१०१२
म. ग्रं. सं. ठाणे
विषय चरित्र
नं. २९८

मुंबई इलाख्याचे प्रसिद्ध गव्हरनर

नामदार

# [illegible] एल्फिन्स्टन

[illegible]

(उत्तरार्ध)

REFBK-0000754

मुंबई इलाख्याचे प्रसिद्ध गव्हरनर

नामदार

# मौन्ट स्टुअर्ट एल्फिन्स्टन

## साहेब यांचें चरित्र.

(उत्तरार्ध)

---

लेखक

**कृष्णाजी बल्लाळ गोडबोले**

(संस्कृत गद्य रामायण, अनाथ पांडुरंग, विद्यमान एतद्देशीय राज्यें, संस्थानें, जाहागिरी यांचा इतिहास, राबिनहुड इत्यादि पुस्तकांचे कर्ते.)

पुणे बुधवार पेठ घर नंबर १४४ येथें **त्रिंबक सिताराम जोशी** यांनीं अ[illegible]ाकरितां छापिलें.

REFBK-0000754

७५८

शिराळकर [illegible], १००, बुधवार पुणें.

**सन १९११**

किंमत १ रुपया, ट. खर्च वेगळा.

हें पुस्तक सन १८६७ च्या २५ अक्टाप्रमाणें रजिस्टर
करून मालकानी सर्व हक्क आपल्याकडे ठेविले
आहेत.

# विज्ञप्ति.

धि ऑनरेबल मौंट स्टयुअर्ट एल्फिन्स्टन साहेबाच्या चरित्राचा पूर्वार्ध प्रसिद्ध झाल्यावर थोडक्याच दिवसांत उत्तरार्ध प्रसिद्ध व्हावयाचा होता व तो ठरल्याप्रमाणें होईल अशी आह्मांस खात्री वाटत होती ह्मणून पूर्वार्ध प्रसिद्ध झाला. तसें नसतें तर दोन भाग न होतां सर्व चरित्र एकपुस्तकरूपानें एकदमच प्रसिद्ध झालें असतें; त्याला फार तर चार महिने अवकाश लागता इतकेंच. परंतु आमची खात्री, आशा वगैरे बाजूस राहून उत्तरार्ध कसा प्रसिद्ध होतो अशी आह्मांस काळजी उत्पन्न झाली. तिचें निवारण होऊन इतक्या दिवसांनीं तरी आह्मास हा भाग प्रसिद्ध करतां आला याजबद्दल संतोष वाटतो. हातीं धरलेलें काम शेवटास गेलें, महाराष्ट्र वाङ्मयाच्या भाण्डारांत खंडीमध्यें पावरती भर टाकण्याची सेवा आपल्या हातून घडावी अशी इच्छा उत्पन्न झालेली पूर्ण झाली, ज्या इतिहासप्रिय किंवा अन्य जिज्ञासु वाचकांस पूर्वार्ध वाचून उत्तरार्ध वाचण्यास मिळावा अशी इच्छा झाली असेल त्यांनां ती आपली वासना पूर्ण करून घ्या असें ह्मणण्याचा सुयोग आला याबद्दल आनंद वाटतो.

आह्मी हातीं घेतलेला हा चरित्रग्रंथ लिहून पुरा झाला आणि मग तो डेक्कन व्हरन्याक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीकडे पाठविला. त्याचें परीक्षण होऊन तो बक्षीस देण्यास योग्य ठरला. मग चिटणिसाकडून आह्मास समज आली कीं एकावर्षाचे आंत ग्रंथ छापून प्रसिद्ध करावा ह्मणजे ठरलेलें बक्षीस मिळेल. आह्मास बक्षिस मिळणार ह्मणून आनंद झाला, परंतु पुस्तक छापण्याचें काम खर्चाचें असल्यानें कसें होईल ही काळजी पडली. स्वतः खर्च करण्याचें ह्लोत नसल्यानें कोणी छापखानेवाले वगैरे प्रकाशक मालकी हक्क घेऊन

छापतील तर पहावें ह्मणून यत्न करूं लागलों. अखेर इन्दुप्रकाशाचे मालक मालकी हक्क घेऊन पुस्तक छापून प्रसिद्ध करण्यास तयार झाले. एका चांगल्या गृहस्थाच्या मार्फतीनें ठराव होऊन छापण्याचें काम सुरू झालें. परंतु आह्मी मुंबईपासून दूर अंतरावर असल्यानें प्रूफ तपासून पाठविण्यांत दिवस मोडूं लागले. मुदतींत काम होईलसें दिसेना तेव्हां मुंबईस जाऊन बसणें भाग पडलें. सर्व काम पुरें होईपर्यंत आह्मास तेथें रहाण्यास सवड मिळेना सबब पुस्तकाचे दोन भाग करावे, पूर्वार्ध प्रसिद्ध करून डे० सोसायटीकडे मुदत मागावी असें ठरलें. सोसायटीनें कृपा करून जास्त मुदत दिली. छापणा-नेवाले यांशीं ठरल्यावेळीं आह्मी पुनः मुंबईत जाऊन बसण्यास सिद्ध झालों. परंतु मग त्यांची मर्जी फिरली. आतां आह्मी उत्तरार्ध छापीत नाहीं, तुमचा तुह्मी छापा. पैसे घाल तर आह्मी छापून देऊं असें त्यांणीं साफ सांगितलें. असें कां ह्मणून विचारलें असतां आह्मास व्हावा तसा नफा नाहीं, पुस्तकाची विक्री व्हावी तशी होत नाहीं ह्मणाले. लेखी करार झाला असून ते असें बोलले तेव्हां आह्मी चकित झालों. परंतु त्यांच्याशीं वाद घालीत बसण्यांत अर्थ नाहीं असें समजून पुढच्या उद्योगाल लागलों. सोसायटीकडे पुनः मुदत मागितली आणि पुण्यास छापण्याचें काम सुरू केलें. तेथें प्लेग सुरू झाल्यानें तें नीट चालेना, धरल्या मुदतीत तडीस जाईलसें दिसेना अर्धेमुर्धे झाल्यावर आमच्या हातून होत नाहीं; आज कंपाझिटर नाहीं, उद्यां प्रेसमन नाहीं, अशी वरचेवर हरकत येते, तुमचा तगादा रहात नाहीं; तर आतां दुसरीकडे पहा, असें सांगण्याच्या घाईस शिराळकर आले. ती स्थिति सोसायटीस कळवून पुनः मुदत मागावी लागली. अखेर प्रयासानें काम तडीस गेलें आणि पूर्णग्रंथ वाचकांपुढें ठेवतां आला याजबद्दल संतोष वाटतो.

पूर्वार्ध प्रसिद्ध झाला तेव्हां तो धि ऑनरेबल श्रीमंत राजश्री

बाबासाहेब घोरपडे यांस दाखविला. तो वाचून श्रीमंत खुष झाले व त्यांणीं उदारपणें मोठा आश्रय दिला ह्मणून उत्तरार्धाचें अकस्मात अंगावर पडलेलें काम आह्मास हातीं घेतां आलें. सबब तो प्रसिद्ध झाल्याचें श्रेय श्रीमंतांस आहे.

पुन: पुन: मुदत मागावी लागली तरी मागितली तसतशी सोसायटीनें दिली याजबद्दल आह्मी आभारी आहों.

सन १७१४ पासून १८१८ पर्यंत ह्मणजे शंभर वर्षांवर पेशवाई चालली. परंतु श्रीमंत नारायणरावाचा वध होऊन जो कठिण प्रसंग आला, त्यांतून पार पडून श्रीमंत सवाई माधवरावाचे कारकीर्दीत नानाफडणिसांनीं ती कोणत्या रंगारूपास आणली आणि श्रीमंत दुसरे बाजीराव गादीवर आल्यापासून तिला कशी उतरती कळा लागली हें सर्व विश्रुत आहे. परंतु पुढें अत्यल्प काळांत सर्वस्व नाश कसा झाला, पुण्यांत इंग्रजांचा अम्मल कसा बसला, नवीन घेतलेल्या मुलखाची व्यवस्था कशी लागली, पुढें तो मुंबईइलाख्यांत सामील होऊन राज्यकारभार कशाप्रकारें चालू लागला, कायदेकानू कसे झाले, त्यांची अम्मलबजावणी कशी होऊं लागली, एल्फिन्स्टन साहेब मुंबईस गव्हरनर झाल्यानें दक्षिण देशाचें हित झालें कीं अहित झालें मुंबईइलाख्यांत विद्याप्रसाराचा विचार आणि विद्यार्जनाच्या सोई कशा झाल्या, सुधारणा कशी होऊं लागली इत्यादि अनेक गोष्टि साधार समजण्याला एल्फिन्स्टन साहेबाच्या चरित्रासारखें दुसरें साधन नाहीं; असें दिसून आल्यावरून आह्मी हा ग्रंथ फार परिश्रमानें तयार केला. तो डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्स्लेशन सोसायटीस पसंत होऊन बक्षीस देण्याचें ठरलें तेव्हां आमचे महाराष्ट्र देशबंधूस ही आमची अल्पसेवा मान्य होऊन त्यांजकडूनही प्रोत्साहन मिळेल अशी आशा बाळगण्यास कांहीं हरकत नाहीं. पूर्वार्ध प्रसिद्ध झाल्यास बरेच दिवस झाले, परंतु त्याचा खप व्हावा

तसा झाला नाहीं याचें कारण कोणी कोणी आह्मांस असें सांगतात कीं साधारण वाचकवर्गाची प्रवृत्ति गोष्टी, कादंबऱ्या, नाटकें इत्यादि वाचण्याकडे जितकी आहे तितकी इतिहास वाचण्याकडे नाहीं, त्यांत ही चारित्रवाचनाकडे आणि त्यांतून परद्वीपस्थ पुरुषांचीं चरित्रें वाचण्याकडे विशेषच कमी. हें खरें असावें; बऱ्याच अंशीं अनुभव असाच आहे. तथापि परद्वीपस्थ पुरुष एवढयावरच जाऊं नये. निदान महाराष्ट्रीयांनीं तरी जशीं महाराष्ट्रांतील पुरुषांचीं चरित्रें उत्सुकतेनें वाचावयाचीं तसेंच ब्राह्मणीराज्य नष्ट होऊन त्याची अखेरची व्यवस्था ज्या पुरुषाच्या हातून लागली त्याचें चरित्र वाचावें. तें पुष्कळ बोधप्रद आहे असें वाचलें तर कळेल.

पूर्वार्ध प्रसिद्ध झाला तो वाचून कांहीं गृहस्थांनीं आह्मास उत्तेजनपर अभिप्राय कळविले; त्यांपैकीं एकाचा येथें उल्लेख केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. हा कोणा मोठ्या थोर विद्वानाचा किंवा प्रसिद्ध विदुषीचा नाहीं. एका थोर श्रीमान सरदार कुलोत्पन्न, साठी उलटलेल्या, वयोवृद्ध बाईसाहेबांचा आहे. त्या आपल्या घराण्याच्या चालीप्रमाणें लहानपणीं लिहिण्यावाचण्यास शिकलेल्या, पोथीपुस्तक वाचण्यांत नित्य तास दोन तास वेळ घालविणाऱ्या आहेत. नवीन कांहीं पुस्तक आलें ह्मणजे तें वाचावयाचें असा त्यांचा परिपाठ आहे. आमचें पुस्तक वाचून त्या ह्मणतात—"एल्फिन्स्टन साहेबांचा इतिहास तुह्मी जो लिहिला तो फार चांगला आहे. तुह्मी फार श्रमाचें काम केलेंत. आतां दुसरा भाग वाचणेची उत्कंठा फार झाली आहे. तो लौकर तयार करावा. श्रीमंत माजी सरकार बाजीरावसाहेब पेशवे पुणें सोडून ब्रह्मवर्तास योगक्षेम करण्यास गेले,

त्याची खरी हकीगत तुह्मी लिहिलेल्या चरित्रांत दिसून आली. आजदिनपर्यंत कांहीं तरी ऐकत होतों. तुह्मी जगापुढें हा आरसा ठेविला आहे."

एल्फिन्स्टन चरित्र वाचून महाराष्ट्रीयांनीं पुष्कळ गोष्टी घेण्यासारख्या आहेत, सबब ज्या कोणी पूर्वार्ध वाचला असेल त्यांस उत्तरार्ध वाचण्यास व ज्यांनीं तो वाचला नसेल त्यांस दोनही वाचण्यास ही विज्ञप्ति आहे.

कुरुंदवाड, तारीख ९ माहे जुलै सन १९१२. } कृ. ब. गोडबोले.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

# एल्फिन्स्टनचरित्र

## उत्तरार्ध.

### भाग १.

हिंदुस्थानचे गव्हरनर जनरल लॉर्ड **हेस्टिंग्ज** यांणीं पुण्याची गादी बुडवावयाची, पेशव्यांच्या वंशाचें नांव राहूं द्यावयाचें नाहीं, असा निश्चय करून त्याप्रमाणें **एल्फिन्स्टन** साहेबास हुकूम पाठविला व नवीन काबीज होणाऱ्या मुलखाची व्यवस्था लावण्यास त्यासच अधिकार देऊन कमिशनर हा हुद्दा दिला व दक्षिणेंतल्या सर्व फौजेवर हुकूम त्याचा ठेविला, हें मागें सांगितलेंच आहे. ही **एल्फिन्स्टन** साहेबाची नेमणूक इसवी सन १८१८ च्या अगदीं आरंभीं जानेवारी महिन्यांतच झाली. तेव्हांपासून त्याच्या अंगावर जें काम पडलें तें मुख्यत्वें राज्यकारभाराचें व तें अगदीं नवीन व्यवस्था लाऊन मुळापासून करावयाचें होतें; तसल्या कामाचा त्याला अनुभव मुळींच नव्हता. कारण तो जरी पुष्कळ दिवस रेसिडेंट होता तरी आतांच्या रेसिडेंटांप्रमाणें दरबारच्या राज्यकारभाराकडे तेव्हांच्या रेसिडेंटांना पहावयाचें नसे. ज्या मुलखाची त्याला व्यवस्था लावावयाची होती तो टिपूचा वगैरे जे इंग्रजांनीं पूर्वीं घेतले होते त्यांपेक्षां फार मोठा असून त्यांतले लोक शूर, लढवय्ये होते व त्यांतला बराच भाग पेशव्यांच्या सरदारांच्या ताब्यांत होता. तो लहानपणींच घर सोडून आला होता त्याला फार दिवस झाले असून त्याला घरीं जाण्याची उत्कंठा फार लागली होती परंतु सवडच मिळाली नाहीं ती आतां मिळण्याची आशा दिसत होती; नवीन घेतलेला मुलुख आपल्या ताब्यांत केव्हां येईल असें मुंबई सरकाराला होऊन तें अगदीं हपापल्या सारखें झालें होतें; इत्यादि अनेक कारणांमुळें त्याचें मन अस्वस्थ होत होतें. तरी तशा स्थितींत, अगदीं अल्प काळांत त्याणें जी राज्यव्यवस्था केली, आणि पुढें थोड्याच दिव-

सांत मुंबईच्या गव्हरनराच्या जागीं त्याची नेमणूक झाली तेव्हांपासून आठ वर्षे पर्यंत त्यानें तें काम पुढें होणाऱ्या गव्हरनरांनीं कित्ता ध्यावा असें उत्कृष्ट प्रकारें केल्यामुळें त्याची जी लोकांत मान्यता व कीर्ति झाली ती अजरामर होऊन बसली आहे. तेव्हां अर्थातच त्याच्या चरित्रांतला हा भाग मागच्यापेक्षां अगदीं निराळा असून फार महत्वाचा आहे. तर आतां आपण त्याकडे वळूं.

एल्फिन्स्टन साहेबाची नेमणूक राज्यकारभार करण्याच्या कामीं झाली तेव्हां त्याच्या अंगावर जें काम पडलें तें मुलुख जिंकून घेण्याच्या कामापेक्षां अधिक जोखमाचें होतें. आतां कंटाळा यावयाला आणि उदासीन व्हावयाला वेळ नाहींसा झाला, तसा त्याचा जो अत्यंत प्रिय व्यासंग—ग्रंथावलोकन—त्यालाही वेळ मिळेनासा झाला. तरी जरा सवड सांपडल्याबरावर तो पुस्तक काढून वाचल्यावांचून रहात नसे. बाजीरावाला धरण्याकरितां त्याच्या पाठीमागून पळण्याची धामधूम चालली होती, तेव्हां देखील त्याणें आपल्या आवडीचे कांहीं ग्रंथ बरावर घेतले होते आणि फुरसतीप्रमाणें ते थोडे बहुत वाचीत असे.

आष्टीची लढाई होऊन बाजीरावाची बहुतेक निराशा झाल्यासारखी झाली आणि पुढें लौकरच त्याचे बहुतेक सरदार त्याचा पक्ष सोडून हळुहळु आपआपल्या घराचा मार्ग धरूं लागले, तेथपर्यंत व पुढेंही बरेच दिवस, एल्फिन्स्टन साहेब लष्कराबराबर हिंडत होता, परंतु आपलें, नवीन राज्याचा बंदोबस्त करण्याचें, काम करण्यांत कसूर होऊं देत नव्हता. प्रथम सातारच्या राजाला गादीवर बसविण्याचें जें काम त्याच्या हातून घडलें तें त्याला संतोषप्रद वाटलें. प्रतापसिंह महाराजांनां राज्य किंवा फक्त जाहागीर देण्याचें गव्हरनर जनरलानें त्याच्यावर सोंपविलें होतें, परंतु त्याणें त्यांनां जाहागीरदार करून टाकलें नाहीं. पेशव्यांचें सारें राज्य आह्मी आतां घेणार, तेव्हां त्यांच्या प्रजेला मराठी रिवाजाची चाकरी मिळण्याला एक स्थळ असणें अवश्य आहे, असें ह्मणून त्याणें राज्य स्थापून दिलें. महाराज कारागृहांत होते ते

मुक्त होऊन जाहागीर मिळती तरी तेवढ्यांत खुष झाले असते. परंतु त्यांनां राज्यपद दिल्यानें महाराष्ट्रांतल्या साऱ्या लोकांनां आनंद झाला आणि त्याची कीर्ति झाली. हल्लींचा बहुतेक सातारा जिल्हा हेंच तें सातारचें राज्य. तें पुढें **डलहौसी** साहेबानें खालसा केलें. ह्याचा विस्तार ५००० चौरस मैल आणि लोकवस्ती १००००० आहे.

**एल्फिन्स्टन** साहेबाच्या अंगावर जें काम पडलें तें मोठ्या जोखमाचें व विकट होतें हें तर खरेंच परंतु एका अर्थानें पाहिलें तर तें सोपेंही होतें; कारण त्यावेळीं इंग्रजसरकारचें सैन्यबळ पूर्वींपेक्षां फार वाढलेलें असून अगदीं शिखरास जाऊन पोंहोचलेलें होतें. येथून तेथून साऱ्या हिंदुस्थानांत पाहिलें तर प्रबळ काय ते एक इंग्रज दिसत होते. त्यांणीं नवीन घेतलेला दक्षिणेंतला व मध्य हिंदुस्थानांतला मुलुख हूं कीं चूं न करितां त्यांच्या ताब्यांत गेला. एकंदर लोकसंख्येंत शेतकऱ्यांचा भरणा मोठा आणि त्यांची आपल्या वतनवाडीवर, जमीनजुमल्यावर, घरादारावर, गांवावर व चालीरीतींवर प्रीति मोठी. हिंदुस्थानाचा इतिहास ज्या काळापासून उपलब्ध आहे, तितकें मागें जाऊन पाहिलें तरी, एक राज्य बुडालें आणि त्याच्या जागीं दुसरें झालें तर त्याच्या बरेवाईटपणाची कांहीं एक विचक्षणा करीत न बसतां, हे लोक जो कोणी गादीवर आला त्याच्या हाताखालीं मुकाट्यांनीं नांदूं लागले असेंच दिसतें. ह्मणून ह्या वर्गापासून अपाय होईल ही भीति मुळींच नको होती. बाजीरावानें पुण्यांत चोहींकडून अफाट सैन्य जमवून लढाई आरंभिली, तेव्हां आतां हे पेशवे इंग्रजांनां हिंदुस्थानांतून हांकून लावतात असें एकून एक मराठ्याला वाटूं लागलें होतें. पुढें खडकीची लढाई होऊन श्रीमंतांनां अपयश आलें ह्मणून कांहीं लोकांची आशा खुंटली नाहीं; कारण तींत कांहीं त्यांचा चुराडा उडाला नाहीं. परंतु पुढें आष्टीच्या प्रसंगांत श्रीमंतांच्या जिवाला ज्याचा मुख्य आधार तो मराठ्यांतला खरा नांवलौकिकाचा वीर, बापू गोखला पडला आणि साताऱ्यास राजाला आणून गादीवर बसवून, आतां पेशव्यांचें नांव आम्ही पुनः निघूं देणार नाहीं असें जेव्हां एल्फिन्स्टन साहेब प्रसिद्धपणें बोलला तेव्हां पुण्यांत पुनः पेशवाई होईल हा साऱ्यांचा भ्रम अगदीं दूर झाला, आणि आतां श्री-

मंतांची कृपा झाली काय आणि रोष झाला काय, फळ एकच असें सर्वांना वाटूं लागलें. मग एल्फिन्स्टन साहेबानें प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्याची खेड्यापाड्यांतून सुद्धां चर्चा होऊं लागली. लढाईला आणि बेबंदशाईला लोक कंटाळून गेलेच होते, त्यामुळें त्या जाहीरनाम्यांतील मजकूर पाहून त्यांनां जिकडे तिकडे शांतता होणार ह्मणून समाधान वाटलें. त्यांत लिहिल्याप्रमाणें वागलें नाहीं तरच आपलें नुकसान होणार, हें मनांत आणून वतनदार, इनामदार, वगैरे लोक तर तेव्हांच वळले. तेव्हां एकंदर लोकांच्या मनाचा कल पाहून त्यांनां संतोष वाटे असे उपाय योजून त्यांनां परकीय अमलाचा जाच होऊं नये अशी व्यवस्था करण्याकडे लक्ष ठेऊन मुलखाचा बंदोबस्त राखावयाचा, हेंच मुख्यत्वें करावयाचें होतें. हें सांगावयाला सोपें आहे, परंतु कोणतीही वस्तु संपादण्यापेक्षां संपादलेल्याचें संरक्षण करून उपभोग घेण्याला अक्कल ज्यास्त लागत असते, अशी जी एक सामान्य व्यवहारांत ह्मण आहे ती खरी कीं खोटी, हें त्याला सर्वांच्या निदर्शनास आणून द्यावयाचें होतें.

एल्फिन्स्टन साहेब मोठा मुत्सद्दी, खरा राजकार्यधुरंधर पुरुष, अशी त्याची जी मोठी कीर्ति गाजत आहे, तिचें बीज पाहूं गेलें तर असें दिसतें कीं त्याणें आपल्या बुद्धिचातुर्यानें असें ताडलें कीं हिंदुस्थानांत ज्या राज्यपद्धति आणि लोकसमाजांतले रीतरिवाज शेकडों वर्षें चालत आले आहेत, ते आपल्या दृष्टीला बरे दिसत नसले, तरी त्यांत चांगलें कांहींच नाहीं असें होणार नाहीं. याजकरितां त्यांत एकदम उलटापालट करण्याच्या भरीस पडूं नये. आपल्या पहिल्या कायदेकानूंत फेरफार न होतां, आतां आपल्यावर राज्य पहिल्यापेक्षां चांगलें चालेल एवढेंच लोकांनां वाटावें अशा प्रकारें राज्य चालावें ह्मणून त्याणें फार मेहेनत केली. त्याला असें वाटत होतें कीं लोकांचे खरे हक्क असतील तेवढे चालविले ह्मणजे झालें असें नाहीं; तर त्यांच्या कांहीं वेडगळ समजुती असल्या तरी त्या देखील ऐकिल्या पाहिजेत.

त्याणें गव्हरनर जनरलाला असें लिहिलें कीं अगदीं न्यायानें राज्य चालविलें तरी तें जर लोकांच्या संवई आणि स्वभाव यांच्या उलट असेल,

तर तें त्यांनां सुखवह होणार नाहीं. त्यालों एवढें कळत होतें कीं परकीय लोकांचें राज्य ह्मटलें ह्मणजे तें लोकांनां नेहेमी जांचक वाटावयाचेंच. तसें वाटूं नये ह्मणून जिंकणारांनीं आपली पराकाष्ठा करावयाची ह्मटलें तर इतकें करावें कीं त्या जिंकलेल्या लोकांनां आपल्या मानेवरचें हें परकीयांचें जूं जितकें हलकें वाटणें शक्य असेल आणि जितक्या थोड्या जागीं टोंचण्यासारखें असेल तितकें हलकें वाटावें आणि थोडें टोंचावें असें करण्याविषयीं जपावें. त्याणें साताऱ्यास राजाची स्थापना केल्यानें, इंग्रज शिवाजी महाराजांचें घराणें बुडवीत नाहींत असें वाटून लोकांनां संतोष झाला. बाजीराव नामर्द मनुष्य ह्मणून लोकांनां त्याचा जरी तिरस्कार येत होता तरी त्यांनां स्वराज्य नको असें वाटत नव्हतें. म्हणून पुष्कळ घरंदाज लोक त्याचा पक्ष धरून राहववलें तेथपर्यंत राहिले. कित्येक निस्सीम स्वामिभक्त होते ते त्याची वाट ती आपली वाट, असें म्हणून अखेर बुडालेदेखील. हें सर्व तो समजून होता. असो.

एल्फिन्स्टन साहेबाची दक्षिणेचा कमिशनर म्हणून नेमणूक होऊन त्याच्या हातांत हुकूम येऊन पडला, तेव्हांपासून लागलाच तो पुढच्या विचारास लागला. परंतु कामाला खरी सुरुवात होऊन तें लोकांच्या दृष्टोत्पत्तीस व अनुभवास जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून येऊं लागलें. तें पुरें होण्याला दोन वर्षें तरी लागतील असा त्याचा अदमास होता. परंतु तितका वेळ त्याला त्या जागीं रहावयास सांपडलें नाहीं. एका वर्षाच्या आंतच त्याची बदली झाली. तितक्या काळांत त्याणें कशी व्यवस्था केली ती आतां सांगावयाची. नवीन मुलुख काबीज झाला म्हणजे त्यावर अम्मल बसवितांनां राज्याकर्ते आणि प्रजा ह्या उभयतांचीं मनें एकमेकांविषयीं साशंक असतात, त्यांत अगदींच परकीयांशीं गांठ असली म्हणजे तर असा प्रकार विशेषच होत असतो. प्रजेला वाटत असतें हे कसे झाले तरी परधर्मी, परजातीय, परमुलखी लोक; ह्यांची सारी नजर आपली तुंबडी भरण्याकडे असणार, तेव्हां ह्यांचें आमचें कसें जुळणार? आमच्या विषयीं ह्यांच्या मनांत दयामाया असण्याचा अर्थाअर्थी संबंध नाहीं. हे अनेक तऱ्हांनीं आह्माला पीडितील. राज्यकर्त्यांनां वाटत असतें, आह्मी

हें राज्य घेतलें खरें, परंतु ह्या लोकांचें आमच्यावर प्रेम जडणें अशक्य. ह्यांची आमची जत, धर्म, भाषा, रीतभात, आचारविचार, उद्योगधंदे करण्याची तऱ्हा, सर्वकांहीं वेगळें. तेव्हां ह्यांचें आमचें जमावें कसें? आह्मी जरी कांहीं केलें तरी तें ह्यांनां गोड लागेलच असा भरंवसा नाहीं; हे केव्हां बिथरून आमच्यावर उठतील ह्याचा नेम नाहीं; याजकरितां आपण फार जपून सावधपणानें राहिलें पाहिजे. ह्यांच्यावर विश्वास ठेऊन उपयोगीं नाहीं. अशी उभय पक्षांच्या मनाची स्थिति उलट असल्यानें तो प्रसंग फार नाजुक असतो. तो निभावून नेण्यास राज्यकर्ते पुरुष खरे मुत्सद्दी हवे लागतात. एल्फिन्स्टन साहेब तसा होता हें कंपनीसरकारचें व दक्षिणेंतील प्रजेचें भाग्य ह्मटलें पाहिजे. पेशव्यांच्या मुलखांतल्या प्रजेंत, लहानापासून थोरापर्यंत, सर्व वर्गांतल्या लोकांत असंतोष उत्पन्न होण्याचीं मूळ बीजें कशीं कशीं होतीं आणि राज्याची व्यवस्था आपण कशी कशी केली, तें वरिष्ट सरकारास कळविण्याकरितां त्याणें एक खलिता लिहिला; त्यांत ही राज्यक्रांति लोकांनां मान्य होईल असें आपल्याला खचित वाटतें असें त्याणें लिहिलें होतें. त्यांतला एक उतारा खालीं देतों.

"शेतीभाती करणाऱ्या एकंदर लोकांच्या मनाचा कल पाहिला तर तो शांतता व्हावी इकडे फार आहे. लढाई सुरू झाली किंवा लुटारू लोकांच्या टोळ्या फिरूं लागल्या तर प्रथम त्यांचें नुकसान होत असतें. मराठ्यांच्या स्वातंत्र्याचा त्यांनां केवढा जरी अभिमान असला, तरी पेशवे पुनः गादीवर केव्हां येतील अशी ते मनापासून वाट पहाणार नाहींत. कारण ब्राह्मणी राज्यांत त्यांच्यावर कांहीं कृपा नव्हती."

"आह्मी जमिनीवर फाळा थोडा बसविला आणि रक्षण केलें ह्मणजे ते आमचे उपकार मानतील असें आह्मांला वाटेल परंतु तसे न मानणारे त्या वर्गांत देखील पुष्कळ निघतील. देशमुख व इतर जमीनदार, पाटील व इतर गांवकामदार, यांणीं रयतेला पिळूं नये ह्मणून आह्मी जपूं लागलों ह्मणजे त्यांचे

अधिकार नाहींसे होत चालले. मग ते बिथरून आमच्यावर उठतील आणि ज्यांच्यासाठीं आह्मी त्यांचा रोष संपादणार त्यांनांच चिथवून आमच्यावर उठवितील. इतकें करण्यापुरतें त्यांचें त्यांच्यावर बहुतकरून वजन आहे. शिपायगिरीचा धंदा करणारे सारे व त्यांचे सारे आप्तसंबंधी, ज्यांचा फक्त नोकरीवर निर्वाह होता ते सारे, ज्या कोणाचा एक भाऊ नोकरीवर असे आणि तो आतां घरांत येऊन रिकामा बसला आहे ते सारे, ज्यांच्या जवळ घोडे होते किंवा लष्करांत दुसऱ्या कांहीं तऱ्हेनें ज्यांचा निर्वाह होत असे ते सारे, असे हे एकंदर लोक आमचा आणि आमच्या कायमच्या पट्टणींचा द्वेष करतात आणि त्यांची सांप्रतची स्थिति पाहून वाईट वाटून व देशाभिमानामुळें त्यांचे शेजारी पाजारी त्यांनां सामील होतात. शिपायगिरी करणारे आणि शेती करणारे यांचा संबंध आहे, त्याचा किंचितकाळपर्यंत जरी असा वाईट परिणाम झाला तरी एकंदरींत तो हितावह आहे. कारण त्याच्या योगानें शिपायगिरी करणाराला चरितार्थ चालण्याचा मार्ग दिसतो आणि शेतीला उत्तेजन दिलें ह्मणजे तो मार्ग अधिक सुलभ होईल."

असो. यावरून एकंदरींत लोकांच्या मनाची स्थिति कशी होती आणि एल्फिन्स्टन साहेबाला किती जपून वागावें लागलें असेल याचें अनुमान करतां येईल.

नवीन राज्याची व्यवस्था करतांना एल्फिन्स्टन साहेबाला लहान थोर साऱ्याच गोष्टींकडे लक्ष द्यावयास पाहिजे होतें. अर्थातच जमीनबाब, सायरबाब, लोकसंरक्षण, मुलखाचा बंदोबस्त, न्यायपद्धति, लोकशिक्षण, ह्या त्यांत मुख्य असून जाहागीरदारप्रकरण व धर्मसंबंधाच्या गोष्टी ह्याही तशाच मोठ्या विचाराच्या होत्या. त्यांची व्यवस्था त्याणें कशी लाविली तें पहावयाचें.

आपल्या हाताखालीं आलेला मुलख केवढा, कोणत्या प्रकारचा व त्यांत लोकवस्ती किती आणि कशा तऱ्हेची आहे हा विचार एल्फिन्स्टन साहेबानें आधीं केला आणि मग कोणत्या भागांत काय केलें पाहिजे तें पाहिलें.

त्याचा अदमास असा झाला कीं ह्या मुलखाचें क्षेत्रफळ सुमार ५०००० पन्नास हजार चौरस मैल असावें आणि लोकवस्ती ४०००:०० चाळीस लक्ष असावी. ह्याचे स्वभावतःच तीन भाग झालेले असून ते एकमेकांपासून अगदीं भिन्न आहेत व त्यांतले लोक ही तसेच तीन प्रकारचे आहेत. अगदीं उत्तरेकडचा भाग खानदेश; हा दोन पर्वतांच्यामध्यें असून बहुतेक सपाट मैदान आहे, व पुष्कळ सुपीक आहे. तापी नदी यांतूनच वहात वहात गेली आहे. येथील हवा फार उष्ण आहे. सन १८०२ मध्यें ह्याला होळकराच्या सैन्यानें फार उपद्रव दिला आणि पुढच्या वर्षी दुष्काळ पडला त्यामुळें त्याची फार नासाडी झाली होती. पेशवाईच्या अखेरपर्यंत तो कांहीं सुधारला नव्हताच. त्याच्या खालीकडे महाराष्ट्र देश. यांत नगर प्रांत, पुणें प्रांत आणि सातारचें नवें राज्य होतें. ह्याच्या पश्चिमेला सह्याद्रिपर्वत व दक्षिणेला कृष्णा नदी असून पूर्व बाजू मोकळी आहे. ती अगदीं दक्षिणेंतल्या सपाट मैदानापर्यंत लागलेली आहे मराठे लोकांचें जें अगदीं मुख्य ठिकाण तें हें. ह्यांतल्या डोंगरांवर त्यांनीं अनेक मोठमोठे किल्ले, गड, कोट बांधून जागोजाग बंदस्ती केलेली होती. त्या किल्ल्यांची त्यांनां आवड फार असे आणि शत्रूला हे अगदीं अजिंक्य आहेत असें ते समजत असत. त्यांचे प्रसिद्ध दमदार दक्षणी घोडे व तट्टे याच मुलखांत पैदा होऊन कुरणांत चरून तयार होत असत. ह्या मुलखाची हवा उत्तम असून लोकांच्या अंगीं शौर्य व राज्यकर्तृत्व हे तें कां नाहीं तें सांगावयाचें कारणच नाहीं. कृष्णेच्या दक्षिणेचा प्रदेश तें कर्नाटक. त्याची हद्द खालीं म्हैसूरच्या राज्यापर्यंत होती. मद्रास इलाख्याला सोडलेला मुलुख (ceded districts) म्हणावयाचा तो ह्याच्या हद्दीवरच होता. ह्यांत बेळगांव व विजापूर जिल्हे असून दक्षिण महाराष्ट्रांतल्या जाहागीरदारांचे मुलुख ही होते. हा भाग फार सुपीक असून कापूस पिकण्याची जी उत्तम प्रसिद्ध काळी जमीन तिचीं अफाट मैदानासारखीं शेतें यांतच आहेत. ह्याची हवा फार उष्ण आहे. ह्यांतल्या लोकांची भाषा कानडी आहे. त्यांचें आणि मराठ्यांचें कांहीं सख्य झालें नाहीं. ते त्यांनां परकेच समजत आणि त्यांचा नेहेमी द्वेष करीत असत. ते स्वभावानें

अगदीं शांत आणि मनमिळाऊ आहेत. जनरल मनरो त्या प्रांतीं अम्मल बसवावयास गेला तेव्हां मराठ्यांनां हुसकून लावण्यास ते तेव्हांच सामील झाले. चौथा भाग कोकण प्रांत. परंतु तो मुंबई सरकारानें फौज पाठवून सर केला होता व त्याची व्यवस्था तेच लावीत होते. **एल्फिन्स्टन** साहेबानें तिकडे पाहिलें देखील नाहीं. नेमाड प्रांतांतला कांहीं मुलुख पेशव्यांच्या राज्या-पैकींच होता, परंतु तो मालकम साहेबाच्या ताब्यांत गेला होता ह्मणून **एल्फिन्स्टन** साहेबानें तिकडेही पाहिलें नाहीं. त्याचा वसूल सारा २५००० पंचवीस हजार रुपये होता. त्याचें मत असें होतें कीं नेमाडांत शांतता रहा-ण्यास तो कंपनीसरकारच्या ताब्यांत ठेवलाच पाहिजे असें नाहीं, असें दिसलें तर त्याची अदला बदल केली तर बरेंच.

**एल्फिन्स्टन** साहेबानें त्या नवीन राज्यांत अम्मल बसावितांना प्रथम जी व्यवस्था केली ती अगदीं साधी होती. कांहीं अंशीं कालमान मनांत आणून त्याला ती तशी करावीच लागली ह्मटलें तरीही चालेल. कारण इंग्रजी अम्मल हळु हळु बसत गेला पाहिजे, बंगाल वगैरे बराच काळ ताब्यांत असलेल्या मुलखांतल्याप्रमाणें कायदे कानू एकदम लागू करणें आणि त्यांची सक्तीनें बजावणी करणें बरें नाहीं असें त्याचें मत होतें. शिवाय मालकम आणि मनरो हे मोठे अनुभवी व कर्ते पुरुष त्याचे मित्र होते, त्यांनां गुरुस्थानापन्न केल्यासारखें करून त्यांचे अभिप्राय घेऊन त्याप्रमाणें वागावें असें मनांत आणून तो तसें हो करीत होता. मनरो कांहीं अद्याप मद्रासचा गव्ह-रनर झाला नव्हता, परंतु त्याचें सर्व आयुष्य त्या इलाख्यांत नवीन मिळाले-ल्या मुलखाची राज्यव्यवस्था लावण्यांत गेलें होतें. पूर्वीची राज्यव्यवस्था कशी होती तें फारबारीक नजरेनें पाहिलें पाहिजे आणि तींत कांहीं फेरफार नकरतां चालण्यासारखें असेल तोंपर्यंत तर करूंनये, अगदीं अडेल तर तेवढ्यापुरता थोडासा करावा असें त्याचें मत होतें, तें **एल्फिन्स्टन** साहेबानें स्वीकारलें. उभयतांची भेट झाली तेव्हां त्याच्याविषयीं त्याचा ग्रह कसा झाला तें मागें सांगण्यांत आलेंच आहे. तो भेटीचा योग सहज आलेला नव्हता

**एल्फिन्स्टन** साहेबानें त्याला मुद्दाम बोलाविलें होतें. असो. **मालकम** साहेबाचें अंतःकरण तर आमच्या लोकांविषयीं फार दयार्द्र असे. त्यांत त्याचा अंतस्थ हेतु तत्वविचारास अनुसरून कां असेना. एतद्देशीयांवर दया करावी, त्यांच्या दुराग्रही समजुती उदार मनानें चालवाव्या आणि त्यांची मोठेपणा मिळवण्याची हौस ही भागवावी, हे गुण **एल्फिन्स्टन** साहेबानें त्याच्यापासून घेतले. मालकम साहेबाची योग्यता तो कशाप्रकारची समजत होता तें त्याच्या रोजनाम्यांतील पुढील लेखावरून कळतें. तो ह्मणतो—

"राजकार्यधुरंधरत्वासंबंधानें त्याचे जे विचार आहेत ते खरोखर शहाणपणाचे आणि थोरपणाचे आहेत; आणि त्यांत ह्या देशांतल्या लोकांनां ममतेनें आणि सदयपणानें वागवावें असें जें त्याचें मत आहे आणि तो जें करतो, तें त्याचे विचार तसे आहेत ह्मणून किंवा कदाचित त्याच्या अंतःकरणाच्या कोमलपणामुळें असलें, तरी त्या गोष्टीचें महत्व कांहीं थोडें नाहीं. काळ्या पलटणींविषयीं त्याची जी मनोवृत्ति आहे तींत आणि त्यांच्याविषयीं त्याणें जें पुनः पुनः बोलून दाखविलें आहे त्यांत तर तें विशेषच चांगलें दिसून येतें. तो तरुण नाहीं आणि त्याच्या वर्गांतला मुत्सद्दी दुसरा कोणी उरला नाहीं, तोच शेवटचा, हें मनांत आलें ह्मणजे वाईट वाटतें. आलीकडचे मुत्सद्दी हे खरोखर त्याच्यापेक्षां करडा अम्मल करण्यांत अधिक, यांचे विचार अधिक कठोरपणाचे आणि यांच्यांत शहाणपणा कमी आहे. एकादें काम बळाच्या हिमतीवर पार पाडण्याकडे त्याच्यापेक्षां यांचा भरंवसा अधिक, ममतेनें करून घेण्याकडे कमी असतो."

याप्रमाणें त्या दोघां थोर पुरुषांचा कित्ता उचलून, ते केव्हां कसे वागले इकडे नजर पुरवून, लोकांनां खुष राखण्याचें व चौकशी करून माहिती मिळविण्याचें अशीं दोन ही कामें एल्फिन्स्टन साहेबानें एकदम चालविलीं. जसजसा मुलुख काबीज होत गेला तसतसा त्यावर तो आपल्या माहितीचा व खात्रीचा असामी नेमीत गेला. त्याला मनुष्याची

पारख उत्तम होती. त्याणें निवडलेल्या असामींनीं कामें चांगलीं केलीं. सातारचें राज्य एकीकडे वारणेपासून निरेपर्यंत व दुसरीकडे सह्याद्रीच्या पायथ्यापासून तहत पूर्वेस पंढरपूरपर्यंत ह्मणजे जवळ जवळ निजामाच्या हद्दीपर्यंत होतें. त्याची चांगली व्यवस्था लागून ती सुरळीत चालूं लागेपर्यंत तें इंग्रजी अमलाखालींच होतें. त्यावर त्याणें क्यापटन ग्र्यांट डफ याची नेमणूक केली होती हें मागें सांगितलेंच आहे. पुणें शहर व पुणें प्रांत ह्मणजे निरेच्या व भिमेच्या मधला मुलूख, यावर त्याणें क्याप्टन एच. डी.* राबर्टसन याची नेमणूक करून त्याला मुलकी, दिवाणी, व फौजदारीचा अधिकार दिला. क्याप्टन पॉटिंजर यास तसाच अधिकार देऊन त्याची नेमणूक भीमेपासून चांदोरच्या डोंगरांपर्यंतच्या मुलखावर केली, आणि क्याप्टन ब्रिग्ज यास खानदेशावर नेमिलें. त्याला वरच्या सारखे अधिकार देऊन शिवाय भिल्ल लोकांचा बंदोबस्त करण्याकरितां त्यांचा एजंट केलें. त्या जंगली लोकांचा लुटारूपणा व धुंडावा मोडण्यासाठीं व त्या प्रांतांतील मोठी सुपीक परंतु ओसाड पडलेली जमीन बाहेरचे लोक बोलावून आणून लागवड करण्यासाठीं त्याणें मोठी मेहेनत केली.

एल्फिन्स्टन साहेब आपल्या हाताखालचे अम्मलदार हे आपलें कुटुंब ह्मणत असे व ते नेमण्याचा अधिकार आपल्याकडेच पाहिजे असें त्यास वाटत असे. त्याची काबुलास रवानगी झाली तेव्हां बरोबर दिलेली मंडळी त्याला न विचारतां नेमलेली होती ह्मणून त्याला वाईट वाटलें होतें व राग ही आला होता; परंतु पुनः तसा प्रकार झाला नाहीं ह्मणून तो संतोषांत होता. वर सांगितलेले जे अम्मलदार त्याणें नेमिले त्यांनां नांव कलेक्टर हें होतें व

---

* ...राबिसन, गोकुळीं किसन, मेजावर बसुन, लेखणी तासुन, मनसबा केले. जी जी जी. असें एका तमाशांत एक गाणें ऐकावयास मिळालें. तें पुणें प्रांतीं साम्र मिळेल. तिकडील कोणी शोधक वाचक तें मिळवितील तर बरें होईल. यांतील राबिसन ते हेच राबर्टसन.

त्यांचा अधिकार पेशवाईतल्या थोरल्या सुभेदारांप्रमाणें होता. त्यांच्याकडे कामें पुष्कळच होतीं; तीं चालविण्याकरितां हाताखालीं अनुभवीक, माहितगार अशा लोकांच्या नेमणुका झाल्या. त्यांनां पगार कायमचे, त्यांच्या हुद्याला व नांवाला शोभत असे, आणि त्यांनां प्रतिष्ठेनें रहातां येई असे होते.

**एल्फिन्स्टन** साहेबानें नवीन नेमलेल्या ह्या सर्व अधिकाऱ्यांस प्रथम जीं कामें करावयास सांगितलीं त्यांत कांहीं गोष्टींकडे विशेष लक्ष द्यावयाचें होतें. त्या अशा—मुलुख ताब्यांत घेणें; चालू सालचा वसूल किंवा पेशव्यांच्या खजिन्यांत शिल्लक असेल तो पैसा शत्रूंच्या हातीं लागला असतां लढाईकडे खर्च होईल सबब त्यांच्या हातीं न पडे असा बंदोबस्त करणें; लोकांचें संरक्षण करणें व त्यांचीं मनें आपल्याकडे वळविणें, नवीन कांहीं तऱ्हा सुरू करण्याच्या खटपटींत न पडणें आणि फेरबदल दुसरा कांहीं होणार नाहीं, तुमचे जे काय कायदेकानू आहेत त्यांप्रमाणें अम्मलबजावणी, परंतु पहिल्यापेक्षां चांगल्या-प्रकारची होईल, असें लोकांनां दाखविण्याविषयीं झटणें. बाजीराव पळत सुटले तेव्हां बहुतेक फौज त्यांच्यामागें लागली, त्यामुळें त्या अम्मलदारांजवळ प्रथम कांहीं सैन्य राहिलें नाहीं, परंतु त्यांणीं नवीन ठेविलें आणि घेतां आलीं तितकीं ठाणीं घेतलीं, लुटारू लोकांच्या टोळ्या फिरत असत त्यांची पाठ पुरवली, आणि जे गांवांत शिरून लोकांनां लुटीत किंवा त्यांचे हाल हाल करीत त्यांनां फांशीं दिलें; जे किल्ले मजबूद, सहज हातीं न येण्यासारखे होते त्यांवरच्या अम्मलदारांशीं 'तुह्मी आमच्या स्वाधीन व्हाल तर तुमचें नुकसान होणार नाहीं, नाहींतर धडगत लागणार नाहीं हें ध्यानांत ठेवा,' अशा प्रकारें बोलणें लाऊन त्यांस वश करून घेतलें. या प्रमाणें थोडक्याच काळांत सारा मुलुख त्यांच्या ताब्यांत आला. बाजीरावाच्या फौजेंत चाकरी करीत असलेले शिपाई तिकडून सुटल्याबरोबर लागलेच कंपनीच्या नोकरीस रहात. कितीएक ठिकाणीं तर असें झालें कीं, आतां तो आपला धनी नव्हे असें ठरल्यापासून आठ प्रहरांच्या आंत, कंपनीची दारूगोळी घेऊन ते त्याच्यावर बंदुक झाडण्यास धांऊं लागले. "ज्याची

खावी भाकरी त्याची करावी चाकरी " एवढें एक हिंदुस्थानच्या लोकांस माहीत आहे असें जें ह्मणतात, त्याचा अनुभव याहून दुसरा कोणता यावयाचा? या प्रमाणें नुकते ठेवलेल्या लोकांच्या ताब्यांत नवीन काबीज केलेले मुलुख सरकारास द्यावेच लागले, परंतु त्यांतल्या कोणी विश्वासघात केला किंवा हुकूम अमान्य केला, असें मात्र घडलें नाहीं.

लोकांमध्यें कोठें कांहीं बेदिली उत्पन्न होईल, फंदफितूर होईल, तर त्याचा बंदोबस्त ताबडतोब करतां यावा ह्मणून मुलुखभर हेर फिरते ठेऊन गुप्तपणें बातमी काढावी, अशी मराठेशाईंत वहिवाट होती व मुलखाचा बंदोबस्त राखण्यास ती अवश्य आहे असें मराठे समजत. **एल्फिन्स्टन** साहेबाला ती उत्तम वाटली व त्याणें त्यांचा कित्ता उचलला. पेशवाईंत हत्यारबंद लोक देशभर फिरत, परंतु आतां तसें फिरूं देणें बरोबर नाहीं असें वाटून **एल्फिन्स्टन** साहेबानें त्यांच्याजवळ परवाने असले पाहिजेत असें ठरविलें आणि ज्यांच्याजवळ नसतील त्यांचीं हत्यारें काढून घ्यावीं असे हुकूम फिरविले. परंतु मराठ्यांनां निःशस्त्र करावें असा त्याचा हेतु नव्हता, ह्मणून पुढें एक वर्ष लोटल्यावर हत्यारबंद पंचवीस असामी जमून जात असले तरी त्यांनां परवाना नको, त्यांहून जास्त असले तर मात्र घेतला पाहिजे, असें त्याणें फरमाविलें.

ह्या नवीन मुलखाचा वसूल घेण्याची व्यवस्था **एल्फिन्स्टन** साहेबानें बहुतेक पहिली होती तशीच ठेविली. इतर खात्यांत त्याला थोडेबहुत फेरफार करावेसे वाटले त्या मानानें ह्या खात्यांत कांहींच वाटलें नाहीं ह्मटलें तरी चालेल. बाजीरावाच्या कारकीर्दींत महाल मक्त्यानें देण्याची वहिवाट सुरू झाली होती व तीमुळें रयतेवर जुलूम होत होता, ती त्याणें बंद केली आणि नाना फडणिसाच्या वेळेस जी रीत चालू होती ती पुनः सुरू केली. तींत त्याणें फेरफार केला नाहीं असें नाहीं, केला; परंतु थोडा. ती पहिली पद्धत ह्मणजे रयतवारीच होती. तींत विशेष गुण हा असतो कीं रयतेची स्थिति सरकारच्या कामदारांनां कळते आणि आपलें काय जें ह्मणणें असेल ते रयतेला त्यांनां स्वतः कळवितां येतें. आपली दाद लागण्याचा

मार्ग असा सुलभ दिसला ह्मणजे रयतेला मोठा आनंद होत असतो. राज्यक्रांति झाली ह्मणजे तिच्या मागून नव्या राज्यकर्त्यांबराबर पुष्कळ नव्या तऱ्हा यावयाच्याच हें **एल्फिन्स्टन** साहेब जाणून होता. परंतु त्या जितक्या थोड्या असतील तितकें बरें असें वाटून, त्यांची संख्या होईल तेथवर थोडी ठेवण्याकडे त्याचें लक्ष होतें. खेडगांवांतल्या लोकांची पूर्वी एक जूट असे आणि त्यांच्या अंगांत सार्वजनिक कामाची हिम्मत (public spirit) असे तीं पुनः आणावीं आणि फार प्राचीन काळापासून ज्या ग्रामसंस्था चालत आल्या, शेकडों वर्षं जुलमी राजांच्या कारकीर्दी झाल्या आणि झोटिंग पादशाह्या झाल्या तरी ज्या समूळ नाहींशा झाल्या नाहींत, तशांतून ही निभावल्या, त्या पुनः नीट चालूं लागत असें करावें, ह्मणून त्याणें आपली पराकाष्ठा केली. त्याणें गांवकामदारांचें वजन कायम राखलें. कारण अगदीं लहान सहान खेडीं पाडीं आणि त्यांतले लोक येथपर्यंत सरकारचा अम्मल पोहोचून तो नीट चालवयास हें काम परकी लोकांच्या हातून होणें दुर्घट आहे, तें गांवकरी लोकांमार्फत आणि त्यांची जूट कायम राखली तर मात्र होईल, ही राज्यकर्त्या इतर इंग्रज लोकांच्या मनांत न येणारी गोष्ट तो नीट जाणत होता. ह्मणून त्याणें कलेक्टरांना असा हुकूम केला कीं जी पद्धत चालू आहे ती कायम राखा, खरोखर जेवढी जमीन लागण झालेली असेल तेवढीचा वसूल घ्या, सारा हलका ठेवा, नवे कर बसवूं नका आणि पहिले असतील ते सोडूं नका; परंतु जे उघड उघड अन्यायाचे दिसत असतील ते उठवा; सर्वांवरची गोष्ट ही लक्षांत ठेवा कीं कोणती ही नवी तऱ्हा सुरू करावयाची नाहीं. या प्रमाणें ह्या खात्याकडे त्याणें लक्ष चांगलें पोहोंचविलें; रयत लोकांनां उगीच पीडा देऊन त्यांच्याकडून पैसा घेऊं नये ह्मणून हरएक प्रकारें खरी मनापासून खटपट केली. सर्व कलेक्टरांनीं वसूल घेण्याची जी तऱ्हा सुरू केली ती नाना फडणिसाच्या वेळची जी वहिवाट होती ती मूळ धरूनच. तींत योग्य वाटले तेवढे फेरफार केले. चारी भागांत रीत अगदीं एक होती असें नाहीं; थोडा बहुत निराळी होती, परंतु एकंदरींत सारखी होती. ती अशी—

जमिनीचा वसूल ह्मणून अमूक गांवापासून अमूक रक्कम घ्यावयाची असें ठरविण्याला कांहीं तरी आधार पाहिजे होता. त्यास आपल्यावर राज्य चांगलें चाललें होतें असें ज्या काळीं लोकांनां वाटत असे, त्या वेळीं ते काय देत असत हें पहावयाचें आणि ती रक्कम कायम असें समजावयाचें. मग लगवडींत कांहीं जमीन कमी असेल तर त्या मानानें आकार कमी करावयाचा. शेतकऱ्यांनीं कांहीं विशेष कारणें घडलेलीं दाखविलीं तर तीं मनांत आणून त्यांबद्दल आणखी सूट घालावयाची. मग जी निवळ रक्कम ठरेल ती गांवकामदारांनीं सर्व कुळांवर वांटावयाची. ती सर्वांनां कबूल झाली ह्मणजे मग पट्टे द्यावयाचे. ते मिळाले ह्मणजे जमावंदी ठरली ह्मणावयाचें...जास्ती पट्टी, सादिलवार पट्टी, झडती पट्टी वगैरे पुष्कळ बाबी पेशवाईत होत्या; त्या सर्व बंद करून, रयतेच्या स्थितीकडे लक्ष पुरवून सारे कलेक्टर सारा होईल तितका हलका करण्याविषयीं झटत होते. वसुलाच्या बाबतींत रयतवारी पद्धत कायम ठेवावयाची इकडे त्यांचें लक्ष पुरें होतें आणि कांहीं असामींनीं ती रीत पेशवाईतल्यापेक्षां ही अधिक वाढविली.

या प्रमाणें सारा अगदीं माफक असावा, रयतेला कांहीं जड वाटूं नये, ह्मणून जरी सर्व प्रयत्न चालले होते, तरी जेथें जेथें इंग्रजी अम्मल प्रथम सुरू झाला तेथें तेथें तो जसा जड वाटत होता तसाच दक्षिणेंत ही प्रकार झाला. हा जड आहे, देण्याला आपली शक्ति नाहीं, असेंच लोकांनां वाटत होतें यांत शंका नाहीं. असें होण्याचीं कारणें हीं असावीं असें वाटतें. (१) गांववर आकार बसवितांना कलेक्टरांनीं जे जमाबंदीचे कागद आधारास धरले यांत जे आंकडे होते ते खरे वसूल येत असलेल्या रकमेचे नसून कमाल आकाराचे, ह्मणजे ज्यापेक्षां जास्त वसूल कधींच यावयाचा नाहीं, ते होते. आणि (२) इंग्रजी अम्मलदारांची तऱ्हा सगळीकडे एक. जी रक्कम घ्यावयाची ठरली ती त्यांणीं वसूल करावयाचीच. पाऊसपाणी, पीक, कसें आहे, इतर गोष्टी बऱ्या वाईट कशा आहेत, तें कांहीं एक मनांत आणावयाचें नाहीं. त्या काळांत उत्तम पीक आलें तरी तें रय-

तेचें दुर्दैवच असे. अगदीं नापीक झाल्यापेक्षां हें बरें असें त्यांनां वाटे इतकेंच. ही गोष्ट नेहेमीं ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. कारण पिकलेल्या मालाचा जागच्या जागीं खप थोडा होत असे आणि तो बाहेर पाठविण्याची सोय नसल्यामुळें जात नसे. त्यामुळें जितकी स्वस्ताई अधिक, तितका शेतकऱ्याला नफा कमी होई.

काळीचा वसूल ही उत्पन्नाची मुख्य बाब हें तर निर्विवाद होतें. या शिवाय उत्पन्नाच्या बाबी आणखी पुष्कळ होत्या, त्यांपैकीं जकात, अपकारी, नजर, वकरीपट्टी, टंकसाळ, वगैरे कांहीं **एल्फिन्स्टन** साहेबानें चालू ठेविल्या.

जकातीचें उत्पन्न पांच लाख रुपये होतें. जकात बैलओझ्यावर घेत असत. तिचा दर गोणींतील माल पाहून त्याच्या किंमतीवर कमजास्त असे. परंतु आठ रुपयांहून अधिक केव्हां ही घ्यावयाची नसे. जकात दर प्रांतांत घेत असल्यामुळें एका हद्दींतून दुसऱ्या हद्दींत माल गेला कीं त्याची तपासणी, पुनः जकात, असा त्रास पुष्कळ वेळां होई. तो चुकविण्याला शहरांत हुंडेकरी म्हणून असत ते जकातदाराबराबर करार करीत आणि एकदां जकात घेऊन पुनः असा त्रास होऊं न देतां साऱ्या मुलखांत कोठें ही बिनहरकत माल पोहोचविण्याचें पत्करीत असत. पेशवाईंत जकातीचा मक्ता असे, तोच वहिवाट कांहीं दिवस चालू टेवणें **एल्फिन्स्टन** साहेबाला जरूर वाटलें. कारण कलेक्टरांनां दुसरीं कामें फार असल्यामुळें इकडे लक्ष देण्यास फुरसत नव्हती. तो म्हणतो " जकात जास्ती घेतली अशा कांहीं फिर्यादी येत नाहींत; यावरून येवढें खचित आहे कीं कदाचित सरकारचें नुकसान होत असेल, परंतु लोकांना त्रास नाहीं." पेशवाईंत इंग्रजी लष्करांतील बाजाराकरितां जो माल लागे त्यावर जकात नसे. जकात ठेविली तर व्यापाऱ्यांचे व जकात्यांचे हमेष तंटे होतील अशा सबबी सांगून इंग्रजांनीं ती माफ करून घेतली होती. परंतु आतां तें निमित्त राहिलें नाहीं, म्हणून **एल्फिन्स्टन** साहेबानें कोणाला माफी ठेविली नाहीं; एवढाच काय तो फरक केला.

अपकारीचें उत्पन्न पेशवाईत फारच थोडें, १०००० रुपये देखील नव्हतें. पुण्यांत दारूचा दुकानें नव्हतीं आणि बाहेर देखील बहुधा घालूं देत नसत. तें पाहून **एल्फिन्स्टन** साहेबाला संतोष वाटत होता. तो म्हणतो—" दारूबाजी हें विशेषतः हलक्या लोकांचें व्यसन. हें सान्या महाराष्ट्रांत बहुतेक माहीत नसल्यासारखेंच आहे. यामुळें हा देश जुन्या [ म्हणजे इंग्रजी अम्मल बरेच दिवस चालत असलेल्या ] प्रांतांपेक्षां अधिक नीतिमान आहे ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. याचें कारण मादक दारू विकण्याची बंदी. या बाबीपासून उत्पन्न ही फार थोडें आहे, यास्तव आपण ही मुळींच बंद केली तर बहुधा अधिकच चांगलें होईल "

दारूची अगदीं बंदी करावी किंवा तीवर जबर जकात बसवावी आणि तिचा खप पूर्वीपेक्षा वाढूं तरी देऊंनये असें त्याचें म्हणणें होतें व त्याप्रमाणें त्याणें सरकारास लिहिलें. बंगाल प्रांतांत इंग्रजांचा अम्मल बसल्यापासून दारूचा खप वाढत चालला होता आणि या वेळीं अपकारी ही उत्पन्नाची मोटी बाब होऊन बसली होती तेव्हां सरकारच्या तोंडाला पाणी सुटेल हे जाणूनच त्याणें असें लिहिलें कीं काय नकळे !

पेशवाईंत दत्तकाबद्दल नजराणा घेण्याची वहिवाट होती ती **एल्फिन्स्टन** साहेबाला चांगली वाटली. कारण तो देणाराला जड वाटत नसे आणि वारसाप्रकरणांत आयता दाखला होत असे. म्हणून तो चालू ठेवावा असेंच त्याचें मत होतें.

पेशवाईत मिठावर कर मुळींच नव्हता. जकात मात्र होती.

टंकसाळीचा मक्ता होता तो **एल्फिन्स्टन** साहेबानें तसाच ठेविला. त्याणें सरकाराला असें लिहिलें कीं नाणें कोणत्या प्रकारचें ठेवावयाचें त्याचा विचार होऊन एक पद्धत ठरेपर्यंत हा कर असूं द्यावा.

बलुतेपट्टी ही **एल्फिन्स्टन** साहेबानें कायम ठेविली. तिचा मक्ता असे तसाच ठेवला. परंतु त्यांत त्याच्या मनांत लौकरच फेरफार करावयाचा होता.

कारण धनगरलोक सारे मुलुख हिंडणारे असत. त्यामुळें त्यांच्यावर कलेक्टराचा अम्मल नीट चालेना.

याप्रमाणें **एल्फिन्स्टन** साहेबानें नवीन मुलखाचा वसूल घेण्याची व्यवस्था लाविली तें काम जसें मोठें होतें तसें त्या मुलखाचा बंदोबस्त राखणें, त्यांतील प्रजेच्या जीविताच्या व मालमत्तेच्या संरक्षणाची तजवीज करणें, म्हणजे त्यांच्यांत जे तंटे उपस्थित होतात त्यांचा योग्य न्याय होण्याची तजवीज करणें ह्या राज्यव्यवस्थेंतल्या महत्वाच्याच गोष्टी होत्या. त्या त्याणें कशा केल्या तें आतां सांगावयाचें.

**एल्फिन्स्टन** साहेब हिंदुस्थानांत आला तो बंगाल्यांत गेला. तेथून त्याची नेमणूक बनारसेस झाली. तेथें असतांना त्याणें मुलकी खात्यांत कांहीं दिवस काम केलें होतें, परंतु त्याला दिवस फार झाले होते; आणि तेव्हांपासून दिवाणी फौजदारी कामाचा त्याला कांहीं अनुभव नव्हता. तेथें असतांना त्याचा वरिष्ठ मिस्टर डेव्हिस याच्या सहवासानें बंगालच्या न्यायपद्धती विषयीं त्याच्या मनाचा ग्रह वाईट झालेलाच होता. ती पद्धति कशी आहे याची नीट चौकशी करावी म्हणून सन १८१२ मध्यें पार्लमेंटांतून कमिटीची नेमणूक झाली होती; तिचा रिपोर्ट नुकताच प्रसिद्ध झाला होता. तो वाचून तर त्याचा पूर्वीचा ग्रह अधिकच दृढ झाला. या कामीं तर जें करावयाचें तें फार विचारानें केलें पाहिजे म्हणून त्याणें मद्रासचे व मुंबईचे कायदेकानू आणून पाहिले; आणि **जेरिमी बेंथाम** म्हणून त्यावेळीं एक मोठा नामांकित न्यायशास्त्र पंडित विलायतेंत होता त्याचे ग्रंथ आपला मित्र आर्स्किन साहेब याजकडून आणविले. ते वाचीत असतांना त्याणें आपल्या मित्राला तारीख ३ आक्टोबर सन १८१८ रोजीं पत्र लिहिलें त्यांत तो म्हणतो—

"तुम्हाला वाटतें आहे तितका कायदे करण्याचीं मूल तत्वें शिकण्याचा मला प्रसंग नाहीं; कारण माझें काम फार हलकें आहे. तें एवढेंच कीं येथें कोणती पद्धति चालू आहे तें समजून घ्यावें आणि ती असेल तशी राखावी बिघडूं नये मला वाटेल तूर्त म्हणून जी राज्यव्यवस्था व्हावयाची ती करणारांना हें आपलें

मोठें कर्तव्य आहे असें समजणें योग्य आहे आणि मला वाटतें ह्या देशाला कायद्यां-ची जरूर आहे किंवा नाहीं हें समजेपर्यंत जर मी ह्याच्या साठीं ते कोणाला करून दिले नाहींत तर मी ह्यांच्या फार उपयोगीं पडलों असें समजेन."

असे त्याचे पोक्त विचार असल्या मुळें त्याणें महाराष्ट्रांत चालत आलेली संरक्षणाची व न्यायाची पद्धत कशी आहे हें नीट लक्ष लाऊन पाहिलें. गांवच्या चौकी पहाऱ्याची व बंदोबस्ताची रीत त्याला एकंदरींत चांगलीच वाटली. ती त्याणें चालू ठेविली, परंतु आमचा इंग्रजी अम्मल सुरू झाला ह्मणजे त्या रीतींत जो खरा उपयोगी भाग आहे तो कायम राखणें कठीण आहे असें ह्मणून दाखविलें. त्या रीतींत मुख्य बीज हें होतें कीं गांवचा वसूल करणें व त्या-वर अम्मल चालविणें हे दोन ही अधिकार एकाच्याच हातीं असत. जमिनीचा सारा वसूल करण्याची आणि गांवाचा बंदोबस्त राखण्याची जबाबदारी पाट-लावर असे. जर प्रसंग पडला तर गांवांतल्या साऱ्या लोकांनां त्याला आपल्या मदतीस बोलावितां येई. परंतु बंदोबस्ताच्या कामीं सदोदीत त्याच्या जवळ असणारा ह्मटला ह्मणजे त्याच्या हाताखालचा गांवचा रखवाल-दार म्हार हा असे.

म्हाराचें काम रात्रीं रखवाली करावी, गांवांत आला कोण, गांवांतून गेला कोण याचा तपास करावा, गांवांत कोणी परके मनुष्य येतील त्या सर्वां-वर नजर ठेवावी आणि जो कोणी संशय घेण्यासारखा दिसेल, त्याची पाट-लाला वर्दी द्यावी. गांवांतला कोण मनुष्य कशा चालीचा ती माहिती त्याला असावयाचीच आणि गांवच्या हद्दींत चोरी झाली तर तिचा तलास लाऊन चोर धरण्याचें काम त्याचेंच असे. लहानपणापासून तपास करण्याची आणि बारीक नजरेनें पहाण्याची संवय लागलेली असल्यानें व आपल्या पोटाला नेमलेला शेर पदरांत पाडून घेण्याकारितां दर घरीं फेरी घालण्याची आणि हमेष फिरत रहाण्याची त्याला जरूर पडत असल्यामुळें हें काम त्याला करतां येई. कोठें चोरी झाली किंवा दरवडा पडला कीं रखवालदार म्हार तपासास लागलाच.तो बहुधा पावलांवरून चोराचा माग लावी आणि तो

माग दुसऱ्या गांवच्या हद्दीपर्यंत नेऊन पोहोचविला आणि तेथच्या म्हाराची खात्री करून दिली किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारें चोरीचा माल शेजारच्या गांवीं गेल्याचा माग लाऊन दिला म्हणजे त्याच्या अंगावरची जबाबदारी गेली. मग त्या गांवचा म्हार तपासास लागे. असा माग काढीत काढीत जातां जातां अखेर ज्या गांवांत चोर शिरल्याचें स्पष्ट दिसून येई तो गेलेल्या मालाबद्दल जबाबदार होई. मूळ चोरी झालेल्या गांवाबाहेर माल गेलाच नाहीं तर त्या गांवालाच ती भरून द्यावी लागे. त्यांत त्या म्हाराची जितकी शक्ति असेल तितका पैसा त्यालाच भरावा लागे आणि बाकीचा साऱ्या गांवावर बसे.

गावसंरक्षणाच्या व वसुलाच्या कामांत पाटलावर देखरेख मामलेदाराची असे. सर्वगांव एक विचारानें वागत आहेत आणि योग्य झटपटीनें कामें करीत आहेत कीं नाहीं हें पहाण्याचें काम मामलेदाराचें असे. गांवावर कोणी जुलूम करील तर त्याच्या हाताखालीं जी शिबंदी व शिलेदार असत ते तो गांव रखवालदाराच्या मदतीस पाठवी. गुन्हेगारांचा तपास लावण्यास मात्र त्यांस पाठवीत नसे. भिल्ल व इतर लुटारू लोकांनीं स्वतः मुलखास उपद्रव देऊं नये व दुसरे कोणी देत असल्यास त्यांचा बंदोबस्त करण्यास सहाय व्हावें म्हणून त्यांच्या नायकांजवळ बोलून जी काय व्यवस्था करावयाची असेल ती करण्याचा अधिकार मामलेदाराकडेच असे. त्याला योग्यायोग्य पाहून वागण्याचा मोठा अधिकार असे. गांवांत स्वस्थता राखण्याची जबाबदारी पाटलावर असे म्हणून एखादा मनुष्य संशय घेण्यासारखा दिसला तर त्याला पकडून अटकेंत ठेवण्याला किंवा दुसरी योग्य वाटेल ती तजवीज करण्याला पाटील देखील मागें पुढें पहात नसे.

साऱ्या दाक्षिणेंत मराठी राज्यांत गांवसंरक्षणाची पद्धति अशी होती. मोठाल्या शहरांत मात्र असें नसे; तेथें तें काम कोतवालाकडे असे आणि तेथची व्यवस्था स्वतंत्र असे. ह्या मराठी व्यवस्थेंत दोष असणारच हें खरें होतें आणि बाजीरावाच्या नेभळ्या कारकीर्दींत ते पुष्कळच बळावले होते. परंतु एकंदरीत पाहिलें तर ती तऱ्हा वाईट नव्हती आणि बंगाल्यांतली

स्थिति जी नुकतीच ह्या रिपोर्टांवरून प्रसिद्ध झाली होती, तिशीं ताडून पाहिलें तर ही पुष्कळच चांगली होती. लॉर्ड **कार्नवालीस** साहेबानें बंगाल्यांत जी तऱ्हा सुरू केली तिचे परिणाम फारच वाईट झाले. ते असे कीं तिच्या योगानें जमीनदारांचे अधिकार नाहींसे झाले आणि गांवबंदोबस्त ही नाहींसा झाला. त्यांच्या जागीं इंग्रजी अम्मलदार आणि इंग्रजी कोर्टें आलीं तीं बंगालच्या एवढ्या थोरल्या वस्तीच्या मानानें अगदींच थोडीं असल्यानें तीं आहेत कीं नाहींत असें होऊन गेलें. त्यांचा दरारा कांहींच वाटेना. त्याचा परिणाम असा भयंकर झाला कीं डाके (दरवडे) भारी पडूं लागले. किती एक वर्षेपर्यंत फौजदारी गुन्ह्यांची चौकशीच नाहींशी झाली. परंतु दक्षिणेंत तसें कांहीं झालें नाहीं. साऱ्या कलेक्टरांनीं आपआपल्या भागांतली स्थिति कशी होती तें नीट पाहून **एल्फिन्स्टन** साहेबाकडे रिपोर्ट केले; त्यांवरून तो ह्मणतो—

"गुन्हे विशेष होतात असें त्यांच्या लिहिण्यावरून ह्मणवत नाहीं. इंग्रजी अमलांतला पूर्वीचा प्रदेश (मद्रास प्रांत) आणि हा प्रदेश यांची तुलना करून पहाण्याची मिस्टर **चापलीन** साहेबास उत्कृष्ट संधी आहे; त्या प्रमाणें करून ते ह्मणतात मला तेथच्यापेक्षां येथें गुन्हे कमीच आहेत असें वाटतें. गांवच्या शिवेबद्दल व जमीन जुमल्याच्या मालकी बद्दलच्या खटल्यांत आणि आपसांतल्या वैराबद्दल सूड उगवण्याकरितां खून करण्याची वहिवाट मराठ्यांत पुष्कळ आहे. वैऱ्याचा सूड घेण्याकरितां व दाद लागून न्याय व्हावा ह्मणून सोमल घालणें व गुरें चोरून नेणें हा प्रकार कर्नाटकांत फार आहे. दरवडे आणि रस्तेलुटी हे ही गुन्हे पुष्कळ होतात परंतु ते नेहेमी बहुतकरून भिल्ल व इतर जातींचे लुटारू लोक करतात. ते बहुधा गांवच्या लोकांत मोडणारे नसतात; आणि हे गुन्हे देखील मी ह्या देशांत आल्यापासून बंगालच्या स्थितीविषयीं पार्लमेंटापुढें आलीकडे जे कागद येऊन पडले आहेत त्यांत नमूद असलेल्या गुन्ह्यांच्या तोडीला क्षणैक तरी लागतील इतक्या पल्ल्याला कधींच गेले नाहींत."

ही स्थिती दक्षिणेंतल्या फौजदारीन्यायपद्धतीचें वर्णन सुद्धां करतां येत नाहीं इतकी ती वाईट आहे असें ह्मणणें होतें त्यावेळची आहे हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. त्या वेळीं ठरीव कायदा ह्मणून नव्हता आणि चौकशी अमूक प्रकारें चालावी असें ही कांहीं ठरलेलें नव्हतें. न्याय करण्याचा अधिकार मुलकी कामदारांस असे आणि तो पाटलापासून मामलेदारापर्यंत ज्याच्या त्याच्या दर्जा प्रमाणें कमी जास्त असे. पाटलाला गुन्हेगार मनुष्याला गांवच्या चौकींत फक्त कांहीं दिवस अटकेंत ठेवतां येई. त्याच्या वरच्या अम्मलदारांनां त्याच्यापेक्षां अधिक शिक्षा देतां येई; मामलेदारांनां पुष्कळच देतां येई आणि त्यांत ही जे मोठे मोठे होते त्यांनां पुढें पुढें तर देहांत शिक्षा देण्याचा ही अधिकार मिळाला होता. कोणी जाहागीरदार कोठें ही असला तरी अपल्या फौजेवर व चाकरमाणसांवर त्याचा पूर्ण अम्मल असे. परंतु शिक्षा करण्याचा कोणाला अधिकार किती हें कांहींच ठरलेलें नसे. त्याला प्रमाण मुळींच नसे. ज्याचें जितकें वजन असे तितका तो अधिकार चालवी; आपल्या दर्जाकडे पहात असे असे नाहीं जे अगदीं श्रेष्ट अम्मलदार असत ते पुण्यांत असले आणि तेथें त्यांनां कोणाला देहांतशासन करणें झालें तर पेशव्यांच्या कानावर घालीत. हा त्यांचा मान राखीत इतकेंच.

एकादा मुख्य बंडवाला किंवा लुटारूंच्या टोळीचा नाईक सांपडला म्हणजे त्याला एकदम फांशीं देत. त्याचें नांव गाजलेलें एवढें पुरे असे, दुसरा पुरावा लागत नसे. एकाद्या ठिकाणीं भिल्ल वाटा मारीत असले आणि त्या भागांत एकादा भिल्ल सांपडला तर त्याला ही लगेच फांशीं देत. त्याचें नांव गाजलेलें एवढें पुरे असे, दुसरा पुरावा लागत नसे. एकाद्या खटल्यांत अपराधाबद्दल संशय वाटत असला तर मुख्य अम्मलदार असे तो आपल्या जवळच्या कांहीं लोकांनां त्याची चौकशी करण्यास सांगे. ते त्या गुन्हेगाराला कांहीं प्रश्न विचारीत आणि त्यांचा संशय दृढ झाला तर त्याला कबूल होण्याकरितां फटके मारीत. साक्षीदारांच्या जबान्या घेत आणि ते जो मजकूर सांगत त्याचा सारांश व आरोपीचें काय म्हणणें असेल तें नेहेमी लिहून

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

घेत. दोघांपैकीं जो खोटा असेल तो लाजेल किंवा गोंधळून जाईल आणि खरें काय असेल तें बाहेर निघेल ह्या आशेनें केव्हां केव्हां आरोपीपुढें साक्षीदारांनां आणून रुजवात करीत. परंतु असें केलें नाहीं तर खटला गैरशिस्त चालला असें मात्र होत नसे. धर्मसंबंधाचे जे खटले असत त्यांत केव्हां केव्हां शास्त्र्यांचे अभिप्राय घेत. त्या शिवाय इतर खटल्यांत कधीं कायदा पाहात असत असें दिसत नाहीं. देशरिवाज आणि अम्मलदारास (माजिस्त्रेटास) वाटेल तो योग्यायोग्य विचार हेच काय ते नियम असत असें दिसतें.

खून करतांना कांहीं विलक्षण घोरकर्म झालेलें नसलें तर त्याबद्दल देहांत शासन केव्हांच होत नसे असें दिसतें. भर रस्त्यावर दरवडा पडला तर त्याबद्दल बहुधा मरणाची शिक्षा असे. कारण तो घालणारे लोक बहुत करून हलके असत. बऱ्याचशा चांगल्या जातींतल्या मनुष्याला बहुधा देहांतशासन करीत नसत, परंतु त्याणें जर सरकारांशीं गुन्हेगारी केलेली असली तर मग त्याच्या जातीकडे आणि कुळाकडे पहात नसत; मरणाचीच शिक्षा ठोठावीत. होळकराचा एक भाऊ बंडखोरांच्या-अथवा लुटारू घोडेस्वारांच्या-एका टोळीचा नाईक होता, ह्मणून त्याला हत्तीच्या पायाशीं देऊन मारण्याची शिक्षा झाली. एक जाहागीरदार होता—त्याची जाहागीर गेली होती—त्याणें तसाच कांहीं गुन्हा केला होता ह्मणून त्याला तोफेच्या तोंडीं दिलें. देहांतशासनाचे दुसरे प्रकार फांसावर चढविणें, डोकें उडविणें तलवारीनें आंगाचे तुकडे उडविणें आणि मेकसूनें डोकें फोडणें, हे होते. ब्राह्मण कैदींनां ठार मारतां येत नसे, त्यांनां विष घालीत किंवा वाईट अन्न खावयाला घालून परलोकच्या वाटेस लावीत. बायकांनां देहांतशासन कधींच करीत नसत. त्यांनां जबर शिक्षा ह्मटली ह्मणजे पुष्कळ दिवस कैद आणि नाक, कान व थान कापणें ही असे. हातपाय वगैरे अवयव तोडणें हें तर अगदीं साधारण होतें. सक्तमजुरी—मुख्यत्वें किल्ले बांधण्याच्या कामीं—हा ही प्रकार नव्हतासा नाहीं; परंतु सर्व शिक्षांत अगदीं साधारणतः फार ह्मटली तर दंड आणि चीजवस्तेची जप्ती ही असे आणि आलीकडे तर तो करण्यास मामलेदार लोभानें इतके आतुर झालेले असत कीं ते ती शिक्षा ह्मणून करीत कीं तो फक्त पैसा मिळवण्याला बहाणा

असे हें ओळखणें पुष्कळ प्रसंगीं कठीण असे. एकपक्षीं पाहिलें तर खुना-बद्दल—विशेषतः चांगल्या जातीच्या कोणी मनुष्यानें केला असेल तर त्या-बद्दल—दंड हीच शिक्षा करण्याची मराठ्यांत चाल होती. परंतु दुसरीकडे पहावें तर मामलेदार दरवडेखोर भिल्लांनां ही वरचेवर सोडून देत. हें ठर-लेल्या वहिवाटीस धरून असे. त्यांच्या कडून कांहीं पैसा घेऊन त्यांनां ते आपला लुटारूपणाचा धंदा सुरू करूं देत. ज्याला दंड भरण्याची शक्ति असे त्याला दुसरी कांहीं शिक्षा कधीं होतच नसे असें साफ ह्मणतां येईल; आणि एकंदरींत मराठ्यांची फौजदारी प्रकरणीं न्यायाची शिस्त अतिशयच बिघडून गेली होती व लांचलुचपतीचा प्रकार फार झाला होता.

ही पेशवाई तऱ्हा राज्यकर्त्या इंग्रज अम्मलदाराला तशीच चालू ठेवतां आली नसती हें तर उघड आहे. परंतु **एल्फिन्स्टन** साहेबानें त्यांत ज्या सुधारणा केल्या त्या लोकांच्या समजुती व त्यांचे विचार कसे आहेत हें नीट पाहून त्यांचें मन न दुखवे अशा बेतानें, त्या सुरू केल्या. पाटलाकडे अधि-कार त्याचें गांवांत वजन होतें तसें रहावें एवढा ठेविला. मामलेदाराकडे अधिकार प्रथम दोन रुपये दंड करण्याचा आणि चोवीस तास कैदेची शिक्षा करण्याचा ठेविला होता, परंतु पुढें लहानसहान मारामारीची चौकशी करून शिक्षा करण्याचा अधिकारही दिला. इतर सर्व फौजदारी गुन्ह्यांस चौकशी करून शिक्षा करण्याचा अधिकार कलेक्टरांनां दिला. परंतु देहांतशासन कर-ण्याचा अधिकार त्यांस दिला नाहीं. त्याणे जी तऱ्हा सुरू केली तीविषयीं तो ह्मणतो—

"आमची तऱ्हा अशी आहे—कैदीला रीतीप्रमाणें आणून त्याची उघ-डपणें चौकशी सुरू करावयाची. तूं गुन्हा केलास कीं नाहीं असें त्याला विचारावयाचें. त्याणें होय, केला; असें ह्मटलें तर ही कबुली तो आपण होऊन खुषीनें देत आहे कीं कसें हें समजून घेण्याची खटपट करावयाची. त्याणें मी गुन्हा केला नाहीं असें ह्मटलें तर मग त्यास जास्त न विचारतां साक्षीदार बोलावावयाचे. त्यांच्या जबान्या कैदीच्या समक्ष घ्यावयाच्या,

त्याला त्यांची फेरतपासणी करूं द्यावयाची आणि आपल्यातर्फे साक्षीदार आणूं द्यावयाचे. याप्रमाणें चौकशी पुरी झाल्यावर त्याणें गुन्हा केला ह्मणण्याबद्दल कांहीं शंका वाटत असली तर त्याला निर्दोषी ह्मणून सोडून द्यावयाचें. तो गुन्हेगार आहे असें स्पष्ट दिसलें ह्मणजे त्याला हिंदुधर्मशास्त्रांत शिक्षा काय आहे तें शास्त्रीबावांस विचारावयाचें. हें शास्त्र अगदीं अयोग्य आहे असें पुष्कळ वेळ दिसून येतें. त्यांत सांगितलेली शिक्षा कडक आहे असें दिसलें तर ती कमी द्यावयाची, परंतु ती थोडी आहे असें दिसलें तरी ती मान्य करावयाची. खानदेशांत बहुतकरून पंचाईतच जमवितात. पंच साक्षीदारांनां प्रश्न करतात आणि आरोपी दोषी आहे कीं नाहीं तें ठरवितात. सातान्यांत पोलिटिकल एजंट कायदेकामगारांशिवाय कितीएक संभावित लोकांनां बोलावितो व खटला चालवितांना आणि अखेर निकाल करतांना त्यांचें मत घेतो खटला चालण्याचें काम पुरें झालें आणि शिक्षा सांगून झाली ह्मणजे खटला मोठा असेल तर शिक्षा मंजूर होण्याकरितां तें प्रकरण कमिशनराकडे जातें आणि तिकडून मंजुरी आली ह्मणजे ती कायम होते. खटला चालते वेळीं आरोपीवर कृपादृष्टि ठेवण्याकडे जसा न्यायधिशाचा कल असतो तसाच शिक्षा मंजूर करतेवेळीं कमिशनराचा ही असतो."

विलायतेंतल्या न्यायकोर्टांच्या नमुन्यावर सुरू केलेली ही पद्धति गुन्हेगारांस दहशत बसून त्यांणीं गुन्हे करूं नयेत आणि लोकांचें संरक्षण व्हावें या पेक्षां जे निरपराधी असतील त्यांचें संरक्षण होण्याला आणि अपराध्यांनां शिक्षा हलकी वाटण्याला अधिक उपयोगीं आहे असें **एल्फिन्स्टन** साहेबानें बोलून दाखविलें. पेशवाई तऱ्हेपेक्षां नवें सुधारलेलें पोलीस गुन्हेगारांचा पत्ता लाऊन त्यांनां धरण्याच्या कामीं जसें कमी योग्यतेचें होतें तशी त्यांनां हटकून शिक्षा होण्याच्या व ती शिक्षाशी भासण्याच्या कामींही ही पद्धति गौण होती; पुढें जसजसा अनुभव येत गेला तसतशा त्याला पुष्कळ सुधारणा सुचल्या; आरोपीची फेरतपासणी करावी अशी त्याणें शिफारस केली; कारण जो निरपराधी असतो तो आपण आपल्या अंगावर गुन्हा घेत नसतो आणि जो अपराधी असतो त्याणें अंगावर घेतला तर बरेंच झालें असें त्याचें मत होतें. त्याला

असें हा वाटत होतें कीं चौकशीच्या वेळीं माजिस्ट्रेटानें आपल्याला पसंत असतील त्या, बुद्धिमान, अशा कांहीं आमच्या लोकांची मदत घ्यावी. कारण त्यांना लोकांची माहिती असल्यानें युरोपीयनांच्या नजरेस न येणाऱ्या अशा खऱ्या गोष्टी पुष्कळ वेळ उघडकीस येतील. त्याचें असें मत होतें किं हिंदुधर्मशास्त्र कसें आहे तें पहाण्याची रीति खरें म्हटलें असतां इंग्रजांनीं काढलेली आहे ती बंद करावी. कारण त्या शास्त्रांत सांगितलेल्या कांहीं कांहीं शिक्षा फार भयंकर असल्यामुळें त्या देऊन न देऊन सारख्या. त्यांपासून दहशत उत्पन्न होत नसल्यानें त्यांचा कांहीं उपयोग नाहीं.

आमच्या धर्मशास्त्रांत काय सांगितलेलें आहे तें इंग्रजी अम्मलदारांनां समजावें आणि त्याप्रमाणें शिक्षा द्यावी म्हणून तें पाहून अभिप्राय देण्यास त्याणें मोठमोठ्या शास्त्र्यांच्या नेमणुका केल्या होत्या. परंतु त्यांनां न्यायाचें मूलतत्व देखील कळत नसे अशा विषयीं त्याणें एक गोष्ट लिहिलेली आहे ती अशी--

अहमद नगरच्या शास्त्रीबावांनीं एकाच तऱ्हेच्या चोरीच्या दोन खटल्यांत एका चोराला सुळीं द्यावें ह्मणून सांगितलें आणि दुसऱ्याला सहा फानम (पणम) दंड करावा असें सांगितलें. कारण एका खटल्यांत चोरीस गेलेला माल दैवयोगानें सांपडला होता आणि दुसऱ्यांत सांपडला नाहीं. तेव्हां हें असलें धर्मशास्त्र बाजूस ठेवावें हें बरें असें त्याला वाटूं लागलें.

शिक्षा देतांना आरोपीची जात मनांत आणावी आणि तिला पुष्कळ वजन द्यावें असें **एल्फिन्स्टन** साहेबाचें मत होतें. कारण तो ह्मणे आह्मी जर तसें न केलें तर लोकांच्या मनाला धक्का बसतो. आह्मी जर त्यांची समजूत राखली नाहीं तर आमच्या ज्या अगदीं मोठ्या योग्य शिक्षा असतील त्या ह्मणजे केवळ जुलूम आहे असें त्यांनां वाटेल.

पेशवाईत दिवाणी खटल्यांचा न्याय करण्याची जी तऱ्हा होती ती तशीच चालू ठेवावी असा त्याचा विचार होता. पेशवाईत मोठमोठ्या शहरांत मात्र न्यायाधीश असत. ते पेशव्यांच्या नांवानें खटल्याचा निकाल करीत. त्यांच्या शिवाय न्याय करण्याकरितां ह्मणून नेमलेले कोणी अम्मलदार नसत. दिवाणी स्वरूपाचा खटला आला ह्मणजे त्याचा निकाल पंचाइतीनें होत असे. पंच ह्मणजे पांच असामी. त्यांच्यापुढे खटला चालला ह्मणजे जी वाटाघाट होई तिचें नांव पंचाईत. पंचाईत होऊन जो निकाल होई तो कायमचा असें लोक समजत असत व तो मुकाव्यांनीं मान्य करीत. त्यावर कोणाची तक्रार चालत नसे. पंचांविषयीं लोकांची इतकी पूज्यबुद्धि होती कीं त्यांच्या तोंडून जे शब्द निघत ते ईश्वराच्या तोंडून निघाल्यासारखे ते समजत. त्यावरून "पांचांमुखीं परमेश्वर" ही ह्मण पडली. पंच मंडळींत पांच असामी असलेच पाहिजेत असें नव्हतें. कमी किंवा जास्ती असले तरी चालत. पंचाइतीचें प्राबल्य इंग्रजी अमलापूर्वी साऱ्या हिंदुस्थानांत पुष्कळ होतें. रणजितसिंग मेल्यावर पंजाबांत सरकारचा अधिकार ह्मणून उरला नाहीं, तेव्हां खालसा फौजेनें आपल्यावर हुकमत पंचाइतीनें चालवावी असें ठरविलें. हल्लीं देखील साऱ्या हिंदुस्थानांत जातिसंबंधाच्या सर्व खटल्यांचा निकाल पंचाइतीनें होत असतो. मालमत्तेच्या व व्यापारांतल्या पुष्कळ मोठमोठ्या तंट्यांचाही निकाल असाच होतो.

पंचाइतीनें होणाऱ्या न्यायाची तऱ्हा अशी होती—वादीप्रतिवादींनीं आपल्यापैकीं लोकांनीं आपल्या वादाचा निकाल करावा असें म्हटलें ह्मणजे सरकारकामदारानें बरें आहे ह्मणून पंच जमवावे आणि त्यांच्या समक्ष सारें काम चालवें. पक्षकार सावकार, व्यापारी असले तर पंच सावकारच असत. गांवांतल्या लोकांचा साधारण खटला असला तर त्या गांवचा पाटील शेतकरी लोकांपैकीं चांगले हुशार आणि निःपक्षपाती असामी पाहून त्यांनां घेऊन एखाद्या झाडाखालीं किंवा देवळांत बसे आणि तेथें काम चाले. पक्षकारांनीं आपली पंचाईत व्हावी ह्मटलें ह्मणजे पाटलापासून मामलेदारापर्यंत सर्व मुलकी अम्मलदारांनां पंचाईत भरविण्याचा अधिकार असे. वास्तविक ह्मटलें ह्मणजे

पंचाइतीला उभय पक्षकारांची कबुली लागत असे. परंतु प्रतिवादी नाकबूल असला तरी त्याला कबूल व्हावयाला लावण्याचें वादीच्या हातांत तगादा हें चांगलें साधन असे. तगाद्यानें दुसऱ्या गोष्टींचाही निकाल होत असे. तगाद्याची तऱ्हा अशी होती—

कोणा मनुष्याचें आपल्यापेक्षां कमी योग्यतेच्या किंवा आपल्या बरोबरीच्या मनुष्याकडे कांहीं येणें असलें ह्मणजे तो त्याला दुराई घाली, घराबाहेर जाऊं देत नसे, जेऊं खाऊं देत नसे आणि तो कौलास येऊन कांहीं तोडजोड करीपर्यंत त्याला उन्हांत बसावयाला देखील लावी. कर्जदार आपल्यापेक्षां थोर मनुष्य असला तर धनको प्रथम त्याच्याकडे गरीबीनें मागणें करून पाही; त्याचा उपयोग झाला नाहीं तर आपण आपल्या नांवलौकिकाकडे पहा, माझ्या देण्याबद्दल कांहीं तरी लाज वाटूं दे असें ह्मणे. तेवढ्यानें कांहीं झालें नाहीं तर तो त्याच्या उंबरठ्यावर बसे, त्याच्या वाटेवर आडवा पडे, त्याच्या दारापुढें ओरडे. हें सारें त्याणें स्वतःच केलें पाहिजे असें नव्हतें, दुसऱ्या कोणाकडून करविलें तरी हरकत नसे. तो आपल्या कर्जदाराच्या दारापुढें बसे आणि उपास करी. तो उपाशीं असेपर्यंत कर्जदाराला ही उपाशीं रहाणें भाग असे. इतक्यानें ही कर्जदार ऐकेना तर सावकार देवांचीं नांवें घेऊन त्याला शाप देई. असे त्याणें कितीही शिव्याशाप दिले तरी जोंपर्यंत त्याचें देणें खरें आहे तोंपर्यंत कूळ त्याला उलट बोलत नसे आणि त्या उपायांनीं त्याचा बहुतकरून कांहीं तरी उलगडा होई जर त्याचें मागणें गैर असलें तर कूळ कांहीं रिकामा त्रास सोसून घेत नसे, चल पंचाईत होऊं दे असें ह्मणे. त्याणें असें म्हटलें म्हणजे कामदाराची त्याच्याकडे कृपादृष्टि असल्यामुळें जी न होणारी गोष्ट ती सहजच होऊन जाई. राजाकडे दाद लागून न्याय मिळण्याला ही असलेच उपाय योजीत असत. मोठ्या मनुष्याच्या दारापुढें जाऊन उभें रहावें, त्याला शिव्याशाप द्यावे, त्याच्यापुढें दिवसा मशाल पेटवून धरावी, देवावर संतत धार धरावी, हे अगदीं शेवटचे उपाय होते. परंतु बाजीरावाच्या कारकीर्दींत देखील ह्यांची योजना झाली असतां बहुधा दाद लागल्यावांचून रहात नसे. इतक्याही उपायांनीं कर्ज

वसूल होईना, किंवा न्याय मिळेना तर सर्वांवरचा आणखी एक उपाय होता. तो असा कीं कोणा एकद्याची दाद लागेना तर त्याच्या जातीचे, गांवचे, किंवा व्यापारधंद्यांतले जितके लोक असतील तितक्या सान्यांनीं मिळून, त्याचा निकाल होईपर्यंत, वर सांगितलेले प्रकार करावयाचे.

वादी फिर्यादीला गेला आणि प्रतिवादी हर कोणत्या तरी उपायानें हजर झाला ह्मणजे कामाला सुरवात होई. ती अशी कीं आधीं त्या दोघांचे कबूल जाब घेत. खेडेगांवांत बारीक सारीक खटल्यांत कांहीं असा लेख घेत नसत; आह्मी कबूल आहों ह्मणण्याबद्दल दोघांकडून दोन काड्या उचलून घेत.

आधीं वादीचा फिर्याद अर्ज वाचीत आणि त्यावर प्रतिवादीचा जबाब घेत; आणखी कांहीं कैफीयत किंवा जबाब असल्यास तोही एकादेवेळीं घेत; आणि पंचांनां वाटेल तितके वेळ दोन्ही पक्षकारांनां उलट प्रश्न करीत. एखाद्या मनुष्याला स्वतः येण्याची सवड नसली तर तो आपल्या पदरच्या कारकुनाला किंवा आपल्या कोणा आप्ताला पाठवून देई. परंतु वकीलाचें ह्मणून नांव नसे. पक्षकारांनां प्रश्न करून झाले म्हणजे हिशेब, कागदपत्र, वगैरे जो लेखी पुरावा असेल तो घेत. तो नसला तर तोंडीं पुरावा घेत, परंतु लेखीला वजन पुष्कळ अधिक देत. साक्षीदारांनां उलटसुलट प्रश्न फार काळजीनें करीत परंतु ते कांहीं लिहून घेत नसत. त्यांच्या उत्तरांचा सारांश तेवढा थोडक्यांत टिपून घेत आणि त्यांनां लिहितां येत असलें तर तो बहुधा त्यांच्याच हातानें लिहवीत. साक्षीदार सांगतो आहे हें खरें नसावें असा संशय येण्याला कारण दिसल्यावांचून त्याला बहुधा शपथ देत नसत; परंतु तसें असलें म्हणजे त्याला शपथ करावयास लाऊन त्याच्या तोंडून खरें काढून घेण्याला फार झटत. अशी ही तपासणी पुरी झाली ह्मणजे पंच वादविवाद करून निवाडा करीत. त्यांत फिर्यादीचें, ती वरील उत्तराचें. उभय पक्षकाराकडून जे कागदपत्र दाखल झाले असतील त्या प्रत्येकाचें, व जे तोंडीं साक्षी झाले

असतील त्यांच्या जबान्यांचें, हांशील देऊन त्या साऱ्याचा विचार करून त्यांणीं जो ठराव केला असेल तो नमूद केलेला असे. खेडेगांवांत ज्या पंचाइती होत त्यांचें काम इतकें पद्धतशीर नसे. तें बहुतकरून चार मंडळी बसली असतां बोलणें चालतें तसें चाले; अखेरच्या निकाला शिवाय कांहीं लिहीत नसत आणि केव्हां केव्हां तोही लिहीत नसत. पंचाईत करतांना अव्वलपासून अखेरपर्यंत पंचांच्या मनाला जें न्याय्य दिसे तेंच धरून ते चालत असत. त्यांनां कांहीं तरी एक वाट हवी लागत असे. हिंदुधर्मशास्त्र आणि देशरिवाज कसा आहे तें पहात यांत संशय नाहीं. ते कांहीं ग्रंथ पहात नसत. हिंदुधर्मशास्त्राशीं ज्याचा निकट संबंध अशा--लग्न प्रकरण, वारसा प्रकरण वगैरे,—गोष्टींतला वाद असला तर तेवढ्यापुरतें शास्त्रयाचें मत विचारीत. पंचाइतीचा निवाडा झाला आणि तो सरकारी अम्मलदाराला त्यांणीं कळविला ह्मणजे तो तो कायम करून त्याप्रमाणें बजावणी करी. पंचांनां बजावणी करण्याचा अधिकार नसे. त्याकामीं सरकारी कामदाराकडे पुष्कळ वेळ जावें लागे, आणि पंचाइतीचें काम चाललें असतांनाही त्याचें वजन पुष्कळ असे.

न्याय करण्याच्या ह्या पद्धतींत जे दोष होते ते उघड उघड होते. ते असे—काम सावकाश होत असे; पंचांनां आपला अधिकार निवाडा करण्यापलीकडे चालवितां येत नसे; त्यांनां लांच खाण्याला सवड असे; आणि खटला भानगडीचा असला तर त्यांतल्या बिकट मुद्याचा विचार नीट करण्याचें सामर्थ्य नसे. परंतु **एल्फिन्स्टन** साहेबाला तें सारें पुरवलें. त्याच्या मतें ह्या दोषांपेक्षां त्या पद्धतींत गुण अधिक होते; बारीकसारीक खटल्यांच्या निकालाला तर ती चांगलीच होती; आणि साऱ्यांवरची गोष्ट ही होती कीं आपले हक्क काय आहेत तें ठरविण्यांत आणि ते कायम राखण्यांत लोकांचें लक्ष ह्या पद्धतीनें लागत असे आणि तंटे करण्याला कोणाला उत्तेजन मिळत नसे. तो ह्मणतो—

“पंचाइतीची वहिवाट असल्यानें न्यायाच्या कामांत वशिला किंवा

लांचलुचपत चालत नाहीं. तंट्याच्या प्रकरणाची पंचांनां माहिती चांगली असल्यानें व पुष्कळ खटल्यांत पक्षकारांची वर्तणूक कशी आहे हें ही माहीत असल्यानें त्यांचे निवाडे बहुधा बरोबर असले पाहिजेत. पंचाईत करणारे मनुष्य लोकांपैकींच असल्यानें त्यांची काम करण्याची रीति सर्वांनां समजे अशीच असली पाहिजे; कोणाला न समजे अशा तऱ्हेनें त्यांनां जातां येत नाहीं. त्यामुळें कायद्याची अशाश्वतता आणि संदिग्धता न राहून तंट्याच्या मुळालाच त्यांचा हात जाऊन पडतो, हा ह्या न्यायपद्धतीपासून जो नफा आहे तो अगदीं अमोलिक आहे. बाजीरावाच्या भ्रष्ट कारकीर्दीनंतर देखील पंचाइतीवर लोकांचा विश्वास पुष्कळ होता असें दिसतें. त्यांविषयीं त्यांचा ग्रह चांगला असण्यालायक त्या नाहींत असें दिसत नाहीं. त्याविषयीं मी जे प्रश्न केले होते त्यांचीं उत्तरें साऱ्या कलेक्टरांकडून आलीं आहेत, त्यांत एक असामी शिवायकरून बाकी सर्व ती तऱ्हा फार चांगली आहे असें म्हणतात. विशेषतः **चापलीन** साहेब तर असें ह्मणतात कीं बहुतेक खटल्यांत त्यांचें साक्षीपुराव्याचें टिपण थोडक्यांत आणि स्पष्ट असतें. त्यावर त्यांचे जे विचार असतात ते खोल आणि उघड समजण्यासारखे व त्यांचे निवाडे खरे व निःपक्षपाताचे असतात."

पंचाइतीनें होणारा न्याय आशा प्रकारचा असल्याचें दिसून आल्यावरून **एल्फिन्स्टन** साहेबानें ती पद्धत चालू ठेवण्याचें ठरविलें. ती बंद करावी तर तिच्या बदला अदालत (दिवाणी कोर्ट) सुरू करण्यावांचून दुसरा मार्ग नव्हता आणि तिचा तर त्याला अगदीं तिटकारा होता. त्याचें कारण आमच्या लोकांनां तिचें किती* भय वाटत होतें तें त्याला माहीत होतें;

* अदालतीला आणि इंग्रजी कायदेकानूंनां लोक पहिल्यानें किती भीत असत त्याचें अनुमान एल्फिन्स्टन साहेब एक गोष्ट वारंवार सांगत असे तीवरून करावें. ती गोष्ट अशी—१९ व्या शतकाच्या आरंभीं वायव्य प्रांतांत इंग्रजी अम्मल बसूं लागला तेव्हां त्या मुलखांतले लोक आपलीं घरेंदारें टाकून भराभर पळूं लागले. तें पाहून त्यांनां कोणी विचारीत 'पळतां कां' 'लार्ड लेक आला कीं काय?' तेव्हां ते ह्मणत 'नाहीं' 'तर झालें काय?' 'कोण येत आहे?' असें पुनः विचारलें ह्मणजे ते ह्मणत 'अदालत येते आहे· अदालत"

आणि शिवाय दुसरें असें कीं इंग्रज न्यायाधिशांनीं दिवाणी कामांत न्याय अमूक तऱ्हेनें करावा असें ह्मणण्याला सर्वमान्य असा ठरलेला कायदा नव्हता. पंचाइतीच्या पद्धतींत कांहीं सुधारणा त्याणें सुचविल्या होत्या आणि तेवढ्यानें काम नीट न चालेल तर अदालत पाहिजे तेव्हां सुरू करतां येईल, त्याला किती उशीर असें तो ह्मणत असे.

**एल्फिन्स्टन** साहेबाचा अभिप्राय असा होता कीं पूर्वीं जसे पाटील व मामलेदार हे नेहमी पंचाइती नेमून देत असत त्याप्रमाणें त्या त्यांणींच नेमून द्याव्या आणि त्यांवर कलेक्टराची सामान्य देखरेख असावी. कलेक्टरानें आपल्या ताब्यांतील मुलखांत नियमानें फिरत असावें; इतकेंच नव्हे दररोज निदान दोन तास लहान थोर सर्व प्रतीच्या लोकांस भेटावें, त्यांच्या फिर्यादी असतील त्या तोंडीं ऐकाव्या आणि त्यांचे निकाल व हुकूम मामलेदाराच्या उलट द्यावे लागले तरी द्यावे अशी कलेक्टरांनां तो लक्षपूर्वक ताकीद देत असे. तो ह्मणे 'आह्मी मामलेदारांनां पगार मोठाले करून दिले आहेत आणि दुसरे ही कांहीं हक्क करून दिले आहेत हें खरें, परंतु त्यांच्यावर जर नीट सक्त नजर ठेविली तरच ते काम चांगलें आणि प्रामाणिकपणानें करतील.' मोठमोठ्या शहरांतून अमीन (मुनसफ) नेमलेले होते त्यांनां पंचाइती नेमून देण्याचा व कलेक्टर त्यांच्याकडे जे खटले पाठवितील त्यांचा निकाल पक्षकारांची तशी संमति असल्यास स्वतः करण्याचा अधिकार होता. कोणत्याही कोर्टांत खटल्यांत वकील नेमून देऊन त्याच्या मार्फत काम चालविण्यास त्याची सक्त मनाई होती.

याप्रमाणें **एल्फिन्स्टन** साहेबानें मुलखाच्या बंदोबस्ताच्या मुख्य खात्यांची व्यवस्था लाविली तेव्हां आतां हळुहळु सर्वत्र शांतता झाल्यानें लोकांस संतोष वाटूं लागेल असें वाटणें साहजिक होतें; परंतु त्याप्रमाणें सर्वांनां संतोष झाला असें मात्र घडलें नाहीं. पेशवाईंत ब्राह्मणांचें प्राबल्य मोठेंच होतें, तें तिची समाप्ति होण्याबराबर सहजच नाहींसें झालें; त्यामुळें अल्पकाळांतच किती एक घराणीं अजीबाद बुडालीं आणि शेंकडों ब्राह्मण अन्नास

महाग होऊन बसले. राज्यकारभारांत मोठमोठ्या हुद्यांवर असलेले व लष्करांत नौकरी, शिलेदारी, करीत असलेले रिकामे होऊन घरीं बसले. वेद, शास्त्र, पुराण, इत्यादिकांचा अभ्यास करून भिक्षुकीवर निर्वाह करणारांची संख्या मोठी होती. त्यांनां मुख्य आश्रय पेशव्यांचा असून त्यांच्या पदरच्या सरदार, जाहागीरदार, दरखदार, सावकार, वगैरे मंडळीचाही आधार असे. त्यांच्याकडून त्यांनां इनाम जमिनी, वर्षासनें, नेमणुका, वगैरे अनेक प्रकारांनीं द्रव्य मिळत असे. श्रावणमासीं पुण्यास जी दाक्षिणा होई तिचा खर्च बाजीरावानें मागच्यापेक्षां थोडा कमी केला होता तरी तिला पांच लाख रुपये लागत आणि ती घेण्याला पन्नास हजार ब्राह्मण जमत. ते सारेच विद्वान असत असें नाहीं; त्यांत पुष्कळ टोंच्ये असत. परंतु श्रीमंतांचा हेतु स्वजातीयांचें संरक्षण व्हावें हा असल्यानें कोणी विन्मुख होऊन जात नसे.

मुसलमान बादशाहांच्या वेळीं देखील ब्राह्मण राज्यकारभारांत होते. त्यांच्या लष्करांत सरदार ह्मणून तलवार गाजविण्यास त्यांस संधी मिळत नव्हती, परंतु इतर खात्यांतलीं मोठमोठ्या हुद्यांचीं कामें, दिवाणगिरीसुध्दां, मिळत असत व तीं ते उत्कृष्ट रीतीनें चालवीत असत. मराठी राज्याची स्थापना झाल्यापासून त्यांचा सर्वत्र अप्रतिबद्ध संचार होऊं लागला तेव्हां त्यांच्या अंगांत क्षात्र तेजही चमकूं लागलें आणि पेशवाईची स्थापना झाल्यापासून अल्प काळांतच ते दिल्लीच्या तख्ताला धडक्या देऊं लागले. पानपतास त्यांच्यावर जो भयंकर प्रसंग गुदरला त्यांतून त्यांचें डोकें वर निघेल असें बहुधा कोणाला वाटलें नसेल, परंतु थोडक्याच अवकाशांत ते आपले पुनः दिल्लीच्या राशीस लागले. अखेर नाना फडनिवसाच्या कारभारांत त्यांचें वैभव आणि शहाणपण शिखरास पोहोचल्यासारखें झालें आणि बाजीराव गादीवर आल्यापासून जी उतरती कळा लागली ती काईम होऊन बसली. त्यांचें ऐश्वर्य अल्पकाळांत गेलें आणि राज्यकारभारांत पहिल्याप्रमाणें हात चालण्याची आतां मुळींच आशा धरावयास नको असें झालें तेव्हां इतर लोकांपेक्षां त्यांनां विशेष वाईट वाटणें अगदीं साहाजिक होतें. हें एलिफन्स्टन

साहेब मनांत वागवीत होता. कोणत्याही काळीं पाहिलें तरी साऱ्या हिंदुस्थानांत विद्येचे खरे भक्त, वेदशास्त्राध्ययनांत निमग्न होऊन जाणारे असे एक ब्राह्मणच होते. त्यांचें विद्वत्व कसलेंसें होतें तें कांहीं **एल्फिन्स्टन** साहेबाला कळत नव्हतें; तरी पण त्यांचीं वेदशास्त्रपुराणें ह्मणजे कुचकामाचीं असा त्याणें आपल्या मनाचा विपरीत ग्रह होऊं दिला नाहीं. उलट शास्त्राध्ययन चालावें ह्मणून पाटशाळा स्थापन कराव्या असें त्याचें मत होतें. भटाभिक्षुकांना श्रीमंतांचा आश्रय होता तो नाहींसा होण्यावरावर त्यांचे हाल आले आणि शेंकडों असामी पूर्वीं मिळालेलीं महावस्त्रें विकून निर्वाह करीत आहेत असें ऐकून त्याचें मन कळवळलें, व त्या गरीव विचाऱ्यांस आपल्या हातून आश्रय देववेल तेवढा द्यावयाचा असा त्याणें निश्चय केला. साताऱ्यास त्याणें जो जाहिरनामा प्रसिद्ध केला त्यांत धर्मादाय, नेमणुका, वर्षासनें, वगैरे पूर्वीं प्रमाणें चालेल असें कलम घातलेंच होतें आणि मुलखांत स्थिरस्थावरता झाली तेव्हां प्रथम तें वचन खरें करून दाखविण्याकरितां तो नाशिक क्षेत्रीं गेला आणि प्रसिद्धपणें तसें बोलून दाखवून त्याणें तेथें दक्षिणा वांटली. पुढें तेथून परत आल्यावर पुण्यांतही तशीच वांटली. विद्याध्ययन व धर्मादाय यां प्रीत्यर्थ पेशव्यांप्रमाणें दोन लक्ष रुपये वर्षास खर्चावे; त्यांत ब्राह्मणांकरितां दोन पाठशाळा ठेवाव्या आणि बाकी * दक्षिणा वांटावी असा त्याचा प्रथम विचार होता

* या प्रकरणीं एल्फिन्स्टन साहेबाचा लेख असा आहे—जिंकून घेतलेल्या देशामध्यें धर्मसंबंधाच्या ज्या बाबी असतील त्या कायम राखणें हें नेहेमी अवश्य आहे आणि जेथें राज्यकारभारही पुष्कळ काळपर्यंत ब्राह्मणांच्याच हातीं होता तेथें तर असें करणें विशेष अगत्याचें आहे. पेशव्यांचा धर्मादाय व धर्मसंबंधीं इतर खर्च जवळ जवळ पंधरा लक्ष रुपये असे. त्यांच्या पदरचे सधन लोक दानधर्म करीत तो वेगळाच. अशी त्यांच्या सारखी उधळपट्टी करणें अप्रशस्त होईल परंतु साताऱ्यास जाहिरनामा प्रसिद्ध केल्याप्रमाणें असले पुष्कळ खर्च करणें भाग आहे; आणि पेशवेतर तमभाव न पहाता जो धर्मादाय करीत त्याच्या बदला नासिक व वाई या उभय क्षेत्रीं एकदम हिंदूसाठीं पाठशाळा स्थापाव्या हें उदार सरकारास भूषणावह होईल.

परंतु पैशाच्या टंचाईमुळें त्याला तो सोडून द्यावा लागला. मग त्याणें संस्कृतांच्या अध्ययनाकरितां बक्षिसें देण्याकरितां वगैरे म्हणून ५०००० रुपयांची नेमणूक करून दिली. हाल्लीं पुण्यास जें कालेज आहे त्याला मुख्य आधार ह्याच रकमेचा. त्याची स्थापना प्रथम विश्रामबागेंत पाठशाळा ह्या नावानें झाली. भिक्षुकांस दक्षिणाही पुष्कळ वर्षे चालली होती. आतां ती कालेजांतल्या फेलोनां पगाराच्या रूपानें महिनेमहा मिळते व त्यांनां दाक्षिणा फेलो म्हणतात.

याप्रमाणें सर्व लोकांचीं स्थित्यंतरें मनांत आणून **एल्फिन्स्टन** साहेब त्यांच्याविषयीं योग्य वाटल्या तशा तशा तजविजी करीत होता म्हणून तो कोणाला भीत होता किंवा त्यांनां नसतें महत्व देऊन त्यांची मनधरणी करीत होता असें कोणी समजावयास नको होतें व समजत असले तर त्यांचा तो भ्रम ही लौकरच पळाला असेल. पेशवाई बुडाली आणि इंग्रजी झाली हें चांगलें झालें असें कोणाकोणाला वाटत असेल परंतु सर्वांनांच कांहीं तसें वाटत नव्हतें. पुनः स्वराज्य व्हावें अशी इच्छा पुष्कळांची होती व ती सिद्धीस नेण्यास कांहीं जिवावर उठलेले असामी उद्युक्त झाले. त्यांच्यांत पूर्वी लष्करांत नौकरी केलेले लोक होते. त्यांणीं बंडाला प्रवृत्त होऊन सातारच्या महाराजांस कैद करावें, तोतया चतुरसिंगास कैदेंतून मुक्त करावें, पुण्यास व साताऱ्यास असलेल्या साऱ्या गोरे लोकांनां एकदम ठार मारावें, आणि कांहीं मोठमोठे किल्ले अकस्मात घाला घालून घ्यावे, असले विलक्षण बेत मनांत आणले होते. परंतु ती बातमी बाहेर फुटून **एल्फिन्स्टन** साहेबाच्या कानीं गेली. त्याबराबर सावध होऊन त्याणें चौकशी सुरू केली, आणि बहुतेक पुढारी असामी धरले. त्यांत कांहीं ब्राम्हण होते. लागलीच चौकशी करून त्याणें त्यांनां तोफेच्या तोंडीं दिलें. त्याबराबर त्याचा वचक साऱ्या मुलुखभर चांगलाच बसला. ही शिक्षेची मराठी तऱ्हा त्याला मोठी पसंत होती. तो म्हणे देहांतशासन करण्यांत ज्या मुख्य दोन गोष्टी व्हावयास पाहिजेत त्या ह्या प्रकारानें साधतात. त्या अशा कीं मरणाराला इजा होत नाहीं आणि पहाणाराला तर ती शिक्षा मोठी भयंकर वाटते. सन

१८५७च्या बंडाच्या वेळीं इंग्रजांनीं पुष्कळ लोक तोफेच्या तोंडीं दिले, परंतु ती तऱ्हा प्रथम सुरू केली **एल्फिन्स्टन** साहेबानें.

ह्या पुण्यांत घडलेला प्रकार ऐकून मुंबईचा गव्हरनर सरईव्हन **नीपियन** साहेब याणें **एल्फिन्स्टन** साहेबाला पत्र लिहिलें, त्यांत त्याला त्याचें अगदीं आग्रहाचें असें सांगणें होतें कीं "शहाणे असाल तर ह्या कृत्याबद्दल वरिष्ठ सरकाराजवळ क्षमा मागा." परंतु **एल्फिन्स्टन** साहेबानें तो उपदेश जुमानला नाहीं. तो आपल्या मित्रमंडळीला म्हणाला, मी जर यांत कांहीं अन्याय केला असेल तर मला शिक्षा होणें योग्य आहे; आणि तसें नसून मीं केलेलें बरोबर असेल तर मला क्षमा मागण्याची जरूर नाहीं.

धर्मसंबंधीं बाबतींत लोकांनां आपआपल्या मनांप्रमाणें वागूं दिलें जाईल, स्वधर्माप्रमाणें वागण्यास कोणाला कांहीं हरकत होणार नाहीं, देवस्थानांचे खर्च—इनामें, नेमणुका वगैरे—जे पेशवे सरकारच्या वेळीं चालत होते ते चालविले जातील असें **एल्फिन्स्टन** साहेबानें जाहिरनाम्यांत प्रसिद्ध केलें होतें त्याप्रमाणें ते सारे चालू ठेविले. हिंदूंच्या धर्मप्रकरणांत आपण अगदीं हात घालूं नये आणि त्यांचीं मनें दुखवूं नयेत असें त्याचें मत होतें व त्याप्रमाणेंच तो वागत होता. त्याणें दक्षिणा चालू ठेविली त्यामुळें लोकांचा त्याच्या बोलण्यावर विश्वास बसला.

मराठी राज्यांत दक्षिण देशांत जाहागीरदार व सरदार पुष्कळ होते, त्यांची व्यवस्था पेशवाई अखेर कशी लागली तें आतां सांगावयाचें.

शिवाजी महाराजाच्या दोघा पुत्रांच्या पश्चात राज्याची वांटणी होऊन वडील घराण्याची गादी सातान्यास व धाकट्याची कोल्हापुरास कायम झाली. शाहूनें सर्व राज्य पेशव्यांस अर्पण केल्यासारखेंच होतें. त्याच्या मागून जे छत्रपति झाले ते नांवाचे राजे परंतु खरें पाहिलें तर कैदी होते. बाजीरावाच्या हातून शेवटचे उभयतां बंधु सुटल्यावर **एल्फिन्स्टन** साहेबानें त्यांस सातान्यास नेऊन कशी व्यवस्था केली हें मागें सांगितलेंच आहे. कोल्हापूर-

च्या महाराजांस ही आपल्या मुठींत ठेवावें असें बाजीरावाच्या मनांत होतें परंतु तें कांहीं घडलें नाहीं. इंग्रजांची व त्याची लढाई सुरू होतांच महाराज इंग्रजांस मिळाले; त्यामुळें त्यांचें कल्याण झालें. त्यांचे चिकोडी व मनोळी हे दोन तालुके गेले होते* ते परत मिळावे असा त्यांचा फार हेतु होता तो ही सिद्धीस गेला.

राजघराण्याच्या खालची पायरी जाहागीरदारांची. परंतु जाहागीरदार झाले ह्मणून कांहीं सारे सारखे नव्हते. फलटणचे निंबाळकर, जतचे डफळे, मुधोळचे घोरपडे, वगैरे कांहीं घराणीं महाराष्ट्रांत फार प्राचीन, भोंसल्यांच्या आधींपासून पादशहाच्या पदरीं मानकरी ह्मणून प्रसिद्ध होतीं. तेव्हां तीं अर्थातच पहिल्या प्रतीचीं. शिवाजीच्या व त्याच्या वंशजांच्या पदरीं राहून वाढलेले पंतप्रतिनिधि, सचिव वगैरे अष्टप्रधान, आंग्रे व अक्कलकोटकर राजे हे त्यांच्या खालचे ह्मणजे दुसऱ्या प्रतीचे, आणि पेशव्यांच्या पदरीं नोकरी करून वाढलेले ते तिसऱ्या प्रतीचे होत. यांपैकीं कांहीं इंग्रजांनां आरंभींच सामील झाल्यामुळें व कांहीं पूर्वीं त्यांच्या उपयोगीं पडले असल्यामुळें त्यांनां त्यांचें संरक्षण करणें भाग होतें. परंतु ज्यांचा तसा कांहीं हक्कसंबंध नव्हता, बाजी. रावाचा पक्ष अखेरपर्यंत ज्यांणीं सोडला नाहीं, त्यांनां देखील मोठाल्या नेम" णुका करून देऊन त्यांचें चालवावें, त्यांवर कृपा करावी यांत शहाणपण आहे, असें **एल्फिन्स्टन** साहेबाचें मत होतें.

जाहागीरदारांसंबंधानें विचार करण्यासारख्या गोष्टी पुष्कळच होत्या" त्यांप्रमाणें त्यांचा नीट विचार करून व्यवस्था लावण्याचें काम **एल्फिन्स्टन** साहेबासारख्या थोर मनाच्या मुत्सद्याच्या हातीं पडलें हें त्यांचें नशीब असें समजलें पाहिजे. त्याणें प्रथम असें केलें कीं ज्या जाहागिरी चालण्यास कांहीं

---

* चिकोडी व मनोळी तालुके महाराजांस परत देण्याचा ठराव झाला, परंतु ते त्यांच्या पदरीं पडले नाहींत. ती हकीगत येथें देण्याचें प्रयोजन नाहीं सबब दिली नाहीं.

हरकत येणार नाहीं असे करार झालेले होते, तेवढयाशिवाय करून बाकीच्या साऱ्या, बाजीरावाच्या मामलेदार वगैरे अम्मलदारांच्या हातांतला मुलुख जसा इंग्रजांनीं घेतला, त्याप्रमाणेंच काढून घेतल्या. त्यांपैकीं जो मुलुख निजामाच्या हद्दींत होता तो कोणाच्या नांवावर असला तरी त्याला त्यांतलें कांहीं मिळणार नाहीं असें सांगितलें. तसेंच ज्या जाहागिरी पेशवाई असतांच खालसा झाल्या होत्या त्यांपैकीं कोणास कांहीं परत दिलें नाहीं. पहिल्या वर्गांतल्या वंशपरंपरेनें चालत आलेल्या घराण्यांचा सर्व मुलुख सोडून दिला दुसऱ्या वर्गापैकीं पंतसचिवांकडे मात्र पेशव्यांनीं कांहीं अधिकार चालू दिला होता; साताऱ्चा जाहिरनामा प्रसिद्ध होण्याबरोबर ते इंग्रजांकडे जाऊन मिळाले ह्मणून त्यांचा मुलुख लागलाच त्यांच्या स्वाधीन केला. प्रतिनिधि पेशव्यांच्या स्वारींत होते परंतु संधि सांपडल्याबरोबर पळाले ह्मणून त्यांचा मुलुख त्यांच्या हवालीं केला. बाजीरावाच्या हुकमांत आह्मी वागणार नाहीं असें अक्कलकोटचे राजे कधींच ह्मणाले असते. परंतु इंग्रजांनीं त्यांच्या चाकरीस ठेवलेल्या फौजेला ते भीत होते; नाइलाजास्तव ते लढाईंतही हजर होते, परंतु लौकरच बाजीरावास सोडून गेले; ह्मणून त्यांची जाहागीरही लौकरच त्यांच्या हातीं आली. तिसऱ्या वर्गाच्या जाहागीरदारांत पटवर्धन अत्यंत प्रबळ होते; त्यांपैकीं परशुराम भाऊचा पुत्र गणपतराव तासगांवकर बाजीरावाकडे मुळीं गेलाच नाहीं, व मी खास जाणार नाहीं असें साताऱ्यास जाहिरनामा प्रसिद्ध होण्यापूर्वीच त्याणें **एल्फिन्स्टन** साहेबाला सांगितलें होतें; ह्मणून त्याची जाहागीर त्याच्याकडे कायम झाली. बाकीची जी भाईबंद मंडळी श्रीमंतांबरावर गेली होती, ती **एल्फिन्स्टन** साहेबाच्या पत्रांचा आदर करून फेब्रुआरी अखेर त्यांनां सोडून माघारी आली म्हणून त्यांच्याही जाहागिरी कायम झाल्या. निपाणकर आपा देसाई बाजीरावाकडे लौकर गेलाच नाहीं, अगदीं मागाहून गेला होता, परंतु इंग्रजांबराबर केव्हांच नेटानें लढला नाहीं; आणि एका प्रसंगीं त्यांच्या कैदींनां फारच चांगला जपला. पटवर्धन व रास्ते यांच्या प्रमाणें लढाईच्या आरंभापासून अखेरपर्यंत **एल्फिन्स्टन** साहेबाबराबर त्याणेंही संबंध ठेविला होता, परंतु बाजीरावाचा पक्ष लौकर सोडला नाहीं

ह्मणून त्याचा बराच मुलुख त्याणें घेतला; बाकीची जाहागीर त्याला दिली व झालेल्या नुकसानाबद्दल ही पुढें थोडासा मुलुख दिला. बाजीराव सर्वस्वीं बुडणार असें दिसलें तरीं त्याच्या पदरच्या जाहागीरदारांनां त्याच्यासाठीं आपल्या हातून होईल तितकें लढलें पाहिजे असें वाटणें अगदीं योग्य होतें, व लढण्याबद्दल त्यांच्यावर इंग्रजांनां दोष ठेवतां आलाच नसता. माधवराव रास्त्याला मात्र ती गोष्ट लागू नव्हती. सिवनीचा प्रसंग पाहून त्याणें पळ काढला, त्यामुळें तो आपल्या यजमानाशीं बेमान ठरला; इंग्रज सरकारावर त्याचे कांहीं उपकार नव्हतेच, ह्मणून इतरांप्रमाणें त्यांणीं त्याचें चालवावें असें नव्हतें; मिळून तो 'अतो भ्रष्टस्ततोभ्रष्टः' असा झाला.मराठेशाईंत जाहागीर ह्मटली; ह्मणजे कोणी सरदार कर्ता असला, जर त्याणें कांहीं चांगली कामगिरी बजाविली तर त्याची शिपायगिरी पाहून मग त्याणें अमूक फौज ठेऊन सरकारची नोकरी करावी असा करार ठरे आणि त्या फौजेच्या खर्चाकरितां त्यास दरसाल जो पैसा द्यावयाचा ठरे तितक्या उत्पन्नाचा मुलुख त्याच्या ताबीन होई व त्याचा बेहेडा ठरे. त्या मुलुखाच्या उत्पन्नाचा व खर्चाचा त्याला दरसाल हिशेब द्यावा लागे. परंतु त्यांत सर्वप्रकारें अम्मल त्याचा चाले. जाहागिरीपैकीं कांहीं मुलुखावर खुद्द त्याची मालकी ठरे. त्याप्रमाणें रास्त्यांचा जेवढा खासगी ह्मणून भाग ठरला होता तेवढा त्यांच्याकडे त्याणें ठेविला. त्याच्याच सारखे जे आणखी कित्येक सरदार होते, ह्मणजे 'आमचें चालवा' असें ह्मणण्याला ज्यांनां कांहीं हक्क उरला नव्हता आणि ज्यांनां आपल्यावर कृपा होणार नाहीं, आपला छळ होईल असें भय वाटत होतें, त्यांच्यावर देखील **एल्फिन्स्टन** साहेबानें कृपादृष्टि ठेविली आणि जाहागिरीपैकीं वर सांगितल्याप्रमाणें जेवढे गांव किंवा जमिनी त्यांच्या खास नेमणुकीच्या म्हणून होत्या तेवढ्या साऱ्या त्यांनां परत दिल्या. पंतप्रतिनिधि, पंतसचिव, अक्कलकोटचे राजे, डफळे आणि निंबाळकर, हे आम्ही सातारच्या महाराजांच्या पदरीं राहणार असें म्हणाल्यावरून **एल्फिन्स्टन** साहेबानें तें मान्य केलें आणि त्यांच्या जाहागिरी त्यांजकडे चालविण्याचें आश्वासन दिलें.

याप्रमाणें **एल्फिन्स्टन** साहेबानें नवीन राज्यव्यवस्थेचें काम बहुतेक

संपविलें. त्याला प्रथम वाटलें होतें त्यापेक्षां तें पुष्कळ कमी वेळांतही झालें; तेव्हां आतां बाकी राहिलेलेंही असेंच लौकर आटपून आपल्याला स्वदेशीं थोड्याच दिवसांत जातां येईल ह्या आशेवर तो आनंदांत दिवस काढीत होता; परंतु दक्षिण देशच्या लोकांच्या सुदैवानें सन १८१९ च्या फेब्रुआरी महिन्यांत आपली नेमणूक मुंबईच्या गव्हरनरच्या जागेवर झाली असें त्याला समजलें. त्याबराबर त्याचे सारे बेत फिरले आणि नवे नवे विचार मनांत घोळूं लागले. गव्हरनर होऊन बसल्यावर कराव्या लागणाऱ्या पुष्कळ गोष्टी आपल्यास अगदीं अपरिचित आहेत याकरितां कलकत्यास जावें, गव्हरनर जनरल, त्याचे कौन्सिलर वगैरे हुजूरची बडीबडी कामदार मंडळी, आपली पुष्कळ दिवसांत न भेटलेली स्नेही मंडळी, यांच्या भेटी घ्याव्या आणि राज्यकारभा-रांत कठीण वाटणाऱ्या विषयांवर त्यांच्याशीं बोलून माहिती करून घ्यावी, असें मनांत आणून तो लागलाच निघाला. परंतु मुंबईहून पुढें जाणें झालें नाहीं. कर्नाटकांतील जाहागीरदारांबराबर बोलणें चालणें होऊन ठराव व्हावयाचे होते; तें काम अगदीं जरूरीचे होतें ह्मणून त्याला माघारें फिरून परभारें तिकडे जावें लागलें.

पेशव्यांच्या राज्यापैकीं दक्षिण महाराष्ट्र देश जिंकून घेण्याचें काम जनरल मनरो याचे हातून झालेलें होतें ह्मणून पुढें त्याची व्यवस्था लावण्याचें कामही त्याच्यावरच सोंपवावें असें गव्हरनर जनरलाचे मनांत होतें. **एल्फिन्स्टन** साहेबाप्रमाणें त्यालाही कमिशनर नेमून तसाच अधिकार तो देत होता, परंतु **मनरो** साहेबाच्या दृष्टीला विकार झाला आणि शक्ति क्षीण झाली ह्मणून आतां चाकरी नको असें सांगून त्याणें राजीनामा दिला आणि घराची वाट धरली; त्यामुळें तें सारें काम **एल्फिन्स्टन** साहेबावरच पडलें. मद्रास खात्यांत मिस्टर चापलिन ह्मणून एक मुलकी कामदार चांगला हुशार होता, त्याणें **मनरो**च्या हाताखालीं काम केलें होतें; त्याची त्याणें शिफारस केल्यावरून त्याणें त्याला आपल्या मदतीस घेतलें.

**एल्फिन्स्टन** साहेब मुंबईहून निघाला तो मस्कतच्या इमामाकरितां

बांधलेल्या ' करफ्यू ' नामक जहाजांत बसून मालवण बंदरांत उतरला. तो खुषकीच्या मार्गानें तारीख २१ एप्रिल रोजीं गोंव्यास गेला. तेथच्या गव्हर्नरानें त्याचें आदरातिथ्य चांगलें केलें. तें शहर पाहून आपण आतां अगदीं युरोपियन वस्तीतींत आहों असें त्याला वाटलें. तो मागें तेथें गेला होता तेव्हां इन्क्विझिशन ( Inquisition ) नामक तेथची जी प्रसिद्ध तुरुंगाची इमारत ती त्याला पाहावयास मिळाली नव्हती, ती त्या गव्हरनरच्या परवानगीनें आतां पहावयास सांपडली. कैदी एकमेकांशीं बोलत असतील तें त्यांच्या दृष्टीस न पडतां ऐकावयास सांपडावें अशी एका कोठडींत युक्ति केलेली होती ती ही त्यास पहावयास सांपडली.

गोंव्याहून निघून एल्फिन्स्टन साहेब बेळगांवास गेला. तेथें जाहागीरदार मंडळी जमली होती. त्यांच्याशी बोलणेंचालणें होऊन ठराव होण्याला श्रम पडले नाहींत; कारण त्या बहुतेकांशीं त्याचा परिचय होता आणि पूर्वी पंढरपूर मुक्कामीं त्यांच्या व पेशव्यांच्या दरम्यान जे करार ठरले ते त्याच्या मध्यस्थीनें झाले होते. बाजीरावाचें व त्यांचें रहस्य नव्हतेंच आणि ते त्याचा टिकाव लागत नाहीं हें समजूनच त्याला सोडून येऊन घरीं बसले होते. ' आतां त्याचा आमचा कांहीं संबंध उरला नाहीं, आह्मी इंग्रजांच्या पदरचे ' असें ह्मणा, तुमचे मानमरातब पेशवाईतल्याप्रमाणें चालतील, आपआपल्या मुलखांत तुमचा अधिकार अगदीं पूर्ण, देहांत शासन करण्याचा सुद्धां चालेल; त्याच्या जोरावर एखादें अनन्वित कृत्य केलेंत नाहीं आणि आपल्या राज्यकारभारांत पुष्कळ दिवस, सतत, अव्यवस्था राहूं दिलीत नाहीं ह्मणजे इंग्रज सरकार आपल्या अधिकारांत हात घालणार नाहीं; असें त्याणें त्यांनां आश्वासन दिलें. एक चिंतामणराव आपा सांगलीकर शिवाय करून बाकी सर्वांनीं इंग्रज सरकारची चाकरी करण्याचें कबूल केलें. त्यांच्या बरोबर जे ठराव झाले त्यांत त्यांणीं आपसांतएकमेकांशीं तंटेबखेडे करूं नयेत. जर कांहीं वाद उत्पन्न होईल तर त्याचा निकाल सरकारमार्फत करून घ्यावा असें ठरलें. सरकारचे गुन्हेगार त्यांच्या मुलखांत जाऊन राहिले तर त्यांनां त्यांनीं आश्रय

देऊं नये, सरकारचे अम्मलदार येऊन त्यांचा तपास लावतील तर त्यांनां त्यांच्या स्वाधीन करावें, असा त्यांच्याशीं एक करार करून ठेऊन पुढें वारंवार उपस्थित होणाऱ्या तक्रारींचें **एल्फिन्स्टन** साहेबानें दूरदृष्टीनें आधीं मूळच नाहींसें करून टाकलें.

चिंतामणराव आपानें आपण इंग्रज सरकारची चाकरी करणार नाहीं असें सांगितलें आणि **एल्फिन्स्टन** साहेबाला ह्मटलें 'तुह्मी पेशवे सरकारची नोकरी जोंपर्यंत इमानें इतबारें कराल तोंपर्यंत तुमची जाहागीर तुह्माकडे बिन तक्रार चालेल अशा विषयीं आह्मी जामीन आहों,' असा ज्या इंग्रज सरकारानें आमच्याशीं करार केला, त्याणेंच आतां पेशवे गेले तेव्हां 'आह्मी तुमचे यजमान, आमची चाकरी करा,' असें ह्मणावें हें आश्चर्य आहे. पेशवे सरकारचा व इंग्रज सरकारचा बेबनाव झाला तर आह्मी इंग्रजांची चाकरी करावी असा पंढरपूरच्या तहनाम्यांत कांहीं कोठें करार नाहीं. याजकरितां इंग्रजांनीं जी जामीनगत पत्करलेली आहे ती त्यांनां सुटत नाहीं, ती चाललीच पाहिजे सबब त्याकराराप्रमाणें इंग्रज सरकार चालेल असें तुह्मी मला एकदम पत्र लिहून पाठविलें पाहिजे.

यावर **एल्फिन्स्टन** साहेबाकडून जें उत्तर मिळालें त्याणें आपासाहेबांची ती तक्रार बाजूस राहून ते लौकरच ताळ्यावर आले. त्याणें त्यांनां असें लिहिलें कीं आतां पेशवाई बुडून कंपनीसरकारचें राज्य झालें आहे ह्मणून आह्मी सांगतों याप्रमाणें आपण वागलें पाहिजे. असें वागण्याची आपली कबुली पंधरा दिवसांच्या आंत न येईल तर सरकारास आपली जाहागीर काढून घेणें भाग पडेल. तें वाचून त्याणें आपल्या वकिलाबरोबर असें सांगून पाठविलें कीं आह्मी चाकरी करतों व सरकारच्या आणखी ज्या अटी आहेत त्या मान्य करतों, परंतु इंग्रज सरकारानें आपण गुरें मारणार नाहीं व ब्राह्मणांकडून जबरीनें कामें करून घेणार नाहीं, कांहीं माफ करूं असा करार करावा.

ह्या अटी व दुसऱ्या अशाच आणखी कांहीं होत्या—त्यांत आपल्या

भाईबंद मंडळीबराबर आपल्यापुरती लढाई करण्याचा आपल्यास अधिकार असावा ही अगदीं मुख्य होती—त्या इंग्रज सरकारास कधींही मान्य होण्यासारख्या नव्हत्या; त्यांच्याविषयीं वादविवाद होण्यांत पुष्कळ दिवस गेले, परंतु अखेर त्याला बाकीच्या मोठमोठ्या सरदार मंडळीबराबर जें नाशिबीं आलें तें मान्य करावें लागलें. अखेर तारीख १० माहे मे रोजीं कागदपत्र झाले. त्या दिवशींच्या एलिफन्स्टन साहेबाच्या रोजनाम्यांतला लेख असा आहे—
"चिंतामणरावांनां दपटशा पोहोंचला तेव्हां ते आज संध्याकाळीं भेटीला येऊन पुष्कळ वेळ बसले. त्यांचें भाषण एकंदरींत सौम्य होतें आणि बहुतेक मुद्याच्या गोष्टी त्यांणीं मान्य केल्या. तरीपण 'जर' 'तर' 'आणि' 'व' हे शब्द कोठें असावे, कोठें नसावे, याविषयीं ते कारकुनाबराबर भारी भांडले त्यांचें भाषण मोठें विनोदाचें, मौजेचें होतें. इंग्रजांच्या रीतिभातींची आपल्याला मोठी माहिती, आपलें चालणें, घोड्यावर बसणें, बागबगीचे करणें, इत्यादिकांची त्यांणीं पुष्कळ बढाई मारली आणि आपल्या भाईबंद मंडळीवर खूप तोंड सोडण्यांत कांहीं कसूर केली नाहीं; अगदीं एका पायावर उभे असल्यासारखे होते.'

असो. चिंतामणरावाबराबर करारनामा झाल्यावर सारें आटपून एलिफन्स्टन साहेबानें जो सरकारास रिपोर्ट केला त्यांत त्यांच्याविषयीं असें लिहिलें आहे.

'इतर बाबतींत हे जरी कांहींसे प्रतिष्ठित आणि चांगल्या मनाचे आहेत तरी क्षुद्रबुद्धि, कुटिल, कलहप्रिय आणि लहरी स्वभावाचे आहेत. त्यांचा कोटिक्रम कुटिलपणाचा व लबाडीचा होता यांत संशय नाहीं.

चिंतामणरावांविषयीं एलिफन्स्टन साहेबाच्या मनाचा ग्रह असा होता तरी त्याणें त्यांची सारी तक्रार ऐकून घेतली हा त्याचा थोरपणा म्हटलें पाहिजे. त्याणें त्या सर्व जाहागीरदार मंडळीबराबर जे ठराव केले ते पुष्कळ अंशीं त्यांनां हितावह असेच होते. ते व त्यांच्या घराण्यांतील सरदार यांज-

कडे जाहागिरी चालतील; त्यांबद्दल त्यांणीं चाकरी करावी असे करार झाले. परंतु त्यांणीं चाकरीस जे स्वार ठेवावयाचे ते त्याणें केवळ नांवाला, अगदीं थोडे* मागितले. त्यांचे स्वार दूर देशीं जावयाचे नसतच आणि ते कामाच्या फारसे उपयोगीं नसत, व आतां त्यांची फारशी जरूरही लागण्यासारखीं नव्हती. आपल्या मुलखांत आपला अधिकार पूर्ण चालावा असा त्यांचा मोठा हेतु होता तोही त्याणें पूर्ण केला. सर्व अधिकार त्यांकडे ठेविले.

याप्रमाणें कर्नाटकाच्या जाहागीरदारांशीं ठराव होऊन तें काम पुरें झालें. **एल्फिन्स्टन** स्वतःच तिकडे गेल्यानें तें चांगल्या प्रकारें तडीस लागलें. चिंतामणराव आडेल स्वभावाचे होते, परंतु त्याणें त्यांच्याशीं गोडीगुलाबीनें वागून त्यांनां देखील खुष करून सोडलें. तो ह्मणतो—त्याचें आमचें संघटन झाल्यानें तो अगदीं खुष झाला आणि शेवटीं अगदीं संतुष्ट आणि आनंदांत असल्यासारखा दिसत होता. कदाचित त्याची ही वृत्ति टिकणार नाहीं, परंतु ती खरी होती यांत मला कांहीं शंका नाहीं.

**एल्फिन्स्टन** साहेब बेळगांवाहून निघाला तो समूर पुण्यास गेला नाहीं. त्याला प्राचीन स्थळें पाहाण्याची मोठी हौस असे आणि तसें एकादें त्याच्या वाटेपासून पन्नास मैल दूर असलें तरी तिकडे तितकें वांकडें जाऊन तें पाहिल्यावांचून तो रहात नसे हें मागें सांगितलेंच आहे. दक्षिणेंतल्या उद्ध्वस्त झालेल्या राजधान्यांत विजापूर आलीकडील असून, तेथील बादशहानीं

---

* वेहेज्यांत ठरलेल्या संख्येपैकीं तीन हिस्से माफ करून फक्त चतुर्थांश घ्यावे असें ठरवून सरकारानें धारवाडास रिसाला केला. त्यांत असलेले स्वार कच्चया खर्चानें होते व ते जाहागीरदारांस कार्यप्रस्थांत घरीं नेतां येत. पुढें रिसाला कलादगीस गेला. त्याचा खर्च जाहागीरदार देत, परंतु तो नियत होता; व त्यांत त्यांणीं नेमून दिलेले लोक होते. त्यास ‘सदर्न मराठा हॉर्स’ हें नांव होतें. सन १८५७ च्या बंडानंतर हा रिसाला मोडला आणि जाहागीरदारांकडून सरकार नक्त पैसा घेऊं लागलें.

अगणित द्रव्य खर्चून ज्या टोलेजंग, भव्य इमारती उठविल्या त्यांपैकीं पुष्कळ अद्याप चांगल्या शाबूद आहेत.त्या दक्षिणेचें भूषणच आहेत ह्मणण्यास हरकत नाहीं. त्या पाहणाराचें मन आनंदभरित व आश्चर्यचकित झाल्यावांचून रहातच नाहीं. तेव्हां असलें हें अप्रतिम स्थळ केव्हां पाहीन असें त्याला वाटावें यांत कांहीं नवल नाहीं. तारीख ९ जून रोजीं तो तेथें जाऊन पोहोंचला. तेथें त्याणें जें जें पाहिलें आणि त्यावर त्याच्या मनांत जें जें आलें तें तें त्याणें आपल्या रोजनाम्यांत लिहून ठेविलें आहे. त्यांत दिल्लीच्या व तेथच्या इमारतींची तुलना करून चांगली कोणती तें लिहिलें आहे. त्याणें अखेर असें ह्मटलें आहे.—' एकंदरींत विजापुरांत मला वाटलें होतें त्यापेक्षां पुष्कळ अधिक पहाण्यासारखें आहे आणि दक्षिणेंत आजपर्यंत मी जें काय पाहिलें त्यापेक्षां पुष्कळच जास्त आहे. ह्या देखाव्यांत एक प्रकारचा भव्यपणा आहे आणि हा पाहून येथें जे बादशहा होऊन गेले त्यांचें स्मरण होऊन वाईट वाटतें. त्यांच्या अंगांत जे काय दोष आणि दुर्गुण होते त्यांचें आतां कोणाला स्मरण नाहीं, परंतु त्यांची शक्ति केवढी होती त्याचें प्रमाण दिसतें आहे. तें सर्व लयास गेलें ह्मणून वाईट वाटतें आणि त्या मानानेंच त्यांच्या ऐश्वर्याबद्दल अधिक आश्चर्य वाटतें. '

बेळगांवाहून विजापुरास जात असतांना तारीख २४ मे रोजीं **एल्फिन्स्टन** साहेबानें मालकम साहेबाला पत्र लिहिलें त्यांत त्यावेळीं हिंदुस्थानच्या राजेरजवाड्यांविषयीं त्या उभयतांचे विचार कसे होते वगैरे अनेक गोष्टींचें दिग्दर्शन आहे. याजकरितां तें जरी बरेंच लांब आहे तरी त्यांतील मजकूर खालीं देतों त्याचा वाचकांनीं कंटाळा मानूं नये.

मेहेरबान मालकम साहेब—

तुमचें पत्र व त्या लगत स्टुअर्ट साहेबाला पाठविलेल्या पत्राची नक्कल आलेली काल पावली. त्या पत्रांत जीं तत्वें नमूद केलेलीं आहेत तीं उदार आणि थोर मनाचीं आहेत. येथून पुढें चार पांच वर्षें हिंदुस्थानाची स्थिति बहुधा कोणत्या प्रकारची होण्याचा संभव आहे तें लिहून तिचें तुह्मी

जें अगदीं हुबेहुब चित्र काढलें आहे तें पाहून, आतां तुह्मी हा देश सोडून बहुतकरून जाणार ह्मणून मला वाईट वाटतें. केव्हां केव्हां माझ्या मनांत असें येतें कीं आमची जी नव्या पिढीची तरुण मुत्सद्दी मंडळी आहे—ज्यांणीं हिंदुस्थानच्या राजेरजवाड्यांच्या भरभराटीच्या काळांतलें ऐश्वर्य मुळींच पाहिलेलें नाहीं—ती येथच्या लोकांचा तिरस्कार करते आणि तिचा कल सर्व कामांत अरेरावीनें वागण्याकडे असतो हा तिच्या अंगांत दुर्गुण आहे. आह्मी जिंकलेले लोक आमच्यावर केव्हां उठतील नकळे अशी मला एकदां मोठी धास्ती पडली होती, ती जरी आतां पुष्कळ कमी झाली आहे तरी जें दुसरें एक भय आहे तें मनांतून जात नाहीं. तें असें कीं हिंदुस्थानच्या बहुतेक भागांत हाल्लीं जे रिकामे असलेले शिपाई भरलेले आहेत आणि आणखी कित्येक वर्षे असेच असणार, त्यांनां जर कोणी साहसी नायक मिळाला तर आमच्यावर मोठें संकट ओढवेल. ह्या शिलेदार मंडळीला आपली स्थिति कठीण आहे असें कळूं लागून फार काळ झाला नसेल, आणि ह्या देशांत जी राज्यक्रांति झाली आहे तिचे परिणाम आमच्या नव्या प्रजेच्या अनुभवास पूर्णपणें येऊं लागण्याचा समय अजून आला नाहीं, हें ही मी समजतों आहे. ह्मणून अशा समयीं तुह्मी येथून जाणार हें खरें दुर्दैव असें मी समजतों; आणि एवढा प्रसंग गुदरून जाईपर्यंत कोणत्यातरी प्रकारानें माळव्यांत, राजपुतान्यांत, किंवा कोठें तरी तुमचें वास्तव्य घडावें अशी इच्छा केल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. तुह्मी स्टुअर्ट साहेबाला पत्र लिहिलें त्यांत ज्या गोष्टी लिहिल्या आहेत त्यांपैकीं पुष्कळ शिंद्याच्या राज्यापेक्षां निजामाच्या राज्याला अधिक चांगल्या लागू पडतात; आणि त्या दृष्टीनें त्या मला अधिक महत्वाच्या वाटतात. शिंद्याच्या राज्याविषयीं ह्मणाल तर आह्माला जय आल्यानें त्याची स्थिति सन १८०३ मध्यें लढाई सुरू झाली तेव्हां होती तीपेक्षां कांहीं निराळी झाली आहे आणि तें लयाला जाण्याच्या पंथास लागलें आहे असें कांहीं मला वाटत नाहीं. तें तेव्हांच निर्बळ, जरा धका लागला कीं कोसळून पडेल असें खिळखिळें झालेलें होतें. त्यावर कर्जाचें ओझें मोठें होतें आणि त्याच्यानें जितक्या फौजेला पगार देववतो तीपेक्षां त्याणें अधिक फौज बाळगली होती;

त्यामुळें ह्मणजे त्याचे हाल कांहीं अधिक होत आहेत असें मला दिसत नाहीं, आणि ते कमी करण्याचें आमच्या शक्तींत आहे अशीही माझी खात्री होत नाहीं. अगदीं आह्मी सांगूं तसें वागण्यास कबूल व्हावें आणि तूर्त आपल्यावर जीं संकटें आलेलीं आहेत त्यांतून एकदां मुक्त व्हावें असें शिंद्याच्या मनांत खरोखर आलेलें आहे अशी आपली खात्री असल्याचें तुह्मी लिहिता त्यावरून आणि तसेंच स्टुअर्ट साहेबाच्या युक्तीपेक्षां दुसरी कोणतीच आपल्याला बरी वाटत नाहीं ह्मणता त्यावरून माझें मन बरेंच डळमळूं लागलें आहे. तरी देखील मी असें कबूल करतों कीं ती युक्ति कितीशी उपयोगीं पडेल, आणि तिच्या योगानें आह्मी जें टाळावयाला पहात आहों तें बाजूस राहून प्रत्यक्ष आमचें राज्य वाढल्याशिवाय राहील कीं काय आणि त्यायोगानें ह्या देशच्या लोकांनां कामें मिळण्याला अवकाश कमी झाल्याशिवाय राहील कीं काय, याची मला मोठी शंका आहे. आह्मी शिंद्याला जर कांहीं पैसा उसनवार ( कर्ज ) दिला तर तो आपल्याला ज्या काय खऱ्या अडचणी असतील त्या भागविण्याकडे न लावतां तो चैनबाजींत उडवूं लागला तर असा उधळशील तर खबरदार, अमूक प्रकारें खर्च कर, असें आह्माला त्याला सांगतां येईल अशी मला खात्री मुळींच वाटत नाहीं. तो जितका आमच्यावर अवलंबून राहूं लागेल तितकी तितकी आपल्या फौजेची दुर्दशा अधिक होऊं देईल असा संभव आहे. परंतु तसें न करतां त्याच्या मनांत ती कायम राखावी असें आलें तरी ती कमी होत जाईल असें स्टुअर्ट साहेबाच्या युक्तींत मूळ बीजच आहे. त्याणें नीट व्यवस्था केली आणि खर्च उत्पन्नाच्या बेतानें ठेविला तर त्याच्या फौजेची स्थिति आहे यापेक्षां चांगली राहील. परंतु त्याणें आपला कांहीं मुलुख गहाण लाऊन दिला ह्मणजे आतां आहे तितकी फौज कायम ठेऊन तिला महिनेमहा भरपूर पगार देऊन बाळगतां येणें अशक्य आहे. हल्लीं तो त्या लोकांनां सरासरी निर्वाहापुरता पैसा आगाऊ देतो, बाकी मागाहून निकाल करून देऊं असें वचन देतो, पुढें पाहूं म्हणतो आणि केव्हां केव्हां थोडीशी लूट करूं देतो, अशावर चाललें आहे. म्हणून स्टुअर्ट साहेबाची युक्ति साधली तर रिकाम्या फौजेची संख्या वाढलीच पाहिजे.

आतां जी सुधारणा करण्याचा बेत आहे ती करूं लागलें तर तिचें फळ तत्काळ दिसूं लागून शिंद्याचें उत्पन्न एकाएकीं लागलेंच वाढेल अशी जर कोणाची कल्पना असेल तर मात्र गोष्ट वेगळी. आह्मी आपला प्रत्यक्ष अम्मल वाढवूं लागलों तर दुसरें एक अरिष्ट उत्पन्न होण्याचा पुष्कळ अंशीं संभव आहे. तें असें कीं मग शिंद्याचा व आमचा अगदीं निकट संबंध येईल आणि तंटे, लढाया, सुरू होऊन मुलूख जिंकून घेण्यावर येईल. कारण त्याच्यावर आम्हाला हाल्लीं आहे यापेक्षां अधिक जोरा चालवतां आला नाहीं म्हणजे परिणाम असा व्हावयाचाच. मी असें म्हणतों तरी या प्रकरणीं दुसरी कांहीं यापेक्षां चांगली युक्ति मला सांगतां येईल असें मात्र वाटत नाहीं. आह्मी जर शिंद्याच्या राज्याकडे पाहिलें नाहीं, पाहिजे तसें चालूंदे ह्मटलें, तर शिंदा मेल्यावर—किंवा त्यापूर्वी देखील—बंड किंवा आणखी कांहीं गडबड होऊन झोटिंग बादशाही होईल; तितक्या अवधींत तें राज्य लुटारू होऊन बसण्याचा संभव आहे, आणि आह्मीं त्यांत हात घालूं ह्मटलें तर घालण्याला स्टुअर्ट साहेबाचा बेत आहे तो चांगला कीं आमची फौज चाकरीस ठेऊन देण्याची जी आमची तऱ्हा आहे ती (subsidiary system) चांगली येवढेच पहावयाचें. ह्या दोहींच्या तोडीची तिसरी युक्ति मला कांहीं माहीत नाहीं. माझें मत विचाराल तर आपली फौज चाकरीस ठेवावयाची ही जी आमची युक्ति आहे तींत किती जरी दोष असले तरी मला तीच पसंत आहे आणि मला असें वाटतें कीं, तींत जरा सूत्रचालकपणा नीट केला ह्मणजे निजाम, गायकवाड, म्हैसूरचा राजा आणि होळकर, भोसले, यांचें काय जें अवसान शिल्लक उरलें आहे तें, हीं सारीं लखनौचे नबाब जितके दिवस जीव धरून राहिले आहेत तितके दिवस राहतील. सारांश सध्या आमच्या अंगांत जितकी शक्ति आहे तितकी असतां आमच्या मनांत आहे त्यापेक्षां जलद राज्य वाढविण्याला आम्हाला कोणाला भाग पाडतां येईल कीं काय, याची मला पुष्कळच शंका आहे. जर आम्हाला हिंदुस्थानांतल्या एखाद्या राजानें लढाईला उठावयासच लाविलें तर आम्ही त्याला पाहिजे तर पदच्युत करूं, किंवा एखादा किल्ला अथवा दुसरें कांहीं तरी

त्याच्याकडून जामीनगतीदाखल अडकवून घेऊन ठेऊं. त्याच्याजागीं आह्मी दुसरा बसवूं आणि राज्य चालवूं. असें आह्माला नेहमी करतां येईल. वजीर अलीच्या प्रकरणांत आह्मी कांहीं अंशीं असें केलें, आणि ह्मैसूर प्रकरणांत तितकेंही केलें नाहीं. आज नाहीं उद्यां, पण केव्हां तरी आह्मी सारा देश घ्यावा हें बहुधा इष्ट आहे. तेवढा घेतला ह्मणजे मग आमच्यांत जरी कर्ते पुरुष नसले तरी फारसें भय नाहीं; कारण मग राजकारणें, कारस्थानें करायाला कांहींच उरलें नाहीं. तसेंच मग लढाईचें ही फारसें भय नको, कारण आमच्याशीं जे लढण्याला उभे राहणार त्यांना कोणी नायकच नाहीं असें होईल. मग आह्माला आपली काळी फौज नीट संभाळतां आली आणि रशियाला आंत येण्याला प्रतिबंध करतां आला ह्मणजे झालें. मग ह्या देशाचे लोक आमच्या शिक्षणानें सुशिक्षित होऊन, त्यांचें आमचें बनेनासें होऊन, दोघांनीं दोहींकडे व्हावें हें उभयतांस ही श्रेयस्कर असें होईपर्यंत आमच्या राज्याला धोका येण्यासारखें दुसरें कांहीं दिसत नाहीं. इतकें होण्याला फार काळ पाहिजे. परंतु मध्यंतरीं मला एक मोठें भय दिसत आहे, तें असें--आह्माला साऱ्या हिंदुस्थानांत शांतता राखावी लागणार, ती राखण्यास जेवढें सैन्य अवश्य पाहिजे तेवढें नेहमी अगदीं तयार ठेविलें पाहिजे; त्याच्या खर्चाखालीं आमच्या उत्पन्नाचा फडशा पडेल; आणि जर आह्मी कोठें सईल सोडलें तर एखादा धारिष्टवान सेनाग्रणी उत्पन्न होऊन कांहीं काळपर्यंत आपला यशोदुंदुभि वाजवील, तो ऐकून त्याच्या जवळ लुटारू लोकांच्या झुंडीच्याझुंडी जमतील. ते लोक साहसी असणार. त्यांचा तो नायक एखादा ब्राम्हण, किंवा नामर्द, मागूबाई, किंवा तान्हें पोर, किंवा बायको, असला मात्र नसावा. तो जर गनिमी काव्यांत वाकबगार, कजाग असला तर आम्हाला पुरेपुरें करून टाकील. शिवाय आम्ही आपल्या सूत्रानें वागवूं लागलों म्हणजे हें संकट उपस्थित होण्याचा संभव कांहीं वाढणार नाहीं, उलटा कमी होत जाईल. तसें करण्याला खरा लागू पडणारा उपाय म्हटला तर (subsidiary system) आमची फौज यांच्या चाकरीस ठेऊन द्यावी हा एकच आहे.'

विजापूर पाहून झाल्यावर **एल्फिन्स्टन** साहेब पुण्यास गेला. तेथून तारीख २ जुलै रोजीं त्याणें सर जेम्स मार्किंटाश यास पत्र लिहिलें; त्यांत ज्या गोष्टी लिहिल्या त्या फार दूर दृष्टीच्या होत्या व त्याप्रमाणें कांहीं अनुभव ही येऊन चुकला आहे, सबब तेवढा मजकूर पुढें लिहितों.

'आमचें हिंदुस्थानांतील साम्राज्य फारकाळ टिकणार नाहीं असें जें तुम्हाला वाटतें आहे, तें विचारपूर्वक आहे, उगाच कांहीं तरी मनानें घेतलेलें नाहीं; असें मला वाटतें. हें राज्य काय झालें तर बुडेल, हा तर्क करणें कठीण आहे. परंतु हें जर रशियाच्या तडाक्यांतून निभलें आणि दुसऱ्या कोणी परकीयांनीं स्वाऱ्या केल्या आणि त्यांतून ही निभलें तर आमच्या काळ्या फौजेच्या हातून बुडेल. मला वाटतें त्याच्या नाशाचें बीज ह्या फौजेंत आहे. आमची काळी फौज हें एक नाजुक आणि भयंकर यंत्र आहे. तें चालविण्यांत थोडें कांहीं चुकलें कीं तें लागलेंच उलटून आमचें आमच्यावर पडेल. हिंदुस्थानचे लोक सुधारत जाऊन इतके चांगले व्हावे कीं त्यांच्यावर परकीयांनीं अम्मल चालविणें अगदीं अशक्य व्हावें आणि त्यामुळें आमचें राज्य बुडावें. असें होईल तर फार उत्तम. परंतु हें घडणें म्हणजे किती दूरची, कालांतरींची गोष्ट आहे तें अनुमान सुद्धां करतां येणार नाहीं. आमच्या लोकांची येथें वसाहत झाली तर तें लौकर घडून येईल. परंतु आमची वसाहत म्हटली म्हणजे गर्दी आणि काळ्या लोकांचा द्वेष होण्यास सुरुवात झालीच समजावें. युरोपियन लोक मुलुखभर जिकडे तिकडे शिरून ह्या देशाच्या लोकांच्या ज्या काहीं चमत्कारिक समजुती ( prejudices ) आहेत त्यांच्या उलट वागून त्यांना राग आणतील, त्यांचे हक्क बळकावतील, आणि ज्या उद्योगधंद्यांवर त्यांचा निर्वाह चालला आहे त्यांतले पुष्कळ आपण आटोपतील. गोऱ्या लोकांच्या वसाहतीला मला ज्या हरकती दिसतात त्यांतली ही एक झाली. दुसरी अशी कीं, वसाहतवाल्या लोकांचीं मनें आकुंचित आणि ते आपस्वार्थी असतात. त्यांचें मला भय वाटतें. वसाहतवाल्यांचा कल कालांतरानें स्वतंत्र होण्याकडे असतो; परंतु त्यांत कोणत्या एका प्रकारचें नुकसान आहे असें मला वाटत

नाहीं. ते आणि आह्मी वेगळे होण्याचा प्रसंग आलाच पाहिजे; आणि रानटी लोकांशीं अगदीं खडाजंगीचा प्रसंग येण्यापेक्षां सुधारलेल्या लोकांपासून लौकरच विभक्त होण्याचा प्रसंग आला तर त्यांत आमचें हित आहे. कारण त्या खडतर प्रसंगांत आमचे सारे वसाहतवाले, आह्मीं सुरू केलेल्या संस्था आणि आमचा व्यापार, ह्या साऱ्याचा फडशा उडून जाईल.

विजापुराहून परत गेल्यावर **एल्फिन्स्टन** साहेब तीन महिने पुण्यांत राहिला. तितक्या काळांत त्याणें पेशव्यांपासून जिंकून घेतलेल्या मुलखावर रिपोर्ट लिहिला. त्यांत आरंभीं त्या राज्याचा विस्तार, देशस्वरूप, हवापाणी वगैरे वर्णन करून पुढें लोक कसे आहेत तें सांगून त्यांच्या इतिहासाचा सारांश दिला आहे. नंतर पेशवाईतली राज्यव्यवस्था कशी होती, न्याय कोणत्या प्रकारें होत असे, बंदोबस्त कसा असे, कर कसे घेत, वगैरे सविस्तर वर्णन केलें आहे आणि पुढें आपण राज्यव्यवस्था कशी ठेवावी तें लिहिलें आहे. एकंदरींत त्याचा रोख आपण नेमस्तपणानें आणि सावधगिरीनें वागलें पाहिजे असें सुचविण्याकडे आहे. सावधगिरी ठेवावयाची ती मोठें थोरलें राज्य जिंकून घेतलें ह्मणजे त्याच्या मागून ज्या राजकीय अडचणी उपस्थित होत असतात त्या तो जाणत होता एवढ्याचसाठीं नव्हे; हिंदुस्थानांत युरोपांतल्या राज्यव्यवस्थेचीं मूलतत्वें एकदम सुरू केलीं तर स्वभावतःच ज्या अडचणी उपस्थित होणार त्याही तो जाणत होता ह्मणून त्यानें सावधगिरीनें वागण्याविषयीं सुचविलें होतें. तो रिपोर्ट पुष्कळ मोठा—चांगला एक ग्रंथच—झाला. त्याची योग्यता सरकारानें नीट मनांत आणून तो छापला आणि कामदार मंडळींत वाटला. त्यावेळीं तर तो कित्ता ह्मणून पुढें ठेऊन त्याप्रमाणें वागावें असाच होता आणि सरकारचा हेतु ही तसाच असेल. आतां त्याचें महत्व अर्थातच फक्त ऐतिहासिक दृष्ट्या, गतगोष्टींचें निरूपण, एवढेंच आहे. परंतु **एल्फिन्स्टन** साहेबाच्या टांकांतून जो जो लेख निघाला त्याप्रमाणें हा ही पोक्त विचारांनीं भरलेला आहे; त्यामुळें त्याची किम्मत अद्याप जशीच्या तशी कायम आहे आणि पुढें ही तशीच राहील. त्याणें स्वतः ज्या सुधारणा

केलेल्या त्यांचीं मूलतत्वें हीं त्या रिपोर्टांत आहेत. मुंबईस गव्हरनर असतांना त्याणें ज्या गोष्टी केल्या त्यांपैकीं पुष्कळ त्या धोरणानें झाल्या. त्या रिपोर्टां-तून कांहीं उतारे पुढें देतों—

पोलीसबंदोबस्त आणि फौजदारी न्याय ह्यांविषयीं तो ह्मणतो—

फौजदारी न्यायाची आणि पोलिसबंदोबस्ताची व्यवस्था कशी होती तें वर्णन केलें आहे त्यावरून गुन्हेगारांस शिक्षा होत नव्हती, ते अगदीं निर्धास्त असावे असें अनुमान निघून आमची कल्पना अशी वाहूं लागेल कीं महाराष्ट्र देश ह्मणजे झोटिंग बादशाही आणि जुलूमजबरी यांचें अगदीं माहेरघर असावें. परंतु हा मोठा भ्रम आहे. खरा प्रकार फारच निराळा आहे. कलेक्टरांकडून जे रिपोर्ट आले आहेत त्यांत विशेषतः गुन्हे फार होतात असें ते ह्मणत नाहींत. आमच्या ताब्यांतल्या जुन्या मुलखाची आणि ह्या मुलखाची तुलना करून पहाण्याची संधी मिस्टर चापलिन यांस उत्तम आहे; ती करून ते ह्मणतात तिकडच्यापेक्षां इकडे गुन्हे कमी होतात.

'नेटिव्ह राज्यांत सर्व प्रकारची अव्यवस्था' आणि जुलूम असावयाचे, तसें असतां देखील पोलिसाला लांच खातां येत नव्हता आणि कामाची हयगय करतां येत नव्हती; यामुळें आमच्या अगदीं जुन्या मुलखापेक्षां ह्या मुलखाची भरभराट होती; तर असें कशानें होत होतें तीं कारणें शोधून काढणें फार महत्वाचें आहे. बंगाल्यांत जो सारा गोंधळ झाला तो होण्याला जीं कारणें ह्मणून सांगतात त्यांतलीं मुख्य हीं होत.—लोकसंख्या वाजवीपेक्षां फाजील होती आणि त्यामुळें लोक हलके, नामर्द झाले; आम्ही जी वसूल घेण्याची पद्धति सुरू केली तिच्या योगानें वरिष्ठ वर्गाचे लोक नाखुष झाले आणि त्यांच्या खालच्या वर्गाचे निराश झाले; गरीबांचे श्रीमंत आणि श्रीमंतांचे गरीब झाले. नेटिव्हांचे राज्य होतें तेव्हां सर्व दरजांच्या लोकांनां लष्करांत व इतर खात्यांत चाकऱ्या मिळत होत्या आणि त्यांचा निर्वाह होत होता

तो होईनासा झाला; पोलिस बंदोबस्ताची जी प्राचीन रीति होती ती मोडल्यानें आणि सारीच उलटापालट झाल्यानें जे वाईट परिणाम होतात ते होऊन शिवाय जमीनदार लोकांवरची जबाबदारी नाहींशी झाली, त्यांचें जातीचें वजन हें पोलिसाचें एक शस्त्र होतें तें नाहींसें झालें; गांवरखवाल-दारांची रखवाली नाहींशी झाली. ज्या लोकांची स्वभावतः चोरी करण्याकडे प्रवृत्ति व ज्या कित्येकांना दारिद्र्यानें अगदीं व्यापल्यानें दरवडेखोर व्हावें लागलें अशांच्या नेमणुका बंद केल्यानें त्यांच्यावर दाब नाहींसा झाला; मुलकी, दिवाणी, फौजदारी व लष्करी खातीं निरनिराळीं करून अधिकार कमी केल्यानें सारेच निर्बल झाले आणि त्यांच्यावर जें दडपण पडलें त्यामुळें त्यांची शक्ति आणखीं कमीच झाली; खटल्यांच्या चौकशीला दिवसगत होऊं लागली, शाबिदी होणें कठीण झालें, शिक्षा हलक्या होऊं लागल्या; फिर्याद करून साक्षी पुरावा करणें म्हणजे खर्चाचें आणि त्रासाचें काम होऊन बसलें; आमच्या न्यायसूत्रांनीं बद्ध झाल्यामुळें कोणाही मनुष्याला आपली सत्ता चालवितां येईनाशी झाली आणि आमच्या अदालतीचें भय वाटत असल्यामुळें पोलिसाला मदत करण्याला कोणालाच धीर होईनासा झाला. अशा प्रसंगीं थोर लोकांनीं पुढाकार घ्यावयाचा, परंतु तो वर्गच एतद्देशीय लोकांत नाहींसा झाला आणि त्याच्या जागीं आह्मी जे युरोपियन माजिस्ट्रेट नेमले ते थोडे असून त्यांचा नेटिव्हांशीं संबंध, त्यांच्यांत मिळून मिसळून वागणें मुळींच नाहीं, त्यांना त्यांच्या भाषेचें आणि स्वाभावाचें ज्ञान * नाहीं '

* " येवढ्या लेखानें ह्या विषयाचें विवेचन व्हावें तसें मुळींच होत नाहीं. नेटिव्ह कामगारांना पगार थोडा—कित्येकांना अधिकार मोठाले असून ही—आणि ब्रिटिश कामदारांपैकीं पुष्कळ असामी कामाला नालायक, ह्या दोन गोष्टी अशी लज्जास्पद स्थिति होण्याला पुष्कळ अंशीं कारण होत्या. हिंदुस्थानांत अतिशय महत्वाचीं कामें करण्याकरितां कामगार नेमून पाठविण्याची जी पद्धति सुरू होती ती मोठी चमत्कारिक असल्यानें अगदीं ढोंग्ये निवळ शंख सुद्धां त्यांच्यांत खपत असत. "

हें बंगालच्या स्थितीचें चित्र झालें, महाराष्ट्राच्या स्थितीचें असें नाहीं; तें याच्याहून पुष्कळ प्रकारांनीं फार निराळें आहे. तेथें लागवड करण्या लायक जमिनीच्या मानानें लोकांची संख्या थोडी आहे. ते लोक सशक्त लढाऊ आणि अगदीं परवांपर्यंत नेहमीं हत्यारबंद असत. खालच्या प्रतीचे लोक सुखी आणि वरच्या प्रतीचे संपत्तिमान होते. स्वदेशांत सर्व खात्यांत आणि बाहेर मुलुखगिरीवर त्यांना पुष्कळ चाकऱ्या असत. पोलिस बंदोबस्ताची प्राचीन वहिवाट चालू होती, राज्यांतले सर्व अधिकार त्यांच्या हातांत होते आणि सरकार आपल्यावर संशय घेईल कीं काय, कसें करावें, असल्या शंका मनांत येत नसल्यानें ते दबत नव्हते, उत्साहानें काम करीत असत; स्वस्थतेचा भंग होण्याचें जरा चिन्ह दिसलें कीं तो करणारांस ते भराभर बेलाशक धरीत, त्यांची चौकशी तोंडीं तेव्हांच करीत आणि लागलीच जबर शिक्षा ठोठावीत. त्यामुळें एकादे वेळीं बिचाऱ्या निरपराध्याला शिक्षा होई, परंतु अपराधी सुटला असें मात्र बहुधा कधीं घडत नसे. माजिस्ट्रेट देशांतलेच असल्यानें त्यांना आपल्यापुढें आलेल्या खटल्याचें खरें स्वरूप तेव्हांच कळे आणि आपल्याला वाटतें आहे हें खरें का खोटें ह्या विवंचनेंत ते फारसे पडत नसत; ह्मणून फिर्यादी व साक्षीदार यांना फार वेळ तिष्ठत रहावें लागत नसे. त्यांच्या ढिल्या पद्धतींत त्यांना एवढें माहीत होतें कीं एकंदरींत आपला मूळ मुद्दा खरा असला ह्मणजे झालें, बाह्य स्वरूपांत कांहीं चुकलें ह्मणून कोणी आपल्याला विचारणार नाहीं. तसेंच कदाचित लोक ही असें समजून असत कीं आपलें संरक्षण आपणच केलें पाहिजे, अधिकारी करतील असें नेहमी ह्मणत बसून उपयोगीं नाहीं. त्यांच्याकडे न जातां संपण्यासारखे लहानसान खटले असतील ते ते पाहणार नाहींत, त्यांचें काम तसेंच कांहीं मोठें खटलें, दंगाधोपा वगैरे होईल तर तें पहाण्याचें आहे. मामलेदार चांगले वजनदार, थोर गृहस्थ असत आणि त्यांच्या आसपास इनामदार, जहागिरदार, प्राचीन जमीदार, असे चांगले सघन व प्रतिष्ठित लोक गांवोगांव असत. त्यांचा संबंध खालून गरीबगुरीबापासून वर राजापर्यंत असे; अशी ही समाजाची सांखळी

गोवलेली असे; त्यामुळें खालच्या प्रतीच्या लोकांची स्थिति कशी आहे तें वरच्या प्रतीच्या लोकांनां कळत असे; आणि ज्याला कोणा थोरांचा आश्रय नाहीं असा मनुष्य क्वचित असे; त्यामुळें जरी जुलूम झाला तरी अगदीं दाद लागत नाहीं असें बहुधा होत नसे.'

'आजपर्यंत ह्या देशावर आलीं नाहींत असलीं पुष्कळ अरिष्टें आतां परकीयांचा अम्मल सुरू झाला ह्मणजे आल्यावांचून राहणार नाहींत. परंतु योग्य तजवीज केली असतां जीं थोरथोर आहेत तीं कदाचित टाळतां येतील. वरच्या वर्गातले ( चांगले सुखी ) लोकांपैकीं पुष्कळ दरिद्री होतील आणि राजदरबारांत व लष्करांत ज्यांनां चाकऱ्या होत्या त्यांतल्या पुष्कळांनां आतां अगदीं अन्नान्नगत होईल. बाजीरावाच्या कारकीर्दीच्या आरंभीं असें दोन्हीं प्रकारचें संकट ओढवलेंच होतें, परंतु राज्याचा डोल्हारा उभा होता, त्यामुळें ह्या अंशतः आलेल्या अरिष्टाचे दुष्परिणाम टळले. आम्हाला राज्याचा सांगाडा तसाच राखतां येईल कीं नाहीं हा प्रश्न आहे; याचा विचार अजून व्हावयाचा आहे. हालीं जी पोलिसाची तऱ्हा आहे ती खेडेगांवापुरती तशीच राखतां येईल. परंतु गांवकीमधची जी व्यवस्था आहे, ती तशीच राखली आणि सारेंच मामलेदाराच्या हातीं दिलें तर तेवढें पुरे कीं नाहीं याची मला शंका आहे. गांवांत पाटलाचें वजन आणि प्रतिष्ठा असते ती राखली पाहिजे. ती राहण्याकरितां गांवखर्चाची कांहीं मुक्त्यारी त्याच्याकडे ठेवावी आणि गांवांतल्या बारीक सारीक गोष्टींचा बंदोबस्त राखण्याचा अधिकार त्याला द्यावा. अशाप्रकारच्या सर्व फिर्यादी ऐकण्याचें युरोपियन अम्मलदारांच्या हातून होईल तर बरें अशी तर मी इच्छा करीतच नाहीं; उलट त्यांनां तशाप्रकारच्या खटल्यांचा निकाल लावण्याला फुरसत नाहीं ही सुदैवाची गोष्ट समजतों. मामलेदारांनीं तें पाटलावर सोंपविलें तर बरें असें वाटतें. अशाप्रकारें पाटील काईम राखावे; कारण राज्यकारभारांत सर्व खात्यांत त्यांच्या मदतीची जरूर पुष्कळ लागणारी आहे. जमिनीचा सारा वसूल करण्याच्या कामीं जशी पाटलाची मनापासून झटून मदत हवी लागते

शी ती दिवाणी कामांत आणि पोलिस कामांत ही हवीच लागते. याजवरितां त्यांचा अधिकार कसें ही करून राखलाच पाहिजे. त्यांच्याविषयीं वरिष्ठाकडे वरचेवर गिल्ले आणल्यानें त्यांनां आपलें काम मोठें त्रासदायक वाटेल तसें वाटूं न देण्याविषयीं व त्यांचें वजन कमी न होण्याविषयीं फार जपावें. त्यांणीं जुलूम केला आहे अशा जर फिर्यादी येतील तर त्या सान्या मी तावडतोव ऐकेन, परंतु त्यांणीं पद्धतीप्रमाणें काम केलें नाहीं ह्मणून टपका ठेवणार नाहीं. क्षुल्लक फिर्यादींचे निकाल त्यांनां वाटेल त्या तऱ्हेनें करण्याचें मी त्यांच्यावर सोंपवीन. कोणाला ही जबर शिक्षा झाली नाहीं ह्मणजे झालें ह्मणेन. पाटलाचा अधिकार कमी केला पाहिजे असें वाटलें तर पुढें तसें करतां येईल आणि त्याची मिळकत देखील कमी करतां येईल. परंतु आह्माला एक एक गोष्ट सावधपणानें केली पाहिजे. कारण आह्मी जर पाटलांवरचें आपलें वजन कमी केलें किंवा त्यांचें लोकांवरचें कमी केलें तर दोहोंतून एक ही पुनः बसवितां येणार नाहीं. गांवच्या रखवालदाराची स्थिति नीट राखण्याविषयीं ही जपलें पाहिजें. त्याची मिळकत त्याचा निर्वाह होण्याला पुरेशी, त्याला चोरी करण्याची इच्छा होऊं नये येवढी, नसेल तर त्याची नेमणूक वाढविली पाहिजे. परंतु ती त्याला लोकांच्या तोंडाकडे पहावें लागूं नये इतकी मोठी करणें योग्य नाहीं. ती त्याला अंशतः लोकांकडूनच नेहमीं आणावी लागावी. तसें असेल तरच त्याला हालींप्रमाणें गांवांत लोकांच्या घरोघर जावें लागेल.'

जर गांवपोलिस कायम राखलें तर त्याच्या पुढची पायरी मामलेदाराची योग्यता कायम राखणें ही होय. हाल्लीं सर्व अधिकार मामलेदाराकडे सोंपविलेले असतात आणि जोंपर्यंत (auxiliary) मदत स्वार आणि शिबंदी आह्मी कायम ठेवूं तोंपर्यंत त्याजवळ बंदोबस्त राखण्याचें साधन पुष्कळ असेल. मामलेदाराची प्रतिष्ठा अधिक वाढावी, त्याला लांच खाण्याची इच्छा होऊं नये आणि चांगल्या लोकांनीं मामलेदार होण्याला झटावें असें करण्याला तूर्त एक गोष्ट करणें जरूर आहे; ती अशी कीं त्याचा

पगार वाढविला पाहिजे. शिबंदी कमी केली आणि स्वार काढून टाकले ह्मणजे शांतता राखण्याचें साधन पुष्कळ कमी होईल आणि शांतता मोडणारे जे आहेत त्यांची संख्या लागलीच वाढेल. आह्मी नवीन जिंकून घेतलेल्या मुलखापैकीं ह्या भागांत जी पाहण्यासारखी चांगली व्यवस्था आजपर्यंत राहिली आहे, तिचें कारण जे लोक निरुद्योगी आणि पोटार्थी होऊन फिरावयाचे त्यांनां आह्मी पगार देऊन आपल्या शिबंदीमध्यें गुंतवून ठेविले आहेत; याशिवाय दुसरें कांहीं नाहीं यांत मला शंका नाहीं. मागच्या मामलेदारांनां जाहागिरदार व थोर थोर लोक होते ते, आपलें वजन खर्चून, व समई स्वार, शिबंदी पाठवून ही मदत करीत असत; परंतु आतां त्यांतले पुष्कळ नाहींसे झाल्यानें आतांच्या मामलेदारांना त्यांचा आधार तुटलेला जाणवेल. सरकाराला त्यांच्या मार्फत महालांचे हिशेब येत असत आणि मामलेदार कसे वागतात हें ही कळत असे. आतां तें द्वार बंद झाल्यानें तें अधिकच जाणवेल. आतां त्यांनां बढती होण्याची कांहीं आशा राहिली नाहीं ह्या एका कारणामुळें त्यांच्या आणि राज्यकर्त्यांच्या मधला संबंध पुष्कळ अंशीं तुटेल, आणि मला आणखी असें भय वाटतें कीं नेटिव्ह आणि इंग्रज गृहस्थ यांच्यामध्यें स्वभावतः च जें अंतर असणार त्याच्या योगानें उभयतांत संबंध नाहींसा होऊन अंतर कायमचें होऊन बसेल. मराठ्यांच्या रीतरिवाजांतला साधेपणा आणि सारखेपणा जर कायम ठेवला आणि मराठे सरदारांची भेट होण्याला कोणालाच कांहीं अडचण पडत नसे—हें प्रसिद्ध आहे—तशी वहिवाट आह्मी ठेविली, तर कांहीं तरी होईल. सर हेन्री स्ट्राची साहेबांनीं पार्लमेंटाकडे जो अर्ज पाठविला आहे त्यांत असें म्हटलें आहे कीं, बंगाल्यांतल्या आमच्या राज्यकारभारांत जे दोष आहेत त्यांतले पुष्कळ आमच्यामध्यें आणि नेटिव्हांमध्यें महदंतर पडल्यामुळें उत्पन्न झाले आहेत. ते ह्मणतात तें अंतर इतकें वाढलें आहे कीं त्या प्रांतांत इंग्रज गृहस्थाच्या देखत आपण खालीं बसावें असें मनांत आणणारा बहुधा एक देखील नेटिव्ह मिळणार नाहीं. येथें तसें नाहीं हरकाऱ्याच्या वरच्या प्रतीचे जे लोक आहेत ते सारे आमच्यापुढें बसतात आणि पेशव्यापुढेंही बसत असत. एकादा

अगदीं यःकश्चित रयत असला आणि त्याच्या कामाला कांहीं वेळ लागणारा असला, तर तो देखील जमिनीवर बसेल. राज्यकर्ते आणि प्रजा यांच्यामध्यें जें संघट्टण असणें योग्य आहे तें बाह्योपचारांनीं जितकें राखतांयेण्यासारखें असेल तितकें राखण्याला हें उपयोगीं पडतें. परंतु ही रीत मोडत जाण्याचा संभव फार आहे. नेटिव्हांशीं परिचय रहाण्याचा मोठा उपाय म्हटला तर इंग्रज गृहस्थांनीं त्यांच्यांतले कोणी कामाशिवाय एरवीं भेटावयाला येतील तर त्यांच्या वरचेवर भेटी घ्याव्या. असें होणें कठीण आहे हें कबूल केलें पाहिजे. नेटिव्हांशीं नुसती संगत कधींच बरी वाटणार नाहीं. कारण त्यांचे स्वार्थी, मतलबी, आर्जवी, आणि स्तुतिपर भाषण नेहेमी ऐकून कंटाळा आणि राग आल्यावांचून राहणार नाहीं. त्यांच्या मनाचे जे कांहीं चमत्कारिक ग्रह असतात, त्यामुळेंही ते आमच्या मंडळीला विश्रांतीच्या वेळीं आपल्यांत यावयाला नकोत असें वाटतें; त्या शिवाय इतर वेळीं त्यांची भेट घेण्याला आमच्यांतल्या गृहस्थांना फुरसत नाहीं हें निमित्त पुरें असतें. परंतु त्यांनीं एवढें ध्यानांत ठेवावें कीं नेटिव्हांशीं परिचय ठेवणें हें आपल्या कर्तव्यां पैकींच एक आहे. आमचें राज्य नीट चालावें ह्मणून बारीक गोष्टींत सारा दिवस आह्मी पहात असतों; त्या जशा राज्य नीट चालण्यास अवश्यक असतात तशीच ही ही आहे. तसेंच मामलेदारांशीं सहवास असणें हें एक भूषण आहे, असें नेटिव्ह गृहस्थांस वाटावें इतक्या मोठ्या योग्यतेला जर आह्मी आपल्या मामलेदारांस चढविलें तर त्यापासून पुष्कळ हित होईल. आमच्या हाताखालीं असणारीं माणसें लोकांच्या चांगलीं नजरेंत भरत असें करण्याला जीं साधनें लागतात तीं आमच्या जवळ नाहींत; ह्या बाबतींत आमच्या सरकाराच्या अंगांत दोन्ही बाजूंनीं स्वभावतः उणेपणा आहे हें कबूल केलें पाहिजे. विश्वासाच्या आणि मानाच्या अशा ज्या जागा आहेत, त्या साऱ्यांवर युरोपियनांच्याच नेमणुका केल्या पाहिजेत. राज्यकारभारांत घेण्याच्या योग्यतेचे नव्हत अशा लोकांनां प्रतिष्ठितपणाच्या नोकऱ्या देण्याला आमच्याजवळ शिबंदी (बेकायदा) फौज नाहीं. त्यांची थोरपणा मिळवण्याची हौस अशी पुरी करतां येत नाहीं तर

त्याबद्दल मान मरातब देऊन आणि कोरडी मर्जी दाखवून त्यांनां खुष करूं म्हटलें तर आमचें तसें राजदरबार नाहीं. नेटिव्ह लोक मोठाल्या मानमरातबांची ही किंमत फार समजतात. परंतु आमच्या पदरीं जर थोर थोर नोकरीला राहिलेच नाहींत तर तसले मान आह्माला हलक्या लोकांनां देतां येत नाहींत. अमुक एक प्रकारचें छत्र धरण्याचा किंवा पालखींत बसण्याचा हक्क अमक्यासच असावा असा आह्मी कांहीं निर्बंध ठेविला नाहीं; आमची कोणाला कांहीं बंदी नाहीं; आह्मी तो मान आहे असें समजत नाहीं. आह्मी जे मान ह्मणून देतों त्यांची जर आह्मीच कांहीं प्रतिष्ठा राखींत नाहीं आणि कोणता मान कोणाला, कोणत्या प्रसंगीं द्यावा, हें जर आम्हालाच नीट कळत नाहीं तर त्यांत कांहीं अर्थच नाहीं. हे मान जर मुळींच मानीव आहेत तर त्यांची योग्यता फक्त बाह्य गोष्टींवरूनच ठरावयाची असणार.'

तर आतां ह्या गोष्टींबद्दल आह्मी आपल्या नोकरांनां पगार पुष्कळ द्यावा, त्यांची प्रतिष्ठा चांगली राखावी, केव्हां केव्हां त्यांची वाहावा करावी आणि त्यांनां बक्षिसें द्यावीं एवढें उरलें. पैकीं हाल्लीं तालुके आहेत त्या पेक्षां ते मोठे केले आणि कांहीं कामदार कमी केले व पगार वाढविले ह्मणजे खर्च विशेष न वाढतां एक विचार सिद्धीस जाईल. पुष्कळ दिवस नोकरी झाली ह्मणजे त्या मानानें पगार वाढवावा किंवा कामांत विशेष हुशारी दिसून आली तर बक्षीस द्यावें. पगार पाहिल्यानें दोनशें पासून अडीचशें पर्यंत ठेवावा आणि दर पांच वर्षांनीं त्याचा एक षष्ठांश वाढवावा; चाकरी पाहून केव्हां केव्हां पोषाक द्यावे; आणि ह्या सर्वांहीं पेक्षां विशेष असें करावें कीं ह्मातारे किंवा ज्यांनीं फार चांगली नोकरी केली असेल त्यांनां त्यांचा जीवमान असे पर्यंत जमिनी द्याव्या. त्या क्वचित प्रसंगीं दोन किंवा तीन पिढ्यापर्यंत किंवा निरंतर देखील चालवाव्या. अशा उदारपणें देणग्या दिल्या तर त्या योगानें मामलेदारांचें वर्तन सुधारेल; हें सद्यःफळ दिसेल आणि राजकीय दृष्ट्या दुसरे जे परिणाम होतील ते विशेष चांगले होतील. ते असे कीं, सरकारच्या पक्षाला असणारे असे पुष्कळ संभावित मनुष्य मुलखांत पसरतील, आणि

सरकारचीं कामें कशीं आहेत तें त्यांनां लोकांनां समजाऊन सांगतां येईल. जर अशा जमिनी वरचेवर वंशपरंपरेनें देतां आल्या तर आमच्या सरकारच्या नोकरीस ठेवण्यास चांगले शिकलेले व संभावित लोक मिळण्याला इतउत्तर एक मार्ग होईल आणि आमच्यासारख्या स्थितींतल्या राज्याला उपयोगीं पडत अशा एका दर्जाचीं जीं घराणीं पाहिजेत त्यांची स्थापना होईल. जाहागीर दिलेल्या जमिनी जशजशा रिकाम्या होतील तसतशा त्या ह्या कामीं लावाव्या आणि जर त्या अशा देण्याचें ठरेल तर मला वाटतें हाली त्या उपभोगणारे जे आहेत त्यांच्या पश्चात त्या खालसा करण्याविषयींचे नियम जरा अधिक सक्त केले तर बरें होईल; कारण हालींच्या जाहागीरदारांपैकीं पुष्कळांच्या वारसांपासून याप्रमाणें जमिनी काढून घेतल्याबद्दल आह्मांवर जी लोकांची अप्रीति होईल, तीपेक्षां त्याच वरच्या तऱ्हेनें देऊन टाकल्यानें त्यांची आमच्यावर प्रीति जडेल आणि ती आमच्या उपयोगीं अधिक पडेल. तसेंच कलेक्टराजवळ जो दप्तरदार असावयाचा ती जागा आपणास मिळण्याविषयीं मामलेदारांनीं लाळ घोटीत असावें असा जर तिचा पगार ठेविला तर त्यांचीं कामें चोख होऊन त्यांनां ही ईर्षा उत्पन्न होईल. असें होण्याला ह्या जागेचा पगार हजार रुपये ठेवावा. नेटिव्हाला अतिशय मोठी जी काय जागा मिळावयाची ती ही, हें ध्यानांत ठेऊन पाहिलें ह्मणजे ही रक्कम खचित कांहीं फार नाहीं. पहिल्यानें ह्या जाग्यांचे पगार जेवढाले ठेवणें मला सोईचें वाटलें होतें त्याच्यापेक्षां हे मी कमीच ठेविले आहेत; आणि त्यांची बेरीज करून पाहिली तरी ह्या मुलखांतल्या आणि आमच्या जुन्या मुलखांतल्या खर्चांत केवढें मोठें अंतर आहे हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. येथें सामान्य नोकराला पगार बंगाल्यांतल्या पगाराच्या दुपटीपेक्षां अधिक असतो; परंतु मी जे आंकडे सुचविले आहेत ते उत्पन्नाच्या मानानें झेंपतील त्याच्यापेक्षां अधिक आहेत असें वाटेल तर येवढें ध्यानांत ठेवणें योग्य आहे कीं ज्याच्यावर बराचसा विश्वास टाकावयाचा आहे, त्याला पगार चांगला द्यावा यांतच शहाणपण आहे, तो फाजील खर्च समजूं नये. मनरो साहेबानें ही ह्मण

शहाणपणानें नेटिव्हांनां लागू करून, अनुभव घेऊन पाहिला आहे, त्यावरून ती पुष्कळ दिवसांपासून खरी ठरलेली आहे.'

कोणत्या दरजाच्या अम्मलदारावर किती जबाबदारी ठेवावी आणि त्याणें आपल्या अधिकाराच्या बाहेर जाऊं नये ह्मणून त्याच्यावर देखरेख रहाण्याची कशी तजवीज ठेवावी तें लिहून **एल्फिन्स्टन** साहेब पुढें पोलिसाकडे वळला आहे. तो हत्यारांसंबंधानें असें म्हणतो—

लोकांच्या अंगांत ओज-तेज-(spirit) असणें हें अत्यंत महत्वाचें आहे असें म्हटलें आहे, आणि परकीय अमलाखालीं तें जरी मंदावण्याचा संभव आहे—आणि जें बलाढ्य सरकार आपल्या सर्व प्रजांचें संरक्षण करतें, स्वसंरक्षणाकरितां त्यांस आपल्या आंगचे धैर्य किंवा हिंमत दाखविण्याचें कारणच ठेवीत नाहीं, त्याच्या अमलांत तें विशेषच मंदावणार—तरी आमच्या जुन्या प्रांतांतल्या कांहीं भागांत आमच्या प्रजेच्या दंगाधोपा करण्याच्या संवई नाहींशा झाल्यावर देखील अंगांत शूरत्वाचें वारें शिल्लक असल्याचीं उदाहरणें आहेत; आणि त्याचप्रमाणें तें येथें ही राहण्याची आशा आहे. तें तेज त्यांच्या अंगांत येण्याला प्रथम उपाय त्यांनां हत्यारें वापरण्याला कोणत्याही प्रकारची हरकत ठेऊं नये हा आहे. जेव्हां आह्मी मुलुख जिंकून घेतला तेव्हां पहिल्यानें लोकांनां हत्यारबंद होऊन फिरण्याची थोडी बंदीकरणें जरूर होतें. परंतु आतां तितकी बंदी नाहीं आणि ती अज्जी नाहींशी करणें योग्य आहे. लोक हत्यारबंद असल्यानें पोलिस बंदोबस्ताच्या उपयोगीं पडतात हा एक नफा आहे, परंतु याशिवाय असें आहे कीं, लढाईचा किंवा बंडाचा प्रसंग आला तर त्यावेळीं देखील त्यापासून उपयोग होईल. तो असा कीं बहुतेक लोक आह्मांवर नाराज होऊन विथरले तरी ते आपल्या मालमत्तेचें संरक्षण करण्याकरितां जे लुटारू आमचे शत्रु होऊन येतील त्यांच्यावर तें हत्यार उपसतील; आमच्यावर उगारणार नाहींत. हेंच तत्व ध्यानांत ठेऊन गांववाल्या लोकांनां आपआपल्या गांवा-

भोंतालच्या भिंती, तट वगैरे कायम राखण्याला उत्तेजन द्यावें, आणि त्यांची दागदुजी करण्याला ही थोडी बहुत सवड द्यावी.

मराठ्यांच्या राज्यकारभाराविषयीं **एल्फिन्स्टन** साहेब म्हणतो -- 'त्यांत इतके दोष असून मराठ्यांच्या मुलखांची भरभराट होती आणि खुद्द आमच्या विशेष पूर्णावस्थेस पोहोंचलेल्या राज्यव्यवस्थेंत ज्या कांहीं वाईट गोष्टी आहेत आणि त्यांमुळें लोकांनां जो त्रास सोसावा लागतो तो तेव्हां त्यांनां सोसावा लागत नव्हता असें दिसतें. म्हणून त्यांच्या त्या रीतींत जे कांहीं उघड उघड दिसणारे दोष होते त्यांचा प्रतिकार होण्यासारखे कांहीं गुणही असले पाहिजेत; आणि ते बहुतेक एका गोष्टीमुळें असावे असें मला वाटतें. ती गोष्ट ही—लोकांनां न्याय मिळावा म्हणून सरकार जरी नीटसें पहात नव्हतें तरी तो मिळण्याचीं साधनें त्यानें त्यांच्या हातांत ठेविलीं होतीं; खालच्या प्रतीचे जे लोक आहेत त्यांनां तें विशेषच हितावह होतें; कारण अधिकाऱ्यांची नजर त्यांच्यापर्यंत मुळीं पोहोंचतच नव्हती, आणि सर्व राज्यांत बहुधा त्यांचीच हेळसांड फार होत असते. पंचाइतीची रीत असल्यानें त्यांनां आपल्या आपल्यांत बराच न्याय करून घेतां येत होता. आणि असें होत असतें कीं त्या रीतीला ज्या हरकती सांगितल्या आहेत त्यांपैकीं बहुतेक त्यांनां लागू नसतात.'

'पाटलाला लोकांवर जुलूम करतां येत नसे; कारण त्याला एक मामलेदाराचें भय असे; आणि ज्या लोकांत नेहेमीं रहावयाचें त्यांनां नाराज करून ठेवणें ही बरें वाटत नसे, आणि वादी प्रतिवादी जर आपली पंचाईत व्हावी ह्मणत असले तर ती जमवीत नाहीं ह्मणण्याला त्याला कांहीं कारण नसे. त्यांत त्याचें काय नुकसान असणार? साधे खटले जे पंचांच्या डोळ्यांपुढें होणारे असतात त्यांचा निकाल करतांना त्यांनां घोळांत पडण्यासारखें बहुधा कांहीं नसतें आणि खटल्याची खरी हकीगत शेजारपाजारच्या साऱ्या लोकांनां माहीत असल्यामुळें त्यांनां लांच

खाऊन भलताच निकाल सहसा देतां येत नाहीं. प्रतिवादी, साक्षी, पंच वगैरे सारे लोक गांवांतल्या गांवांत, एवढ्याशा प्रदेशांत, असतात आणि चौकशीचें काम चालतें तोंपर्यंत साऱ्यांनां आपला नित्याचा उद्योगधंदा बंद ठेऊन बसावें लागतें. यामुळें बहुधा निष्कारण फिर्यादी किंवा निकालाला उगीच वेळ लागत नाहीं. ह्मणून रयत लोकांचे तंटे आपसांतल्या आपसांत तुटण्याला ही न्यायाची रीति उत्तम आहे; परंतु त्यांच्या वरिष्ठांचे त्यांच्यावर जे जुलूम होत असतील त्यांपासून त्यांची सुटका होण्याला ती कांहीं उपयोगाची नाहीं; 'आणि लोक काय पाहिजे तें करोत' असें ह्मणून तिकडे न पहातां रहातां आलें नसतें. तशानें त्यांचा न्याय कधीं झाला नसता हें उघड आहे.,

'परंतु या प्रकरणांत दुसरें एक तत्व लागू होत होतें. सरकारचा सारा वसूल रयतेपासून येत असे ह्मणून रयतेचें रक्षण करावें, तिच्यावर आपल्याशिवाय आणखी कोणाला जुलूम करूं देऊं नये, यांतच सरकारचें व त्यांच्या गुमस्त्यांचें हित होतें. आबादानीच्या दिवसांत देखील सरकार रयतेपासून फाजील पैसा घेत नसे. त्याच्या घेण्याला निर्बंध असे. कारण आपण श्रीमंत होण्याला उत्तम मार्ग ह्मटला तर रयतेला सुखी राखणें हाच आहे अशी त्याची खात्री होऊन चुकली होती. आणि सरकारचें व रयतेचें हिताहित एकच असल्यानें उभयतां एक होत आणि गुमस्त्यांनां लुटूं देत नसत. ह्या कारणामुळें पेशवाईराज्य चांगलें असून त्यांतल्या प्रजेचें रक्षण बरेंच चांगलें होत असे. शेजाऱ्या पाजाऱ्यांनां ही तिच्याशीं अन्यायानें वागतां येत नव्हतें आणि वरिष्ठांनां ही तिच्यावर जुलूम करतां येत नव्हता; आणि एकंदर लोकांत पाहिलें तर रयतेचीच संख्या मोठी, फार महत्वाची आणि फार योग्य आहे.'

'न्यायपद्धतींतले दोष फार जांचत होते ते ह्या वर्गाच्या वरच्या प्रतीच्या लोकांनां; परंतु त्यांत देखील कांहीं गोष्टी हितावह होत्या. सरकारचा मोठा दोष काय तो दिरंगाई—सुस्ती—हा होता. परंतु त्यामुळें

सरकारच्या फाजील घाईमुळें जें नुकसान होत असतें त्याचें तरी भय नव्हतें. सरकारी कामदाराला लांच देऊन न्यायाच्या मिषानें एकाद्या मनुष्याला त्रास देतां येता, परंतु नुसती फिर्याद करून त्याच्या अमलांत असणाऱ्या साऱ्या लोकांना कायदेशीर फिर्यादीच्या सर्व त्रासाच्या फेऱ्यांत आणावयाला भाग पाडतां येत नव्हतें. लांच खाऊन सुद्धां त्याला एकाच मनुष्याला काय त्रास देतां येई तेवढा येई; त्याच्या पलिकडे कांहीं करतां येत नसे. कारण प्रतिवादीला पंचाईत भरवा म्हणण्याचा हक्क असल्यामुळें त्याला मन मानेल तसा निवाडा करतां येत नव्हता. आणि जरी त्यानें पंचाईत जमवीत नाहीं म्हटलें, किंवा टाळाटाळ केली, तरी लोकमताच्या अगदीं उलट असली गोष्ट बरेचवर होऊं लागली तर ती त्याच्या वरिष्ठांच्या नजरेस आल्याशिवाय रहात नसे. त्यांच्या मनांत मात्र न्याय व्हावा ही इच्छा असली म्हणजे पुरे.'

'सरकारच्या सुस्तीमुळें काम होत नसेल तर तें करून घेण्याला दुसऱ्या पुष्कळ युक्ति होत्या. त्या जरा दोषयुक्त होत्या तरी चांगल्या तत्वांच्या ऐवजीं उपयोगीं पडत. त्या आपली दाद लाऊन घ्यावी, वशीला लावावा आणि बक्षिसें द्यावीं ह्या होत. यांपैकीं पहिली, आपला कोणी अपराध केला तर त्याचा सूड उगवण्याची जी तऱ्हा याहून अनाडी लोकांत फौजदारी कामांत आहे तिच्याच तोडीची दिवाणी कामांत आहे; मराठे जो तगादा म्हणतात तो हीच होय. तगादा कसा असतो आणि त्यानें अखेर न्यायावर कसें येतें तें मागें सांगितलेंच आहे.'

'न्याय मिळवण्याचा दुसरा उपाय वशीला लावणें हा होता. जर एकाद्या गरीब मनुष्याचा यजमान किंवा धनी असला, किंवा मोठा शेजारी अथवा आप्त इष्ट असला तर तो त्याला आपल्या तर्फें मध्यस्थीस घालून आपल्या कर्जदाराजवळ, किंवा त्याचे इष्ट मित्र असतील त्यांजजवळ बोलावयास लावी, किंवा अखेर सरकारी अधिकाऱ्याकडे आपलें वजन खर्चून माझा न्याय करून देववा म्हणे. त्या गरीबाचा कोणी आप्तसंबंधी असल

आणि त्याचा कोणा थोर मनुष्यावर असाच दावा असला तर त्याच्यासाठीं ही तो असाच वशीला लाऊन आपल्या प्रमाणें त्याचें काम करवी. हा उपाय सकृद्दर्शनीं जेवढा कठीण दिसतो, अथवा अर्धवट असला तर जेवढा कठीण असला पाहिजे, तेवढा नाहीं. कारण ज्याला कोणाचाच असा आधार नाहीं असा मनुष्य क्वचित सांपडेल. या प्रमाणें वादीप्रतिवादी या उभयपक्षांची सरासरी बरोबरी होत असे आणि वशील्याच्या द्वारानें मध्यस्थी सुरू झाली म्हणजे प्रकरण पंचाइतीवर येई. पंचाईत हें जें एरवीं नुसतें नांव रहावयाचें तें अशानें खरें होई.'

'हा उपाय थकला तर सरकारी अधिकाऱ्याला किंवा त्याच्याजवळ ज्यांचें वजन असेल त्यांना कांहीं बक्षीस किंवा बक्षीस देण्याचें वचन देण्यानें कार्य साधत असे. फिर्याद करून जी मालमिळकत प्राप्त होईल त्या सारीचा चतुर्थांश देण्याची वहिवाट ही खरें पाहिलें असतां अम्मलदारानें मदत करावी ह्मणून त्याला देण्याचा ठरीव लांचच ह्मटलें पाहिजे.'

'पंचाइती भरविणाऱ्या लोकांची संख्या ही मोठी होती त्यामुळें न्याय लौकर होई. न्यायाधीश, मामलेदार जाहागीरदार पुष्कळच होते आणि त्यांच्याशिवाय ही मोठमोठे पुष्कळ लोक पेशव्यांच्या स्पष्ट अथवा गर्भित हुकमावरून पंचाइती जमवीत आणि सारे सरदार आपल्या पदरच्या लोकांचे तंटे आपण तोडीत; मग ते त्यांच्यांत आपआपसांत असोत अथवा त्यांच्या खालच्या किंवा वरच्या मध्यम प्रतीच्या लोकांशीं असोत. पुष्कळ खटल्यांचे निकाल लोक आपसांत पंचाइती भरून करीत आणि त्यांच्या निवाड्यांवर सरकाराकडे फिर्याद (appeal) गेली तरी सरकार आपल्या हुकमानें पंचाईत भरून झालेले निकाल जसे मानीत असे तसेच हे ही मानी.'

'याप्रमाणें बरावाईट कसा तरी न्याय होत असे आणि तो ज्या द्वारांनीं मिळत असे तीं मनांत आणलीं, ह्मणजे जितका पक्षपात होत असावा असें वाटतें तितका होत नसे; न्याय पुष्कळ चांगला होत असे. कारण लोकमताचा आणि सरकारी अम्मलदाराच्या अधिकाराचा वचक असल्यानें लगायाला

मर्यादा असे आणि न्यायपंचाइतींमें होत असल्यानें त्यांत वशीला आणि लांच लुचपत चालत नसे. '

' पंचाइतीनें न्याय करण्याची तऱ्हा खेडेगांवांतील खटले तोडण्याला चांगली होती; बाकी तींत मागें सांगितल्याप्रमाणें दोष होते, तरी तींत चांगल्या गोष्टी पुष्कळ होत्या. पंचाइतीचें काम थंडपणानें चालत असे खरें, परंतु एकाच मनुष्याच्या देखरेखीखालीं पुष्कळ पंचाइतींनां एकदम ही बसतां येई, त्यामुळें त्यांनां पुष्कळ खटल्यांचे निकाल करतां येत असावे. तंट्याच्या प्रकरणाची पंचांनां माहिती चांगली असल्यानें व पुष्कळ खटल्यांत पक्षकारांची वर्तणूक कशी आहे हें ही माहीत असल्यानें त्यांचे निवाडे बहुधा बरोबर होत असावे. पंचाईत करणारे मनुष्य लोकांपैकींच असल्यानें त्यांची काम करण्याची रीति सर्वांनां समजे अशीच असली पाहिजे; कोणाला न समजे अशा तऱ्हेनें त्यांनां जातां येत नाहीं; त्यामुळें कायद्याची अशाश्वतता आणि संदिग्धता न राहून त्यांचा हात तंट्याच्या मुळालाच जाऊन पडतो; हा ह्या न्यायपद्धतीपासून जो नफा आहे तो अगदीं अमोलिक आहे. पंचांच्या मनांत लांच खावा असें असलें तरी त्यांनां खातां येत नसे. कारण लांच खाऊन पुष्कळ पैसा मिळवावा असें एकाद्याच्या मनांत असलें तरी एकावरच पंच होण्याची पाळी वरचेवर येईल असा संभव नसे आणि बाकीचे पंच व वादीप्रतिवादी हे त्याच्या बरोबरीचेच असल्यानें आपलें कृत्य उघडकीस येऊन आपली बेअब्रू होईल हें भय त्याला फार असे. ह्यामुळें बाजीरावाच्या भ्रष्ट कारकीर्दीनंतर देखील पंचाइतींवर लोकांचा विश्वास पुष्कळ होता असें दिसतें आणि त्यांचा त्यांविषयीं मह चांगला असण्यालायक त्या नाहींत असें दिसत नाहीं. त्याविषयीं मी जे प्रश्न केले होते, त्यांचीं उत्तरें साऱ्या कलेक्टरांकडून आलीं आहेत. त्यांत एक अहमदनगरचा कलेक्टर शिवाय करून बाकी सर्व ती तऱ्हा फार चांगली आहे असें ह्मणतात आणि विशेषतः चापलीन साहेब तर असें ह्मणतात कीं बहुतेक खटल्यांत त्यांचें साक्षीपुराव्याचें टिपण थोडक्यांत आणि स्पष्ट असतें; त्यावर त्यांचें जे विचार असतात ते खोल आणि उघड

समजण्यासारखे आणि त्यांचे निवाडे पुष्कळ खटल्यांत खरे व निःपक्षपातीच असतात.'

'पंचाइतींत मुख्य दोष दिवसगत हा असे ; आणि तो नाहींसा करण्याला सरकारी कामदारांकडे काम असले ह्मणजे जे उपाय योजीत तेच येथें ही योजितात. ते हे—आर्जव, मध्यस्थी, वशीला आणि केव्हां केव्हां वचनें, देहेनगी ( fee ) आणि लांच ही असे यांत संशय नाहीं.'

'एतद्देशीय न्यायपद्धतींत गुणदोष याप्रमाणें आहेत. आह्मी आपल्या मुलखांत जी पद्धति सुरू केलेली आहे तिच्याशीं हिची तुलना करावयाची. त्यांच्या राज्यांतल्या प्रमाणें जशीच्या तशीच जर ती आह्माला ठेवावी लागली तर गुणावगुणांचें पारडें बहुधा लौकरच फिरेल; परंतु तींत जे मोठमोठे दोष आहेत ते काढून टाकून तिला जोर आणतां येणार आहे, ह्मणून कसें करावें हें सहज ठरवितां येत नाहीं. आमच्या तऱ्हेंत अगदीं ढळढळीत दिसणारे गुण ह्मटले तर—कायदे ठरलेले आणि ते प्रसिद्ध करण्याची तजवीज आह्मी करीत असतों तेव्हां ते हरएक मनुष्याला कळतील. अदालतीचे ठराव कसे व्हावयाचे तीं मूलतत्वें नेहमी अगदीं कायम ठरलेलीं, त्यामुळें निवाडा कसा होईल हें नेहेमीं आधीं ताडतां येतें. दावा लावण्याची रीति ठरलेली आणि ती लागू होईल कीं नाहीं ही कांहीं शंका नसते; हरएक खटल्याचा निकाल कोणत्याही एतद्देशीय दरबारांतल्या पेक्षां पुष्कळ लौकर होतो आणि तो अमलांत येईल ही खात्री तिकडच्यापेक्षां अधिक असते; अदालतीच्या द्वारानें गेलें असतां सरकारच्या अम्मलदारांनां किंवा खुद्द सरकाराला देखील न्यायानें वागावयाला लावतां येईल; न्यायाधीश सोंवळे ( लांच न खाणारे ) असतात आणि त्यांच्या निकालांवर फेर तपासणी ( appeal ) असल्यानें त्यांणीं सोवळें रहावें आणि निकाल बिनचूक करावे असा बंदोबस्त असतो; सारी पद्धत कायम आणि चोहोंकडे सारखी असते आणि भय, भीति, राजकारण किंवा आदरमान इत्यादि कारणांनीं तींत फेर होऊन ती एकाच बाजूस झुकण्यासारखी नाहीं.'

'आतां दुसऱ्या बाजूनें पाहिलें तर असें दिसतें कीं कायदे जरी प्रसिद्ध होतात तरी ते हिंदुस्थानच्या लोकांनां अगदीं नवे असल्यानें सर्व लोकांनां कळूं लागण्याला फार काळ लागेल आणि ते व कोर्टांचे निवाडे युरोपियन विचारसरणीस अनुसरून होत असल्यानें त्यांचीं मूलतत्वें काय आहेत हें नुसतें समजूं लागण्यास त्याच्याही पेक्षां अधिक काळ पाहिजे. ह्या एका अज्ञानावस्थेमुळें मालमत्तेविषयींच्या सर्व प्रश्नांचा लोकांनां मोठा संशय पडतो आणि तंटे वाढतात; आणि आमच्या कायद्यांत सांकेतिक शद्वांमुळें ज्या शेंकडों अडचणी येतात त्या उलगडून सांगण्याला जो एक वर्ग (वकील लोक) उत्पन्न झाला आहे त्याचें पोट चालण्याला फिर्यादि पुष्कळ व्हाव्या लागतात ह्मणूनही तंटे वाढतात. ह्या योगानें फिर्यादींची संख्या वाढते आणि अदालतींतून निवाडे जलद होऊन कांहीं उपयोग होत नाहीं. अपीलांनां सवड दिलेली असल्यामुळें अदालतीचे निवाडे सक्तीनें अमलांत येण्यापासून जो नफा वाटतो तो नाहींसा होतो आणि एकंदरींत, पुष्कळ खटल्यांत, पंचाइतीच्या निवाड्यापेक्षां ही हे कमकुवत आणि सावकाश होतात आणि कित्येक खटल्यांत पक्षकारांची योग्यता व स्थिति वगैरे गोष्टी मनांत न आणतां जो कडकपणा आणि बेपर्वाई दाखविण्यांत येते ती नेटिव्हांच्या मनाला फारच लागते; सरकारच्या कामदारांवर ही अदालतीचा अम्मल चालत असल्यानें त्यांचे अधिकार कमी होतात आणि सरकार जुलमी आहे असें जें लोकांच्या मनांत भरावयाचें तें कांहीं नाहींसें होत नाहीं, किंवा त्यांच्या मनांत तसें वागत असल्यानें त्यांनां ज्या संवई लागलेल्या आहेत त्या नाहींशा होत नाहींत. राज्यकारभार हें एक यंत्र आहे. ह्या यंत्राचा एक भाग अशानें दुर्बळ होतो आणि बाकीच्या भागांत त्या प्रमाणानें फेरफार न झाल्यानें सारेंच बिघडतें आणि जिकडे तिकडे घोटाळा होतो; अदालत दूर असल्यानें सामान्य लोकांनां तिकडे जाणें होत नाहीं; ही अडचण दूर करावी ह्मणून मुनसफ, त्यांची फी, वकील, वगैरे तऱ्हा जर सुरू केल्या तर नेटिव्ह तऱ्हेंत लांचखाऊपणा वगैरे जे दोष, ते त्यांच्यांत असणारच; ते कांहीं नाहींसे होत नाहींत आणि आमच्या तऱ्हेनें भांडखोरपणा उत्पन्न होतो हा एक जो विलक्षण गुण आहे तो मात्र विशेष वाढतो.'

'हें जें अदालतीचें स्वरूप वर्णन केलें आहे तें बंगाल्यांतल्या रिपोर्टांवरून. त्यांत जे दोष दाखविले आहेत त्यांपैकीं पुष्कळ वसुलाच्या पद्धतींत कायदेकानू फार झाल्यामुळें त्यांत, किंवा अन्य कांहीं बाह्य गोष्टींमध्यें उत्पन्न होण्याचा संभव आहे; आणि असें अनुमान करण्याला मुंबई इलाख्यांतलीं जीं कोर्टें आहेत त्यांच्या स्थितीवरून आधार आहे असें दिसतें; कारण तेथें वर सांगितलेल्या बहुतेक अडचणींपैकीं एक ही अद्याप उत्पन्न झालेली नाहीं असें ह्मणतात. परंतु ही पद्धत अगदीं पूर्णावस्थेस पोंहोंचण्याचा किंवा तिच्या जवळ जवळ येण्याचा संभव जसा नेटिव्ह रीतींत नाहीं तसा आमच्यांत ही नाहीं, दोहोंतून कोणती ही स्वीकारली तरी आह्माला पुष्कळ गैरसोई व अडचणी सोसल्याच पाहिजेत, आणि जी प्रत्यक्ष वस्तुस्थिति आहे तींत एकदम, अगदीं अकस्मात्, सुधारणा होईल असें मनांत आणतां येणार नाहीं, अशी आमची खात्री होण्याला पुष्कळ गोष्टी व्हाव्या लागतील. जर अशी गोष्ट आहे तर चालू असलेल्या पद्धतींत जेवढें ह्मणून चांगलें असेल तेवढें जपून राखून ठेवावें आणि आतां जें मूलतत्व लागू आहे त्याला धक्का बसेल असा कोणता ही नवा प्रकार सुरू करण्याला उद्युक्त होऊं नये ही गोष्ट अत्यंत महत्वाची आहे. कारण आहे तें मोडून टाकल्यावर त्याच्या जागीं दुसरें त्याच्याहून चांगलें सुरू करतां येईल अशी आपली खात्री नाहीं, संशयच आहे.'

'ह्मणून मी असें ह्मणतों कीं जी एतद्देशीय पद्धति आहे ती कायम राखावी, तींत जे दोष असतील ते काढून टाकून ती चांगली चालेल अशाविषयीं उपाय योजावे. हें करणें एतद्देशीयांनां जितकें पसंत पडेल तितकी ती पद्धति अगदीं नाहींशी करून तिच्या जागीं दुसरी अगदीं नवी सुरू केली तर ती पसंत पडणार नाहीं.'

पंचाइतीच्या रीतींत ज्या सुधारणा करण्याचें एलिफन्स्टन साहेबानें सुचविलें त्या अशा होत्या कीं, तिचें मूळस्वरूप अगदी कायम ठेवून तींत जेवढे दोष होते तेवढे काढून टाकावे आणि काम चांगले होण्याची तींत शक्ति आ-

णावी. प्रतिवादीनें पंचाइतीला कबूल होण्याला त्याला आधीं जो तगादा होत-असें तो मुख्य साधन होतें, म्हणून तगाद्याची सुद्धां वहिवाट चालू ठेवण्याला त्याची कबुली होती. त्यांत भलत्याच गोष्टी होऊं नयेत, जेणेंकरून आपली अप्रतिष्ठा होते असें कुळाला वाटेल आणि आपली अब्रू संभाळावी असें त्याच्या मनांत वागेल इतक्यापुरत्याच तऱ्हेनें तगादा करावा, कोणाला हरकत किंवा गैरसोई होऊं नयेत ह्मणजे झालें असें त्याचें मत होतें. पंचाइतीचीं कामें अगदीं पहिल्याप्रमाणें चालावीं, त्यांत कांहीं ढवळाढवळ करूं नये, कोणती ही नवी पद्धत सुरू करूं नये, असें त्याचें अगदीं निक्षून सांगणें होतें. पंचांनां कामाला बसण्याची आस्था लागण्याकरितां त्यांच्यावर थोडासा नेट घालावा आणि त्यांणीं काम केलें ह्मणजे त्यांनां बक्षीस ह्मणून थोडासा पैसा द्यावा; उभय पक्षकारांची पंचाइतीला कबुली आणि पंचांनीं केलेला निवाडा,—मग तो त्यांनां वाटेल तितका थोडक्यांत लिहिलेला असला तरी हरकत नाहीं— यांशिवाय दुसरे पंचाइतीचे कोणते ही कागद मागूं नयेत; येवढे दोन हजर झाले ह्मणजे तो निकाल अखेरचा समजावा; जर पंचांनीं लांच खाल्ला असेल किंवा मोठा अन्याय केला असेल, तर तो बाजूस ठेवण्याविषयीं कलेक्टराकडे अर्ज करावा, त्यांणें पुनः पंचाईत करण्यास हुकूम द्यावा, या शिवाय कांहीं करूं नये. असा हुकूम देण्याचा उद्देश पंचाइतीचें काम अगदीं निःपक्षपातानें चालावें एवढाच असावा, तिचा निवाडा दुरुस्त करण्याचा नसावा. तंट्यांची संख्या वाढूं नये आणि मुख्यत्वें शुष्क अपीलें होऊं नयेत ह्मणून ज्याची फिर्याद ढळढळीत क्षुल्लक दिसत असेल त्याला दंड करण्याचा अधिकार सर पंचाला असावा असा **एल्फिन्स्टन** साहेबाचा अभिप्राय होता. न्यायाच्या कामांत ह्मणजे तें करण्याबद्दल पैसा (दस्तुरी, फी) घेतला तर त्यामुळें लोकांनां न्याय मिळण्याला प्रतिबंध होतो त्यापेक्षां तंटे होण्याला तो अधिक प्रतिबंधक होतो कीं नाहीं याविषयीं मोठा संशय आहे, असें बेंथाम साहेबाचें मत होतें, त्याला अनुसरून **एल्फिन्स्टन** साहेबाला असा पैसा घेणें नापसंत होतें. हुकूमनामे बजावावयाचे ते पहिल्या चालत आलेल्या रीतीस अनुसरूनच फार सौम्य प्रकारानें बजावावे. पहिल्यानें ऋणकोकडे मनुष्य पाठवून त्याला

सांगावें कीं निवाड्याप्रमाणें देण्याचा उलगडा कर. नाहीं तर तुला सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत केव्हांही जेऊं खाऊं देणार नाहीं. अशानें निकाल न झाला तर मग त्याची जिनगी विकावी. परंतु त्याचें घर व त्याच्या धंद्याला लागणारीं हत्यारें-पात्यारें असतील तीं विकूं नयेत. जिनगी विकून निकाल झाला नाहीं तर त्याला कैदेंत टाकावें. कैदेची मुदत कर्जाच्या रकमेच्या मानानें आणि ऋणकोचा हेतु लबाडी करण्याचा किंवा त्रास देण्याचा दिसला असेल त्या मानानें पंचाइतीनें ठरवावी असें **एल्फिन्स्टन** साहेबाचें मत होतें.

**एल्फिन्स्टन** साहेबानें न्यायपद्धतीची व्यवस्था लाऊन झटलें— आतां ही जी तजवीज केली आहे हिणें काम चांगलें चालेल. तसें न चाललें तर पंचाइती भरण्याकरितां पुष्कळ अमीन नेमावे लागतील आणि पक्षकारांनां हजर होणें भाग पाडण्याला व पंचांकडून निवाडे लौकर लौकर होण्याला हळूहळू सक्तीचे नियम करावे लागतील. तेवढ्यानें ही भागलें नाहीं तर मुनसफांनांच खटल्यांचा निकाल करण्याचा अधिकार द्यावा लागेल आणि मग त्या सर्वांवरचीं अपीलें ऐकण्याकरितां एक यूरोपियन न्यायाधीश (जज्ज) नेमला पाहिजे. परंतु ह्या सुधारणा जरूर पडेपर्यंत करतां कामा नये. परिणामीं आपल्याला खरें करून दाखवितां येणार नाहीं असला चोख आणि पुष्कळ लौकर न्याय होण्याची आशा दाखवून लोकांची हालीं आपसांत खटले तोडण्याची जी रीति आहे, ती सोडून देण्याच्या नादाला त्यांनां लाऊं नये एवढें करण्याविषयीं आपण जपलें पाहिजे'

न्याय होण्याची व्यवस्था आपण कशी लाविली तें सांगून **एल्फिन्स्टन** साहेब पुढें लिहितो—

मी जी पद्धत योजली आहे तींत उघड उघड पुष्कळ दोष आहेत आणि ती नीट अमलांत आणूं लागलें ह्मणजे आणखी पुष्कळ नजरेस येतील यांत कांहीं संशय नाहीं. परंतु तींत हा गुण आहे कीं आजपर्यंत लोक ज्यांच्या

योगानें एक जुटीनें राहिले आहेत त्या त्यांच्या संस्था, मतें आणि मनोवृत्ति यांना धक्का लागत नाहीं; आणि तींत दोष म्हटला तर तिणें ढवळा ढवळ अगदीं थोडी होते हा आहे, परंतु तो हळु हळु काढून टाकतां येईल: अगदीं जरूर पडलेली दिसेल तसतसा थोडा थोडा हात घालतां येईल. ह्या पद्धतीच्या उलट दुसरी योजली आणि ती जर साधली नाहीं तर अजीच फसेल, सारेंच बुडेल. हिच्या जागीं ज्या दुसऱ्या कांहीं गोष्टी उपयोगीं पडल्या त्याही नाहींत आणि ही ही नाहीं असें होईल आणि ही नाहींशी होण्याबरावर समाज रचनेचीं सारीं बंधनें नाहींशीं होतील. ह्या पद्धतींत तसाच आणखी एक गुण आहे; तो असा कीं फिर्यादींचा निकाल होण्याचीं सर्व साधनें जर तींत सिद्ध नाहींत तर नसोत, परंतु तंटे उपस्थित होण्याचीं जीं कारणें असतात तीं तरी तींत नाहींत. तिच्या योगानें कायद्यांत खरोखर किंवा उगाच दिसण्यासारख्या मोठमोठ्या उलटापालटी होत नाहींत आणि मालमत्तेच्या स्थितींत फेरफार होत नाहीं. जी चालू पद्धत आहे ती तिच्या जागीं जी दुसरी सुरू करावयाची तिच्यापेक्षां जरी वाईट असली. तरी तींत जे काय दोष असतील ते लोकांच्या आंगवळणीं पडून जाऊन त्यांच्या गांवीं ही नसल्यासारखे झाले असल्यामुळें तीच कमी त्रासाची वाटेल; आणि नव्या पद्धतींतला प्रत्येक दोष—आणि पुष्कळ गोष्टी दोषावह नसतां त्याही—त्याची संवय नसल्यामुळें फार जाचक वाटेल. तथापि देशी पद्धतींत हात घालून आह्मी जो फेरफार केला आहे, तो हाल्लीं त्यांनां त्रासदायक वाटत आहे असें माझें ह्मणणें नाहीं. उलट कितीएक कलेक्टरांचें ह्मणणें असें आहे कीं युरोपियन न्यायाधीश तोंडानें तेव्हांच निकाल करतात ती रीति नेटिव्हांनां जितकी पसंत पडते तितकी दुसरी कोणतीच पडत नाहीं. पहिल्या पहिल्यानें असें होईल, परंतु युरोपियनांचे निकाल लोकांनां अतिशय आवडूं लागून त्यांनां आपली रीति नापसंत वाटतां वाटतां ती अगदीं बंद पडली, ह्मणजे थोड्याच दिवसांत कोर्टांत अतिशय गर्दी उडून जाईल. मग तेथें न्याय जरी अगदीं चोख होत असला तरी तो होण्याला वर्षांच्या वर्षे वाट पहात तिष्ठत बसावें लागेल.'

'असें आहे तथापि आह्मी आतां जी पद्धति सुरू करावी ह्मणतों तींत

ठरीव नमुन्याला बरेंच सोडून वागावें लागणार आणि निवळ न्यायालाही कांहीं सुटणार, असें झालेंच पाहिजे. आणि ज्या गैर गोष्टी नजरेस येतील त्या पाहून आमच्या बहुतेक कामदारांनां अगदीं तिटकारा येईल, कारण त्या आमच्या विचारांच्या रीतीच्या उलट असणार आणि दुसरी कोणती ही पद्धति घेतली तरी तींत असेंच दोष असणार, आणि आमच्या दृष्टीनें जे अगदीं क्षुल्लक दिसणार ते नेटिव्हांनां अतिशय तिरस्कार उत्पन्न करणारे असणार हें आह्मी विसरून जाऊं. तथापि ही नेटिव्ह पद्धति युरोपियन विचारसरणीला अनुकूल नाहीं ही ती सुरू करण्याला मोठीच हरकत आहे, आणि तीप्रमाणें काम करण्याला जे कामदार नेमावयाचे, ते फक्त त्यांची लायकी पाहून नेमावयाचे अशी रीति आहे ती बंद झाली ह्मणजे ती पद्धति आह्माला राखतां येईल किंवा नाहीं याची शंका आहे'

'खुद्द आमची जी पद्धति आहे, ती नेटिव्हांनां समजण्यासारखी नसली तरी निदान आह्माला समजण्यासारखी आहे; आणि कडक नियम व ते उल्लंघून इकडे तिकडे जाऊं नये असा बंदोबस्त, हें तींत विशेष असल्यानें वांकडें जाणें सोपें नाहीं. शिवाय नेटिव्हांची जी विचार करण्याची तऱ्हा आहे तिच्याशीं ही ती नीट जुळणारी नसल्यानें थोडीशी अव्यवस्था झाली ह्मणून मोठेंसें कांहीं बिघडत नाहीं. परंतु त्यांची जी तऱ्हा आहे ती आमच्यापैकीं कोणाला ही बहुधा नीट समजण्यासारखी नाहीं. त्यांचे जे अगदीं साधे नियम आहेत ते आह्मी फक्त न समजल्यामुळें उल्लंघूं आणि आपल्यामतें तींतले जे दोष असतील ते काढून टाकीत असतां आमच्या साऱ्यांच्या हातून तींतलीं जीं अगदीं मूलतत्वें तींच दुखावतील. अगदीं मोठे घातक परिणाम होण्याला ही चूक कायदे करणारांच्याच हातून झाली पाहिजे असें ही नाहीं. ती पद्धति निरुपयोगी होण्याला अम्मल बजावणाऱ्या हलक्या कामदाराची चूक पुरे आहे. गांव पंचाइतींत ज्या अनेक गैरशिस्त चुका, लांच वगैरे दोष आहेत ते कमिशनराचे नजरेस येतील आणि थोडेसे सोपे नियम करून ते त्याला काढून टांकतां येतील; पाटलानें काम कसें केलें याचा त्याच्याकडून नुसता रिपोर्ट आणविला ह्मणजे त्या कामांत काय काय झालें हे सारें त्याला

फकून येऊन वर देखरेख करील. तो नियम करील, नोंद ठेवण्याला हुकूम देईल, त्याप्रमाणें नोंद करण्याची हयगय झाली तर दंड करील; आणि असें झालें ह्मणजे आटोपलें. त्या क्षणापासून गांव पंचाइती संपल्याच समजावें. मग त्या त्रासदायक व आपल्याला माहीत नाहींत असल्या नमुन्यांप्रमाणें, त्यांत गैर समजुतीनें चूक झाली तरी शिक्षा आणि टपका मिळणार असें दिसत असून, फक्त सार्वजनिक हिताच्या बुद्धीनें तें काम करण्याला पाटील तयार होतील तेव्हां पंचाईत भरेल. ज्याला अनुभव नाहीं असा एकादा असिस्टंट (मदतनीस) कामाच्या अनुभवा अंतींच जी खात्री उत्पन्न होत असते तशा खात्रीनें वागूं लागून जे निकाल करील त्यांचा परिणाम वरच्या सारखाच होईल. तो कांहीं पंचाइतींनीं आपल्या अधिकाराबाहेर काम केलें ह्मणून त्यांनां दंड करील, कांहीं पाटलांनीं मुलकी आणि दिवाणी कामाची सरमिसळ करून घोटाळा केला ह्मणून त्यांनां तुरुंगांत टाकील; असें झालें ह्मणजे संपलें. त्याचा परिणाम सरकारच्या कामदारांवांचून दुसऱ्या कोणी ही खटले तोड-ण्याच्या कामांत पडूं नये असा सरकारनें कायदा केला असल्यासारखा परिणाम त्याच्या हाताखालच्या प्रांतांत होईल.'

'हीं सर्व अरिष्टें टाळण्याला उत्तम उपाय ह्मटला तर हा—सर्व मुलूख बराच काळपर्यंत एका स्वतंत्र कमिशनराच्या ताब्यांत ठेवावा आणि वर सांगिल्या प्रकारच्या ज्या चुका होणाऱ्या आहेत त्या दुरुस्त करण्याचें काम त्याच्या दक्षतेवर ठेविलें पाहिजे.'

आतां आपल्या अमलाखालीं आलेल्या निरनिराळ्या वर्गांच्या लोकांचे स्वभाव कसे आहेत, काणापासून कोणतें भय उत्पन्न होणार आणि राज्यावर कसें संकट येईल वगैरे गाष्टींचा **एल्फिन्स्टन** साहेबानें चांगला विचार करून त्या रिपोर्टाच्या शेवटीं सविस्तर लिहिलें आहे; त्यांतून पुष्कळ उतारे घेण्या-सारखे आहेत, परंतु वर जे दिले आहेत तेच पुष्कळ लांब झाले आहेत याजकरितां आणखी दिले तर वाचकांस कंटाळा येईल ह्मणून इतकेंच सांगतों कीं त्या काळीं लोक कोणकोणत्या कारणांनीं बिथरण्याचें भय होतें तें त्यांत

सांगितलें आहे आणि प्रसंग आल्यास बहुजनसमाजापैकीं आपल्यास कितीसे लोक अनुकूल असतील, पेशव्यांच्या वेळचे कामदार व जाहागिरदार यांजपासून आपल्याला केवढें मोठें भय आहे, तें दाखवून मराठी राज्याची पुनः स्थापना करण्याचा एकादा प्रयत्न झाला तर त्याला हातभार लावण्याला ते कोणत्या कारणांनीं अनमान करतील तें सांगितलें आहे; आणि महाराष्ट्र देश जातीचाच फार मजबूद असून त्यांत काम नसल्यानें शिपायगिरीवरून निघालेले व लुटारू हजारों लोक जिकडे तिकडे भरलेले असून ते फक्त आपली (इंग्रजांची) खरी शक्ति फार मोठी आणि कीर्ति त्याहून ही मोठी असल्यानें कसे दबून राहिले आहेत तें मोठ्या जोरदार शब्दांनीं सांगितलें आहे. तो ह्मणतो 'अशा प्रकारचीं जीं संकटें आहेत तीं परदेशाशीं लढाई सुरू झाली आणि आपल्याला दक्षिण देशांतून फौज बाहेर पाठवावी लागली किंवा पेशवाईचा शेवट होतेवेळीं जसा येथें धुमाकुळ चालला होता तसा फार दिवस चालण्याचा प्रसंग आला, तर मात्र भयंकर होतील. एरवीं वेळेवर सावध राहिलें ह्मणजे कशाला भिण्याचें कारण नाहीं.'

आपण जर हिंदुलोकांच्या धर्माच्या बाबतींत हात घातला तर ते केव्हां बिथरतील आणि कोणत्या पल्ल्यास गोष्ट जाईल याचा कांहीं अजमास करतां येणार नाहीं असें **एल्फिन्स्टन** साहेबाचें मत होतें, ह्मणून त्या प्रकरणांत फार जपून वागलें पाहिजे अशी त्याणें सूचना दिली. तो ह्मणतो--

नेटिव्ह लोकांच्या धर्मसंबंधानें ज्या वेडगळ किंवा दुराग्रहाच्या समजुती आहेत त्यांत ढवळा ढवळ करण्याचा जर आपण यत्किंचित प्रयत्न केला, तर आमच्यावर केवढें अरिष्ट कोसळेल तें मी अद्याप कांहींच सांगितलें नाहीं. तें संकट किती मोठें आहे तें अगदीं उघड दिसणारें आहे, या करितां आपण त्या वाटेला कधीं जाऊंच नये हें बरें. नेटिव्हांची संख्या आणि शारीरबल हीं आमच्यापेक्षा किती अधिक आहेत तें सांगतां येत नाहीं हें उघड आहे. त्यांच्या अंगांत हिम्मत नाहीं आणि साऱ्यांची एक जूट नाहीं त्यामुळें आह्मी प्रबळ आहों. परंतु त्यांना स्फुरण येऊन साऱ्यांनीं एक व्हावें आणि आमच्या

कडे त्यांच्यांतलें एक चिट पांखरूं राहूं नये असा एक जादूचा मंत्र आहे. तो कोणता ह्मणाल तर 'धर्म' हीं दोन अक्षरें. हा मंत्र असा जबरदस्त व फार भयंकर असतां त्या लोकांनीं आमच्यावर त्याचा वारंवार आणि यथाविधि कसा प्रयोग केला नाहीं याचें आश्चर्य वाटतें. सरकार नेटिव्हांनां एकादे वेळीं वाटवण्याचा यत्न करील ह्या भीतीनें मी आतां हें भय सरकारच्या नजरेस आणून देत आहें असें नाहीं, परंतु अशा वेताला सरकार उत्तेजन देत आहे असा एकादा संशय लोकांच्या मनांत आला तर त्यापासून कसा परिणाम होईल तें सरकारच्या मनांत नीट ठसावें ह्मणून सांगतों आहें. नेटिव्हांचा जोंपर्यंत आमच्यावर विश्वास आहे, तों पर्यंत आह्मी अतिशय धाडसानें नव्या नव्या गोष्टी सुरू केल्या तरी कांहीं भय नाहीं; परतु तो एकदा उडाला, ह्मणजे मग आह्मी अगदीं जपून जरी कांहीं केलें तरी संकटांत पडूं. मग आह्मी आतां करीत आहों इतकें देखील कांहीं करावें लागणार नाहीं; अगदीं यःकश्चित, एकादी क्षुल्लक गोष्ट केली तरी ती सुद्धां लोकांच्या अंगांत धर्माचें वेड संचारण्याला पुरेल. त्या धर्मवेडाचे परिणाम जसे भयंकर आहेत तसेच ते उत्पन्न होण्याचीं स्थानें ही गुप्त आहेत.'

दक्षिणेंतल्या जाहागीरदारांची व्यवस्था **एल्फिन्स्टन** साहेबानें कशी लाविली तें मागें सांगितलेंच आहे. त्यांच्याविषयीं रिपोर्टांत त्याणें असें लिहिलें आहे:—

वंशपरंपरेनें चालत आलेले थोर थोर सरदार हा वर्ग पुष्कळ अधिक महत्वाचा आहे. मुसलमान राजांच्या पदरच्या सरदारांप्रमाणें ते लोकांना परके नाहींत. राजा बुडाला, त्याचा आश्रय नाहींसा झाला, तर त्याच्या बरोबर ते नाहींसे होणार नाहींत, कारण ते त्याणें वाढविलेले नाहींत. लोकांचें आणि त्यांचें राष्ट्र एक, धर्म एक; लोक जेव्हां स्वतंत्र होऊं लागले तेव्हां त्यांच्यांतले त्यांचे जे पुढारी, नायक, झाले त्यांचे ते वंशज आहेत. त्यांच्या ताब्यांत प्रदेश असल्यानें त्यांचें जें वजन आहे तें जसें विस्तृत आणि कायम

टिकणारें आहे, तसें आम्ही पूर्वी जिंकून घेतलेल्या मुलखांत कोणाचें फारसें दिसत नाहीं.'

सरदार कायम राखावे व त्यांचे हक्क, मानमरातब, चालवावे हें फार इष्ट आहे असें **एल्फिन्स्टन** साहेबाला वाटत होतें. त्याबद्दल त्याणें मेटकाफ साहेब सेक्रेटरी यास अगदीं स्पष्ट लिहिलें, त्यांतला एक उतारा खालीं देतों.

'या विषयावर मला इतक्या विस्तारानें लिहिण्याचें कारण, आह्मी आपले दोस्त आहों असें आह्मी ज्या सरदारांनां ह्मटलें, त्यांचे हक्क कायम राखून चालवणें मला किती महत्वाचें वाटतें तें सांगावें, तसेंच ते आमच्या सरकाराशीं मिळून राहिल्यानें आपला केवढा नफा झाला आहे तें दाखवावें आणि प्राचीन सरदार मंडळीपैकीं कांहीं भरभराटींत व संतुष्ठ राहिल्यानें एकंदरींत किती फायदा आहे तें दाखवावें, हें होय. तसेंच मला असें वाटतें कीं अशा प्रकारचे जे सरदार आहेत त्यांच्याशीं उपस्थित होणारे तंटे टाळण्याच्या ज्या खऱ्या अडचणी आहेत त्या मनांत येऊन शिवाय त्यांची मागची स्थिति आणि त्यांच्या हक्कांचें स्वरूप जरासें कळूं लागलें ह्मणजे त्यांचा उपयोग कांहीं नाहीं, हे फक्त खावयाला काळ आणि कायदे सुरळीत चालण्याला रिकामी अडचण असें वाटूं लागून त्यांचे मुलूख खालसा करावे हें बरें असें मनांत येऊं लागेल; मनाची प्रवृत्ति अशा प्रकारची झाली आणि काळ ही लोटला ह्मणजे हालींचे करारनामे कशा प्रकारें अमलांत आणण्याचें योजलेलें आहे याचा विसर पडून त्यांतल्या अक्षरांचें मात्र स्मरण होईल; असा प्रकार घडूं नये ह्मणून फार थोर असे जे नामदार गव्हरनर जनरल त्यांनां मी अशी सूचना करण्याचें साहस करतों कीं करारनाम्यांतला जो उद्देश तो कायम रहावा ह्मणून स्पष्टीकरणार्थ जें लिहावेंसें वाटेल तें लिहावें आणि हे सरदार ज्या ज्या सरकारांच्या ताब्यांत ठेवावयाचे असतील त्यांणीं त्यांच्याशीं कसें वागावें त्याबद्दलचे हे कायमचे नियम असें

त्यांस कळवावें, आणि ज्या ज्या जाहागीरदारांकडे त्यांचे मुलुख राहिले आहेत त्या सर्वांशीं याच नियमांप्रमाणें वागावें.

मराठी राज्यांत जाहागीरदार आपल्या मुलखांत पूर्ण मुक्त्यार असत. एकाद्या सरदारास जाहागीर मिळाली ह्मणजे फौजेच्या खर्चाकरितां जाहागीर मुलखाचा वसूल घेण्याचा हक्क त्याला मिळाला असें मुळांत असे, परंतु त्या मुलखाचा सर्व अधिकार ही त्याच्याचकडे चालावयाचा अशी वहिवाट असे; त्याप्रमाणें चालवून जे मोठमोठे जाहागीरदार असत ते आपसांत एकमेकांशीं लढण्याचा सुद्धां आपल्याला अधिकार आहे असें म्हणून तो गाजवीत ही. इंग्रजी झाल्यावर ते त्यांचे अधिकार कांहीं तरी कमी करणें अवश्य झालें, परंतु त्यांचे पेशव्यांशीं जे करार होते त्यांप्रमाणेंच वागण्याचें इंग्रज सरकारानें ही कबूल केलें असल्यामुळें अडचण आली. वर जें **एल्फिन्स्टन** साहेबानें मेटकाफ साहेबाला पत्र लिहिलेलें सांगितलें त्यांतच दक्षिणेंतल्या जाहागीरदारांविषयीं त्याणें असें लिहिलें—ह्या जाहागीरदारांशीं आम्ही जे करार केले आहेत त्यां वरून पहातां, पंढरपूरच्या तहनाम्याप्रमाणेंच त्यांनां वागविलें पाहिजे. ते करार मराठी राज्यांतील प्राचीन वहिवाटीच्या आधारानेंच केलेले आहेत. म्हणून त्यांनां आपआपल्या जाहागिरीची व्यवस्था ठेवण्याचा पूर्ण अधिकार, देहांत शिक्षा देण्याचा सुद्धां, असला पाहिजे. त्यांणीं त्या अधिकाराचा अगदीं उघड उघड दुरुपयोग केला, किंवा एक सारखी पुष्कळ दिवस अगदीं अव्यवस्था चालूं दिली, असें झाल्याशिवाय सरकारानें त्यांत हात घालता कामा नयें.'

जे जाहागीरदार खालच्या प्रतीचे, हलके, होते त्यांचे अधिकार कमी करून सर्व बाबतींत ते खुद्द कमिशनराच्या नजरेखालीं असावे असें **एल्फिन्स्टन** साहेबानें ठरविलें. अदालतीचें त्यांनां मोठें भय वाटत होतें ह्मणून तुह्माला तिच्या ताब्यांत देणार नाहीं असें त्याणें त्यांनां आश्वासन दिलें. त्यांच्याविषयीं त्याणें असें लिहिलें आहे—खालच्या प्रतीच्या जाहागीरदारांच्या गुन्ह्यांची चौकशी कलेक्टरांनीं केली तरी चालेल, परंतु ती आधीं कमि-

शनराला कळविल्यावांचून करूं नये. मला वाटतें जे प्रतिष्ठित लोक आहेत त्यांच्यावर ज्या मोठमोठ्या फिर्यादी येतील त्या साऱ्यांनां हाच नियम लागू करावा; ज्या अगदीं क्षुल्लक फिर्यादी असतील त्यांची आणि दिवाणी दाव्यांची चौकशी पंचाइतीमार्फत, किंवा योग्य युरोपियन अधिकाऱ्यापुढें चालणें योग्य आहे; परंतु अशा सर्व प्रकरणांत कायमच्या मुलखांतल्या कोर्टांतून समन्सें निघतात आणि हुकूम होतात तसे न करतां संभावित लोक एकमेकांनां पत्रें लिहितात त्याप्रमाणें लिहावें. ह्या मुलखांतली सारीच व्यवस्था तूर्त ह्मणून आहे तर जी गोष्ट गैरसोईची दिसेल ती फिरवितां येईल. परंतु मी तर निदान हाल्लींच्या पिढीचे लोक जिवंत असे पर्यंत, वर सांगितलेल्या मेहेर नजरेच्या गोष्टींपैकीं बहुतेक चालवितां येतील तों-पर्यंत चालवीन. पुढें खरा विषमभाव उत्पन्न करणाऱ्या सर्व गोष्टी नाहींशा करून टाकतां येतील. परंतु जोंपर्यंत आमच्या मनांत लोकांत श्रेष्ठ, कनिष्ठ असे भेद दाखवावयाचे आहेत, तोंपर्यंत त्यांच्या मानप्रतिष्ठेंत कमीजास्त-पणा राखलाच पाहिजे. नेटिव्ह लोक ज्ञानवान होऊन, आम्हाला विला-यतेंत अशा बावतींत जसें कांहीं वाटत नाहीं तसें त्यांनां वाटेनासें झालें ह्मणजे मग हें कांहीं करावयाला नको. हाल्लीं असा एकदम मोठा फेरफार केला तर वरच्या प्रतीच्या लोकांनां तो जुलूम वाटेल आणि खालच्या प्रती-च्यांनां देखील तो अगदीं अपरिचित ह्मणून अयोग्य वाटेल.'

**एल्फिन्स्टन** साहेब पुढे लागलाच मुंबईचा गव्हरनर झाल्यानें त्याला आपल्या ह्या विचारांप्रमाणें अम्मलबजावणी करावयास सांपडलें. दक्षिणेंतला राज्यकारभार चालवावयास जे कामदार नेमलेले होते, त्यांनां आपल्यास योग्य वाटेल त्याप्रमाणें वागण्याचा जोंपर्यंत अधिकार होता, तोंपर्यंत ह्या जाहागीरदार व सरदार मंडळीस इतरांपेक्षां निराळ्या प्रकारानें वागविणें सोईचें होतें व त्याप्रमाणें चाललें ही होतें; परंतु पुढें थोड्याच दिवसांत त्या भयंकर अदालत बाईच्या हातीं कदाचित सरकार आम्हाला देईल अशी त्यांनां भीति उत्पन्न झाली आणि सन १८२२ मध्यें **एल्फिन्स्टन** साहेब

जेव्हां दाक्षिणेंत फिरावयास गेला तेव्हां त्यांणीं त्याला गांठलें आणि जीं दिवाणी कोर्टें स्थापन होणार त्यांच्या ताब्यांत आह्माला देऊं नका अशी त्याची विनवणी केली. ते असें ह्मणाले कीं पेशवाई अखेर आपण जो जाहिरनामा प्रसिद्ध केलात त्यांत दिलेलीं वचनें पहा. पेशव्यांच्या अमलांत चालत आलेले आमचे सर्व हक्क चालवूं ह्मणून सांगितलेंत त्याप्रमाणें चालवा. आह्माला अदालतीच्या ताब्यांत दिलेंत ह्मणजे आमचा सर्वस्वीं नाश झालाच.' **एल्फिन्स्टन** साहेबानें त्यांच्या तक्रारीचा योग्य विचार केला आणि त्यांच्या वरच्या फिर्यादींचा निकाल करण्याकरितां एक स्वतंत्र कामदार नेमला. त्याला त्याणें 'सरकारचा एजंट' असें नांव ठेविलें आणि त्याणें केलेल्या निकालांवर अपील फक्त गव्हरनर इन् कौन्सिल यांजकडे व्हावें असें ठरविलें. पेशव्यांच्या मुलखास इतर प्रांतांप्रमाणें कायदे लागू करण्याचें ठरलें तेव्हां ह्या सरदार मंडळीस ते लागू करूं नयेत असें **एल्फिन्स्टन** साहेबानें ठरविलें. पेशवाईंत त्यांचा दरजा व मानमान्यता कशी काय होती तें पाहून त्या मानानें त्यानें त्यांचे वर्ग केले आणि त्यांत जे वरच्या प्रतीचे होते त्यांच्या वरच्या खटल्यांत अपील गव्हरनर इन् कौन्सिल यांजकडे आणि खालच्या प्रतीच्या वरच्यांत सदर दिवाणी अदालतीकडे व्हावें असें ठरविलें. याप्रमाणें त्याणें जी व्यवस्था केली ती त्याच्या मागून त्या जागेवर आलेला त्याचा मित्र **मालकम** साहेब यास पसंत पडली. त्याचे विचार तसेच असल्यानें ती कायम झाली. तो त्याच मताचा नसता तर ती टिकली नसती.

**एल्फिन्स्टन** साहेबानें जो रिपोर्ट लिहिला त्याचा उद्देश दाक्षिणेंतील नवीन घेतलेल्या मुलखाचा राज्यकारभार कोणत्या धोरणावर पुढें चालवावा तें दाखवावें हा असल्यानें त्याणें एकंदर लोकांनां लागू पडतील अशा ज्या गोष्टी होत्या त्या जशा विस्तारानें लिहिल्या, तशा ह्या सरदार, जहागीरदार, वगैरे लोकांबद्दल लिहिल्या नाहींत; कारण त्यांची संख्या थोडी पडली. त्यांनां कसें वागवावें तें लिहितांना बंगालच्या राज्यव्यवस्थेंतल्या ज्या अगदीं निंद्य गोष्टी

बाहेर पडल्या होत्या, त्या साऱ्या त्याच्या डोळ्यांपुढें अथपासून इतिपर्यंत मूर्तिमंत उभ्या होत्या. तो प्रांत इंग्रज सरकारच्या ताब्यांत येऊन तेथें त्यांचा अम्मल अगदीं पक्का बसल्याला पुष्कळ वर्षें झालीं होतीं तेव्हांपासून तेथच्या त्यांच्या कारभारांत जे एक एक अनान्वित प्रकार चालले होते त्यांची हकीगत सन १८१२ च्या पांचव्या रिपोर्टांत तपशीलवार दिलेली आहे. तो रिपोर्ट अगदीं गाजलेला आहे. बंगाल्यांत मोठमोठे जमीनदार लोक पुष्कळ होते, परंतु तेथें जमिनीचा वसूल घेण्याची जी नवीन पद्धत निघाली तिणें त्यांची अगदीं दुर्दशा उडून ते धुळीस कसे मिळाले, जमीन कसणारीं जीं कुळें होतीं, त्यांच्या पूर्वापार चालत आलेल्या हक्कांचें संरक्षण कसें होईनासें झालें, गांवसंरक्षणाची रीत कशी अजीबाद बुडाली, आणि त्यामुळें मुलुखभर कशी सारी अव्यवस्था झाली व न्यायखात्यांत कशी घाण झाली, ती सारी माहिती त्या रिपोर्टांत सविस्तर दिलेली आहे.

इंग्रजसरकारच्या ताब्यांतल्या मुलखांत ह्या, आणि अशाच दुसऱ्या ज्या लज्जास्पद गोष्टी घडत होत्या, त्या जेव्हां उघडकीस आल्या तेव्हां लोकांच्या मालमत्तेचें आणि जीवाचें संरक्षण ते आपल्या राजेरजवाड्यांच्या अमलाखालीं असतांना अधिक चांगलें होत होतें कीं नाहीं, हिंदूंच्या आण मुसलमानांच्या अमलाखालून निघून आमच्या अमलाखालीं आल्यानें त्यांचें कांहीं अधिक हित झालें आहे कीं काय, याचा पुष्कळ गोऱ्या लोकांच्या मनांत संशय येऊं लागला. इंग्रजी अम्मल झाल्यानें हिंदुस्थानांत शांतता झाली हा अमोलिक लाभ झाला. जे मुलुख लुटालूट होऊन उद्ध्वस्त झाले होते त्यांत व्यवस्था लागली; परंतु दोन असामींचा तंटा लागला तर त्याचा नीट न्याय व्हावा, जीवित आणि वित्त यांचें संरक्षण व्हावें, ह्मणून ज्या तजवीजी त्यांणीं योजल्या व वसूल घेण्याची चांगली पद्धत घालून देण्याला ह्मणून जो प्रयत्न केला, तो कांहीं साधला नाहीं. पुष्कळ ठिकाणीं तो इतका फसला कीं त्यामुळें अगदीं दुर्लौकिक झाला. याप्रमाणे प्रथम राज्यकारभारांत ज्या चुका झाल्या, त्यावरून अनुभव येऊन, पुढें जे आणखी मुलुख काबीज झाले, त्यांची व्यवस्था करतांना तो प्रकार घडला

नाहीं. नवीन मुलुख ताब्यांत आला ह्मणजे त्याची व्यवस्था लावतांना नियम अगदीं साधे करावे, देशी वहिवाटी असतील त्यांत फारशी ढवळाढवळ करूं नये, लहान थोर सर्व लोकांचे हक्क कसे आहेत ते नीट समजून घ्यावे, नेटिव्ह लोक कामावर पुष्कळ लावावे, युरोपियन अम्मलदारांना अधिकार अधिक मोठाले द्यावे, परंतु त्यांच्या नेमणुका करतांना निवड अधिक जपून करावी, अशा धोरणानें पुढें वर्तन होऊं लागलें; परंतु आपल्या कृतीनें व लेखानें असा कित्ता घालून दिल्याचें श्रेय **एल्फिन्स्टन** साहेबाला दिलें पाहिजे.

**एल्फिन्स्टन** साहेबानें दक्षिणेचा कमिशनर ह्मणून सुमार दोन वर्षें काम केलें. तें आटोपल्यावर त्याणें त्यासंबंधानें जो हा रिपोर्ट सरकाराकडे केला तो त्याच्या कर्तृत्वाला शोभे असा होता. तेवढ्यानें त्याचें राज्यकारभाराचें काम संपलें असें मात्र समजावयाचें नाहीं; ह्या वेळापासून त्याला आरंभ झाला असें ह्मटलें तरी देखील हरकत नाहीं. दाक्षिणेंत राज्यक्रांती नुकती झाली होती, तेव्हां तेथें पुढें कशी कशी व्यवस्था व्हावी याविषयीं त्याणें आपला अभिप्राय दिला होता, परंतु त्या प्रमाणें घडून येणें अवकाशाचें काम होतें. परतु मुंबईस तोच गव्हरनर झाला हा योग चांगला जमून आला. त्या जागीं असतांना त्याचें मुख्य काम जें आपण पुण्यास असतांना आरंभिलें तेंच पुढें चालवून त्यांत न्यूनाधिक काय केलें पाहिजे तें पहाण्याचें व त्याप्रमाणें करण्याचें होतें. तें त्याणें कसें केलें तें पुढच्या भागांत यथास्थळीं सांगण्यांत येईल. रिपोर्ट लिहून पुरा होतो आहे आणि तो त्यावर सही करून लेखणी खालीं ठेवितो आहे तोंच त्याला मुंबईस जाणें आलें त्याला मिळालेली जागा फारच मोठ्या योग्यतेची होती परंतु त्याच्या त्याला संतोष वाटला नाहीं. कारण आतां जी जागा सोडून जावयाचें आलें तिचा अधिकार कांहीं लहान सहान नव्हता; जबाबदारी ही तशीच मोठी होती; परंतु तो अगदीं स्वतंत्र होता; त्याणें जें आपल्या मनाला योग्य वाटेल तें करावें इतकी मुक्त्यारी होती; मुंबईचा गव्हरनर ह्मणजे राजा

खरा, परंतु तेथचें राज्य पुष्कळ दिवस स्थिरस्थावर होऊन सुयंत्र चाललेलें आणि त्याचा अधिकार अगदीं ठरलेला होता. त्याच्या बाहेर त्याला जातां येत नव्हत. कमिशनरी सोडून जातांना त्याला कितो वाईट वाटलें आणि मनाची स्थिति कशी झाली तें त्याणें आपल्या रोजनाम्यांत उत्कृष्ट तऱ्हेनें लिहून ठेविलें आहे, तें दाखवून ह्या भागाची समाप्ति करूं. सरकारी कामांत त्याचा जो काळ गेला, त्यापैकीं बराच भाग पुण्यांत गेला येवढें ध्यानांत ठेवावयाचें. मराठी साम्राज्याला उतरती कळा लागून त्याचा अखेर ऱ्हास झाला त्या शेवटच्या वीस वर्षांत ज्या मोठमोठ्या गोष्टी घडल्या त्या त्याणें डोळ्यांनीं पाहिल्या होत्या, आणि त्यांतल्या कांहींनां हातभार ही लाविला होता. आतां तो काळ गेला, जिकडे तिकडे सामसूम झालें, आणि आतां मुलखांत अशीच स्वस्थता नांदेल असा अदमास दिसत होता, तेव्हां कचेरींत बसून वर्षानुवर्ष एकसारखें करीत बसावें लागणारें कंटाळवाणें वाटणारें काम त्याला डोळ्यांपुढें दिसूं लागलें. आजपर्यंत आपण जें काम केलें त्यापेक्षां अगदीं निराळ्या प्रकारचें आतां आपल्या पुढें येऊन पडणार हें मनांत येऊन त्यांतून आपण कसे पार पडूं अशी काळजी वाटणें साहजिकच होतें व तें त्याला शोभत होतें. अशा त्या नवीन जागीं गेल्यावर त्याच्या हातून तेथचें काम कसें निभलें तें पुढच्या भागांत दिसेल.

विजापुराहून पुण्यास परत आल्यावर जुलैच्या पहिल्या तारखेच्या रोजनाम्यांत तो ह्मणतो—बंगल्यामध्यें गर्मीत, कोंडलेलें रहाणें मला बरें वाटत नाहीं. तंबू, आटोपसर सामान आणि शानदार हवा सोडून आलों; तें सुख पुनः मिळेल काय असें वाटतें. आतां थोड्याच दिवसांत इकडच्या आनंददायक हवेला जसा मी खचित मुकणार, त्या प्रमाणें हिंदुस्थानांत असेपर्यंत कदाचित तंबूला ही मुकेन. त्याची माझी फारखत झालीच

पुनः तारीख २३ चा लेख असा आहे—मुंबईला जावयाचें ह्मणून आटपाआटोप करूं लागलों आहें. तो काळ जसजसा जवळ येत चालला आहे तसतसें मला भय आणि त्रास अधिक वाटूं लागला आहे. मला-

सगळ्यांत अधिक भय तेथच्या हवेचें वाटतें. मला मुंबई न आवडण्याला तेथची मंडळी, तेथच्या कामाचें स्वरूप आणि तें चालविण्याची तऱ्हा, हीं ही कारणें आहेत.

तारीख १३ आक्टोबर. रिपोर्टाचें काम संपलें. आतां थोडीशी फुरसत सांपडेल. परवांच्या दिवशीं डुकराच्या शिकारीला जाईन. काल रात्रीं येथच्या मंडळीनें मला फार छान मेजवानी केली. लोक मला फार मानतात ह्मणण्याबद्दल माझ्या मनांत कधीं आल्या नसत्या अशा गोष्टी मला दिसल्या. मंडळी मजवर कृपा करतात हें मी चांगलें समजून आहें. येथची माझी स्थिति किती चांगली आहे आणि आतां पुढें जी प्राप्त व्हावयाची आहे ती हिच्या किती उलट असणार आहे, तें माझ्या मनांत आल्यावांचून राहीना. माझ्या हातून काम उत्कृष्ट होईल असा लोकांनां मोठा भरंवसा आहे परंतु तो सिद्धीस जाण्याचीं साधनें केवढीं अहित हें जेव्हां माझ्या मनांत आलें तेव्हां ते जी माझी वाहवा करीत आहेत ती अखेरची, आतां याच्यापुढें मी लोकांनां चांगला वाटणार नाहीं, असें मला वाटल्यावांचून राहवेना. असें झालें तरी त्यांत माझा कांहीं दोष आहे असें ह्मणतां येणार नाहीं आणि कदाचित आपल्या हातून कांहीं कसूर होऊं नये येवढी इच्छा असली ह्मणजे तेवढ्यानेंच मी आपलें काम केलें असें लोक समजतील.

Be just and fear not. Let all the ends thou aimest at be thy country's. Thy God's and truth's, then, if thou failest, O. Cromwell.

हें कविवचन आपण नेहेमीं ध्यानांत ठेवावें ह्मणजे झालें.

तारीख २३ आक्टोबर--मी आज बांधाबांध करतों आहें. पुण्यांत पुष्कळ दिवस वास्तव्य, हा माझ्या चरित्रांतला एक भाग आतां समाप्त होणार. मी येथें आलों तेव्हां माझी प्रकृति बिघडलेली होती; आतां फ्रेंचांची स्वारी होईल, [illegible] मी मोठा पराक्रम करीन आणि लौकिक मिळवीन, अशी मला

मोठी आशा वाटत होती; ती निष्फळ झाली ह्मणून मी उदास झालों होतों. त्या निराशेच्या योगानें हिंदुस्थानांत लौकिक मिळवावा अशी जी मला हाव सुटलेली होती ती जिरली आणि संगमावर पुष्कळ दिवस अगदीं स्वस्थतेंत काळ गेल्यानें जी संवय लागली ती दृढ होऊन बसली. काबूलची हकीगत लिहीत होतों त्यावेळीं ज्या प्रकारें अभ्यास करावा लागला, त्याणें माझी विचार करण्याची जी अगदीं पहिली रीत होती ती आणि तेव्हांच्या संवई सुटून मला एकांताची गोडी लागली; गडबड, मंडळी यांचा तिटकारा येऊं लागला; अशा समयीं ज्या गोष्टी घडल्या, त्यांमुळें मला तो एकांतवास सोडून यावा लागला. माझे प्रथम जे अत्यंत थोर मनोरथ होते—आणि जे सिद्धीस जाण्याची कांहींच आशा दिसत नव्हती—तशाच प्रकारचे ह्या गोष्टींनीं कांहीं काळानें परिपूर्ण झाले, आणि मी आतां जरी चाकरी सोडली तरी माझ्या हातून ज्या गोष्टी झाल्या आहेत त्यांबद्दल मला सर्व प्रकारें संतोष वाटावा असेंच आहे. मी संगमावर येऊन राहिलों तेथून पहिल्यानें कांहीं वर्षें अध्ययनाला फुरसत मिळाली आणि पुढें शेवटच्या काळांत लढाई वगैरे अनेक प्रकारचीं कामें अंगावर पडलीं; परंतु आतां तशांतला एक ही प्रकार घडणार नाहीं. आतां येथून पुढें एक पैसा शिवाय करून बाकी सर्व बाबतींत माझें नुकसानच होणार. पैशाचें देखील बहुधा तसेंच मुंबईत मन उदास होईल आणि कंटाळा येईल असें भय वाटतें, परंतु तेथच्या कामाची नवीन तऱ्हा, गडबड, नव्या गोष्टी आणि नवीं नवीं माणसें दृष्टीस पडतील त्याच्या योगानें तसें घडणार नाहीं असें ही वाटतें, आणि तेथें माझी प्रकृति चांगली राहील असें दिसलें तर मग इतर सर्व नवीन प्रकार मला आवडूं लागणार नाहींत असें नाहीं.

तारीख २६ आक्टोबर छावणी आंबेगांव—रात्रीं नाच ( बॉल ) होऊन पुनः भोजन झालें तों सुमार साडेचार वाजले. इतकें जागरण झालें. मी अकरा वाजतां पुणें सोडून निघालों तो येत येत वाकरी येथें पावना नदी उतरे पर्यंत अर्जदार व पोहोंचवावयास आलेली मंडळी बरोबर होतीच. जेथें माझा इतका काळ स्वस्थतेंत आणि आनंदांत गेला त्या स्थळाचें दर्शन जातां

जातां होईल तेवढें घ्यावें ह्मणून मी मध्यें मध्यें थांबून मागें पहात पहात चाललों. मी घोड्यावरून चांदखेडांतून आणि मागें आह्मी जेथें शिकारीला येत असूं त्या जागेंतून चाललों असतां, आजपर्यंत ह्या स्थळीं जो सुखोपभोग घेतला तो पुनः आतां कधीं ही घ्यावयास मिळावयाचा नाहीं असें मनांत येऊन तीं पहिल्यापेक्षां दुप्पट चांगलीं वाटलीं. ह्या गांवाजवळ येत चाललों तसतशी आसमंतात् अधिकाधिक चांगली शोभा दिसूं लागली. अखेर एका लहानशा टेंकडावरून खालीं एका सुंदर खोऱ्यांत उतरलों. त्याच्या सभोंवार डोंगर असून त्यांच्या माथ्यांवर तोरुज, तिकोना, इसापूर आणि लोहगड हे किल्ले उभारलेले आहेत. तोरुज आणि तिकोना हे पुष्कळ उंच आणि भव्य आहेत. पावना नदी त्या खोऱ्यांतून वहात चालली आहे आणि त्यांत मध्यें मध्यें जीं टेंकडें आहेत त्यांवर हिरवें गार गवत आहे, मधून मधून शानदार वृक्ष आहेत आणि त्यांवर ऊन पडलेलें होतें तेणेकरून त्या खोऱ्याला चांगली शोभा आलेली होती. आकाशांत ढग आलेले होते ते निस्तेज आणि जड होते, आणि खालीं जमिनीवर त्यांची छाया पडत होती ती हळुहळु चालत होती, तेणेंकरून तो देखावा फार मनोहर झाला होता. ह्या चित्रासारख्या सुंदर आणि शानदार प्रदेशावर माझी एक प्रकारची प्रीति जडली आहे आणि माझ्या मनांत ह्याच्याविषयीं एकप्रकारची आदरबुद्धी ही वसत आहे. असला हा प्रदेश साडून आतां मी त्या सपाट आणि गजबजलेल्या रस्त्यांच्या मुंबईंत जाऊन पडणार ह्मणून दक्षिणेंल्या चित्रविचित्र, मनोहर वनश्रीच्या देखाव्यांचें आणि शिकारीचें स्मरण होऊन वाईट वाटल्यावांचून रहात नाहीं.

इतकें लिहून पुढें एका ग्रीक काव्यांतल्या तीन चार पंक्ति लिहिलेल्या आहेत; त्यांतील सारांश असा—

डोंगरांत, गुहेंत लपून बसणाऱ्या लांडगे कोल्ह्यांनों, आस्वलानों, सलाम सलाम. आतां तुह्मी आपल्या जंगलांत, झाडा-झुडपांत, दऱ्या-खोऱ्यांत स्वस्थ असा. इतःपर हा शिकारी तुह्माला त्रास द्यावयाला इकडे येणार नाहीं. सलाम.

---

[stamp]

# भाग २ रा.

## एल्फिन्स्टन साहेब मुंबईचा गव्हरनर.

### सन १८१९—१८२७.

गव्हरनरी सारख्या राज्यकारभारांतल्या मोठमोठ्या जागा ईस्ट इंडिया कंपनीच्या खर्चानें चालत होत्या खऱ्या, परंतु त्यांवर आपल्या पदरच्या मंडळीपैकीं एकाद्याची किंवा दुसऱ्या कोणा पाहिजे त्याची नेमणूक करण्याचा अधिकार कंपनीच्या डायरेक्टरांस नव्हता. बोर्ड आफ कंट्रोल ह्मणून त्यांच्यावर नजर ठेवणारी जी सभा होती, तिच्या अध्यक्षाची ज्यांच्यावर मर्जी सुप्रसन्न होई त्यांनां बहुधा त्या मिळत असत. मुंबईचा गव्हरनर सर ईव्हन नीपियन याच्या जागीं दुसऱ्याची नेमणूक करण्याची वेळ आली तेव्हां त्या बोर्डाचा अध्यक्ष क्यानिंग साहेब होता, त्याच्या हातांत पाहिजे त्याला नेमण्याचें होतें. परंतु आलीकडे हिंदुस्थानांत ज्या मोठमोठ्या लढाया झाल्या त्यांत कंपनीच्या नोकरांनीं चांगले पराक्रम केले आणि कीर्ति मिळविली याचा आपल्याला संतोष वाटतो असें दाखविण्याला प्रधानमंडळाला ही संधी चांगली आहे असें मनांत आणून त्याणें डायरेक्टरांस लिहिलें कीं सर जान मालकम, मिस्टर एल्फिन्स्टन, आणि कर्नल मनरो यांपैकीं कोणाची तरी त्या जागीं नेमणूक करावी. आपले विचार कसे आहेत तें स्पष्ट कळावें ह्मणून क्यानिंग साहेबानें डायरेक्टरांनां जें पत्र लिहिलें त्यांत तो ह्मणतो—

दरबारची नेहेमीची रीत झटली ह्मणजे कंपनीच्या नोकरांपैकींच कोणाला नेमण्यापेक्षां ह्या देशांतल्या थोर थोर लोकांपैकीं कोणी मिळेल तर पाहून त्याला गव्हरनर नेमावें अशी आहे. एकंदरींत ही रीत चांगली आहे असें मी ह्मणतों. कंपनीचें खरें हित ह्याच मार्गानें साधणार आहे असें विचाराअंतीं दिसल्यावरून माझें मत असें झालें आहे हें आपल्याला सांगावयाला नकोच; ही माझी खात्री आहे. परंतु आलीकडे नुकतीच जी

भानगडीची आणि मोठी नांवाजण्यासारखी लढाई झाली,' तींत कंपनीच्या लष्करी व मुलकी खात्यांतील नोकरांनीं जी आपली विलक्षण आस्था आणि बुद्धिवैभव प्रकट केलें, आणि लढाईचा उत्तम शेवट झाल्यानें तुमच्या मुंबई इलाख्याची जी विशेष प्रकारची स्थिति झाली आहे, ती मनांत आणली म्हणजे असें वाटतें कीं नेहमीची रीत जरा बाजूस ठेऊन तुमच्या पदरच्या मंडळीपैकीं कोणाला तरी नेमणें योग्य आणि सोईचें आहे.'

ह्या पत्रांत दरबारची वहिवाट म्हटलें आहे ती प्रधानमंडळाचें वजन विशेष असल्यानें पडलेली होती; कंपनीच्या डायरेक्टरांचा ओढा विलायतेंतल्या मुत्सद्दी मंडळीकडे विशेष होता आणि त्यामुळें पडली होती असें नाहीं, यांत कांहीं संशय नाहीं. परंतु ह्यासमयीं ती वहिवाट बाजूस ठेवल्याचें सारें श्रेय खुद्द क्यानिंग साहेबास होतें.

कंपनीच्या नोकरांपैकींच डायरेक्टरांना जो उत्तम वाटेल त्याला नेमावें असें आलें, तेव्हां त्यांणीं त्या जागीं **एल्फिन्स्टन** साहेबाची नेमणूक केली.

ही गोष्ट मालकम साहेबाला फार वाईट वाटण्यासारखी झाली. कारण गेल्या वीस वर्षांत ज्या कांहीं गोष्टी घडल्या त्या साऱ्यांत त्याचा विचार हवा लागत होता, आणि एकामागून एक जितके गव्हर्नर जनरल झाले तितक्या साऱ्यांचा त्याच्यावर भरंवसा होता. ही मराठ्यांबरोबरची लढाई सुरू झाली तेव्हांच सरकारच्या हातांत देण्यासारखी जी सगळ्यांत मोठी जागा होती ती त्याणें त्यालाच दिली होती, आणि आतां लढाई संपून जयजयकार झाला तेव्हां पहावें तर त्याच्यापेक्षां दहावर्षांनीं मागून चाकरीवर आलेल्याला ही थोरली जागा मिळून तो मागें पडला. यांत आपली अगदीं अप्रतिष्ठा झाली असें तो आपल्या मित्र मंडळीजवळ आणि खुद्द लार्ड हेस्टिंग्ज साहेबाजवळ ही बोलला. **एल्फिन्स्टन** मुलकी खात्यांतला असल्यानें त्यालाच ही जागा देणें योग्य आहे असें त्यावेळीं जें बोलणें निघालें होतें त्यांत कांहीं अर्थ नाहीं. मनरोची जी एवढी कीर्ति झाली होती ती त्याच्या शिपायगिरीबद्दल

नव्हे, मुलकी खात्यांत त्याणें पुष्कळ दिवस चांगले परिश्रम केल्यामुळेंच झाली होती. कंपनीच्या पदरचे लष्करी व मुलकी खात्यांतले एक एक असामी कसे बुद्धिमान, जसे लढाईच्या तसे राज्यकारभाराच्या कामांत ही कसे कर्तृत्ववान होते, त्याचा ह्या तिघा कीर्तिमान पुरुषांतला प्रत्येक असामी खरोखर पहाण्यासारखा मासला होता. असें असतां एल्फिन्स्टन साहेबालाच नेमण्याचें कारण नवीन घेतलेला दक्षिणदेश आतां मुंबई इलाख्यांत सामील व्हावयाचा आहे तो त्याच्याच नजरेखालीं असावा हें बरें, असें जें क्यानिंग साहेब बोलला तेंच सयुक्तिक दिसतें. दक्षिण देश मोठा चमत्कारिक, त्याची एल्फिन्स्टन साहेबाला पूर्ण माहिती असून तो राजकार्यधुरंधर असतां, तो मुलुख दुसऱ्याच्या हातीं देणें चांगल झालें नसतें.

मालकम साहेब एल्फिन्स्टन साहेबापेक्षां कांहीं कमी नसून वडील ही आहे. तेव्हां त्याला बढती न देतां याला दिली तर त्याला वाईट वाटल्यावांचून रहाणार नाहीं, ही गोष्ट वरिष्ठांच्या मनांत आल्यावांचून कांहीं राहिली नाहीं. नवीन घेतलेल्या मुलखाची पुढें व्यवस्था कशी करावी, या विषयीं गव्हरनर जनरल लार्ड हेस्टिंग्ज याणें कोर्ट आफ डायरेक्टरास आपला अभिप्राय कळवितांना असें ह्मटलें होतें कीं तेवढा भाग कांहीं दिवस अगदीं निराळा ठेवला पाहिजे; याजकरितां एक लेफ्टनंट गव्हरनर ह्मणून नवीन अधिकारी नेमून त्याच्या स्वाधीन तो मुलुख करावा. त्या जागेवर प्रथम नेमणूक एल्फिन्स्टन साहेबाची करावी; कारण त्या कामाला त्याच्याइतका लायक दुसरा कोणी मनुष्य नाहीं. गव्हरनर जनरलाचा अभिप्राय डायरेक्टरांनां मानवला. त्याप्रमाणें करून मालकम साहेबाला लेफ्टनंट गव्हरनर नेमावें असा ही त्यांचा विचार होता, परंतु त्या जागेला एल्फिन्स्टनच योग्य, त्याच्या इतकी दक्षिण देशाची माहिती दुसऱ्याला नाहीं, असें त्याणें लिहिलें असल्यामुळें त्यांनां विचार पडला. ही बातमी खासगी पत्रांवरून हेस्टिंग्ज साहेबाला समजली, तेव्हां त्याणें एल्फिन्स्टन साहेबाला पत्र पाठविलें, त्यांत कांहीं दिवस दक्षिण प्रांत निराळा ठेऊन आपण ह्मटल्याप्रमाणें मालकम साहेबाची त्यावर नेमणूक केली तर चालेल कीं नाहीं तें

अगदीं मोकळ्या मनानें मला सांगा असें लिहिलें. **एल्फिन्स्टन** साहेबानें त्याला असें उत्तर पाठविलें कीं 'हा प्रांत एक वर्षभर तरी निराळा ठेवावा असें माझें मत आहे व त्याचीं कारणें मी आपल्या रिपोर्टांत लिहिलींच आहेत. मालकम साहेब त्या जागेला सर्व प्रकारें योग्य आहेत. त्यांच्या हाताखालीं कौन्सिल नेमावें; त्यांत एक मिस्टर चापलिन व दुसरा मुंबईच्या सनदी नोकरांपैकीं असावा ह्मणजे झालें.' परंतु तें प्रकरण तेवढ्यावरच संपलें, त्याची पुढें आणखी कांहीं वाटाघाट झाली नाहीं असें दिसतें.

**एल्फिन्स्टन** साहेबाला ही गव्हरनराची जागा केवळ त्याची योग्यता मनांत आणून कोर्ट आफ डायरेक्टर्स यांणीं दिली. त्याच्यासाठीं कांहीं कोणी खटपट केली नाहीं कीं वशिला बांधून भीड खरचली नाहीं. त्याचा चुलता त्या कोर्टांत होता तो सुद्धां मालकम साहेबाला नेमावें ह्मणत होता. परंतु तो लार्ड वेलेस्ली वगैरे जे गव्हरनर जनरल सारें हिंदुस्थान भराभर जिंकून आपल्या हाताखालीं आणावें ह्मणणारे होते त्यांच्या तालमेंतला होता. **एल्फिन्स्टन** तसा नव्हता. कोर्ट आफ डायरेक्टर नां तें मत पसंत नव्हतें. शिवाय तो मुलकी खात्यांतला होता. दक्षिण देश आतां मुंबई इलाख्यांत सामील करावा अशी त्या कोर्टाची इच्छा फार होती. अशा कारणांनीं त्या जागेला **एल्फिन्स्टन**च योग्य असें बहुमतानें ठरून त्याची नेमणूक झाली. त्याच्या जागीं चापलीन साहेबाची कमिशनर ह्मणून नेमणूक झाली, परंतु ती नांवाला होती. तो **एल्फिन्स्टन** साहेबाच्या हाताखालीं आला; सार हुकूम मुंबईहून तो करील तो चालावयाचा, गव्हरनर जनरलाशीं आतां कांहीं संबंध नाहीं असें झालें.

याप्रमाणें या नेमणुकीची हकीगत झाली ह्मणून **एल्फिन्स्टन** साहेबाच्या आणि मालकम साहेबाच्या स्नेहांत कांहीं अंतर आलें नाहीं. त्यांची एकमेकांनां पत्रें जात येत होतीं त्यांत त्यासंबंधाचा मजकूर नव्हता असें नाहीं; परंतु ती जागा तिसऱ्याच कोणाला मिळते आहे कीं काय अशा प्रकारें अगदीं निष्काळजीपणानें मोकळ्या मनानें ते लिहीत होते. सारें

संपल्यावर **एल्फिन्स्टन** साहेबानें **मालकम** साहेबाला जें पत्र पाठविलें त्यांत तो ह्मणतो, 'या प्रसंगीं तुह्मी जें मोकळ्या मनानें आणि विनोदानें लिहिलेंत त्याबद्दल माझें कांहीं ह्मणणें नाहीं, कारण तुह्मी तसें लिहाल ही माझी पक्की खात्री होती. या शिवाय दुसरें कांहीं लिहावें असा तुमचा स्वभावच नाहीं हें मला पुरें माहीत आहे. पत्रावरून आणखी असें दिसून येतें कीं पेनशनाचा तुह्माला तिरस्कार आहे. मला पेनशन मिळतें आणि तुह्माला ही गव्हरनरी मिळती तर बरें होतें. मुंबईत जी कीर्ति मिळणार तिणें आपल्या लौकिकांत कांहीं भर घालण्यापेक्षां आपल्या विपुल संपत्तीचा उपभोग घेत घरीं रहावें हें बरें असें तुह्माला खरोखर वाटेल.'

**एल्फिन्स्टन** साहेबाची मुंबईचा गव्हरनर ह्मणून कारकीर्द बरोबर आठ वर्षें, सन १८१९ च्या नोव्हेंबर पासून सन १८२७ च्या नोव्हेंबर महिन्यापर्यंत झाली. ह्या काळांत हिंदुस्थानांत जिकडे तिकडे शांतता होती. इंग्लिशांनीं आपले सारे शत्रु अगदीं हतवीर्य, पादाक्रांत करून टाकले होते. लार्ड लेक भरतपूरच्या किल्ल्यापुढें हात टेंकून तेथून निघून गेला होता, तेवढें एक त्यांना लांछन झालें होतें आणि तें त्यांच्या मनांत सलत होतें. परंतु सन १८२४ मध्यें लार्ड आंबरक्रांबीनें तो किल्ला घेऊन तो डाग धुऊन टाकला. त्याच वर्षी ब्रह्मदेशावरोबर पहिली लढाई झाली. त्यांचा जिकडे तिकडे जयजयकार चालला होता. चोहींकडे दरारा बसून गेला होता; कोणी शत्रु प्रबळ होऊन डोकें वर करील हें भय नव्हतें. तेव्हां सरकारचें मुख्य काम, दक्ष राहून आहे तशी शांतता राखावी आणि नवीन घेतलेल्या व जुन्या मुलखांत राज्यकारभार उत्तम प्रकारें चालवून प्रजेचें कल्याण होण्याला ज्या गोष्टी करणें इष्ट व अवश्य असेल त्या कराव्या या शिवाय कांहीं नव्हतें. मुंबई इलाख्यांत मुख्यत्वें हेंच करावयाचें होतें. या वेळीं **एल्फिन्स्टन** साहेबाच्या वयाला सारीं चाळीस वर्षें झालीं होतीं, ह्मणजे जनरूढी प्रमाणें ह्मटलें तरी तें सरासरी निम्मे झालें होतें इतकेंच. परंतु दुसरीकडून पाहिलें असतां, जनांमध्यें कीर्ति मिळवण्याचे जे कांहीं प्रसंग होते त्यांतल्या शेवटल्यावर तो येऊन ठेपला होता. तारुण्याच्या भरांत

असतांना अंगामध्यें जी तर्तरी, धमक, उतावीळपणा, महत्वाकांक्षा आणि काळजी असतें तें सारें निघून गेलें होतें कामाकाजांत अनुभव आल्यानें त्याचा वर्तनक्रम कायम ठरला होता. नित्य मेहेनत आणि आहार विहार नियमित असल्यानें त्याचें शरीर सशक्त होतें. बुद्धीची तर्तरी पूर्ण होती; अशी स्थिति असल्यानें नूतन प्राप्त झालेल्या उच्चपदाचें वैभव आणि सुख अनुभवण्याला सर्व प्रकारें अनुकूलता होती. लढाई दंगाधोपा वगैरे कांहीं नाहीं तर कीर्ति कशी मिळेल असें कोणी ह्मणेल तर ह्मणो, परंतु कीर्ति होण्याचे मार्ग अनेक असतात; त्यांतले कांहीं सुदैवानें त्याला सांपडले. हें राज्यकारभाराचें नवीन काम आपल्या हातून कसें निभेल अशी त्याला काळजी पडली होती खरी, परंतु त्याच्याविषयीं लोकांनां जो भरंवसा होता तो फुकट गेला नाहीं. त्याच्या हातून काम चांगलें होऊन त्याची कीर्ति पहिल्यापेक्षां फार वाढली आणि अजरामर होऊन बसली चिरस्थाई होण्यासारखें अमूक काम त्याणें केलें असें जरी कांहीं दाखविण्यास रखें नसलें तरी त्या आठ वर्षांत मोठ्या महत्वाच्या, तावडतोब मोठ्या हिमतीनें केल्या पाहिजेत अशा पुष्कळ गोष्टी वरचेवर उपस्थित होत होत्या. त्या साऱ्या कामगिऱ्या नीट बजाऊन शिवाय हिंदुस्थानच्या एकंदर कारभारांत जे मोठ्या विचाराचे प्रश्न निघत त्यांतल्या अमक्याविषयीं त्याणें विचार करून लिहिलें नाहीं असें बहुधा नाहीं. तरी एकंदरींत पहातां त्याच्याबरोबर किंवा त्याच्या हाताखालीं जे अनेक लोक काम करीत होते त्यांचा त्याच्या विषयीं बोलण्याचा विषय एक—त्याचा स्वभाव, वर्तन वगैरे—असे. तो इतक्या आस्थेनें काम करी कीं तो त्याला एक शोकच असल्यासारखें दिसें; आणि तें पाहून त्याची ज्यांनां माहिती होती, किंवा त्याच्या बराबर जे काम करीत असत, त्यांच्या अंगांत तसें स्फुरण यत असे. मागें मोठे बिकट प्रसंग आले तेव्हां तो जसें हिमतीनें काम करीत होता तसेंच आतां स्वस्थपणाच्या वेळीं उत्सुकतेनें करीत असे. लोकांनां दिपवून टाकण्यासारखें एकादें मोठें कृत्य करून न ठेवतां त्याणें सर्व प्रकारच्या लहान थोर लोकांची प्रीति संपादिली आणि ते त्याला फार मानीत होते. अद्याप लोकांनां त्याचें

स्मरण होऊन ते त्याचे गुण गातात, यापेक्षां आणखी कीर्ति ती काय व्हावी!

आतां **एलिफन्स्टन** साहेबानें मुंबईस कायकाय केलें तें सांगावयाचें. आधीं त्याला मुंबई आवडली कीं नाहीं आणि नवें काम कसें वाटलें तें समजलें पाहिजे, याजकरितां त्याणें आपला चुलतभाऊ आडाम साहेब याला तारीख ३ डिसेंबर सन १८१९ रोजीं जें पत्र पाठविलें, त्यांत त्या संबंधाचा जो मजकूर लिहिला तो खालीं देतों. तो ह्मणतो—

आतां तुमच्या प्रश्नांचीं उत्तरें देतों. मला मुंबई कशी काय आवडते? फार चांगली. तुह्मांला वाटलें होतें कीं पहिल्या महिन्यांत बरी वाटणार नाहीं; परंतु मला असें वाटतें कीं या महिन्यांत जितकी चांगली वाटली तितकी पुढे कोणत्यांतच वाटणार नाहीं. जेणें करून त्रास वाटेल असले आदरोपचार आणि समारंभ (forms and ceremonies) वगैरे कांहीं नव्हतें. तऱ्हेतऱ्हेच्या नव्या गोष्टी पुष्कळ होत्या. मला माहीत नाहींत असलीं नवीं कामें कशीं वाटतात ह्मणून विचारलेंत, त्याचें उत्तर— तीं मला जड वाटत नाहींत. कारण नेहेमीची वहिवाट कशी काय आहे तो सारा तपशील सांगण्याला वार्डन साहेब माझ्याजवळ नेहेमी उभेच आहेत. अगदीं तपशीलवार पहावयाला नकोत असलीं जीं नवीं कामें असतात, तीं शिकण्याला मला आवडतेंच. शिवाय मला दाक्षिणेंत असतांनां जितकें काम पडत होतें तितकें कांहीं येथें पडत नाहीं; आणि जें पडतें—ह्मणजे जें माझा वेळ खातें—त्यापैकीं बरेंच खेळासारखें वाटतें. तें कसें ह्मणाल तर माझ्याकडे कामाकरितां ह्मणून जे लोक येतात त्यांच्याशीं बोलावयाचें असतें; कागदपत्र पाहून यांत खरें कोणतें, खोटें कोणतें, अशा भ्रमांत पडावयाचें किंवा नेटिव्हांनां खोदखोदून विचारून खरें काढून घ्यावयाचें, असें नसतें; कौन्सिलाला जावयाचें; देवळाला (church) जावयाचें जिचें भय वाटतें, वीट येतो, अतिशय तिटकारा येतो, तो इतका कीं मला वाटतें आजपर्यंत असा दुसऱ्या कशाचा कधीं आला नसेल,

अशी एक गोष्ट येथें आहे. ती कोणती ह्मणाल तर लांब लांब भाषणें आणि असल्या प्रकारचे डौल करणें. ह्या रीतिचें मला मोठें भय वाटतें असें आपलें स्पष्ट बोलून, माझ्या हातून होइल तितकें तें करावयाचें मी टाळतों. तरी पण तसें करावयाचे केव्हां केव्हां प्रसंग येतात. मुंबइचे बाकीचे सारे लोक अशीं डौलदार, इतकीं भाषणें करतात, कीं मी जर चार्लस फॉक्स असतों तर ही रीत (fashion) मोडून टाकावी ह्मणून आपल्या तोंडाला अगदीं खीळ घातली असती. एकाद्या बैठकींत तीस मंडळी जमली, तर तितक्यांचीं यथाक्रम भाषणें झाल्याशिवाय रहावयाचींच नाहींत ही एकादवेळ मौज दिसेल, परंतु मुंबईला हें मोठें लांछन आहे. एवढें शिवाय करून बाकी येथील मंडळी आनंदी आणि सरळ आहे; निदान कलकत्त्यांतल्या सारखी आहे. कोठें एकादी मेजवानी असली ह्मणजे नाच किंवा गाणेंबजावणें यांतून एक तरी नेहमी असतेंच; अगदीं आळ्सेंतच आपली तेवढी मंडळी बसली आहे, असें नसतें. गव्हर्नरानें ही वरचेवर गार्डांतून बाहेर जावें अशी येथची वहिवाट आहे; त्याला अगदीं एकाद्या सुखवस्तु गृहस्थाप्रमाणें रहातां येतें. तें मला आवडतें आणि माझी संवय ही तशीच आहे. आतां मुंबईत वाईट काय तें सांगतों. या ऋतूंत हवा जरी असावी तितकी चांगली आहे तरी उन्हाळ्यांत ती जबर कडक असेल. घोड्यावरून फिरण्याचीं स्थळें सुंदर आहेत परंतु प्रादेशमात्र आहेत. क्षुल्लक आणि कच्चें काम फार आहे. सरकारानें तें पहात बसण्याची दगदग करणें योग्य नाहीं. कारण तशानें त्यांतल्या तपशीलवार पोटकलमांत सरकार बांधलें जातें आणि मग त्याला एकंदरींत वरचेवर जी तपासणी ठेवावयाची आणि मागच्या पुढच्या व चालू वेळचा विचार पहावयाचा तें होत नाहीं. तें तर सरकारचें खरें कर्तव्य समजलें पाहिजे. दुसरी त्रासाची गोष्ट कौन्सिल कारण त्यांत फुकट वेळ मात्र जातो आमची कौन्सिलची मंडळी चांगल्या मनाची, विनोदी आणि मोठमोठ्या गोष्टींत एकमताची असते. परंतु कित्येक कामांत एकेकांचें मत निराळें असे पुष्कळ वेळ होतें आणि खलिते (minutes) लिहिण्यांत पुष्कळ वेळ जातो. उदाहरणार्थ समजा, एका नवीन जिल्ह्याच्या

कलेक्टरानें 'मला मुलखांत फिरावयास जावयाचें आहे, कचेरीच्या कारकु-नांस बसावयास तंबू पाहिजेत' असें लिहिलें. तें माझ्यापुढें आलें ह्मणजे मी ह्मणतों "मंजूर" परंतु एक कौन्सिलर तसें न करतां मिनिट लिहितो आणि मागें अमक्या अमक्याला तंबू दिले होते परंतु त्याची गोष्ट ह्याला लागू नाहीं, ह्याची निराळी आहे असें दाखवितो; मग त्यावर उत्तर देण्यांत अर्धा तास मोडतो. दुसऱ्या बाजूनें पाहिलें तर कौन्सिलर माझा पुष्कळ त्रास चुकवितात; तो असा कीं ज्या गोष्टी मला स्वतःला समजत नाहींत त्या त्यांनां विचारावयास सांपडतात.'

मुंबई येथें इंग्रज लोक जेव्हां फक्त दुकानांत बसून व्यापार करीत होते तेव्हां त्यांचे गव्हरनर दक्षिणेंतल्या ज्या मराठे व मुसलमान राजेरजवाड्यांशीं आर्जवानें वागत होते तीं सारीं दरबारें मोडून कालवशात् मुंबई मोठा इलाखा झाला, तेव्हां मग मोठें ह्मणण्याला कायतें एक बडोदें उरलें. त्याच्याशीं त्यांचा स्नेह चांगला होता. गायकवाडांची भेट झाल्यापासून इंग्रज त्यांनां चिकटलेले आहेत बडोद्यांत भाईबंदी तंटा माजून त्यांचा पाय आंत शिरला त्याबराबर त्यांणीं तहनामा करून प्रथम सन १८०२ इसवींत आपली फौज चाकरीस ठेऊन दिली. गादीचा मालक आनंदराव वेडसर असल्यामुळें त्याचा भाऊ फत्तेसिंग हा त्याचा पालन कर्ता ह्मणून गादीवर बसला आणि सारा राज्य-कारभार रेसिडेंट साहेब करूं लागला. गायकवाडाच्या पदरीं आरब लोक पुष्कळ होते, त्यांचा पगार तुंबला होता, तो चुकता करून देऊन त्यांनां हांकून लावतां यावें ह्मणून इंग्रजांनीं पुष्कळ पैसा कर्जाऊ दिला होता; आणि तो वसूल व्हावा ह्मणून सारें राज्य वस्तुतः आपल्या ताब्यांत घेतल्या सारखेंच होतें. सन १८१८ मध्यें फत्तेसिंग मेला. आनंदराव त्याच्यामागून लौकरच मेला; तेव्हां तिसरा भाऊ सयाजी गादीवर बसला. त्याला पूर्ण मुख्त्यारी मिळाली. त्याच्या राज्यकारभाराची व्यवस्था लावण्याकरितां **एल्फिन्स्टन** साहेब दोन वेळ बडोद्यास गेला. तेथची व्यवस्था कशी काय लागली तें त्याच्या पत्रांवरून कळेल.

कोल्हापूरचें राजघराणें ही साताऱ्या प्रमाणें शिवाजीचाच वंश असल्यानें त्याचें नांव मोठें होतें. त्यावेळीं गादीवर असलेले महाराज हट्टी आणि मनास येईल तसें वागणारे होते. एकदां इंग्रज सरकाराबरोबर असलेला तहनामा बाजूस ठेऊन त्यांणीं आपल्या शेजारच्या जाहागीरदारांच्या मुलखांत धामधूम मांडली, सरकाराला त्यांनां ताळ्यावर आणण्याला तावडतोब तजवीज करावी लागली.

इराणच्या आखातांत चांचे लोक उपद्रव देत, त्यांचा बंदोबस्त करावा ह्मणून इंग्रज सरकारानें थोडीशी फौज तिकडे पाठविली तीवर जो मुख्य अम्मलदार होता, त्याला कांहीं आसामींनीं फसवून 'चल तुला त्यांची लपून बसण्याची जागा दाखवितों' असें ह्मणून दूर, आंत मुलखांत, वाळवंटांत नेलें, आणि एकाएकीं चोहींकडून आरबांनीं घोडे घालून, वेढून अगदीं कत्तल उडविली. त्या प्रसंगांतून थोडेच जिवानिशीं सुटले. ती बातमी येतांच मुंबईहून लागलीच दुसरी फौज रवाना झाली. तिला त्या कामांत कांहीं यश आलें आणि कांहीं दुसरे उपाय योजून तिकडचा व्यापार सुरळीत चालावा असें झालें. इराणच्या अखातांतलें एक बेट बळकावावें असा इंग्रजांचा बेत होता परंतु इराणच्या शहाला राग येईल असा रंग दिसतांच त्यांणीं तो नाद सोडून दिला.

याच सुमारास तांबड्या समुद्राच्या कांठीं मोखा येथें थोड्याशा आरमाराची मुंबईहून रवानगी झाली. कारण तेथें ही तसाच कांहीं प्रकार झाला होता. तिकडचा ही बंदोबस्त होऊन व्यापार नीट चालावा असें झालें.

हाल्लीं मुंबई इलाख्यांत सामील असलेला सिंध प्रांत तेव्हां स्वतंत्र होता तेथचे अमीर तेथें राज्य करीत होते ते इंग्रज सरकाराशीं सरळ वागत होते. परंतु इंग्रजी मुलखाच्या सरहद्दीवर स्वतंत्र असल्यासारखे पुष्कळ सरदार होते, त्यांच्यामध्यें गडबड होती. आणि तींत सिंधमधले ही कांहीं लुटारू शिरले. तेव्हां तिकडचा बंदोबस्त करावा ह्मणून इंग्रजी फौज

गेली. ती सिंध मधून निघाली तेव्हां अमीर उठले; परंतु तें प्रकरण वाढलें नाहीं, सामोपचारानें थोडक्यांतच मिटलें.

**एल्फिन्स्टन** साहेब मुंबईस गव्हरनर असतांना बाहेरप्रांतीं राजकीय प्रकरणें उद्भवलीं तीं एवढींच. त्यांत त्याची मोठी कीर्ति व्हावी असें कांहीं झालें नाहीं.

गतगोष्टींचा विचार आणि पुढें कसें वागावयाचें याविषयीं निश्चय, याबद्दल उल्लेख त्याच्या दोन वर्षांच्या रोजनाम्यांत वरचेवर आहेत. घरीं जाण्याची गोष्ट फार लांबणीवर पडली ह्मणून त्याला जें वाईट वाटत होतें त्याचा लौकर विसर पडेना. त्याला मागच्या सारखी पुनः उदासीनता येऊं लागली, आणि मुंबईची हवा ही मानेना असें दिसतें परंतु तें सर्व तो मुकाट्यांनीं सोशीत होता.

अशा स्थितींत असतां सन १८२० च्या मार्च महिन्यांत **एल्फिन्स्टन** साहेबाला बडोद्यांस जाणें आलें तें चांगलें झालें. त्या स्वारींत मुख्य काम सयाजीराव गायकवाडास मुकत्यारी देऊन गादीवर बसवावयाचें, हिशेब तपासावयाचे, आणि दरबारच्या मुख्य मुख्य मंडळीची ओळख करून घ्यावयाची, व तेथच्या राजकीय गोष्टी समजून घ्यावयाच्या हें होतें. त्यावेळच्या त्याच्या रोजनाम्यावरून असें दिसतें कीं त्याला बडोद्याची व्यवस्था नीट लावावयाला बरीच मेहेनत पडली असावी.

पर्जन्यकाळानंतर **एल्फिन्स्टन** साहेब पुनः गुजराथेंत फिरावयास निघाला; तो वसईवरून स्वाराच्या घोड्यावरून जात असतां पेरोजन येथें तो घोडा पडून स्वारी खालीं आली आणि बरीच इजा झाली. जत्रु (गळ्याजवळचें हाड) मोडून हात ही दुखावला. त्यामुळें पुढें गलबतांत बसून जावें लागलें. सुरतेस तो महिना दीड महिना अगदीं पडून होता, जरासा बरा झाल्यावर ता तसाच पुढें दूर काठेवाडांत फिरावयास गेला.

तेथून कच्छच्या रणांतून अमदाबादेस गेला आणि तेथून माघारा फिरून बडो-
ध्यावरून मुंबईस आला.

त्या दोन ही स्वाऱ्यांत त्याणें पुष्कळ राजकीय प्रकरणांचा निकाल लावला. कंपनीच्या ताब्यांतील मुलखासंबंधानें त्याला कांहीं फारसा त्रास पडला नाहीं. तेथील प्रकार पाहून त्याणें जे रिपोर्ट केले ते अद्याप देखील तेव्हांची स्थिति कळण्याला ऐतिहासिकदृष्ट्या फार महत्वाचे आहेत. जमिनी-वर जो सारा बसविलेला होता तो जरब होता परंतु ती जमीन फार सुपीक आणि इंग्रजी अमलापासून शांतता होऊन निर्भय झालें, त्यामुळें तो रयतेला जांचला नाहीं. कलेक्टरांच्या हाताखालीं जो मुलख होता, तो थोडा असून त्यांना आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें करण्याचा पुष्कळ अधिकार असे. कारण मुंबईंत बोर्ड आफ रेव्हिन्यू कधींच नव्हतें आणि गुजराथेला स्वतंत्र कमिशनर ही नव्हता. इकडे अदालतीचा प्रभाव कसा काय आहे तें पहाण्याकडे त्याचें लक्ष सहजच गेलें. परंतु ती एकंदरींत लोकांना कांहीं अप्रिय नाहीं असें दिसलें तेव्हां त्याला आश्चर्य वाटलें. तरी त्याच्या नजरेस दोन दुःखकारक गोष्टी आल्या त्या त्याणें लिहून ठेविल्या आहेत. राज्यक्रांतीच्या काळांत असल्या गोष्टी घडावयाच्याच. खेडा जिल्ह्याविषयींच्या रिपोर्टांत तो ह्मणतो—'सन १८०४ मध्यें ज्याच्या-जवळ १५० स्वार आणि २००० पायदळ होतें अशा एका राजाला आमच्या एका माजिस्त्रेटानें आपल्यापुढें हजर होण्याविषयीं समन्स पाठ-विलें; तें त्याणें मानलें नाहीं ह्मणून त्याणें त्याला तुरुंगांत टाकिलें.' दुसरा एक सरदार होता त्यावर गायकवाडी फौज हल्ला करीत होती परंतु तिला त्याणें दोन महिने दाद दिली नाहीं. त्याणें स्वतंत्र असतांना लढाई करितां कर्ज काढलें होतें, तें त्याच्यानें फेडवेना ह्मणून सावकारानें फिर्याद केली तेव्हां अदालतीनें त्यास तुरुंगांत टाकिलें. एल्फि-न्स्टन साहेब ह्मणतो—

'यांच्या स्थितींत केवढा बदल झाला आहे हें मी निराळें सांगत नाहीं, एकच गोष्ट सांगतों म्हणजे पुरे. ती गोष्ट एवढीच कीं कर्नल वाकर, आणि मला वाटतें कीं आमचा अधिकार प्रथम सुरू झाल्यावर आमचे जे अम्मलदार तेथें गेले ते सारे, ज्यांनां स्वतंत्र राजे म्हणत ते हेच लोक. त्यांच्याकडून खंडणी घ्यावयाची, या पलिकडे त्यांच्या वाटेस जाण्याचा आम्हांस अधिकार नव्हता. आतां त्यांचा सर्व अधिकार, मोठेपणा आणि बहुतेक उत्पन्न, हें सर्व नाहींसें झालें आहे. हें एवढें स्थित्यंतर सारें गेल्या तीनच वर्षांत झालें. अशी एकाएकी त्यांची विपरीत स्थिति झाली तर त्यांनां वाईट वाटल्यावांचून कसें राहील? त्यांनां शिक्षा झाली तर त्यांत कदाचित अन्याय नसेल, परंतु हे त्यांचे हाल आहेत एवढें कबूल केलें पाहिजे.'

रयत लोकांवर अदालतींत फिर्यादी होऊन इंग्रजी अम्मल बसण्यापूर्वी, मराठ्यांच्या कारकीर्दींत, त्यांणीं जें कर्ज काढलें होतें, त्याबद्दल त्यांच्यावर हुकूमनामे होऊं लागले; म्हणून ते गाऱ्हाणीं घेऊन आले तेव्हां त्यासंबंधानें त्यानें असें लिहिलें आहे—

'कुळानें दस्त लिहून दिलेला असला म्हणजे झालें, त्याणें देणें आहे खरें असें मानावयाचें, यांतच त्याच्या दुःखाचें बीज आहे असें दिसतें. परंतु दस्त असला म्हणजे देणें खरें म्हणण्याबद्दल योग्य पुरावा झाला असें अगदीं मानतां येत नाहीं. कारण कुळानें वेळोवेळीं थोडाथोडा पैसा सावकाराकडून घेतला असला आणि थोडीबहुत फेड केली असली म्हणजे सहजच त्याच्या हिशेबाचा गोंधळ होऊन जातो; तो त्यांला समजणें अगदीं अशक्य असतें. त्या हिशेबांत त्याच्याकडेच पुष्कळ बाकी निघत असावयाची. तिच्या फेडीकारतां म्हणून त्याणें दरसाल आपल्या शेतांत पिकेल तो माल देत असावयाचें आणि पुढच्या वर्षी शेत पिकविण्याकरितां आणखी कर्ज घ्यावयाचें, अशी नेहेमींची वहिवाट

असल्यानें तो सावकाराच्या दाढेंत अगदीं पुरा सांपडलेला असतो. त्यामुळें त्याची इतराजी होईल ह्मणून तो अती भीत असतो आणि तो सांगेल त्या कागदावर सही करून देतो. याकरितां या संकटांतून त्याला मुक्त करण्याकरितां आमच्या नवीन घेतलेल्या मुलखांत असा नियम करावा कीं कोणी रयतानें मागील देण्याबद्दल ह्मणून दस्त लिहून दिला असेल तर तेवढ्यावरून देण्याची शाबिदी झाली असें समजूं नये; दस्त नाहींच असें समजून त्याच्या खात्याचा हिशेब पहिल्यापासून करावा आणि त्यावरून जेवढें निवळ देणें निघेल तेवढें सावकाराला देण्याविषयीं हुकूमनामा करावा. रयत सरकारचें देणें देतो त्याप्रमाणें कर्जाची फेड हप्त्यांनीं करविण्याची सोय असेल तर तसें ठरवावें, ह्मणजे त्याची मुक्तता होईल. कर्जाच्या फेडीकरितां त्याचीं शेतकामाचीं आउतें आणि जनावरें कांहीं झालें तरी विकावयाचीं नाहींत अशी तजवीज ठेवावी.'

बिशप हीबर ह्मणतो ह्याच सुमारास एल्फिन्स्टन साहेबानें आणखी दोन सुधारणा केल्या, त्या खऱ्या उपयोगी होत्या. त्या अशा कीं अदालतीचें ठाणें गुजराथेंत सुरतेस होतें तें तेथून काढून मुंबईस नेलें आणि कचेरीचें काम फारसी भाषेंत चालत असे तें बंद करून गुजराथींत सुरू केलें.

गुजराथेच्या सरहद्दीवर पुष्कळ संस्थानें होतीं त्यांची व्यवस्था लावण्याचें काम मोठें कठीण होतें. पेशवाई बुडून सारें राज्य कंपनी सरकारच्या ताब्यांत आलें, तेव्हां मराठी राज्याचे मालक ह्मणून पेशवे गुजराथेंत जो अधिकार चालवीत तोही इंग्रजांकडे आला. परंतु पेशव्यांचा अमूक मुलखावर अमूक अधिकार असें कांहीं स्पष्ट नव्हतें. कित्येक ठिकाणीं मोठमोठ्या प्रदेशावर पेशवे आणि गायकवाड या उभयतांचा हक्क असून त्यांच्या वांटण्या सारख्या नव्हत्या; एकाकडे मुलुख थोडा, दुसऱ्याकडे फार असे ही होतें. कित्येक ठिकाणीं अर्धवट असे स्वतंत्र असे सरदार दोघानां ही खंडण्या देत तेव्हां

हा सर्व गोंधळ मोडून टाकून एक शिस्त लावणें अवश्य होतें. बडोदें सरकार कमकुवत पडल्यानें त्या गोष्टीचा निकाल लावणें पुष्कळ सोपें गेलें. सन १८०२ मध्यें गायकवाडांनीं इंग्रजांची फौज आपल्या चाकरीस ठेऊन घेण्याचा करार केला तेव्हांपासून गादीवर मालक नांवाला असून सर्व अधिकार त्याच्या पालनकर्त्याकडे होता, आणि त्यांत ही खरें पाहिलें तर इंग्रज सरकारचा जो तेथें रेसिडेंट असे, तो सर्व सत्ताधीश असे. अशी स्थिति असल्यानें खुद्द गायकवाडी मुलखांत त्यांचा अम्मल दृढ होऊन नीट चालावा, त्याचे जे खंडणीदार होते त्यांतले कित्येक कंपनीला ही खंडणी देणारे होते, तेव्हां त्याणें कोणाकडून जुलमानें अधिक पैसा घेऊं नये, असें करण्याला ती संधी चांगली होती; ती साधून त्याणें त्याप्रमाणें केलें. काठेवाड द्वीपकल्पांत आणि महीकांठ्याच्या जंगली व डोंगराळ मुलखांत ही, स्थिरस्थावरता होऊन गायकवाडाची खंडणी अमूक असें नक्की ठरलें, आणि ती रकम इंग्रज सरकारा मार्फत त्यास पोहोंचवावी असा ही ठराव झाला. त्याप्रमाणें आजमितीपर्यंत वहिवाट चालली आहे.

**एल्फिन्स्टन** साहेबाला कच्छमध्यें ही काम बरेंच होतें. तेथील रावानें राज्यकारभारांत इतकी अव्यवस्था केली होती कीं ती असह्य झाली आणि त्याचे अन्याय ही फार होते त्यामुळें त्याचा अधिकार काढून त्याचे जागीं रिजेंटाची (पालन कर्त्यांची) नेमणूक झाली होती. त्या राज्यांत त्या-वेळीं दोन कारणांनीं त्रास होत होता. एक त्या मुलखांत नुकताच जो मोठा धरणीकंप झाला होता त्याणें शहरें, किल्ले वगैरेंना धक्के बसून कांहीं ठिकाणीं जमिनीचें स्वरूप कायमचें पालटून गेलें होतें. दुसरें राज्यांत निर्नायकी झाल्यानें सरहद्दीवर सिंधच्या लोकांबराबर वरचेवर तंटे होत आणि राज्यकारभाराची व्यवस्था चमत्कारिक असल्यानें दंगेधोपे मोडणें कठीण पडत असे. झोरझे रजपूत झणून रावाचे भाईबंद सुमारें दोनशें होते, ते सर्व आपण त्याच्या बरोबरीचे अधिकारी आहों असें झणत. त्यांच्याविषयीं **एल्फिन्स्टन** साहेब झणतो—

झोरश्यांबरोबर ज्यांत बहुतकरून खचीत तंटा उपस्थित होईल अशीं प्रकरणें तीन आहेत. एक, त्यांच्या आपसांतल्या खटल्यांचा निकाल लावणें; दुसरें, लहान मुली मारण्याच्या बंदीच्या हुकमाची अम्मलबजावणी करणें; आणि तिसरें त्यांनां आपआपल्या हद्दींत लुटारूंचा बंदोबस्त करावयाला लावणें; तर न्याय वेळच्यावेळीं आणि निःपक्षपातानें केला ह्मणजे सर्व भय टाळतां येईल. मुली मारण्याचे जे गुन्हे होतात ते उघडकीस आणण्यास ज्या तजविजी करावयाच्या, त्या फार जपून आणि नाजुक प्रकारें केल्या आणि शिक्षा सौम्य केल्या ह्मणजे तें ही भय टळेल तिसरें प्रकरण मोठें जड आहे, त्यांत इष्ट हेतु साध्य होण्यास कडकपणा दाखविण्यापेक्षां दक्षता दाखविली, त्यांणीं काय करावें असा सरकारचा हेतु आहे तें समजून सांगितलें, हयगय झाल्यास टपका दिला, नुकसान भरून द्यावयास लाविलें आणि लुटारूंस सामील असल्याबदल दंड केला, तर त्याणेंच काम फत्ते होण्याचा अधिक संभव आहे. झारेझे सरदारांशीं आह्मी जें वर्तन करूं त्यांत उद्धटपणा अगदीं दिसूं नये अशाविषयीं फार जपलें पाहिजे. हाल्लीं रेसिडेंटामार्फत जो पत्रव्यवहार चालतो तो वरवर पाहिला तरी असें दिसून येतें कीं राजकीय संबंधाच्या पुष्कळ गोष्टी तो त्यांच्याकडे निकालाकरितां सोंपवितो; परंतु असें करण्याची जरूर नाहीं.'

गुजराथेंत फिरत असतांनां एल्फिन्स्टन साहेबानें मालकम साहेबाला पत्र पाठविलें त्यांत तिकडच्या स्थितीचें वर्णन केलेलें आहे त्यांतून कांहीं मजकूर पुढें देतों—

सिंधप्रांत स्वस्थ आणि आमच्यावर खुष आहे. आमचे वकील आह्माला येवढेंच सांगतात कीं सरहद्दीवर लुटालूट होते—ती सिंधी लोक करीत असावेसें दिसतें—तिचा बंदोबस्त होण्याला कांहीं चांगले उपाय योजा, परंतु एशियांतलें राज्य ह्मटलें ह्मणजे त्याच्या हद्दीवर थोडीबहुत लुटालूट चालावयाचीच. ह्या ( कच्छ ) देशाविषयीं मी

नुकताच निबंध लिहिला आहे तो तुम्हांकडे पाठवीन. मी आतां वायव्य सरहद्द पहाण्याला जाणार आहें. त्या भागांत पांच सहा रजपूत व मुसलमान सरदार आहेत. ते अगदीं स्वतंत्र, कोणाचें कांहीं लागत नाहींत. परंतु आमच्याशीं त्यांचे तहनामे झाले आहेत त्यांत असा करार आहे कीं अरण्यांतल्या लुटारू लोकांचा बंदोबस्त करण्याला त्यांणीं आह्माला मदत करावी आणि त्यांचें सरक्षण करण्याला आह्माला जो खर्च लागेल त्याचा योग्य हिस्सा द्यावा. परंतु दुष्काळ, प्लेग, धरणीकंप आणि खोझा लोकांचा उपद्रव, यांणीं त्यांची दुर्दशा उडाली आहे; त्यामुळें तूर्त त्यांच्यानें फारसा पैसा देववत नाहीं. ते लोक गरीब आहेत. त्यांच्या शेजारचे मारवाड व मेवाडचे लोक ही आह्माला फारसा त्रास देत नाहींत. इकडे येण्यांत माझा उद्देश इतकाच कीं, वैगण मुलखांत लुटालूट करणारे लोक कोण आहेत तें नीट पहावें, त्यांचा चांगला बंदोबस्त होण्याला सक्तीशिवाय दुसरा मार्ग आहे कीं नाहीं, सिंधी लोकांच्या मदतीशिवाय चालेल कीं नाहीं, तें पहावें आणि आमच्याशीं तह झालेले जे लहान लहान सरदार वगैरे आहेत त्यांचा आमचा संबंध कोणत्या प्रकारचा असावा तें ही कायमचें ठरवून टाकावें.

गुजराथेंत आमच्या ताब्यांत आलेला जो मुलुख आहे त्याच्या वसुलाची व पोलीस बंदोबस्ताची व्यवस्था तेथें आमचा अम्मल सुरू होण्यापूर्वी जशी होती तशीच बहुतेक कायम आहे. ती चांगली आहे असें दिसतें कारण त्या प्रांतांतल्या लोकांचीं घरेंदारें, वस्त्रपात्र वगैरे जितकीं चांगलीं आहत तितकीं साऱ्या हिंदुस्थानांत दुसऱ्या कोठेंच आजपर्यंत मला दिसलीं नाहींत. जमिनीच्या वसुलाची बाकी राहिली आणि तीबद्दल कोर्टांत फिर्याद झाली असें ऐकावयाला देखील मिळत नाहीं; आणि दिवाणी कामांत ही बाहेरच्या पेक्षां येथें त्रास कमी दिसतो; कारण खटले शिल्लक थोडे आहेत आणि मला कांहीं कुरकुर ऐकूं येत नाहीं. ह्या प्रांताच्या उत्तर सरहद्दीवर ह्या टोंकापासून त्या टोंकापर्यंत

कोळी लोक आहेत; ते स्वतंत्र आणि पुंड आहेत. हे लोक थोडीशी खंडणी देतात आणि जे आमच्या मुलखांत आहेत ते अदालतीच्या ताब्यांत आहेत. तरी येथची स्वस्थता आणि त्यांची चांगली वर्तणूक एकंदरींत आश्चर्य करण्यासारखी आहे. ह्या खंडणीदारांपैकीं बरेच भडोजच्या पूर्वेस पालनपुरापासून राजपिंपळ्यापर्यंतच्या मुलखांत जे आहेत ते गायकवाडाच्या अमलाखालीं आहेत आणि जोंपर्यंत त्याची फौज तेथें होती तोंपर्यंत त्यांना तीपासून नेहमीं त्रास होत असे. आमच्या रेसिडेंटानें दोन तीन वर्षांपूर्वी ती तेथून काढविली. तेव्हांपासून ते स्वस्थ आहेत परंतु त्यांणीं खंडणी दिली नाहीं. बडोद्यास जो आलीकडे ठराव झाला त्यावरून त्यांची व्यवस्था पहाण्याचें काम आमच्याकडे आलें आहे. आतां जशी व्यवस्था आहे तशी रहावी आणि गायकवाडाची खंडणी कमी होऊं नये असें होण्याला काय केलें पाहिजे ते पहाण्याकरितां मी त्यांच्या मुलखांत जातों आहे. खुद्द गायकवाडाचें फार चांगलें चाललें आहे. त्याला मुकत्यारी देऊन मोकळा सोडला तेव्हां तो त्रास देईल असें प्रथम मला वाटलें होतें परंतु त्याणें अगदीं कांहीं दिला नाहीं. काठेवाडांत सुमार १०० सरदार आहेत, त्यांच्या जहागिरी लहान थोर, १०० रुपयांपासून १२००००० रुपयेपर्यंत वसुलाच्या आहेत. ते कंपनी सरकाराला किंवा गायकवाडाला जरी खंडणी देतात तरी आपआपल्या मुलखांत जो तो अगदीं मुक्तयार आणि स्वतंत्र आहे. मागें ते आपसांत नेहेमी लढत असत आणि दरसाल मराठ्यांची फौज त्यांच्या मुलखाची नासाडी करीत असे. परंतु सन १८०५ मध्यें कर्नेल वॉकर यानें त्यांची खंडणी कायम ठरविली आणि पुढें त्यांचे दंगे धोपे मोडले. आतां ते अगदीं शांत आहेत, परंतु अनेक कारणांनीं त्यांच्यांत आबादानी नाहीं; दुष्काळ, प्लेग, पटकी, मरुस्थानांतल्या (desert) व कच्छच्या लुटारूंच्या स्वाऱ्या, ह्यांनीं त्यांच्या वस्तींत तिसरा हिस्सा लोक कमी झाले आहेत आणि बहुतेक सरदार कर्जभरित होऊन अडचणींत आहेत. मुंबईच्या गेल्या गव्हरनराच्या कारकीर्दींत असें अगदीं बहुतेक ठरल्या-

सारखें आलें होतें कीं ह्या संस्थानिकांकडून खंडणी घेण्याला उपाय—खरोखर ती घेण्याला मार्ग—ह्मटला तर एकच दिसतो. तो असा कीं संस्थानिकांचे जमीन जुमले सरकारानें आपल्या ताब्यांत घ्यावे आणि ते आपल्या ताब्यांतल्या एकेका मनुष्याला मक्त्यानें देऊन टाकावे आणि त्या संस्थानिकांनां खर्चाकरितां कांहीं तरी एक रक्कम ठरवून तितके पैसे देऊन टाकीत जावें. असें केलें ह्मणजे दहाबारा वर्षांत त्यांची स्थिति सुधारेल; मग त्यांच्या जमिनी त्यांच्या हवालीं कराव्या. मला वाटतें त्यांच्या कामांत इतका हात घातला तर त्यांनां त्रास होईल आणि त्यांचे त्या मक्तेदाराबरावर तंटे होतील. इतक्या ह्या साऱ्या लहान लहान सरकारांची आंतली खरी व्यवस्था पहाण्याचें काम आमच्या हातून होणार नाहीं; ह्मणून ती आपली ज्याची त्यालाच पाहूं द्यावी हें योग्य. आमची जी खंडणी द्यावयाची तेवढ्या रकमेच्या उत्पन्नाची जमीन प्रत्येकाकडून एकाद्या सावकाराच्या ताब्यांत देववावी आणि आमच्या पैशाला तो जबाबदार असें ठरवावें ह्मणजे पुरे आहे, याजकरितां पहिल्या बेताबद्दल तुह्माला काय वाटतें तें कळवाल तर मजवर मोठी मेहेरबानी होईल.'

याप्रमाणें **एल्फिन्स्टन** साहेबानें काठेवाडची व्यवस्था लाविली. तो प्रांत मोठा सुपीक. तरी लोकांची स्थिति सुधारून ते सुखी होण्याला पुष्कळ काळ लागला. तेथच्या राजेरजवाड्यांची स्थिति आतां चांगलीच आहे. त्यांतील कित्येक उत्तम राज्यकर्ते निघाले आहेत, त्यांच्या खजिन्यांत पैसा पुष्कळ शिल्लक असतो आणि प्रजा आबाद आहे हें प्रसिद्ध आहे.

महीकांठ्यामध्यें काठेवाडापेक्षां पुष्कळ अधिक भानगडीच्या गोष्टी होत्या तेथें इंग्रज सरकारचा अम्मल सन १८१३ मध्यें बसला परंतु त्या प्रांतांत रहाणारे रानटी भिल्ल, कोळी आणि त्यांच्याचसारखे रानटी रजपूत लोक हे कांहीं अजून हुकूम जुमानीत नव्हते आणि खंडणी मुळींच देत नाहीं ह्मणत होते. तेथच्या सरदारांच्या प्रती त्यांच्या उत्पन्नावर लागत नव्हत्या; समरांगणावर कोणाला किती तिरकमठेवाले आणतां येतात हें पाहून त्याप्रमाणें

लागत होत्या. हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. असे सरदार एकंदर १२१ होते आणि त्यांपैकीं ६३ असामी कंपनीला खंडणी देणारे व २४ असामी गायकवाडाला देणारे होते. निदान एक असामी तरी शिंद्याचा खंडणीदार होता. कांहीं असामी आपसांत एकमेकांनां खंडणी देणारे घेणारे होते. शिवाय कांहीं असामींच्या जमिनी कंपनीच्या किंवा गायकवाडाच्या मुलखांत असून त्यांबद्दल त्यांच्याकडून त्यांनां गिरास ह्मणजे नक्त पैसा घेण्याचा हक्क होता, त्यामुळें अधिकच गोंधळ होत होता. खरें ह्मटलें तर या प्रकरणीं विचार करून निकाल लावण्याच्या ज्या गोष्टी होत्या त्या बहुतेक मध्य हिंदुस्थानांत मालकम साहेब ज्यांचा निकाल लावीत होता त्यां सारख्याच होत्या. **एल्फिन्स्टन** साहेबानें प्रथम पुष्कळशी फौज आणून बंदोबस्त करून हुकूम अमलांत यावा असें केलें. मग कोणी किती खंडणी द्यावी त्याचा निकाल लाऊन कायमचे ठराव केले, आणि त्याप्रमाणें वसूल व्हावा व त्यांच्याबरोबर जे करार झाले होते त्यांप्रमाणें त्यांणीं वागावें ह्मणून त्यांच्याकडून जामीन घेतले. त्या करारांत अशीं कलमें होतीं—कोणी आपसांत एकमेकांशीं लढाई करूंनये; परमुलखी शिपाई बाळगूं नयेत; जे तंटे असतील त्या साऱ्यांचा निकाल इंग्रज सरकारामार्फत लाऊन घ्यावा; लुटालूट करूंनये; जे कोणी करतील त्यांनां धरून सरकारच्या स्वाधीन करावें; व्यापारी लोक माल नेतील आणतील त्याचें रस्त्यानें संरक्षण करावें; त्यावर जकात घेण्याचा हक्क सोडून द्यावा व त्या नुकसानाबद्दल सरकार जो पैसा देईल तो घ्यावा आणि अफूचा कोणी चोरून व्यापार करील तर त्याचा बंदोबस्त करावा.

**एल्फिन्स्टन** साहेब मुंबईस गव्हरनर होऊन गेल्यावर मे महिन्यांत सर टॉमस मनरो साहेब कुटुंबासह तेथें आला होता. तो तेथचा पाहुणचार घेऊन तारीख २८ रोजीं निघून गेला तेव्हां त्याणें त्याच्याविषयीं आपल्या रोजनाम्यांत असें लिहिलें आहे—मला त्याच्याविषयीं पूर्वीपेक्षां फारच अधिक आनंद वाटतो. त्याच्या अंगांत चांगला शहाणपणा, थोरपणा, विनोदीपणा साधेपणा आणि परोपकारीपणा, हे मागें पाहिलेले सारे गुण असून आतां माझ्या नजरेस असें आलें कीं त्याणें ग्रंथावलोकन केलेलें आहे; तो काव्यरसा-

स्वादाचा लोलुप आहे; त्याचें मन हौशी आणि विलक्षण आहे. ह्या गुणां-मुळें वार्धक्य आणि स्वभावाचा कडकपणा यांपासून जे परिणाम व्हावयाचे ते न होतां उलट त्याच्या वर्तनाला फारच शोभा आली आहे. मला तो बापा-सारखा पूज्य वाटला आणि मी त्याच्याशीं भावासारखा मोकळ्या मनानें वागत होतों. तो खरोखर बुद्धिमान पुरुष असून युद्धांत आणि शांततेच्या काळांत सतत परिश्रम करीत असल्यानें मुरलेला आहे.'

**एल्फिन्स्टन** साहेब गव्हरनर झाल्यापासून थोड्याच दिवसांत दोन विषय त्याच्या मनांत घोळूं लागले. त्यांवर त्याणें पुष्कळ विचार केला आणि आपल्या कौन्सिलदारांस ही विचार करावयास लाविलें. त्यांतला एक विषय ह्या इलाख्यांतील लोकांस सुधारण्यास कोणत्या प्रकारचें शिक्षण दिलें पाहिजे व तें कसें द्यावें हा होता. ह्याविषयीं त्याणें पुष्कळ बेत मनांत आणले; परंतु एक निश्चय ठरून सर्वानुमतें तें पसंत होऊन त्याप्रमाणें विद्या-खातें सुरू होण्याला तीन चार वर्षें लागलीं. दुसरा विषय एवढ्या थोरल्या प्रदेशाचा राज्यकारभार नीट चालण्यास—आपण कसें वागावें हें प्रजेला कळण्यास व तिला कसें वागवावें हें सरकारच्या लहान थोर अधिकाऱ्यांस कळण्यास—कायदे असणें अवश्य होतें, सबब तें काम त्याणें तत्काळ हातांत घेतलें. परंतु तें कांहीं सहज, थोड्या दिवसांत, अल्पश्रमानें होणारें नव्हतेंच त्याला ही पुष्कळ वर्षें लागलीं. त्यावेळीं मुंबईस जे कायदे कानू चालू होते ते तपासून सुधारावे आणि पद्धतशीर करावे ह्मणून त्याणें एक स्वतंत्र कमिटी नेमिली.

हा वेळ (सन १८२०) पर्यंत हिंदुस्थानची न्यायपद्धति सुधारावी ह्मणून ज्यांनीं खटपट चालविली होती त्यांचा हेतु कायद्यांतले एतद्देशीयांचे जे सर्वमान्य ग्रंथ (standard works) असतील ते सर्वांस नीट समजत अशा तऱ्हेनें लोकांपुढें आणावे, एवढाच होता. न्यायाधिशांनीं असे हुकूम होते कीं दिवाणी काम लोकांच्या कायद्याप्रमाणें चालवावें आणि तें चालण्याची

व्यवस्था त्याच बेतानें केलेली होती. प्रत्यक कोर्टात हिंदुधर्मशास्त्रांत अथवा मुसलमानी कायद्यांत प्रवीण अशा मनुष्याची न्यायाधिशास मदत देण्याकरितां नेमणूक केलेली होती. परंतु ते जो त्या ग्रंथांचा अर्थ सांगत त्यावर तो फारच थोडा विश्वास ठेवी; आणि वॉरन हेस्टिंग्जच्या व त्याच्या नंतरच्या गव्हरनर जनरलांच्या कारकीर्दीत इंग्रज न्यायाधिशांनां हिंदूंचा कायदा संक्षेपतः तरी कळावा ह्मणून दोन ग्रंथ तयार होऊन त्यांचीं भाषांतरें पुरीं झालीं होतीं. दायविभागाविषयींच्या मूळ ग्रंथांचींच भाषांतरें झालीं होतीं आणि त्या विषयाला हळुहळु कांहीं स्वरूप येत गेलें. परंतु तें तितक्यावरच थांबलें. सर उइलियम जोन्स याच्या देखरेखीखालीं त्या विषयावर एक पुस्तक (digest) तयार होऊन कौलब्रूक साहेबानें त्याचें भाषांतर केलें. परंतु तें नीटसें उपयोगीं पडण्यासारखें नव्हतें.

**एल्फिन्स्टन** साहेबाचा उद्देश त्याहून फार वेगळा होता. कायद्यांचा पूर्ण संग्रह करावा असा जो बेंथाम याचा प्रचंड बेत त्याचा यांत समावेश होता. परंतु तें काम केवढें मोठें होतें तें तो नीट समजून होता, हिंदुस्थान सरकारानें त्या कामाला सन १८३३ मध्यें सुरवात केली, तेथून सुमार ३० वर्षांत तें अंशतः सुद्धां तडीस गेलें नाहीं; यावरून तें केवढें प्रचंड असावें याचें अनुमान सहज करतां येईल. तो पुण्यास कमिशनर असतांनाच त्याचें लक्ष तिकडे लागलें होतें आणि मुंबईस गव्हरनर होऊन बसतांच त्याणें तें उत्साहानें हातीं घेतलें. त्याणें प्रथमतः जी कमिटी नेमली तिला दोन कामें नेमून दिलीं आणि तीं अगदीं वेगळीं वेगळीं होतीं; एक सरकारचे जे कायदे कानू होते ते तपासून सुधारावे हें, आणि दुसरें लोकांच्या ज्या चालू रीतिभाति व वहिवाटी असतील त्यांची पद्धतवार चौकशी करावी हें.

त्यावेळापर्यंत तिन्हीं इलाख्यांच्या सरकारांनीं जे कायदे कानू केले होते ते दिवाणी फौजदारी कोर्टांची रचना कशी असावी व त्यांणीं काम कसें चालवावें एवढ्यापुरतेच होते. त्यांणीं फौजदारी कायदा केला होता, परंतु

तो अपुरता होता; जमिनीच्या साऱ्याचे ठराव करण्याकरितां जे कामदार नेमले होते त्यांणीं काम कोणत्या प्रकारें करावें याबद्दल नियम केले होते; कर कसे घ्यावे ते नियम आणि आणखी असेच किरकोळ पुष्कळ कामांतले नियम केले होते. धनी व चाकर, जमिनीचा मालक व कूळ, यांचे संबंध कसे असावे इत्यादि ज्या प्रकरणांवर कायदे कानू केल्याशिवाय चालणारच नव्हतें व जे प्रश्न सरकारच्या नजरेपुढें वरचेवर येत होते, त्यांवर त्यांणीं कायदे केले होते, परंतु एकंदरींत **एल्फिन्स्टन** साहेबासारखे विचार व श्रम कोणीच केले नाहींत. त्याणें आपला मित्र स्ट्राची साहेब याला जीं पत्रें लिहिलीं त्यांत या विषयावर पुष्कळ लिहिलें आहे, त्यावरून त्याच्या मनांत तो विषय किती घोळत होता आणि दृष्टि किती दूर पोहोंचत होती तें चांगलें दिसतें. त्यापत्रांतून कांहीं उतारे देतों.

जेरेमी बेंथाम याच्या ग्रंथांचें त्याणें अध्ययन सुरू केलें होतें हें मागें सांगितलेंच आहे. त्याच्याविषयीं स्ट्राची साहेबानें लिहिल्यावरून तो ह्मणतो—

"जेरेमी बेंथाम साहेबाची तुह्मी जी हकीगत लिहिलीत ती वाचून मला मोठा आनंद झाला. त्याची हकीगत समजावी अशी मला फार इच्छा होती, ती अगदीं परिपूर्ण झाली. तो खरोखर पहिल्या प्रतीचा बुद्धिमान् मनुष्य आहे परंतु तसाच पहिल्याप्रतीचा विक्षिप्त ही आहे. हा विक्षिप्तपणा त्याच्या मतांत आणि संवईत ही दिसतो. तो लोकांमध्यें अगदीं थोडा मिसळतो त्यामुळेंच बहुधा हा उत्पन्न झाला असावा. त्याणें मला पुस्तकें नजर पाठविलीं त्यावद्दल मला अतिशय आनंद झाला. त्याणें मला जो हा मान दिला तो मी जेवढा मोठा समजतों तेवढा दुसऱ्या कोणत्याच ग्रंथकारानें दिलेला समजत नाहीं.'

'मी जेव्हां मागें तुह्माला लांब पत्र लिहिलें तेव्हां बंगालचे सभासद (counsellors) पुनः त्यास आणतां येतील असें मला वाटत होतें आणि त्यांनां हिंदुधर्मशास्त्राचा (ब्राह्मणामध्यें जे चालतें त्याच्या) व महाराष्ट्र

देशांतील रीत रिवाजाच्या अनुरोधानें, त्या आमच्या रीतीप्रमाणें कांहीं बाबतींत सुधारून नवा कायदा करावयाला सांगावें असा माझा विचार होता. परंतु ते कोणी कांहीं आले नाहींत आणि मी जों जों विचार करूं लागलों तों तों तें मला अधिकाधिक भयंकर काम वाटूं लागलें. ज्याची आपल्याला नीट माहिती लागत नाहीं अशा राष्ट्राला परदेशच्या कांहीं लोकांनीं कायदे करून द्यावयाचे तर ते करतांना त्यांणीं बरोबर सावध राहिलें पाहिजे आणि चालू कायद्यांत जितका घोटाळा अधिक तितकें त्यांणीं अधिक जपलें पाहिजे. चालू प्रकरणांत हिंदुधर्मशास्त्र आधाराला घेतां येईल. परंतु तें कसें आहे तें पहाण्याला बहुतेक सारखेच मान्य असे पुष्कळ ग्रंथ पाहिले पाहिजेत. आह्मी मनूचे कायदे चांगले आहेत असें ह्मणतों परंतु प्राचीन काळच्या रोमच्या बारा कायद्यांनां ( Twelve tables. ) चांगले ह्मणण्यापैकींच तें आहे. बरें, हिंदुधर्मशास्त्र कसें आहे तें शोधून काढलें ह्मणजे झालें असें तरी आहे? तेवढ्यानें आपलें अर्धें देखील काम होत नाहीं. कारण बहुतेक कामें देशरिवाजाप्रमाणें चालत असतात आणि तो देशरिवाज कसा आहे हें ठरविणें किती कठीण आहे हें कांहीं तुह्माला सांगावयाला नको. अमुक एका प्रकरणांत देशरिवाज कसा आहे हें ठरविण्याकरितां कितीएक दिवसपर्यंत दिवाणी खटल्यांतला पुरावा चाळीत बसावें लागत असल्याचें आपल्याला स्मरत असेल ह्यांत कांहीं शंका नाहीं, आणि इतकें होऊन ही आपण करतों हा निकाल बरोबर आहे कीं नाहीं ह्याविषयीं आपलें मन साशंकच असे. आतां कोणी असें ह्मणेल कीं असे लोकांनां नीट न कळणारे कायदे व देशरिवाज यांवरून न्याय करण्याची ही रीत बंद केली आणि लोकांनां नीट कळत असे चांगले कायदे सुरू केले तर कांहीं वाईट नाहीं, चांगलेच होईल. परंतु असें ह्मणणें ही बराबर नाहीं. कारण लोकांनां आपलें शास्त्र कसें आहे हें जरी पक्कें माहीत नसल तरी त्याची अर्धवट कां होईना परंतु कांहीं तरी कल्पना ह्मणून असते आणि ते त्या धोरणानेंच वागत असतात; विलायतेंत असेंच आहे आपल्या प्राणाचें

आणि धनाचें संरक्षण ज्या कायद्यांनीं होत असतें ते आपल्याला माहीत आहेत असें कोणी ह्मणत नाहीं, तरी कायद्याच्या सपाट्यांत लोक सांपडत नाहींत; कारण कायदा असा असा असावा असें परंपरेनें ऐकून ऐकून त्यांचा तर्क झालेला असतो; तो केव्हां आणि कसा झालेला असतो तो कोणाला माहीत नसतो. लिहून ठेवलेले कायदे पालटतां येतील, परंतु लोकांचे जे असे मनाचे ग्रह झालेले असतात ते पालटणें कठीण आहे. ह्मणून आपण जरी नवा कायदा केला तरी पुष्कळ काळपर्यंत लोक आपल्या त्या पहिल्या समजुतीप्रमाणेंच वागत रहाणार, कायद्यानें तें गैर ठरविलें असलें ह्मणून कांहीं हरकत नाहीं. आपल्या नव्या तऱ्हेप्रमाणें त्यांनां वागावयाला लावावयाचें ह्मटलें तर फार घोटाळा आणि गैरसोय होईल. इतकें ही होऊन नवी तऱ्हा ही चुकीची ठरेल. लॉर्ड कॉर्नवॉलिस साहेबानें जी तऱ्हा सुरू केली तिचे पुष्कळ भाग चांगला विचार करून मगच सुरू केलेले होते; त्यांत ही जमीनदारांच्या हक्कांचा जितका विचार झाला होता तितका दुसऱ्या कशाचाच झाला नव्हता, तरी चूक झालीच आणि त्या प्रांतांतल्या ज्या लोकांचा जमिनीशीं संबंध होता त्यांची स्थिति अगदीं पालटून गेली, आणि मग त्यांचे एकमेकांशीं संबंध कसे असावे हें ठरविणें अदालतीकडे गेलें. त्यामुळें अंत नाहीं इतक्या फिर्यादी झाल्या. त्यांचा न्याय करून निकाल करण्याचें कोर्टाच्या शक्ती बाहेर होतें त्याचा परिणाम असा झाला कीं जे विचारे गरीब होते ते बलिष्ठांच्या तावडीस सांपडले आणि रयतांचा अगदीं चुराडा उडाला. ते अगदीं पराधीन होऊन केवळ गुलाम बनले. या चुकीचा दुसरा एक साहजिक असा परिणाम घडला कीं गांवकामगारांच्या ज्या मंडळ्या होत्या त्या मोडून गेल्या, पोलीस व्यवस्था नाहींशी झाली आणि भयंकर दरवडे पडूं लागले. ह्या आणि दुसऱ्या अशाच ज्या कांहीं गोष्टी घडल्या आहेत त्या पाहून मी सावध झालों आहें. तो इतका कीं या लगत जो कागद आहे तो पढून मी अगदीं किती बेतानें जावें ह्मणतों तें पाहून तुह्मी मला कदाचित भित्रा ह्मणाल. मी कमिटी नेमिली

आहे ती काम चांगले करील ह्मणण्याला मोठा आधार तींत अर्स्किन साहेब आहेत हा होय. ह्या गृहस्थानें नोकरी सोडली आहे त्याची बुद्धि विशाळ आणि माहिती फार मोठी अशी प्रसिद्धि आहे. ह्या सुधारणा जरी थोड्या आहेत तरी त्या तडीस जाण्याला मला अडचणी दिसतात.'

**एल्फिन्स्टन** साहेबानें स्ट्राची साहेबाला तारीख २१ एप्रिल १८२१ इसवी रोजीं दुसरें पत्र लिहिलें त्यांत तो ह्मणतो—

'मला पंचाइती आढळल्या ह्मणून मी त्या कायम राखल्या. त्यांची सुधारणा करण्याला आपल्या हातून झालें तें मी केलें आणि अखेर त्या नीट चालत नाहींत असें दिसलें तर पुढें काय करावें तो उपाय मी सांगितला आहे. कांहीं झालें तरी पंचाईत मोडूंनये असें मला अजून वाटतें ज्या लोकांच्या हातांत न्याय करण्याचें मुळींच ठेविलेलें नाहीं ते न्यायाच्या मूल-तत्वांप्रमाणें चालण्याचा संभव कमी असतो परंतु तीं कायम राखण्याला आणि न्याय होण्याला पंचाइतीची तऱ्हा उत्कृष्ट आहे. तसेंच मला आणखी असें वाटतें कीं सर्वांनां न्याय मिळण्याला ही एकच तऱ्हा ठेऊन बहुधा कधीं काम भागणार नाहीं. याजकरितां पुष्कळ नेटिव्ह न्यायाधीश नेमावे आणि त्यांच्यावर देखरेख ठेवण्यास युरोपियन असावे. कायदे कानू सुरू करावयाचे ते हळुहळु करावे. मराठ्यांनां कोणती गोष्ट चांगली उपयोगीं पडेल हें कोणाला सांगतां येईल कीं काय याची मला शंका आहे. मला कांहीं सांगतां येणार नाहीं अशी माझी खात्री होती आणि कांहीं काळ जाऊं देऊन काय कळतें तें पहावें अशी माझी इच्छा होती. ज्या लोकांचें मला पुष्कळ दिवस निरीक्षण करावयास सांपडेल त्यां यामध्यें एक कायदा सुरू केला तर त्याचा परिणाम काय होईल याचें म[illegible] अनुमान करतां येईल. तुह्माला तें अधिक खात्रीनें सांग[illegible]ां येईल. [illegible]था साहेबाला तें निश्चय-पूर्वक सांगतां यईल परंतु ज्या लोकांची [illegible]पल्याला बहु[illegible]क माहिती

नाहीं अशांमध्यें एकदम सारे कायदे सुरू केले तर परिणाम काय होईल हें सांगावयाचें झटलें ह्मणजे त्याकामीं तिघांची ही मति बहुधा सारखीच चालेल.'

**एल्फिन्स्टन** साहेब तारीख १० मार्च सन १८२२ इसवीच्या तिसऱ्या पत्रांत ह्मणतो—

हिंदुस्थानच्या राज्यकारभाराविषयीं तुमचीं आमचीं मतें बहुतेक सारखींच आहेत. तुमचा आणि सर हेनरी साहेबांच्या कित्ता मी बहुतेक अंशीं उचललेला आहे. माहिती नसलेल्या ( the undiscovered ) परगण्यांत ( ह्मणजे जेथची स्थिति खरी कशी आहे हें नीट पाहिलेलें नाहीं अशांत ) सदर अदालत तुह्माला कायदे लागू करण्याला सांगत होती तें आणि अदालतीची स्वारी आली ह्मणून लार्ड लेकच्या स्वारीपेक्षां लोक तिला भिऊन कसे घाबरून गेले होते तें तुह्मांला स्मरतच असेल. आह्मी आपली पद्धत घाईघाईनें सुरू केली तर तिचे परिणाम कसे अपायकारक होतात तें दाखविण्याला एवढी एक गोष्ट पुरे आहे. बंगालच्या मुलकी कामगारांनीं आपलीं मतें प्रसिद्ध केलीं तेव्हां त्यांवरून आमच्या पद्धतींतच दोष आहेत असें मला वाटलें. ही पद्धत चांगली आहे असें ह्मणणारे पुष्कळ आहेत खरे, परंतु खरे बुद्धिमान् लोक त्यांच्या उलट पक्षाकडे आहेत असें माझ्या नजरेस आलें. लार्ड वेलेस्ली साहेबाच्या प्रश्नाला हेनरी स्ट्राची साहेबानें दिलेलें उत्तर आणि मुख्यत्वें त्याचीं कांहीं पत्रें पाहिलीं तेव्हां तर मला असें वाटलें कीं आह्मी नवी तऱ्हा सुरू केली तर ती चांगली चालण्याची आशाच धरावयाला नको. शिवाय डेव्हिस साहेबाप्रमाणें माझ्या मनाचा असा ग्रह झालेला होता कीं आह्मी बंगालच्या लोकांच्या पुष्कळ उत्तम उत्तम संस्था मोडून टाकल्या आणि त्यांच्याजागीं खुद्द आमच्या अगदीं अयोग्य व निरुपयोगी असलेल्या संस्था सुरू केल्या. असा माझ्या मनाचा आधींच समज झालेला असल्यामुळें आमच्या बंगाली व हिंदुस्थानी प्रजेपेक्षां मराठे लोक अगदीं निराळे आहेत असें मला दिसलें. बऱ्याच अडचणी असून ही त्यांचें बरें चाललें आहे; त्यांत कांहीं कायदा व्हावा अशी त्यांची मुळीं इच्छा नाहीं आणि मला एवढें माहीत आहे

कीं त्यांच्या ज्या संस्था आहेत त्यांतल्या मी जर कांहीं मोडल्या तर त्यांची पुनः संस्थापना माझ्या हातून कधीं व्हावयाची नाहीं. दुसऱ्या पक्षीं पाहिलें तर मला एक कायदा करून अदालत पाहिजे तेव्हां सुरू करतां येईल. ह्मणून त्यांची पद्धत जितकी जशीच्या तशी ठेवतां आली तितकी मी ठेविली आणि ती आमच्या हातून कशी चालते व तींत कोठें सुधारणा केली पाहिजे हें पहाण्याचा निश्चय केला. ती कशी चालते आहे हें पहाण्याकरितां मी पुढच्या पावसाळ्यांत दक्षिणेंत जाणार आहें, आणि आमचा राज्यकारभार चालविण्याचा जो बेत आहे त्याच्या जवळ जवळ बहुधा तिला आणून सोडीन. अदालती गुजराथेंत चांगल्या चालत आहेत; यांणीं तेथें सारा गोंधळ उडवून दिला नाहीं, कारण आमचे मुलकी कायदे आहेत, जिल्हे लहान आहेत आणि नेटिव्ह कमिशनर पुष्कळ आहेत. आमची कायदेकमिटी बंगालच्या कायदेकानूची दहशत घेईल ही भीति नको. माझें मिनिट पहाल तर तुह्माला असे दिसून येईल कीं बंगालचे कायदेकानू व्यर्थ झाले असें धरून मी अगदीं चालत नाहीं. मोठालीं व्यंगें पुष्कळ काळपर्यंत नजरेस नयेतां तशीच राहून जातील असें मी ह्मणतों. याला प्रमाण पाहिजे तर दाखवितों. लार्ड वेलेस्लीच्या वेळीं लार्ड कार्नवालिस याच्या पद्धतीची तारीफ तींतल्या कांहीं भागामुळें होत होती. आतां आह्मी असें कबूल करतों कीं तींत अतिशय दोष आहेत. तसें नाहीं असें तुह्मी खचित ह्मणणार नाहीं. तींत मुख्य दोष कोणता ह्मणाल तर रयत लोक अगदीं पराधीन होऊन सर्वस्वीं जमीनदारांच्या मुठींत सांपडले. मी अगदीं प्रजापक्षीय, ( democrate ) सारी रयतवारीच पद्धत असावी असें ह्मणणारा कांहीं नाहीं. मला वाटतें कीं देशांतल्या श्रेष्ठ लोकांचा वर्ग कायम राखला पाहिजे. मग त्यांत गांवांतले मुख्य लोक असोत कीं जमीनदाऱ्यांचे मुख्य लोक असोत. परंतु मला असें ही वाटतें कीं त्या प्रमुख लोकांचे हक्क काय आणि त्यांच्या ताब्यांतल्या रयत लोकांचे हक्क काय, हें अगदीं स्पष्ट ठरलें पाहिजे, आणि मुख्यत्वेंकरून रयतांच्या हक्कांचें संरक्षण पूर्णपणें केलें पाहिजे. ह्या दोन गोष्टी लार्ड कार्नवालीस साहेबाच्या हातून अगदीं झाल्या नाहींत. याला

एवढेंच सांगतों कीं लार्ड वेलेस्ली साहेबाला हेनरी स्ट्राचीनें जें उत्तर दिलें आहे तें पहावें. दुसरें सर ई. कोलब्रूक साहेबानें असें खरोखर ह्मटलें आहे कीं रयत लोकांनां कांहीं हक्क नाहींत असें साफ ह्मणून सोडलें तर त्यांच्या स्थितींत ती सुधारणा होईल. मी नव्या कायद्याचे कांहीं मासले तुह्माला पहाण्यास पाठवितों. हे अगदीं अत्यंत नवीनांपैकीं आहेत. दिवाणी न्यायाचे बहुतेक कायदे अगदीं बंगालच्या नमुन्या प्रमाणें आहेत. मी जे नमुने पाठविणार आहें ते फक्त कमिटीनें केलेले मसुदे आहेत. सारे न्यायाधीश बसून त्यांवर वादविवाद अजून व्हावयाचा आहे, आणि मग ते सरकारांतून कायम व्हावयाचे आहेत. दोन उत्तम तर्जुमा करणारे आपल्या लेखण्या तासून अगदीं तयार असतात, तें एक पत्र मंजूर झालें रे झालें कीं लगेच त्याचें भाषांतर करूं लागतात. माझ्या मनांत आणखी एक बेत आहे तो सिद्धीस जावा असा माझा फार हेतु आहे. तो कोणाला देखील पसंत नाहीं. तो ज्याला ज्याला मी सांगितला त्याणें त्याणें नाक मुरडलें आहे. परंतु मला तो स्वल्पसाच वाटतो आहे. तो अगदीं यःकश्चित आहे हाच त्यांत मुख्य दोष. असा हा बेत कोणता ह्मणाल तर मुंबई ताब्यांतल्या मुलखांत सर्वत्र मान्य आणि व्यवहारांत चालू असा एकादा हिंदुधर्मशास्त्राचा ग्रंथ किंवा त्याचा एकादा भाग आहेसें पहावयाचें आणि असेल तर छापून टाकावयाचा आणि शेवटीं तोच कायदा असें प्रसिद्ध करावयाचें. दुसरे धर्मशास्त्राचे असेच आणखी कांहीं भाग अगदीं सर्वमान्य आहेत कीं काय तें पहावयाचें, मग ते छापावयाचें आणि कोणत्या देशाला किंवा जातीला ते लागू नाहींत तें सांगावयाचें, आणि शेवटीं असें करावयाचें कीं प्रत्येक मोठ्याशा मुलखाच्या भागांत किंवा जातींत कोणते विशेष कायदे चालतात तें पहावयाचें—हे आपलें हळुहळु चोहोंकडे प्रश्न पाठवून त्यांचीं उत्तरें आणून तीं किंवा कोर्टामध्यें जे खटल्यांचे निकाल होतात त्यांपैकीं कांहीं निवडून घेऊन, ते लिहून ठेऊन, करावयाचें. असें झालें ह्मणजे कायद्यांचें एकीकरण होईल—हें अगदीं अपुरतें होईल, परंतु लोकांनां आणि न्यायाधिशांनां त्यावरून कायदा कसा आहे हें कळेल. आणि कायदे करणारांनां तुलना करतां येऊन त्यांत सुधारणा करतां येईल. असें

होण्याला सर्वांचीच जी एक मोठी हरकत आहे ती अशी कीं ते ह्मणतात हिंदूमध्यें सर्वसाधारण (सर्वांना लागू) असा मुळीं कायदाच नाहीं. आह्मीं ज्याला हिंदुकायदा ह्मणतों तो फक्त ब्राह्मणांनां लागू आहे. प्रत्येक जातीचे कायदे आणि रीतरिवाज निरनिराळे आहेत आणि ते देखील देश-भेदानें निराळे आहेत. हें ह्मणणें पुष्कळ अंशीं खरें आहे, परंतु यावरूनच सर्वांनां लागू असा कायदा असणें किती जरूर आहे तें दिसून येतें आणि कोणत्याही जातीचे जे विशेष कायदे किंवा रीतरिवाज असतील ते न बिघडतां सर्व जातींनां लागू पडेल असा कायदा करण्याला किती दीर्घ काळ लागेल तें ही दिसतें. ह्मणून आपण ह्या कामाला आरंभ करावा असें मला वाटतें. तें एकदा चालू झालें ह्मणजे केव्हां कां पुरें होईना ती काळजी नको. दुसरी एक हरकत अशी आहे कीं त्या शास्त्रांत भलत्या भलत्या गोष्टी आहेत, त्यांचें आह्मी मुळीं नांवच घेतलें नाहीं तर त्या लोक आपोआप विसरतील; परंतु त्यांचें तें शास्त्र आह्मी हातीं धरलें ह्मणजे त्यांचें आयुष्य वाढलें. यावर मी असें ह्मणतों कीं जे विषय अशा (ब्राह्मणांचे हक्क वगैरे सारख्या) भलत्या भलत्या गोष्टींनींच भरलेले असतील ते आह्मी टाकून देऊं ह्मणजे झालें. त्यांशिवाय जे इतर विषय असतील ते स्पष्ट कळले आणि त्यांचा इतर भागांशीं संबंध कसा आहे तो स्पष्ट कळला ह्मणजे यथाकाळीं ते नीट करण्याला ही सोपें जाईल. हें काम कठीण आहे आणि तें करण्याला चांगले संस्कृतभाषाभिज्ञ पाहिजेत ते नाहींत, ह्या अडचणी मोठ्या आहेत. तरी मी येथें असेपर्यंत जरी नुसता आरंभ झाला तरी मी आपलें काम चांगलें बजावलें असें समजेन. फौजदारी कायद्याची गोष्ट अगदींच निराळी आहे. आह्मी येथें बंगाल्यांतल्या प्रमाणें मुसलमानी कायदा लागू करतों आहों असें ह्मणत नाहीं. मुसलमानांनां मुसलमानी आणि हिंदूंनां हिंदु कायदा लागू करतों असें ह्मणतों. येथच्या प्रजेंत हिंदूंचीच संख्या फार मोठी आहे. व्यवहारांत पाहिलें तर आह्मी बंगाल्यांतल्या प्रमाणेंच मुसल-मानी कायदा रद्द असल्यासारखाच समजत आहों. हिंदुकायद्याप्रमाणें पाहिलें तर नगरांतून हद्दपार करून लावणें किंवा कवडीपासून दंड घेणें किंवा

प्राण घेणें यांपैकीं पाहिजे ती शिक्षा करण्याचा अधिकार सर्व प्रसंगीं राजाकडे असतो. याचा परिणाम असा आहे कीं दर खटल्यांत न्यायाधिशाला नवा कायदा करावा लागतो. याला उपाय थोडक्यांत आहे. प्रत्येक प्रकारच्या गुन्ह्याला बहुधा शिक्षा कोणती देत असत तें पाहून ठरवितां येईल, आणि जेथें संशय येईल तेथें तारतम्यानें एकेका खटल्यांत जी शिक्षा नेहेमीं देतों तीच त्या प्रकारच्या साऱ्या गुन्ह्यांनां द्यावी असें ठरवितां येईल. मग आतां चाललें आहे असेंच बहुतेक सारें चालेल; कोणत्या खटल्यांत कोणती शिक्षा द्यावी हें न्यायाधिशाला कळेल आणि आपल्याला कोणती शिक्षा होईल हें आरोपीला कळेल एवढें अधिक होईल. कायदे कमिटी आपलें काम आटोपण्यापूर्वी हें ही करील. हें करणें ह्मणजे खरें पाहिलें तर कायदा खरा कसा आहे हें सांगावयाचें इतकेंच.'

असो. **एल्फिन्स्टन** साहेबानें कायद्यांचे मसुदे तयार करण्याकरितां जी कमिटी नेमिली होती तिचा अध्यक्ष बेबिंग्टन आणि सभासद अर्स्किन हे दोघे बेंथाम साहेबाच्या मताचे होते. दुसरा सभासद रावर्टसन साहेब होता. हे तिघेही चांगलें नांवाजलेले हुशार होते. त्यांचें काम पुरें झाल्यावर कौन्सिलांत वादविवाद होऊन सर्व कायदे मंजूर होऊन चालू होत तों सन १८२७ ह्मणजे **एल्फिन्स्टन** साहेब मुंबई सोडून गेला तें वर्ष आलें. हे कायदे जरूर तेवढ्या सर्व विषयांवर असून अगदीं साधे व प्रजेच्या तेव्हांच्या स्थितीला अगदीं योग्य होते. ते सत्तावीसचे कायदे ह्या नांवानें अद्याप प्रसिद्ध आहेत आणि त्यांची संख्या ही २७ आहे. ही कांहीं लहान नव्हे; परंतु **एल्फिन्स्टन** साहेबाला उगाच कायदे करीत सुटण्याचें खूळ लागलें होतें आणि त्याच्या भरांत त्याणें इतके केले असें नाहीं, अवश्य तेवढेंच केले. त्यांवरून लोक त्याची कीर्ति गाऊं लागले. ते ह्मणजे त्याचें एक स्वतःसिद्ध स्मारकच झालें.

**एल्फिन्स्टन** साहेबानें प्रजेच्या संरक्षणाकरितां कायदे करण्याचें काम हातीं घेतलें त्याचप्रमाणें तीस ज्ञान प्राप्त व्हावें ह्मणून विद्याध्ययन कर-

ण्याची सोय करून देण्यासाठीं ही पुष्कळ परिश्रम केले. प्रजेस सुशिक्षित करणें हें सरकारचें कर्तव्य आहे किंवा नाहीं, आपण जें शिक्षण द्यावयाचें तें कोणत्या प्रकारचें असावें वगैरे अनेक गोष्टींचा त्याला विचार करावयाचा होता तो करून त्या विषयावर त्याणें जे लेख लिहिले ते फार नांवाजण्यासारखें आहेत. त्यांत ही सन १८२४ च्या मार्च महिन्यांतला खलिता त्याच्या दक्षिणदेशावरील रिपोर्टासारखा फार महत्वाचा आहे. त्यावरून तो मनाचा किती थोर, उदार आणि दूरदृष्टि मुत्सद्दी होता हें चांगलें दिसून येतें. तो गव्हरनर होण्यापूर्वी विद्याप्रसार करण्याकडे मुंबईसरकारचें तादृश लक्ष नव्हतेंच ह्मटलें तरी चालेल. बंगाल इलाखा इंग्रजांचे ताब्यांत पुष्कळ आधीं आलेला होता, परंतु तेथें ही विद्यादानाकडे सरकारचें लक्ष नव्हतें. लार्ड मिंटोच्या कारकीर्दीत कलकत्यास हिंदुविद्यार्थ्यांकरितां एक व मुसलमान विद्यार्थ्यांकरितां एक, अशा दोन पाठशाळा स्थापन झालेल्या होत्या; परंतु त्यांचा उद्देश निवळ विद्यादानाचा नव्हता. न्याय करण्याच्या कामीं हिंदु व मुसलमानी धर्मशास्त्र काय आहे तें कळण्यास पंडित व मौलवी हवे लागत ते तयार करण्याकरितां त्यांची स्थापना केलेली होती. इंग्रजी भाषेचें शिक्षण देण्याकरितां कलकत्यास शाळा स्थापन झाली ती यापुढें पुष्कळ दिवसांनीं, तींत प्रवेश थोडयांचाच होत असे, पाहिजे त्यास जातां येत नसे.

पेशवाई लयास गेल्यावर **एल्फिन्स्टन** साहेब दक्षिणेचा कमिशनर झाला तेव्हां त्याणें पुण्यास पाठशाळा स्थापन केली, नाशिकास एक व मुंबईस एक स्थापावी असें ह्मटलें, दक्षिणा वांटली आणि ब्राह्मणांचे आशीर्वाद घेतले हें खरें, परंतु सार्वजनिक शिक्षण द्यावें किंवा नाहीं याविषयीं त्याचें मत कायम ठरलें नव्हतें. लोकशिक्षणाकरितां सरकारानें उपयुक्त पुस्तकें छापावीं, त्याच्यापेक्षां कांहीं जास्त करणें बरें नाहीं असें त्याला वाटत होतें. त्याणें असें लिहिलें आहे कीं लोकांची नीति सुधारण्याला त्यांची विद्या सुधारण्याशिवाय दुसरें कांहीं आह्माला करतां येईलसें मला दिसत नाहीं. आह्मी फुकट शिकण्यासाठीं शाळा घातल्या ह्मणजे ही स्थिति पालटेल अशी मला

खात्री वाटत नाहीं. यांत आमचा कांहीं तरी गुप्त हेतु (कपटभाव) असावा असा लोकांच्या मनांत संशय येईल." पुढें त्या विषयावर त्याणें जसजसा विचार केला तसतसें त्याचें मत पालटत गेलें असावें असें वाटतें. तो विद्याव्यसनी असल्यानें तिचें महत्व त्याच्या ध्यानांत सहजच आलें. अखेर प्रजेस सुशिक्षित करणें हा सरकारचा धर्म आहे असें त्याचें मत ठाम झालें आणि त्याणें तें आपल्या लेखांनीं निर्विवाद सिद्ध करून दाखविलें. त्याच्या मनांत शाळाखातें चांगलें सुरू करावयाचें होतें, परंतु त्याचा हेतु त्याच्या हातानें सिद्धीस गेला नाहीं. मुंबईस त्याचे जे कौन्सिलर होते ते त्याकामीं त्याला प्रतिकूळ झाले आणि त्याचप्रमाणें विलायतेंतले कोर्ट आफ डायरेक्टर्स हीं प्रतिकूळ झालें. कलकत्यास वेलेस्ली साहेबानें तरुण सनदी नोकरांस शिक्षण देण्याकरितां पाठशाळा (College) घातली होती त्या नमुन्याची, परंतु तिच्यापेक्षां पुष्कळ लहान, एक मुंबईस घालावी आणि तींत एतद्देशीय कामगारांस शिक्षण देण्याची मुद्दाम सोय करावी असा त्याचा फार हेतु होता. परंतु तो त्याच्या कौन्सिलर मंडळीस पसंत पडला नाहीं. ते तेवढ्याला प्रतिकूळ होते परंतु विलायत सरकारानें कोणतेंच मान्य केलें नाहीं. याप्रमाणें त्याचा कोणताच बेत सिद्धीस गेला नाहीं. त्यानें पुण्यास जी पाठशाळा स्थापन केली होती ती कायम राहणें देखील कठीण दिसूं लागलें. तिचा खर्च कंपनी सरकारच्या अंगावर कांहीं पडत नाहीं, तो निराळा तोडून दिलेल्या पैशांतून चालला आहे असें त्याणें मोठ्या मेहेनतीनें सिद्ध करून दाखविलें तेव्हां ती सरासरी जीव धरून राहिली. त्याला संस्कृताचा गंध ही नव्हता परंतु ग्रीक व ल्याटिन भाषांचा परिचय चांगला होता त्यावरून अनुमानानें आमची गीर्वाण वाणी तशीच प्रौढ व उत्तम असावी असें वाटून त्याणें तिचा कैवार घेतला आणि संस्कृत काव्याध्यापकाची नेमणूक कायम असलीच पाहिजे असें ह्मणून ती जागा कायम राखली. त्याकामीं त्याणें असें लिहिलें—

कोणत्याही देशाच्या लोकांनां आपल्यापेक्षां जास्त सुधारलेल्या राष्ट्राकडे

पहाण्यास सांपडलें नाहीं किंवा त्यांचें साहाय्य मिळालें नाहीं तरी त्यांनां जसजसें ज्ञान प्राप्त होत जातें तसतसे नवीन शोध लागत जाऊन त्यांच्या योगानें त्यांचें जें पहिलें शास्त्र असतें तें मागें पडत जातें आणि त्यांचे जे आद्य ग्रंथ असतात त्यांच्याकडे ते पहातनासे होऊन ते लोपून जातात. परंतु त्यांच्या काव्याचें तसें होत नाहीं. त्यांचे जे श्रेष्ठ ग्रंथ (standard works) असतात त्यांची कीर्ति सर्वकाळ कायम रहाते. ते ग्रंथरचनेचे कित्ते होऊन बसतात आणि अभियुक्त (classical) भाषेचे मूलाधार असतात आणि अगदीं अज्ञान काळांतले जे ग्रंथकार असतात त्यांच्या कृति (काव्यें) पाहून पुढें त्यांचे जे अत्यंत सुधारलेले वंशज होतात त्यांनां फार आनंद होत असतो आणि त्यांची सुधारणा होत असते.'

दक्षिणदेश मुंबई सरकारच्या स्वाधीन होईपर्यंत मुंबई इलाखा फारच लहान होता तसा तो विद्येच्या कामांत बंगाल व मद्रास प्रांतांच्या बहुधा फार मागें होता. त्यांत थोड्याशा धर्मार्थ शाळा होत्या त्यांची देखरेख कंपनी सरकारच्या उपाध्ये (chaplains) बावांवर सोंपविलेली होती. ते आपलीं इतर कामें करून मग हें करीत. सन १८१४ च्या सुमारास अमेरिकेंतील थोडेसे मिशनरी लोक आलेले होते ते ख्रिस्ती धर्म पसरण्याच्या खटपटींत असत. **एल्फिन्स्टन** साहेब मुंबईस जाण्यापूर्वीं तेथें एक विद्याप्रसारार्थ मंडळी स्थापन झालेली होती; परंतु तिचें लक्ष आमच्या लोकांस शिकविण्याकडे तादृश नव्हतें. तिचे जे हेतु होते त्यांत एतद्देशीयांस शिक्षण देणें हा एक नमूद केलेला होता, परंतु तो अगदीं कनिष्ठ होता. सन १८२० पर्यंत स्थिति अशी होती. त्यावर्षीं बंगाल्यांतल्या एज्युकेशन सोसायटीच्या धर्तीवर गरीब लोकांस विद्या देण्याकरितां ह्मणून एक मंडळी स्थापन करण्याच्या हेतूनें आगस्ट महिन्यांत एक जाहिर सभा भरली. तिचें अध्यक्षस्थान **एल्फिन्स्टन** साहेबानें स्वीकारलें आणि त्याच्या हातानें मंडळीची (society) स्थापना झाली. तिचा मुख्य उद्देश आमच्या देशभाषांच्या द्वारें शिक्षण द्यावें हा ठरला. त्या सभेंत जे ठराव झाले त्यांत शिकविण्यास योग्य अशीं

इंग्रजी व देशभाषांत पुस्तकें करून छापावीं; चालू असलेल्या एतद्देशीय शाळांस आश्रय द्यावा, आणि नवीन शाळा स्थापाव्या, इत्यादि होते. याप्रमाणें स्थापन झालेली ही मंडळीच पुढें १६ वर्षेपर्यंत आमच्या देशभाषांतून चाललेलें शिक्षण देत होती. कंपनी सरकारचे मोठमोठे कामदार, मुंबईचे मुख्य धर्माधिकारी व इतर उपाध्ये, (clergy) एतद्देशीय चांगले चांगले वजनदार गृहस्थ, अशा लोकांचा त्या मंडळीला आश्रय होता, तरी जी वर्गणी जमत होती तीवर शिक्षणाचें काम सरासरीच चालत होतें. **एल्फिन्स्टन** साहेबानें सरकारची मदत मिळण्याची खटपट चालविली होती ती सिद्धीस जाऊन वर्षास पांच हजार पौंड ह्मणजे ५०००० रुपये पुस्तकें छापण्याकरितां व बाक्षिसें देण्याकरितां देण्याची सरकारानें मंजुरी दिली. एवढा आश्रय मिळाला तेव्हां मग मंडळीचें काम चांगलें चालूं लागलें आणि तिणें एतद्देशीय शिक्षक तयार करण्याकरितां शाळा (normal school) स्थापिली.

आपल्या इलाखाधिपतीचें आपल्यास साहाय्य चांगलें आहे असें पाहून मंडळीस उत्तेजन आलें आणि सरकाराकडून जास्ती मदत मिळावी असा अर्ज करा अशी त्याणें सूचना केली तीप्रमाणें त्यांणीं सन १८२३ च्या सप्टेंबर महिन्यांत आपले विचार सविस्तर लिहून अर्ज केला. त्याच्या मनांत चांगली मदत करावयाची होती परंतु त्याच्या हातांत पैसा अगदीं थोडा पडल्यानें त्याचा इलाज चालेना. त्यामुळें त्याच्या कारकीर्दीची समाप्ति होईपर्यंत मंडळीला तेवढ्याच पैशांत काय तें करावें लागत होतें. प्राथमिक शिक्षणाची साऱ्या इलाख्यांतली स्थिति कशी आहे तें समजावें ह्मणून त्याणें पुष्कळ प्रश्न काढून ते साऱ्या कलेक्टरांकडे पाठविले व उत्तरें मागविलीं. त्यांची चौकशी पुरी होऊन रिपोर्ट केव्हां आले असतील ते असोत, परंतु ते सन १८३२ पर्यंत प्रसिद्ध झाले नाहींत. त्यावर्षी असें कळलें कीं मुंबई-सरकारच्या ताब्यांतील मुलखांत एकंदर शाळा १७०५ असून त्यांत विद्यार्थी ३५१४३ आहेत. त्यावेळीं मुंबई इलाख्याची लोकसंख्या अजमासें

४७५०००० होती. सन १८९० मध्यें मुंबई इलाख्याची खानेसुमारी झाली तींत लोकसंख्या जवळ जवळ १९०००००० भरली. शाळा ११७१६ असून त्यांत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ५११६२७ होती. पुढच्या दहा वर्षांनीं ह्मणजे सन १९०० इसवींत ह्या इलाख्याची लोकसंख्या १८५५९६५० झाली. शाळा १५४३२ आणि विद्यार्थ्यांची संख्या ८५०२९३ झाली. याप्रमाणें त्याणें लाविलेल्या विद्यावृक्षाचा विस्तार होत चालला.

**एल्फिन्स्टन** साहेबानें शिक्षणसंबंधानें जे खलिते (minutes) लिहून सरकाराकडे पाठविले त्यांत सरकारानें प्रजेस विद्यादान करणें कसें अवश्य आहे, परंतु तें आरंभीं किती जपून, कोणत्या मार्गानें, कोणत्या तऱ्हेनें केलें पाहिजे, प्रजेस सुशिक्षित न करण्याचे परिणाम काय होतील, वगैरे सर्व गोष्टींचें चांगलें विवेचन केलेलें आहे. त्यांतून कांहीं उतारे खालीं देतों, परंतु ते मूळ साग्र वाचावे अशी आमची शिफारस आहे.

तो एका खलित्यांत ह्मणतो—

'मी मुंबईस आल्यापासून एतद्देशीय लोकांमध्यें विद्यावृद्धि व्हावी ह्मणून स्वशक्त्यनुसार झटत आहें. माझ्या नजरेस जें काय आलें आहे त्यावरून, व लोकांशीं पत्रव्यवहार केला त्यांत जें मला समजलें आहे त्यावरून, माझी अशी पुरी खात्री झाली आहे कीं ह्या महत्वाच्या कामीं सरकारानें पुष्कळ मदत केल्यावांचून पुढें पाऊल पडणार नाहीं. बंगाल्यामध्यें एज्युकेशन सोसायटीनें पुष्कळ काम केलें आहे असें दिसतें आणि त्यावरून ह्या इलाख्यांत ही तसेंच होईल असें मनांत येईल; परंतु इकडे युरोपियन लोकांची संख्या थोडी आहे आणि एतद्देशीय लोकांशीं आमचा संबंध अगदीं आलीकडचा आहे यामुळें तिकडच्यापेक्षां इकडे पुष्कळ जास्त परिश्रम करावे लागणार आहेत.'

'विद्याप्रसाराच्या कामीं पाद्रीलोक इतर युरोपियन लोकांपेक्षां अधिक आस्तेवाईक असतात व त्यांनां वेळ ही पुष्कळ असतो, परंतु इकडे ते उपयोगीं नाहींत. कारण आह्मी ब्राह्मणीराज्य विलयास नेऊन नुकतेच तत्स्थानापन्न झालों आहों आणि अशांत पाद्र्यांनां उत्तेजन देऊं लागलों तर परिणाम भयंकर होईल.'

'सरकारानें मदत देणें अवश्य आहे हें मान्य केलें ह्मणजे पुढें असा प्रश्न येतो कीं ती देण्याचा उत्तम मार्ग कोणता. मला दोन मार्ग दिसतात, त्यांचा विचार व्हावा. एक एतद्देशीयांचें शिक्षण सरकारानें सर्वस्वीं आपल्या हातांत घ्यावें किंवा हल्लीं जी मंडळी स्थापन झालेली आहे तिला जास्त द्रव्य द्यावें आणि उत्तेजन द्यावें. हे दोन ही उपाय योजले तर त्यांपासून बहुतकरून फळ चांगलें येईल.'

'एतद्देशीय लोकांमध्यें ज्ञानाचा प्रसार होण्यास उपाय ह्मटले तर असे आहेत. पहिला—त्यांच्या शाळांतून शिकविण्याची जी तऱ्हा आहे ती सुधारावी आणि शाळांची संख्या वाढवावी. दुसरा—शालोपयोगीं पुस्तकें पुरवावीं—तिसरा—याप्रमाणें शिक्षणाची सोय करून दिली ह्मणजे त्यांच्यांत खालच्या प्रतीचे जे लोक आहेत त्यांच्या मनांत आपण शिकावें असें यावें ह्मणून त्यांनां कांहीं तरी उत्तेजन द्यावें. चौथा—युरोपियन शास्त्रें आणि उच्च प्रतीच्या विद्येंत ज्या सुधारणा आहेत त्या शिकविण्याकरितां शाळा स्थापाव्या. पांचवा—नीतिशास्त्र आणि पदार्थविज्ञानशास्त्र यांवर देशभाषांत पुस्तकें तयार व्हावीं आणि तीं छापून प्रसिद्ध व्हावीं अशी तजवीज करावी. सहावा—इंग्रजी ही अभियुक्त भाषा (Classical-language) ह्मणून आणि युरोपामध्यें जे नवे नवे शोध लागतात त्यांचें ज्ञान संपादन करण्यास साधन ह्मणून ज्यांच्या मनांत तीं शिकावें असें येईल त्यांनां शिकविण्यास शाळा स्थापाव्या. सातवा—ह्या ज्या ज्ञानाच्या शाखा सांगितल्या त्या शिकण्याविषयीं एतद्देशीय लोकांस उत्तेजन द्यावें.'

विद्येला सरकारानें उत्तेजन देण्याचा उत्तम उपाय ह्मटला ह्मणजे शाळांची संख्या वाढवावी; आणि या कामीं यत्किंचित कसूर करूं नये असें माझें मत आहे. सध्या देशाची स्थिति अशी आहे कीं अशाप्रकारें यत्न केला असतां तो उत्तम प्रकारें सिद्धीस जाणार आहे. देशांतील लोकसमूह पाहिला तर तो अगदीं अनक्षर आहे. परंतु लिहितां वाचतां व शिकवितां येणाऱ्या लोकांचा एक वर्ग आहे. त्यांत आपल्याला पाहिजेत त्यापेक्षां अधिक मनुष्यें आहेत. त्यांनां काम नसल्यामुळें तीं रिकामीं आहेत, परंतु अशी स्थिति फार काळ रहाणार नाहीं. पेशवाईत अशा लोकांची जरूर लागत होती ती आतां लागेनाशी झाल्यानें ते रिकामे आहेत आणि थोड्याच दिवसांत नाहींसे होतील. आणि सरकारानें कांहीं तजवीज केली नाहीं तर देशाची स्थिति पेशवाईतल्यापेक्षां आमच्या अमदानींत खरोखर अधिक वाईट होईल. हें माझें ह्मणणें ज्याला विद्वत्व ह्मणतात त्या संबंधानें नव्हे; त्याचें जें सांप्रतचें स्वरूप आहे तें आमच्या कारकीर्दीत नाहींसें होत जाणारच, त्याला इलाज नाहीं. मी जें बोलतों आहें हें फक्त नुसत्या लिहिण्या वाचण्या संबंधानें. त्याच्याकडे जर आह्मी पाहिलें नाहीं तर तें ब्राह्मणेतर जातींत वाढणार नाहींच आणि ब्राह्मणांत आहे तें कमी कमी होत जाऊन लयास जाईल.'

त्याणें जे सात मुद्दे काढले त्यांचें विवेचन बरेंच सविस्तर केलें आहे. सातव्या मुद्यावर तो ह्मणतो—

उच्चप्रतीचें शास्त्राध्ययन होण्याची सोय करून देणें कठीण आहे. शास्त्रपारंगत होण्याची इच्छा उत्पन्न करणें हें त्याहून कठीण आहे. स्वदेशांत सर्व मोठमोठालीं कामें मिळण्याचीं बंद झाल्यानें लोकांनां नित्याच्या व्यवहारांत मोठ्याशा ज्ञानाची जरूर आहे असें वाटत नाहीं आणि एकाद्या विषयांत पारंगत होण्याची शक्ति असली तरी होऊन पुढें मोठेसें फळ येण्याचा संभव दिसत नाहीं. ही अडचण आह्मी हाली जे बेत मनांत आणीत आहों ते योजून त्यांच्या योगानें ते सरकारी कामें देण्यास आणि तीं विश्वासपूर्णें करण्यास

अधिक योग्य होईपर्यंत दूर होणार नाहीं. तसें होईपर्यंत त्यांची सुधारणा कांहीं अंशीं जबरीची आणि ओढून ताणून होत असणार. याकरितां त्यांस सरकारची मदत एरवींपेक्षां जास्त पाहिजे.'

ही अडचण टाळण्याला त्याला सुसाध्य उपाय असे दोनच वाटले. एक बक्षिसें आणि दुसरा त्यावेळीं आमच्या लोकांनां जीं सरकारी कामें मिळत होतीं तीं देण्याला योग्य कोण हें ठरविण्याकरितां कांहींतरी परीक्षा. पैकीं ह्या दुसऱ्या उपायाचा उपयोग अर्थात थोडा होणार होता. याविषयीं लिहून तो पुढें ह्मणतो—

हे जे बेत ( proposals ) मी सुचवीत आहें त्यांस अमूक हरकत आहे असें ह्मणतां येईल असे माझ्या मनांत येत नाहीं. ह्या गोष्टी मोठ्या खर्चाच्या आहेत एवढें एक सरकाराला ह्मणतां येईल; परंतु त्यावर माझें उत्तर असें आहे कीं हें कामच तसें मोठें आहे. ज्यांत आमचें कर्तव्य, आमचें हित, आणि आमची प्रतिष्ठा, यांचा संबंध याहून ही अधिक निकट आहे असें दुसरें काम मनांत आणणें देखील कठीण आहे. सर्व देशांत गरिबांनां सुख होणें तें पुष्कळ अंशीं त्यांनां ज्या मानानें विद्या प्राप्त होईल त्या मानानें होईल ही गोष्ट आतां चांगली कळलेली आहे. शहाणपणा आणि स्वाभिमान यांपासून इतर सर्व सद्गुण अंगीं येत असतात. हे ह्या देशच्या लोकांच्या अंगीं येणें जितकें अवश्य आहे तितकें अन्यत्र कोठें ही नसेल. हे मुख्य दोन गुण विद्येच्या योगानें मात्र प्राप्त होत असतात. अल्पवयांत लग्नें करण्यापासून प्रजावृद्धि फाजील झाल्यापासून कसे वाईट परिणाम होतात; जन्मभर पै पै करून सांचविलेला पैका एकाद्या कार्य-प्रसंगांत उधळून जाऊन पुढें कसे प्रसंग येतात; रयतलोक दीन होऊन सावकाराच्या दाढेंत कसे सांपडतात; आपल्याला अंगावर वस्त्र आणि रहाण्याला घर चांगलें असावें असें त्यांच्या मनांत येत नाहीं—आणि याकरितां सरकारानें त्यांच्याकडून सारा कमी घ्यावा असें केव्हां केव्हां कोणी ह्मणत असतात—ह्या गोष्टी आह्मी सर्वांनीं ऐकिलेल्या आहेत. आणि शेवटीं असें ही ऐकिलें आहे कीं त्या

गरीबांचें कल्याण व्हावें ह्मणून कितीही कायदे केले तरी त्यांपासून आपलें हित साधून घ्यावें अशी धमक बाळगणारा मनुष्यच जर होत नाहीं तर ते सारे व्यर्थ आहेत. ह्या साऱ्याला उपाय एकच आहे. तो कोणता ह्मणाल तर विद्या. स्वदेहाचें बलिदान करण्याची व बालहत्या करण्याची जी भयंकर चाल आहे ती मोडून टाकण्याचें यत्किंचित श्रेय घेण्याची आणि शेवटीं वेडगळ समजुती, देवभोळेपणा, (superstition) नाहींसा करून टाकण्याची जर आमची इच्छा असेल तर ती सिद्धीस जाण्याला ज्ञानप्रसार करणें हा एकच उपाय आहे हें आतां सिद्ध करून दाखवावयास पाहिजे आहे असें नाहीं. तो ज्ञानप्रसार केव्हां होईल तेव्हां होऊ असें ह्मणून आह्माला स्वस्थ बसतां येत नाहीं. एतद्देशीय लोकांनां धर्माच्या बाबतींत जरा धक्का लागला कीं चीड येत असते, आमच्या प्रजा आणि आह्मी अगदीं भिन्न असल्यामुळें आमच्या राज्याचा पाया डळमळीत आहे, त्यापासून आमच्या राज्याला अपाय होण्याचें भय आहे, तें टाळण्याकरितां ह्या दोन ही गोष्टींचा प्रतिकार करण्याचा आह्माला कांहीं तरी उपाय योजला पाहिजे. तो उपाय ह्मटला तर एवढा एकच कीं त्यांच्या दुराग्रहाच्या समजुती (prejudices) नाहींशा कराव्या आणि Rational Education ह्मणजे शहाणपणाच्या विद्येच्या प्रसारानें खुद्द आमचीं मूलतत्वें (विचार) आणि मतें त्यांनां शिकवावीं.'

'आह्मी हिंदुस्थानांतील राज्यें बुडविलीं आणि ह्या देशाला ज्या योगानें आजपर्यंत वैभव प्राप्त झालें तीं सर्व द्वारें बंद करून टाकलीं आणि उपयोगाचें किंवा भव्य दिसावें असें एक ही काम स्वतः केलें नाहीं, अशी आमच्या येथील राज्याला लोक नांवें ठेवितात. यांपेक्षां आह्मीं ह्या देशच्या लोकांच्या बुद्धीचा अंकुरच खुडून टाकतों, तो वर येऊं देतच नाहीं, असें ह्मटलें आणि आह्मी देश जिंकून घेतला असल्यामुळें स्वभावतःच असें झालें आहे कीं ज्ञानाची वृद्धि होण्यास उत्तेजन मिळण्याचे सर्व मार्ग बंद झाले इतकेंच नव्हे, ह्या लोकांची जी खरी विद्या आहे ती

बहुधा बुडून जाईल आणि मागच्या बुद्धिमान पुरुषांनीं जे ग्रंथ वगैरे करून ठेविले आहेत त्यांचा लोप होईल असें ह्मटलें, तर तें अधिक खरें होईल. आमच्या राज्याला हा जो डाग लागत आहे तो नाहींसा करण्याला आह्माला खरोखर कांहीं तरी केलें पाहिजे.'

'हिंदुस्थान सरकाराला आपल्या उत्पन्नापैकीं कांहीं भाग विद्यावृद्धीकडे खर्च करण्याला भाग पाडण्यासाठीं विलायत सरकारानें जो कायदा केला आहे तो बहुतकरून मी ह्मणत आहें असलेच कांहीं तरी विचार मनांत आणून केला असेल. परंतु तसें नसलें आणि त्याचा हेतु दुसरा कोणताही असला तरी त्या सरकारानें कायदा केला एवढीच गोष्ट त्या विषयाकडे आह्मी लक्ष दिलें पाहिजे ह्मणण्याला नवीन पुरावा आहे. यावर असें ह्मणणें पडेल कीं ह्या कामीं लागणाऱ्या पैशाचा जरी किती ही सद्व्यय होत असला तरी तो खर्च सरकावर पडणें योग्य नाहीं; विद्या प्राप्त करून घेऊन तिचें फळ जे उपभोगणार आहेत त्यांणींच तो सोसावा हें योग्य; असें न ह्मणतां दुसऱ्या कोणत्याही अटीवर आह्मी खर्च करूं लागलों तरी तिचें चीज होणार नाहीं; शिक्षक निःकाळजी राहतील आणि ज्यांच्या हिताकरितां ह्मणून खर्च करावयाचा ते शिकून तयार होणार नाहींत; आमचा यत्न फुकट जाईल. हें ह्मणणें खरें होईल, परंतु जे लोक आधींच खऱ्या विद्येचे (sound learning) भोक्ते असतील त्यांनां उच्च प्रतीचे विषय शिकवावयाचें झालें तर हिंदुस्थानांत आह्माला अगदीं पहिली आणि साऱ्यांत मोठी अडचण वाटते ती ही कीं लोकांनां ज्ञान प्राप्तीची इच्छा नाहीं. आह्माला ती त्यांच्या मनांत उत्पन्न करावयाची आहे. जी हरकत घेतलेली मी वर दाखविली आहे ती अशी इच्छा आहे असें कल्पून घेतलेली आहे. (अर्थात ती निराधार आहे.)'

'गरिबांच्या शिक्षणाविषयीं ह्मटलें तर--लोक सुधारणेच्या कोणत्याही पायरीवर असले तरी हा खर्च पुष्कळ अंशीं सरकारानेंच केला पाहिजे. राष्ट्र-

संरक्षण आणि न्यायखातें या दोहोंशिवाय तिसरा कोणताही खर्च सरकारावर बहुधा पडूंनये असें आडॅाम स्मिथ याचें मत आहे, परंतु त्याणें देखील गरिबांच्या विद्याध्ययनाचा खर्च हा राजानें अवश्य करण्याच्या खर्चांपैकींच आहे असें कबूल केलें आहे. (सरकारानें कोणत्या कामांत, विशेषतः शिक्षणांत, किती हात घालावा याचा निर्बंध इतर सर्व शास्त्रकारांपेक्षां आडॅाम स्मिथ याणें अधिक केला आहे.'

'याकरितां हा खर्च जरी बराच आणि कायमचा असला तरी तो सरकार आनंदानें करील असा मला भरंवसा आहे. परंतु तो सारा सरकारावर पडत नाहीं. शाळांचा खर्च गांवकीकडून होणार, बक्षिसांचा आणि अध्यापकांचा, जी रक्कम आधींच वेगळी काढून ठेविलेली आहे तींतून होणार; छापखान्याचा खर्च पुस्तकांचा खप जसजसा जास्त होईल तसतसा परभारें भागेल; आणि मी जे बेत योजलेले आहेत ते एकदां पूर्णपणें अमलांत आले ह्मणजे ही एवढी लोकांच्या कल्याणाची सारी व्यवस्था कंपनीला ह्मणण्यासारखा खर्च नयेतां लागेल.'

आपल्या सूचनेप्रमाणें केल्यास खर्च किती लागेल त्याविषयीं लिहून **एल्फिन्स्टन** साहेब शेवटीं ह्मणतो—

'पाद्री (missionary) लोकांनां अगदीं हलक्या जातीच्या लोकांत उत्तम प्रकारचे शिष्य मिळतात असें ह्मणतात; परंतु तशा प्रकारच्या लोकांनां विशेष उत्तेजन न देण्याविषयीं आह्मी जपलें पाहिजे. कारण ते अत्यंत तिरस्कृत आहेत इतकेंच नव्हे, तर एकंदर जनसमूहाचे जे मोठमोठे विभाग आहेत, त्यांच्याशीं तुलना केली असतां त्यांची संख्याही लहान आहे. आमच्या विद्येचें बीजारोपण प्रथम अशा लोकांत झालें तर पुढें त्याचा विस्तार कधीं ही होणार नाहीं ही भीति आहे. आह्मी त्यांनां शिकवून तो एक नवाच वर्ग उत्पन्न केल्यासारखा होईल; उपयुक्त ज्ञानांत ते इतरांहून श्रेष्ठ होतील, परंतु ज्या इतर जातींतले लोक असेच शिकून तयार झाले तर

आह्माला त्यांच्यापेक्षां नेहेमी चांगले वाटतील व त्यांनांच जवळ करावें असें वाटेल ते सर्व लोक त्यांचा (हीन जातीयांचा) द्वेष करतील व त्यांनां तुच्छ मानतील. आह्मी आपल्या फौजेवर कृपा ठेऊन त्यांत संतोष मानून राहणार असूं, किंवा लोकसमुदायापैकीं कांहींची प्रीति संपादन करून ते खुष राहिले ह्मणजे झालें असें समजत असूं, तर अशी स्थिति होणें इष्ट आहे, परंतु तसें नसेल (आह्मांला पुष्कळांची प्रीति संपादावयाची असेल) तर असें होणें इष्ट नाहीं.'

'आमचे जे शिक्षणाचे बेत आहेत त्यांत धर्मसंबंध यत्किंचित देखील येऊं देतां उपयोगीं नाहीं. मला तें अगदीं नापसंत आहे. शिक्षणाच्या कामीं आह्माला आधींच पुष्कळ अडचणी आहेत आणि त्यांत ही आणखी कांहीं भर घालावी हें मला संमत नाहीं. एतद्देशीय लोकांमध्यें ज्ञानाचा प्रसार झाला ह्मणजे त्यांचें धर्मांतर झाल्याशिवाय राहणारच नाहीं ही माझी खात्री आहे. हा कार्यकारण संबंध त्यांच्या ध्यानांत येत नाहीं हें उघड आहे; तो ध्यानांत येईल तर हें शिक्षण ह्मणजे आपल्या धर्मावर गदाप्रहार आहे असें समजून ते त्यांच्या अज्ञान नाशनाचे आह्मी जे उपाय करणार ते न चालूं देण्याविषयीं फार झटतील. आमच्या शाळांमध्यें आह्मी ख्रिस्ती धर्माचा उपदेश करूं लागलों तर त्याचा परिणाम 'ब्राह्मण हो! सावध व्हा, तुमचा धर्म बुडणार' अशी अगाऊ आरोळी ठोकून त्यांना सावध केलें एवढा मात्र होईल. जोपर्यंत कोणी खरोखर बाटले नाहींत तोंपर्यंत कदाचित ह्या आरोळीकडे ही कोणी लक्ष देणार नाहींत, परंतु कांहीं काल तसें झालें ह्मणून माझें ह्मणणें कांहीं खोटें होणार नाहीं. तसें होईपर्यंत आमचा बेत नीट चालेल इतकेंच. तसें झालें म्हणजे शिक्षण संबंधानें आमचे जे बेत आहेत ते सारे फसतील इतकेंच नव्हे, तर आमच्या राज्याला धक्का बसून तें बुडेल हें भय आहे.'

**एल्फिन्स्टन** साहेबानें शिक्षणासंबंधानें कितीएक खलिते (minutes) लिहिले. त्याच्या ह्मणण्याप्रमाणें थोडेंसें कांहीं झालें. या कामीं खर्चास

पैसा नाहीं असें सरकार म्हणत होतें म्हणून तें पुष्कळ काळपर्यंत पडून राहिलें होतें. एका मुद्यावर तर विलायत सरकार अडून बसलें. त्याणें पुण्यास पाठशाळा सुरू केली होती ती त्यांच्या दृष्टीनें गैर गोष्ट झाली. आणि ती मोडून टाकावी असें त्यांचें म्हणणें होतें. तिचा कैवार घेऊन ती कायम राखण्याला त्याला बरेच श्रम पडले असावे असें वाटतें. त्याणें आपल्यातर्फे असें लिहिलें कीं पूर्वी पेशवे सरकारांतून, किंवा विद्येचे भोक्ते व स्वधर्माभिमानी अशा लोकांकडून, धर्मादाय म्हणून जो खर्च होत होता तो तसाच चालवावा असा राजकारणीदृष्टीनें (policy) जो ठराव झाला आहे, त्याला अनुसरून हें कृत्य मी केलें आहे; आणि या पूर्वीच बंगाल्यांत ज्या तत्वांस अनुसरून सरकार चाललें त्याच प्रमाणें धर्मादायाच्या रकमेपैकींच थोडासा पैसा इकडे खर्चावा असें मी म्हणतों आहें, याहून कांहीं निराळें नाहीं. हिंदूंच्या विद्याध्ययनांत प्राचीन काळच्या पौराणिक गोष्टी जरी असल्या तरी लोकांनां आवडणाऱ्या आणि खऱ्या उपयोगीं, ज्यांत अर्थ आहे अशा, गोष्टी पुष्कळ आहेत; याकरितां तशा विद्येकडे खर्च करावयाचा नाहीं असें म्हणून तो सारा एकदम बंद करणें अगदीं वाजवी नाहीं, अशी त्याणें फार तक्रार केली.

**एल्फिन्स्टन** साहेबाच्या मनांत लोकशिक्षणाचे विचार सामाजिक संबंधानें मात्र येत होते असें नाहीं, राजकीय संबंधानें ही येत होते. इंग्रजी अम्मल पसरत जाऊन एतद्देशीय राजेरजवाडे बुडत चालले तसतसे लोकांनां उद्योगधंदे नाहींसे होत चालले, सरकार दरबार आणि लष्कर हीं दोन खातीं त्यांनां अगदीं नसल्या सारखीं झालीं, तेव्हां सर्वांची स्थिति एक होणार असें दिसूं लागून त्यांचे दिवसे दिवस हाल वाढत चालले. जे व्यापारांत शिरतील किंवा ज्यांनां सरकारी नोकरी मिळेल त्यांचें मात्र डोकें जरा हालेल असें वाटूं लागलें. परंतु पेशवाई बुडाल्यावर सन १८५७ च्या बंडा अखेर महाराष्ट्रांतलीं लहान मोठीं खातीं पितीं किती घराणीं धुळीस मिळालीं याचें अनुमान देखील बराबर करतां येणार नाहीं. बंड मोडून सर्वत्र शांतता झाल्यापासून विद्येचा प्रसार झपाट्यानें होऊं लागला व आमच्या लोकांस मोठ

मोठीं सरकारी कामें थोडीं थोडीं मिळूं लागलीं हें खरें, परंतु **एल्फिन्स्टन** साहेबाच्या वेळीं तसें होण्याचा कांहीं रंग दिसत नव्हता, ह्मणून त्याणें आपले विचार आपल्या बरोबरीचे कामगार व विलायत सरकार यांच्या मनांत भरवून देण्याविषयीं हरएक प्रसंगीं झाली तेवढी मेहेनत केली.

आपल्या प्रजेला सरकारानें शिक्षण द्यावें असें **एल्फिन्स्टन** साहेबाला मनापासून वाटत होतें तसेंच सरकारी अमलाचीं व भरंवशाचीं मोठमोठालीं कामें ही त्यांनां द्यावीं असें त्याचें मत होतें व त्याविषयीं ही त्यानें वारंवार लिहिलें. निजाम सरकारच्या पदरीं ठेवलेला क्याप्टन सदरलंड ह्मणून एक अम्मलदार होता त्याणें सन १८२४ मध्यें सरकारास एक खलिता पाठविला त्यांत आमचे लोक मुलकी कामदार (native revenue officers) व सनदी नोकर (native civil servants) नेमण्यास लायक व्हावे ह्मणून त्यांस शिक्षण देण्याकरितां एक शाळा स्थापावी असें सुचविलें होतें. तें कळतांच ही संधी बरी आहे असें वाटून **एल्फिन्स्टन** साहेबानें ही पुनः लेखणी उचलली. त्याणें पूर्वीं ज्या सूचना केल्या होत्या त्यांपैकीं कांहींवर पुनः लिहिलें आणि असें करणें किती न्यायाचें व त्यांत राजकारण ही किती साधतें तें दाखविलें. एतद्देशीयांस बाजूस ढकलून इंग्लिश लोकांस किंवा त्यांच्या संततीसच लहान थोर सर्व कामांवर साधेल तितकें लावावयाचें असें मनांत आणून त्याप्रमाणें करीत गेलें तर एतद्देशीय लोक अत्यंत नाखुष होतील त्यांची स्थिति दिवसें दिवस बिघडत जाऊन तुर्कस्थानांतल्या ग्रीक लोकांपेक्षां ही नीच, बहुतेक स्पानिश अमेरिकेंतल्या इंडियन लोकांची दशा त्यांनां प्राप्त होईल; हिंदुस्थानांतल्या व विलायतेंतल्या सर्व अधिकाऱ्यांच्या मनांत आपल्या प्रजेची स्थिति चांगली असावी असें किती जरी असलें तरी सध्या आपली जी तऱ्हा चालू आहे तिणें हळुहळु अखेर हा परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाहीं ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे, असें सांगून तो पुढें ह्मणतो—

एतद्देशीय लोकांस शिकवून सरकारी कामें (public service) करण्यास लायक केलें आणि पुढें कामें देऊन उत्तेजन देत गेलें तर मग

लौकरच मी जें वर लिहिलें आहे त्याच्या अगदीं उलट स्थिति होईल. एकेका तालुक्याची देखरेख आतां जसे युरोपियन करीत आहेत तशी थोडक्याच दिवसांत ते लोक करीत असलेलें आह्मांस पहावयास मिळेल. त्याच्या ही पुढें मजल गेली ह्मणजे ते केव्हां केव्हां रजिस्ट्रार आणि सब-कलेक्टर किंवा कलेक्टर आणि जज्ज देखील होतील. कालांतरानें त्यांचा आणि इंग्रजांचा संबंध चिनी आणि तार्तरी लोकांचा आहे त्या सारखाच बहुतेक होईल—ह्मणजे राजसत्ता आणि लष्करी अधिकार युरोपियनांच्या हातांत आणि बऱ्याच मुलकी कामावर व लष्करांतील हाताखालच्या पुष्कळ जागांवर एतद्देशीय लोक नेमलेले—असें होईल असें मानलें तर हे केवळ कल्पनातरंग आहेत असें ह्मणावयास नको.'

'कोणी असें ह्मणेल कीं एतद्देशीय लोकांनां विद्वान करून आह्मी आपल्या बरोबरीस आणलें आणि त्यांनां आपल्या देशाच्या राज्यकारभारांत ही घेतलें, तर ते तेवढ्यानें संतुष्ट रहातील किंवा साऱ्या राज्यावर आपला हक्क सांगूं लागून तो मिळेपर्यंत स्वस्थ बसतील असें बहुधा होणार नाहीं. ही भीति बाळगण्यास पुष्कळ आधार आहे; तें कांहीं नाहीं ह्मणतां येणार नाहीं, परंतु ह्मणून तसें केलें नाहीं तर काय केलें असतां तरी आह्मी अधिक निर्भय होऊं तें मला कळत नाहीं. आह्मी त्यांनां दडपून टाकण्याचा यत्न केला तर ते धडपडून आमच्याशीं झगडतील आणि आमचें राज्य बुडेल. असा प्रसंग आला तर तो वरच्यापेक्षां अधिक हानिकारक आणि लज्जास्पद होईल. आमच्यापुढें त्यांची कांहीं वडपड चालली नाहीं आणि आह्मी त्यांनां अगदीं हतवीर्य करून सोडलें तरी आमचें राज्य त्यांनां अप्रिय झाल्यानें एकादें परचक्र येऊन किंवा आमच्या वंशजांचें बंड होऊन बुडेल, त्यापेक्षां ज्यांच्या हिताकरितां तें आमच्या हातांत आलेलें आहे त्यांच्या स्वाधीन आमचा अधिकार आह्मी करावा. यांत आमची प्रतिष्ठा आणि हित आहे. एकाद्या प्रतिस्पर्धी राष्ट्रानें तें आमच्या हातांतून हिसकावून घ्यावें

किंवा थोड्याशा लेकवळ्यांनीं (creoles) ही आमची वडिलार्जित मिळकत ह्मणून हक्क सांगून तें घ्यावें यांत कांहीं आह्माला भूषण नाहीं.'

'हे माझे विचार ह्मणजे फार दूरचे, केवळ कल्पनातरंग आहेत असें एकाद्याला वाटेल, आणि खरोखर पाहिलें तर जो लहानसा प्रश्न पुढें आलेला आहे त्यावरून इतक्या गोष्टी माझ्या मनांत याव्या ह्मणजे फारच आहे. परंतु पुढें आपल्यास इतिकर्तव्य काय हा निश्चय झाल्यावांचून इष्ट हेतु साधण्यास चांगले उपाय योजणें अशक्य आहे; याजकरितां कांहीं तरी एक रीति (system) ठरविणें जरूर आहे; ती ठरली ह्मणजे तो मार्ग धरतां येईल.'

**एल्फिन्स्टन** साहेब मुंबईस गव्हरनरीचें ह्मणजे राज्यकारभाराचें मोठें जबाबदारीचें आणि जोखमाचें, काम करीत होता तेव्हां तें राज्य सुरळीत चालावें, शांतता कायमची रहावी, प्रजेचें कल्याण व्हावें आणि लोकांची उत्तरोत्तर सुधारणा होतजावी हे विचार त्याच्या मनांत नेहेमी घोळत असत. शिवाय ग्रंथावलोकन हा त्याचा मोठा प्रिय व्यासंग चालूच असे, त्यामुळें आपल्या मित्रमंडळीशीं त्याचा जो पत्रव्यवहार चाले त्यांत व आपल्या रोजनाम्यांत तो अनेक विषयांवर जे विचार मनांत येत ते लिहीत असे. असे हे त्याचे लेख पुष्कळ आहेत त्यांपैकीं कांहींचें येथें दिग्दर्शन करूं.

गुजराथेंतून फिरून आल्यावर तो लिहितो--मी ज्या स्थितींत पडलों आहें हींत कीर्ति मिळण्याची बाजूस राहून मला सुख मिळणार नाहीं असें मनांत येऊन मागें मला वाईट वाटत असे. माझी या (गव्हरनरच्या) जागेवर नेमणूक झाल्यामुळें मी युरोपांत जाण्याचा बेत सोडून दिला तेव्हांपासून तर माझ्या मनाचा असा विशेष दृढ ग्रह होऊन बसला आहे. परंतु हा विचार केवढा स्वार्थपरायणतेचा आहे हें केव्हांच मनांत आलें नाहीं हें पाहून मला आश्चर्य वाटतें. मी जर फक्त मेहेनत करीन आणि झटेन, तर या

जागेवर असतां मला पुष्कळ चांगलें करण्याची विलक्षण संधी आहे, असें असून मी कीर्ति आणि सुख मिळणें नाहीं ह्मणून रडत बसलों आहें. हें लांछन टाकून यावें अशी मी अगदीं मनापासून अतिशय इच्छा करतों.'

तारीख २४ सेप्टेंबरच्या रोजनाम्यांत तो लिहितो--देवळाला गेलों. मिरझापुराजवळच्या गुहेचें आणि तींत बसून मी व्हरजिल होरेस, टिबुलस यांचे ग्रंथ वाचण्यांत व रोस साहेबाबरावर बोलण्यांत दिवस घालवीत असें त्या काळाचें, मला कशावरूनसें चांगलेंच स्मरण झालें; आणि मग त्यावरून मी त्याकाळीं काय काम करीत असें, काय वाचीत असें आणि माझे विचार काय असत तें पहावें असें मनांत येऊन मी त्या उद्योगास लागलों. दोन तासांवर वेळ त्यांत गेला आणि मी सन १८११ मध्यें पुण्यास गेलों तेथपर्यंत झालेल्या गोष्टींचें पर्यालोचन केलें. तें काम फार आनंददायक झालें आणि मला वाटतें हितावह ही झालें. तें असें:— त्यांत गुंतलों होतों तोंपर्यंत उगाच मनांत येणारे जे कल्पनातरंग ते बंद राहिले आणि मागच्या व पुढच्या गोष्टींचा मला विचार करतां आला. त्याचा परिणाम हितावह झाला. माझा जो काळ गेला तो बहुतेक सुखांत गेला आणि त्यांत ही जो उत्तम सुखांत गेला तो तसा जाण्याला जीं साधनें होतीं तीं माझ्याजवळ नेहेमी असणार आहेत. जो काळ मौजेंत आणि मोठ्या आनंदांत गेलेला असतो तो दुरून (पुष्कळ दिवसांनीं) पाहिला (मनांत आणला) ह्मणजे मोठा चांगला वाटतो आणि जो एकांतवासांत अभ्यास करण्यांत गेलेला असतो तो त्याच्या उलट उदासपणाचा असा वाटतो. परंतु त्या दोहोंचें ही नीट परीक्षण करूं लागलें ह्मणजे पहिल्यामध्यें अस्वस्थपणाचें मिश्रण फार होतें आणि दुसऱ्यामध्यें शांतता आणि स्वस्थता यांचा उपभोग फार होत होता असें दिसून येतें. वृद्धापकाळ सुखावह होण्याला विघातक ह्मटली तर एक आशा मात्र असण्याचा संभव आहे; आणि ज्यापासून कीर्ति होण्याचा वाजवी पाहिलें असतां संभव आहे असें एकादें पुष्कळ काळ चालणारें, उदाहरणार्थ हिंदुस्थानचा इतिहास, काम हातीं घेतलें तर सुख प्राप्त होईल. परंतु ह्या कामाला

घाईघाईनें हात घालतां कामा नये. त्यांत पुष्कळ काळ घालविला पाहिजे, आणि त्यावर जितके परिश्रम होतील त्या मानानें कीर्ति मिळेल असेंच तें पार. पाडलें पाहिजे; नाहींतर पूर्वी जी आशा बाळगलेली असते ती निष्फळ झाल्यानें पुढचे दिवस फार कष्टदायक होतील.

तशी वेळ येईपर्यंत माझें मनोरंजन होण्याला आणि आपला उपयोग व्हावा होईल अशी आशा उत्पन्न होण्याला साधनें पुष्कळ आहेत. अशा गोष्टींकडेच आपण लक्ष द्यावें, भ्रमांत पडूंनये आणि Vacant hand and heart and eye ह्मणजे मोकळे हात, रिकामें मन आणि शून्य दृष्टि यां पासून उत्पन्न होणारें सुख भोगावें.'

गुजराथेंत फिरावयास जात असतांना घोड्यावरून पडून **एल्फिन्स्टन** साहेबास इजा झाली ह्मणून मागें सांगितलें आहे. त्या वेळीं हाताला इजा झाल्यामुळे निदान दीड महिना त्याला लिहितां येत नव्हतें. हात बरा झाल्या वर त्याणें मालकम साहेबास एक भलें लांब लचक पत्र लिहिलें. त्यांत पुष्कळ विषयांवर चर्चा होती. शेवटीं आपण हातीं घेतलेलें कायदे करण्याचें काम चालू असल्याबद्दल, लष्करी कायद्यांच्या एकीकरणाबद्दल व आमचे लोक सरकारी नोकरीच्या लायक होण्याकरितां त्यांस शिकवून तयार करण्यास एक पाठशाळा स्थापावी असा आपला बेत असून त्यास आपले जोडीदार प्रतिकूल आहेत वगैरे लिहून तो ह्मणतो ' मी मुंबईविषयींच फार लिहिलें त्यामुळें माळव्या विषयीं लिहिण्याला जागा उरली नाहीं; परंतु मला आतां त्याविषयीं फारसें लिहावयाचें नाहीं. तेथची सर्व व्यवस्था एका मनुष्याच्या हातांत ठेवावी किंवा नाहीं; या विषयीं संशय उत्पन्न व्हावा हें पाहून मला आश्चर्य वाटतें. तुह्मी गेल्यावर तेथच्या व्यवस्थेंत जी कमतरता येणार ती भरून काढण्याकरितां जर तेथची फौज बरीच वाढविली नाहीं तर मोठी अव्यवस्था होईल असें मला वाटतें. ह्या देशच्या लोकांनां कामें मिळण्याला कांहीं तरी मार्ग काढणें अवश्य आहे ह्मणून तुह्मी जें लिहिलें आहे तें पाहून मी

फार चकित झालों. खरोखर जर आह्मी असें कांहीं तरी केलें नाहीं तर आम्हाला त्यांना गुलाम तरी केलें पाहिजे, किंवा बंडखोर तरी बनवलें पाहिजे. परंतु हें टळणार कसें? ह्या महत्वाच्या आणि कठीण प्रश्नाचा जबाब तुम्हाला देतां येईल काय?"

**एल्फिन्स्टन** साहेबांचा मुंबई मुक्कामचा तारीख २५ नोव्हेंबर १८२१ चा रोजनामा—मी येथल्या देखाव्यांविषयीं कांहीं लिहिलें नाहीं. ते खरोखर आनंदायक आहेत. मी संध्याकाळीं ते पाहण्याला जातों तो अगदीं आतुर झालेला आणि हपापल्या सारखा असतों आणि ते सोडून परत येतांना मला वाईट वाटतें. माझी वृत्ति फार उदास होत असते तरी सृष्टिसौंदर्य अवलोकन करण्याची आणि काव्यरसास्वाद घेण्याची हौस केव्हां ही नष्ट झाली नाहीं हें पाहून मला संतोष वाटतो. पांच दिवसांपूर्वी मी ब्लेकर *वाचून टाकला तेव्हां दक्षिणेंतल्या लढाईंत माझ्या हातून काय काय झालें त्याचा त्याणें कांहींच उल्लेख केला नाहीं हें पाहून मी संतापलें. मग मी आपले कागदपत्र वाचून पाहिले आणि त्यांत त्या लढाईच्या कामीं माझ्या हातून जें काय झालें त्याची मी फाजील प्रौढी मिरविली नाहीं असें दिसून आलें तेव्हां मला बरें वाटलें. मागें एकदां माझी फाजील स्तुति केल्याबद्दल मला राग आला होता, त्याचें आतां स्मरण झालें आणि या प्रसंगीं ब्लेकरनें तसें कांहीं केलें नाहीं ह्मणून त्याच्या बद्दल आलेला राग गेला. माझें जितकें वर्णन केलेलें आहे त्यापेक्षां मी बरा आहें असें आतां मला वाटतें."

तारीख २ डिसेंबरचा रोजनामा असा आहे—तारीख २९ रोजीं मालकम साहेबाला आह्मी मेजवानी केली. ती सर्वप्रकारांनीं उत्तम तऱ्हेनें पार पडली. त्याचें आगत स्वागत तर फारच मनापासून झालें. तेव्हां-

---

*सन १८१७—१९ मधल्या मराठ्यांबराबरच्या लढाईची हकीगत.

पासून मी शहरांतच आहें आणि आतां मालकम साहेबांनां पोहोंचवून आलों. ते गेले ह्मणून मला फार वाईट वाटतें. त्यांची ती गडबड आणि अहंपणाचें भाषण आह्मी विसरून जाऊं, परंतु त्यांची हिम्मत आणि चांगला विनोद यांचें आह्माला वारंवार स्मरण झाल्यावांचून खरोखर राहणार नाहीं. माझ्या माहितीचे जे अगदीं पहिल्या प्रतीचे आणि उत्तम मनुष्य आहेत त्यांतल्या एकाच्या आंगचा तेवढा दोष (अहंपणा) मला सहन होत नसे याबद्दल मी नेहमी आपली निर्भर्त्सना करीत असें.'

हिंदुस्थानांतील प्राचीन शिलालेख इतिहासदृष्ट्या उपयोगी आहेत ह्मणून ते पहावे व जितके मिळतील तितके मिळवावे अशा विषयीं जी मंडळी खटपट करीत होती तीपैकींच एल्फिन्स्टन साहेब होता हें मागें एकदां सांगण्यांत आलें आहे. असे लेख जमविण्यासंबंधानें कशी व्यवस्था करावी याजबद्दल त्याणें तारीख २५ दिसेंबर १८२१ रोजीं आर्स्किन साहेबास पत्र लिहिलें तें खालीं देतों—

आज सायंकाळीं आह्मी मंडळीमध्यें कोरीव लेख, व ते विशेषेंकरून जैनांसंबंधाचे, जमविण्यासंबंधानें बोलत होतों. एकदोन नेटिव्ह तें काम करण्याला नेमून त्यांवर देखरेख करण्यास दर जिल्ह्यांत एक एक असामी मनापासून काम करणारा मिळणें कठीण पडेल असें आह्माला वाटत नाहीं. कच्छमध्यें नारीस साहेब, काठेवाडांत कार्नवालसाहेब, वायव्य सरहद्दीवर माइल्स साहेब, सातान्यास ग्र्यॅटसाहेब, इत्यादि हें काम आस्थेनें करतील. परंतु कोणत्या प्रकारचे लेख जमवावयाचे आणि ते उतरून घेतांना कोणत्या प्रकारच्या चुका न होऊं देण्याविषयीं जपावयाचें हें दाखविण्याला आधीं कांहीं तरी नियम ठराविणें जरूर आहे. पुढें दुसरें असे लेख उतरून आले ह्मणजे ते व्यवस्थेनें लावण्याला व आणखी कोरीव लेख मिळण्याला कोणत्या स्थळीं शोध करावा किंवा त्या संबंधाची कांहीं चौकशी कोठें करावी तें सांगण्याला एक मनुष्य काढणें जरूर आहे. जसजसे लेख तयार होऊन येतील तसतशी त्यांची समजूत पटण्यासारखी याद वाल्टरसाहेब करतील याविषयीं मला संशय नाहीं

केनेडी साहेब ह्मणतात पत्रव्यवहाराचें बरेंचसें काम आपण करूं. परंतु साऱ्या कामावर नजर ठेवणारा असा कोणी तरी एक अधिकारी पाहिजे. आणि मला वाटतें तो खरोखर तुह्मींच झालें पाहिजे. आतां मी ह्मणतों या प्रमाणें व्यवस्था लाविली असतां उपयोगीं पडण्यासारखे बिनचूक असे पुष्कळ मौल्यवान लेख जमा होतील असें तुह्माला वाटतें का? आणि बाकींच्या बद्दल जें काम चालावयाचें त्यावर नजर पुरवावयाला व त्या लेखांतून भाषांतराकरितां व छापण्याकरितां निवडून काढण्याला तुह्माला फुरसत मिळेल का आणि असें करण्याचें तुमचे मनांत येईल का? हाल्लीं तुह्मी काम सोडून रिकामे झालेले आहां तेव्हां ह्या विषयाचा विचार करण्याला आणि हें इष्टकार्य साध्य आहे असें तुह्माला वाटेल तर तें पुढें कसें चालावें या बद्दल कांहीं नियम करण्याला ही तुह्माला बहुधा फुरसत मिळेल. लेण्यांमधले कोरीव लेख कोणत्या लिपींत आहेत तें समजण्याला कांहीं तरी मार्ग सांपडेल तर पहावा हा एक मुख्य उद्देश साधण्याचा यत्न करावयाचा. हा हेतु सफळ झाला तर दक्षिण आणि पश्चिम हिंदुस्थानांत ब्राह्मणांचें आणि संस्कृताचें प्राबल्य पूर्णपणें स्थापन होण्यापूर्वीं तेथची स्थिति कशी होती तें समजण्यास मार्ग होईल. हा हेतु साधण्याला त्या अज्ञेय अक्षरांनीं कोरलेले लेख समजण्याला आसपासचे संस्कृतांत कोरलेले लेख बहुधा साहाय्यकारी होतील ह्मणून ते ही लक्षपूर्वक जमवावे लागतील. जमिनींचीं दानपत्रें ताम्रपटांवर अपरिचित अक्षरांनीं कोरलेलीं सांपडतात. तीं कशाबद्दल आहेत हें माहीत असल्यामुळें तीं अक्षरें लावण्यास पुष्कळ साहाय्य होईल आणि कदाचित तीं संस्कृतांत आणि त्याच घरांत त्याच मजकुराच्या सनदा मिळतील तर मोठेंच साहाय्य होईल.

संस्कृतेतर भाषेंतील एकाद्या शब्दापासून निघालेले असे हिंदुस्थानांतील प्रत्येक भाषेंतील शब्द गोळा केले असतां बरें होईल असें जें तुमचें ह्मणणें आहे त्यावरून दुसरा असा एक प्रश्न उत्पन्न होतो कीं सर जेम्स मॉकिंटाश साहेबाचा शब्दकोश जमा करण्याचा जो बेत आहे त्याला उपयोगीं पडेल अशी एकादी गोष्ट करणें कितीसें शक्य आहे. शब्दकोश सहज मिळवितां

येतील आणि मला वाटतें त्यावेळीं कांहीं मिळविलेले ही होते. नागपुराहून मी तर सहा सात भाषांचे पाठविले होते. परंतु त्यांची कांहीं तरी एक व्यवस्था लावण्याची तजवीज तेव्हां न झाल्यामुळें ते कोणी पाठविले असले तर सांडून गेले असावे; आणि कोणीतरी त्यांचें वर्गीकरण करावें, जीं पुस्तकें छापावयाचीं असतील त्यांत त्यांची नोंद करावी, किंवा त्यांच्या प्रती करून त्या एकदोन विद्वान मंडळयांकडे पाठवाव्या, हें उत्तम असें तेव्हां ठरलें होतें; त्या प्रमाणें न झालें तर ते आतां पुनः सांडून जातील. मूळाक्षरें जमविण्याचा जो तुमचा बेत आहे त्याला ही चांगला जोड होईल. परंतु बेत करणें जसें सोपें असतें तसें तें तडीला नेणें सोपें नसतें; आणि त्या कोशांची विल्हेवारी लावावी येवढ्या कामाला जे श्रम लागणार आहेत तेवढे करण्याचें पत्करणारा सुद्धां तुम्हाला कोणी मिळणार नाहीं. शास्त्रीय विषयांच्या विचारा करितां डाक्टर मार्शल यांची नेमणूक झालेली होती, ती एकदां ठरलेली बंद होऊं द्यावी ही दुःखाची गोष्ट आहे. आतां ज्या विषयीं मी लिहित आहें अशा प्रकारचीं कामें करविणें झालें तर तीं सदर जागेवर असणाऱ्या मनुष्याकडे सोपविणें नेहमीं सोईचें होतें. त्या जागेवर असण्यास योग्य असा कोणी मनुष्य तुह्माला माहीत आहे का?

हिमालय हा गिरिराज खरा, त्याची शोभा अप्रतिम आहे. ती पहाण्याला **एल्फिन्स्टन** साहेबाला फार आवडत असे. त्या संबंधानें त्याणें क्लोज साहेबाला लिहिलेल्या पत्रांत मजकूर आहे तो—

कांहीं दिवस माझे डोळे दुखत होते आणि आतां वाचावयाचें झालें तर मला निळी चाळिशी लावावी लागते; एवढें आधीं सांगून ठेविलें ह्मणजे मी आतां दिव्याजवळ बसून तुह्माला पत्र लिहीत आहें हें किती श्रमाचें वाटत असेल याचें तुम्हाला नीट अनुमान करतां येईल. तुमचें मालवणचें पत्र मला पोहोंचलें; तें वाचून फार आनंद वाटला ह्मणून त्याचें उत्तर आतांच्या आतां लिहितों. तुमच्या पूर्वीच्या पत्रांत दुखण्याची हकीगत आणि निराशेचे उद्गार होते ते जाऊन आतां प्रकृति उत्तम आहे हें

वाचून मला अतिशय आनंद वाटतो. जसा हिमालय तसें इंग्लंड चांगलें वाटेल हें अगदीं ध्यानांत ठेवा. दुसरी आनंदाची गोष्ट तुह्मी जें त्या पर्वताचें वर्णन केलें आहे तें वाचून आणि त्याची ती शोभा पाहून मनाची जी वृत्ति होते तिचें पुनः स्मरण झाल्यानें जो हर्ष होतो तो, ही होय. हिमालय तुह्मी जसा पूर्णपणें पाहिला तसा जरी मी पाहिला नाहीं तरी तो आणि त्याच्या जवळचा पश्चिमेकडचा दुसरा पर्वत पाहिला तेव्हां त्याची शोभा दिसली तिच्या पासंगाला तरी लागेल अशी आजपर्यंत दुसरी कोणती ही माझ्या दृष्टीस पडली नाहीं. त्या पर्वताचे जे खालचे भाग आहेत त्या वरचीं तीं दाट हिरवींचार गार अरण्यें, त्यांतले ते स्वच्छ जलप्रवाह, त्या खोल दऱ्या, ते भयंकर कडे, इत्यादि अपूर्व व अद्भुत गोष्टी एकत्र झालेल्या पाहिल्या ह्मणजे तेवढ्यावरून सुद्धां त्या गिरिराजाच्या ह्या खालच्या नुसत्या सखल भागाची शोभा अन्य कोठच्याही पेक्षां श्रेष्ठ आहे असें वाटतें. परंतु त्याच्या त्या हिमाच्छादित उंच शिखरांकडे वर नजर फेकली ह्मणजे तर त्यांच्या पुढें त्या खालच्या भागाची किंवा दुसऱ्या कशाचीच कांहीं योग्यता नाहीं, सारें तुच्छ आहे असें वाटतें आणि मन आश्चर्य, भीति, व विस्मय इत्यादि विकारांनीं चकित होऊन जातें. त्या पर्वतराजराजीचें दर्शन मला पुनः कधींच घडणार नाहीं हा विचार मनांत आला ह्मणजे मन उद्विग्न होतें आणि आल्पसपर्वत पहावयास सांपडणार आहे ह्मणून कांहीं त्याचें नीटसें शांतवन होत नाहीं. प्रस्तुत मला येथच्या एकून एक गोष्टींचा कंटाळा आलेला आहे तरी रात्रीच्या समयीं पडलेलें शुभ्र चांदणें, वृक्षाच्छादित डोंगर आणि आरशा सारखें निर्मळ उदक पहात Near the deep sea and music in its roar, अगाधोदक सागरतीरीं, त्याचें मनोहर, गंभीर, गर्जनगान श्रवण करीत मी आनंदांत बसत असतों.'

क्याप्टन ग्रांटडफ साहेबानें मराठी साम्राज्याचा इतिहास लिहून महाराष्ट्र देशावर अवर्णनीय उपकार करून ठेविले आहेत ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. हें काम करण्यास त्यास **एल्फिन्स्टन** साहेब प्रोत्साहन देत असे; त्यास जी

सामुग्री लागत होती ती मिळण्यास साहाय्य करीत असे आणि एक एक भाग लिहून झाला ह्मणजे तो वाचून पाहून कोठें काय कमी जास्ती असावें त्या सूचना करीत असे. सामुग्री पुरवण्याकरितां आपल्या स्नेही मंडळीस तो लिहीत असे. क्रोज साहेबाला त्याणें पाठविलेलें पत्र वर दिलें आहे त्याच्या शेवटीं पुढील मजकूर आहे—ग्र्यांट साहेबांनीं आपल्या मराठ्यांच्या इतिहासास लागणारी माहिती पुरविण्याबद्दल तुह्माला लिहिलें असेल. पण त्या बद्दल मला खात्रीनें सांगवत नाहीं; कारण मला वाटतें तुमची त्यांची ओळख ही नसेल. परंतु तो इतिहास उत्तम होईल-शिवाजी, संभाजी आणि राजाराम यांच्या कारकीर्दी लिहून झाल्या आहेत आणि आतां ते त्रिवर्ग आमच्या डोळ्यां-पुढें उभे असल्या सारखे, हैदर आणि टिप्पु यांच्या सारखे सहज समजण्या सारखे, हुबेहुब दिसत आहेत. ग्र्यांट साहेब शिंदे होळकर वगैरे बद्दल माहिती मागत नाहींत परंतु त्यांनां ती ही हवी लागेल; आणि तुह्मी बक्कर कृत इराणच्या बखरी ( Bukker's Persian Memoirs &c. ) वगैरे मिळवून द्याल तर बरें. त्यांची त्यांनां पुष्कळ मदत होईल. शिंद्याबरोबरच्या मुख्यमुख्य तह नाम्यांच्या नकला ही त्यांच्या उपयोगीं पडतील.

एल्फिन्स्टन साहेबानें ग्र्यांटडफ साहेबाला त्याच्या इतिहासाच्या-उपयोगीं पडणारी पुष्कळ माहिती आमच्या लोकांकडून व युरोपियन लोकां-कडून मिळवून दिली. तें काम चाललें असतांना त्याणें त्याला पुष्कळ पत्रें पाठविलीं. तारीख २७ एप्रिल सन १८२२ च्या पत्रांत पुणें हैदराबाद, कलकत्ता वगैरे ठिकाणच्या सरकारी दप्तरांत त्या इतिहासाच्या उपयोगीं पडण्यासारखे किती कागदपत्र मिळतील त्यांची एक लांबलचक याद दिली. त्या पत्रांपैकीं एक दोन मासल्याकरितां खालीं देतों.

मुंबई तारीख २१ मार्च १८२२.

मेहेरबान ग्र्यांट साहेब

तुमच्या इतिहासाचे पहिले तीन भाग ( chpters ) मला वाटलें

होतें त्यापेक्षां बरेच लौकर वाचून झालें. ते वाचून मला मोठा संतोष वाटला. तुह्माला आतां पहिल्या पेक्षां पुष्कळ शांत ( सौम्य ) व प्रगल्भ अशा ऐतिहासिक भाषेनें लिहिण्याची हातोटी साधली. तुमच्या भाषासरणींत मागें मी जे दोष काढीत असें त्यांतला एक देखील आतां नाहीं. मी ज्या काय टीका ( remarks ) केल्या आहेत त्या मुख्यत्वें दोषनिर्देशक आहेत आणि मुख्यतः बारीकसारीक गोष्टींसंबंधानें आहेत; परंतु त्यांचा उपयोग व्हावयाला हवा असेल तर त्या दोषनिर्देशकच पाहिजेत. कोणता मजकूर पालटावयाला नको हें सांगण्यापासून कांहीं उपयोग नाहीं. जे दोष द्यावयाचे ते तपशीलवार असले पाहिजेत, कारण ज्या ग्रंथकारानें आपल्या विषयाचा पूर्णपणें विचार केलेला असतो त्याला मात्र त्याचें मागचें पुढचें अनुसंधान राखून स्थूलदृष्ट्या पर्यालोचन करतां येतें. तथापि मला असें वाटतें कीं तुह्मी मराठ्यांच्या चालीरीतींचें वर्णन थोडें अधिक विस्तारानें करावयास पाहिजे होतें; ते लोक आणि त्यांचा नायक यांचे हेतु आणि कृत्यांच्या तऱ्हा, हीं वाचकाला नीट समजण्याकरितां असें पाहिजे होतें. आतां मराठे जसे आहेत तसें त्यांचें चित्र काढून दाखविलें तर मात्र हें साध्य होणार आहे; आणि तें जेव्हां तुह्मी सांप्रत कालाचें वर्णन करूं लागाल तेव्हां आपोआप अधिक ओघानेंच येईल कीं नाहीं सांगवत नाहीं. परंतु एकंदरींत मला असें वाटतें कीं ज्यापेक्षां तुह्मी हा ग्रंथ युरोपांतल्या लोकांनीं वाचावा ह्मणून लिहीत आहां त्यापेक्षां त्याच्या मुख्य भागाला आरंभ करण्यापूर्वीं त्यांत येणाऱ्या पात्रांची वाचकांना नीट ओळख करून द्यावी हें बरें. तथापि एका एका वर्णनाची जसजशी जरूर पडेल तसतसें तें देत गेलेत ह्मणजे यांपैकीं बराच भाग ओढून ताणून रचना केल्यासारखें न दिसतां उरकून जाईल. आणि खरोखर जर असें करतां येईल तर ग्रंथांत वैचित्र्य आणि गोडी आणण्याला हा मार्ग उत्तम होईल. उदाहरणार्थ तुह्मी जेव्हां शिवाजी आणि शाइस्तेखान यांचा एकाच स्थळीं निर्देश कराल तेव्हां ऐषआरामांत निमग्न, चैनी आणि गर्विष्ठ मुसलमान आणि ऊन पाऊस थंडीवारा सोसणारे राकट, धीट, कपटी, अर्धनग्न मराठे,

या दोहोंमध्यें केवढें अंतर होतें तें थोड्या शब्दांनीं दाखवा अथवा, जेव्हां पहिल्या स्वारीचें वर्णन कराल तेव्हां लुटारू लोकांची छावणी आणि तींतले ते रानटी लोक यांची हुबेहुब तसबीर काढल्यासारखें त्यांचें वर्णन द्या. एकाद्या दूरदेशच्या लोकांच्या कृत्यांचें वर्णन करावयाचें झालें तर इतिहास आणि प्रवासवर्णन मिश्र करावें लागतें. बर्नियरचा ग्रंथ हा त्या मिश्रण-कलेचा मासला आहे असें मला वाटल्याचें स्मरतें. 'पुढें लिहावें किंवा नाहीं' ह्या तुमच्या प्रश्नाचें उत्तर मी दिलें नाहीं. वस्तुतः त्याचें उत्तर द्यावयासच नको. जसजसें पुढें लिहीत जाल तसतसा विषयविस्तार होत जाईल तो अधिक रमणीय होईल, वाचकांना नवीन पुरुषांची आणि नव्या नव्या प्रसंगांची ओळख होत जाईल तसतशी त्यांना पुढें काय झालें तें समजण्याची अधिकाधिक उत्कंठा लागेल. ग्रंथरचना करण्याची तुमची शक्ति दिवसानुदिवस वाढत जाईल आणि तुह्मांला ती अधिक सुलभ जाईल. आतां दुसऱ्या एका गोष्टीविषयीं चार शब्द लिहिले पाहिजेत. मला वाटतें तुह्मी घांटांचें जें वर्णन केलें आहे तें पहिल्या मसुद्यांतल्यापेक्षां अधिक हुबेहुब परंतु पहिल्या इतकें चटकदार नाहीं परंतु प्रथमवाचनाची गोडी दुसऱ्या खेपेस वाटली नाहीं असें ही कदाचित असेल.

## दुसरें पत्र.

मुंबई तारीख २२ एप्रिल सन १८२२.

मेहेरबान ग्रँट साहेब.

राजारामाच्या इतिहासावर मी केलेली टीका (notes) पाठविली आहे. तुह्मी आपल्याला मिळालेली माहिती उत्कृष्टप्रकारें ग्रथित केली आहे आणि त्याकाळीं घडलेल्या बहुतेक गोष्टी डोळ्यांपुढें ढळढळीत दिसतील अशा तऱ्हेनें वर्णन केल्या आहेत परंतु त्या सुव्यवस्थित नाहींत आणि मध्यें मध्यें भर घालावयास पाहिजे आहे, ती तुह्माला फुरसतीप्रमाणें सहज घालतां येईल.

निराधार गोष्टींनीं भरलेल्या पुष्कळ बखरी आणि डौली, आत्मश्लाघापूरित, तवारिखी वाचून, त्यांतील सार घेऊन, खऱ्या गोष्टी कोणत्या हें ठरवून, त्यांची सारासार विचारानें जुळणी करून, सुसंबद्ध आणि सुरेख दिसे (rational) असा इतिहास तयार करावयाचा हें काम कठीण होतें आणि तें तुमच्यावांचून दुसऱ्या कोणाच्या हातून झालें नसतें. बाकी राहिलेल्या कामाला कांहीं इतकी तयारी नको आहे. तरीपण त्यांत येणारे पुरुष आणि त्यांणीं केलेल्या पराक्रमांचीं स्थळें युरोपियन वाचकांच्या मनांत नीट भरत अशा रीतीनें त्यांचें वर्णन करणें अवश्य आहेच. छावणी म्हटली म्हणजे उत्तम व्यवस्थेनें ठोकलेल्या पांढऱ्या शुभ्र तंबूंच्या लांब लांब रांगा असें युरोपियनांच्या मनांत येतें. मराठ्यांची कल्पना तशी होत नाहीं; छावणी झटली झणजे ती डोंगरावर, दऱ्या खोऱ्यांत चारी दिशांनां किती एक मैल दूर-वर पसरलेली असावयाची; तींत हरएक प्रकारच्या, हरएक रंगाच्या आणि हरएक आकाराच्या असणाऱ्या जागा असावयाच्या; तींत, तंबू, निशाणें, झाडें, घरें, यांची सरमिसळ असावयाची, असें त्यांच्या मनांत येतें. जोन्सच्या इतिहासांत 'कूच' झटलें झणजे स्वारांच्या एक किंवा अनेक रांगा आणि तोफखाना मोठ्या मार्गानें किंवा कदाचित दोहोंकुंपांमधून चालले आहेत असें समजावयाचें असतें. मराठ्यांच्या इतिहासांत कूच झटलें झणजे स्वार, पायदळ, करोल करणारे, चालले आहेत, त्यांच्या दोहीं बाजूंस कितीएक मैलपर्यंत जमीन जशी कांहीं फुलून गेली आहे, त्यांत मध्यें मध्यें कोठें थोडेसे स्वार एकादें निशाण आणि नौबद आहे, कोठें उंटांचा तांडा मोकळाच, रस्ता सोडून चालला आहे, हत्ती, बैल, नायकिणी, फकीर बहुरूपी, खुषमस्कऱ्ये, घोड्यावरचे लोक, पायचे लोक, भालेवाले, तोड्यांच्या बंदुका घेतलेले, वाणी, मुत्सदी, सर्वकांहीं आहे असें समजावयाचें. त्यांत तुझी खुद्द आपली कल्पना ही थोडीशी लढविली पाहिजे. संताजी अथवा धनाजी वीस हजार फौज घेऊन निघाला असें वाचलें झणजे माझ्या मनांत असें येतें—तें कदाचित चुकीचें असेल—कीं ती फौज झणजे विजापूरच्या

व गोवळकोंड्याच्या सैन्यांतला शिल्लक राहिलेला गाळ, शिवाजी आणि संभाजी यांच्या पदरचे ह्मातारे लोक, दक्षिणेंतल्या राज्यांचा ऱ्हास झाला तेव्हां उठलेल्या देशमुख व पाळेगार यांच्या टोळ्या, आणि अखेर जुलूम जबरी व लूट सोसवेनासें होऊन त्रासून गेलेले आणि तींच कर्मे करण्यास उद्युक्त झालेले शहरवासी व शेतकरी लोक असावे; परंतु याबद्दल तुह्मी कांहीं तरी लिहिलें नाहीं तर परक्या वाचकाला असें वाटेल कीं हें सैन्य पृथिवीच्या पोटांतून अकस्मात् वर आलें असावें. जेव्हां तुह्माला फक्त अनुमानानें लिहावयाचें असेल तेव्हां 'बहुधा' 'अर्थात', 'असें दिसतें' वगैरे किंवा आशा अर्थाचे दुसरे कांहीं संशयदर्शक शब्द तुह्माला घालतां येतील. परंतु हे देखील वरचेवर फार ठिकाणीं घालतां कामा नये; आणि ज्या गोष्टी उघड आहेत त्यांचें स्पष्टीकरण करावयास लागून भर दिवसा दिव्याचा उजेड दाखवावयास लागतां कामा नये. इतिहासकाराचें कौशल्य मधला मार्ग स्वीकारणें हें आहे. या दोन वर्गांपैकीं संक्षिप्त आणि सांदिग्ध लिहिणें हें अगदीं थोडें वाईट आहे.'

तिसरें पत्र खडकीच्या लढाईसंबंधाचें आहे, तें असें—

मुंबई तारीख २४ एप्रिल सन १८२२.

मेहेरबान ग्र्यांट साहेब.

खडकीच्या लढाईची खरी हकीगत सांगतों. तींत महत्वाची गोष्ट ही आहे कीं त्या बाबतींत कर्नल बुर साहेबाचें आणि माझें अगदीं पुष्कळ बोलणें झालें होतें आणि असें पक्कें ठरलें होतें कीं जर लढाईचा प्रसंग आलाच तर त्याणें मराठ्यांवर चालून जाऊन युद्धाला आरंभ करावा, आणि त्याप्रमाणें करण्याला त्याणें कसूर केली हें अगदीं हातघाईस येईपयत मला मुळीं समजलें नाहीं. आह्मी नदी उतरून जाण्याला निघालों तेव्हां बुर साहेबाला चाल करण्याला सांगावें असें तुह्मी मला बोललां. त्याप्रमाणें मी सांगितलें परंतु

त्यावेळचे माझे शब्द कांहीं आतां माझ्या लक्षांत नाहींत. परंतु माझा समज असा होता कीं बुर साहेबानें हल्ला करावयाचा हें अगदीं पक्कें ठरलेलें आहे आणि लढाई सुरू झाली असें कळण्याबराबर ते त्याप्रमाणें करतील. पुढें असें समजलें कीं माझा समज अगदीं चुकीचा होता आणि हुकुमावांचून ते हाललेच नसते आणि ह्मणून त्यावेळीं जी गोष्ट घडून आली तिचें श्रेय आह्मी तुह्माला देतों. आपण हल्ला करावा असें माझ्या मनांत होतें त्याचें एक मोठें कारण, आणि बुर साहेबानें फोर्ड साहेबाची वाट न पहातां चाल करावी अशी माझी फार इच्छा कां होती तें, त्यावेळच्या माझ्या खलित्यांत (despatches) मला लिहितां येईना. परंतु शिपायांविषयींची आह्माला खात्री नव्हती आणि त्यामुळें विचाराला फुरसत राहूं न देणें महत्वाचें होतें हें तुह्माला आठवत असेल. खडकीची लढाई झाली ती पाहून मला असें खास वाटतें कीं आमचे अर्धे शिपाई जर बिघडलेले नसते तर ती आह्मी जिंकली असती, परतु आह्मी पेशव्यांपेक्षां कमकुवत आहों असें दिसतें, आमच्या छावणीवर तोफांचा भडिमार चालला असल्यानें त्रासलेले, स्वारांच्या चकमकी झडत असल्यानें आणि रात्रीं हल्ले होणार अशा कंड्यांनीं घाबरून गेलेले व अपमान पावलेले, टेंकडीवर बसून राहिलों असतों तर मला खरोखर असें वाटतें कीं आह्माला अनुकूल असलेल्यांपैकीं पुष्कळ असामी कचरले असते; आणि फितूर होण्यापासून नफा आणि पडत्या पक्षाकडे रहाण्यापासून भय ह्या दोन्ही गोष्टींचा विचार करूं लागले असते. आह्माला जय आल्यावरसुद्धां आह्मी स्वस्थ राहिलों ह्मणून घोरपडा किती नाउमेद झाला आणि किती घाबरला आणि शिलेदार गोखल्याच्या कौलेच्या (cowle)? निशाणाकडे जाण्यास कसे निघाले त्याचें स्मरण करा. आह्मी चालून गेलों असतों किंवा नसतों तरी शत्रूनें आमच्यावर हल्ला केलाच असता असें मनांत येईल; परंतु जी गोष्ट त्याला उघड उघड इतकी अनिष्ट ती त्याणें केली असती असें मानण्याचा आह्माला हक्क नाहीं; आणि त्याणें तसें केलें असतें आणि आह्मी त्याला धुडकावून लावला असता तर, तो माघारा आपल्या छावणींत जाता,

इतकेंच झालें असतें; परंतु आह्मी चालून गेल्यानें त्याचा जो नाश झाला तेवढ्यानें तो रणांगण सोडून पळत सुटला.

एल्फिन्स्टन साहेब सन १८२२ मध्यें दक्षिणेंत फिरावयास गेला तो अगष्ट महिन्यांत प्रथम पुण्यास गेला. तेथें त्याणें तीन महिने मुक्काम केला. तेथची हवा फार उत्तम, मुंबईच्या आणि पुण्याच्या हवेला जमीन अस्मानाचें अंतर असें त्याला वाटलें आणि फार आनंद झाला. तो ह्मणतो 'मी पुणें सोडून नुकता काल गेलों असें वाटतें; पण आतां कामाला लौकरच सुरवात होईल आणि ह्या स्थलाची रमणीयता पुष्कळ कमी होईल.'

पुण्याहून तारीख ११ नवंबर रोजीं निघून तो विजापुरास गेला त्याच्या बरोबर पुष्कळ मंडळी होती. विजापुरास पूर्वीं गेल्यावेळीं पाहिलेलीं प्राचीन वैभवदर्शक सर्व स्थळें त्याणें पुनः पाहिलीं. तेथून स्वारी दक्षिण महाराष्ट्र देशाकडे वळली आणि गोकाकचा धबधबा पहाण्यास गेली. घटप्रभा नदी दऱ्या खोऱ्यांतून जात जात दोन डोंगरांच्या मध्यें अगदीं अरुंद चिंचोळ्या खिंडींत सांपडली. तेथें तिच्या पात्राची रुंदी सारी ८० यार्ड झाली आणि पुढें जाण्यास मागच्या सारखा ही मार्ग उरला नाहीं तेव्हां गोकाक गांवाकडे धांव घेण्याकरितां तिणें १७८ फूट उंचीच्या कड्यावरून खालीं उडी घेतली. ह्या पडत्या प्रवाहास धबधबा ह्मणतात. ही पाण्याची धार १६००० घनफूट असावी असा अजमास केलेला आहे. धबधब्याच्या डाव्या बाजूस कोण्णूर गांव आहे तेथें एल्फिन्स्टन साहेबाच्या स्वारीचा मुक्काम होता. तारीख २४ दिसेंबर सन १८२२ रोजीं त्याणें धबधबा पाहिला. त्या दिवशींच्या त्याच्या रोजनाम्यांत लेख असा आहे.

'मी संध्याकाळीं धबधब्यावर गेलों. मी तो मागें पाहिला तेव्हांपेक्षां आतां पाणी पुष्कळ जास्त आहे. परंतु आमच्याबराबर मंडळी पुष्कळ असल्यानें आणि नेटिव्ह लोकांची गर्दी फार झाल्यानें मला मागच्यापेक्षां पुष्कळ कमी आनंद वाटला. मग रात्रीं भोजनोत्तर सुमार साडे दहा वाजतां

मी तो पहाण्यास पुनः गेलों. त्यावेळीं चांदणें पडलेलें असून सामसूम होतें. हा रात्रीचा समय ह्मणजे ज्यावेळीं "No spirit dares stir abroad......No fairy takes, nor witch has power to charm so hallowed and so gracious is the time." अशा प्रकारचा होता. जेव्हां मी धबधब्याच्या वरच्या भागावर जाऊन उभा राहिलों तेव्हां ते खडक आणि तें जंगल सौम्य आणि सुंदर दिसत होतीं. नदीचें पात्र संथ होतें, आसपास जिकडे तिकडे अत्यंत शांतता होती, तींत त्या पाण्याच्या प्रवाहाचा जो ध्वनि होत होता तेवढाच काय तो तिचा भंग करणारा होता. अशी त्या स्थळाची त्या वेळची शोभा पाहून माझ्या मनाची वृत्ति अगदीं तटस्थ होऊन गेली आणि मी आनंदांत मग्न झालों. पाण्याची जी थोरली झोत लागली होती तिची शोभा अप्रतिम दिसत होती, ती केवळ मनोगम्य होती धबधब्याचा वरचा भाग अंधक अंधक दिसत होता आणि तळ तर दिसत नव्हताच म्हणावयाचा. आस पासचे सर्व पदार्थ गाढ निद्रेंत मग्न झालेले होते. तेवढा तो एक जलप्रवाह पूर्ण वेगानें वहात होता आणि त्याची जी मोठी गर्जना होत होती तिणें माझें चित्त अगदीं पूर्णपणें आकर्षून टाकलें होतें. या वेळीं आपण केवळ ईश्वराच्या एका विभूतिसान्निध आहों असें मनांत येऊन त्याच्याविषयीं भक्ति आणि बहुतेक भोळेपणामुळें वाटणारी भीति यांणीं हृदय अगदीं व्यापून जात होतें." *

---

* **एल्फिन्स्टन** साहेबानें हें जें वर्णन केलें आहे त्यावरून पहातां धबधब्याची खरी शोभा त्याला पहावयास मिळालीच नाहीं असें वाटतें. ती गोकाकच्या बाजूस खालीं पात्रांत जाऊन खडकावर उभें राहून प्रवाहाचे जलतुषार अंगावर उडत इतकें जवळ जाऊन पाहणारास दिसते. खडकावर बसून वर नजर फेंकली म्हणजे कड्यावरून अव्याहत धो धो धो पडत असलेली पांढरी शुभ्र, प्रचंड, अखंड, विस्तीर्ण जलधारा; तिच्या पतनाच्या

सर टामस मनरो यास पत्र.

पुणें, तारीख २७ आक्टोबर १८२२.

मेहेरबान मनरो साहेब,

मी असें ऐकतों कीं तुह्मी मद्रासेस जमाबंदी कामाकरितां नेटिव्ह बोर्ड ( A native board of revenue ) सारखी कांहीं व्यवस्था केली.

---

तीव्र वेगानें खडक फूटून चूर होऊन तळाशीं झालेला डोह, त्यावर त्या पाण्यास येत असलेला सफेद फेंस, मोठ्या संथपणानें पुढें चाललेला नदीचा प्रवाह, तिच्या दोहीं बाजूस असलेले उंच डोंगर, त्यांवरून दाट लागून गेलेली, नजर न पोचें इतकी दूर पसरलेली हिरवीगार वनराजी, तिच्यावर लखलखीत ऊन पडून त्याणें आलेला तजेला, वर आकाशाकडे पाहिलें तर त्याचा अमर्यादपणा जाऊन त्यास प्राप्त झालेला संकोच, त्या जल-धारेवर तिरकस पडणाऱ्या सूर्यकिरणांच्या योगानें अधिकच खुलून दिसणारा तिचा शुभ्रपणा, इत्यादिकांची विविध, विचित्र, नैसर्गिक सृष्टिजन्य शोभा अप्रतिम आहे. धबधब्याच्या घोर अस्खलित चाललेल्या प्रचंड ध्वनीनें कानटाळ्या बसून गेल्या आहेत, त्याच्या रौप्यमय भासणाऱ्या विस्तीर्ण, लंबायमान, पातालगामी, जलधारेवरून दृष्टि काढून दुसरीकडे लावावी असें कांहीं काळ तर मनांत येतच नाहीं, चित्तवृत्ति एकाग्र होऊन मन आनंद-मग्न होऊन गेल्यानें बसल्या जागेवरून उठावें असें वाटत नाहीं; असा ह्या ईशनिर्मित लहानशा, अरण्याच्छादित पर्वततलपाषाणभेदी जलधाराप्रवाह-तीरस्थलाचा महिमा आहे. तेथें जाऊन पोहोंचण्यास जो मार्ग आहे तो सहज दिसणारा, किंवा मनांत येणारा ही नाहीं; माहितगार दाखविणारा भेटला नाहीं तर चटकन सांपडणार ही नाहीं. धबधब्याच्याउजव्या बाजूच्या दरडींतून भुयारांत जाण्यास केल्यासारखा दगडी पायऱ्यांचा जिना आहे, परंतु तो तळापर्यंत सारखा बांधलेला नाहीं. ( हा, आलीकडे गिरणीचें काम सुरू करतेवेळीं, खालीं जाण्याकरितां केलेला आहे. )

त्या सृष्टिजन्यचमत्कारांत आलीकडे मनुष्यकृतीनें आणखी भर घालून त्या वनमध्यगत स्थलाला विशेष रमणीयत्व आणलें आहे. तें असें कीं

आहे. ती तुमची व्यवस्था कोणत्या स्वरूपाची आहे तें तुह्मी मला कळवाल तर मी तुमचा फार आभारी होईन. त्या व्यवस्थेनें नेटिव्ह लोकांना मो-

---

धबधब्याच्या उजव्या बाजूस एक चर खणून त्यांतून लहानसा जलप्रवाह आणून तो एक मोठा थोरला खूप उंच लोखंडी नळ उभा करून त्यांतून खालीं सोडून दिला आहे आणि तेथें पडतांना त्याला जी शक्ति उत्पन्न झाली आहे तिच्या जोरावर चालणारी पानचक्की बांधून तिणें कापसाची गिरणी चालविली आहे. तीकरितां इमारती, ती चालविणाऱ्या युरोपियनांस रहाण्यास बंगले, डोंगरावर खूप उंच जागीं आहेत. बेळगांवाकडे जाणाऱ्या आगगाडींतील प्रवाशाची लांब, दूर उंच डोंगरावर दृष्टि गेली ह्मणजे हिरव्या गार रानांत मध्येंच तांबडें दिसतें हें काय असावें याचा तो तर्क करूं लागतो; परंतु हीं मंगरुळी कौलें आहेत असें त्याच्या ध्यानांत चटकन येण्यास कांहीं साधन नाहीं. गिरणींत काम करणारीं शेकडों माणसें नदीपलीकडील कोण्णूर वगैरे खेड्यापाड्यांत रहातात, त्यांना आलीकडे येण्यास धबधब्याच्या वरच्या बाजूस फारच थोड्या अंतरावर, गिरणीसमूर,एक बिनखांबी तारांचा पूल बांधलेला आहे, तो अधंतरीं झुलता असून त्यावरून चालतांना खालीं कड्यावरून उडी घेण्यास वेगानें चाललेला नदीप्रवाह दिसतो त्याकडे दृष्टि गेली ह्मणजे जी मौज वाटते आणि साधारणपणें भित्र्या माणसाची जी त्रेधा उडते तिची कल्पना करीत बसण्यापेक्षां तेथें जाऊन अनुभव घ्यावा हें बरें. मिरजेकडून जातांना हुकेरी रोड स्टेशनावर उतरून धबधब्याकडे जावयाचें झटलें ह्मणजे ह्या पुलावरूनच गेलें पाहिजे. त्याच्या पुढच्या गोकाक रोड स्टेशनावर उतरून गेलें ह्मणजे ती मौज पहाण्यास मुद्दाम गेलें पाहिजे. ह्या स्टेशनापासून धबधबा जवळ, सारा ३ तीन मैल आहे. मागच्या स्टेशनापासून त्याच्या दुप्पट आहे आणि रस्ता वाईट, सडक नाहीं. ह्या दोहों-स्टेशनांच्या दरम्यान आगगाडी गोकाक कालवा (canal) वलांडून जाते, तेव्हां जवळच असलेला मोठा थोरला तलाव, त्याकरितां बांधलेलें नदीचें विस्तीर्ण धरण, व त्यावरून पर्जन्यकाळीं पडत असलेली पाण्याची चादर पसरल्यासारखी दिसणारी जलधारा, यांची शोभा उत्कृष्ट आहे. ह्या दोहों-स्टेशनांत अंतर सारें साडेतीन मैल आहे.

ठाल्या व जबाबदारीच्या जागा मिळण्याला द्वार होत आहे. हा तोंपासून एक मोठा नफा आहे असें दिसतें. तशीच व्यवस्था न्यायखात्यांत किंवा दुसऱ्या एकाद्या खात्यांत करतां येईल असें तुह्माला वाटत असेल तर तसें कळविल्यास बरें होईल. नेटिव्हांवर राज्य करण्यास सल्ला मसलत घेण्यास चांगले नेटिव्ह असणें जरूर आहे; शिवाय आपल्या देशाच्या राज्यकारभारांत त्यांचा थोडा-बहुत कांहीं तरी हात असावा ह्मणून तो शिरण्यास आह्मी मार्ग तयार करून देणें ही जरूर आहे. आम्हाला असें करणें भाग पडे तोंपर्यंत कदाचित पन्नास वर्षें जातील. परंतु आह्मी राज्यकारभाराची आणि विद्याध्ययनाची जी पद्धत पूर्वीच सुरू केली आहे तिच्या योगानें ह्या देशच्या लोकांमध्यें केव्हांना केव्हांतरी असा बदल होईल कीं त्यांनां फक्त हाताखालच्या जाग्यां-वर (subordinate position) ठेवणें अशक्य होईल; आणि जर आह्मी त्यांची महत्वाकांक्षा पुरविण्याची व त्यांच्या हुशारीप्रमाणें त्यांनां योग्य अशा जागा देऊन त्यांनां संतुष्ट करण्याची तजवीज वेळींच केली नाहीं तर अकस्मात असा कांहीं भयंकर प्रसंग येईल कीं तेणेंकरून आमचें राज्य बुडेल, हें आह्मी मनांत आणलें पाहिजे. ज्यांची कांहीं विलक्षण कर्तबगारी दिसून आली आहे अशा सरकारी नोकरी बजावलेल्या नेटिव्हांनां पेनशन किंवा जमिनी देण्याबद्दल, तसेंच ज्यांची कांहीं एक नियमित मुदतींपर्यंत नोकरी झाली आहे अशांनां पेनशन देण्याबद्दल कांहीं नियम करून ठेवावे (ते प्रसिद्ध न केले तरी हरकत नाहीं) असें तुह्माला वाटतें कीं नाहीं तें ही मला सांगाल तर माझ्यावर मोठी मेहेरबानी होईल. तुह्मी लिहिलेला एक ही खलिता (minute) बरेच दिवसांत मला मिळाला नाहीं आणि तुमच्या हल्लींच्या खासगी चिटणिसाची व माझी ओळख नाहीं, यामुळें तुमचे निवडक निवडक खलिते कसे मागावे हें समजत नाहीं. परंतु मला जे मिळाले आहेत त्यांची योग्यता मी मोठी समजतों आणि तसेच पुढें मिळत गेले तर मोठे आभार मानीन. ह्या मुलखाची स्थिति कशी आहे तें चापलिन साहेबाच्या रिपोर्टा-वरून तुह्माला समजेल. ठीक चाललें आहे. परंतु पंचाइतींत कांहीं

सुधारणा केली पाहिजे, आणि जिल्हेमुनसफांची कांहीं मदत घेतली पाहिजे. ते आमच्या इकडे अद्याप मुळींच नाहींत."

ह्याच स्वारींत सीना नदीतीरीं मुक्काम असतांना तारीख ५ माहे दिसेंबर १८२२ इसवी रोजीं एल्फिन्स्टन साहेबानें आपला मित्र स्ट्राची साहेब याला पत्र लिहिलें. त्यांत साताऱ्च्या महाराजाची भेट होऊन तेथची जी स्थिति दिसून आली, तिणें आनंदित होऊन, आपण लावलेल्या वृक्षाला किती मधुर फळें आलीं त्याचें त्याणें आरंभीं वर्णन केलें आहे. तो भाग आह्मी मागें योग्य स्थळीं दिलाच आहे. त्या पत्राच्या पुढील भागांत तो ह्मणतो --

पंधरा सोळा गृहस्थ आणि तीन बायका, इतक्या मंडळीसह मी ह्या मुलखांत फिरत आहें. मी विजापुरास जाणार आहें. ही माझी दुसरी खेप होणार. पटवर्धन व दुसरे कांहीं जाहागिरदार यांच्या भेटी होतील. कोल्हापूरचा राजा आणि दुसरे कांहीं असामी यांची भेट मिरजेस घेऊन तेथून मी दक्षिण कोकणांत उतरणार. तें मी केव्हांच पाहिलेलें नाहीं. तेथें मला पुष्कळ गोष्टींची चौकशी करावी लागेल; परंतु तेथें काय करावयाचें हे मी चापलिन साहेब, कमिशनर, यांज बरोबर बोलून बहुतेक ठरवून ठेविलें आहे; ते आमच्या बरोबरच आहेत, आणि मला दक्षिण देशाची माहिती चांगली आहे, ह्मणून पुणें सोडल्यापासून ह्या पाऊण महिन्यांत मला फारसें काम पडलें नाहीं. पुण्यास असतांना मीं तेथचीं मागचीं सर्व स्थळें पाहिलीं, आणि संगमावर आलिकडच्या सर्व खुणा अगदीं नाहींशा झाल्या असल्यामुळें फरलार्न (Forlorn) च्या सर्वखुणा आणि संगमावरच्या आमच्या क्रीडा आणि यांपासून आपलें कांहीं तरी बरें होईल अशी आशा दिसत होती म्हणून आह्मी त्या दिवसांत करीत असलेले अभ्यास, यांचें मला चांगलेंच स्मरण झालें. फारसीवाचन मी पुष्कळ दिवसांपासून सोडून दिलें आहे तरी त्या दिवसांचें स्मरण व्हावें ह्मणून अजून देखील केव्हां तरी हफीजचा एकाद दुसरा गजल वाचीत

असतों. (त्याणें इष्टकार्य बहुधा झाल्याशिवाय रहात नाहीं.) आमच्या वेळेपेक्षां अलीकडची तरुण मंडळी किती अधिक सुधारली आहे हें पाहून मी अगदीं थक्क होऊन जातों. त्या काळीं तुह्मी आम्ही आपल्या बराबरीच्या मंडळी सारखे होतों, तरी मला हाल्लीं जितकें येत आहे तितकें निदान येत नाहीं असा, अलीकडे आलेल्या साधारण बुद्धीच्या तरुण मंडळांत एक ही मनुष्य दृष्टीस पडत नाहीं. विद्येमध्यें इतकी सुधारणा झाली आहे, शिवाय व्यसननिमग्नता अगदीं नाहींशी झाल्यानें व घोड्यांचें आणि कुत्र्यांचें माहात्म्य कमी झाल्यानें पुष्कळ वेळ वांचूं लागला आहे. मला आणखी पुष्कळ लिहावयाचें आहे, परंतु आतां पुरे."

एल्फिन्स्टन्न साहेबाची स्वारी देशावरून कोंकणांत कुंभारलीच्या घाटानें उतरून चिपळूणावरून मुंबईस गेली. तारीख १४ माहे जानेवारी सन १८२३ रोजीं कुंभारलीस मुक्काम होता, त्या दिवशींच्या रोजनाम्यांत असें लिहिलें आहे—आतां आह्मी कोंकणच्या गर्मींत आणि गुदमऱ्यांत सांपडलों आहों. आतां, साडे अकरा वाजतां, जरी पारा फक्त ८३ अंशांवर आहे आणि थोडासा वाराही आहे, तरी घाम चालला आहे आणि धापा देत आहों. मला चैन पडत नाहीं, त्याचें कारण कदाचित माझें डोकें दुखत आहे हें असेल. मी पुनः दक्षिणदेश सोडला आणि सोडतांना पुनः वाईट वाटलें. त्यांत हवा उत्तम होती; मजबराबर मंडळी चांगली होती, पुष्कळ व्यायाम आणि मौज होती, पुष्कळ रिकामपण होतें आणि काव्य व सृष्टिसौंदर्य यांचा रसास्वाद पुष्कळ घेतां येत होता. आतां मुंबईंत जाऊन परक्यांमध्यें पडावयाचें. तेथें निरुत्साही ठरीव मंडळी असावयाची, नित्याचें चालू नीरस काम रोज असावयाचें, कंटाळवाणें, अरुंद रस्त्यांतून फिरावयाचें, माझी दृष्टी मंदावत जावयाची, शरीर निःशक्त होत जावयाचें आणि हिम्मत कमी कमी होत जावयाची; तरी मी जेवढा सुखोपभोग घेतला तेवढ्याबद्दल आणि पुनः तसा तो घेण्याचें सामर्थ्य आलें आहे याबद्दल आभार

मानले पाहिजेत, आणि मला हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं आजपर्यंत सर्व प्रकारचीं सुखें मला आपल्या योग्यतेपेक्षां पुष्कळ अधिक भोगावयास मिळालीं, दुःख बहुधा भोगावें लागलें नाहीं; जें वाय लागलें तें माझ्याच कृत्यामुळें.'

ही दक्षिणेंतली स्वारी करून एल्फिन्स्टन साहेब तारीख १ फेब्रुआरी १८२३ रोजीं मुंबईस पोहोंचला. त्या दिवशींच्या रोजनाम्यांत असा लेख आहे—येऊन उतरलों; सरकारी बंगल्यांत गेलों; जनरल स्मिथ साहेबास भेटलों कौन्सिलची बैठक झाली. लिटररी सोसायटीला गेलों, आणि परळास गेलों. चिटणिसाकडून आलेल्या कित्येक काळ्या पेट्या पाहिल्या. ह्यांत मी उद्यां पहावीं ह्मणून कामें तयार आहेत. ह्या पहातांच मला मुंबईचा अतोनात तिटकारा आला."

युरोपियन लोकांनीं एतद्देशीय लोकांशीं चांगल्या प्रकारें वागावें, त्यांच्या रीतिभाति समजून घ्याव्या, त्यांच्यांत मिसळावें, असें एल्फिन्स्टन साहेबाचें मत होतें; तथापि त्याला कांहीं मर्यादा असावी असें त्याला वाटत होतें. ह्या संबंधानें त्यानें एका तरुण अम्मलदाराला पत्रानें उपदेश केला. तें पत्र तारीख १ माहे जून सन १८२४ चें असें—

तुह्मी मोठे नेटिव्ह आणि मोठे नाचे बनलां आहां असें मी ऐकतों. नेटिव्हांशीं परिचय करणें, त्यांच्या रीतिभाति आणि स्वभाव समजून घेणें हें मोठें अगत्याचें वाटतें. युरोपियनांनीं नेटिव्हांसारखा पोषाख केलेला पाहून मला नेहमी मोठा तिटकारा येत असे परंतु तो मी सोडून दिला आहे; कारण मला असें वाटूं लागलें आहे कीं त्या लोकांविषयीं जर तुह्माला त्या योगानें आस्था (interest) वाटूं लागत असेल तर तसें करण्यास ही हरकत नाहीं. परंतु तसें करणें देखील बेतानें असावें, त्यांत अनिवार होऊं नये, एवढा सावधपणा ठेवण्याविषयीं जपावें इतकें मला तुह्माला सांगितलेंच

पाहिजे. कारण ज्यानें नेटिव्हांच्या पोषाकाची तऱ्हा उचलली आहे आणि जो त्यांच्यासारखी ख्याली खुशाली फार करूं लागला आहे असा कोणी ही युरोपीयन पुनः आपल्या लोकांमध्यें अगदीं पूर्ववत मानमान्यता पावलेला मला कधीं दिसला नाहीं. तुह्माला नेटिव्ह लोक आवडावे, तुह्मी त्यांची भाषा शिकावी, परंतु त्यांच्या इतक्या खालच्या पायरीला जाऊं नये अशी माझी इच्छा आहे.'

सन १८२४ च्या नोव्हेंबर महिन्यांत **एल्फिन्स्टन** साहेब उभाउभीं घाईघाईनें मुंबईहून पुण्यास जाऊन आला. त्याचें कारण कर्नाटकांत कित्तूर येथें अकस्मात दंगा झाल्याचें वर्तमान आलें, तेव्हां तो मोडण्यास काय तजवीज करावी हें कमांडर-इन-चीफ साहेब व दक्षिणेचा कमिशनर चापलीन साहेब या उभयतांशीं समक्ष बोलून त्यास ठरवावयाचें होतें. कित्तूर प्रकरणास एकाएकीं भयंकर स्वरूप आलें. त्यावर **एल्फिन्स्टन** साहेबाचे किती एक खलिते झाले. त्याची साद्य हकीगत अशी—

कित्तूर हालीं बेळगांव जिल्ह्यांत मोडतें. तेथचा मालक देसाई जाहागीरदार होता. त्याला जी सनद मिळालेली होती तींत त्याच्या घराण्याकडे ती जाहागीर पुत्रपौत्रादि वंशपरंपरा चालेल असें होतें आणि त्याला सर्व अधिकार होते. मालक देसाई यास औरस पुत्र नसल्यानें त्याणें एक मुलगा दत्तक घेतला आणि तो आक्टोबर महिन्यांत वारला. तेव्हां संस्थानांतील प्रमुख मंडळीनें त्या दत्तक मुलास मालक ह्मणून गादीवर बसविण्याचा समारंभ केला. इकडे देसाई वारल्याचें वर्तमान सरकारास जाहीर झालें तेव्हां **एल्फिन्स्टन** साहेबानें कमिशनर साहेबास असा हुकूम केला कीं तूर्त संस्थान तुह्मीं आपल्या ताब्यांत घ्यावें आणि मयत देसाई यानें दत्तक घेतलेला मुलगा कोणत्या घराण्यापैकीं आहे याची चौकशी करावी. तो मुलुख टिप्पू गुत्तून (Tippu Guttun) याणें जिंकून घेण्यापूर्वी ज्या देसायांकडे होता त्यांच्याच वंशांतला हा आहे असें दिसून येईल तर त्याचें दत्तविधान जरी

यथाशास्त्र झालें नसलें तरी हरकत नाहीं, त्याला दत्तक घेण्याचा मयताचा हेतु होता एवढें सिद्ध झालें ह्मणजे सरकार त्यास मंजूर करील. हें **एल्फिन्स्टन** साहेबाचें मत अगदीं सरळ होतें. परंतु त्याचा इकडे असा विचार चालला आहे तों तिकडे मंडळीनें दत्तकास गादीवर बसवून राज्यकारभार त्याच्या नांवानें सुरू केला. गव्हरनर साहेबाच्या हुकमाप्रमाणें कमिशनर साहेबानें आपला असिस्टंट मिस्टर थाकरे यास थोडीशी फौज बराबर घेऊन कित्तुरास जाऊन व्यवस्था करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें तो गेला असतां संस्थानचे लोक बिथरून त्याच्या अंगावर आले. त्याच्या बराबरच्या त्या लहानशा फौजेचा मोड होऊन दाणादाण झाली, तो प्राणास मुकला आणि त्याच्या बराबर असलेले दोन अम्मलदार कैद झाले. (त्यांपैकीं एक पुढें सर वाल्टर ईलियट ह्मणून प्रसिद्धीस आलेला तो होय.) हें वर्तमान **एल्फिन्स्टन** साहेबास कळतांच त्याला असें भय उत्पन्न झालें कीं आतां आसपासचे बेदिल झालेले लोक ह्या दंग्यांत सामील होतील आणि कित्तूरच्या दक्षिणेस व पूर्वेस जंगली, रानवट मुलुख असल्यानें त्यांस चांगला आश्रय मिळून बंड माजेल. ह्मणून तो धांवत धांवत पुण्यास गेला आणि त्या बंडाचें अगदीं नांव राहूं देऊं नये ह्मणून त्याणें पुष्कळ फौज तिकडे रवाना केली आणि देसायाच्या घराण्याचा नष्टांश झाल्यामुळें संस्थान खालसा करून इंग्रज सरकारच्या राज्यांत सामील केलें आहे असा जाहिरनामा प्रसिद्ध केला. तसाच दुसरा एक जाहिरनामा लावला त्यांत असें लिहिलें होतें कीं अमुक मुदतीच्या आंत जे लोक शरण येतील त्यांस क्षमा होईल. त्या मुदती पुढें जे दंग्यांत सामील असतील त्यांस बंडखोर समजून शिक्षा होईल. जे मुख्य अपराधी आहेत त्यांस मात्र क्षमा होणार नाहीं. ह्या उपायानें इष्टकार्यसिद्धि तेव्हांच झाली. दंग्याच्या प्रवर्तक मंडळीस आपला हेतु पहिल्या सपाट्यास साधला ह्मणून कांहीं स्फुरण चढलें नाहीं. ते घाबरून गेले आणि धरलेल्या कैदींची हाल अपेष्टा न करतां त्यांणीं त्यांना नीट वागवून आपल्यावर फौज येण्यापूर्वींच सोडून दिलें. सरकारची फौज येऊन बंड मोडलें आणि गुन्हेगारांस शिक्षा देण्याची वेळ आली तेव्हां त्या कैदींस

आपण कसें वागविलें तें ध्यानांत आणून आपल्यावर दया करावी असें ते ह्मणूं लागले. सारें संपल्यावर **एल्फिन्स्टन** साहेबानें त्या प्रकरणीं जो अखेरचा खलिता लिहिला त्यांत असें ह्मटलें कीं बंडवाल्यांच्या पुढाऱ्यांनीं अज्ञानानें चूक केली. देसायाचा सरकाराशीं संबंध कसा होता हें त्यांनां माहीत नसल्यानें अज्ञानानें भलतीच गोष्ट केली.

याप्रमाणें बंडाचा निकाल लागून जिकडे तिकडे शांतता झाली. आतां हें प्रकरण मोठेंच वाढेल असें आरंभीं भय पडलें होतें परंतु ज्यास्त रक्तपात न होतां तें लौकरच संपलें.

**एल्फिन्स्टन** साहेब गव्हरनर असतांना सरकार आणि मुंबईचें न्यायाधिकारी वरिष्ट कोर्ट ( supreme court ) यांमध्यें तंटे उपस्थित होऊन **एल्फिन्स्टन** साहेबाला फार त्रास झाला. ती हकीगत आतां सांगावयाची. तंट्याला मूळ कारण वर्तमानपत्रांतील लेख झाले. इंग्रजी राज्य हिंदुस्थानांत स्थापन झालें त्याबराबर छापखाने सुरू झाले. वर्तमानपत्रें निघूं लागलीं. परंतु त्यांनां आतांसारखें स्वातंत्र्य नव्हतें व तें देऊंनये असेंच ठरलें होतें. **एल्फिन्स्टन** साहेबाचा मित्र स्ट्राची साहेब विलायतेस इंडिया हौसमध्यें मोठ्या हुद्यावर होता, त्याला त्याणें तारीख १० नोव्हेंबर १८२४ रोजीं एक लांबलचक पत्र लिहिलें, त्यांत त्याणें या विषयाची चर्चा बरीच केली आहे. असें स्वातंत्र्य दिलें असतां नेटिव्हांपासून आपल्या राज्याला अपाय होईल ही इंग्रजांनां भीति वाटत होती. परंतु त्यावेळीं नेटिव्हांचा वर्तमानपत्रांशीं कांहीं संबंध नव्हता, ते तीं वाचीत नसत, ह्मणून त्यांच्याबद्दल कांहीं काळजी करावयास नको असें स्ट्राची साहेबाचें मत होतें. त्यावर **एल्फिन्स्टन** साहेबाचें म्हणणें असें होतें कीं अशी स्थिति असेपर्यंत त्या विषयाला कांहीं महत्वच नव्हतें. मग २५००० गोरी फौज आणि २५०० स्वतंत्र गोरे व्यापारी एवढ्यांचकरितां वर्तमानपत्रांनां स्वातंत्र्य दिलें किंवा न दिलें ह्मणून कांहीं बिघडलें नाहीं. परंतु सद्यःस्थिति तशी नाहीं. ‘ हालीं रेसिडेन्सींत

असणारे कांहीं नेटिव्ह लोक आमचीं वर्तमानपत्रें वाचतात, त्यांणीं चालविलेलीं वर्तमानपत्रें आहेत, ते स्वतंत्रता, व्हिग (whigs) टोरी (tories) यांविषयीं बोलतात आणि त्यांची सुधारणा झपाट्यानें होत आहे; ती त्यांच्यावर कांहीं आकस्मित प्रसंग गुदरेल तर मात्र बंद पडेल, नाहींतर पडणार नाहीं. असा प्रसंग आपल्या राष्ट्राला स्वातंत्र्य असावें ह्मणून ते उतावळीनें तें मिळविण्याच्या खटपटीस लागतील तर ओढवेल'

वर्तमानपत्रांनां स्वातंत्र्य नव्हतें तेव्हां अर्थातच त्यांच्यावर नजर ठेवणारा कामदार (censor) होता, परंतु हिंदुस्थान सरकारानें तो काढून टाकून एक कायदा (regulation) केला आणि तें काम पुढें कसें चालावें तें ठरविलें. त्याप्रमाणें **एल्फिन्स्टन** साहेब मुंबईस करूं लागला तेव्हां तंट्यास सुरवात झाली. मग जो प्रकार झाला तो वाचला ह्मणजे हिंदुस्थानचा पहिला गव्हरनर जनरल वारन हेस्टिंग्ज आणि चीफ जस्टिस अलिजा इंपी यांच्यामधील इतिहासप्रसिद्ध तंट्याची ही पुनरावृत्ति आहे असें वाटतें. परंतु एवढ्यानेंच संपलें नाहीं **एल्फिन्स्टन** साहेब गेल्यावर सरजान मालकम गव्हरनर असतांना तो व त्यावेळचा चीफ जस्टिस या उभयतांमध्यें जो प्रकार घडला तो फारच विलक्षण होता. असो.

**एल्फिन्स्टन** साहेब गव्हरनर होण्यापूर्वीं मुंबईस जें मुख्य न्यायपीठ होतें त्याला रेकार्डर्स कोर्ट (Recorders court) असें ह्मणत. सरजेम्स म्याकिंटॉश ह्मणून जो मोठा प्रसिद्ध न्यायाधीश होऊन गेला तो याच कोर्टांत होता. सन १८१३ मध्यें हें कोर्ट मोडून त्याच्या जागीं वरिष्ट (supreme) कोर्टाची स्थापना झाली. त्यांतील सरन्यायाधीश (chief justice) आणि त्याच्या मदतीस असलेले इतर न्यायाधीश (puisnes) यांची नेमणूक राजाकडून झाली. या कोर्टाचा अधिकार मुंबईशहरांत मात्र चालावयाचा असें समजत असत. या शिवाय हायकोर्ट ह्मणून होतेंच; परंतु तें अगदीं पृथक होतें, त्याचा याच्याशीं कांहीं संबंध नव्हता हें नीट ध्यानांत ठेवावयाचें. त्या कोर्टाचे जज्ज कंपनीसरकारचे नोकर होते, त्याला

दिवाणी फौजदारी हे दोनही अधिकार असून ते सर्व इलाख्यावर चालत असत. वरिष्ठ कोर्टाचे नवे जज्ज मुंबईंत पाऊल टाकल्या दिवसापासून आपला व गव्हरनर आणि कौन्सिलर यांचा कांहीं संबंध नाहीं, आपण त्यांच्याहून श्रेष्ठ नसूं, परंतु स्वतंत्र आहों, असें मानू लागले असावेंसें दिसतें. ह्या वरिष्ठ कोर्टाला एक मोठा अधिकार मिळाला होता. तो असा कीं कोणताही कायदा झाला तरी तो त्यांत आधीं नोंदल्यावांचून इलाख्याच्या मुख्य शहरांत चालू होत नसे. तो नोंदविलाच पाहिजे असा कोर्ट आफ डायरेक्टर्स यांचा गव्हरनर साहेबास सक्त हुकूम होता. त्या हुकमास अनुसरून एल्फिन्स्टन साहेबानें गव्हरनर जनरलाकडून आलेला वर्तमान पत्रांसंबंधाचा नवा कायदा वरिष्ठ कोर्टाकडे नोंदण्यास दिला. तेव्हां आधीं अशा कायद्याची जरूर आहे कीं नाहीं हें ठरविण्याचा अधिकार आमचा आहे असें त्या कोर्टाच्या न्यायाधिशांनीं ह्मणून अखेर त्याची जरूर नाहीं असें ठरवून तो टाकून दिला. मग त्या विषयावर मुंबईतल्या दोन वर्तमान पत्रांत चर्चा सुरू झाली. तीं पत्रें एकमेकांशीं स्पर्धा करणारीं होतीं. प्रथम त्यांचें त्यांचेंच वाग्युद्ध चाललें होतें परंतु पुढें चीफ जस्टिस साहेब आणि खुद्द गव्हरनर साहेब हे उभयतां त्यांत शिरले. याप्रमाणें झालेला हा तंटा विशेष हास्यास्पद होण्याला आणखी एक कारण असें झालें कीं त्यापूर्वी थोड्याच महिन्यांखालीं एका वर्तमानपत्रकारानें त्या न्यायाधिशांना लागे असा कांहीं मजकूर छापल्यामुळें त्याला हिंदुस्थानांतून हांकून लावलें पाहिजे असें एल्फिन्स्टन साहेबाला वाटून त्याप्रमाणें त्याणें त्याला देशांतर करावयास लाविलेंच. ती हकीगत त्याणें स्ट्राची साहेबास पाठविलेल्या सदरच्या पत्रांत लिहिलेली आहे. थोड्याशा लोकांनां मनोरंजक वर्तमानपत्रें वाचावयास मिळावीं ह्मणून राज्याला अपाय होईल असल्या प्रकारची गोष्ट करणें वाजवी नाहीं वगैरे मजकूर लिहून तो पुढें म्हणतो—

परंतु ह्या रगळ्याशीं माझा कांहीं संबंध नाहीं. मला करावयाचें आहे तें एवढेंच कीं वर्तमानपत्रांवर नजर ठेवणारा असामी कमी करावयाचा ( तें

मी केलें.) आणि त्या बदला लार्ड हेस्टिंग्ज साहेबांनीं जे नियम केले आहेत ते अमलांत आणावयाचे. त्यांतील पहिला नियम असा आहे कीं न्यायाधिशांवर दोषारोप करूं नयेत. आमचे सर न्यायाधीश सान्या वकील मंडळीवराबर भांडत असल्यानें आमच्या लोकांतले पुष्कळ असामी त्यांचे प्रतिपक्षी झाले. त्या पक्षाच्या एका वर्तमानपत्रांत वकील लोकांनीं कांहीं लेख छापविले. त्यांत आपली निंदा आहे अशी गेल्या मार्च [१८२४] महिन्यांत सर न्यायाधीश सर ई. वेस्ट साहेबांची कागाळी आली. तेव्हां दोन्ही वर्तमानपत्रकारांस ताकीद दिली. परंतु नित्याप्रमाणें आपल्यावर हल्ले होत आहेत अशी त्यांची पुनः फिर्याद आली. तेव्हां मग ज्या पत्रकारानें तो अपराध केला होता त्याला अशी ताकीद दिली कीं तूं जर पुनः असें करशील तर तुला स्वदेशीं पाठवून देऊं. दुसऱ्या दिवशीं त्याणें दुसऱ्या (second) न्यायाधिशाला लागे असा लेख लिहिला. ताकिदीप्रमाणें त्याला स्वदेशीं न पाठवितां क्षमा मागावयास सांगितलें. तो कांहीं मागेना, तेव्हां मग त्याची रवानगी केली. परंतु आंतली खरी हकीगत अशी होती कीं त्याला परवाना नव्हता, तो अमुक मुदतींत आला तर बरें, नाहींतर त्याला स्वदेशीं पाठवावें असा कोर्ट आफ डायरेक्टर्स यांचा आधींच हुकूम आलेला होता. ती मुदत होऊन गेली. परवाना कांहीं आला नाहीं. त्याला ह्या देशांत राहून वर्तमानपत्र चालविण्याशिवाय दुसरा कांहीं धंदा करतां येण्यासारखा नव्हता; आणि तो क्षमा मागता तर त्या पत्राचे मालक त्याला काढून टाकते. परंतु ते संपन्न आणि स्वहित साधण्याविषयीं दक्ष असल्यानें तो घरीं गेला तर त्याला तेथें ही पोसण्यासारखे होते. ह्मणून तो स्वदेशीं जाण्यास कबूल होता. त्याला कंपनीच्या गलबतांतून पाठवावें असा कायदा असल्यामुळें त्याला चिनाकडून पाठविणें भाग होतें तितकां होत कोणतेंच गलबत थेट जात नाहीं, आणि त्या मार्गानें तरी [illegible] धारापुरीची महिन्यांत एकच गलबत जावयाचें होतें. असें होतें तथापि तें काम आटपून सांगितलें कीं तूं तीन महिन्यांनीं किंवा पुढें जेव्हां सांगाणी झाली. आगस्ट

कबूल असशील आणि तसा जामीन देशील तर तुला तीन महिने रहाण्याची परवानगी मिळेल. परंतु त्याला तो कबूल होईना. जामीन फार मोठ्या रकमेचा मागतां असें म्हणूं लागला. जर त्याच्या मनांत करार तोडावयाचा नसता आणि ठरल्या मुदतीपेक्षां जास्त रहावयाचें नसतें तर दहाकोटीचा जामीन मागितला असता म्हणून त्याचें काय जात होतें? याप्रमाणें तो बऱ्याच कचाट्यांत आला होता आणि त्यांतही त्याणें आगखी असें केलें कीं एक गलबत स्वतःसाठींच स्वतंत्र भाड्यानें ठरवून त्यांतून जाण्याची तयारी केली. परंतु सरकारानें त्या गलबतवाल्यास रोख ७०० रुपये त्याच्या उतारावद्दल देऊन टाकून त्याचा तो डाव चालू दिला नाहीं. सारांश नियम झालेल असल्यामुळें ते अमलांत आणणें जरूर होतें; आणि प्रतिपक्ष यत्किंचित् मागें पाऊल घेईना तेव्हां निकरावर येणें भाग पडलें. न्यायाधिशांमध्यें विशेष रहस्य नसल्यानें त्यांचा कैवार घेणें मला आपलें कर्तव्य वाटलें. कारण तसें केलें नसतें तर सरकारानें यांनां हातचे सोडले आहेत असा लोकांचा समज होऊन त्यांच्या शत्रूंनां अधिकच स्फुरण चढलें असतें. परतु अगदीं उत्तम संधी येती तरी देखील त्यांच्या फिर्यादीकडे मी दुर्लक्ष केलें नसतें.

**एल्फिन्स्टन** साहेबाला असें वाटत असे कीं हिंदुस्थानांतलें इंग्रजी राज्य पक्क्या पायावर नाहीं; तें डळमळीत आहे. केव्हां बुडेल याचा नेम नाहीं. म्हणून त्याच्यावर टीका करण्याची वगैरे सवड देऊन लोकांचीं मनें क्षुब्ध होऊं द्यावीं आणि नसता उपद्व्याप करीत बसावें हें चांगलें नव्हे. या करितां वर्तमानपत्रांनां स्वतंत्रता देऊं नये असें जें त्याचें एकदा मत झालें होतें तें कायम होतें. आपलें राज्य केव्हां बुडेल याचा नेम नाहीं असे त्याचे उद्गार त्याच्या रोजनाम्यांत पुष्कळ ठिकाणीं आहेत. परतु तें त्याचें मत लौकरच पालटलें. स्ट्राची साहेबाला, करणें वाजवी... त्यानंतर पुढें आठच दिवसांनीं त्याणें मेटकाफ साहेबाला जें पत्र लिहि... स्पष्ट दिसून येतें. ब्रह्मदेशांत लढाई सुरू झाली असल्यानें बरा... परंतु त्या वेळीं काळ्या पलटणांनां तिकडे जाण्याला हुकूम झाला, त्या तें एवढेंच कीं बंड करून त्यांणीं बंड केलें. तें फार क्रूरपणानें मोडल्यामुळें

जास्त पसरलें नाहीं. ती बातमी एल्फिन्स्टन साहेबाला कळली तेव्हां त्याणें वर सांगितलेलें पत्र लिहिलें. त्यांत तो ह्मणतो—बराकपुरचें वर्तमान अगावर कांटा येण्यासारखें आहे. परतु भय वाटण्यासारखें नाहीं. कारण विशेषतः त्यांत काळ्या अम्मलदारांचें अंग नव्हतें. आमचें राज्य कांचेचें आहे असें मी समजत असें परंतु मागच्या व अलीकडच्या काळांत त्यावर जे कठीण प्रसंग गुदरले त्यांचा विचार करून पहातां एकाद्याला असें वाटेल कीं तें लोखंडाचें आहे. मला असें वाटतें कीं तें पोलादाचे आहे त्याची धार नीट सरळ धरली तर तें काय पाहिजे तें कापून टाकील; परंतु तें ( पोलादी शस्त्र ) जर अडाण्याच्या हातांत पडलें तर त्याचा घात अगदीं थोडा बसेल. '

ह्याचवर्षी (सन १८२४) बिशप हेबेर ह्मणून एक सूक्ष्मदृष्टि, चाणाक्ष मनुष्य उत्तर व मध्य हिंदुस्थानांतून प्रवास करीत करीत मुंबईस आला. एल्फिन्स्टन साहेबानें त्याचें आदरातिथ्य चांगल्या प्रकारें केलें. तो विद्वान्, बहुश्रुत, पुष्कळ देश फिरलेला आणि ज्ञानाभिलाषी असल्यानें एल्फिन्स्टन साहेबाला त्याचा सहवास फार आवडला. उभयतांच्या मनांत परस्परांविषयीं आदरबुद्धि आणि प्रेमभाव वाढत चालला. परंतु एल्फिन्स्टन साहेब स्वभावतः संकोचवृत्ति असल्यानें पहिल्यापहिल्यानें तो त्याच्याशीं अगदीं मोकळ्या मनानें वागत नव्हतासें दिसतें. त्याचा मुक्काम मुंबईस चार महिने होता. अनेक विषयांवर उभयतांचें भाषण होत असे. परंतु एल्फिन्स्टन साहेबानें आपल्या रोजनाम्यांत त्याविषयीं फारसें लिहिलेलें नाहीं. प्रथम तारीख ३ मेचा लेख आहे तो असा—" बिशप साहेब येथें आले. सर्व लोक त्यांची वाहवा करतात. ते साधे, ममताळु, आनंदी, उदार आणि चतुर आहेत. असा सर्वतापरी चांगला मनुष्य क्वचितच पहावयास मिळतो. मी संकोचवृत्ति आणि अडाणी पडल्यामुळें त्याच्याशीं जितका दाट परिचय व्हावा अशी माझी इच्छा आहे तितका होत नाहीं." तारीख २५ मे रोजीं बिशपसाहेब कांहीं मंडळी घेऊन घारापुरीचीं लेणीं पहावयास गेले. त्यादिवशीं कौन्सिल भरावयाचें होतें. तें काम आटपून एल्फिन्स्टन साहेब तेथें गेले. तेथें काश्मिरी व फारसी गाणीं झालीं. आगस्ट

महिन्यांत बिशपसाहेब गेले. तारीख ८ रोजीं एलिफन्स्टन साहेबानें असें लिहिलें आहे—बिशपसाहेब परवां जाणार. ते येथें आल्यापासूनचा काल फार आनंदांत गेला ते आणि त्यांची पत्नी उभयतां फार मनमिळाऊ आहेत." अखेर तारीख १५ रोजीं ते गेले त्यावेळचा लेख असा आहे – बिशपसाहेबांस पोहोचविण्यास मी आज शहरांत गेलों त्या उभयतांचें स्मरण मला फार होईल. लहान एमीविषयीं तर बोलावयासच नको."

याप्रमाणें एलफिन्स्टन साहेबानें त्या आपल्या थोर पाहुण्याबद्दल अगदीं थोडें लिहिलें आहे खरें, परंतु त्या गृहस्थानें आपल्या रोजनाम्यांत त्या आपल्या यजमानाची चाल, रीत, संभाषण, वगैरे बद्दल सविस्तर लिहून ठेविलें आहे. त्यावरून एलफिन्स्टन साहेब त्याला कशा प्रकारचा वाटला तें चांगलें दिसून येतें, याजकरितां तो मजकूर साराच पुढें लिहिणें बरें वाटतें. तो म्हणतो—

" मुंबई सोडतांना आह्माला वाईट वाटल्यावांचून राहीना काहीं मंडळींचा वियोग झाल्याबद्दल तर आह्माला फारच वाईट वाटलें. सर एडवर्ड वेस्ट आणि सर चार्लस चेंबर्स हे माझे पूर्वपरिचित होते आणि आर्चडीकन बार्नस हा पूर्वींचा मोठा स्नेही मनापासून प्रीति करणारा, जिवलग मित्र आहे. परंतु एलफिन्स्टन साहेबांचें अखंड कृपालुत्व, उत्तम पाहुणचार आणि मनोहर संभाषण, हीं सर्वांहून अधिक होतीं त्यांपासून मला जसा आनंद होत होता तसा हिंदुस्थानांत किंवा युरोपांत असतांना दुसऱ्या कशापासूनही झाला नाहीं.'

'एलिफन्स्टन साहेब हा सर्व प्रकारांनीं मोठा विलक्षण मनुष्य आहे. त्याच्या अंगांत मोठी चलाखी आहे, तसेंच त्याचें मनही मोठें चलाख आहे. सरकारी कामकाजांत त्याची बुद्धि आणि परिश्रम विलक्षण दिसून येतात. त्याला ग्रंथावलोकनाची प्रीति येवढी आहे आणि बहुतेक विषयांची माहिती इतकी आहे कीं त्याच्याच सारख्या स्थितींतल्या दुसऱ्या कोणत्याही मनुष्याला तशी असलेली माझ्या पहाण्यांत आलेली नाहीं. त्याच्या रीतिभाति आणि संभाषण फार गोड आणि आनंददायक आहेत. हाल्लीं हयात असलेल्या कोणत्याही मनुष्यापेक्षां

हिंदुस्थानांत व त्याच्या आसपासच्या देशांत तो अधिक फिरला आहे. अठरा वर्षांच्या वयाचा झाल्यापासून तो राजकीय कामांत व केव्हां केव्हां लष्करी कामांतही गुंतलेला आहे. इतकें असून त्याला हिंदुस्थानांतल्या व इराणच्या भाषा शिकण्याला फुरसत मिळाली इतकेंच नव्हे. ग्रीक व लाटिन ह्या गीर्वाण भाषांचें त्याला जें काय ज्ञान होतें तें कायम राखून त्याणें तें अधिक वाढविलें आहे. शिवाय फ्रेंच व इटालियन भाषांचा त्याणें अभ्यास केला आहे. आमच्या इंग्लिश भाषेंतले जे प्राचीन व मोठे नामांकित ग्रंथ आहेत ते त्याणें वाचले आहेत. शिवाय काव्य, इतिहास, राजनीति (politics) आणि अर्थशास्त्र या विषयांवर जे चालू व लोकप्रिय ग्रंथ आहेत ते त्याणें वाचले आहेत. असे विलक्षण गुण त्याच्या अंगांत असून. आणि दारूला अगदीं शिवावयाचें नाहीं अशा प्रकारचा कृतसंकल्प असल्याप्रमाणें वागत असून, त्याला मंडळींत मिसळण्याची आवड आहे. असें असतांना ज्ञानसंपादनाला दिवसा कीं रात्रीं, त्याला वेळ तरी केव्हां मिळतो याचें त्याच्या मित्रमंडळीला आश्चर्य वाटत असतें. सर्वांच्या बोलण्यांत तोच एक विषय आहे.'

हिंदुस्थान संबंधानें त्याची जी राजनीति आहे ती मला फार शहाणपणाची व उदारपणाची दिसली; ह्या देशावर त्याचें प्रेम बसलेलें आहे. हा देश आणि यांतील लोक चांगले आहेत असें त्याला वाटतें हें उघड दिसतें. त्याची सरकारी कामाची तऱ्हा पाहिली तर ती वरून एकंदरींत असें दिसतें कीं त्या लोकांची सध्या असलेली स्थिति सुधारत जावी अशी त्याची सतत इच्छा आहे. शाळा व विद्याध्ययनाच्या ज्या इतर कांहीं सोई त्यांकडे हिंदुस्थानांतलें कोणतेंही सरकार त्याच्या इतकें लक्ष पुरवीत नाहीं. कोणत्याही सरकारचे कर येथच्यापेक्षां हलके नाहींत. ह्या देशांतील लोकांनां न्याय देण्याचें काम त्यांच्या स्वभाषेंत चालावें, पंचाइतींची स्थापना व्हावी, सरकारी कामांत नेटिव्हलोकांच्या नेमणुका बऱ्याच असाव्या आणि आपल्याला भेटण्याकरितां जे कोणी प्रतिष्ठित नेटिव्ह लोक येतील त्यांचें आगत स्वागत अम्मलदारांनीं चांगल्या प्रकारें करावें, त्यांच्याशीं चांगलें परिचित व्हावें, इत्यादि गोष्टी आमच्या ह्या

देशांतील राज्याच्या ज्या ज्या भागांत मी पूर्वी फिरलों त्यांतील राज्यपद्धतींत सुरू होणें अत्यंत अवश्य आहे असें मला दिसून आलें होतें, त्या बहुतेक सर्व येथें **एल्फिन्स्टन** साहेबानें अगदीं चालू केलेल्या आहेत. त्याची बुद्धि आणि त्याचे गुण जसे विलक्षण आहेत त्याचप्रमाणें त्याची लोकप्रियता ही पहाण्या-सारखी आहे. ( कांहीं व्यक्तींनां तो अप्रिय नसेल असें ह्मणणें नाहीं. ) " बाकीच्या सर्व सरकारी कामदारांनां शत्रु आहेत आणि मित्र आहेत, त्याची वाहवा करणारे आहेत आणि निंदा करणारे आहेत, परंतु **एल्फिन्स्टन** साहे-बाचें तसें नाहीं; त्याची जो तो स्तुतीच करतो. " असें मी एकदा त्याच्या विषयीं बोललेलें ऐकलें तेव्हां मला आश्चर्य वाटलें. तो फार उदार आहे असें मी ऐकिलें होतें आणि त्याचा मला अनुभव ही आला. '

' वर्तमानपत्रांच्या स्वातंत्र्याला **एल्फिन्स्टन** साहेब अगदीं प्रतिकूल कां आहे, त्याला कोणती भीति वाटते तें समजावें अशी माझी फार इच्छा होती. त्या विषयावर तो अगदीं मोकळ्या मनानें बोलला. हिंदुस्थानांत वर्तमानपत्रांनां स्वातंत्र्य देण्यापासून जी भीति आहे तिचा बाऊ फार केलेला आहे हें त्याणें कबूल केलें; परंतु तो म्हणाला स्वातंत्र्य दिलें असतां त्यापासून गैरसोय ( अडचण ) होणार आहे आणि भयही आहे; तें असें कीं निरनिराळ्या ठिकाणीं जे युरोपियन अम्मलदार आहेत त्यांच्यामध्यें जे राजकीय विषयांवर वादविवाद चालतात त्यांपासून त्यांच्यामध्यें ऐक्य नाहींसें होऊन तंटे उपस्थित होतात; वर्तमान पत्रांतून Lentule आणि Grachi अशीं नांवें धारण करून सरकारचीं सर्व कृत्यें प्रसिद्ध करून त्यांवर जी टीका चालते तिच्या योगानें सरकारची त्रेधा उडून जाते. तो आणखी असें म्हणाला कीं सरकाराला जर याचा बंदोबस्त करणें जरूर आहेच असें वाटलें तर मग तो करण्याला जे उपाय योजावयाचे ते पक्के आणि खरमरीत असले पाहिजेत, अर्धवट उपयोगी नाहींत. वर्तमानपत्रांवर नजर ठेवणारा अम्मलदार ( censor ) असला पाहिजे ह्मणून मी आजपर्यंत जें काय ऐकलें आहे त्यांत त्याचें मत आणि त्याचा अनुभव यांनां फार वजन दिलें पाहिजे हें मी कबूल करतों.

'घोडेस्वारांवरचा रणांतला अम्मलदार' ( Field officer of cavalry) म्हणविणाऱ्या एका मनुष्यानें आपल्या हिंदुस्थानांतल्या प्रवासाचें वर्णन केलें आहे; त्यांत त्याणें **एल्फिन्स्टन** साहेबावर असा आरोप केला आहे कीं तो धर्मलंड आणि पारलौकिक सत्याला न मानणारा आहे. ( He is devoid of religion and blinded to all spiritual truth) मी इतकेंच ह्मणूं शकतों कीं मला असें मानण्याला कांहीं कारण दिसलें नाहीं. उलटें हा त्याच्या विषयींचा लेख वाचल्यावर पुढें जेव्हां त्याची माझी भेट झाली आणि माझ्या जें काय नजरेस आलें व मला समजलें त्यावरून पहातां तो नेहमीं आचरणानें व वाणीनें शुद्ध, नीतिमान व सभ्य, सार्वजनिक उपासनेच्यावेळीं भजनालयांत नियमानें जाणारा, धर्मसंबंधीं विषयांचा चांगला माहितगार इतकेंच नव्हे, त्यावर चर्चा करण्यांत आनंद मानणारा आणि चर्चा करण्यास अगदीं तत्पर असतो असें जेव्हां पाहिलें तेव्हां मला फार आश्चर्य आणि आनंद वाटला; सर्व मुख्य मुख्य विषयांवरचे त्याचे विचार मतानुसारें शुद्ध ( doctrinally correct) आणि त्याची मनोवृत्ति गंभीर व धर्मपरायण आहे, आणि ख्रिस्ती धर्माच्या उत्तेजनास मदत द्यावी असा त्याचा हेतु असून त्याप्रमाणें करण्यास वसतीची चाल बंद करण्यास किंवा कमी करण्यास त्याणें खरोखर जितका प्रयत्न केला तितका करण्याचा हिंदुस्थानांत दुसऱ्या कोणत्याही गव्हरनराला धीर झालेला नाहीं असें मला दिसून आलें. वर लिहिलेल्या गृहस्थाच्या विचित्र विचारांहून त्याचे विचार कांहीं प्रकरणांत भिन्न असतील हें मला सहज कळतें; परंतु तें भिन्नत्व कसें कसें, केवढें आहे, हें त्याचें त्यालाही कळलें नसावें असें मला वाटतें. कारण मला असें पक्कें कळलें आहे कीं त्याणें **एल्फिन्स्टन** साहेब स्वतः कांहीं बोललेलें किंवा त्याणें कांहीं केलेलें त्याणें पाहिलेलें नसून लोकांच्या तोंडून ऐकिलेल्या गोष्टींवरून त्याच्याविषयीं आपलें मत ठरवून तसें लिहिलें. **एल्फिन्स्टन** साहेबाची चालरीत जी काय मला दिसली तिचें आपलें थोडेसें, अपुरें, वर्णन केल्यावांचून मला राहवेना; ह्मणून मी लिहिलें आहे. कारण तो जो एक मोठा सज्जन आणि अतिशय हुशार

मनुष्य माझ्या पहाण्यांत आला तो धर्मलंड किंवा नास्तिक आहे असें कोणाच्या मनांत येईल याजबद्दल वाईट वाटतें."

ह्या बिशपसाहेबांनीं मिस्टर हार्टन साहेबाला पत्र लिहिलें त्यांत एल्फिन्स्टन साहेबांविषयीं असें ह्मटलें आहे—'मी आजपर्यंत जे गृहस्थ पाहिले त्यांत तो अतिशय हुशार आणि मोठा सज्जन आहे. त्याची लोकप्रियता आणि लोकांत वजन इतकें आहे आणि राज्यांतील प्रत्येक मनुष्याची व गोष्टीची त्याला इतकी माहिती आहे कीं तशी दुसऱ्या कोणाला असलेली आजपर्यंत माझ्या पहाण्यांत नाहीं. त्याच्यासारखा माहितगार कदाचित ओडिसा येथें जो मी रिचेलाचा ड्यूक पाहिला तो एक असेल'

तारीख ७ जून सन १८२५ रोजीं बिशपसाहेबानें एक पत्र लिहिलें त्यांत असा मजकूर आहे—हिंदुस्थानचे लोक ज्ञानप्राप्ति करून घेण्याविषयीं आणि सुधारणेविषयीं फार उत्सुक आहेत. भूमिति, ज्योतिष इत्यादि शास्त्रें, तसेंच चित्रकला व शिल्पकला यांत त्यांची बुद्धि विलक्षण चालते परंतु प्रवीणता संपादण्याला नमुने, हत्यारें, आणि प्राथमिक शिक्षण लागतें तें नसल्यानें व त्यांचे धनी जे इंग्रज त्यांच्या मनांत त्यांनां तें द्यावें असें येत नसल्यानें, किंबहुना त्यांतल्या पुष्कळांनां अगदीं परवांपर्यंत त्यांनां कोणत्याही प्रकारचें शिक्षण देणें भयंकर आहे असें वाटत असल्यानें, आणि आतां शास्त्रीय ग्रंथांचें भाषांतर त्यांच्या भाषांत करण्यास शब्दास प्रतिशब्द योजतां येत नसल्यानें तें होत नाहीं. ही खरी नड आल्यानें, त्यांनां मोठ्या अडचणी सोसाव्या लागत आहेत. ह्या सर्व अडचणी दूर करण्याला एल्फिन्स्टन साहेबाच्या शाहाणपणाच्या व उदारपणाच्या कृतीनें मुंबई इलाख्यांत जितका प्रयत्न झालेला व तो सिद्धीस गेलेला दिसतो तितका तो हिंदुस्थानचें जे दुसरें भाग मी फिरलों आहें त्यांत कोठें ही दिसत नाहीं. एल्फिन्स्टन साहेबानें ह्या इलाख्यांतल्या न्यायखात्यांत फार महत्वाच्या आणि खऱ्या उपयोगीं अशा कांहीं सुधारणा केल्या आहेत. गोड स्वभाव, चांगल्या रीतिभाति, विस्तृत आणि नानाप्रकारची

माहिती, सूक्ष्म, चांगलें शहाणपण, हिम्मत आणि परिश्रमानें काम करणें, इत्यादि गुणांनीं मंडित असा तो एक मोठा विलक्षण मनुष्य अत्यंत लोकप्रिय गव्हर्नर आहे. असा दुसरा कोणी मला दिसला नाहीं.

बिशप हेबेर साहेबाचा रोजनामा प्रसिद्ध झाला तेव्हां एल्फिन्स्टन साहेब आपल्या एका मित्राला ह्मणाला मला असा संशय वाटतो कीं, मला जें काय वाटत आहे त्यापेक्षां मी त्या साहेबाजवळ जास्त बोललों असें आतां लोकांनां वाटेल.

एल्फिन्स्टन साहेबाचीं धर्मसंबंधीं मतें त्या बिशपाला वाटलीं तशींच केवळ नव्हतीं एवढें खरें आहे. परंतु तो जातीचाच भक्तिमान आणि त्याच्या मनाचा खिस्ती धर्माकडे ओढा असल्यानें साधारण परिचयानें त्याचें खरें मत कळण्यासारखें नव्हतें. तें त्या बिशपाला वाटलें तसेंच वाटावयाचें. त्याणें धर्म प्रकरणीं पुष्कळ ग्रंथ वाचले होते, विचार पुष्कळ केला होता आणि त्याला संशयही फार होते. खिस्ती धर्माला ऐतिहासिक पुरावा कसा काय आहे हें त्याणें लक्ष लाऊन पाहिलें होतें आणि लार्डनरच्या ग्रंथांची योग्यता तो थोर मानीत असे. त्याच्या रोजनाम्यांत व पत्रव्यवहारांत धर्मसंबंधीं गोष्टींचे उल्लेख अगदीं थोडे आहेत. परंतु एकंदरींत त्याच्या मतांचीं रूपांतरें पुष्कळ झालीं. ज्यांनां आयुष्य पुष्कळ आणि जे विचार पुष्कळ करीत असतात त्यांची अशी स्थिति होतेच. एल्फिन्स्टन साहेबाचें पूर्व वय ज्या मंडळीच्या संगतींत गेलें ते ईश्वर नाहीं किंवा त्याच्या अस्तित्वाची शंकाच आहे असें मानणारे (sceptic) असून तें आपलें मत उघडपणें बोलून दाखवीत असत. तो संगनिसंगदोष त्याला जड वयास राहिला नाहीं हें खचित आहे. परंतु त्याच्या पत्रांमध्यें त्यासंबंधानें जे कांहीं उल्लेख आहेत त्यांवरून असें दिसतें कीं त्याणें पुढें तें मत सोडून दिलें. मग तें कदाचित मनापासून असो वा नसो. त्याचा एक चरित्रकार ह्मणतो "त्याचीं मतें प्राचीन स्टोइक [ stoic ] पंथाच्या लोकांसारखीं असावीं असें मला वाटतें, आणि त्याचे रोजनामे वाचून हें माझें मत दृढ झालें आहे." उत्तर वयामध्यें

त्याचीं मतें कशीं होतीं हें ताडण्याची ज्याला उत्तम संधी मिळाली असा एक गृहस्थ म्हणतो " तो खरा एकेश्वरवादि होता आणि त्याच्या मतांमध्यें हेंच मुख्यत्वेंकरून दिसून येत... त्याचा चरित्रकार ह्मणतो त्याच्या आलीकडील रोजनाम्यांत धर्मसबंधीं जे कांहीं थोडे उल्लेख आहेत त्यांवरून पाहिलें तर हेंच अनुमान निघतें असें मलाही वाटतें. कसें ही असो, तो कांहीं नास्तिक नव्हता एवढें खचित आहे.

एल्फिन्स्टन साहेबाची दिनचर्या कशी असे वगैरे बद्दल वाईन साहेबाचा एक लेख आहे तो येथें दिला असतां अप्रासंगिक होणार नाहीं सबब तो पुढें देतों.—

'एल्फिन्स्टन साहेब मुंबईचा गव्हरनर आठ वर्षेंपर्यंत होता. त्या अवधींत त्या इलाख्याच्या प्रत्येक भागांत तो दोन दोन वेळ फिरला. पेशव्यांच्या राज्यांत त्याची जी शेवटची स्वारी झाली तींत मी त्याचा दुय्यम चिटणीस (Under secretary) ह्मणून बराबर होतों तो मुंबईत असला किंवा बाहेर मुलखांत असला तरी त्याचा नित्यक्रम जो एकदा ठरलेला होता तो कायम असे. तो सूर्योदयाबराबर उठे आणि आपल्या पागेंतल्या पुष्कळ घोड्यांपैकीं एकावर बसून दीडतास पर्यंत फिरावयास जाई. तो बहुतकरून भरसात्रक घोडा सोडी. त्याच्या दररोजच्या सकाळच्या उपहाराच्या पंक्तीला मुक्तद्वार (public breakfast) असे आणि फराळ होऊन सार निघून गेले, आपल्याजवळ बोलण्याच्या उद्देशानें कोणी एक ही थांबलेला नाहीं असें दिसेपर्यंत तो त्या खोलींतून उठत नसे. तेथून गेल्यावर मग मात्र तो आपल्या जवळच्या कामाच्या मंडळीखेरीज दुसऱ्या कोणास ही भेटत नसे. मी त्याच्या हाताखालीं जें काम करीत होतों तेंच सर जान मालकम्, लार्ड क्लेअर, लार्ड राबर्ट ग्रँट आणि दुसऱ्या पुष्कळ चांगल्या चांगल्या काम करणाऱ्या लोकांच्या हाताखालीं ही केलें आहे.

परंतु त्या सर्वांत **एल्फिन्स्टन** साहेब उत्तम. तो काम करणारा असा बहादर असे कीं त्याच्या पुढें एकादें पांच रुपयांच्या विचाराचें प्रकरण असलें आणि एक तहनाम्याचा मसुदा असला तरी तो तीं दोन्हीं कामें सारखीं समजे आणि तशीच मेहेनत घेऊन त्यांचा निकाल करी. त्याला लिहितांना विचार करावा लागत नसे, लेखणी सरसर चाले. तो खलिते भराभर लिहून टाकी; त्यांत चीत काट अगदीं नसे. दोन प्रहरचा उपहार (luncheon) झाल्यावर तो थोडी वामकुक्षी करी आणि तिसऱ्या प्रहरीं ग्रीक किंवा लाटीन वाची. मी त्याच्याकडे केव्हां केव्हां अगदीं संध्याकाळीं, सहा वाजतां बोलाविल्यावरून जाऊन आठ वाजतां भोजनास बसण्यापूर्वी अर्धा तास इकडे तिकडे फिरावयास सांपडे इतका काळ राहिलेला आहें. तो भोजन आटोपून दहा वाजतां उठे आणि मग आपल्या खालींत अर्धा तास वाचीत बसून नंतर जाऊन निजे तो तरुण मंडळीनें वेष्टित असे खरा परंतु कोणाचें काडीइतकें ही गैरशिस्त वर्तन त्याला पुरवत नसे; आणि भोजनोत्तर जर कोणी एकादें कांहीं व्यर्थी भाषण केलें, तर तो त्यावर कांहीं बोलत नसे, परंतु उठून खुर्ची मागें सारी आणि चालता होई. मग अर्थातच मंडळी निघून जात. आमच्या स्वारीबरोबर एक शिकारी नेहमीं असे. त्याचें काम डुकराचा तपास करण्याचें असे. तें करीत राहून शिकार साधण्याचें संधान आहे अशी त्याणें बातमी सांगतली कीं **एल्फिन्स्टन** साहेब लगेच 'आज सुटी' ह्मणे आणि शिकारीला जो निघून जाई तो एक किंवा दोन दिवस तिकडेच असे; आणि केव्हां ही शिकार झटली ह्मणजे तिची त्याला हौस वाटे. त्याच्या अंगांत पुष्कळ आश्चर्यकारक उत्तम गुण होते आणि ज्या थोर लोकांच्या गोष्टी मी ऐकिलेल्या आहेत त्या सर्वांत एका गुणानें त्याला फार उच्चस्थानीं बसविलें होतें. असा तो गुण कोणता ह्मणाल तर स्वार्थत्याग करून परकार्य करण्यास झटणें.'

वार्डन साहेबानें आपल्या ह्मणण्याच्या समर्थनार्थ कांहीं उदाहरणें दिलीं

आहेत. तीं अशीं—एकदा **एल्फिन्स्टन** साहेब पुण्यास असतांना सेनापति (Commander-in-chief) साहेबाची पत्नी आजारी पडली ह्मणून त्याणें आपला सरकारी बंगला तिला रहाण्यास दिला. दुसरा एक बंगला त्याच्या ताब्यांत होता, तो तेथच्या मुख्य धर्माध्यक्षाची स्त्री आजारी पडली ह्मणून तिला दिला. या प्रमाणें दोन ही गेल्यावर त्याला राहण्याला घर नाहींसें झालें ह्मणून वार्डन साहेब त्याला आपला बंगला घ्या ह्मणाला, परंतु तो त्याणें घेतला नाहीं; आणि जरी त्याची कंबर वरचेवर दुखत असे तरी कांहीं आठवडेपर्यंत तो तंबूत निजत असे. वार्डन साहेब ह्मणतो 'नोकरीवर असलेल्या बहुतेक थोर मनुष्यांची अत्यंत स्वार्थपरायणवृत्ति आणि याची ही वृत्ति ताडून पहा.' तो आणखी ह्मणतो—त्याची दुसरी एक गोष्ट आहे ती याहून निराळ्या प्रकारची आहे. ती गुदस्त सालीं पारीस शहरीं असतां कर्नल मोर्स कूपर साहेबानें मला सांगितली. ती अशी —तो तरुण ड्रागून (Dragoon) असतांना एकदा **एल्फिन्स्टन** साहेबाच्या स्वारींत पाहुणा ह्मणून गेला. **एल्फिन्स्टन** साहेब डुकराच्या शिकारीला निघाला तेव्हां याच्या ही मनांत जावें असें आलें. परंतु आपल्या जवळ घोडा नाहीं ह्मणून याचा जीव तळमळला. तें पाहून **एल्फिन्स्टन** साहेबानें त्याला आपल्या एका उत्तम घोड्यावर बसविलें आणि बराबर नेलें. त्याणें डुकर गांठून भाल्याची फेक केली. तें पाहून **एल्फिन्स्टन** साहेब त्याच्या जवळ गेला आणि ह्मणाला "तुह्मी फार चांगला डाव केलात. हा हात ज्या घोड्यावर बसून तुह्मी केलात तो मी तुह्माला बक्षीस देतों एवढा तुह्मी घेतला पाहिजे."

**एल्फिन्स्टन** साहेबाचा चुलत भाऊ आडाम साहेब त्याच्याच बराबर हिंदुस्थानांत आला होता. तो हिंदुस्थानांत जें अत्युच्च पद मिळावयाचें त्याला पोहोंचला होता. पुढें त्याची प्रकृति बिघडली तेव्हां तो काम सोडून विलायतेस परत गेला आणि थोड्याच दिवसांत मेला. **एल्फिन्स्टन** साहेबाला तें वर्तमान सन १८२५ च्या डिसेंबर महिन्यांत कळलें तेव्हां

त्याला जें काय वाटलें त्याच्याबद्दल उल्लेख त्याच्या रोजनाम्यांत आहेत, ते असे—

तारीख ३ डिसेंबर. आज आडाम वारल्याचें वर्तमान आलें. त्याच्या मरणानें माझा बाळपणचा स्नेही आणि माझ्या आयुष्यांतल्या उत्तम दिवसांचा सोबती नाहींसा झाला. त्याच्यासारख चांगले, त्याच्या निम्मे गुण अंगीं असलेला कधींकाळीं एकादा मनुष्य मला भेटेल, पण त्याची जागा रिकामी पडली ती पडलीच; ती कधीं भरून येणार नाहीं. एवढें मोठें माझें नुकसान आजपर्यंत कधीं झालें नाहीं अथवा पुढें होणार नाहीं; आणि तें केवढें मोठें आहे हें माझ्या मनांत येत नाहीं हें पाहून मला आश्चर्य वाटतें. पहिल्यानें तें वर्तमान खरें असेल असेंसुद्धां मला वाटेना.

तारीख २१ डिसेंबर. सतत काम चाललें आहे, त्यामुळें मोठमोठ्या मौजा मारण्याला किंवा मोठ्या शोकांत मग्न होण्याला अवकाशच सांपडत नाहीं. परंतु आतां नुकताच जो काल गेला तशा प्रसंगीं असें वाटूं लागतें कीं आतां कशी तरी विश्रांति मिळो, मग ती अभंग (महानिद्रा) असली तरी देखील हरकत नाहीं आज लॉक बाईच्या पत्राची नक्कल येऊन मला पोंहोचली. त्या पत्रांत आडाम साहेबाच्या अंतकालाचें वर्णन आहे, तें हृदयद्रावक आहे. माझा अंत तशाच प्रकारें स्वस्थपणें होईल तर चांगलें.

तारीख २६ जानेवारी सन १८२६. अद्याप माझ्या मनाला असें वाटतें कीं माझ्यावर कांहीं तरी दुःखाचा प्रसंग कोसळणार आहे. आणि माझे जे मित्र अद्याप शिल्लक आहेत त्यांच्या विषयीं विचार करूं लागलों ह्मणजे प्रथमतः मनाला असें वाटतें कीं ते सुद्धां मेले. हिंदुस्थानच्या ह्या भागांत पुष्कळ लोक मरत असल्यानें जीवित अशाश्वत आहे असें मनाला अधिकच वाटूं लागतें आणि निःकाळजीपणा वाढतो. कोणी तरी मेल्याची

बातमी येणार हें आपलें ठरल्याप्रमाणें वाटतें आणि उद्यां आपल्या मृत्यूची वार्ता निघाली तर त्यांत मोठेंसें कांहींच नाहीं असें वाटतें.

पुढें एप्रिल महिन्यांत त्याणें मयत आडाम साहेबाचा बंधु उइलियम आडाम यास पत्र लिहिलें त्यांतील मजकूर असा—

त्याच्या मरणानें अह्मा सर्वांसच दुःख झालें आहे. सान्यांत मला अधिक झालें आहे. तो माझा अतिशय जिवलग मित्र नव्हता असा वेळ मला स्मरत नाहीं. आह्मी उभयतां घरांतून बराबर निघालों आणि सर्वांना सोडून आलों तेव्हांपासून आजपर्यंत जीं इतकीं वर्षें गेलीं तीं अगदीं खऱ्या स्नेहानें घालविलीं. माझ्या आयुष्याचे शेष राहिलेले दिवस त्याच्या सहवासांत अतिशय आनंदांत जातील असें मी नेहमी समजत होतों परंतु तो न गेल्यानें आतां विलायतेस परत जाण्याची जी काय हौस वाटत होती ती बहुतेक नाहींशी झाली आणि स्वदेशीं परत गेल्यावर सुख भोगण्याचे जे माझ्या मनांत एक एक विचार येत होते ते सर्व लयास गेले. त्याचा स्वभाव नम्र (modest) दयाळु, ममताळु, आणि उदार असल्यानें त्याच्या अंगांत इतर कांहीं गुण नसते तरी तो कोणालाही प्रियच झाला असता; मग तो अत्यंत हुशार, धैर्यवान आणि निश्चयी असल्यावर काय विचारावें? त्याला जो जो ह्मणून ओळखीत होता तो तो त्याची वाहवाच करीत होता. हिंदुस्थानांत त्याचें जें स्मरण राहिलें आहे तें अशा प्रकारचें आहे. इंग्लंडांत त्याचे फक्त सरकारी कामांत सार्वजनिक गुण (public virtues) दिसून येत होते, तरी तेथें देखील त्याची योग्य ती प्रशंसा होत होती हें पाहून मला संतोष वाटतो."

मुंबई सरकार आणि वरिष्ठ कोर्टाचे न्यायाधीश यांच्यामध्यें स्नेहभाव नसल्यानें कसा प्रकार झाला तो मागें सांगितलाच आहे. चीफ जस्टिस सर ई. वेस्ट साहेब याचे मनानें असें घेतलें होतें कीं आपली व आपल्या

हुद्याची (office) अप्रतिष्ठा करावी असा हेतु धरून गव्हरनर साहेबांनीं हें कृत्य मुद्दाम आरंभिलें आहे. परंतु हा आपला गैरसमज आहे असें कळून त्यांची समजूत पटली तेव्हां तटा मिटला आणि खुलासा झाला. परंतु तो फार काळ टिकला नाहीं. पुढें थोड्याच दिवसांत एक अगदीं अश्लाघ्य असा तंटा झाला आणि वार्डन साहेबानें कान्सिलाकडे शी फिर्याद नेली कीं कोर्टानें माझी प्रतिष्ठा ठेवावी तशी ठेवली नाहीं त्या प्रकरणांत एल्फिन्स्टन साहेबाचा प्रत्यक्ष संबंध येऊन पुनः पत्रव्यवहार सुरू झाला आणि त्यांत मागें संपून गलेल्या गोष्टींचा उल्लेख झाला. त्या प्रकरणाची हकीगत एल्फिन्स्टन साहेबान आपल्या एका मित्राला लिहून सारे कागदपत्र त्याच्याकडे पाठविले. तो ह्मणता--

आमच्या उच्च युद्धाला सुरवात झाली ती अशी --वार्डन साहेब हे कौन्सिलचे एक सभासद आहेत. त्यांनां वरिष्ट कोर्टानें आपल्यापुढ साक्ष देण्याकरितां बोलाविलें. तेव्हां त्यांणीं एक खासगी चिठी पाठविली तींत असें लिहिलें होतें कीं मला पिंजऱ्यांत बसवूं नये, आपल्या जवळ बसवून जबानी घ्यावी; असा माझा हक्क आहे सरन्यायाधीश साहेबांनीं ती चिठी न उघडतांच परत पाठविली आणि वार्डन साहेबाला असें कळविले कीं तुमच्या-कडून पूर्वीं एक चिठी आली होती आतां दुसरी घेतां येत नाहीं. तेव्हां-पासुन कित्येक तंटे झाले आणि त्यांपैकीं जे दोन फार मोठे आहेत ते अजून चालून आहेत. बंगाल्यांत छापखान्यां संबधानें जे नियम आहेत ते येथ नोंद-ण्यास द्यावे असा कोर्ट आफ डायरेक्टर्स यांणीं हुकूम केल्यावरून दिले. वरिष्ट कोर्टानें त्यांची जरूर नाहीं असें ह्मणून नोंदले नाहींत, टाकून दिले; आणि वर्तमानपत्रांच्या स्वातंत्र्याची पुष्कळ स्तुति केली. हा कोर्टाचा ठराव ऐकून बंगाल्यांतल्या एका वर्तमानपत्राला मोठा आनंद झाला, आणि अशा उत्तम समया मुंबईचीं पत्रें मौन धरूनच बसलीं ह्मणून त्याणें त्यांची निर्भत्सना केली (कोर्टाच्या तक्रारीवरून एका वर्तमानपत्रकाराला स्वदेशीं लाऊन दिला तेव्हांपासून मुंबईचीं पत्रें गप्प होतीं.) ती सहन न होऊन मुंबईच्या

एका पत्रानें त्याला जवाब दिला. त्यांत वर्तमानपत्रासंबंधानें जो कायदा झाला होता तो योग्य आहे असें प्रतिपादन केलें होतें आणि असें लिहिलें होतें कीं आह्मांला मुंबईंत वढाई मारण्यासारखें स्वातंत्र्य नाहीं दुसऱ्या (मुंबईच्या) पत्रानें त्याच्यावर उठून वरिष्ठ कोर्टाचा व स्वतंत्रतेचा पक्ष उचलून त्या तर्फेनें लिहिलें याप्रमाणें हे वाग्युद्ध वाढत जाऊन अखेर सर न्यायाधिशांनीं त्या स्वातंत्र्याच्या शत्रूला दंड करतों आणि तुरुंगांत टाकतों अशी धमकी दिली. स्वतंत्रतेचा आणि कोर्टाचा पक्ष स्वीकारलेल्या पत्रकारानें सर न्यायाधिशाचा भाषणाचा रिपोर्ट ह्मणून एक कागद तयार केला आणि तो पसंत करण्याकरितां त्याच्याकडे पाठवून दिला. (तो लेख अत्यंत कडक आणि मनसोक्त होता.) सर एडवर्ड साहेबांनीं तो बिनचूक नाहीं ह्मटलें आणि आपण एक सौम्यशब्दयुक्त लेख तयार करून पाठविला. तो त्यानें छापून प्रसिद्ध केला; परंतु असें लिहिलें कीं हा लेख फार मोठ्या आधाराचा आहे, परंतु आमच्या बातमीदाराकडून जीं टिपणें आलेलीं आहेत त्यांच्याशीं याचा सर्वांशीं मेळ आहे असें नाहीं. सर न्यायाधिशांनीं ज्या पत्राला धमकावलें होतें त्याच्याशीं सरकारचा संबंध आहे असें आपण तयार करून दिलेल्या लेखांत कांहीं ठिकाणीं खोचून लिहिलें होतें आणि आपल्या त्या सौम्य लेखांत ही तें पत्र "सरकारी" असें ह्मटलें होतें. सरकारचा आणि वर्तमानपत्रांचा संबंध आहे असें न्यायाधीश साहेबांना वाटत होतें तें त्यांचें खासगी मत होतें; परंतु तें त्यांनीं जेव्हां या प्रमाणें सरकारी रीतीनें प्रकट केलें तेव्हां मला त्याच मार्गानें त्याचा निषेध करणें योग्य वाटलें. मी आणखी असें ही लिहिलें कीं न्यायाधिशाच्या हातच्या अशा लेखाचा परिणाम असा होईल कीं विलायतेस 'ओरिएंटल हेरल्ड" पत्रांत जे कांहीं निंदात्मक लेख आले तशा प्रकारच्या लेखांना खरेपणाचें स्वरूप येऊं लागेल. ह्या माझ्या लेखाला सर एडवर्ड साहेबांनीं बरेच दिवस उत्तर दिलेंच नाहीं. मग दिलें, त्यावर मी

पुनः लिहिलें. * * *. त्याला पाऊण महिना होऊन गेला तरी त्याचा अजून जबाब नाहीं. दुसरें प्रकरण याहून जड आहे. सन १८१८ तल्या लढाईच्या शेवटीं पेशव्यांच्या एका किल्लेदारानें किल्ला आमच्या स्वाधीन केला. पेशव्यांचा जो पैका त्याच्या हातांत होता तो स्वाधीन करण्याचा ही त्याणें करार केला होता, परंतु तो मोडला आणि त्यांतला बराच भाग घेऊन तो पळून गेला. तेव्हां त्या किल्ल्याला वेढा घालून बसलेल्या फौजेवरील अम्मलदार आणि मुंबई सरकार यांणीं बरीच आरडा ओरड केली. ( त्यावेळीं सर ई. नीपियन साहेब गव्हरनर होता. ) तो किल्लेदार जो पळाला तो पुण्यास गेला. तेथें मी कमिशनर वरिष्ठ सरकारच्या हात खालचा, होतों. कप्तन राबर्टसन पुण्याचा कलेक्टर होता. त्याणें त्या किल्लेदाराला धरलें. त्याच्याजवळ पुष्कळ पैसा सांपडला आणि हिशेब सांपडले त्यांवरून पहातां त्याच्याजवळ आणखी पुष्कळ असला पाहिजे असें दिसलें. कांहीं रक्कम देऊन तो मुक्त झाला आणि मग तो पैसा आपला खाजगी होता सबब परत मिळावा असें ह्मणून कव्हां त्या साऱ्याबद्दल तर केव्हां कांहीं भागाबद्दल, असें मागणें करूं लागला. तो पुढें पुष्कळ वर्षें जिवंत होता, व बरेच दिवस मुंबईस येऊन राहिला होता—तेव्हां बहुतकरून वकिलांचे अभिप्राय घेत असावा—परंतु त्याला कोर्टांत फिर्याद करण्याचा केव्हां ही धीर झाला नाहीं. मरतेवेळीं त्याणें मुंबईच्या एका सावकाराला आपलें मृत्युपत्र चालविण्यास अधिकार दिला आणि थोड्याशा रकमेला आपला हक्क त्याला विकून दिला. त्या सावकारानें कंपनीसरकारावर फिर्याद लाविली. तेव्हां ह्या कोर्टाला ही फिर्याद घेतां येत नाहीं; कारण जिंकून घेतलेल्या मुलखांत पूर्णपणें शांतता होण्यापूर्वीं, लुटीमध्यें मिळालेल्या द्रव्यासंबधाचा हा प्रश्न असून शिवाय तो मुलुख वरिष्ठ सरकारच्या ताब्यांत होता, ( मुंबई इलाख्यांत नव्हता. ) अशी आमच्या वकिलानें तक्रार केली; परंतु कोर्टानें ती मान्य केली नाहीं आणि खटला सुरू केला. तेव्हां वादीच्या वकिलाला मोठें स्फुरण आलें आणि तो अद्वातद्वा बोलूं लागला. त्याणें सरकारावर हवें तसें तोंड सोडलें;

हा खटला याप्रमाणें चालला असतांना वादीच्या मागण्यावरून कोर्टानें सरकारच्या सेक्रेटरीला समन्स काढलें आणि मराठ्यांबराबरच्या लढाईसंबंधाचे सर्व कागदपत्र कोर्टांत घेऊन यावें असा हुकूम केला. कोर्टाचा हुकूम अयोग्य, भलताच आहे, हा मान्य करावा कीं काय याचा विचार सुरू होऊन एल्फिन्स्टन साहेबानें दोन खलिते (मिनिटें) लिहिले; पैकीं तारीख १९ सेपटेंबर १८२६ च्या मिनिटांत असें ह्मटलें कीं कोर्टाला असा हुकूम करण्याचा व तो अमलांत आणण्याचा अधिकार आहे कीं काय याविषयीं आडव्होकेट जनरल याचा अभिप्राय घ्यावा आणि तो हुकूम मानणें कायद्यानें भाग आहे असें ठरल्याशिवाय कांहीं झालें तरी तो मानूंनये.

कोणी मनुष्यानें फिर्याद केली आणि सरकारानें केलेल्या एकाद्या तहा-संबंधाचे किंवा दुसऱ्या एकाद्या प्रकरणांतले कागदपत्र हजर करावे ह्मटलें ह्मणजे ते हजर केले पाहिजेत असा एकदा दाखला पडला ह्मणजे त्यापासून किती अनिष्ट परिणाम घडणार आहेत याविषयीं लिहून एल्फिन्स्टन पुढें ह्मणतो—आपण अगदीं भलतें, विलक्षण मागणें करीत आहों, हें मान्य होणार नाहीं, अशी वादीची पक्की खात्री असून असें मागणें करण्यांत त्याचा उद्देश इतकाच असावा कीं तें मान्य होऊं नये आणि मग आपल्याला जरूर ती माहिती मिळाली नाहीं अशी आपण तक्रार करावी हें, अगदीं उघड आहे. तर त्याला अशी सवड सांपडूं नये ह्मणून असें करावें कीं त्या प्रकरणाचा खुलासा होण्याला उपयोगीं पडण्यासारखे जितके कागदपत्र असतील तितके सारे द्यावे. अमुक अमुक कागद हजर करावे असें जर त्याचें स्पष्ट नांव घेऊन मागणें होईल तर ते सारे मी देईन. दोन गुप्त कागद आहेत त्यांचें प्रसंगवशांत मागणें होईल तर तेवढे मात्र देणार नाहीं, कारण आह्माला ज्या बातम्या लागत त्या कोणीकडून तें त्यांत आहे तें बाहेर पडेल.'

आडव्होकेट जनरल याचा अभिप्राय एल्फिन्स्टन साहेबाप्रमाणेंच

पडला तेव्हां थोड्या दिवसांनीं त्या विषयावर त्याणें पुन: लिहिलें. तो ह्मणतो—

'मराठ्यांबरोबरच्या लढाईच्या संबंधाचे मुंबई सरकारच्या दप्तरांत जे कागदपत्र आहेत त्यांचा प्रचंड ढीग आहे. (त्यांपैकीं बहुतेक मी कधींच पाहिलेले नाहींत). त्या थोरल्या ढिगांतले कोणते कागदपत्र बाहेर निघाले असतां सरकाराला बाधक होतील हें मला सांगतां येणें अशक्य आहे.'

'मला वाटतें त्यांत अशा प्रकारचे कागद असलेच पाहिजेत—अमूक अमूक राजेरजवाडे आमच्याशीं इमानानें वागत आहेत कीं नाहीं याविषयीं शंका आहे, असें ज्यांत नमूद आहे; आमचें सरकार कोणत्या कोणत्या गोष्टींत दोषी आहे तें ज्यांवरून दिसून येईल असे; अद्याप तडीस गेलीं नाहींत अशीं कारस्थानें केलेलीं ज्यांत लिहून ठेवलेलीं आहेत; कितीएक लोकांकडून आलेलीं अशीं पत्रें कीं त्यांतील मजकूर बाहेर फुटला तर त्या लोकांचें नुकसान होईल, आणि पुष्कळ दुसरे अशा प्रकारचे कागदपत्र कीं ते बाहेर काढणें ह्मणजे विश्वासघात करणें होईल.'

'दप्तरांतले कागद दाखविण्याला माझी हरकत आहे त्यांतला मुद्दा हा आहे. परंतु चालू खटल्यांत जे कागद मागत आहेत ते हजर केले असतां सरकारचें कांहीं नुकसान होईल असें मानण्याला जरी कांहीं विशेष कारण नसलें तरी देखील ते दाखवूं नयेत असें मी ह्मणतों त्यांतलें मुख्य बीज असें आहे कीं एकाद्या वकिलानें उठून सरकारच्या अमुक खात्याच्या दप्तरांतले कागद आले पाहिजेत असा वरिष्ठ कोर्टाला अर्ज केला कीं ते दिले पाहिजेत असें एकदां झालें ह्मणजे असें होईल कीं कोणत्याही कामांत गुप्तपणा ह्मणून उरणारच नाहीं; मग तें काम स्वराज्यसंबंधानें असो कीं परराज्यसंबंधीं असो; खुद्द आमचे जे विचार ठरतील त्यांवर किंवा कोणत्या एकाद्या कामांत आह्मी ज्या लोकांशीं बोलणें चालणें करूं त्यांवर कोणी विश्वास ठेवणार नाहीं.'

याप्रमाणें आपले विचार नमूद करून त्याणें अखेर असें ठरविलें कीं

कोर्टानें मागितलेले कागदपत्र देऊं नयेत. ‘आपला हुकूम अमान्य केला, समन्समध्यें लिहिल्याप्रमाणें सेक्रेटरीनें कागद हजर केले नाहींत, ह्मणून कोर्ट जर त्याला अटकेंत ठेऊं लागेल तर हेबिअस कारपस (Habeas-corpus)+ मागावा. तो अर्ज कोर्ट नामंजूर करील तर मग आपल्याला जेवढी खबरदारी घेतां येण्यासारखी असेल तेवढी घेऊन, आह्मी हे कागद कांहीं खुषीनें देत नाहीं वगैरे ह्मणून, ते प्रसिद्ध होतील त्याजबद्दल कोणत्याही प्रकारें सरकारावर जबाबदारी येणार नाहीं अशी तजवीज करून द्यावे.

आडव्होकेट जनरलचें मत कागदपत्र देऊं नयेत असें असतां तें बाजूस ठेऊन कोर्ट निकरावर येईल असें **एल्फिन्स्टन** साहेबाला वाटत नव्हतें. त्याणें आणखी असें लिहिलें कीं ‘कोर्ट सेक्रेटरीला अटकेंत ठेवील तर ठेऊं द्यावें, Habeas corpus मागावा, आणि मग कागदपत्र द्यावे. असें मी ह्मणतों त्याचें कारण असें आहे कीं मग हें प्रकरण विलायत सरकारापुढें नेऊन टाकण्याला आह्माला कोणती ही हरकत नाहीं. आह्मी करण्याची अमूक गोष्ट राहिली असें होऊंनये. आडव्होकेट जनरल याचें मत जर असें असेल कीं आह्मी इतक्या पंथाला जाण्याची जरूर नाहीं, कागदपत्र देण्यापूर्वी तक्रार केली ह्मणजे पुरे, तिचें फळ तेंच आहे; तर मग माझा कांहीं आग्रह नाहीं; ही गोष्ट निकराला गेली असतां सेक्रेटरी अडचणींत पडणार आणि सरकारची अप्रतिष्ठा होणार, तसें होऊं नये अशी माझी इच्छा आहे हें खचित. परंतु ह्या प्रकरणाचा निकाल न लागतां तें मुग्धावस्थेंत ठेवण्याची यत्किंचित् सवड मी आपल्याकडून उरूं देणार नाहीं. सार्वजनिक हिताकरितां आपल्याला कोणत्याही प्रकारचा त्रास सोसावा लागला तरी तो सोसण्याला सेक्रेटरी साहेब

---

+ A writ to a jailor to produce the body of one detained in prison, and to state the reasons of such detention, that the court may judge of their sufficiency.

माझ्याप्रमाणें तयार आहेत ही माझी खात्री आहे असें मी ह्मटलें तर यांत ह्मणजे त्यांची उत्कंठा विशेष आहे असें ह्मणतों असें नाहीं.

खटला पुढें चालला तेव्हां कागदपत्र हजर न केल्यामुळें वार्डन साहेबाला अटकेंत ठेवण्याचा कोर्टानें हुकूम केला कीं काय तें समजत नाहीं. खटल्याचा निकाल वादीतर्फेनें होऊन प्रतिवादी **एल्फिन्स्टन** साहेब याणें १७५४२९० रुपये वादीस द्यावे असा निवाडा झाला. त्यावर प्रिव्ही कौन्सिलाकडे अपील होऊन त्यांत तो रद्द झाला. State trials म्हणजे सरकारी खटले निकालांत आले त्यांची नवी आवृत्ति छापलेली आहे त्या पुस्तकाच्या दुसऱ्या भागांत ह्या खटल्याची सर्व हकीगत दिलेली आहे.

**एल्फिन्स्टन** साहेबाच्या पाठीमागून सर जॉन **माल्कम** मुंबईस गव्हरनर झाले, आणि सर आर **ग्रांट** चीफ जस्टिस झाले. त्या उभयतांचा तंटा लागून तो अगदीं विकोपास गेला. ती बातमी विलायतेस पोहोंचली तेव्हां **एल्फिन्स्टन** साहेबानें आपला मित्र सर जे. वेडरबर्न अकौंटट जनरल मुंबई, ह्यास पत्र पाठविलें त्यांत मजकूर आहे तो—

सुप्रीम कोर्टाबराबर सारखा तंटा चाललाच आहे हें ऐकून मला वाईट वाटतें. ह्या कलहाला आरंभ माजी सर न्यायाधिशांनीं केला. ते फार हुषार मनुष्य होते. ते हाल्लींच्या इतक्या विकोपाला कधीं तरी तें प्रकरण नेते असें मला वाटत नाहीं. परंतु त्यांच्यापेक्षां चांगल्या स्वभावाचे लोकही आड वाटेला गेलेले आहेत. एकंदरींत कदाचित् असें ह्मणतां येईल, कीं झालें तें बरेंच झालें; ती सुदैवाची गोष्ट मानली पाहिजे; कारण त्या साऱ्या प्रकरणाचा येथें अगदीं पुरा निकाल लागला. परंतु यामुळेंच सर आर ग्र्यांट साहेबांबद्दल वाईट वाटतें; कारण खासगी वागणुकींत पाहिलें तर ते चांगले गृहस्थ दिसतात. बोर्ड आफ कंट्रोलचा त्यांच्यावर फार राग झाला आहे.'

सन १८२६ च्या जून महिन्यांत **एल्फिन्स्टन** साहेब पुण्यास गेला

आणि तेथून त्याणें राजीनामा पाठविला. हालींप्रमाणें तेव्हां गव्हरनरानें पांच वर्षें काम केलें कीं त्याची रवानगी व्हावयाची असें नव्हतें. त्याला काम करावयास लागून जवळ जवळ आठ वर्षें होत आलीं होतीं. राजीनामा विलायतेस पोहोंचून, तो मंजूर होऊन, दुसऱ्या कोणाची ती नेमणूक होऊन त्याला हुकूम होऊन, तो दाखल होऊन त्याला मोकळा करीपर्यंत वर्ष सहा महिने सहज लोटणार होते. तितके दिवसही त्याच्या मनांत रहावयाचें नव्हतें. परंतु त्याला इलाज नव्हता; रहावयास पाहिजेच होतें. हा राजीनामा देण्याचा विचार त्याणें अकस्मात केला असें नाहीं. तो त्याच्या मनांत बरेच दिवस घोळत होता. विलायतेंतल्या आपल्या मित्रमंडळीस त्याणें आपला बेत कळविला होता. त्यांनां तो पसंत पडला नव्हता. त्याणें राजीनामा देऊं नये ह्मणून त्याचें मन वळविण्याविषयीं त्यांणीं त्याला लिहिलें, परंतु त्याणें तें कांहीं ऐकिलें नाहीं. त्याच्या मनाचा निश्चय झाला तो झाला. त्याला कांहीं कारणेंही होतीं, नाहीं असें नाहीं. सर न्यायाधिशाबराबर जो कलह सुरू झाला तो उत्तरोत्तर वाढत चालल्यानें त्याच्या मनाला अधिकच त्रास होऊं लागला; कौन्सिलमध्यें आजपर्यंत जसें सुरळीत काम चाललें होतें तसें चालेनासें झालें. लोकशिक्षणासंबंधानें त्याचे जे विचार होते त्यांचें विलायत सरकारांत जसें चीज व्हावें तसें झालें नाहीं; त्याला उत्तेजन मिळालें नाहीं. तो जरी अद्याप भर ज्वानींत होता तरी इकडच्या हवेचा अम्मल त्याच्या प्रकृतीवर बसावयाचा राहिला नाहीं. तिणें त्याच्या गात्रांनां शिथिलता आणली होती, त्यामुळें उन्हाळा आणि पावसाळा आला ह्मणजे त्याला बरें वाटेनासें होई, आणि केव्हां केव्हां तो आजारी पडे आणि त्याचें मन उदास होई. आपल्या हातून राज्यकारभाराचें काम पुष्कळ दिवस झालें, नोकरी ही सतत तीस वर्षांवर झाली, आपली कीर्ति मागें रहाणार नाहीं असें ही नाहीं, जवळ पैसा नाहीं, पुढें चरितार्थ कसा चालेल ही ही काळजी नाहीं, पुढें दिवस कसे येतील याचा नेम नाहीं, अकस्मात एकादी विपरीत गोष्ट घडून येऊन आजपर्यंत मिळविलेला नांवलौकिक जाण्याचा प्रसंग येणार, चाकरी सोडून केव्हांतरी जावयाचेंच आहे, आतां चाकरी पुरे असें हक्कानें ह्मणतां येण्यासारखें

आहे, तर तसें ह्मणून जावें हेंच बरें, अशूनें जाण्याची वेळ हीच आहे, असे अनेक विचार मनांत आणून त्याणें राजीनामा पाठवून दिला. आतां मी एकदां घरीं केव्हां जाईन अशी त्याला मागें जी उत्कंठा लागली होती ती कांहीं आतां उरली नव्हती, तिकडला ओढा कमी झाला होता, परंतु त्याच्या बदला प्राचीनकाळीं वैभवाच्या शिखरास पोहोंचून गाजलेले ग्रीस व इटली हे देश पहाण्याची अतोनात हौस उत्पन्न झाली होती. ते पाहून झाले आणि स्वदेशीं गेलें ह्मणजे मग मात्र कांहीं काम ना धंदा, तेव्हां तो रिकामपणचा वेळ कसा जाईल एवढी मात्र एक काळजी उत्पन्न झाली होती. घरीं बसून ग्रंथलेखनाचा जो मोठा उद्योग त्याणें आरंभिला त्याची यत्किंचित् कल्पनाही ह्यावेळीं त्याच्या मनांत आली असल्याचें दिसत नाहीं; ही आश्चर्य मानण्या-सारखी गोष्ट आहे.

राजीनामा देण्याचा निश्चय होऊन त्याप्रमाणें दिल्यापासून त्याचें सारें मन पुढच्या गोष्टींकडे लागलें. त्या संबंधाचे उल्लेख त्याच्या रोजनाम्यांत व पत्रांत अनेक ठिकाणीं आहेत, त्यांतून कांहीं उतारे पुढें देतों—

पुणें, तारीख १६ जून. मी आतां नुकता चाकरीचा राजीनामा विला-यतेस पाठवून दिला. या गोष्टीमुळें आजचा दिवस स्मरणांत ठेवण्यासारखा झाला. या गोष्टीचें मला मागाहून वाईट वाटणार नाहीं अशी मला आशा आहे. पुष्कळ जणांनां असें वाईट वाटत असतें. परंतु मी अगदीं विचार-पूर्वक राजीनामा पाठविला आहे. तो पाठवितांना उगाच भलत्या भलत्या विलक्षण आशा मनांत आणल्या नाहींत. मला हिंदुस्थानांत येऊन तीस वर्षें झालीं. मला वर्षास निदान २५०० पौंड (पेनशन) मिळतील. मला जर जावयाचें आहे तर जाण्याची हीच वेळ आहे. मला गव्हरनर होऊनही आतां आठ वर्षें होतील. माझी जाण्याची इच्छा नसतां मला काढून टाकावें किंवा राहून दुर्दैवाच्या एकाद्या फेऱ्यांत सांपडावें असा प्रसंग आणून घेणें कांहीं योग्य नाहीं.

तारीख १९ आगस्ट. मी फार कामांत आहें. काल रात्रीं मेजवानी होती; ती चांगली झाली. उष्मा होत आहे; पर्जन्य नाहीं. आज अभ्र आलें होतें आणि फार चांगली हवा वाटत होती. कांहीं थोडी मंडळी आज येथें घरींच भोजनास होती ती भोजन करून बाळाजीपंत नातूकडे नाच पहावयास गेली आहे आणि मी पुष्कळ वर्षांमागें (तारीख १६ नोव्हेंबर १८१८) जसा येथें अगदीं एकटा होतों तसा आज राहिलों आहें. मी थोडा वेळ चांदण्यांत फिरलों आणि मग त्या दिवशींचा रोजनामा वाचला. तेव्हांचे ते दिवस हिमतीचे, पुढच्या आशेचे, आणि काम करण्याचे होते. आतांचे तेव्हांपेक्षां फार थंडाईचे आहेत, परंतु वाईट नाहींत आणि अगदीं तोट्याचेही नाहींत. मी आणखी आठ वर्षे राहिलों तर कोठें असेन? आणि माझे विचार कसे असतील: तो काल अभ्यासाचा आणि शांततेचा असेल कीं सुस्तीचा असेल, आणि मधून मधून फक्त थोडा त्रास होईल? दक्षिणदेश सोडण्यापूर्वी आणि मुंबईस गेल्यानंतर, स्वदेशाविषयीं माझ्या मनांत काय काय विचार येत होते ते मी वाचले. मला असें दिसून येतें कीं मला जें सुखाचें मुख्य साधन (द्रव्य) तें तेव्हांपेक्षां चांगलें आहे आणि इतर साधनें तेव्हांपेक्षां फार वाईट आहेत असें नाहीं. तेव्हां जी काय थोडी आशा आणि भीति होती ती जाऊन त्यांच्याजागीं चांगली खात्री वाटण्यासारखें झालेलें आहे.

तारीख २० आगस्ट. झोंप येईना म्हणून मी अगदीं पहाटे उठलों आणि घोड्यावर बसून प्रथम संगमावर गेलों आणि मग नदीतीरानें जात जात होळकराबरोबर लढाई झाली त्याच्या आदल्या दिवशीं हामिल्टन आणि मी ज्या टेंकडीवर गेलों होतों तेथपर्यंत गेलों. पहिल्यानें मला झोंप येत होती, आणि तीं स्थळें पाहून मनाला कांहीं वाटलें नाहीं, परंतु कांहीं वेळानें त्या मागच्या काळाचें स्मरण झालें. आतांच्यापेक्षां तो किती तरी निराळा! त्यांत ह्यांत अगदीं जमीन अस्मानाचें अंतर. ह्या स्थळांत जो फेरबदल झाला आहे तो जरी अगदीं पुरा आहे तरी तो अगदीं नभासणारा आहे; माझ्यामध्यें—माझ्या सभोंतालच्या स्थितीमध्यें, हिंदुस्थानामध्यें आणि जगा-

मध्यें—जो फेरफार झाला आहे तो बहुतेक पुरा आहे, तरी ते तारुण्याचे दिवस अविचारानें सुखोपभोग घेण्यांत गेले असावे असें एकाद्याला वाटेल तर तसें मात्र नव्हतें; तेव्हां वारंवार असें होत असे कीं मोठ्या निराशेनें मन अगदीं ग्रस्त होऊन जात असे; मध्यें केव्हां केव्हां चांगल्या गोष्टी करण्याविषयीं मोठी उमेद येत असे. तेव्हांपासून मला जी स्थिति प्राप्त झाली ती जर त्यावेळीं प्राप्त करून देण्याचें कोणी बोलता तर मी ती नको ह्मणून त्याला झिटकारलें असतें. परंतु आतां सारेंच पालटलें आहे, आणि तेव्हां माझ्या मनांत ज्या भलत्या भलत्या कल्पना येत असत आणि विलक्षण इच्छा होत असत त्यांतल्या एकादी प्रमाणें जर कांहीं घडून आलें असतें तर माझी जी स्थिति झाली असती तीपेक्षां आतां मी आपला अप्रसिद्धच राहून मरेन असा संभव दिसत आहे हें माझें कदाचित सुदैव असें मला वाटतें.

तारीख २७ आक्टोबर. आज घोड्यावरून अगदीं एकटा खडकीच्या पुलावर गेलों. नदीतीरानें जातां जातां त्यांत एक खोलवट जागा आहे ती पाहिली. तेथें मागें ह्यामिल्टन आणि मी स्नान करीत असूं. तींत कांहींबदल झालेला नाहीं, जशीच्या तशी आहे असें पाहून तेव्हांची एकूनएक वस्तू माझ्या डोळ्यांपुढें उभी राहिली. मग मी पुलावर गेलों, खडकी गांवापर्यंत गेलों (परंतु वेली अलायन्स मला सांपडेना) आणि त्या दिवसांत जीं स्थळें मला माहीत होतीं त्यांवरून गेलों. मग पश्चिमेकडच्या शांत मैदानावर नजर फिरविली आणि मग संगमाकडून, संगमांतून माघारा आलों. आतां याचें हें बहुधा शेवटचें दर्शन. हें मनांत येऊन पुष्कळच गोष्टी आठवल्या.'

पर्जन्यकाळ संपल्यावर **एल्फिन्स्टन** साहेब पुण्याहून निघून फिरावयास गेला ती त्याची दक्षिणेंतली शेवटची स्वारी. फिरत असतांना त्याणें आपल्या मित्रमंडळीला पत्रें पाठविलीं, त्यांतील कांहींतील मजकूर पुढें देतों.

छावणी लोणंद, तारीख ३० आक्टोबर १८२६.

मेहेरबान हेन्री एलिस साहेब.

सर चार्लस फॉर्बिस साहेबांस गेलेलें पत्र मी आतांच वाचलें. तें तुह्मी लिहिलेलें आहे असें मी ऐकिलें आहे. वाचून मला जो आनंद वाटत आहे त्याजबद्दल तुमचे आभार मानल्यावांचून मला राहवत नाहीं. तुमची (तुह्मी योजलेली) गृहव्यवस्था (विलायतेंत हिंदुस्थानाविषयीं व्हावयाची ती) बरी कीं वाईट हें मला सांगतां येत नाहीं आणि हिंदुस्थानांत श्रेष्ठ अधिकाराची वांटणी करण्याबद्दलचे जे तुमचे बेत आहेत ते मला सर्वांशीं मान्य नाहींत. (माझें मत तुमच्यासारखें नाहीं असें ह्मणण्यापेक्षां मी त्याबद्दल विचार केलेला नाहीं असें ह्मणणें बरें आहे.) परंतु तुमचे बाकीचे सर्व विचार मला आश्चर्य करण्यासारखे वाटतात; आणि त्यांपैकीं कांहीं छापून आलेले पाहून मला संतोष वाटतो. हा तुमचा लेख लोकांपुढें येणें ह्मणजे हिंदुस्थानाविषयीं आमच्या ज्या कल्पना आहेत त्यांत सुधारणा होत चालली आहे या ह्मणण्याचें मोठें प्रमाण हेंच आहे असें मी समजतों. एतद्देशीय लोकांनां सर्व कामांत घ्यावें अशा अभिप्रायाचें जें तुमचें लिहिणें आहे त्याला विशेषतः अनुलक्षून मी बोलतों. माझें नेहेमीं अगदीं मनापासून असें ह्मणणें आहे कीं ह्या देशच्या लोकांशीं आमचा जो संबंध असावयाचा तो तार्तर लोकांचा आणि चिनी लोकांचा जसा आहे तसा असावा; ह्मणजे राज्याधिकार आणि लष्करी अधिकार हे नेहेमीं आह्मी आपल्या हातांत ठेवावे आणि मुलकी व्यवस्थेंतून आपला हात हळुहळु काढून घ्यावा; मात्र ती सर्व व्यवस्था सुरळीत चालण्याला व मार्ग दाखविण्याला जेवढी देखरेख ठेवणें अवश्य असेल तेवढी आह्मी आपल्याकडे ठेवावी. मुलकी खात्यांत लोकांनां जागा देण्याचा आपल्या हातांत अधिकार आहे तो जाईल अशी डायरेक्टर मंडळीला जी भीति वाटते (असें तुह्मी अनुमान करतां) ती देखील वाटण्याचें कारण नाहीं. परंतु ती गोष्ट ध्यानांत वागविली पाहिजे आणि आह्मी ज्या गोष्टी करूं त्या त्या धोरणानेंच केल्या पाहिजेत. त्या गोष्टीला आरंभ करावयाचा ह्मणजे असा

कीं एतद्देशीय लोक मुलकी कामें करण्याला योग्य व्हावे ह्मणून त्यांनां पद्धतवार शिक्षण देऊं लागावयाचें, न्याय खात्यांतलें बरेंच काम त्यांजकडे एकदम सोंपवावयाचें, बहुतेकांचे पगार वाढवावयाचे आणि त्यांच्यांत जे मोठे उत्कृष्ठ हुशार आणि प्रामाणिक असतील त्यांनां थोडींशीं मोठमोठीं बक्षिसें देऊं लागावयाचें. त्यांनां कौन्सिलांत घ्यावें असा जो तुमचा बेत आहे त्याप्रमाणें करण्याचा काल दूर आहे असें दिसतें. परंतु राजकीय विषय आणि जागा देणें—नेमणुका—शिवाय करून बाकी सर्व गोष्टींत, ज्यांत कांहीं गुप्त ठेवावयाचें नाहीं अशा कामांत त्यांचे विचार अगदीं निर्धास्तपणें घेतां येतील. वसाहत करणें खचित अपायकारक होईल कीं काय हें मला खात्रीनें सांगवत नाहीं परंतु त्याचा मासला करून पाहूं लागणें फार भयंकर आहे. आतां देखील असें होत असतें कीं हिंदुस्थानाविषयीं लिहिणारे बहुतेक ग्रंथकार आपली दृष्टि बहुतेक फक्त युरोपियन आणि त्यांचे संबंधी यांकडे मात्र ठेवतात. तुह्मी दाखविल्या आहेत तसल्या पुष्कळ चुका (छापखाना, हाफ कास्ट लोक, इत्यादिबद्दल) त्यामुळें होतात. आणि जर आह्मी इकडे वसाहत केली तर हे खोटे विचार अधिकाधिक सर्वत्र पसरतील हें मोठें भय आहे. परंतु जे व्यापाराला उत्तेजन देतील, युरोपियन तऱ्हेच्या सुधारणा लोकांनां शिकवितील आणि कायद्यानेंच प्रतिबंध करून टाकल्यानें एतद्देशीय लोकांकरितां ह्मणून ज्या नोकऱ्या आहेत त्यांत शिरणार नाहींत, असे सावकार इकडे आणण्याची जर तजवीज करतां येईल तर त्यापासून हिंदुस्थानाला अतोनात उपयोग होईल. मी ह्मणतों अशा प्रकारचे जर कायदे केले नाहींत तर युरोपियन वसाहतवाले आपल्या श्रेष्ठत्वानें हळुहळु विश्वासाच्या तेवढ्या साऱ्या जागा पटकावतील आणि एतद्देशीय लोकांची योग्यता कमी होत होत त्यांनां गुलामांची अवस्था प्राप्त होईल. हिंदुस्थानच्या हद्दीच्या पलीकडे राज्यविस्तार करणें भयावह आहे अशाविषयीं जसे तुमचे विचार आहेत तसेच माझे आहेत. कोणत्याही कारणानें आह्माला असा लोभ उत्पन्न न होवो. या देशचे जे राजेरजवाडे आहेत त्यांची आपोआप वाट लागेल ती लागूं द्यावी. हिंदुस्थानांतलें (किंबहुना एशियांतलें) प्रत्येक राज्य अल्प काळांतच लयास जात

असतें. युरोपियन जवळ नसले ह्मणजे गझनवीच्या हातांतून घोरीच्या हातांत, अफगाणच्या हातांतून मोगलांच्या हातांत आणि मोगलांच्या हातची मराठ्यांच्या हातांत, अशी एका एका घराण्याची राजसत्ता जात असते. युरोपियन लोकांनां मात्र स्थापतां येतें असें चिरस्थाई राज्य जेथें असतें, तेथें त्याच्या आसमंतात असणारीं सारीं अल्पायुषी राज्यें तें गिळून टाकणारच. आजपर्यंत जो प्रकार झाला आणि अजून जो चालूच आहे त्याचें कारण हें आहे, आपली फौज चाकरीस ठेवण्याची आमची जी रीत (subsidiary system) आहे ती नव्हे, असें आह्मी समजावें. घाईघाईनें लिहिलेलें, सारा गोंधळ झालेलें, हें पत्र मला संपविलेंच पाहिजे. जें लहानसें पुस्तक (pamphlet) वाचल्यामुळें मी हें पत्र लिहिलें तें जर तुह्मी लिहिलेलें नसेल तर हें तुह्माला दुप्पट त्रासदायक वाटेल.

एम. एल्फिन्स्टन.

तारीख १५ नोव्हेंबर १८२६.

मेहेरबान अर्स्किन साहेब यांस.

आपलें तारीख १३ माहे मे चें पत्र पावलें. त्याबद्दल आणि विलायतेंत हिंदुस्थानासंबंधानें कशा प्रकारचे समज आहेत तें तुह्मी अगदीं स्पष्ट लिहिलें आहे त्याबद्दल मी तुमचा फार आभारी आहें. सुधारकपक्षाची मंडळी हा देश ह्मणजे युरोपियन लोकांची एक वसाहत आहे असें नेहमी समजतात आणि खरे या देशचे जे लोक त्यांनां अजीबात विसरतात असें दिसतें. त्यांच्या सर्व बेतांत दोघले (Half cast) लोकांबद्दल पुष्कळ ऐकावयास मिळतें, परंतु हिंदु व मुसलमान यांबद्दल कधीं विचार केलेला दिसत नाहीं. वर्तमानपत्रांनां स्वातंत्र्य असल्यानें जर आमच्या देशच्या लोकांखेरीज दुसऱ्या कोणाला स्फुरण येणार नाहीं तर तें असणें इष्ट आहे असें निःसंशय वाटेल, त्याप्रमाणें तें असणें जरूर वाटण्याचें हें कारण आहे.

वसाहत झाल्यानें हल्लींचे जे ह्या देशचे मालक आहेत त्यांच्यांत अतिशय गर्दी होईल किंवा त्यांना काढून टाकलें जाईल याचें कांहीं एक भय न बाळगतां वसाहतीबद्दल आरडाओरड चालली आहे. माझी इच्छा आहे कीं ह्या देशाची राज्यव्यवस्था पुढें कशी असावी याचा विचार ज्ञानवान, अक्कलवान मनुष्यनें करावा. तो मनुष्य हाल्लींची आमची जी तऱ्हा आहे ती अगदीं निर्दोष आहे असें मानणाराही नसावा आणि आमच्या अमलाखालीं सहा कोट हिंदुस्थानचे लोक, शिवाय युरोपिअन लोक, इतकी प्रजा आहे हें विसरणाराही नसावा. चांगले कायदे करून व विद्या देऊन एतद्देशीय लोकांना सुधारावें आणि मग हळुहळु मुलकी खात्यांतील सर्व जागांवर त्यांच्या नेमणुका कराव्या, लष्करी अम्मल आणि राजकीय सत्ता आह्मी आपल्या हातांत ठेवावीं, अशा धोरणानें आह्मी वागावें असें मला वाटतें.' हा मुख्य हेतु समजून त्याला अनुसरून सर्व कांहीं होत असावें. लोकांमध्यें ज्ञानप्रसार करण्याला जरूर तेवढें वर्तमानपत्रांना स्वातंत्र्य असावें, जेणेंकरून राजकीय गोष्टींविषयीं त्यांस उत्तेजन येईल असें नसावें. ग्रेट ब्रिटन देशांतील कांहीं लोक आपलें कांहीं भांडवल आणि ज्ञान ह्या देशांत घेऊन येतील इतकेंच वसाहतीला उत्तेजन द्यावें, युरोपियन भिकाराची झुंड इकडे येऊन ह्या देशच्या लोकांस हाल्लीं जीं कामें मिळत आहेत तीं त्यांच्या हातून काढून घेण्यास प्रवृत्त होतील असें होऊं देऊं नये. कालान्तरानें वर्तमानपत्रें स्वतंत्र आणि लोक राजकीय विषयांत मन घालणारे मुत्सद्दी झाल्या शिवाय तसेच राहतील आणि हें असेंच चालेल असा माझ्या ह्मणण्याचा आशय नाहीं. परंतु तसें होण्याचा काल दूर आहे, आणि तो आला ह्मणजे लौकरच आह्मांला गाशा गुंडाळलाच पाहिजे, तो गुंडाळून आह्मीं गेलों तर आह्मीं स्थापन केलेल्या संस्था ( institutions ) आमच्या पश्चात येथच्या लोकांना चालवितां येतील असे आह्मीं त्यांनां तयार करून सोडलें पाहिजे. मी काल्पनिक गोष्टींचाच पाल्हाळ लावीत बसून त्यांत बराच कागद संपविला आतां थोडा राहिला आहे त्याचा उपयोग तुमच्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याकडे करावा हें बरें ह्मणून आतां तसें

करूं लागतों. कायदे पुरे होऊन बहुतेक छापून होत आले. मी मुंबईस गेलों झणजे तुझाला एक प्रत पाठवून देईन. विद्येविषयीं ह्मणाल तर सन १८२३ च्या अखेरीस एतद्देशीय लोकांच्या शिक्षणासंबंधानें मी एक बेत योजला तो फार विस्तृत होता असें कदाचित ह्मणतां येईल. कौन्सिलांत तो नापसंत झाला. (वार्डन साहेबांनीं त्याच्याउलट बेत योजला.) आणि डायरेक्टरांचीही त्याला अनुकूलता मिळाली नाहीं. तथापि मी तो विषय पुनः पुनः सवडीप्रमाणें पुढें आणीत असतों आणि मला अशी आशा आहे कीं, हालीं बंगाल्यांत ज्या मोठमोठ्या संस्था सुरू झाल्या आहेत त्यांच्या सारख्या आज नाहीं उद्यां केव्हां तरी इकडे होण्याची कांहीं तरी तजवीज होईल. तो काळ येईपर्यंत आह्मांला विद्येच्या प्रसारा विषयीं अतिशय झटून मेहनत करणारा असा एक गृहस्थ मिळाला आहे. (एंजिनीयरिंग खात्यांतले क्यापटन जर्व्हिस). तो अशा जागेवर आहे कीं विद्येची वृद्धि व्हावी ह्मणून आह्मी जी काय व्यवस्था करीत आहों तिची त्याला देखरेख करतां येते. आह्मी पंतोजी तयार करीत आहों आणि थोडथोड्या पगारांवर त्यांच्या नेमणुका करून त्यांना बाहेर पाठवीत आहों, पुस्तकें छापीत आहों आणि इंग्रजी पुस्तकांची एतद्देशीय भाषांत भाषांतरें करावीं, किंवा त्या भाषांत शास्त्रीय विषयांवर स्वतंत्र ग्रंथ लिहावे ह्मणून बक्षिसें देऊं करीत आहों; तीं आमची कमिटी शिफारस करील त्याप्रमाणें ५००० रुपयेपर्यंत किंवा त्याहून जास्त ही देऊं. येवढीं बक्षिसें देण्यास तयार झालों असून तीं मिळवण्यास कोणी उभे रहात नाहींत हें पाहून माझी फार निराशा होते. आह्मी शिक्षण देऊं तर तें घेण्याकडे ह्या देशच्या लोकांची प्रवृत्ति चांगली आहे असें मला वाटतें. दक्षिणेच्या राज्य कारभारांत आतां फेरफार झाला आहे. आतां कमिशनरी अम्मल नाहीं, तो उठला. दोन न्यायाधीश (Judges) नेमले आहेत. पंचाइती हळुहळु मोडत चालल्या आहेत आणि पुष्कळ मुनसिफांच्या नेमणुका झाल्या आहेत.

नवे कायदे दहा आहेत आणि ते चालविण्याचा अधिकार न्यायाधिशांना आहे. ह्यांत आणि प्रांतांत मोठें अंतर आहे तें असें कीं एतद्देशीय लोकांच्या नेमणुका पुष्कळ अधिक झाल्या आहेत. युरोपियन लोक बहुतेक फक्त अपिलें ऐकण्याला आणि देखरेख करण्याला नेमले आहेत. वसुलाच्या रीतींत फारसा कांहीं फेरफार झालेला नाहीं. परंतु जमीन महसूल बेताचा, सारखा, आणि ठरीव असावा ह्या उद्देशानें जमिनीची पहाणी सुरू झाली आहे.'

दक्षिणेंतली ही शेवटची स्वारी करून एल्फिन्स्टन साहेब नोव्हेंबर महिन्यांत मुंबईस परत गेला आणि स्वारींत आपण काय काय केलें त्याबद्दलच्या हकीगतीचा रिपोर्ट त्याणें कौन्सिलास सादर केला. त्यांत कोणकोणत्या सरदारांच्या व जाहागिरदारांच्या भेटी झाल्या, कोणाच्या काय तक्रारी, फिर्यादी, होत्या त्या सर्व लिहून मुलकी राज्यकारभारासंबंधीं (civil administration) गोष्टींविषयीं ही कांहीं सविस्तर मजकूर दिला होता. दक्षिणदेश इंग्रज सरकारच्या अमलाखालीं आल्यापासून त्यांत जी सुधारणा झाली तीविषयीं आपल्याला साधारणतः काय वाटतें तें त्याणें लिहिलें आहे, त्यांतून कांहीं उतारे पुढें देतों; त्यांवरून त्याणें पूर्वीं जे बेत योजले होते त्यांच्या सफलनिष्फलतेविषयीं व बरेवाईटपणाविषयीं त्याणें जें काय म्हटलें आहे त्यावरून तो मनाचा कसा मोकळा होता तें दिसून आल्याशिवाय रहाणार नाहीं.

'पटवर्धन घराण्यांतले सात सरदार, तसेच मुधोळचे राजे व्यंकटराव घोरपडे, आणि नरगुंदकर व रामदुर्गकर मला रहिमतपुरास भेटले. आपा देसायाची प्रकृति नीट नसल्यानें त्याणें निपाणी सोडली नाहीं.

* * * * *

ह्या सर्व सरदारांकडे पेशव्यांच्या वेळीं, जितका मुलूख चालत होता

तितका अजून ही चालत आहे. शांतता चालत असल्यानें आणि लष्करी डामडौल कोणी दाखविण्याची जरूर नसल्यानें त्यांचा लवाजमा मी मागें ह्या मुलखांत आलों होतों तेव्हांपेक्षां कमी झालेला आहे. त्यावेळीं कोणाकोणा बरावर हजार हजार, दीड दीड हजार मनुष्य असून किती एक तोफा ही होत्या. या खेपेला कोणा जवळ ही दोनशें तीनशें स्वारांहून अधिक नव्हते आणि ते पुष्कळ वेळ फक्त एक किंवा दोन नोकर बरावर घेऊन फिरत असत.'

'ह्या सरदारांनां आपआपल्या मुलखाचा उपभोग निर्वेधपणें घ्यावयास सांपडत आहे, आणि सरकारची त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारची मागणी नाहीं, त्यामुळें पेशवाईंतल्यापेक्षां आतां त्यांची स्थिति पुष्कळ चांगली आहे यांत कांहीं संशय नाहीं; परंतु आतां ते सरकारचे अगदीं पूर्णपणें अंकित, ताबेदार, झालेले आहेत; पेशव्यांचा हुकूम ते जसे जुमानीत नसत, किंवा मानण्याची टाळाटाळ करीत असत, तसें आतां त्यांनां ह्या सरकाराशीं करतां येत नाहीं; आणि ह्या गोष्टीमुळें त्यावेळीं त्यांच्या मनाला जो अभिमान आणि स्वातंत्र्य वाटत असेल तें आतां अंशतः तरी नष्ट झालें असलें पाहिजे. मला असें ही वाटतें कीं आमच्या राज्यकारभाराला सुस्थिरता आली तेव्हांपासून त्यांची मानमान्यता ठेवण्याचा आमचा जो पहिला बेत होता त्याप्रमाणें आह्मी ठेवीनासे झालों आहों, त्यापेक्षां कमी ठेवितों. त्यांच्या हातून मोठा जुलूम न होण्याला साधारण सल्ला (general advice) पुरे आहे असें असेल तोंपर्यंत, त्यांच्याबरावर झालेल्या ठरावांवरून ज्या कामांत सरकाराला हात घालतां येईल अशांत सुद्धां, प्रत्यक्ष हात घालूं नये अशी प्रवृत्ति ठेवण्याविषयीं सरकारचा नियम असावा हें योग्य आहे. तसेंच गुन्हेगारास धरावयाचें असेल किंवा दुसरें कांहीं जरूरीचें काम असेल, असे प्रसंग शिवाय करून स्थानिक अधिकाऱ्यांनीं त्यांच्या (संस्थानिकांच्या) अम्मलदारांस परभारें हुकूम करूं नयेत अशी तजवीज करावी. या गोष्टींचा

ह्या जाहागीरदारांस किती जरी त्रास वाटत असला तरी सातारच्या राजाच्यां जाहागीरदारांनां स्वतः व त्यांच्या स्वारांनां जी सक्त नोकरी करावी लागते तशी आपल्याला करावी लागत नाहीं, ह्मणून त्यांच्यापेक्षां आपली स्थिति बरी असें वाटलेंच पाहिजे.'

'मी दक्षिणेंत असतांनां तेथून पुष्कळ खलिते व पत्रें लिहिलीं आहेत ह्मणून आतां जाहागीरदारांच्या कामाप्रकरणीं जास्त विस्तारानें लिहिण्याचें कारण उरलेलें नाहीं; तसेंच न्यायखात्यांतल्या व मुलकी खात्यांतल्या कामासंबंधानें ही नाहीं. परंतु आतां बहुधा दक्षिणेंत माझी पुनः फेरी व्हावयाची नाहीं, ह्मणून हा मुलूख आह्मी आपल्या ताब्यांत घेतला तेव्हां त्याच्या राज्यव्यवस्थेसंबंधानें आह्मी जे एक एक बेत मनांत आणले होते त्यांतले किती साधले, किती फसले, तें एक एक खातें घेऊन दाखविलें असतां उपयोगीं होईल ह्मणून तसें करतों.

'सातारच्या राजाविषयीं जें काय लिहावयाचें तें मागेंच लिहिलें [illegible] वरीणून आणि त्याचा राज्यकारभार आमच्या अजमासापेक्षां फार उत्कृष्ठ चालला आहे हें सांगण्याची कांहीं जरूर आहे असें नाहीं.'

'कोल्हापूरच्या राज्याची स्थिति तशी नाहीं. विद्यमान राजाची वागणूक चांगली नसल्यानें तेथें आमचे बेत वरच्या सारखे फलद्रूप झाले नाहींत. राज्यकारभारांत हात घालूं नये असा आमचा जो बेत होता तो बाजूस ठेवावा लागला आणि अंतर्व्यवस्थेंत सुद्धां हात घालण्याचा हक्क आह्मी तहनाम्यानें स्थापन केला आहे. परंतु होतां होईल तोंपर्यंत आह्मी हा हक्क चालवावयास लागूं नये आणि तशी संधी सांपडतांच आमची जी जुनी रीत ( old policy ) होती तिचाच पुनः अंगीकार करावा.'

'आह्माला वाटलें होतें त्यापेक्षां अधिक शांतता मुलखांत झाली आणि

लष्करी खात्यांत बहुतेक खर्च बहुतकरून कमी करण्यांत आला आहे.

' आमच्या जमाबंदीच्या पद्धतीचें सामान्य दृष्टीनें अवलोकन केलें तर असें दिसून येतें कीं आह्मला वाटत होतें त्यापेक्षां कांहीं वाईट स्थिति झालेली नाहीं. '

' अद्याप जमिनीची पहाणी झाली नाहीं किंवा जमाबंदी सरसकट एक द्वितीयांशाची एक तृतीयांश इतकी कमी करण्यांत ही आली नाही, परंतु तो बेत अखेरीस पूर्णपणें अमलांत येत आहे आणि यापुढें आतां बहुत-करून कांहीं हरकती येणार नाहींत. '

' मध्यंतरीं ( वरच्या गोष्टी होत पर्यंत ) सारा कांहीं कमी केल्यानें व रयतेकडून वाजवी येण्याशिवाय जें कांहीं गैरहकानें कोणी घेत असत तें बंद केल्यानें लोकांवरचें ओझें पुष्कळ कमी झालें आहे आणि केव्हां पर्जन्य नीट न पडला किंवा पीक फार आलें तरी त्यांची जी स्थिति होते ती पेशवाईतल्या उत्तम वर्षांत असे तीपेक्षां बहुधा चांगली असते. '

' पोलिसाची स्थिति मराठ्यांच्या कारकीर्दींत होती तीपेक्षां वाईट आहे, आह्मला जितकी वाईट होईल असें वाटत होतें तितकी नाहीं. पुण्याच्या शेजारीं देखील लुटारू लोकांच्या दोन तीन टोळ्या होत्या आणि हल्लीं एक आहे. तिचे जे पुढारी ( नाईक ) आहेत ते अधिकारावर होते परंतु त्यांच्या-वर शाबिती न झाल्यामुळें ते सुटले. '

' ह्या गोष्टीमुळें फौजदारी न्यायाच्या पद्धतींत जो फेरफार झाला आहे त्याबद्दल लोकांच्या मनाचा ग्रह वाईट आहे; परंतु त्याचा परि-णाम काय होईल याचा निर्णय इतक्यांतच करतां येत नाहीं. '

' तथापि दरवड्यांशिवाय इतर गुन्हे, आणि दक्षिण महाराष्ट्र देशांत

कदाचित दारूबाजपणा, या शिवाय इतर व्यसनें हीं वाढलीं आहेत असें मला वाटत नाहीं.'

'मी वर लिहिलेल्या बहुतेक गोष्टी पुणें आणि नगर या दोन जिल्ह्यांना मुख्यत्वें करून लागू आहेत. धारवाडांत तितका बदल झालेला नाहीं आणि खानदेश आमच्या ताब्यांत आल्यापासून त्याची स्थिति बहुत करून चांगली झाली आहे. तेथें जी अगदीं झोटिंग बादशाही आणि जुलूम जबरी होती ती पार नाहींशी होऊन तिच्या जागीं शांतता आणि निर्भयता पूर्णपणें वास करीत आहेत. त्या मुलखांत पुनः लोकवस्ती होण्याला आणि जंगल नाहींसें होण्याला बराच काळ लागेल हें खरें आहे; तथापि ही सुधारणा होण्याला आतां कोणत्याही प्रकारची हरकत उरली नाहीं हें पाहून संतोष वाटतो.'

'दिवाणी कडील न्याय होण्याची आह्मी जी तजवीज लाविली ती जशी फसली तशी आमच्या राज्यव्यवस्थेच्या दुसऱ्या कोणत्याच खात्यांत खोट लागली नाहीं. सन १८१९ मध्यें दक्षिण देशावर केलेला रिपोर्ट छापला आहे; त्या पुस्तकांतील पृष्ठ ११२ यांत भविष्य कथन केल्याप्रमाणें त्या खात्यांत सारे फेरफार घडून आले आहेत.'

पंचाइतींकडून काम करून घेण्यांत अडचणी येऊं लागल्या, त्यांची काम करण्याची जी रीत होती तिला अधिक कडक नियम लावण्यांत आले आणि त्यांच्यावर देखरेख अधिक ठेवण्यांत आली; परंतु एवढ्यानें ही भागत नाहीं असें दिसलें तेव्हां मुनसिफांची संख्या पुष्कळ वाढविली आणि बहुतेक दिवाणी काम त्यांच्यामार्फत चालतें; त्यावर अपील युरोपियन न्यायाधिशाकडे होतें.'

स्वतंत्र अदालत स्थापिली असतां त्याचे परिणाम काय होतील ह्याचें अनुमान जसें झालें होतें तसेंच बहुतेक घडून आलें आहे. पहिल्यापेक्षां पुष्कळ जास्त लोकांनां न्याय मिळतो परंतु तो देण्याचा जो तऱ्हा आहे तिला पुष्कळ

असामी त्रासून जातात. मराठ्यांनां असल्या त्रासाची अगदीं सवय नसल्यानें ही नवी तऱ्हा त्यांनां बहुतकरून बरी वाटत नसावी.'

'सन १८१९ मध्यें आह्मी आपल्या राज्याची जी तऱ्हा असावी असें योजलें होतें त्यापेक्षां अमूक एक खातें अगदीं भिन्नप्रकारचें झालें आहे असें नसलें तरी एकंदरींत ती पुष्कळ निराळी झाली आहे'

'मागची रीत देशाच्या पालटलेल्या स्थितीला उपयोगीं पडेशी नव्हती ह्मणून तींत ढवळाढवळ केली असें नाहीं असें जर वाटेल तरती तऱ्हा मला बरी वाटत नव्हतीं किंवा माझ्या मदतनीस मंडळीच्या मनास येत नव्हती ह्मणून तींत बदल केला असें नाहीं हें ही उघड दिसूत येईल अशी मी आशा करतों. तसें होण्याचें मला जें कारण वाटतें तें असें आहे—युरोपियन लोकांचे जे समज आहेत त्यांच्याशीं ती जळत नाहीं आणि हिंदुस्थानांतील आमच्या अमलांतील सर्व मुलखांत राज्यकारभाराचीं जीं तत्वें स्थापन झालीं आहेत त्यांच्याशीं ही जुळत नाहीं.

अशा ह्या उलट प्रकारचा परिणाम मी आपल्या १८१९ इसवीच्या रिपोर्टाच्या एका कलमांत लिहिल्याप्रमाणें कांहीं अंशीं घडून आला आहे. तें कलम असें—

'आतां जी रीत ( system ) आह्मी योजिली आहे तीप्रमाणें वागण्यांत नमुन्याला ( form ) बऱ्याच अंशीं सुटेल आणि वास्तविक न्याय ही थोडाबहुत बुडेल, आणि असेंही होईल कीं त्या रीतींत जे दोष दिसून येतील त्यांणीं आमच्या बहुतेक अम्मलदारांनां अगदीं वीट येईल; कारण त्या गोष्टी आमच्या ज्या विचाराच्या तऱ्हा आहेत त्यांनां अगदीं प्रतिकूल आहेत आणि दुसरी कोणती ही रीत ( system ) घेतली तरी तींत असेच दोष असणार आहेत, आणि आमच्या दृष्टीनें जे अगदीं क्षुल्लक यःकश्चित असणार ते ह्या देशाच्या लोकांनां

वारंवार अतिशय चीड येण्यासारखे असतील, हें आह्मी विसरून जाऊं, आमच्या ध्यानांत ही येणार नाहीं. तथापि एतद्देशीय लोकांची रीत ( system ) युरोपियन लोकांच्या विचारांशीं याप्रमाणें जुळणारी नसल्यानें ती सुरू करण्यास ही एक अगदीं मोठी अडचण आहे आणि ज्या अम्मलदारांना आह्मी तीप्रमाणें काम करण्यास सांगणार त्यांना फक्त त्यांची लायकी पाहून नेमूं तोंपर्यंत ठीक आहे, परंतु तशा नेमणुका होईनाशा झाल्या ह्मणजे ती आह्मांला राखतां येईल कीं नाहीं याची शंका वाटते. "

दक्षिणेंत हल्लीं ज्या गृहस्थांच्या नेमणुका केलेल्या आहेत ते आपआपल्या कामाला अगदीं योग्य आहेत तथापि मी ह्मणतों असें घडून येत आहे आणि त्यांत दुसऱ्या एका गोष्टीची मोठी भर पडत आहे, तिच्याविषयीं बोलावयास पाहिजे तितकें मी बोललों नाहीं. ती गोष्ट कोणती ह्मणाल तर जिला पद्धत ( system ) आणि कायदे कानू यांचा आळाबांधा नाहीं अशा रीतीनें काम करावयाचें ह्मणजे तें करणाऱ्या सर्वांच्या शिरावर जी जबाबदारी पडते ती. सारासार विचारपूर्वक कितीं हवें तितकें काम केलें असलें आणि त्याला कायद्याचा आधार असला आणि तें ठरीव पद्धतीप्रमाणे असलें ह्मणजे त्याच्याबद्दल कोणी कांहीं शंका घेत नाहीं; परंतु अधिकारांत केलेलें एकादें यःकश्चित काम असलें तरी तें जर का पद्धतीला सुटून झालें असलें तर त्याच्याबद्दल संशय येतो. हें सारें समजून असल्यानें सरकार आणि अम्मलदार ह्या उभयतांवरही ह्याचा परिणाम घडून येतो. एकंदरींत जी पद्धत सुरू केलेली आहे ती चांगल्या तऱ्हेनें चालली आहे कीं नाहीं इकडे लक्ष देण्यापेक्षां सारे असामी प्रत्येक निरनिराळें काम अगदीं बिनचूक झालें आहे कीं नाहीं हें अधिक पहातात; आणि नमुन्याप्रमाणें, ह्मणजे आपण केलेलें काम कसें झालें हें पहाण्याचें ज्यांच्याकडे असतें ते कायदेशीर नमुना ( legal form) जसा समजत असतील त्याप्रमाणें, काम केलें ह्मणजे आपण सुटलों असें समजून तसें करण्याला जपत असतात '

' मोठ्या विस्तीर्ण राज्याच्या एका लहानशा भागांत, राजधानीपासून दूर

आणि सदर अदालतीचा शेजार नसेल अशा जागीं, एतद्देशीय पद्धत पुष्कळ दिवसपर्यंत चांगली चालवून पहातां येईल. परंतु दक्षिणेंतल्या आमच्या मुलखांतल्या सारख्या ठिकाणीं ती आतां जशीच्या तशी चालवून पाहूं लागणें अशक्य आहे.'

'अधिकाराची वांटणी आणि नमुन्यांची सुरवात, यांचा एतद्देशीयांवर पहिला परिणाम फार अनिष्टकारक झाला आहे असें मला वाटतें. आपले वरिष्ठ असे मानायाला त्यांना आतां कोणी राहिले नाहींत. प्रत्येक मनुष्याकडे एक एक खातें असल्यानें सारें पहाणारा असा कोणी नाहीं, आणि कोणत्याही वर्गांतल्या एतद्देशीय लोकांशीं ज्या आमच्या अधिकाऱ्यांचा संबंध येतो असे कोण ह्मणून पाहूं लागलें तर न्यायखातें, वसुलीखातें (revenue) आणि पोलीसखातें ह्यांत जे आहेत ते. ह्याचे परिणाम दक्षिणेंत केव्हांच दिसूं लागले आहेत. वरच्यावरच्या वर्गांतल्या लोकांशीं युरोपियन लोकांचा संबंध मागें असे त्यापेक्षां आतां पुष्कळ कमी झाला आहे आणि आतां जसजसे नवेनवे असामी येत जातील तसतसा तो बहुधा अधिकच कमी होत जाईल'

'आह्मी अगदीं प्रथम ज्या तऱ्हेची राज्यव्यवस्था सुरू केली तींत देखील आमची पद्धत आणि व्यवस्थेशीरपणा यामुळें वरिष्ठ प्रतीच्या एतद्देशीय लोकांचा आमच्या नोकरींत प्रवेश झाला नाहीं; आणि पुढें जसजसा तींत बदल होत गेला तसातसा आमच्या पद्धतीचा आणि व्यवस्थेशीरपणाचा जोर अधिकच वाढत चालला. आणि एक तऱ्हा (uniformity) आणि व्यवस्था (order) यांची आह्मांला आवड असल्यानें त्या आमच्या पद्धतींतून (system) कधीं नाहींशा व्हावयाच्या नाहींत व त्या योगानें निरनिराळे अधिकार आणि हक्क हे हळु हळु नाहींसे होत जातील आणि ज्या जाहागीरदारांशीं स्पष्टपणें करार होऊन त्यांवरून त्यांचे मुलुख त्यांच्याकडे चालावयाचे असें ठरलेलें आहे त्यांत देखील हात शिरेल.'

'दक्षिण देशामध्यें हे परिणाम जितके व्हावे तितके कांहीं पूर्णपणें

झालेले नाहींत, आणि सध्यां जी आमची अवस्था आहे ती पुष्कळ अंशीं अशी आहे कीं तसा परिणाम होऊं नये; निदान लौकर तरी होऊं नये. दक्षिणेंतली पद्धत हिंदुस्थानांतल्या इतर बहुतेक भागांतल्यापेक्षां अजून देखील एतद्देशीय लोकांच्या संवईशीं पुष्कळ अधिक जुळेशी व त्यांच्या मनाला कमी लागेशी आहे. परंतु असें आहे तरी देखील तेथें आहे याच्या उलट स्थिति होत जाण्याकडेच रोख आहे आणि याला प्रतिबंध करणें बहुधा अशक्य आहे.'

दक्षिणेमध्यें फिरून **एल्फिन्स्टन** साहेब मुंबईस परत आला तों त्याला पुनः कांहीं तरी नवा त्रास होऊं लागला. सर न्यायाधिशा बराबरचा त्याचा तंटा या वेळीं अगदीं ऐन रंगांत आलेला होता; तो बाहेर फिरावयास गेला होता तेव्हां ह्मणजे त्यांतून सुटला होता असें नव्हतेंच. परंतु अशा बारीक सारीक त्रासाच्या गोष्टी होत होत्या तरी त्यांतल्या त्यांतच त्याच्या मनाला समाधान वाटण्यासारखी एक गोष्ट होती ती कायम होती. ती अशी कीं आतां आपली मुंबईंत रहाण्याची मुदत भरली, कसें तरी एवढें वर्ष काढलें ह्मणजे झालें, हें संपण्यापूर्वींच मी स्वतंत्र होईन असा त्याच्या मनाला भरंवसा आलेला होता, आणि त्याचें सारें लक्ष तिकडे लागलें होतें मग त्यानें शाळेंतल्या मुलाप्रमाणें एक नित्यकार्यदर्शक पत्रक ( calender ) केलें; त्यांत कौन्सिल भरण्याचे दिवस मांडलेले होते आणि दरदर आठवड्याला तो दिवस गेला म्हणजे तेवढा तो खोडून टाकीत असे. त्याविषयीं त्याच्या रोजनिशींत पुष्कळ उल्लेख आहेत त्यांतून कांहीं खालीं देतो—

तारीख १० जानेवारी–अजून मला हिंदुस्थानांत किती बुधवार काढावयाचे आहेत तें **मरे** साहेब आणि मी मोजीत होतों, सारे ४२ उरले आहेत. आज हवा थंड आणि संतोषकारक आहे. आजचा सारा दिवस अशीच होती. तरीं पुढच्या नोव्हेंबर महिन्यांत मी येथें नसेन असें मनांत येऊन संतोष होतो आणि एकंदरींत तो केव्हां येईल असें वाटतें.

कांहीं आठवड्यांनीं पुनः असें लिहिलें आहे—

आजचा बुधवार गेला. आतां सारे तेहतीस राहिले.

तारीख २० जून—राहिलेल्या बुधवारांपैकीं विसावा आतां खोडून टाकला. जो काल येण्याची मी इतके दिवस वाट पहात आटवडे मोजीत राहिलों आहे तो इतका जलद जवळ येत चालला आहे कीं तें पाहून मला भय वाटतें. भीति वाटण्याचें कारण माझी जाण्याची उत्सुकता कांहीं कमी झाली आहे असें नव्हे. तर नेमल्यावेळीं जाण्याची माझी तयारी होणार नाहीं असें वाटतें हें आहे. आतां पुनः अभ्यास नेटानें करण्यास सुरवात केली पाहिजे. ग्रीस देशाविषयीं मी अद्याप कांहीं माहिती करून घेतली नाहीं.

तारीख २० फेब्रुआरी. अद्याप शांत आणि सुखावह आहे. आतां हवा ही थंड आहे आणि अशीच राहील तर सर्व फार संतोषकारक होईल. मला काम पुष्कळ आहे परंतु रिकामा वेळ सांपडतो तो अथेन्स आणि ग्रीस यांविषयीं वाचण्यांत जातो. काल रात्रीं सोवजीकडे मी नाचाला ( ball ) गेलों होतों. स्टील साहेब मजबरोबर विलायेतला येईल अशी मला फार आशा होती, परंतु तो दुसऱ्या मंडळीबरोबर जाणार.

तारीख २७ फेब्रुआरी. स्टील साहेब आतां आमच्या बरोबर येणार ह्मणतात ह्मणून मला संतोष झाला आहे. माझ्या वाटेवर लागणाऱ्या देशांच्या माहितीचीं क्लार्क, वालपोल, व इतर ग्रंथकारांचीच पुस्तकें मी अजून वाचीत आहें. आणि आतां निघण्याची वेळ केव्हां येईल असें मला झालें आहे. मी काबुलाला गेलों होतों तेव्हांचा आपला रोजनामा संध्याकाळीं वाचीत असतों. त्या वाचनानें ही माझी उत्कंठा वाढत चालली आहे. मला अजून आठ महिने हिंदुस्थानांत काढले पाहिजेत आणि एक महिना समुद्रावर हालअपेष्टेंत घालविला पाहिजे. इतका काळ जाईल तेव्हां मग मी अगदीं एकाकी घोड्यावर स्वार होऊन वाळवंटांत जाऊन उभा राहीन. तेथपर्यंत मी आपल्या मनांत

येणारे पुष्कळ न आवडणारे विचार अगदीं सोडून दिले आहेत आणि आतां पुनः माझा काळ आनंदांत जात आहे.'

एल्फिन्स्टन साहेबाच्या मनांत मिसर, ग्रीस, इटली, सिसिली वगैरे देश पहावयाचे होते ह्मणून त्यांच्या वर्णनांची पुष्कळ पुस्तकें तो जमवीत होता. आपला मित्र स्ट्राची साहेब याला त्याणें तारीख २३ मे रोजीं पत्र लिहिलें त्यांत कांहीं पुस्तकें केरो शहरीं तारीख १ दिसेंबर पर्यंत तरी पोहोचावीं अशा बेतानें पाठविण्यास लिहिलें; त्याचप्रमाणें कांहीं आपण कार्फ्यु येथें जाऊन पोहोंचे पर्यंत तेथें जाऊन पडावीं असें लिहिलें आणि पुढें असें लिहिलें—तुमच्या तारीख १४ डिसेंबरच्या पत्रांत माझ्या राजीनाम्यासंबंधानें जो मजकूर आला आहे त्याशिवाय दुसरा कांहीं हा वेळपर्यंत मला समजलेला नाहीं. परंतु तो आणि माझ्या जागीं मालकम साहेबाची नेमणूक झाली आहे अशी जानेवारी महिना अर्धा होईपर्यंत आलेल्या गलबतांतून जी वातमी आली आहे ती ऐकून माझें मन अगदीं निश्चित झालें आहे. इतकेंही होऊन अखेर माझा राजिनामा गुदरला नसेल तर तुह्मी अशी वातमी ऐकावयाला तयार असा कीं एल्फिन्स्टननें गळयाला फांस लाऊन घेऊन जीव दिला, किंवा रजा न घेतां तो मिसर देशाला निघून गेला. तसें झालें तरी परिणाम एकच. माझ्या प्रवासाच्या बऱ्याचशा भागाला मला वाटतें आहे त्यापेक्षां जास्त काळ लागेल तर मग मी आणखी कांहीं दिवस थांबेन आणि अर्धा उन्हाळा झाला ह्मणजे कुस्तंतुनिया ( constantinople ) येथें जाईन, युफ्राटिस नदीच्या कांठचा प्रदेश पाहीन आणि मग दुसरें काम नाहीं, फक्त

But just to look about us and to die

चोहींकडे विलोकन करून सुखें नयन झांकावे.

ह्मणून पावसाळयांत ग्रीस देशांत जाईन.

जें कांहीं पहाण्यासारखें असेल तें सर्व मी नीट चांगले कां पाहूं नये

[stamp]

हें मला समजत नाहीं. इंग्लंडाला जाण्याची मला जितकी आतुरता आगें होती तितकी आतां नाहीं, आणि तेथें गेल्यावर तसें आतां त्या देशांत ज्या गोष्टी चालू आहेत त्यांत माझें मन जितकें रमेल त्यापेक्षां बनारस, होळकरगर्दी, सन १८०७ मधील मौज इत्यादि विषयांवरच्या मागच्या गोष्टी बोलण्यांत मला अधिक आनंद वाटेल. ज्याची आशा थोडी असते तो सुखी असतो आणि त्याची निराशा होणार नाहीं.'

**एल्फिन्स्टन** साहेबाचें सारें लक्ष युरोपांत जाण्याकडे लागल्यापासून त्या प्रवासांत पहावयाच्या गोष्टींवांचून दुसऱ्या कोणत्याही विषयासंबंधाचें पुस्तक वाचण्यास त्याला फावत नव्हतें तथापि एक पुस्तक तो वाचीत असें त्याणें एक चर्च बायवल (church Bible) मिळविलें होतें आणि तें तो दिव्याजवळ बसून लक्षपूर्वक आनंदानें वाचीत असे. त्याविषयीं त्याच्या रोजनिशींत कोठें कोठें उल्लेख आहेत. ते असे. -

तारीख ११ एप्रिल. मजजवळ चर्च बायवल आहे. तें मला रात्रीं वाचतां येतें आणि मी तें आनंदानें वाचतों.

तारीख २६ एप्रिल. मला आपलें बायबल रात्रीं मेणबत्तीच्या उजेडानें वाचतां येतें असें दिसून आलें. हें मोठेंच काम झालें.

**एल्फिन्स्टन** साहेबाला ह्या देशांतला अखेरचा पावसाळा जड गेला. त्यांत त्याची प्रकृति बिघडली. त्यामुळें आतां कदाचित आपलें जाणें होणार नाहीं अशी त्याला भीति उत्पन्न झाली; स्वदेशीं गेलें म्हणजे कसें काय होईल, रिकामें बसून वेळ कसा जाईल, इत्यादि अनेक गोष्टी मनांत येऊं लागल्या असें त्याच्या अनेक लेखांवरून दिसतें. परंतु एकंदरींत आपला पुढील काळ सुखांत जाईल असेंच त्याला वाटत होतें. कोल्हापूरच्या राजानें थोडी गडबड चालविली त्यामुळें त्याला त्रास उत्पन्न झाला आणि कांहीं वेळ असें वाटूं लागलें कीं आतां लढाईवर बेतेल आणि आपल्याला अडकून पडावें लागेल. परंतु सरतेशेवटीं तो दंगा मोडला आणि कोल्हापूरची व्यवस्था

लागली. आक्टोबर महिना लागला, आतां गव्हरनर साहेब जाणार ह्मणून त्यांना मेजवान्यांवर मेजवान्या होऊं लागल्या आणि मानपत्रें देण्याचे समारंभ होऊं लागले. त्या महिन्याच्या शेवटीं त्याणें असें लिहिलें आहे—मी आपली अखेरची काळी पेटी ही आतांच बंद केली आणि मोकळा झालों परंतु मला जसा आनंद वाटावा तसा वाटत नाहीं. कारण आज पावणे दोन महिने झाले, माझी प्रकृति नीट नाहीं. मालकम साहेब तारीख २६ रोजीं आलेले पाहून सर्वांना आश्चर्य वाटलें. त्यांची प्रकृति उत्तम आहे आणि वृत्ति नित्याप्रमाणें आनंदी आहे ह्मणून आतां कांहीं काळजी उरली नाहीं. आतां फक्त माझी प्रकृति सुधारली पाहिजे, ती मला वाटतें मी गलबतावर बसलों ह्मणजे सुधारेल.

तारीख ३१ आक्टोबर. शेवटचा राहिलेला बुधवार मी आतांच खोडून टाकला. उद्यां मी काम सोडतों आणि मोकळा होतों. मी स्वतंत्र केव्हां होईन असें इतके दिवस मला झालें होतें तो योग उद्यां येईल.

वर लिहिल्याप्रमाणें सन १८२७ च्या नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेस ह्मणजे बरोबर आठ वर्षांपूर्वीं ज्या दिवशीं एल्फिन्स्टन साहेब मुंबईचा गव्हरनर होऊन कामाला बसला त्याच तारखेला तें काम त्यानें सोडलें आणि तें मालकम साहेब पाहूं लागला. पुढें पंधरा दिवस तो मुंबईत होता. त्या अवकाशांत लोकांनीं त्याचें फार गौरव केलें, परंतु त्या बद्दल त्याणें आपल्या रोजनम्यांत कांहीं फारसें लिहिलें नाहीं. एक लेख आहे, तो असा—

तारीख ८ नोव्हेंबर. आतां हें पुस्तक (रोजनामा) युरोपास पाठविण्याच्या सामानांत बांधून टाकावयाचें, तेव्हां त्यांत मला जें काय शेवटचें ह्मणून लिहावयाचें आहे तें लिहितों. कामाची आणि बांधाबांधीची घाई, आजारीपणा आणि त्यांतच कांहीं औषधामुळें आलेली गुंगी यांचा परिणाम असा झाला आहे कीं माझ्या चमत्कारिक स्थितीचा मला वि-

चार करतां येत नाहीं आणि असें झालें नसतें तर ज्या पुष्कळ गोष्टींचा माझ्या मनाला अगदीं चटका लागून राहिला असता त्यांचें मला कांहीं वाटत नाहीं.'

'मालकम साहेबाच्या अंगांत कांहीं थोडे दोष आहेत तरी दयाळुपणा, स्नेह, शहाणपण, आणि विनोदीपणा या गुणांनीं त्याचा सहवास आनंदाचा होतो. मंडळींचें आणि लोकांचें मजवर जें विलक्षण प्रेम आहे त्याबदल मी त्यांचे सतत आभार मानले पाहिजेत. इतक्या स्नेह्यांनां मी आतां सोडून जाणार ह्मणून मला वाईट वाटतें आणि इत उत्तर त्यांतले कोणी जवळ नाहींत असें झालें ह्मणजे याहून दसपट वाईट वाटेल यांत संशय नाहीं. परंतु हा वेळपर्यंत राजीनामा दिल्याबदलचें मला क्वांडाइतकें वाईट वाटत नाहीं आणि राजीनाम्याची गोष्ट कधीं निघाली नसती तरी देखील तारीख १५ रोजीं मी गलबतांत बसून ( साधल्यास ) चालता होईन.'

'नोकरी सोडून जावें ही माझ्या मनांत फार दिवस असलेली गोष्ट आहे, हिचा परिणाम काय होईल हें कालांतरानेंच दिसून येणार आहे. परंतु वृद्धापकाळ, आळस आणि लघुत्व येणार, यांचे परिणाम मी नीट मनांत आणलेले आहेत; आणि भावी स्थिति माझ्या दृष्टीपुढें जशी उभी आहे त्यापेक्षां वाईट होईल तर तें आश्चर्य होईल.'

**एल्फिन्स्टन** साहेब चाकरी सोडून निघाला तेव्हां लोकांनां अतिशय वाईट वाटलें आणि त्यांनीं त्याचा जितका मान सन्मान केला तितका दुसऱ्या थोड्याच सरकारी नोकरांचा केला असेल. मुंबई शहरांतील व इलाख्यांतील इंग्रज लोकांनीं, पुणें प्रांतांत असलेल्या मुलकी व लष्करी अम्मलदारांनीं, पाद्रीमंडळीनें व विद्वज्जनसमूहानें (Literary Society) अशा निरनिराळ्या सभाजांनीं मानपत्रें दिलीं. त्यांत मुंबई इलाख्यांतील सर्व प्रकारच्या लहान थोर एतद्देशीय लोकांनीं मिळून एकविचारें जें मानपत्र दिलें तें विशेष ध्यानांत ठेवण्यासारखें होतें. त्याचें पहिलें कलम असें—

आतां आपण येथील राज्यकारभार सोडून जाणार ह्मणून ह्या मुंबई इलाख्यांत मोडणारे व त्यास जोडून असलेले मुलखांतील आह्मी सर्व एतद्देशीय राजेरजवाडे, सरदार, जाहागीरदार, गृहस्थ लोक आणि मुंबईचे रहिवासी, ह्या सर्वांच्या मनाला जें अतिशय दुःख वाटत आहे आणि जें सतत असेंच वाटत राहणार तें थोडेंच कां होईना परंतु आपल्या हातून होईल तेवढें, उघड बोलून दाखविल्यावांचून या प्रसंगीं आमच्यानें राहवत नाहीं; कारण आपण दक्षिण देशचे कमिशनर आणि मुंबईचे गव्हरनर होईपर्यंत, साऱ्या हिंदुस्थान देशाला ब्रिटिश राज्यापासून केवढा अमोलिक लाभ होणार आहे हें अगदीं बिनचूक ध्यानांत आणण्याला आह्मी केव्हां ही समर्थ नव्हतों. परंतु आज इतके दिवस-पर्यंत आपली मन मोकळें करून व लोकांस उत्तेजन येईल अशा प्रकारें वागण्याची रीत, मनाचा निर्मळपणा ह्या देशच्या लोकांचें कल्याण आणि हित व्हावें अशी सतत वागविलेली बुद्धि, त्यांच्या प्राचीन चालीरीति व कायदे ह्यांविषयीं दाखविलेली मानमान्यता, बुद्धि आणि नीति यांच्या सुधारणेपासुन होणारे अव-र्णनीय नफे यांचा त्यांच्यामध्यें प्रसार व्हावा ह्मणून सतत परिश्रम, सर्व वर्गाच्या लोकांच्या स्थितींत सुधारणा होत जाऊन ती कायम रहावी ह्मणून आणि उत्तम तत्वांवर त्यांची भरभराट होत जावी ह्मणून त्या विषयावर खर्च केलेली आपली विशालबुद्धि, जिच्या योगानें आपल्या खासगी व सरकारी कामांतील संबंधानें आपली येवढी मोठी कीर्ति झाली आहे ती—हें सर्व पाहून आह्मी आश्चर्यचकित झालों आहों आणि आह्माला असें वाटूं लागलें आहे कीं आमच्या ह्या जन्मभूमीचें कल्याण होण्याला हीवर ब्रिटिश राज्य स्थापन होणें हेंच फार महत्वाचें व अवश्य असून ईश्वरानें हा आह्मांवर मोठा अनुग्रह केला आहे.'

त्याच्या कारकीर्दीपासून लोकांचें हित काय झालें तें लिहून पुढें त्या मानपत्रांत त्याणें आमच्या लोकांत विद्येचा प्रसार होण्याकरितां केवढे परिश्रम केले तें सांगून इंग्रजी भाषा, ग्रंथ, व शास्त्रें व युरोपांतील नीतिशास्त्र शिक-विण्याकरितां एक किंवा अधिक गुरूंच्या नेमणुका करण्याकरितां वर्गणीनें पैसा जमविण्याचा आपला निश्चय आहे असें लिहून मग त्याला अशी विनंति केली

होती कीं आपले आह्मांवर जे मोठे उपकार झालेले आहेत त्यांचें सतत स्मरण रहावें आणि त्यांबद्दल आह्मी थोडें तरी उतराई व्हावें व आपलें नांव आह्मांमध्यें चिरकाल रहावें ह्मणून त्यानेमणुकींशीं आपलें नांव संलग्न करावें, त्यांस **एल्फिन्स्टन** प्रोफेसराशिप्स ह्मणावें, अशी आमची इच्छा आहे. तसेंच नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीची स्थापना करणाऱ्या उदार व ज्ञानवान पुरुषाचें कायमचें स्मारक ह्मणून तिच्या दिवाणखान्यांत लावण्याकरितां आपली तसवीर विलायतेंतल्या चांगल्या कुशल कारागिरा कडून काढून आणावी अशी ही आमची इच्छा आहे. तर ह्या दोन ही गोष्टींस आपण कृपा करून अनुमोदन द्यावें.

**एल्फिन्स्टन** साहेबांचें नांव आपल्या देशांत चिरकाल रहावें अशी लोकांनां जी इच्छा उत्पन्न झाली आणि ती त्यांणीं त्याला बोलून दाखविली ती थोडयाच काळांत सिद्धीस गेली. सर टामस लारेन्स नामक प्रसिद्ध चित्रकाराच्या हातून त्याची तसवीर तयार होऊन आली आणि ती नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या दिवाणखान्यांच्या भिंतीवर लटकली. तसाच चांट्रे नामक कुशल शिल्पकारानें निर्मिलेला त्याचा संगमरवरी पुतळा तयार होऊन आला आणि त्याची स्थापना मुंबईच्या टाऊन हालांत झाली. ही पाषाणमयमूर्ति आणि ती रंगनिर्मित प्रतिमा पाहून तो आपल्यापुढें अहोरात्र उभा आहे असें प्रेक्षकास वाटतें. परंतु ह्या निर्जीव रूपदर्शक स्मारकांपेक्षां निराळें असें जें त्याचें तिसरें स्मारक **एलफिन्स्टन** कालेज ह्या नावानें झालें त्याणें त्याचें नांव अजरामर झालें आणि त्यापासून ह्या इलाख्यावर अगणित उपकार झाले. तो खरा विद्याभिलाषी असून हिंदुस्थानच्या लोकांत विद्येचा प्रसार पुष्कळ व्हावा अशी त्याची खरी इच्छा होती व त्याप्रमाणें कांहीं तरी घडावें ह्मणून तो फार झटत ही होता. त्या कामीं त्याणें जे बेत योजिले होते ते कांहीं सिद्धीस गेले नाहींत ह्मणून त्याला वाईट ही वाटत होतें. त्यामुळें एका मोठया पाठशाळेची स्थापना करून ती आपल्या नांवानें अंकित करण्याचा मंडळीचा हेतु आहे असें त्याला समजलें तेव्हां त्याला मोठा आनंद होऊन त्यांच्या भरांत Hoc potius mille signs असे शब्द त्याच्या तोंडांतून निघाले

मंडळीनें त्याला मानपत्र देण्याचा विचार ठरविला तेव्हांच वर्गणी जमविण्यास सुरवात केली. दोन लक्ष रुपयांवर आंकडे लागलेच पडून पुढें एकंदर २७०००० रकम झाली. एतद्देशीय लोकांनां इंग्रजी भाषा आणि युरोपांतल्या कला, शास्त्रें व ग्रंथ शिकविण्याकरितां गुरू नेमावे; त्या जागा प्रथम ग्रेटब्रिटन देशांतून विद्वान लोक बोलाऊन आणून त्यांनां द्याव्या आणि पुढें तीं कामें करण्याला अगदीं योग्य असे एतद्देशीय लोक तयार होऊन मिळूं लागले ह्मणजे त्यांनां द्याव्या. त्यांना पगार देण्याकडेच ह्या रकमेचा विनियोग करावा असा ठराव झाला.

याप्रमाणें स्मारकाचा निश्चय झाला, पैसा जमला; परंतु सन १८३४ पर्यंत शाळा सुरू झाली नाहीं. कारण विलायत सरकाराकडून निकाल लौकर होईना. आपण इतका पैसा जमवून लोकांच्या विद्याध्ययनाची सोय करीत आहों तर सरकारानेंही या सत्कार्यास हातभार लावावा असें लोकांनां वाटणें साहजिक होतें, त्याप्रमाणें वाटल्यामुळें त्यांणीं सरकारास अर्ज केला. सर जान मालकम साहेब गव्हरनर कांहीं प्रतिकूल नव्हते. त्यांणीं लोकांच्या ह्या विनंतीचा नीट विचार व्हावा अशी शिफारस करून प्रकरण पुढें पाठविलें. परंतु तेथें कांहीं लौकर दाद लागेना. अखेर विलायत सरकारानें कांहीं वर्षांनीं कृपादृष्टीनें तिकडे पाहून जें काय औदार्य प्रकट केलें तें इतकेंच कीं त्या जमलेल्या रकमेवर चांगलें व्याज देऊं असें उत्तर दिलें. तें हातीं येतांच पुढील कार्यास सुरवात झाली आणि एल्फिन्स्टन इन्स्टिटयूशन या नांवानें विद्यालयाची स्थापना झाली. पुढें स्वकर्तव्याविषयीं सरकारची जसजशी जागृति होत गेली तसतशी त्या विद्यालयाकडे कृपादृष्टि अधिक पोहोचूं लागली. आपलें नांव आपल्याला प्रिय असलेल्या विषयाला खिळून जाणार असें एल्फिन्स्टन साहेबानें ऐकिलें तेव्हां त्याला मोठा आनंद झाला होता तो मुंबईच्या लोकांनीं मनांत आणल्या प्रमाणें सर्व गोष्टी पार पडल्या हें पाहून सहजच दुणावला असेल.

———

# भाग ३

## खुषकीच्या मार्गानें स्वदेशीं गमन. सन १८२७–२९

Blessed is the man who dares approach the bower &

**एल्फिन्स्टन** साहेबानें मुंबईच्या गव्हर्नरीचा राजीनामा दिला त्या वेळेपासून त्याच्या चरित्रांतील मुख्य भाग जो राजकार्यधुरंधरत्व त्याची समाप्तीच झाली ह्मणावयाची. त्यावेळीं त्याचें वय कांहीं फार नव्हतें. त्याला सारीं ४८ वर्षें होतीं. या वयांत विलायतेंतलें पुष्कळ मुत्सद्दी राज्यकारभारांत शिरून नुकतेसे कोठें नांवारूपास येऊं लागत असतात. **एल्फिन्स्टन** साहेबाचें वय उतार झालें होतें किंवा पुढें आयुष्य थोडें उरलें होतें, किंवा त्याला राजकारभारांतली दुसरी एकादी मोठी जागा मिळत नव्हती असेंही नाहीं. हिंदुस्थानांत सर्वांत मोठा अधिकारी ह्मटला ह्मणजे गव्हर्नर जनरल; तर त्या जागेवर त्याची नेमणूक करावी असें प्रधानमंडळांत ठरून एकदोन वेळ त्यांणीं त्याला ती पत्करा असें ह्मटलें देखील. लहानपणीं त्याणें जी महत्वाकांक्षा धरली होती ती अद्याप पुरी झाली नव्हती आणि पुरी होण्याचा असा सुयोग अनायासानें आला असतां तो तो फुकट घालवता असेंही संभवत नाहीं. परंतु विचाराअंतीं त्याला असें वाटलें कीं आतां आपण या भानगडींत पडूं नये. मनाचा असा निर्धार झाल्यावर त्याणें आतां आपल्याला नोकरी होणार नाहीं असें ज एकदा ह्मटलें तेंच कायम राखलें. आपण मोठा पराक्रम करावा, आपलें नांव गाजवावें, मोठी कीर्ति मिळवावी, अशी त्याला प्रथम प्रथम मोठी हौस होती, परंतु जसजसा काळ लोटत चालला तसतसें त्याला असें वाटूं लागलें कीं आपला हेतु पूर्ण होण्याला जेवढी बुद्धि व शारी पाहिजे तेवढी आपल्या अंगीं नाहीं याकरितां आपण ह्या नादांत पडूं नये. पुढें पुढें तर ज्या विषयांत आपण पूर्वी मन घातलेलें नाहीं त्यांत आतां पडणें ह्मणजे साहस आहे असें त्याला वाटूं लागलें आणि तो इतका जपून

वागूं लागला कीं तशा एखाद्या गोष्टीविषयीं मत देणें झालें तर तो अगदीं भीत भीत देत आहेसें दिसे. इंग्लंडांतील राजकारस्थानें निराळीं आणि हिंदुस्थानांतलि निराळीं. आपला आजपर्यंतचा सर्व काळ त्यांत गेला, इकडची माहिती नाहीं, या करितां स्वदेशच्या कारस्थानांत तोंड घालण्याची आपली योग्यता नाहीं व इकडल्या मुत्सद्दी मंडळींची बरोबरी करूं पहाण्यांत शहाणपणा नाहीं असें त्याणें आरंभींच ताडलें. यांत त्याच्या समकालीन कांहीं मंडळीपेक्षां त्याचा शहाणपणा अधिक दिसून आला. तसेंच हिंदुस्थानच्या राज्यकारभारांतून त्याणें अंग काढल्यापासून येथच्या सामाजिक व राजकीय स्थितीमध्यें किती बदल होत गेला व आपल्या आणि आपल्या पुढल्या नवीन पिढीच्या मुत्सद्दी मंडळीच्या विचारांत किती अंतर आहे तें ही त्याच्या लक्षांत येऊन चुकल्यामुळें पुढें हिंदुस्थानांत ज्या गोष्टी घडल्या त्यांची चर्चा करण्यांत देखील तो मन घालण्यास खुषी नसे. त्यांत तर त्याचें शहाणपण चांगलेंच दिसून आलें. तरी हिंदुस्थानासंबंधीं त्याला जी काय माहिती होती ती कोणाच्या उपयोगीं पडूं नये अशी त्याची इच्छा नव्हती आणि एकादा कृपण मनुष्य आपलें धन कोणाच्या दृष्टीस पडूं नये ह्मणून जसें जपून झांकून ठेवितो तसें मात्र तो करीत नसे. मला अमूक माहिती आहे आणि तमूक माहिती आहे असें तो आपण होऊन कांहीं कोणाला सांगूं लागत नसे, परंतु कोणी कांहीं विचारलें तर मोकळ्या मनानें सांगण्याला अनमान करीत नसे. अमूक एका गोष्टींत माझी सल्ला अशी आहे असें तर तो कधींच ह्मणत नसे आणि इंग्लंडांतल्या मुत्सद्दी मंडळांत जे नेहमी दोन पक्ष असतात त्यांतल्या कोणत्यांतच तो शिरला नाहीं आणि कोणत्याचीच स्तुति किंवा निंदा करीत नसे. हिंदुस्थानसंबंधीं कांहीं प्रश्न उत्पन्न झाला ह्मणजे कांहीं मित्रमंडळी त्याच्याकडे जात आणि त्याविषयीं त्याचे विचार काय आहेत तें समजून घेत. कांहीं गोष्टींची सरकारी रीतीनें चौकशी होई तेव्हां तींत त्याची साक्ष घेत.

हिंदुस्थानांत आल्यापासून ३१ वर्षें इकडच्या उष्ण हवेंत सतत

नोकरी करण्यांत गेल्यानें त्याच्या प्रकृतीला थोडा बहुत अपाय झाला होता. आतां नोकरीची जरूर आहे असें नाहीं, बेताबातानेंच खर्च करून राहिलें तर कांहीं कमी पडावयाचें नाहीं असें वाटण्या इतका त्याणें द्रव्यसंचय केलेला होता. आतां शेष राहिलेलें आयुष्य स्वस्थपणें पुस्तकें वाचण्यांत, देशाटण करून नाना प्रकारचे मुलूख पहाण्यांत व मित्रमंडळी बराबर संभाषण करण्यांत घालवावयाचें असा त्याणें बेत केला होता. तसें कालक्रमण करणें त्याला स्वभावतःच आवडत होतें. त्याणें एक इतिहास लिहिला त्या कामीं जो वेळ गेला तेवढा शिवाय करून बाकीचा काळ वर लिहिल्याप्रमाणें आनंदांत घालविला. असा शांतिसुखाचा उपभोग त्याला बराच काळपर्यंत घडला.

एका ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे कीं **एल्फिन्स्टन** साहेबाला गव्हरनर जनरलची जागा चालून आली असतां ती त्याणें स्वीकारली नाहीं ही चूक केली आणि त्या चुकीमुळें त्याचें नांव पहिल्या प्रतीच्या मुत्सद्यांत यावयाचें तें आलें नाहीं, दुसरींतच राहिलें. तो गव्हरनर जनरल होता तर त्याची कीर्ति फारच मोठी होती.

**एल्फिन्स्टन** साहेब मुंबईहून सन १८२७ च्या नोव्हेंबर महिन्यांत घरीं जाण्याकरितां ह्मणून निघाला परंतु सन १८२९ च्या मे महिन्यापर्यंत विलायतेस जाऊन पोहोंचला नाहीं. मध्यंतरीं जे १८ महिने गेले त्यांत तो इजिप्ट ह्मणजे मिसरदेश, सीरिया, एशियामायनर, ग्रीस आणि इटली या देशांतून आस्ते आस्ते फिरत चालला होता. जे प्रवासी आपल्याला अमुक देशांत अमुक पहावयास सांपडेल, तमूक देशांत तमुक मिळेल, अशी बाहेर पडतांना मोठी आशा धरून निघत असतात त्यांची पुढें बहुधा निराशा होत असते; कारण त्यांनां वाटत असतें तसें कांहींच त्यांच्या दृष्टीस पडत नाहीं. परंतु **एल्फिन्स्टन** साहेबाचें तसें झालें नाहीं. त्याच्या मनाचा उत्साह कधींच कमी झाला नाहीं. ग्रीस आणि लीव्हेंट ह्या देशांतून जातांना त्याला बरेच प्रयास पडले आणि साहसही करावें लागलें. कारण त्या मुलखांत तेव्हां लढाया आणि दंगेधोपे चालू होते. ग्रीक लोकांनी बंड केलें होतें त्याचा तेव्हां

अगदीं भर होता त्याणें मुंबई सोडल्यापासून तीन दिवसांनीं नाव्हारिनोची लढाई झाली आणि तो कान्स्टंटिनोपल ह्मणजे रूमशाम येथें जाऊन पोहोचण्यापूर्वीं नुकतीच रशिया आणि तुर्कस्थान यांची लढाई जुंपली होती. अशा स्थितींत इंग्लडाशी बेबनाव झालेल्या राष्ट्राच्या मुलखांतून फिरत जाणें बरेंच धोक्याचें होतें, परंतु तें साहस त्याणें केलें. त्याणें प्रवासांत ही रोजनामा ठेविला होता. तो ज्या ज्या मुलखांतून गेला तेथची सामाजिक व राजकीय स्थिति कशी होती त्याविषयीं त्याणें पुष्कळ लिहून ठेविलें. परंतु त्याच्या लेखांचा मुख्य विषय तो नव्हता. प्राचीन इतिहासांत गाजलेल्या, नामांकित स्थळांचें व गोष्टींचें स्मरण देणाऱ्या, किंवा प्राचीन काव्यांत ज्यांचें नांव चिरस्थाई होऊन राहिलें आहे अशा स्थळांच्या खाणाखुणा ज्या मुलखांत जागोजाग दृष्टीस पडतात, त्यांचें निरीक्षण करण्याची ज्याला मोठी हौस, अशा त्याच्या सारख्या विद्वान मुत्सद्दी आणि सुक्ष्मदर्शी पुरुषाच्या लेखणींतून, तो साधारण प्रवासी ज्या मुलखांत फिरत नाहींत त्यांतून मुद्दाम गेला असतां, ज्या ज्या गोष्टीनें त्याचें चित्त वेधलें त्यांच्या त्यांच्या वर्णनाचे लेख जसे उतरावे तसेंच उतरले आहेत. ते फार मनोरंजक आहेत.

**एल्फिन्स्टन** साहेब मुंबईहून निघाला तेव्हां त्याच्या बरोबर मिस्टर लार्सिंग्टन, त्याची पत्नी, मिस्टर स्टील आणि दोन डाक्टर इतकी मंडळी होती. त्या दोघांपैकीं एक डाक्टर लीव्हेंटमध्यें त्याच्या बरोबर फिरत गेला. त्यांचें गलबत मुंबईहून निघालें तें मोखा बंदरांत लागलें तेथून ते तांबड्या समुद्रावर कोसीर बंदरीं उतरून मिसर देशांत शिरले आणि वाळवंट वलांडून नाईल नदीवर गेले. सध्याचा मार्ग चालू होण्यापूर्वीं या वाटेनें जाण्यायेण्याची वहिवाट होती असें दिसतें. ह्याच्या आधीं सुमार वीस वर्षांपूर्वीं सर डेव्हिड बेअर्ड हिंदुस्थानच्या मोहिमेस निघाला तो ह्याच बंदरावरून निघाला. असो. नाईलनदीवर पोहोचल्यापासून प्राचीन स्थळें पहाण्याची सुरवात झाली. मिस्टर विल्किन्सन ह्यानें त्यांना कारनाक आणि थीब्स हीं दोन प्राचीन उद्ध्वस्त शहरें दाखविलीं. पूर्वकालीं फार सुधारलेलीं

म्हणून प्रसिद्ध अशा पडापड झालेल्या शहरांत पंधरा दिवस वास्तव्य करून ती मंडळी गलबतांतून केरोशहरास जाण्यास निघाली तेथें ते तारीख २ फेब्रुआरी १८२८ रोजीं पोहोंचले. तेथें फक्त १० दिवस घालवून ते आलेक्झांड्रियाला गेले आणि पुढें सीरिया व एशिया मायनरमध्यें जाण्याच्या तयारीला लागले. तुर्क लोकांच्या मुलखांत त्यावेळीं फार अस्वस्थता होती, परंतु एलिफन्स्टन साहेबानें त्याबद्दल कांहीं लिहिलेलें नाहीं; ज्या चालू गोष्टींशीं त्याचा संबंध आला तेवढयांचा मात्र उल्लेख केला आहे. त्यांवरून एकाद्याला असें वाटेल कीं त्या मुलखांत अगदीं शांतता होती. परंतु खरा प्रकार तसा नव्हता. महंमद अल्लीच्या आरमाराचा नाव्हारिनोच्या लढाईंत फडशा पडला, युरोपियन राष्ट्रें त्या लढाईंत पडून त्याच्या फौजांना शह देऊन बसलीं आणि त्यानें जे बेत योजले होते ते सर्व फसून त्यांचा फार नाश झाला तरी त्याणें फ्रांक ( फ्रँकोनिया देशच्या ) लोकांशीं जें सख्य केलें होतें तें सोडलें नाहीं हें त्याला खरोखर भूषणावह होतें. मिसर देशांत व्यवस्था उत्तम होती; वसाहतवाले फ्रांक लोक आपल्याला कांहीं धक्का लागणार नाहीं अशी खात्री बाळगून आपले कामधंदे करीत होते. तुर्क अम्मलदार आमच्या प्रवासी मंडळीचें आगतस्वागत करीत होते. आणि लोक त्यांचा मान नीट ठेवीत होते. हे त्या देशांत गेले तेव्हां महंमद अल्ली तेथें नव्हता परंतु त्याणें आपल्या कोसीरच्या सुभेदाराला त्यांची व्यवस्था नीट ठेवण्याविषयीं व त्यांना जी लागेल ती मदत देण्याविषयीं हुकूम पाठवून ठेविला होता. पुढें त्याची भेट झाली तेव्हां त्यांचें स्वागत करून तुम्ही येण्यापूर्वीच मला आलेक्झांड्रियाहून जावें लागलें याबद्दल वाईट वाटतें असें तो म्हणाला. तें बहुधा वरोपचारी नसावें.

इजिप्तमधला त्या मंडळीचा प्रवास सुखानें झाला. परंतु तेथून पुढें कठीण आलें. आलेक्झांड्रियां येथें त्यांना असें कळलें कीं पालेस्टाईनमध्यें प्लेगाचा कहर उसळला आहे आणि पोर्ट ( तुर्कस्थानचे मुख्य सत्ताधीश ) कडून फर्मान ( परवाना ) मिळाल्यावांचून एशिया मायनरमध्यें पाऊल टाकतां येणार नाहीं. तेथें असतांना एलिफन्स्टन साहेबानें असें लिहून ठेविलें आहे.

" येथें आल्यापासून माझें मुख्य काम ह्मटलें तर पुढें प्रवास कसा करावा हे बेत चालले आहेत. पोर्टकडून परवाना मिळाल्यावांचून एशिया मायनरमध्यें पाऊल टाकतां येणारच नाहीं ह्मणून तिकडे जाण्याचें नांव घ्यावयासच नको. परंतु सीरियाच्या किनाऱ्यावर जावयाला मिळेल अशी मला आशा होती आणि अजून आहे. तेथें गेलों ह्मणजे आस्ट्रियन परवाना मिळवून व प्रसंगानुसार आपलें खरें राष्ट्रत्व प्रकट करून मला जरुसलेम आणि बालबेक पहावयास मिळेल. परंतु भाड्यानें गलबत मिळणें कठीण आहे. आणि पालेस्टाईन मध्यें प्लेगाचा अनर्थ चालला आहेसा दिसतो त्यामुळें ही धीर अगदीं खचतो." असो. शेवटीं त्याला गलबत मिळण्याची जी अडचण आली होती ती दूर झाली. एक सार्डीनियन गलबत नोलानें मिळालें, त्यांतून ते मिस्टर रटॉल, आणि डाक्टर गार्डन यांनां बराबर घेऊन जाफा येथें जाऊन उतरला आणि पालेस्टाईन व सीरियाचा कांहीं भाग यांत फिरला, तो पाहून त्याला संतोष वाटला. त्याणें लेबनन शहर आणि उद्वस्त झालेलें बालबेक पाहिलें.

बालबेक पाहून झाल्यावर जार्डन नदीच्या पलीकडे प्राचीन उद्वस्त पडलेलें जें जेरिकोनामक शहर तें पाहण्यास **एल्फिन्स्टन** साहेब गेला. तिकडच्या उद्वस्त शहरांचा आलीकडे बराच शोध लागलेला आहे परंतु त्या काळीं तिकडे जाणें ह्मणजे बरेंच धोक्याचें काम असे. वाटाड्ये वगैरे मिळण्याची तजवीज सहज झाली. **एल्फिन्स्टन** जेरिकोच्या आघाला (सरदाराला) जाऊन भेटला आणि त्यानें बेडौइन्स लोकांच्या एका टोळीशीं कांहीं करार करून त्यांना त्या जंगली मुलखांतून सुरक्षितपणें नेण्याचें ठरविलें. याप्रमाणें त्या भयाण मुलखांत फिरणाऱ्या साधारण चोरट्यांपासून होणाऱ्या उपद्रवाचा बंदोबस्त झाला परंतु खुद्द त्या वाटाड्या लोकांचें ज्यांच्याशीं हाडवैर होतें. त्यांचा उपद्रव होताच, तो चुकविण्याकरितां त्यांनां सतत जपावेंच लागत होतें. असो. या प्रवासांत आरबलोकांमध्यें त्याचें जें राहणें झालें त्यांत त्यांची जी माहिती झाली तिचें व त्या पडक्या शहरांतल्या देवालयांचें व स्तंभावलींचें त्याणें जें वर्णन केलें आहे तें मनोहर आहे.

सीरियामध्यें जातांना **एल्फिन्स्टन** साहेबानें मागें सांगितल्या प्रमाणें

आस्ट्रियन परवाना मिळवला होता परंतु तो फारसा उपयोगीं पडला नाहीं. आपलें खरें स्वरूप छपवून आम्ही आस्ट्रियन आहों ह्मणून तशी सारा दिवस बतावणी करीत राहणें त्यानां जड वाटूं लागलें आणि तसें निभणें कठीण दिसूं लागलें. तेव्हां मग सीरियांतून एशियामायनरमध्यें जातांना वेषांतर केलेलें टाकून आह्मी इंग्रज आहों असें उघड सांगत जाण्याचा त्याणें निश्चय केला. हे आस्ट्रियन नव्हत, इंग्रज आहेत असें जरुसलेम येथेंच बाहेर पडलें आणि बेरूट येथें ते केव्हां येतात अशी त्यांची वाटच पहात होते. एलिफन्स्टन साहेब ह्मणतो वेषांतरापासून जसा नफा होतो तसें नुकसानही होतें. कारण खरें स्वरूप छपविल्यानें लोकांच्या मनांत संशय उत्पन्न होऊन अपाय होण्याची भीति असते. तेव्हां एकंदरींत विचार करून पहातां सरळ मार्गानें चालावें हेंच बरें. याजकरितां आतां आह्मी इंग्रज आहों असेंच सांगावयाचें.

असो. याप्रमाणें मुलुख पाहून बेरूट येथें परत आल्यावर तेथून आंटिओक येथें जावें असा त्याचा विचार होता. मिस्टर एबॉट (Abbott) नामक तेथें जो इंग्रजांचा वकील होता तोही त्यांच्या बरोबर जाणार होता. एकरच्या पाच्छानें त्यांनां गलबतावर जाण्याची परवानगी प्रथम दिली परंतु मागाहून कांहीं तरी हरकती उपस्थित करूं लागला तेव्हां शोध करतांना अबॉट साहेबाला असें समजलें कीं आपल्याला येथून जाऊं देऊं नयें अशी पाच्छाची आंतून ताकीद आहे व आपल्यावर पोलिसाची नजर आहे. तें त्याणें **एलिफन्स्टन** साहेबाला सांगितलें तेव्हां त्याणें त्याला घेऊन जाण्याचा निश्चय केला. मग त्या गलबताच्या क्यापटनला आपला बेत कळवून त्यांणीं जो डाव योजला तो साधला. संध्याकाळच्या वेळीं रोजच्यासारखें फिरावयाला ह्मणून अबॉट साहेब बाहेर पडला तो त्या गलबताच्या होडींत संकेताच्या ठिकाणीं कुटुंबासह बसून सुमारें सात वाजतां गलबतावर गेला. तें लागलेंच हाकारावयाचें, परंतु वारा पडला असल्यामुळें हालेना. आतां कदाचित धरणें आलें तर मारामार करावयाची असें ठरवून वीस मनुष्यें हत्यारबंद होऊन उभीं राहिलीं. परंतु तसा कांहीं प्रसंग आला

नाहीं. तरी अशी दांडगाई करून आतां सीरियांत राहिलों तर कशी वेळ गुदरेल न जाणो असें मनांत आणून त्यांणीं आंटिओकला जाण्याचा बेत रहित केला आणि सायप्रस बेटांतील लारनाका बंदराची वाट धरली.

लारनाका येथून ती मंडळी सायप्रस येथें गेली, तेथून लीसियाच्या किनाऱ्यावरील अंटिफेलस आणि क्झांथस हीं प्राचीन शहरें पहाण्यांत एक आठवडा आनंदानें घालवून-होडस बेटाला गेली. तुर्क लोकांच्या व इंग्र्जांच्या स्नेहांत अंतर पडत चाललें आहे असें मध्येंमध्यें त्यांच्या कानीं येऊं लागले. एशियामायनरच्या पश्चिम भागांतील तुर्क लोक फार खवळले आहेत, आणि कोणी इंग्रज फ्रेंच किंवा रशियन प्रवासी त्या प्रदेशांत जाण्याला धजत नाहीं, असें जेव्हां त्यांणीं ऐकिलें तेव्हां त्यांना काळजी वाटूं लागली. परंतु ऱ्होडस येथें पोहोंचल्यावर ती थोडीशी दूर झाली, तेथच्या बेनें ( सुभेदारानें ) त्यांचें स्वागत केलें; सुलतान महमुदाच्या कारकीर्दींत तुह्मांला कांहीं काळजी करावयास नको असें ह्मणून लागेल ती मदत देण्याचें कबूल केलें. परंतु आतां अशा अशा वाटेनें आह्मी पुढें जाणार असें जेव्हां त्यांणीं सांगितलें तेव्हां फक्त धोपट मार्गानें जाण्यास परवाने देण्याचा मला हुकूम आहे; तो सोडून तुह्माला आजूबाजूस कोठें जाणें असेल तर फरमान हवा लागेल असें बोलला.

**एल्फिन्स्टन** साहेबाच्या मनांत जो मुलूख पहाण्याचें आज किती एक वर्षे घोळत होतें त्याच्याजवळ तो येऊन ठेपला असून त्यांत प्रवेश होण्याला अनेक अडचणी दिसूं लागल्या ह्मणून तो कांहीं निराश झाला नाहीं; त्याणें आणि त्याच्या त्या मित्रांनीं ही असा निश्चय केला कीं आपण त्या मुलखांत जावयाचेंच, पुढें कांहीं होऊ. ऱ्होड्स येथून निघून त्यांणीं कोस बेटाकडे गलबत हकारलें. थिआक्रिटसच्या सातव्या आयडिल ( पुस्तक ) मध्यें वर्णिलेल्या स्थलांचें दर्शन घेण्याच्या इच्छेनें ते तिकडे गेले. तेथें त्यांणीं तें गलबत सोडून दिलें. तेथून पुढें एका होडींत बसून ते बुद्रुम ह्मणजे प्राचीन हालिकारनासस शहर पहावयास गेले. तेथून पुढें त्यांच्या प्रवासास खऱ्या

हरकती आणि विघ्नें वगैरे कायतें सुरूझालें, कान्स्टान्टिनोपल पहावयास जावयाचें तर बादशहाचा फरमान पाहिजेच असें होतें. तो मिळण्याची तजवीज ते करीत होते, परंतु तो हातीं येण्याची वाट न पाहतां तसेच निघाले आणि बराच मार्ग क्रमून गेले. पुढें फरमान येऊन हातांत पडला.

त्यांनां ज्या अडचणी येतीलसें वाटत होतें त्यांतली एक देखील आली नाहीं. ते स्मरना जवळ जवळ गेले तेव्हां त्या किनाऱ्या वरील लोकांवर ग्रीक लोकांचे हल्ले होण्याची भीति असल्यामुळें ते सहजच बिथरून गेले होते तरी देखील ह्या प्रवासी मंडळीचें प्रत्येक ठिकाणीं चांगलें आदरातिथ्यच झालें. तेथचे आघा ह्मणजे पिढीजादे सरदार व शेतकरी लोक यांणीं देखील त्यांचा सत्कार केला.

जेथें प्राचीन शिल्पाचे मासले जागोजाग भरलेले आहेत आणि ग्रीक लोकांच्या ऐन अमदानीच्या काळांतल्या ऐतिहासिक किंवा कल्पित प्रसिद्ध गोष्टींचें पावलों पावलीं स्मरण होत आहे अशा त्या मुलखांत सुमार दीड महिना फिरत फिरत ते स्मरना, सार्डिस व ट्रौड, यांमधून जाऊन डारडानेलस येथें पोहोचले.

एशिया मायनरमध्यें प्राचीन इमारतींपैकीं पुष्कळ शिल्लक राहिलेल्या आहेत त्या व कोरीव लेख पुष्कळ आहेत ते एल्फिन्स्टन साहेबानें पाहिले व त्यां विषयीं आपल्या रोजनाम्यांत लिहिलें आहे. शिवाय त्या प्रदेशाचा देखावा तेथच्या लोकांची सामाजिक व राजकीय स्थिति आणि तेथील प्राचीन काळचीं प्रसिद्ध स्थळें पाहून त्याच्या मनाला जें काय वाटलें तें सर्व त्याणें लिहून ठेविलें आहे. आमच्या महाभारतासारखें ग्रीक भाषेंतलें अती प्रसिद्ध महाकाव्य ईलियड. त्यांत वर्णिलेलें रणांगण ट्राय पहाण्याला एल्फिन्स्टन दोनदां गेला, दुसऱ्या खेपेस तेथें तीन दिवस राहून ग्रीक लोकांच्या छावणीची जागा, नद्या वगैरे स्थळें कोणतीं असावीं याचीं अनुमानें करण्यांत तो अगदीं गर्क होऊन गेला होता, सायरा येथें असतांना त्याचें लक्ष त्या देशांत

प्रत्यक्ष चालू असलेल्या लढाईपेक्षां प्राचीनकाळीं झालेल्या ट्रोजन युद्धांतील गोष्टींकडेच अधिक लागलेलें होतें.

गल्लीपोली येथून **एल्फिन्स्टन** खुष्कीच्या मार्गानें कान्स्टन्टिनोपलास गेला. त्याचे स्नेही जळमार्गानें गेले. युरोपखंडाच्या हद्दींत त्याचें पाऊल पडलें तेव्हां त्याणें असें लिहिलें आहे—आतां मी युरोपांत आलों. जेव्हां मी युरोपांतून गेलों तेव्हां तेहतीस वर्षांनंतर तो पुनः माझ्या दृष्टीस पडेल आणि तो थ्रेस प्रांतांत येऊन, असें माझ्या मनांत आलें नव्हतें.

कान्स्टन्टिनोपलमध्यें **एल्फिन्स्टन** साहेबानें फिरून जें जें पहाण्यासारखें होतें तें पाहिलें. त्याच्या सभोंतालची दिसणारी शोभा, सुवर्ण शृंग, ( the golden Horn ) तें बंदर, वगैरेचें त्याणें आपल्या रोजनाम्यांत चांगलें वर्णन केलें आहे.

एकदां सुलतान साहेबांची स्वारी मशिदींत जाण्यास निघाली होती तेव्हां **एल्फिन्स्टन**, कर्नल बायम व गार्डन यांजबरोबर स्वारीचा थाट पहाण्यास गेला. ती मशीद लहानशीच होती. तिच्या पायऱ्यांजवळच ते उभे राहिले आणि सुलतान त्यांच्या अगदीं जवळून गेला; तेव्हां त्याचें जातां येतां दोन्ही वेळ त्यांनां नीट दर्शन झालें. त्याची नजर त्यांच्यावर गेली आणि त्याणें बोस्तंगी बाशी यास पाठवून ते कोण याची चौकशी केली. पायऱ्या उत्तरतांना त्याणें आपल्या तोंडाला व कपाळाला हात लाऊन लोकांनां सलाम केला. त्यांनीं तसाच परंतु अगदीं लऊन केला, *

रशियन लोक चालून येत होते, शुमला येथें त्यांचें मुख्य ठाणें पडलें होतें आणि लढाई चालू असल्यामूळें सहजच अस्वस्थता होती म्हणून **एल्फिन्स्टन** साहेबाला कान्स्टन्टिनोपलमध्यें जास्त दिवस रमण्यासारखें तें स्थळ नव्हतें.

---

* सुलतानानें लोकांनां मुजरे केले, त्यांणीं त्याला केले, तसा आपण केला कीं नाहीं हें एल्फिन्स्टन साहेबानें लिहिलेलें आढळत नाहीं.

तेथून ग्रीस देशाला जाण्याकरितां दोन महिन्यांच्या मुदतीनें त्याणें एक गलबत ठरविलें आणि तिकडचा मार्ग धरला. तुर्क लोकांनीं त्याचें आगत स्वागत कांहीं वाईट केलें नाहीं. त्याबद्दल कुरकुरण्यासारखें कांहीं नव्हतें.

प्राचीन काळच्या सुधारणेचें माहेरघर, सरस्वती देवीचें मुख्य पीठ, प्रजासत्ताक राज्याचें मूलस्थान, फारतर काय चौदा विद्या चौसष्ट कळांचें वसतिस्थान, होमरादिक महाकवि, थेमिस्टाक्लिस, पेरिक्लिस, साक्रेटीस, डेमास्थिनीस, हिराडाटस, प्लेटो, इत्यादि अनेक नररत्नांचें जन्मस्थान, "मूरतसे कीरत बडी" हें विशेषण ज्या एकालाच खरें लागू, असा जो प्राचीन काळीं अति विख्यात झालेला चिमुकला ग्रीस देश त्यांत जाईन आणि त्यांतलें वैभवशिखरास पोहोचलेलें अथेन्स शहर पाहून कृत कृत्य होईन असा जो **एल्फिन्स्टन** साहेबाचा फार दिवसांचा हेतु होता, तो पूर्ण होण्याचा समय जवळ आलासा दिसला तेव्हां त्याला आनंदाचें भरतें येणें साहाजिक होतें. मुंबई सोडल्यापासून नऊ महिन्यांनीं, सन १८२८ च्या आगस्ट महिन्याच्या तिसऱ्या तारखेस गलबतांत तो प्रातःकाळीं जागा होऊन बसला तों सूनियम गिरिशिखरस्थ संगमरवरी उंच स्तंभावलींचें दर्शन झालें. गलबत पुढें चाललें असतां एक एक स्थळ दृष्टीस पडूंलागलें तसतसें त्याची इतिहासांत कशी प्रसिद्धि आहे तें त्याला स्मरूं लागलें आणि वारा पडून जिकडे तिकडे अगदीं स्तब्ध होऊन गलबत तरंगत राहिलें तेव्हां सभोतालचा सर्व देखावा पाहून कांहीं कालपर्यंत तो आनंदांत मग्न होऊन गेला. मग त्याणें असें लिहिलें आहे—हीं एका पुढें एक लागलेलीं इतकीं मनोहर स्थळें एकदम दृष्टीपुढें आलेलीं पाहून प्राचीन स्थळें पहाण्याची मला जी हौस होती ती अंशतःपुरल्यासारखी झाली; परंतु मागें ( अर्थात काव्यें, इतिहास वगैरे वाचतांना ) जसा आनंद होतअसे तसा आतां ज्याचें दर्शन झाल्याबराबर, त्याचयाशीं ज्याचा संबंध आहे अशा पुरुषाचें स्मरण होऊन, आनंद झाल्याशिवाय राहिला असा एकही पदार्थ बहुधा दिसत नाहीं. या प्रमाणें आजाक्स, थीसॉस आणि हरक्युलीस पासून थेमि-

स्टाक्लिस, साक्रेटिस आणि डेमास्थिनीस, किंबहुना होरेस, व्हर्जिल आणि सिसिरो पर्यंत झालेल्या प्रसिद्ध पुरुषांचें मला स्मरण झालें. प्राचीन कांळी जी जी मनोरंजक गोष्ट होऊन गेली ती ती डोळ्यांपुढें येऊन उभी राहिली

एल्फिन्स्टन साहेबानें या प्रमाणें जात जात आनंदमग्न असूनच अथेन्स शहरांत प्रवेश करावयाचा, परंतु तसा योग आला नाहीं. त्यांचें गलबत चाललें असतां एक ग्रीक लढाऊ गलबत त्यांना भेटलें; त्याच्या नाखुदानें त्यांच्या गलबतावर जाऊन त्यानां सांगितलें कीं तुम्ही प्रथम पोरोस येथें जाऊन, अध्यक्षसाहेब कयापोडी इस्ट्रा याची परवानगी घेऊन याल तर अथेन्स तुमच्या दृष्टीस पडेल, त्या वांचून पडणार नाहीं. तें ऐकून त्याचें मन अगदीं विरस झालें आणि गलबत तसेंच चाललें असतां सायंकाळीं एका असामीनें त्याच्या हातांत दुर्बिन दिली आणि तेथून दहा बारा मैलांवर कांहीं इमारती दिसत होत्या त्या तींतून पहावयास सांगितलें. ह्या समयीं आपल्या ध्यानीं मनीं नाहीं अशा एकाद्या इमारतीचें दर्शन घडणार आहे असें कांहीं त्याला वाटलें नाहीं परंतु दुर्बिन घेऊन पाहातांना पार्थिनन दृष्टीस पडलें, मग काय विचारावें ! त्याला जो आनंद झाला तो पोटांत मावेना. तो म्हणतो पार्थिननच्या दर्शनानें माझ्या अंगावर रोमांच उभे राहिले. ( I was electrified) पोरोस येथें गेलें पाहिजे असें झालें तेव्हां आम्ही मुकाव्यानीं तिकडे वळलों. आतां अथेन्स कसचें दृष्टीस पडतें असें वाटून मी हताश झालों होतों अशा समयीं हा अथेन्सच्या दर्शनाचा योग आला. पार्थिननचे स्तंभ, अक्रापोलीस टेकडीची छाया, रुगतच्या दुसऱ्या कांहीं इमारती आणि डाव्या बाजूला, कांहीं अंतरावर फिलिपासचें स्मारक, हीं अगदीं स्पष्ट दिसत होतीं.

ह्या प्रमाणें अथेन्समध्यें जें मुख्य पहावयाचें त्याचें अकस्मात दिग्दर्शन झालें परंतु अल्पकाळांत प्रत्यक्ष दर्शन व्हावयाचें त्याला प्रतिबंध आला म्हणून एल्फिन्स्टन साहेबाला सहजच पुष्कळ वाईट वाटलें. तथापि तो

म्हणतो "अथेन्सपासून मागें फिरावें लागलें म्हणून माझी मोठी निराशा झाली हें तर खरेंच, परंतु एक मनोरंजक पदार्थ पाहून दुसऱ्याकडे वळलें म्हणजे त्यांत ही आनंद वाटत असतो, त्याप्रमाणें आतां आधीं पोरोसकडे जावें लागलें म्हणून ही हरकत नाहीं. तिकडे क्यापोडी इस्ट्रा व मारो कारडेटो यांची भेट होईल तो लाभच होईल; आणि तेथून तसेंच पुढें मोरिया मध्यें जाऊन यावें असें ही माझ्या मनांत येऊं लागलें आहे. याप्रमाणें जातां जातां 'एजिना बेटांतल्या एका डोंगरावर जुपिटर पान् हेलेनिअस याचें देवालय आहे तें मी दुर्बिणींतून पाहिलें. चांगलें स्पष्ट दिसलें.

अथेन्स पहावें असा जो **एल्फिन्स्टन** साहेबाचा फार दिवसांचा हेतु होता तो जरी यावेळीं सिद्धीस गेला नाहीं तरी पुढें थोड्याच दिवसांत गेला. परंतु तेथच्या अक्रापोलीसच्या माथ्यावर चढून जाऊन कृतकृत्य व्हावयाचें जें फार दिवस मनांत होतें तो हेतु पुरण्याचें मात्र त्याच्या नशीबीं नव्हतें. त्याणें जरी पुष्कळ खटपट केली तरी तें साधलें नाहींच. अथेन्स शहर त्या वेळीं टर्क ( तुर्क ) लोकांनीं बळकाविलें होतें आणि त्याला जाण्याच्या मार्गाची ग्रीक लोकांच्या आरमारानें नाकेबंदी केली होती; त्यांचें मुख्य ठाणें सारोनिक अखाताच्या पलिकडच्या किनाऱ्यावर पोरोस येथें होतें. दहा दिवस पर्यंत खटपट होऊन अखेर त्याच्या सुदैवानें ब्रिटिश आरमारावरच्या क्याप्टनानें त्याला आपल्या एका गलबतांतून पीरॉस येथें उतरलें आणि तुर्क सेनापतीला शिफारस पत्र देऊन त्याच्या भेटीस पाठविलें. मग अथेन्स शहरांत प्रवेश होण्याला अडचण पडली नाहीं. तेथें तो जवळजवळ पंधरा दिवस राहिला आणि तितका काळ प्राचीन स्थळें पहात होता. तो केवळ स्वप्नांत असल्यासारखा इकडून तिकडे हिंडत होता; जें जें दृष्टीस पडे त्याचें आश्चर्य वाटून तेणेंकरून त्याचें मन तल्लीन होत असे आणि तत्संबंधाच्या प्राचीन गोष्टींचें स्मरण होऊन त्यांत तो निमग्न होई.

इंग्रजी आरमारांतला क्याप्टन कोपलंड याणें ग्रीक लोकांच्या नाके-

बंदींतून **एल्फिन्स्टन** साहेबाला अथेन्सच्या अगदीं जुन्या तटाजवळ नेलें आणि तेथून तुर्क सेनापतीला निरोप पाठविला. त्याणें त्याच्या गलबतावर दोन अम्मलदार पाठवून दिले. त्यांणीं तपासणी करून अखेर त्यांनां शहरांत जाण्याची परवानगी दिली. मग घोड्यावर बसून आलिव्ह * वृक्षांच्या रानातून जातां जातां पुढें अक्रापोलीस व आसमंतात हिमेटस वगैरे पर्वत पहात पहात जात असतांना त्याच्या मनांत अनेक विचारतरंग उभे राहून तो म्हणतो—ह्या स्थळाची स्थिति कशी ही असली तरी त्याची शोभा विचित्र असणार आहे; ती पाहून माझ्या मनांत सौम्य आणि शांत वृत्तींचें प्राबल्य होऊन मिल्ट्रायडीस व थेमिस्टाक्लिस यांच्या पराक्रमांपेक्षां साक्रेटीस व प्लेटो यांच्या अध्यात्म विचारांचेंच स्मरण अधिक झालें. आह्मी जसजसे शहराजवळ जवळ येत चाललों तसतसें प्रत्येक पदार्थाच्या दर्शनानें एकाद्या थोर पुरुषाचें किंवा एकाद्या प्रसिद्ध गोष्टीचें स्मरण होत चाललें. या प्रमाणें आह्माला लहानपणीं मौजेच्या वाटलेल्या प्ल्युटार्कांच्या ग्रंथांतील विलक्षण गोष्टींपासून तों सदोदीत आश्चर्यचकित करून सोडणाऱ्या कवि, वक्ते, आणि इतिहासकार पुरुषांच्या गोष्टींपर्यंत सर्वांचें स्मरण झालें. मागें तो आंचेमस गिरी, त्याचें तें उभें सुळक्यासारखें खडप्याचें शिखर, पुढें तो अगदीं भिंतीसारखा उभा खडक अक्रापोलीस आणि त्यावर तें पार्थिनन देवालय पाहून असें वाटतें कीं याहून भव्य अशी दुसरी एकादी इमारत दृष्टीस पडेल असें मनांत सुद्धां आणावयास नको. त्या मागच्या सुळक्यानें त्याला फारच शोभा आली आहे. आमचा मार्ग थसिासच्या देवळावरून जातो आहे हें मला माहीत नव्हतें ह्मणून त्याचें मला अगदीं विस्मरण होऊन मी दुसरें जें काय दृष्टीस पडत होतें त्यांत गर्क होऊन चाललों होतों आणि जातां जातां त्या डोंगराच्या माथ्यावर आलों तेव्हां तें अकस्मात् आमच्या पासून पाव मैलावर दृष्टीस पडलें. तें पाहून मी जसा चकित झालों तसा पूर्वी कधींच झालों नव्हतों. तें देवालय अगदीं शाबूद, नुकतें

* प्राचीन काळीं ग्रीस देशांत ह्या झाडांचें माहात्म्य फारच होतें.

आतां बांधून झाल्यासारखें दिसलें, आणि आजपर्यंत दुसरें कधीं पाहिलें नाहीं असें अती उत्कृष्ट, मोठें भव्य वाटलें.

याप्रमाणें त्या जगत्प्रसिद्ध, मनोहर स्थळाचें दुरून दर्शन घेऊन **एलिफन्स्टन** साहेब तुर्क सेनापतीच्या भेटीस गेला. त्याणें त्याचें आगतस्वागत केलें. मग सेलीधर आघा, अथेन्सचा वे (सुभेदार) याजकडे गेला. त्याणें त्याला रहाण्यास घर आणि निग्रोपांटच्या पाच्छाची इच्छा काय आहे तें कळेपर्यंत शहरांत रहाण्यास परवानगी देतों ह्मणून सांगितलें. मग कांहीं इमारती पाहून अस्तमान झाला तेव्हां तो आपल्या गलबतावर परत गेला.

जातांना उद्वस्त शहर पाहून **एलिफन्स्टन** साहेब ह्मणतो—सान्या शहराचा देखावा अतिशय उदास दिसतो. घराच्या, कांहीं थोड्या सार्वजनिक इमारतींच्या व उत्तमोत्तम खासगी घरांच्या भिंती उभ्या आहेत, त्यांवरून हें शहर किती नामी असावें तें सहज कळतें. परंतु आतां सारा अगदीं विध्वंस झालेला आहे; शेंकडा एका घराला सुद्धां छपर किंवा दार नाहीं आणि आंत माणूस नाहीं.

मग दुसऱ्या दिवशीं त्यांणीं थीसॉस व जुपिटर आलिंपियस यांचीं देवालयें, इलिसस नदी, आणि आणखी पुष्कळ मनोहर स्थळें पाहिलीं. त्या ओसाड शहरांत या प्रमाणें किती एक दिवस गेले त्यांत त्या तुर्क अम्मलदारांच्या व त्याच्या भेटी वरचेवर होत होत्या. हकीम बाशानें त्याला मेजवानी केली आणि करागूस म्हणून तुर्की खेळ आहे तो दाखविला. तो कांहीं त्याला आवडला नाहीं; इतकेंच नाहीं, उलटा अगदीं वाईट वाटला. मोटमोठाले प्रतिष्ठित लोक आपल्या बायका मुलां सुद्धां हा खेळ पहातात तें कांहीं त्याला बरें वाटलें नाहीं.

डेह्रीस नामक घोड्यांवरचा एक खेळ ते लोक खेळत असतात तोही त्याणें त्याला दाखविला. व्हर्जिल कवीनें वर्णिलेल्या लोकांच्या घोड्यावरील कांहीं कसरतीची झाक यांत दिसली.

सायंकाळीं पीरिअस बंदर पहाण्याकरितां **एल्फिन्स्टन** साहेब मंडळीसह घोड्यावरून गेला. तेव्हां वाटेनें आलिव्ह वृक्षांचें वन लागलें, त्याची शोभा त्याला फारच मनोहर वाटली.

अथेन्स शहरांतील प्राचीन इमारती व तेथें होऊन गेलेल्या मोठमोठ्या कीर्तिमान पुरुषांचा ज्यांच्याशीं संबंध होता तीं स्थळें पहाण्याचा **एल्फिन्स्टन** साहेबाला अगदीं ध्यास लागलेला होता. तो त्या विषयींचें लेख व वर्णनें वाची आणि त्या ओसाड, पडीत स्थळांवरून एकटाच हिंडत असे. शिल्पकामाचे जे एक एक उत्कृष्ट मासले ते पहावयास मिळतील असें त्याला फार वाटत होतें परंतु सर्वभक्षक काळानें जें नाहींसें करून टाकल त्याचें दर्शन कसें घडावें ! त्याला जें काय दिसलें ते प्राचीन इमारतींचे कांहीं अवशिष्ट भाग आणि पांढऱ्या व सिपोलाइन संगमवरी दगडांचे ढीगें त्यांची मात्र जिकडे जाई तिकडे रेलचेल दिसत होती. तारीख २१ आगष्ट रोजीं त्याची प्रकृति अस्वस्थ होती तरी तो सकाळ संध्याकाळ त्या ओसाड स्थळांतून एकटा हिंडत होता, प्रसिद्ध अकेडमी ( विद्यापीठ ) कोणत्या जागीं होतीं तें कांहीं आतां कळत नाहीं परंतु आदमासानें अमूक ठिकाणींच असावी असे वारबी डी बोकेज व गेल या ग्रंथकारांनीं ठरविलें आहे तीं दोनही स्थलें त्याणें पाहिलीं, सारें फिरून आल्यावर त्यानें रोजनाम्यांत असें लिहिलें आहे—आजच्या फिरण्यांत मला जो आनंद वाटला त्याहून जास्त आजपर्यंत कधीं वाटला नाहीं. हवा थंडगार आणि आकाश सुंदर स्वच्छ होतें आणि एकंदर देखावा खरा अथीनियन होता, बाहेर जातांना मी वारंवार उभा रहात होतों आणि मागें वळून थीसासच्या देवालयाकडे व पार्थिननकडे पहात होतों. सायंकालचा समय असून त्या दोहींवर व त्यांच्या सभोतालच्या डोंगरांवर आणि पडक्या इमारतींवर सूर्यप्रकाश लखलखींत पडला होता. मी फिरून माघारा आलों तेव्हां अस्तपावणाऱ्या सूर्याच्या प्रभेनें त्या डोंगरांना जीं शोभा आली होती, ती मनोहर होती, पारानिसगिरि वृक्षारण्याच्छादित असल्यानें नीलवर्ण दिसूं लागला होता; हेमिटस गि-

रीवरजर्द जांभला रंग चढला होता आणि पिलापोनिसस मधल्या अनेक गिरिशिखरांवर जांभळा, निळा, तांबडा, इत्यादि अनेक रंगांच्या, कोठें अगदीं दाट तर कोठें अगदीं पातळ अशा सर्व प्रकारच्या छटा मारत होत्या; अशी त्या एकंदर प्रदेशाला जी मोठी सौम्य आणि उत्कृष्ठ शोभा आली होती ती अत्यंत मनोहर, केवळ अवर्णनीय होती. मी अथेन्समध्यें आल्यापासून आजारी आहें; बाकीची मंडळी ही आजारी आहे. आम्ही आलों तेव्हां पहिल्यानें हवा फार वाईट पडली होती, अजून देखील आमची रहाण्याची, जागेची, खाण्यापिण्याची व्यवस्था नीट नाहीं; खाणें तर अगदींच वाईट आहे, असें आहे तरी मी आजपर्यंतच्या आपल्या प्रवासांत जीं स्थळें पाहिलीं त्यांत एथच्या सारखा मला दुसऱ्या कोठेंही आनंद झाला नाहीं आणि जसें याचें स्मरण राहील तसें दुसऱ्या कोणत्याचेंही राहणार नाहीं.

अक्रापोलीस किल्ल्याचें दर्शन व्हावें ह्मणून एल्फिन्स्टन एक दिवस तिकडे चालला असतांना शिपायांनीं त्याला अडवून माघारा फिरविलें, ग्रीक लोकांच्या छावणकिडे, एलुसिसच्या बाजुला जाण्यास मुळींच हरकत नव्हती, तारीख २३ आगस्ट रोजीं सायंकाळीं तो गेल्चें पुस्तक हातांत घेऊन बाहेर पडला आणि त्या बाजूला जाऊन अनेक पडकीं स्थळें पहात पहात अस्त मानीं वेश लागण्या पूर्वी आलिव्हवृक्षांच्या अरण्यांतून फिरून घरीं आला, तो ह्मणतो—आलिव्ह वृक्षारंण्यांत फिरणें फारच आनंददायक आहे, ह्या वृक्षांचा अथेन्स शहराशीं आणि त्याच्या मुख्य देवतेशीं संबंध असल्यानें तर त्यांनां विशेष रमणीयत्व आहे, पार्थिननचें केव्हां ही दर्शन झालें तरी आनंद वाटल्या वांचून राहात नाहीं, तें ह्या अरण्यांत मध्यें मध्यें जी पातळाई आहे तींतून होई तेव्हां संतोष वाटे त्याच्या चारी बाजूस दुसऱ्या वृक्षांच्या फांद्या आड आलेल्या होत्या त्यांतून कांहीं वृक्षांच्या शेंड्यांवरून तें दिसलें तेव्हां त्यावर आणि त्या खडकाचा जेवढा भाग दिसत होता तेवढ्यावर पश्चिमेकडून सूर्य किरण पडून तें लखलखत होतें ती शोभा फारच आनंददायक होती.

अक्रापोलीस किल्ला पहावयास मिळावा हा एल्फिन्स्टन

साहेबाचा मोठा हेतु होता तो सिद्धीस जावा म्हणून किल्ल्यांत जाण्याची परवानगी मिळण्याची त्याणें मोठी खटपट चालविली होती. त्या कामीं हकीम बाशानें पुष्कळ मेहेनत केली परंतु ती कांहीं सफळ झाली नाहीं. त्याला कांहीं तरी टाळाटाळीचीं उत्तरें मिळत. एक दिवस सकाळीं सेलीधराच्या पुतण्यानें त्याला बोलतां बोलतां असें सुचविलें कीं आमच्या काकाला कांहीं तरी नजर नजराणा दिलात तर तुमचें काम होईल. त्यावरून त्याणें तो ही उपाय करून पाहिला. त्याणें त्याला एक घड्याळ (clock) नजर केलें, परंतु त्यापासून ही उपयोग झाला नाहीं युरिपो येथून पाच्छाची परवानगी आली पाहिजे असाच अखेर जबाब मिळाला, तेव्हां एल्फिन्स्टन साहेबानें त्रासून जाऊन निराश होऊन तो नाद सोडून दिला. ग्रीस देशांत येऊन मुख्यत्वें पहावयाचें काय तर अक्रापोलीस, थरमापिली, डेल्फी, माराथॉन इत्यादि; हा जो फार दिवसांचा हेतु तो कांहीं पुरा होत नाहीं असें पक्कें दिसलें तेव्हां आतां येथें व्यर्थ कालक्षेप कां करा असें ह्मणून तो मंडळीसह अथेन्स सोडून निघाला आणि आपल्या गलबतावर चढून ग्रीक सैन्याच्या हद्दींत अंबेलकी येथें गेला.

एल्फिन्स्टन साहेब तुर्क लोकांतून निघून ख्रिस्ती लोकांत जाऊन पडला तेव्हां त्याच्या मनाला स्वस्थता आली. अथेन्समध्ये सुमार पंधरा दिवस त्याला त्यांचा सहवास घडला आणि त्यांचा स्वभाव, चालीरीती वगैरे जें पहावयास सांपडलें त्याचें नीट निरीक्षण करून त्याणें त्यांच्याविषयीं असें लिहिलं आहे—

तुर्क लोकांकडे माझा पुष्कळ ओढा आहे तरी ख्रिस्ती देशांत आलें ह्मणजे मनाला खरोखर समाधान वाटतें; मग आपला उपमर्द होईल किंवा आपल्याला कांहीं हरकत होईल ही भीति उरत नाहीं; त्या लोकांत असलें ह्मणजे तसें होतेंच असें नाहीं, तरी पण मनाला वारंवार धाकधुक असते. तुर्क लोकांशीं इतःपर मला कांहीं करावयाचें नाहीं, तेव्हां आतां ते मला कसे

वाटले तें लिहून ठेविलें पाहिजे. त्यांच्याठायीं मुख्य दोष ह्मटला ह्मणजे गर्व—तो स्वराष्ट्राविषयीं नसून धर्माविषयीं असल्यानें पहाणाराला अधिकच तिटकारा येतो बाकी तेवढी एक गोष्ट बाजूस ठेविली ह्मणजे मग ते वाईट नाहींत. ते फार सभ्य उदार आणि आदरातिथ्य करणारे आहेत. त्याच्यांतल्या लहानथोर, सर्व प्रतीच्या लोकांनां स्वाभिमान मोठा असतो आणि एशियांतल्या इतर बहुतेक लोकांत जो अनेक तऱ्हांचा हलकटपणा आहे त्याचा त्यांच्याठायीं बहुतेक बराच अभाव आहे. अथेन्समधले शिवाय-करून बाकीचे मला फार सरळ आणि उघड्या मनाचे दिसले, आणि त्या देशांतल्या ख्रिस्त्यांपेक्षां तेच मला अधिक भरंवशाचे वाटले. तथापि ते लहरी आणि हट्टी आहेत; आणि त्यांच्या उलट गेलें तर दांडगाई करणारे परंतु पुष्कळदा दुर्मुखलेले होऊन बसणारे ही आहेत. ते अतिशय अज्ञानी आणि भोळे आहेत. त्यांनां फुशारकी वाटण्यासारखी किंवा त्यांच्या अविचार मूलक समजाला जमेशी एकादी गोष्ट सांगितली तर ते ती मन लाऊन ऐकतील. एक धर्म विषय शिवाय करून बाकी सर्व बाबींत युरोपियन लोक आपल्यापेक्षां श्रेष्ठ आहेत असें आतां त्यांनां वाटूं लागलें आहेसें दिसतें. आमच्या तऱ्हेवर आपणही कांहीं तरी करूं लागणें अवश्य आहे असें त्यांच्यांतल्या बहुतेकांनां आतां वाटूं लागलें आहे असें दिसतें. परंतु असें स्थित्यंतर होण्याला जें नुकसान सोसावें लागतें तें सोसण्याला मात्र कोणी एकही तयार असल्याचें दिसत नाहीं; आणि त्याचा परिणाम असा आहे कीं चालू राजकारभाराला बहुतेक सर्व लोक नाखुष आहेत, स्वराज्य व परराज्य संबंधाचीं जीं कामें राज्यकर्ते करीत आहेत तीं चांगल्या तऱ्हेनें सिद्धीस जावोत अगर न जावोत, त्याचीही कोणी काळजी मुळीं करीत नाहीं. स्वतः माझ्या नजरेस ज्या कांहीं गोष्टी आल्या त्या अशा आहेत. त्यांच्याविषयीं ज्या गोष्टी ऐकूं येतात त्या कशा प्रकारच्या आहेत पहा—तुर्क लोक मोठे ी आहेत. हा त्यांचा मायावीपणा इतका शिखराला पोहोंचलेला आहे कीं पाच्छाला एखादा म ष्य नकोसा झाला असला तर त्याचा आपण द्वेष

करतों असा तो त्याला यत्किंचित संशयही येऊं देणार नाहीं, त्याच्यावर अत्यंत प्रेम आहे असें दाखवील आणि तो उठून निरोप घेऊन गेला ह्मणजे उंबरठा वलांडतो आहे तों प्राणास मुकेल. कारण तेथें त्याचा शिरच्छेद करावा असा हुकूम होऊन आधींच सारी तयारी झालेली असते. ते क्रूर आणि द्वेषी आहेत असें ह्मणतात. परंतु ह्या दुर्गुणाबद्दल कृतज्ञता हा गुण त्यांचे अंगीं आहे असें ह्मणतात. तसेंच पैशाच्या देवघेवींत प्रामाणिकपणा स्वमताचा अभिमान आणि परधर्मी लोकांचा तिरस्कार ह्या त्यांच्या दुर्गुणाविषयीं मी फार ऐकिलें आहे. त्यांच्या रीतिभाति गंभीरपणाच्या आहेत परंतु त्यांच्या अंगांत पोरपणा आणि त्यांची हलक्या सलक्या खेळांची हौस ही विसरतां कामानये. तसेंच त्यांच्या अंगांत नेहेमी आळस आणि कामाची चालढकल करण्याची संवय हे गुण ते प्रसंगविशेषीं जी हिम्मत दाखवितात तिच्या अगदीं उलट आहेत.

**एल्फिन्स्टन** साहेब अथेन्स सोडून निघाला तो मोरियामध्यें गेला. तेथें त्याणें प्रथम प्राचीन मेगारा शहर पाहिलें. तें एका सुपीक, विस्तीर्ण, आलिव्ह वृक्षयुक्त मैदानांत मध्येंच एक डोंगर असून त्याच्या माथ्यावर वसलेलें असल्यानें फार शोभायमान दिसत होतें. परंतु त्यावर तुर्क लोकांची धाड पडल्यानें व ग्रीक लोकांच्या अव्यवस्थितपणामुळें अगदीं धुळीस मिळालें होतें. ग्रीक लोकांचा सेनापति प्रिन्स इप्सिलांटे याची येथें भेट झाली. तेथून जवळच एक डोंगर आहे त्यावर किल्ला आहे, तो त्याणें जाऊन पाहिला तेथून नजर फार दूरवर पोहोंचत असून आसमंतांतल्या प्रदेशाची शोभा मोठी रमणीय दिसत होती. तेथून परत येत असतांनां अस्तमान झाला तेव्हां त्यावेळची ती विलक्षण शोभा पाहून तो ह्मणतो—नेहेमींप्रमाणें सर्व डोंगरांवर नानाप्रकारच्या रंगांच्या ज्या छटा मारत आहेत, सिथीरानच्या शृंगांनां जें तेज आलें आहे, त्याचें वर्णन करतां येतच नाहीं मी आजपर्यंत पुष्कळ ठिकाणची सूर्यास्त समयाची शोभा पाहिली आहे, परंतु त्यांत येथ-ल्यासारखी कोठचीच नाहीं; ही त्या सर्वांत फार मोठी, अगदीं जशी मनांत

आणावी तशी आहे. हिंदुस्थानांत येथच्यापेक्षां फार छान आकाश मी पाहिलेलें आहे, परंतु येथें अस्तमानसमयींच्या सूर्यकिरणांचें तेज सर्व पदार्थांवर पडून त्यांनां जो रंग येतो त्याची बरोबरी कशालाच होत नाहीं. ती शोभा अगदीं अनुपम आहे.

त्याच दिवशीं सायंकाळीं प्रिन्स इप्सिलांटे याणें **एल्फिन्स्टन** वगैरे मंडळीस मेजवानी केली. सारी मंडळी मांड्या घालून भोजनास बसली. बोलणें फ्रेंच भाषेंत चाललें ती **एल्फिन्स्टन** साहेबाला येत नव्हती. तो ह्मणतो मला फ्रेंच येत नाहीं ह्मणून खरें अडलें असें प्रथम आज.

**एल्फिन्स्टन** साहेब तेथून निघून कॉरिंथ व सिकिआन पाहून मिसिनी येथें गेला. तेथच्या प्रख्यात स्थलांचें त्याणें नीट अवलोकन करून सविस्तर वर्णन केलें आहे. तेथें जामदारखाना ह्मणून जी इमारत आहे ती फार प्राचीन असून आटिअस यानें बांधलेली आहे ह्मणतात. ती नीट पाहून तो खुष झाला आणि ह्मणाला हिला जामदारखाना हें नांव अगदीं योग्य आहे.

मिसिनींहून तारीख २ सेप्टेंबर रोजीं **एल्फिन्स्टन** आरगास येथें गेला. प्राचीनकाळीं अथेन्स मोठें प्रसिद्ध होतें तसें त्याच्याही मागच्या काळांत आरगास सुप्रसिद्ध होतें. **एल्फिन्स्टन** साहेब ह्मणतो ' ट्राय आणि कदाचित थीब्स शिवाय करून ग्रीसच्या इतिहासांत याच्या बरोबरीचें दुसरें शहर नाहीं.' तेथचा किल्ला वगैरे पाहून तो टिरीनस येथें गेला तेथचा किल्ला त्याणें पाहिला. त्या तटाची रचना व त्यावरून दिसणाऱ्या सभोतालच्या प्रदेशाची शोभा पाहून त्याला मोठा आनंद झाला. प्राचीनकाळीं ग्रीसमध्यें महा बलाढ्य ह्मणून दिगंतकीर्ति पावलेला जो हरक्युलीस त्याणें येथें जो पराक्रम केला त्याचें स्मरण होऊन **एल्फिन्स्टन** ह्मणतो -- ह्या तटावर हरक्युलीस वारंवार फिरत असे आणि जेथून त्याणें इफीटस यास खालीं फेकून दिलें त्याच जागीं मी आंतां उभा आहें हें नवलच ह्मणावयाचें.

**एल्फिन्स्टन** तेथून पिलापोनिनसमध्यें गेला. नापोली येथील किल्ला वगैरे पाहून जाहल्यावर त्याविषयीं लिहून मग ग्रीक लोकांविषयीं त्याला काय वाटलें तें त्याणें लिहून ठेविलें. त्यांविषयीं त्याचा ग्रह प्रथम भेटींत कांहीं चांगला झालेला नव्हता. तो ह्मणतो—ह्या राष्ट्रांतले सर्व लोक फार सभ्य आहेत. त्यांना साहाय्य करण्याकरितां एक झालेल्या राष्ट्रांचे ते उपकार मानीत आहेत आणि मला वाटलें होतें तितकी आत्मश्लाघा करणारे कांहीं खचित नाहींत. खेड्यापाड्यांतले लोक तुर्की शेतकऱ्यां इतके नाहींत तरी पण सभ्य आणि शांत दिसतात. ते चोर आहेत असें ह्मणतात; त्याचा अनुभव मला आला आहे. बारीक सारीक जिन्नस जाऊन माझी खात्री झालेली आहे. त्यांना गाण बजावणं आवडतें, तें ही माझ्या नजरेस आलें आहे. ते इतर लोकांपेक्षां जास्त फसवतात असें कांहीं मला आढळलें नाहीं.

ग्रीक लोकांना मदत करण्याकरितां फ्रेंच सैन्य मोरेयांत आलें असें **एल्फिन्स्टन** साहेबानें आरगास येथें ऐकिलें होतें ती बातमी खरी असें नापोली येथें कळलें तेव्हां तो ह्मणाला उत्तरग्रीसांतल्या माझ्या प्रवासाला हरकत आली ह्मणून वाईट वाटत होतें, परंतु ते मजवर उपकारच झाले असें वाटण्यासारखें हाल्लीं प्रतिदिनीं कांहीं तरी नवें कारण घडून येत आहे.

•

नापोलीहून निघून **एल्फिन्स्टन** साहेब प्राचीन उद्ध्वस्त स्पार्टाशहर पाहून मेसेनी अखातावर गेला. तेथें फ्रेंच सैन्य नुकतेंच येऊन उतरलें होतें आणि इंग्लंड तर्फेचा वकील मिस्टर क्यानिंगही कान्स्टान्टिनोपलहून ग्रीसचा प्रेसिडेंट क्यापोडीइस्ट्रा याज बराबर बोलून पुढील विचार ठरविण्याकरितां आला होता. त्याची भेट होऊन **एल्फिन्स्टन**साहेबाला आतां आपण आपल्या देशबांधवांत पडलों असें वाटून चित्त स्वस्थ झालें. आतां ह्याच्या साहाय्यानें आपल्यास पाहिजे तिकडे जावयास व पाहिजे तें पहावयास सांपडेल असें **एल्फिन्स्टन** साहेबाला वाटणें साहजिक होतें परंतु तसा योग येण्याचा अद्याप काळ आला नव्हता. क्यानिंग साहेबाचा फ्रेंच व

रशियन वकिलांशीं बेबनाव झाला; इब्राहिमपाशानें आपलें सैन्य गलबतावर चढवलें व खालीं उतरलें आणि आतां तुर्कस्थानच्या सुलताना बराबर बोलणें होऊन ग्रीसची हद्द ठरविण्याचें बाजूस राहून त्याला मदत करण्याकरितां जमलेले हे स्नेही म्हणविणारेच एकमेकांवर तुटून पडतात असा रंग दिसूं लागला; म्हणून एल्फिन्स्टन साहेबाच्या मनांत नाव्हारिनोकडे जावयाचें होतें तो बेत क्यानिंगसाहेबानें रहित करविला. तो माघारा फिरला आणि परत जातांना कारिंटेनाचा किल्ला पाहून कोलो कोट्रोनि यास भेटला. ग्रीक लोकांनीं स्वातंत्र्य मिळविण्याकरितां जें युद्ध केलें त्यांत प्रसिद्धीस आलेल्या वीरांपैकीं हा होता. तो फार सभ्य होता. त्याणें एल्फिन्स्टन साहेबाला आग्रह करून भोजनास राहविलें. भोजनोत्तर पुष्कळ गोष्टी चालल्या होत्या. त्यांत त्याणें बहुतेक आपली हकीगतच सांगितली. तो म्हणाला मला इंग्रजीलोक आवडतात त्याचें कारण मी त्यांचें अन्न आठ वर्षे खाल्लें आहे येवढेंच नव्हे; तर त्यांणीं आमच्या देशावर एवढे थोरले उपकार केले आहेत हें होय. त्याणें इंग्लिश आरमारावरील सरदार क्यापटन ह्यामिल्टन याची फार स्तुति केली आणि एल्फिन्स्टन साहेबाला निरोप देते वेळीं आपल्या पुत्राला भेटण्याचें व आपल्याला पत्र पाठावण्याचें त्याजकडून वचन घेतलें.

नापोली येथें एक ग्रीक गलबत भाड्यानें ठरवून एल्फिन्स्टन साहेब ग्रीस देशा जवळील साक्लेडस बेटें पहावयास गेला. एक अठवडाभर फिरून त्याणें तीं सारीं नीट पाहिलीं. त्यांतील ज्या ज्या स्थळांचें प्राचीन ग्रंथांत कांहीं वर्णन किंवा उल्लेख आहे तीं सर्व त्यानें लक्ष लावून पाहिलीं. ह्या आपल्या प्रवासाचें त्याणें सविस्तर वर्णन केलें आहे. त्याला नेहमी गलबत फार लागत असे, तरी तो याप्रसंगीं वरचेवर त्यांत बसून फिरत होता. एवढ्या एका गोष्टीवरून देखील त्याणें हा प्रवास किती हौसेनें केला असेल याचें अनुमान करतां येतें.

ही सफर करून एल्फिन्स्टन साहेब मोरियांत माघारा आला तों तुर्के

लोक तेथून निघून गेले होते. त्यांणीं त्या मुलखाला उपद्रव देऊन दुर्दशा उरवल्याची चिन्हें जागोजाग दिसत होतीं. ग्रीस देशाच्या इतिहासांत अती प्रसिद्ध असें जें आलिंपिया नामक स्थळ तें पहाण्यास एल्फिन्स्टन तारीख २१ आक्टोबर रोजीं प्रातःकाळीं उठून गेला. जातां जातां एरिमांथस खोऱ्यांतून बाहेर पडल्यावर आरकेडीया कडे त्याणें एकवार नजर फेकली आणि ह्मटलें असा सुंदर प्रदेश माझ्या दृष्टीस पुनः कांहीं पडणार नाहीं.' तेथून पुढें जात जात तिसऱ्या प्रहरीं तो मिरकी येथें पोहोचला. तेथें रहाण्यास जागा देखील नव्हती. एका शेतकऱ्याचें एक पडकें खोपट होतें त्यांत तो उतरला. त्या खोपटाची भिंत केव्हां पडेल याचा नेम नाहीं अशी दिसत होती. तिला टेंका दिल्या होत्या आणि जवळ डुकरांची इतकी गर्दी होती कीं तीं आतां माझ्या पायांतून जातात असें त्याला वरचेवर भय वाटे. तशा जागीं आनंदानें राहून त्याणें पुस्तक काढलें आणि आलिंपिक खेळांचें मनोहर* वर्णन वाचून सायंकाळीं मैदान पहाण्यास बाहेर पडला. तें तेथून कांहीं दूर असेल असें त्याला वाटत होतें परंतु तीन पावलें गेला नाहीं तोंच तें एकदम दृष्टीस पडलें आणि फार मनोहर वाटलें. सारें पाहून झाल्यावर त्याच्या मनांत जे जे तरंग आले ते त्याणें लिहून ठेविले तो ह्मणतो—हें मैदान बरेंच रुंद आहे. आणि आलफास नदी नागिणी सारखी मोठमोठीं वळणें घेत घेत यांतून चालली आहे, आणि प्रत्येक वळणाला याच्या कडेला जे डोंगर आहेत त्यांच्या पायथ्या जवळ

---

* आलिंपिक गेम्स. प्राचीन ग्रीस देशाच्या अभ्युदयास हे खेळच मुख्य कारण झाले ह्मणण्यास हरकत नाहीं. ह्या मैदानांत प्रतिवर्षी मोठी जत्रा भरे, तींत नाना प्रकारचे खेळ होत कवि, वक्ते, ग्रंथकार शिल्पकार कसरतवाले कारागीर, विद्वान, वगैरे सर्व बुद्धिमान लोक आपली जी कांहीं नवी कृति असे ती प्रथम त्या लोकसमूह पुढें आणून प्रसिद्ध करीत आणि तिचें योग्य फळ पावत.

जवळ जाऊन तेथून पुनः माघारी फिरली आहे ते डोंगर कांहीं फार उंच नाहींत, परंतु त्यांचीं तीं सरळ गेलेलीं शिखरें, त्यांवरून जाणाऱ्या पाण्याचे पडलेले प्रवाह आणि त्यावर असलेली पाईन वृक्षांची झाडी. यांणीं ते फार सुंदर दिसतात. खालीं मैदानांत ही जागा जागीं वृक्ष पुष्कळ आहेत. आरकेडियांतल्या देखाव्यांची तऱ्हा याहून जरी अगदीं निराळी आहे तरी याची शोभा त्यांतल्या चांगल्याच्या बरोबरीचा आहे'

मी सूर्यास्त होईपर्यंत आलिंपस मैदानाची शोभा पहात आणि आश्चर्य मानीत फिरत होतों आणि त्या ठिकाणीं जेव्हां ती मोठी थोरली जत्रा भरत असे, सारें मैदान माणसांनीं अगदीं फुलून जात असे खेळाकरितां नेमलेल्या जागा उत्तम शृंगारलेल्या असत आणि त्यांत खेळ चालत तेव्हां त्यांत जे कोणी विजयी होत त्यांची वाहवा करून त्यांचे देशबांधव त्यांच्या नावांच्या जयघोषानें जेव्हां सारें मैदान दणाणवून सोडीत असत तेव्हां त्याला कशी विलक्षण शोभा येत असेल त्याची कल्पना करीत होतों. थेमिस्टाक्लिस आणि प्लेटो+ यांना सारा ग्रीस देश अभिनंदन करीत होता तें ते या स्थळीं येऊन उभे रहात असतांनाच आणि * थुसिडायडिस ला आपण इतिहासकार होऊन नांव गाजवावें अशी जी प्रेरणा झाली आणि जो ध्यास लागला तो तो या स्थळीं उभा राहून हिराडाटस× आपला इतिहास वाचून दाखवीत होता आणि श्रोतृ मंडळ तल्लीन होऊन माना डोलवीत होतें तें त्याणें पाहिलें असें म्हणतात. असा ह्या स्थळाचा महिमा होता. मी एका टेंकडावर

---

+ ग्रीस देशांत हे आणि यांच्यापेक्षां थोर असे पुष्कळ महात्मे होऊन गेले, त्यांची चरित्रें अवश्य वाचावीं.

* मनांत आल्या प्रमाणें हा मोठा इतिहासकार झाला.

× ह्याला इतिहासजनक ( father of history ) असें नांव पडलें.

ही जाऊन उभा राहिलों आणि तेथून तें सारें मैदान अफाट दिसत होतें तें, आलिंपस आणि तीं आलफास नदी वांकडी वांकडी चाललेली दूरपर्यंत दिसत होती ती शोभा पाहिली. याप्रमाणें फिरून झाल्यावर मी त्या झोंपडींत माघारा आलों तों ती झाडून स्वच्छ केलेली होती, दार लाऊन डुकरें आंत येऊं नयेत असा बंदोबस्त केलेला होता आणि सुखानें पडावें अशी सर्व कांहीं तजवीज लागलेली होती राहण्याला असलें झोंपडें आणि खाण्याला भात आणि उकडलेला भोपळा मिळाला. परंतु यांपासून मला जो आनंद वाटत आहे त्या पेक्षां इंग्लंडांतल्या एकाद्या श्रीमंती थाटाच्या खानावळींत hotel ) उतरलें आणि उत्तम पक्वान्नांचीं ताटें भरून पुढें आलीं म्हणजे त्यांपासून एकदा तरी अधिक होईल असें मला वाटत नाहीं.

दुसऱ्या दिवशीं भल्या पहाटे उठून तो आलिंपिया देवालयाची जागा पहावयास गेला. गेलचें पुस्तक हातांत होतेंच. देवालयाच्या पायाचा कांहीं भाग आणि कांहीं संगमरवराचे दगड मात्र त्या जागेवर शिल्लक होते ते पाहून तो परत आला मग आलिंपिक गेम्स विषयींचा आपला अभिप्राय त्याणें लिहिला त्या खेळांचें ग्रीसमध्ये जें थोरलें प्रस्थ माजलेलें होतें तो त्याला अगदीं पोरकटपण वाटला. मोठमोठ्या विरांनां आणि राजकार्यधुरंधर पुरुषांनां जो मान द्यावयाचा तोच खेळामध्यें प्रवीण होऊन अग्रगण्य होणारांनां अगदीं मनापासून द्यावयाचा म्हणजे अप्रयोजकपणाच म्हणावयाचा असें त्याचें मत आहे.

आलिंपियाहून दुसऱ्या दिवशीं निघून एल्फिन्स्टन साहेब समुद्रतीराला गेला आणि तेथून एका लढाऊ होडींतून झांटी येथें जाऊन स्वदेशाच्या मंडळींत पडला. ग्रीस देशाचा किनारा सोडून निघतांना तो म्हणाला 'एशिया खंडांतील देशांतला माझा प्रवास आज संपला ( ग्रीसदेश युरोपांतला खरा, परंतु त्यांतील प्रवासाची तऱ्हा निराळी नसल्यामुळें त्याची गणना यांतच करावयाची ) येथून पुढें जिकडे जावयाचें तिकडे कांहीं प्राचीन, पडकीं, उद्वस्त ठिकाणें नाहींत, किंवा आधा आणि हिमाजरांटी, असले रानटी लोक

नांहींत; आतां सुधारलल लोक, चांगले सडकांचे रस्ते; गाड्या, शहरें, भजनालयें आणि सज्जे लागावयाचे. याप्रमाणें बदल व्हावयाचा म्हणून मोठा आनंद वाटावा परंतु मला तर अयाप तसा कांहीं वाटत नांहीं. आतां जें कांहीं दृष्टीस पडावयाचें तें सारें एकतऱ्हेचें, म्हणून त्यांत मौज वाटण्यासारखें कांहीं असावयाचें नाहीं; आणि सुधारणेचे जे निर्बंध, मर्यादा असतात त्या मला थोड्याशा आवडत नाहींत.'

तारीख २६ अक्टोबरचा त्याचा लेख असा आहे – आज वर्षाखाली मालकम साहेबानें मुंबईस येऊन मला काळजींतून सोडविलें आणि माझ्या-मनांत फार दिवस घोळत असलेला प्रवास करण्यास जाण्यास मोकळें केलें. त्या प्रवासांतल्या ज्या भागानें माझें सारें लक्ष वेधलें होतें त्याची आज परिसमाप्ति झाली.'

तेथून पुढें नोव्हेंबरमध्यें **एल्फिन्स्टन** साहेब इथाका बेटांत गेला. आडेसी महाकाव्यांत होमर कवीनें वर्णिललीं स्थळें युलिसिसचा वाडा, कोराक्स खडक व त्यांतून वहाणारा सुंदर झरा वगैरे त्याला पहावयाची इच्छा होती तीं त्याणें पाहिलीं. होमरकवीच्या वर्णनावरून तें बेट क्षुल्लक असेलसे वाटत तसें त्याला दिसलें नाहीं. सायक्लेडस बेटांतलीं बहुतेक खडकाळ आणि भिकार, त्यांपेक्षां हें त्याला पुष्कळ चांगलें वाटलें. ग्रीसदेशांतल्या प्राचीन प्रसिद्ध स्थळांची ओळख लागणें कठीण इतकी त्यांची दुर्दशा झालेली, आणि तशांत त्यांतले बहुतेक लोक पूर्वापार परंपरेनें चालत आलेलीं त्यांचीं नांवें कायम राखण्याचें सोडून आलीकडील प्रवासी भलत्याच स्थळाला भलतेंच नांव देतात तेंच मान्य करितात हें पाहून त्याला वाईट वाटलें.

इथकाहून पुढें **एल्फिन्स्टन** साहेब कारफ्यु बेटांत गेला त्याचा चुलतभाऊ सर फ्रेडरिक आडम आयोनियन बेटांचा कमिशनर होता त्याचें रहाण्याचें ठिकाण हें होतें. बंधूबंधूची फार दिवसांनीं भेट झाली त्याणें त्याचें

मोठ्या प्रेमानें उत्कृष्ट आदरातिथ्य केलें. त्या बेटांत जें पहाण्या सारखें होतें तें पाहून तो म्हणतो—हें बेट, आड्रिआटिक उपसागराचें मुख आणि पूर्व भूशलाका, आलबेनियाचे उंच किनारे आणि बर्फानें आच्छादित पर्वत आणि त्यांच्या माथ्यावर अस्तमान समयीं पडलेल्या सूर्यकिरणांनीं त्याला आलेला गुलाबी रंग, इत्यादिकांची शोभा ग्रीस देशाच्या अखेरच्या दर्शनायोग्य आहे. हें दर्शन शेवटचेंच म्हटलें पाहिजे, कारण आतां उदईक सूर्योदयाबरोबर मी आगबोटींत बसून ब्रिंडिसीला जाणार. ह्या बेटांत येऊन मी आनंद पावलों. मुख्य मोठ्या अनंदाची गोष्ट बंधूंची भेट; येथें आल्यापासून त्याचा सारखा सहवास आणि अव्याहत प्रेम. आतां येथून मला सर्व कांहीं निराळें लागणार ग्रीस, एशिया मायनर आणि त्यांजवळचीं बेटें हें सर्व आतां विसरलें पाहिजे.

तारीख ७ दिसेंबर रोजीं एल्फिन्स्टन साहेब आगबोटींत बसला. त्यापूर्वी त्यानें ती कधीं पाहिली नव्हती; तेव्हां म्हटलें असतां त्या अपूर्व नौकायानाचें त्याला मोठें कौतुक व आश्चर्य वाटावें, तींत बसून नियामित काळांत सुखानें ब्रिंडिसीला जाऊन पोहोंचल्यावर मुखानें आनंदोद्गार निघावे; ती युक्ति काढणाराची वाहवा व्हावी, आणि त्या योगानें जलपर्यटनांत कोणत्या प्रकारचे फेरफार होण्याचा संभव ते तर्क चालावे. युद्धामध्यें तिचा उपयोग होईल कीं नाहीं, झाला तर आरमाराच्या यद्धाला कोणत्या प्रकारचें नवीन स्वरूप प्राप्त होईल, इत्यादि अनेक विचार त्याच्या मनांत घोळूं लागावे व जें मनांत ठरेल तें रोजनाम्यांत नमूद व्हावें, परंतु याप्रमाणें कांहीं झाल्याचें आढळत नाहीं हेंच आश्चर्य वाटतें.

एल्फिन्स्टन इटली देशांत जाऊन दाखल झाल्यापासून तेथून पुढच्या प्रवासाचा मार्ग ठरलेलाच होता. इतर प्रवासी ज्या धोपट मार्गानें जातात त्याणेंच तो गेला, परंतु ब्रिंडिसीस पोहोंचल्यावर तेथून लागलाच पुढें चालता झाला नाहीं हिंवाळ्याचे दिवस नेपल्स व रोम शहरांत काढून मग तो पुढें

वसंतऋतूंत इटलीच्या उत्तर भागांतून फ्रान्सांत जाऊन तेथून स्वदेशीं गेला. नेपल्सला जातांना सरळ वाट सोडून तो तारीख २६ दिसेंबर रोजीं क्यानीचें रणांगण पहाण्यास गेला. प्राचीन काळीं रोमन लोकांचें आणि कार्थेजीअन लोकांचें जें मोठें भयंकर युद्ध झालें तें त्यास्थळीं. त्यांत रोमन लोकांचा अगदीं पराजय होऊन ते पळत सुटले तेव्हां कत्तल उडून त्यांचे हजारों मुरदे पडले कार्थेजीअन सेनापति हानिबाल याची दिगंत कीर्ति झाली. रोमन सरदार पालस एमिलिअस मोठ्या शौर्यानें लढत लढत धारातीर्थी पडला म्हणून त्याचें ही नांव राहिलें. त्या युद्धाचें लिव्हीनें जें वर्णन केलेलें आहे तें एल्फिन्स्टन साहेबाच्या डोळ्यांपुढें होतें. प्राचीन क्यानी गांव कोठें असावा, युद्ध कोणत्या ठिकाणीं झालें असावें तें ठरविण्याकरितां तो त्या मैदानावर बराच हिंडला. त्यांतून जी आफिडस नदी वहात आहे तिचा प्रवाह फिरला असल्यामुळें व तेथें जे दोघे धनगर मेंढरें चारीत होते त्यांनां त्याणें विचारलेली माहिती नीट न सांगतां आल्यानें युद्ध अमूकच जागीं झालें असें म्हणतां येईना; परंतु चारलेटा येथून शिकारीकरितां आलेले पांच सात गृहस्थ फिरतां फिरतां त्याला भेटले. त्यांतल्या एकानें लिव्हीनें केलेलें त्या युद्धाचें वर्णन चांगलें पाहिलेलें होतें, त्याच्याशीं बोलणें होऊन रणांगण वरच्या बाजूस, कानोसाकडे असावें असें सर्वानुमतें निश्चित झालें.

पुढें जानेवारी महिन्यांत एल्फिन्स्टन रोमशहरास गेला. प्राचीन इमारतींची पडापड झालेली दिसत होती ती पहात पहात तो शहराजवळ जवळ गेला तेव्हां म्हणाला—आतां क्षणोक्षणीं असें वाटतें कीं सभोंतालचा सर्व देखावा खरा रोमन आहे. पुढें विस्तीर्ण मैदान आहे त्यांत लागवड केलेली आहे. तरीपण तें ओसाड आहे आणि त्यावर जागोजाग पडक्या इमारती आहेत, त्यामधून दोन शानदार कालवे चाललेले आहेत. पुढें थोडक्याच अंतरावर सेंटपॉलचें देवालय दिसत आहे ज्या नगराचें वैभव आम्ही विचार करूं लागलों त्या क्षणापासून आमच्या मनांत बिंबून राहिलें आहे आणि आतां आमच्या असमंतात भागीं जिकडे तिकडे सामसूम असून जी पडापड दिसत

आहे ती ही प्राचीन वैभवशाली रोमनगरी असें हें उंच भजनालय दुरून सांगत आहे आकाश अभ्राच्छादित असल्यानें अप्रसन्न असून मधून मधून पर्जन्यवृष्टि होत आहे तेव्हां तें सभोतालच्या देखाव्याला अनुरूपच आहे परंतु ह्या साऱ्याच्या दर्शनानें माझ्या मनाला कांहीं एक विकार झाला नाहीं. आज किती एक वर्षें माझ्या मनाला असें वाटत आहे कीं रोमनगराचें दर्शन घडेल तर जन्म सफळ होईल. आणि कोणीही प्रवासी ह्या नगराजवळ आला असतां त्याच्या अंगावर रोमांच आल्याशिवाय राहिले असें कधींच वाचलें नाहीं. असें असतां हा माझा फार दिवसांचा हेतु आज पूर्ण होत असून मी नगरांत प्रवेश करीत असतांना माझ्या मनाला कांहींच आनंद वाटला नाहीं. एकाद्या लहानशा शहरांत जावें तसा चाललों होतों, माझ्या मनाची अशी स्थिति होण्याचें कारण मुख्यत्वेंकरून ही वाईट हवा पडली आहे ही आणि हा वाईट वारा सुटला आहे हा असावा असें मी समजतों + + + + असें आहे तरी कोलिसिअन वरून जातांना मला आश्चर्य वाटल्या वांचून राहिलें नाहीं; त्या मोठमोठया हवेल्या, त्यांचा तो भव्यपणा आणि सौंदर्य पाहून माझ्या मनाला मोठा आल्हाद झाला.

दुसऱ्या दिवशीं तो शहर पहाण्याकरितां बाहेर पडला त्यावेळीं त्याच्या मनाची वृत्ति निराळी झाली. फिरून आल्यावर त्याणें असें लिहिलें आहे.—येथें आल्यापासून प्रथम आज माझ्या मनाला प्रसन्नता वाटली; ती टायबर नदीच्या दर्शनानें तिचें पाणी गढूळ, पिंवळे, आणि पात्र भरून चाललेलें पाहतांना त्या ओघाबरोबर माझ्या मनाला अत्यंत मनोहर अशा गोष्टी एकावर एक ओघानें सुचल्या. मी रोममध्यें आहें असें मला प्रथम तेव्हां वाटलें येथच्या मोठमोठ्या गोष्टी व युद्धसंग्राम पुष्कळ काळ मनांत बिंबलेले असून ते जेथें घडले तें स्थळ खरोखर हें असें मला स्मरण होण्याला इतके आयास पडावे हें आश्चर्य आहे. अथेन्समध्यें गेलें ह्मणजे अक्रॉपोलिसवर सॉक्रेटीस, पीरिअसमध्यें थेमिस्टॉक्लिस आणि इलिससमध्यें सॉक्रेटीस, हे तर दत्त ह्मणून डो-

ळ्यांपुढें उभे असल्यासारखे दिसतात आणि तेथें जे योद्धे, तत्ववेत्ते, साधु वगैरे मोठमोठे पुरुष होऊन गेले त्यांचें तत्काळ स्मरण झाल्यावांचून ऱ्हातच नाहीं. परंतु जेथें जेथें ह्मणून जाऊन उभें ऱ्हावें तेथें आसमंतात भागीं सारी पडापड झालेली दिसत असते आणि जरी जवळपास कोठें तुर्क लोक असले तरी प्राचिन गोष्टींचें स्मरण होण्याचें बाजूस राहून मध्यें त्यांची आठवण होईल असें त्यांच्या अंगीं किंवा इतिहासांत* कांहीं सामर्थ्य नाहीं. येथें तसे नाहीं. येथें तो लिओ, ग्रेगरी, जूलियस; पेट्रार्क, टासो, मिकल आंजिलो, राफेल आणि ब्रामांटे, इतके आधीं पुढें येतात; यांचें स्मरण करून त्यांच्या मागें जावें तव्हां रोमन मनात येतात ह्या शहराची प्रस्तुतची वस्ती मोठी आणि अनेक तऱ्हांची असल्यामुळें तींतले उद्योगधंदे कल्पनाशक्तीचे तरंग हवे तसे अव्याहत चालण्याला प्रतिबंधक होतात. सेंट पीटर्स ही इमारत प्रत्यक्ष उभी असल्याने तिच्या पुढें प्राचीन क्यापिटालाचें तेज पडत नाहीं; आणि टोरलोनियाकडे रात्रौ शानदार मंडळी जमलेली पाहिली असली ह्मणजे सकाळीं उठल्यावर प्रथम डोळ्यांपुढें ती उभी रहाते. जूलिअस सीझर दिग्विजय करून वाजत गाजत मोठ्या थाटानें शहरांत आला त्या स्वारीचें स्मरण होत नाहीं. ह्या दोन प्राचीन नगरांच्या सद्यःस्थितीची तुलना करून लाक्षणिक प्रकारानें बोलावयाचें झालें तर आह्मी असें ह्मणूं कीं अथेन्समध्यें एक जुनी हवेली शिल्लक आहे, तिचा नाश झाला आहे खरा तथापि ती स्पष्ट दिसते. येथें रोममध्यें जुन्या घरबंदावर नवी इमारत उठली आहे, ती पहिली जागा झांकून टाकून आपल्या सौंदर्यानें आणि भव्यपणानें पहाणाराचें मन आपल्याकडेच आकर्षून घेते, त्याच्या मनांत प्राचीन इमारतींचे विचार येऊंच देत नाहीं.

याप्रमाणें विचारमग्न होऊन त्याणें क्विरिनल प्रासाद, कोरम रोमानम,

---

* लिओ, ग्रेगरी, जूलियस. ह्या नांवांचे बादशहा पुष्कळ झाले. त्यांची कीर्ति कशी आहे तें रोमचा इतिहास वाचला असतां समजणार आहे.

टेंपल ऑफ कॉनकॉर्ड, जुपिटर स्टेटार, आर्क ऑफ सेपटिमस सेव्हेरस, क्यांपिडोग्लिओ, क्यापिटाल, टारपीयनरॉक वगैरे अनेक स्थळें पाहिलीं. टारपीयन रॉकवर चढून आसमंतात दृष्टि फेंकून तो ह्मणतो—माझ्यापुढें पडापडीचा थोर देखावा होता; पालेटाईन, आव्हेंटाईन, आणि टायबर नद्या जवळ होत्या आणि बर्फाछादित आपिनाईन पर्वत दूर दिसत होता. ह्यापैकीं कांहीं पदार्थ रॉम्युलस आणि रेमस यांणीं भविष्य कथन केलें त्याकाळीं होते तसेच आज आहेत; आणि बाकीच्यांत जे फेरफार झाले आहेत ते फार मौजेचे आहेत.

पुढें व्हरजिल कविकृत दोन पंक्ति देऊन तो ह्मणतो—क्यापिटालवरील भयाण देखाव्याचें हें वर्णन व्हर्जिलनें केलें तेव्हां आपल्यावेळीं त्या स्थळाचें वैभव कसें होतें आणि त्याच्या विपरीत कसें झालें तें सांगितलें आहे.

पुढें आणखी एक ओळ देऊन तो ह्मणतो—ती ही सर्व शोभा नाहींशी झाली; तो क्यापिटाल नवीन धन्यांनीं पादाक्रांत केला आणि जोव्हदेव आपलें सिंव्हासन सोडून गेला आणि त्याच्याजागीं दुसरे देव येऊन बसले.

रोम पाहून झाल्यावर एल्फिन्स्टन साहेब तेथून व्हेनिस येथें गेला, तेथें प्रशियाचा मुख्य प्रधान कौन्ट हार्डिंझ याची भेट झाली. त्याच्याविषयीं त्याणें असें लिहिलें आहे—'याच्याविषयीं आह्माला मोठें भय वाटत असे, आणि मला नेहेमीं असें वाटत असे कीं जीनाच्या लढाईनंतर त्याणें आत्महत्या केली. तो ह्मातारा, ७९ वर्षांचा आहे परंतु सुदृढ आणि बळकट आहे. तो फार आनंदी, मोठा मौज्या आणि बोलका आहे.'

त्याचें तोंड सुरू झालें आणि मग एल्फिन्स्टन साहेबाला बोनापार्टीच्या पुष्कळ गोष्टी ऐकावयास मिळाल्या. तो त्याच्याशीं तह ठरविण्याच्या कामांत गेलेला होता.

इटलींतून एल्फिन्स्टन साहेब फ्रान्स देशांत गेला. पारीस मध्यें असतांना टालेरांड ह्या प्रख्यात पुरुषाची व त्याची भेट झाली. त्या विषयीं तो

म्हणतो—ही मूर्ति विलक्षण दिसते. तोंड निस्तेज, तोंडाची कातडी सईल होऊन खालीं लोंबत आहे, डोक्याला पुष्कळ केंस आहेत, ते चिकटविलेले आणि रंगविलेले आहेत. फ्राइाल्टानें ह्याच्याविषयीं एक चमत्कारिक गोष्ट मला सांगितली; ती खुद्द त्याच्याच तोंडून आपण ऐकिलेली आहे असें तो म्हणतो. ती अशी—कान्फीडरेशनचा मोठा थोरला समारंभ झाला त्यांत त्याणे उपदेशपर व्याख्यान दिलें, त्याच रात्रीं तो तीन ठिकाणीं जुवेबाजांच्या अड्यांत गेला; त्याणें सर्व पेढ्या ( banks ) मोडल्या आणि जुगारांत सात आठ हजार पौंड मिळविले आणि नाहींसा झाला तो फ्रान्सांत जो राज्य क्रांतीचा थोरला दंगा उसळला तो मोडून जिकडे तिकडे अगदीं सामसूम होऊन पुन: शांतता होईपर्यंत इकडे आला नाहीं; त्या द्रव्यावर निर्वाह करून होता आणि तेव्हांपासून पुन: जुगारघरांत कधीं गेला नाहीं. ही गोष्ट विशेष आश्चर्य करण्यासारखी आहे.

एप्रिल महिना संपेपर्यंत फ्रान्सांत राहून एल्फिन्स्टन साहेब मे महिन्यांत स्वदेशीं गेला. तारीख १ मे रोजीं त्याचा मुक्काम क्याले येथें होता, त्या दिवशींचा त्याचा लेख असा आहे—इंग्लंडला जाण्याकरितां मी उद्यां गलबतांत बसणार. तीन तासांत जाऊन पोहोंचेन. तीस वर्षांहून अधिक काळ लोटल्यावर स्वदेशाला परत जाणें आणि आपल्या इष्टमित्रांना भेटणें ही एक ध्यानांत ठेवण्यासारखी आश्चर्याची (awful) गोष्ट आहे परंतु ह्याक्षणीं माझ्या मनाला एका आनंदाशिवाय दुसऱ्या कोणत्याही वृत्तीचा विकार नाहीं. इंग्लंड हा माझा देश आहे एवढेंच नव्हे, तर हा थोर पुरुषांचा आणि स्मरणांत ठेवण्यासारख्या मोठमोठ्या गोष्टींचा देश आहे, असें

---

* ह्या सभेत नेपोलियनाचा पुरा नाश केल्यावांचून हातचें शस्त्र खालीं ठेवावयाचें नाहीं असा आस्ट्रिया, स्पेन, ग्रेटब्रिटन, पोर्तुगल, रशिया, प्रुशिया, आणि स्वीडन इतक्यांनीं मिळून ठराव केला.

+ सन. १८८१

मी दूर असतांना फार दिवसांपासून मानीत आलों आहें, आणि इटली व ग्रीस ह्या देशांविषयीं माझ्या मनाला जसा पूज्य भाव आणि उल्हास वाटत होता तसाच ह्या विषयीं ही वाटत आहे. आतां नित्य व्यवहारांतल्या ग्राम्य गोष्टी पहतांना ह्या वृत्तीचा बऱ्याच अंशीं कदाचित लोप होईल परंतु मला अद्याप असें वाटत आहे कीं मी पुनः ब्रिटिश जमिनीवर पाऊल टाकीन तो क्षण सामान्यांपैकीं असणार नाहीं. ( अर्थात तो काळ विशेष महत्वाचा वाटेल. ) '

'आतां माझा प्रवास संपला. यांत माझा काळ जसा आनंदानें गेला तसा पुनः केव्हां जाईल ही आशा इतःपर धरावयास नको. ह्या प्रवासांत जी मोठी मौज होती ती ही कीं इतके दिवस काळजी आणि संकोच यांचा लवलेश नव्हता; तसाच उदासीनपणा ही नव्हता; ( तो बहुधा केव्हांही नसतो. )'

आपला काळ सुखानें उद्योगांत जावा परंतु श्रम पडूं नयेत, मौज वाटावी परंतु काळजी तर नसावी, कलाकौशल्याच्या व सृष्टिजन्य ईश निर्मित पदार्थांच्या उत्कृष्ठ सौंदर्याचे मासले, प्राचीन काळच्या अति मनोवेधक गोष्टी व आलीकडील काळच्या रीती भातींतील अती आश्चर्यकारक विलक्षण प्रकार थोडक्याशा काळांत पहावयास मिळावे, अशी ज्या कोणाची इच्छा असेल त्याणें आतां मी जो प्रवास संपवीत आहें हा करावा. त्याचा तो हेतु सिद्धीस जाण्याला या सारखें दुसरें साधन बहुधा मिळणार नाहीं.'

बाळपणींच स्वगृहाचा त्याग करून द्वीपांतरीं गेल्यावर सतत तेहतीस वर्षे ह्मणजे पुरीं पावणे तीन तपें दूर परमुलखी काढून जन्मभूमीचें दर्शन घेण्याला एल्फिन्स्टन साहेब परत गेला तेव्हां त्याच्या मनाला केवढा आनंद वाटला असेल तें सांगतां येत नाहीं; त्याचें अनुमान करावें.

तारीख २ मे रोजीं मोठ्या पहाटे उठून त्याणें निघण्याची तयारी चालविली. फ्लारेन्समध्यें त्याणें एक गाडी ५० लुई देऊन विकत घेतली होती ती १० लुईनां घाईघाईनें विकून टाकली. सकाळीं सात वाजतांच क्याले बंदरांतून आगबोट निघावयाची होती, परंतु ती नऊ वाजेपर्यंत निघाली नाहीं, मग फ्रान्सच्या किनाऱ्यानेंच जात जात थेट डोव्हर समूर गेली आणि तेथून सरळ निघाली. एल्फिन्स्टन साहेबाला नेहमीं गलबत लागत असे हें मागें सांगितलेंच आहे. आगबोट कांहीं तितकी लागूं नये परंतु सर्व उतारूंनां लागली. तो ह्मणतो—आजच्या सारखा मी मागें कधींच बेजार झाल्याचें मला स्मरत नाहीं. पुष्कळ वेळ अगदीं अडवा पडून होतों, मध्येंच डोकें वर करून इंग्लंड दिसूं लागलेंसें पहात होतों, परंतु दिसेना तेव्हां पुनः पडत होतों. अखेर जमिनीवर उतरल्यावर देखील पुष्कळ वेळपर्यंत इतका आजारी होतों आणि इतकी भोंवळ आली होती कीं तीपुढें मला कांहीं सुचत नव्हतें.

आपण तीन तासांत खाडीपलीकडे जाऊं असें एल्फिन्स्टन साहेबाला वाटत होतें परंतु आगबोटीला सहा तास लागले आणि त्याचे हाल झाले, त्यामुळें अर्थातच इंग्लंडांत पाऊल पडल्याबरोबर त्याला जो कांहीं अत्यानंद व्हावयाचा आणि मुखानें हर्षोद्गार निघावयाचे त्यास अवकाशच राहिला नाहीं. असो. डोव्हर येथें उतरून बंदरावरून खाणावळींत ( हॉटेल ) गेल्यावर जरा बरें वाटतांच तो गांवांत फिरावयास गेला. तेथच्या बाजारांत सामान्य जिन्नस होते ते पाहून, तो ह्मणतो—घर सोडून गेल्यापासून आजपर्यंत दृष्टीस पडले नाहींत असले पुष्कळ जुने पदार्थ पाहून मला आनंद वाटला. ते कोणते म्हणाल तर साखरेचीं चित्रें, दूध काढण्याचीं जस्ती घमेलीं, इत्यादि अगदीं हलकेच होते.

सायंकाळीं सहा वाजतां तो टपालच्या गाडींत बसून क्यांटरबरीस जाण्यास निघाला; वाटेनें शेतें, गांव, वगैरे लागले ते पहात, आनंद

मानीत नेमल्या ठिकाणीं जाऊन पोहोचला. खाणावळींत सर्व कांहीं उत्तम होतें, परंतु सर्व पदार्थांत मिऱ्याची रेलचेल होती तेवढ्यानें बिघडलें होतें. पारीसमध्यें फ्राहाल्ट याणें त्याला ही इंग्लंडांतली तऱ्हा सांगितलीच होती. खाणावळीच्या खर्चाची याद एक पौंड, तीन शिलिंग, एक * पेन्साची आली. तारीख ३ मे रोजीं रिचमंड येथें गेला. तेथचें देवालय, ब्लयाक प्रिन्सची कबर, तीवर टांगलेला त्याचा मुगुट, ढाल, चिलखत, चौथ्या हेनरीची कबर, दुसरा हेन्री आणि लुइस धि यंग जिच्यापुढें भाक्ति-भावानें गुडघे टेंकीत व नमस्कार घालीत ती बेकेटची कबर, ज्याला केंटच्या राजाचें सिंहासन ह्मणतात ती दगडी बैठक, इत्यादि स्थळें पाहून त्याणें लागलाच लंडनचा मार्ग धरला.

क्याले येथून निघतांना उद्या स्वदेशांत जाऊन पडावयाचें ह्मणतांना एल्फिन्स्टन साहेबाच्या मनाची स्थिति कशी झाली आणि उद्गार कसे निघाले तें वर सांगितलेंच आहे. जन्मभूमीचें दर्शन घडून दोन मजलांनीं जगत्प्रसिद्ध राजधानीजवळ पोहोंचताच त्याच्या मनांत आनंदाची उकळी येऊन कसे उद्गार निघाले ते पहा. तो ह्मणतो—इंग्लंड आणि फ्रान्स यांची तुलना करतांना निःपक्षपातबुद्धि ठेऊन मनाची अगदीं समता राखणें मला कठीण पडत आहे. कारण येथली जी जी वस्तु दृष्टीस पडते ती ती माझें मन प्रेमबद्ध करते. हा रस्ता लंडनला जातो असें सांगणारी फळी लावलेला खांब किंवा मी स्वदेशांत आहें असें स्मरण देणारा दुसरा कोणताही पदार्थ पाहून माझ्या मनाला हर्ष होतो. राहा एडवर्ड आणि आठ हेन्री राजांपासून ह्यांपडेन आणि सिडनीपासून तहत टाम जोन्स

---

* हा वेळपर्यंत एल्फिन्स्टन साहेबानें खाणावळीच्या खर्चाचा आंकडा कोठें नमूद केलेला नाहीं. आतां लिहिण्याचें कारण अर्थात तो जबर वाटला असावा.

आणि पारसन आडाम्स पर्यंत झालेल्या पुरुषांच्या नांवाशीं संलग्न असलेली हरएक गोष्ट आणि आमच्या भाषेतल्या काव्यांतील बहुतेक वर्णनें एकसमयावच्छेदें करून मनांत येऊन दृष्टिपथांतल्या सुपीक व सुंदर प्रदेशाचें खरें मनोहरत्व अधिकच हृदयंगम होतें. मी हिंदुस्थानापासून येथपर्यंत जो प्रवास केला त्यांत क्यांटरबरीपासून लंडनपर्यंत गाडींतून आलों एवढा हा भाग अत्यंत आनंददायक वाटला. रस्त्याच्या बाजूच्या लहान लहान झोंपड्यांचा अवर्णनीय नीटनेटकेपणा, त्यांच्या जवळच्या लहान बागा आणि दोनही बाजूंचा रम्य प्रदेश पाहून मी आधींच आनंदित झालों होतों, तशांत श्रोटन पुढच्या डोंगरापासून दूरवर प्रदेश दिसूं लागला तेव्हां तर अगदीं मोहित होऊन गेलों. शेतांतलीं घरें आणि फुललेल्या फळबागांतून मला एक अप्रतिम सुंदर मैदान दिसत होतें आणि माझ्या उजव्या बाजूला टेम्स नदी मोठ्या डौलानें सागराच्या समागमाला चाललेली दिसली. लंडनला जाईपर्यंत हा जलप्रवाह माझ्या उजव्या हातास खालीं होता. नाईल नदी सोडल्यापासून मी जितक्या नद्या पाहिल्या तितक्यांपेक्षां ही बहुतेक ठिकाणीं मोठी दिसली. तिचा उभय तीरचा जो सुपीक आणि सुंदर प्रदेश आहे त्याची बरोबरी नाईल आणि इतर ज्या नद्या मी आज पर्यंत पाहिल्या त्यांतील एकीच्यानेंहि क्षणभर देखील होणार नाहीं.'

याप्रमाणें वाटेनें लागणाऱ्या हरएक स्थळाच्या सौंदर्यानें मोहित होऊन त्यांचें नीट निरीक्षण करीत करीत **एल्फिन्स्टन** साहेब लंडनांत शिरला परंतु अपरिचितत्वामुळें कोणत्या जागीं आलों हें कांहीं त्याला कळेना. तो म्हणतो—वेस्ट मिनिस्टर पुलावर येईपर्यंत मी कोठें आहें हें कांहीं मला कळेना. तेथून चेअरिंग क्रॉसपर्यंत फारसा फेरफार झालेला नाहीं, परंतु पॉलमॉलपासून सारें अगदीं नवें दिसतें. वाटर्लू प्लेस आणि रिजंट स्ट्रीट एक प्रकारचे आहेत; यांच्यासारखी पारीस मध्यें जागाच नाहीं. परंतु लोव्हेर पासून चांप्स एलिसिसपर्यंत एकसारखे लागत गेलेले वाडे जागा, आणि बागा, यांच्या इतकें त्यांचें स्वरूप भव्य नाहीं. पारीसच्या

त्या भागाच्या तोंडीला लंडन मधलें कांहींच लागणार नाहीं. दुसऱ्यापक्षीं पाहिलें तर पारीसच्या मानानें पहातां लंडनचा विस्तार अमर्याद अफाट दिसतो, आणि कोणत्याही भागांत पाहिलें तरी संपत्ति आणि शोभा सारखी दिसते. मी मागें स्काटलंडांतून येत असें तेव्हां विटांचीं भिकार घरें दिसत असत, त्यां सारखें आतां कांहीं दिसत नाहीं.

**एल्फिन्स्टन** साहेब मुंबई सोडून लंडनास जाऊन पोहोंचला त्या दिवशीं त्याचा प्रवास संपला. सेवा ह्मणजे पराधीनता, तींतून तो मुक्त झालाच होता. दारापत्यादि प्रपंचपाशाला आरंभ विवाहापासून; त्या भानगडींत तो पडलाच नव्हता. चरितार्थ कसा चालेल ही कांहीं काळजी नव्हतीच; शरीरप्रकृति चांगली होती; वृद्धापकाळ अगदीं जवळ येऊन ठेपला असेंहि नव्हतें; तेव्हां आतां त्याणें आयुष्याचा पुढील दीर्घ काळ कशा तऱ्हेनें घालविला हें पाहिलें पाहिजे. तें पुढच्या भागांत सांगूं.

## भाग ४ था.

### स्वदेशवास १८२९—१८३१.

स्वदेशीं परत गेल्यावर **एल्फिन्स्टन** साहेबानें रोजनाम्याची वही नवीच घातली आणि होमरकृत ऑडिसी महाकाव्यांतील दोन तीन पंक्ति प्रथम लिहून मग नित्यवृत्त लिहिण्यास सुरवात केली. युलिसिस हा महावीर देशांतरीं वीस वर्षें कालक्रमण करून पुष्कळ संकटें सोसून, आपल्या बरोबरचे सारे इष्टमित्र नाहींसे झाल्यावर स्वदेशीं परत येईल, तेथें त्याच्या ओळखीचें कोणी असणार नाहीं, तो अगदीं परका असेल, असें हालिथरसिस याणें त्याच्याविषयीं भविष्य कथन केलें होतें, तद्विषयक त्या पंक्ति आहेत. युलिसिसची उपमा **एल्फिन्स्टन**ला सर्वांशीं लागू पडणारी नव्हेच, तेव्हां त्याचें आपलें जेवढें साम्य होतें तेवढेंच मनांत आणून त्याणें तें अवतरण केलें असावें व त्यावरून स्वदेशीं परत आलों खरा परंतु येथें माझें कोणी नाहीं,

मी अगदीं एकटा, परका, असें वाटून त्याच्या मनाची वृत्ति कशी झाली असेल याचें अनुमान करतां येतें. असो.

**एल्फिन्स्टन** साहेब लहानपणींच हिंदुस्थानांत गेला, तो फार वर्षांनीं परत येऊन आपल्याला भेटला ह्मणून त्याच्या आप्त मंडळीला आणि बाळपणच्या इष्टमित्रांना आनंद होऊन त्यांणीं त्याचें स्वागत केलें; तसेंच राजकीय गोष्टींत व विद्वानमंडळांत प्रमुखत्वानें असलेल्या मंडळीनें ही केलें. इतकेंच नव्हे, छानछोकीनें (fashion) वागणाऱ्या मंडळीनें ही तसेंच केलें. तरी पण त्याच्या मनाला कांहीं स्वस्थता वाटेना. त्या नव्या मंडळींत आणि त्या नूतन स्थितींत त्याला कसेंसेंच वाटत होतें. त्याबद्दल त्याच्या रोजनाम्यांत पुष्कळ ठिकाणीं उल्लेख आहेत. लंडन शहरांत राहूं लागून पाऊण महिना गेल्यावर त्याणें जें लिहिलें आहे तें असें--

शहरांत राहणें मला बरें वाटूं लागलें आहे आणि व्यवहारांतल्या ज्या कांहीं वागण्यांच्या बाह्योपचारिक रीति आहेत त्यांची मला जलद संवय होत चालली आहे, परंतु मी एथचा असें वाटत नाहीं तें नाहींच. आडाम, क्लॉक आणि माझा काका उइलियम याचे घरची मंडळी, यांच्याविषयीं माझ्या मनांत जशा कल्पना येत होत्या, किंवा ते जसे असावे असें माझ्या मनांत येत होतें त्याप्रमाणें सर्व कांहीं आहे. त्यांच्यापेक्षां माझ्या आप्तांची मला ओळख कमी आहे, परंतु ते माझें स्वागत मोठ्या प्रेमानें करतात. हिंदुस्थानांतल्या माझ्या अत्यंत जिवलग मंडळीपैकींही कांहीं असामी येथें आहेत ओळखीची मंडळी ही पुष्कळ आहे; परंतु माझ्या स्थितींत एकलकोंडेपणा येत चालला आहे असें मला दिसून येतें. हिंदुस्थानामध्यें आपण एकाद्या गट्टीपैकीं असतों--उदाहरणार्थ आपण ज्या रेसिडेन्सींत किंवा पलटणांत असतों त्यांतील मंडळीची गट्टी--आणि कांहीं लोकांच्या सहवासांत आपण सहज राऊन पडतोंच. येथें कोणाचा कोणाशीं संबंध नाहीं. आपले अत्यंत जिवलग

मित्र आणि आप्त हे सारे आप आपल्या उद्योगधंद्यांत गर्क झालेले असतात आणि त्यांची उगाच केव्हांतरी चुकून माकून गांठ पडते.'

सार्वजनिक गोष्टींसंबंधानें एकप्रकारचें उत्तेजन ( excitement ) येत असतें असें मला वाटत होतें, परंतु तें किंवा आपल्या आसमंतात ज्या नित्य नव्या गोष्टी दिसत असतात त्यांणीं जें उत्तेजन येत असतें तें यापैकीं मला अद्यापपर्यंत कोणतेंच येऊं लागलेलें नाहीं, आणि दुसऱ्या लोकांनां आलेलें हीं कोठें माझ्या फारसें नजरेस येत नाहीं. ज्यांचा पार्लमेंटाशीं कांहीं संबंध आहे ते राजकीय विषयांतल्या गोष्टी बोलतात आणि ज्या सभासदांची माझी भेट झाली त्यांच्या भाषणांत पुष्कळ भिन्न भिन्न विषय निघतात. हिंदुस्थानांतल्या प्रमाणें दुसऱ्याच्या मनाला कसें वाटेल इकडे फारसें लक्ष न ठेवतां आणि प्रत्येक विषयांतील मुख्य मुद्याकडे नजर देऊन मोकळ्या मनानें आणि सहजरीत्या कसें भाषण चालतें तें पाहून मी चकित झालों.'

'हिंदुस्थानांतल्या मंडळींत जेव्हां मी असतों तेव्हां मात्र, आणि त्यांत ही त्या मंडळींत माझे मागचे कोणी परिचित असतील तर, माझें मन अगदीं स्वस्थ असतें. बाहेर मुलखीं असतांना मला जे इंग्रज लोक भेटले ते सर्व एका धंद्यांत असल्यानें त्यांचा एकमेकांशीं कांहीं तरी संबंध होता. एथची गोष्ट तशी नाहीं, आणि माझ्यासारखा जो परका असतो त्याचा आपल्या समोंतालच्या कोणाशीं अगदीं कांहींएक संबंध नसतो. तरी माझे आप्त माझ्यावर फार प्रेम करतात आणि मागें माझा ज्यांच्याशीं अतिशय परिचय होता त्यांची भेट होते तेव्हां ते तर मी कधीं घर सोडून गेलोंच नाहीं असें वाटावें इतकी ममता करतात.'

**एल्फिन्स्टन** साहेबाला स्वदेशांत जाऊन आतां आपण येथें अगदीं एकटे असें जें वाटत होतें त्याला जीं कारणें झालीं तीं फार दिवस टिकणारीं नव्हतीं. तीं लौकरच नाहींशीं झालीं आणि मग त्याला तसें वाटेनासें झालें.

एकादा मनुष्य अमेरिकेंतून उठून अकस्मात विलायतेंत येऊन पडलों, तर तेथच्या मंडळीच्या भाषणांत जें कांहीं स्थानिक, किंवा व्यक्तिवाचक, किंवा क्षणिक महत्वाचे, विषय निघतील त्यांत त्याचें चित्त कसें रमेल! थोडेसे महिने लोटल्यावर एल्फिन्स्टन साहेबाची संकोचवृत्ति बरीच कमी झाली. तो क्लबचा आणि लिटररी सोसायटीचा सभासद झाला, हॉलंड हौसमध्यें जाऊं लागला, आल्मनाकचा वर्गणीदार झाला आणि नाटकें व ऑपरे (संगीत नाटकें) पहाण्यास जाऊं लागला. पहिले कांहीं आठवडे शहरांत इकडे तिकडे हिंडून हें पहा तें पहा अशांत गेले. शहरच्या मौजा पहाण्यांत शाळेंत जाणाऱ्या मुलांना जशी हौस आणि आनंद वाटत असतो तसा त्याला वाटत होता. तो लहानपणीं जेथें फिरत असे तेथें आधीं गेला. त्याला त्या वेळीं जो आनंद वाटला त्याचें त्याणें असें वर्णन केलें आहे—

हाईडपार्कांत आणि केन्सिंगटन बागांत गेलों तेव्हां मला मागील काळाचें स्मरण होऊन दसपट आनंद वाटला. तेथचे रस्ते, झाडें, आणि घरें मी तेव्हांच ओळखिलीं. तीं बहुतेक होतीं तशीं आहेत. टॉमसनच्या शाळागृहाजवळच्या जागा निरखून पाहिल्या आणि आमची खेळण्याची जागा पाहिली. त्याजागीं माझा जितका काळ आनंदांत आणि मौजेंत गेला तितका दुसऱ्या कोठें गेला नाहीं.'

'लंडन शहरचा मोठेपणा, भव्यपणा, संपत्ति आणि सुधारणा पाहून मी आश्चर्यचकित होत आहें. तीं मी जितकीं मनांत आणीत होतों तितकीं आहेत.

याप्रमाणें तो जें जें पाही त्यापासून त्याला आनंद होई, परंतु एका गोष्टींत त्याची निराशा झाली. ती त्याणें लिहून ठेविली आहे.

तारीख २८ मे रोजीं तो हौस ऑफ कॉमन्स पहावयास गेला. ती सभा पाहून मोठा आनंद होईल अशी आशा लागणें सहज होतें, परंतु तसें

कांहीं झालें नाहीं, उलट त्याची निराशा झाली. त्या दिवशींचा त्याचा लेख असा आहे.—

हौस ऑफ कॉमन्स ( लोकनियुक्त प्रतिनिधि सभागृह ) मी पूर्वी पाहिलें तेव्हां होतें तसेंच आहे. त्याच्या दोहीं बाजूस भिंतींत तीन तीन खोल्या काढलेल्या आहेत आणि दोनही सभा एक होण्यापूर्वी याचा जेवढा विस्तार होता त्यापेक्षां कदाचित दुसऱ्या कांहीं तऱ्हेनें तो थोडा वाढला असेल, परंतु तो कांहीं दृष्टोत्पत्तीस येण्यासारखा नाहीं. त्यावेळीं मी तरूण होतों त्यामुळें आणि फॉक्स पिट्ट आदिकरून सर्व वक्ते तींत हजर होते त्यामुळें ती सभा पाहून माझ्या मनाला तिचा जो भव्यपणा वाटत होता आणि आनंद होत होता त्याचा लेश देखील आज वाटला नाहीं. तथापि तेथें जीं भाषणें झालीं तीं बरींच शुद्ध आणि अस्खलित होतीं. त्यांत गांभीर्याचा बहुतेक अभाव होता आणि त्या सभासद मंडळींत शांतपणा किंवा भाषणश्रवणाकडे लक्ष यथायथाच होतें. बाकी पाहिलें तर कांहीं कामाकरितां खासगी रीतीनें मंडळी जमली असतां बैठकींत शिष्टाचाराकडे फारसें लक्ष न देतां मोकळया मनानें संभाषण चालतें तशीं भाषणें होत होतीं. ही सभा चेंबर ऑफ डेप्युटीजपेक्षां बरी होती.

पुढें फार दिवस गेले नाहींत तोंच पार्लमेंटचा सभासद होण्याची त्याला मंडळीनें संधी आणून दिली, आणि खरोखर त्याचे स्नेही असें म्हणूं लागले कीं त्याला सरकारांत मोठ्या हुद्याची जागा मिळेल. परंतु तसें होण्याला फारच मोठ्या अडचणी होत्या. त्याणें असें लिहिलें आहे—

बोर्ड ऑफ कंट्रोलच्या अध्यक्षस्थानीं माझी नेमणूक होणार अशी माझ्या मित्रमंडळींत फार दाट बातमी पसरली आहे. तिला अगदीं थोडा देखील आधार नाहीं. तरीपण हिंदुस्थानच्या मंडळीला तीपासून मोठा आनंद वाटत आहे ; एथपर्यंत सारें ठीक आहे. परंतु खरोखरच जर माझी नेमणूक होणार असेल तर मला कांहीं तें ऐकून आनंद होणार नाहीं, आणि मला नेमूं नका असें मी

चटकर साफ सांगेन. तसेंच मला पार्लमेंटांत निवडून पाठविण्याचा मंडळीचा हेतु असून मला त्याबद्दल त्याणीं विचारलें तेव्हां तें ही मी नको ह्मणून सांगितलें. कारण मला लोकांपुढें किंवा खासगी मंडळींत ही बोलतां येत नाहीं, आणि आतां या देशांत सार्वजनिक कामांत पडून प्रसिद्धीस यावें ह्मणून मी त्या भरीस पडेन तर आजपर्यंत जो काय थोडा बहुत लौकिक मिळविला आहे तोही जाईल हें मी समजून आहें. ह्मणून पुढें काय उद्योग करावयाचा तें आपलें आपल्याला ठरवतां येईल असें जें मी एकदा मनांत आणलेलें आहे तेंच ध्यानांत ठेऊन चालावयांचें.

**एल्फिन्स्टन** साहेबाच्या घराण्याचा जमीन जुमला लानार्क तालुक्यांत [ county ] होता आणि त्या तालुक्याच्या कडेलाच कंबरनाल्ड येथें त्याचें वडिलोपार्जित घर होतें, ह्मणून त्या तालुक्याच्या तर्फे पार्लमेन्टांत सभासद होऊन जाण्याची त्याणें खटपट करावी असें त्याच्या मित्रमंडळीच्या मनांत आलें आणि त्यांणीं त्याजवळ ती गोष्ट काढली, परंतु त्याणें ती मान्य केली नाहीं. तेव्हां ड्यूक आफ ह्यामिल्टन याणें अगदीं आग्रहानें त्याला ह्मटलें एकदम नाहीं ह्मणूं नका; त्या तालुक्यांत जा आणि आपल्याला लोकांनीं निवडण्याचा संभव आहे कीं नाहीं तें पहा आणि मग तरी होय नाहीं ह्मणा. परंतु त्याचा निश्चय कांहीं ढळला नाहीं, तो अगदीं अखेरपर्यंत कायम राहिला. त्या संबंधानें त्याचा लेख असा आहे—' याकामीं मला काय अडचणी वाटतात तें मी सांगितलें. मला येथें येऊन अगदीं थोडे दिवस झाले, राजकीय विषयांत माझे विचार अद्याप स्पष्ट असे कांहींच ठरलेले नाहींत. मला बोलतां येत नाहीं आणि मतें मिळवितां येत नाहींत, ह्मणून ही गोष्ट मनांतच आणावयास नको असें मला वाटतें.'

**एल्फिन्स्टन** साहेबाचा विचार असा होता तरी ड्यूक साहेबांचा फार आग्रह पडल्यामुळें तें प्रकरण कांहीं दिवस तसेंच पडून राहिलें. सर जेम्स ग्राह्याम हे त्या तालुक्यांत एक मतदार होते त्यांणीं ही त्याला आग्रह

केला. ड्यूक आफ् वेलिंगटन मुख्य प्रधान यांचा व त्याचा हिंदुस्थानांतला फार दिवसांचा स्नेह, ही गोष्ट अनुकूलच आहे असें मंडळीला वाटलें, परंतु त्याला ती प्रतिकूल वाटली; कारण तो त्या पक्षाकडे मिळावयाचा नव्हता. अखेर कांहीं महिन्यांनीं ग्राह्याम साहेबाबरोबर भाषण होऊन तो नाद सुटला. त्यासंबंधानें त्याच्या रोजनाम्यांत लेख आहे तो असा—

तारीख १० सेप्टेंबर—सर जेम्स ग्राह्याम साहेबांबरोबर लानार्कशायर संबंधानें पुष्कळ लांबलचक भाषण करून अखेर मी त्यांनां आपल्या बाजूस वळवून आणलें असें मला वाटलें. आतां आपलें अगदीं स्वस्थ, घरांत रहावें असें माझ्या मनानें घेतलें आहे; असा माझा निश्चय झाला आहे ह्मटलें तरी सुद्धां चालेल. पार्लमेंटांत मी गेलों (आणि तो एका तालुक्याच्या तर्फेनें) तर मला न आवडणाऱ्या अशा पुष्कळ गोष्टी मला कराव्या लागतील. त्या अशा—काम पडेल, लोकांनां भेटावें लागेल, त्यांची मर्जी संपादावी लागेल. प्रधानमंडळी, कमिट्या आणि पार्लमेंटसुद्धां खुलासे विचारतील ते (थोडे तरी) द्यावे लागतील, रात्रीं फार वेळ जागावें लागेल आणि जेव्हां माझ्या मनांत बाहेर मुलखांत, स्वदेशांत किंवा परदेशांत फिरावयास जावें असें येईल तेव्हां जातां येणार नाहीं, लंडनांतच रहावें लागेल. आणखी हिंदुस्थानासंबंधीं एकाद्या गोष्टीवर कोणी तरी कांहीं आक्षेप घेतला ह्मणजे बोलावेंच लागेल ही नेहेमी काळजी असणार व त्या प्रसंगाला तोंड देण्याची आपली योग्यता नाहीं ह्मणून मनांत नेहेमी धाकधूक होत असणार.

ड्यूक आफ वेलिंगटन **एल्फिन्स्टन** साहेबाची योग्यता जाणून होता. त्याच्या मनांत त्याला पुनः हिंदुस्थानांत पाठवावयाचें होतें. त्या विषयीं लॉर्ड एलिनबरो याच्या रोजनाम्यांत लेख आहेत. अखेर एलिनबरो साहेबानें **एल्फिन्स्टन** साहेबाकडे जाऊन तुमची इराणच्या शहाच्या दरबारीं वकिलीवर नेमणूक करतों, जाताका? असें विचारलें. तेव्हां त्याणें

त्याचे आभार मानले आणि ह्मटलें 'आतां कांहीं झालें तरी पुनः एशिया खंडांत जावें असें माझ्या मनांत कधीं येणार नाहीं.'

घर सोडून गेल्यापासून तेहतीस वर्षें पर मुलखांत काढून एल्फिन्स्टन साहेब स्वदेशीं स्वस्थ राहण्याच्या विचारानें आला, त्याला पांच चार महिने झाले नाहींत तोंच पुनः पहिल्याप्रमाणें त्याला न मानणाऱ्या हवेंत कामाला जुंपूं पहातों, परंतु तो मान्य होईल का, असा विचार लार्ड साहेबांनीं करावयास पाहिजे होता तो केला नाहीं. परंतु त्यांनां नकाराचें उत्तर देऊन मोकळा झाल्यावर मग त्याच्यामागें कांहीं झट उरलें नाहीं. लंडनांत जाऊन राहिल्यावर आतां मी एकटा ह्मणून त्याला प्रथम जें वाईट वाटत होतें तें ही हळुहळु कमी झालें. तेथें स्वतंत्रपणें राहतां येतें आणि मंडळींत मिसळतांही येतें. लोक आपल्या मनाप्रमाणें वागत होते तसें वागण्याला हरकत नव्हती. संध्याकाळचा प्रहर एकट्यानें कसा घालवावा ही जी त्याला काळजी पडली होती ती ही दूर झाली, असे त्याचे लेख आहेत. ज्या दिवशीं कधीं तो मंडळींत किंवा नाटकाला जात नसे त्यादिवशीं आठ वाजल्यापासून मध्यरात्रींपर्यंत आनंदानें कांहीं तरी वाचीत बसे. याप्रमाणें तीन महिने सुखानें गेले. फार दिवसांपूर्वी तो ज्याच्या हाताखालीं आनंदानें चाकरी करीत होता त्या प्रसिद्ध पुरुषाची प्रथम भेट झाली तिचें वर्णन त्याणें केलें आहे तें असें—

तारीख २५ जून. कोर्ट आफ डायरेक्टर्स यांणीं लार्ड डलहौसी आणि सर एस. बेक्विथ यांना मेजवानी केली. मला आमंत्रण होतें. सारें प्रधान मंडळ आलें होतें, त्यांतील कांहीं असामींची मी नांवें समजून घेतलीं. मागें माझ्या परिचयाची असलेली पुष्कळ मंडळी भेटली. रस्त्यांत गलबला झाला त्यावरून ड्यूक आफ वेलिंगटनची स्वारी आली असें समजलें आणि तो लागलाच आंत आला. तो अगदीं मागच्या प्रमाणेंच, परंतु जरा

म्हातारा दिसला. मला त्याच्यांत अतिशय मोठा फरक दिसला तो असा कीं त्याची चालरीत सौम्य आणि अधिक सभ्यपणाची झाली आहे. त्याचें दर्शन झाल्यानें माझ्या मनाला जें काय वाटलें त्याचें मला वर्णन करतां येत नाहीं. कांहीं वेळानें तो माझी चौकशी करीत आहे असें समजलें तेव्हां मी त्याच्या जवळ गेलों. तो मला मागल्याप्रमाणें भेटला आणि एक दोन मिनिटें बोलला. तो म्हणाला तुम्ही मला मागें पाहिलें तेव्हां पेक्षां आतां मी झातारा झालों आहें आणि केंस पांढरें झालें आहेत. तेव्हां घोड्यावर बसून पाहिजे तसा पळत होतों तसें आतां पळतां येत नाहीं. साधारण थोर मनुष्याशीं बोलतांना मला जसा संकोच वाटतो तसा त्याच्याशीं बोलतांना वाटत नाहीं. भोजनोत्तर त्याणें भाषण केलें; तें एकादा सराईत वक्ता अस्खलित आणि सहज बोलतो तसें कांहीं नव्हतें, परंतु घडघडीत आणि स्पष्ट असून ओतप्रोत होतें. आपण कंपनीच्या नोकरीस होतों आणि हिंदुस्थानांतील सैन्याची आपल्याला आस्था होती असें तो बोलला. आणखी पुष्कळ असामी बोलले, त्यांतले कित्येक (डलहौसी, बेक्विथ, हिल) निवळ शिपाई होते; वक्ते नव्हते. परंतु आपल्याशीं ताडून पहातां त्यांचें प्रसंगावधान पाहून मला आश्चर्य वाटलें आणि मी त्यांच्याहून फार कमी असें वाटलें.

जुलै महिन्यांत **एल्फिन्स्टन** साहेब आपले मित्र स्ट्राची बंधू यांस भेटण्यास शूटर्स हिलवर गेला. तेथें त्याचे दोन तीन दिवस फार आनंदांत गेले. तेथें त्यांणीं आपले सन १८०१ इसवींतले रोजनामे वाचले, सादीचे गजल म्हटले, नाचाचीं गाणीं म्हटलीं, दिल्ली, काबूल मिशन वगैरे बद्दल गोष्टी बोलले, असा मौजेत काळ घालविला.

सप्टेंबर महिन्यांत **एल्फिन्स्टन** साहेब स्काटलंडांत फिरावयास गेला. इष्ट मित्र मंडळीला भेटून मग तीन महिने एडिंबरो शहरांत रहावयाचें आणि तेथें गुरूजवळ ग्रीक भाषेचें अध्ययन करावयाचें असा त्याचा बेत होता. कांहीं

तरी वाचन चालावयाचेंच परंतु त्या शिवाय 'मी नेहेमी कांहीं तरी कायमचा अभ्यास करीत रहाण्याचा यत्न करीन.' असें त्याणें लिहून ठेविलें आहे.

मार्गानें जातांना जीं खेडीं लागलीं त्यांत स्वच्छता किंवा नीटनेटकेपणा वगैरे कांहीं नसल्यानें त्याला तीं पाहून आनंद वाटला नाहीं. एडिंबरो शहराला जाऊन पोंहोचला तेव्हां त्याचें सौंदर्य आणि भव्यपणा पाहून त्याला आश्चर्य वाटलें. तेथच्या रस्त्यांचें आणि त्याच्या आसमंतातल्या भागांचें त्याणें पुष्कळ वर्णन केलें आहे. परंतु त्याला तेथचा किल्ला पाहून जो आनंद झाला त्याला कशाचीच तोड नव्हती. तो जसजसा एक एक पाऊल त्याच्या जवळ जवळ चालला तसतसा जो जो पदार्थ दृष्टीस पडूं लागला त्या त्या वरून त्याला तेथें गेलेल्या बाळपणच्या दिवसांचें अधिकाधिक स्मरण होऊं लागलें. मग आंत जाऊन फिरतांना असंख्य गोष्टी त्याच्या डोळ्यांपुढें उभ्या राहिल्या; आईबापाजवळ तेथें रहात असतांना अनुभविलेलें सुख स्मरलें, आणि मी येथून नुक्ता काल गेलों असें वाटलें.

एडिंबरोहून तारीख २८ सप्टेंबर रोजीं एलिफन्स्टन साहेब आपल्या घराण्याचा रहाता गांव कंबरनाल्ड येथें गेला. तेथें त्याचें वडिलोपार्जित घर होतें, त्यांत त्याचे बहिणभाऊ रहात होते परंतु आतां त्यांपैकीं कोणी उरलें नव्हतें. तो खाणावळींत उतरला आणि घर पहावयास गेला तेव्हां त्याच्या मनाची स्थिति कशी झाली असेल त्याचें वर्णन करतां येत नाहीं, फक्त अनुमान करावयाचें. घरासभोंवतीं बाग होती तींत आपण कोठें बसत होतों, कोठें फिरत होतों, कोठें खेळत होतों, कोठें कोणतें झाड लाविलें होतें, कोठें काय केलें, तें सारें त्याला डोळ्यांपुढें दिसूं लागलें. सर्व ठिकाणीं फिरून तेव्हां कसें होतें आणि आतां कसें आहे तें पाहून मग तो घरांत गेला. त्यांत मिस्टर मिलर रहात होता, त्याणें त्याला पाहिजे तिकडे फिरूं दिलें. सर्व पाहून परत गेल्यावर त्याणें आपला रोजनामा लिहिला त्यांत काय पाहून

कसें वाटलें वगैरे पुष्कळच लिहिलें आहे, त्यापैकीं थोडासा मजकूर पुढें देतों. तो आरंभींच ह्मणतो—

'जें स्थळ सोडून जाऊन ३५ वर्षे झालीं तें आज परत येऊन पाहिलें तेव्हां आतां माझा प्रवास संपला असें मी समजतों.'

'ह्या स्थळाचें एकंदर स्वरूप फार विलक्षण आहे; यांत मला वाटलें होतें तितकें स्थित्यंतर कदाचित् झालेलें नसेल, कांहीं ठिकाणीं मुळींच कांहीं पालटलेलें नाहीं, पुष्कळ स्थळें अजून सुंदर आहेत, परंतु अन्यत्र विलक्षण उलटापालट झाली आहे, ती इतकी कीं जमिनीचें स्वरूप देखील पहिलें राहिलें नाहीं; पुष्कळ अव्यवस्था आणि पडापड आहे, ती पाहून मन खिन्न आणि उदास होतें. दुसरें, मागें येथें जीं मनुष्यें रहात होतीं त्यांतलें आतां कोणी ही उरलेलें नाहीं, मागें येथें असतांना ज्यांच्या सहवासांत मी आनंदांत होतों ती मंडळी नाहींशी झाली आणि घरची सर्व मंडळी गेली, त्यांचें पुनः कधीं दर्शन होणार नाहीं. हें मनांत येऊन मागच्या गोष्टींच्या स्मरणानें जसा आनंद होतो तसेंच दुःख होतें. मी घरांत गेलों तेव्हां देवडी लहान आणि जिना लहान पाहून मला आश्चर्य वाटलें. त्यांत फेरबदल अगदीं कांहीं झालेला नाहीं. चित्रें जशींच्या तशीं आहेत, इतकेंच नाहीं, घडयाळ, सांबरांचीं डोकीं, आणि शहामृगांचीं अंडीं देखील होतीं तशीं आहेत. त्या लहान लहान खोल्या आणि ती साधी फळ्यांची पडदी पाहून मी फारच चकित झालों. मी घरभर फिरलों तेव्हां माझ्या मनाची वृत्ति चमत्कारिक झाली आणि मागच्या गोष्टी फार आठवल्या. मी तेव्हां पाहिलेल्या पुष्कळ वस्तु, जुनीं पुस्तकें, तसबिरी, सामानसुमान, जसेंच्या तसें आहे. मी आपल्या आईच्या निजण्याच्या खोलींत गेलों तेव्हां माझ्या मनाला फारच वाईट वाटलें. मी अगदीं वर छपरांत आणि खालीं चाकरांच्या खोलींत गेलों. मिस्टर मिलर याणें मला कांहीं हरकत केली नाहीं ह्मणून मी आपल्या बाळपणांत ज्या ठिकाणीं फिरत होतों त्या ह्या अतिशय आवडत्या जागा मनाप्रमाणें पहावयास सांपडल्या आणि आईबापाच्या वेळच्या गोष्टींचें स्मरण होऊन जो आनंद झाला तसा पुनः कधीं होणार नाहीं'

दुसऱ्या दिवशीं सकाळीं ह्मणजे तारीख २१ सप्टेंबर रोजीं तेथच्या देवळासभोंवतीं व दुसऱ्या कांहीं स्थळीं फिरून एल्फिन्स्टन साहेब एडिंबरोला माघारा गेला.

त्याला वनश्री पहाण्याची फार हौस असे आणि स्काटलंड देश हें तर तिचें अगदीं माहेरघर असल्यासारखें आहे. तेव्हां त्याची ती हौस पुरण्याला कांहीं कमी नव्हतें. कांहीं दिवस तो डूमाड किल्ल्यांत गेला, तेव्हां आसपासच्या प्रदेशाची अप्रतिम वनशोभा पाहून त्याला फार संतोष झाला.

एडिंबरो शहरांत राहून तीन महिने स्वस्थ अध्ययनांत घालवावयाचें असा त्याचा हेतु होता. त्याप्रमाणें तो अभ्यास करूं लागला; परंतु तो कांहीं त्याच्या मनाप्रमाणें झाला नाहीं. कारण मध्यें मध्यें तो आपल्या मित्रमंडळीकडे पाहुणचार घेण्यास जात असे त्यामुळें खंड पडे. अभ्यास सावकाश होत होता, परंतु तो आपल्या नेहमींच्या तऱ्हेप्रमाणें उल्हासानें करीत होता. त्याविषयीं त्याणें असें लिहिलें आहे—माझी पुढची स्थिति आणि सुख पुष्कळ अंशीं माझ्या उद्योगावर अवलंबून असणार आहेत. हिंदुस्थान सोडल्यापासून मला वाचनाला फुरसत मिळाली नाहीं आणि त्यामुळें सद्यःस्थितीचें माझें ज्ञान माझी जी मित्रमंडळी भेटते त्यांच्यापेक्षां कमी आहे असें मला दिसून येतें तरी माझी वाचनाची हौस यत्किंचितही कमी झालेली नाहीं हें पाहून मला संतोष वाटतो. कांहीं काल अध्ययनांत घालवावयास सांपडेल असें दिसलें ह्मणजे मला अजून देखील स्फुरण येतें, आणि ज्ञानप्राप्तीच्या उत्साहवर्धक मार्गाला लागलेली तरुण मंडळी, मुख्यत्वेंकरून एडिंबरो मधली पाहून पोटांत सलतें.

एडिंबरो येथें असतांना एल्फिन्स्टन साहेबाची पुष्कळ मंडळींशीं ओळख झाली आणि त्यांच्या सहवासांत आनंदानें दिवस गेले. सर वाल्टर स्काट, प्रसिद्ध कादंबरीकार व कवि, याची ओळख होऊन अनेक भेटी झाल्या. त्याविषयीं त्याणें बरेंच लिहिलें आहे.

याप्रमाणें तीन चार महिने स्काटलंडांत घालवून फेब्रुआरींत एल्फिन्स्टन साहेब लंडनांत परत आला. आतां येथेंच रहावयाचें असा त्याचा विचार ठरलेला होता. लंडन अफाटशहर, तेथें हजारों लोक नित्य नवे दिसतात, एडिंबरो त्याच्यापुढें कांहींच नव्हे वगैरे लिहून तो ह्मणतो—आतां हेंच माझें घर समजावयाचें, परंतु येथें माझ्या जिवाळ्याची मंडळी कितीशी आहे? अगदीं थोडी. आणि त्यांच्या भेटी तर कितीशा होतात? थोड्याच. कारण लंडन शहरची वस्ती ह्मटलें ह्मणजे असेंच व्हावयाचें. जो तो आपआपल्या उद्योगांत. एडिंबरोमध्यें असें नाहीं. तेथें एकच मंडळी. तेच तेच लोक वारंवार भेटतात पुष्कळांची ओळख होते. येथें आपण आणि आपले मित्र हे अपार समुद्रांतल्या पाण्याच्या थेंबा प्रमाणें असावयाचे; केव्हां भेटतील तेव्हां भेटतील आणि पुनः प्रचंड ओघांत सांपडून कोणीकडे जातील तिकडे जातील. एकमेकांचा पत्ताही लागावयाचा नाहीं.

लंडनांत कांहीं आठवडे गेल्यावर हौस ऑफ लॉर्डस पुढें **एल्फिन्स्टन** साहेबाची साक्ष होण्याचें ठरलें तेव्हां तो ती देण्याची तयारी करूं लागला. ती देण्याला आपल्याला अवघड जाईल असें त्याला वाटलें होतें परंतु तसें कांहीं झालें नाहीं. हिंदुस्थानच्या राज्यकारभारांतल्या बहुतेक मुख्य मुख्य गोष्टींविषयीं त्याला प्रश्न झाले परंतु ते सारे वरवरचे होते; उत्तर देण्याला विचार पडावा असा एकही नव्हता. दिवाणी कायद्याची फार-जरूर आहे असें त्याणें सांगितलें आणि त्याचीं कारणेंही सांगितलीं. अनेक प्रकारचे सुमार चारशें प्रश्न करून त्यांचीं उत्तरें घेऊन लार्डांनीं त्याला निरोप दिला.

तारीख ११ मे रोजीं **एल्फिन्स्टन** साहेब सर जे शेली साहेबाकडे मेजवानीस गेला तेव्हां ड्यूक आफ वेलिंगटन याची भेट झाली तो प्रथम त्याच्याजवळ हिंदुस्थानासंबंधीं व बंगाल्यांतील सैन्यासंबंधीं गोष्टी बोलला. मग भोजनाला बसल्यावर हिंदुस्थानांतील मागल्या मोहिमांच्या गोष्टी त्याणें काढल्या, तेव्हां त्यांतल्या प्रत्येक मनुष्याचें आणि प्रत्येक विशेष गोष्टीचें

त्याला कसें स्मरण होतें तें पाहून **एल्फिन्स्टन** साहेबाला मोठें आश्चर्य वाटलें. तो ह्मणाला मी एकदा माणकेश्वर येथें लुटारू लोकांची एक टोळी होती तिला अकस्मात् जाऊन गांठावें ह्मणून जो निघालों तो ७२ मैल सपाट्यानें गेलों. त्यावर त्याला एकानें विचारलें अशा मोठाल्या मजला तुह्मी येथें करता का? तेव्हां तो ह्मणाला 'कधीं नाहीं.' परंतु त्या कामांत त्याणें फ्रेंचांची तारीफ केली. तो ह्मणाला दुप्पट मजल—( double march ) मारण्यांत ते पटाईत, रोज ३० मैल—एकदा १५ मग जरा विसावा घेऊन पुनः १५ असे दहा दहा बारा बारा दिवस सारखे जातात. आमच्या शिपायांपेक्षां त्यांच्या शिपायांजवळ ओझें ही अधिक असतें. ते आठ दिवस पुरेशी भाकरी बरोबर घेतात; आणि आमचे सारी तीन दिवसांपुरती घेतात, जास्ती कधीं घेत नाहींत. **एल्फिन्स्टन** साहेब ह्मणतो 'त्याची चालरीत इतकी अगदीं साधी आणि तो मनाचा इतका मोकळा आहे कीं त्याच्याजवळ बोलावें कसें अशी कोणाच्या मनाला भीति किंवा संकोच वाटत नाहीं, सारे एकसारखे मोकळेपणानेंच त्याच्याशीं बोलतातसें दिसतें. कोणाही थोर मनुष्याशीं लोक इतके अघळपघळपणानें बोललेले मी कधीं पाहिले नाहींत. तो तर मुख्य प्रधान आहे, एवढेंच नव्हे, बोनापार्टीचा पराभव करून ज्याणें राष्ट्राचें संरक्षण केलें तो तो आहे. विशेष एवढेंच दिसलें कीं तरुण लोक त्याला 'सर' (महाराज) ह्मणतात. तें कानाला जरासें बादशाही भाषेसारखें लागतें.

चौथा जार्ज राजा तारीख २६ जून रोजीं वारला आणि चौथा उइलियम गादीवर बसला. त्याणें तारीख २२ जुलै रोजीं सुतकांतच लीव्हीं भरून लोकांच्या भेटी घेतल्या. त्या समारंभास **एल्फिन्स्टन** साहेब गेला होता. दोन्ही बाजूस एडिकां आणि मोठमोठे अम्मलदार यांच्या दोन रांगा होत्या आणि त्यांच्यामध्यें राजा उभा होता. तो दिसण्यांत त्यांच्यापेक्षां कांहीं निराळा, हा राजा असें चटकर ओळखतां येण्यासारखा नव्हता. एल्फिन्स्टन ह्मणतो—मी त्याला तेव्हांच ओळखिलें, परंतु त्याच्या तसबिरी पाहिल्या होत्या ह्मणून ओळखतां आलें; त्या पाहिलेल्या नसत्या तर ओळखतां

येतें कीं नाहीं याची शंकाच वाटते. त्याच्या हाताचें चुंबन घेतांना लोक गुडघा वांकवीत, परंतु थोडाच, असें पाहून मीही तसेंच केलें, नाहीं वांकविला झटलें तरी चालेल. भेट करण्याला जो लॉर्ड Lord (सरदार) उभा होता त्याला माझें नांव वाचण्याला जरा पंचाईत पडली (लागेना) पण त्याणें जेव्हां वाचलें तेव्हां राजे साहेब मोठ्यानें झणाले 'हां, ज्या पुरुषाला भेटण्याची मला फार इच्छा आहे, तोच हा. खरोखर--तुमच्याशीं मला खासगींत थोडेसें बोललें पाहिजे; तुमची वारंवार भेट होईल अशी मी आशा करतों.' दर दर भाषणाला मी मान वांकविली आणि शेवटीं निघून गेलों.

त्याच महिन्यांत पार्लमेंट बरखास्त झालें आणि पुढच्या महिन्यांत नवी निवडणूक झाली तेव्हां एल्फिन्स्टन साहेब मत देण्याकरितां स्काटलंडांत गेला. आगस्टच्या २२ व्या तारखेस निवडणूक झाली. आपला जय व्हावा झणून उभय पक्षांची मंडळी मोठ्या इर्षेनें झटत होती; एकाला जय, एकाला अपजय, हें केव्हांही ठरलेलेंच आहे; त्याप्रमाणें झालें, काम संपलें. नंतर जय पावलेल्या पक्षानें आपल्या तर्फेनें निवडलेल्या गृहस्थाबरोबर चार मंडळी देऊन त्यांनां प्रतिपक्षाकडे पाठविलें. त्यांणीं आदरपूर्वक भेट घेतल्यावर आलेल्या मंडळीनें सांगितलें तुमच्या तर्फेच्या उमेदवाराच्या नांवानें आह्मी आतां नुकतेंच मद्यपान केलें. तुमचा आमचा, दोन्ही पक्षांच्या मंडळीचा खासगी स्नेह आहे, त्यांत राजकीय विषयासंबंधानें जो मतभेद आहे त्यामुळें अंतर पडूं नये अशी आमची इच्छा आहे. प्रतिपक्षाकडील मंडळीनें आपलीही तशीच इच्छा आहे. असें झणून लॉर्ड ग्राह्यामच्या नांवानें जयघोष करून मनःपूर्वक मद्यपान केलं स्काटलंडांत निवडणुकीच्या वेळीं नेहमीं असेंच करण्याची चाल आहे. त्याप्रमाणें झाल्यावर पराजित उमेद्वारानें उत्तम भाषण केलें.

सुधारणा व्हावी झणणाऱ्या मंडळींतला एल्फिन्स्टन असल्यानें त्यानें आपलें मत त्याच पक्षाला दिलें. परंतु तो पक्ष हरल्यानें त्याला त्यांतली जी जी मंडळी भेटे त्या साऱ्यांचें झणणें अगदीं एक-साच निवडणुकीची सन्हा अप्रयोजक आणि लाजिरवाणी आहे असें—होतें असें त्याला दिसलें

तारीख १० एप्रिलच्या रात्रीं लंडनांत एल्फिन्स्टन साहेबाला * डायलेटंटी मंडळीमध्यें घेण्याचा समारंभ झाला. त्याचें त्यानें वर्णन केलें आहे. तें असें—काल रात्रीं डायलेटंटीमध्यें "जुने विधि आणि योग्य समारंभ" पूर्वक माझा प्रवेश झाला. आह्मी सोळा असामी भोजनास बसलों. भोजन आटोपल्यावर अध्यक्ष मिस्टर उइलकिन्स मोठयानें ओरडून ह्मणाले "परक्यांनीं बाहेर जावें" तेव्हां लॉर्ड क्यालेडॉन आणि मी (नवे सभासद) दुसऱ्या खोलींत गेलों. तींत एक टेबल मांडलेलें होतें आणि त्यावर आमच्याकरितां वाईन मद्य ठेवलेलें होतें. बराच वेळ गेल्यावर लॉर्ड क्यालेडॉन साहेबांस याचारण झालें; पुढें कांहीं वेळानें मला झालें. लॉर्ड डडली आणि सर जी. स्टांटन मला बोलवावयास आले आणि मी त्यांच्यावर टेंकत टेंकत गेलों, आमच्यापुढें कर्नल लीकी दोन मेणबत्या घेऊन चालले. दरवाज्याजवळ मिस्टर मारिट साहेब आह्मांला भेटले. त्यांणीं तांबडा झगा आंगांत घातला होता. डोक्याला इराणी तऱ्हेची टोपी घातली होती आणि हातांत नंगी तलवार घेतली होती. ते टेबलाच्या तळापर्यंत आमच्यापुढें चालले, अध्यक्षांनां मोठ्यानें कायसें बोलले आणि तलवार परजित त्यांच्यापुढें अकस्मात उडी मारून जाऊन मग चालते झाले. अध्यक्ष साहेब झगा घालून उंच सिंहासनावर बसले होते. त्यांचे चिटणीस ह्यामिल्टन साहेब काळा झगा आणि पट्टा घालून त्यांच्या डाव्या बाजूस होते, ते ओरडून ह्मणाले 'नमा' आह्मी तिघांनींही नमन केलें, तेव्हां सारी मंडळी मोठ्यानें ह्मणाली "आणखी वांका, आणखी वांका." त्याप्रमाणें आह्मी वांकलों. याप्रमाणें तीनदां झालें मग आणखी कांहीं विधि होऊन मला अध्यक्षांजवळ घेऊन गेले आणि त्यांच्याशीं करपीडन [shake hand) झालें. मग माझ्या नांवानें

---

* ललित कला ज्याला प्रिय आहेत, किंवा त्यांचें ज्याला आश्चर्य, कौतुक वाटतें असा मनुष्य विशेषतः एकाद्या कलेंत प्रवीण होऊन तो धंदा करावा ह्मणून नव्हे, परंतु मौजेखातर किंवा हौसेनें जो व्यासंग करतो तो.

घोषपूर्वक मद्यपान झालें आणि समारंभ आटोपला. पुढें बराच वेळ मंडळी अनेक विषयांवर एकमेकांशीं बोलत बसून साडे अकरा वाजतां निघून गेली.

पार्लमेंट बरखास्त झालें असल्यानें पुनः निवडणूक व्हावयाची होती ह्मणून यावेळीं जिकडे तिकडे ती गडबड चालू होती. **एल्फिन्स्टन** साहेबाला मत देण्याकरितां स्काटलंडांत जावयाचें होतें ह्मणून त्या तयारीस तो लागला होता. तारीख २६ एप्रिलच्या रोजनिशींत त्यानें असें लिहिलें आहे—

मी आपलीं पुस्तकें बांधून ठेवणें, कागदपत्र लावणें, वगैरे कामांत गुंतलों आहें, आणि मला असें वाटतें कीं पूर्वापेक्षां जास्त स्वतंत्र असणें शक्य असल्यास मी यावेळीं तसा आहे. येथें असतांना देखील मला कशाची काळजी नव्हती आणि जेणेंकरून मला क्षणभर तरी संतोष होईल अशी राजाला किंवा त्याच्या प्रधानांनां करतां आली असती अशी खरोखर एकही गोष्ट नव्हती. परंतु आतां देखील हें स्थळ आणि येथची ही मंडळी यांचा माझा कांहीं संबंध नाहीं. येथून बारा महिने मी जगाचा रहिवासी होणार आणि पुनः येथें आलों ह्मणजे सारें नवेंच होणार.

तारीख ६ मे रोजीं **एल्फिन्स्टन** स्कॉटलंडास जाण्यास निघाला तो वाटेनें मित्रमंडळीकडे पाहुणचार घेत घेत तेथची शोभा पहात पहात गेला. एकदोन ठिकाणीं निवडणुकीचा समारंभ होता तोही त्यानें पाहिला. ह्यामिल्टन येथील समारंभाबद्दल त्यानें असें लिहिलें आहे—येथें निवडणुकीकरितां एका कुरणांत जागा तयार केलेली असून तेथें मिस्टर म्याक्सवेल आणि दुसरे कांहीं असामी बोलले. त्यांच्या भाषणाचा विषय राजाला द्यावयाचें मानपत्र (address) हा होता. श्रोतृसमाज सुमार १०००० होता. आतां ह्मटलें तर लोकांनां चेतवावयाचें नाहीं, शांत करावयाचें, हा उद्देश असावयास पाहिजे. ह्मणून चाललेला सारा प्रकार मला अप्रशस्त वाटला. ज्या लोकांनां

franchise * फ्रांचाईस मिळण्याचा संभव नाहीं त्यांनां तो मिळण्याचा तुमचा निःसंशय हक्क आहे असें सांगत बसणें ह्मणजे मूर्खपणाच्याही पलीकडचें आहे.

जेव्हां लोक जावयास निघाले तेव्हां बाथवेल ब्रिजच्या लढाईंत जें निशाण होतें तेंच किलब्राइड गांवचें पांढरें जुनें निशाण त्याच्यापुढें फडकत असलेलें पाहून मला फार आश्चर्य वाटलें. त्यावर For God the king and the covenant ह्मणजे ईश्वर राजा आणि + करारनामा यां करितां असें लिहिलें होतें.

तारीख १३ मे रोजीं लानार्क येथील निवडणूक झाली. निवडणुकीच्या जागीं लोक निशाणें फडकावीत समारंभानें गेले. गर्दी फार झाली होती. तेथचे लोक इंग्रज लोकांसारखे व्यवस्थित नव्हते आरडा ओरड करून कामाला हरकत आणीत होते. टोरी पक्षाचा उमेद्वार कर्नल डगलस याला कोणीसा एक कांचेसारख्या पदार्थाचा तुकडा मारला तो कानामागें लागला. इजा ह्मणण्यासारखी झाली नाहीं. डगलस साहेब अगदीं रागावला नाहीं, आपलें काम अगदीं हसत खेळत करीत राहिला त्याच्यावर असा नामर्दपणें प्रहार झाला असून कोणालाही कांहीं राग आला नाहीं हें पाहून एल्फिन्स्टन साहेबाला मोठेंच आश्चर्य वाटलें. तो थक्क होऊन गेला. तेथें जमलेल्या गृहस्थमंडळींत थोरपणा नाहीं, शहाणपणा नाहीं, मनाचे हलके आहेत, असें

---

* पार्लमेंटांत प्रतिनिधि नेमून पाठविण्याचा हक्क.

+ सन १६३८ मध्यें आणि १६४३ मध्यें स्काटलंडच्या पार्लमेंटानें केलेला करार. स्काटलंडांत सुधारलेला धर्म चालवूं. पोपाचा अधिकार चालूं देणार नाहीं असे करार यांत आहेत.

पाहून त्याला बरें वाटलें नाहीं. आतां आपलें येथें कांहीं काम नाहीं असें वाटतांच तो तेथून निघाला वाटेनें त्याला जे लोक भेटत ते सारे निवडणुकीचा निकाल काय झाला ह्मणून विचारीत. तो ह्मणतो सुधारणा reform व्हावी अशी जी लोकांची इच्छा झाली आहे ती इतकी प्रबळ आहे कीं तिचें वर्णन करतां येत नाहीं.

# भाग ८ वा.

**एल्फिन्स्टन** साहेबाला लंडनांत येऊन राहिल्याला दोन वर्षे झालीं; तो काल सुखांत गेला, तशींच आणखी कांहीं वर्षे गेलीं. आतां कोठें तरी कायमचें रहावयाचें असें त्याच्या मनांत होतें, परंतु ती कांहीं त्याला घाई नव्हती. एडिंबरोंत रहावें कीं लंडनांत रहावें हाच कांहीं दिवस विचार चालला होता. स्काटलंडांत जाण्यापूर्वी त्याणें सारी बांधाबांध केली होती आणि आतां फिरावयास जावयाचें असा बेत केला होता हें मागें सांगितलेंच आहे. त्याप्रमाणें तिकडून परत आल्यावर लौकरच तो युरोपांत गेला. ज्याणें आपल्या बुद्धिवैभवानें साऱ्या जगास दिपवून सोडलें आणि आपल्या अतुल पराक्रमानें साऱ्या युरोपखंडास कांहीं वर्षेपर्यंत थर थर कांपावयास लावलें होतें त्या नेपोलियन बोनापार्टाच्या पराभवाचें स्थान जें वाटर्लूचें रणांगण तें पहाण्याकरितां तो १८३१ च्या जून महिन्यांत बेलजम देशांत गेला. तारीख ९ जून रोजीं तेथें जाऊन तें त्याणें पुष्कळ हिंडून पाहिलें, तेथच्या तुमुल युद्धाचा वृत्तांत अनेकांनीं लिहिलेला त्याणें वाचला होता तरी त्याला कांहीं शंका राहिल्या होत्या, त्यांचें निरसन त्या स्थळांचें प्रत्यक्ष दर्शन घेऊन त्याणें करून घेतलें. त्याविषयीं त्याणें पुष्कळ लिहिलें आहे.

तेथून तो फिरत फिरत इटली देशांत गेला. वाटेनें जातां जातां राव्हेना येथील पाईन वृक्षांचें भव्य वन त्याणें पाहिलें; बोलोग्ना येथें तीन दिवस तसबिरी पाहिल्या; त्या ठेवलेल्या गृहांतच वास केला होता. तारीख

१६ सप्टेंबर रोजीं मेझोफंटी नामक एका थोर पुरुषाची त्याणें भेट घेतली. तिची हकीगत त्याणें अशी लिहिली आहे.

तसबीर गृहांतून युनिव्हर्सिटीच्या पुस्तकालयांत गेलों तेथें एका फार थोर गृहस्थाची भेट झाली. त्याची कीर्ति मी फार ऐकिली होती. ह्या प्रख्यात पुरुषाचें नांव अबेट अथवा प्रोफेसर मेझोफंटी तो इंग्रजी फार चांगलें बोलला, आणि मला फारसी येतें असें समजलें तेव्हां फारसींत बोलूं लागला. बराच वेळ तींत बोलला. बायबलाचें फारसी भाषांतर केलेलें काढून त्यांतून त्याणें बरेंच वाचून दाखविलें. ह्मटलें तर तो बोलोन शहर सोडून केव्हां बाहेर गेलेला नाहीं; तेव्हां फारसींत बोलण्याची त्याला सवय असण्याचें नांव नकोच, उच्चार शिकण्याची संधी मिळण्याची मारामार. असें असून त्याचे उच्चार असावे तसे चांगले नव्हते, पण अगदीं समजण्यासारखे होते आणि जीं लेखांत कधीं येत नाहींत अशीं पुष्कळ सांप्रदायिक वाक्यें (idioms) त्याच्या तोंडांत होतीं. जोन्सकृत व्याकरणावरून दोन महिन्यांत तो फारसी शिकला. 'आपल्याला किती भाषा बोलतां येतात' असें मी विचारलें तेव्हां तो ह्मणाला 'ह्याला चाळीस भाषा बोलतां येतात' असें लोक ह्मणतात. ह्या उत्तरावरून मी असें समजतों कीं इतक्या आपल्याला बोलतां येतात असें ह्मणण्यासारखें आपल्याला त्यांचें पूर्ण ज्ञान नाहीं असें त्याला वाटत असावें. त्यांचें वय पंचेचाळीस वर्षांचें आणि भाषांशिवाय इतर विषयांची ही त्याला चांगली माहिती आहे असें दिसलें.

सरकारची नोकरी करवेल तितके दिवस, किंवा सरकार पुरे ह्मणेल तेथपर्यंत करून तींतून एकदा मोकळें झालें ह्मणजे इतिकर्तव्यता झाली, त्यांतून सरकारानें कृपा करून उदरनिर्वाह सुखानें चालावा असें पेनशन दिलें असलें ह्मणजे मग तर कशाचीच काळजी नाहीं; आतां सोईचेंसें स्थळ पाहून तेथें राहून शेष राहिलेलें आयुष्य वाटेल त्या तऱ्हेनें आनंदांत घालवावयाचें; उमेदीचे दिवस गेले, उतार वय लागलें, आतां कोणती ही दगदग करावयाची

नाहीं, कसल्याही पंचाइतींत पडावयाचें नाहीं; असें मनुष्यास वाटलें तर हा त्याचा दोष आहे असें कांहीं कोणी ह्मणत नाहीं. त्याप्रमाणें एल्फिन्स्टन साहेबानें इराणची वकिली नको, कांहीं झालें तरी एशियांत पुनः जावयाचें नाहीं असें ह्मटलें ह्मणून त्याला कोणी नांव ठेविलें नाहीं. दोन वर्षें स्वदेशांत स्वच्छेनें काढून आतां वर्षभर पर्यटन करावयाचें असा निश्चय करून बाहेर पडतेवेळीं त्याणें जे उद्गार काढले त्यावरून त्याच्या मनाची स्थिति कशी झाली असावी तें दिसून येतें. सृष्टीची शोभा, इतिहासप्रसिद्ध प्राचीन स्थळें वगैरे पहाण्याची त्याला फार आवड होती ह्मणून तो इटली देशांत पांचपांच वर्षांच्या अंतरानें तीनदा गेला. परंतु आपलें मन रमविलें ह्मणजे झालें, आतां देहाचें सार्थक काय तें हेंच असेंच केवळ त्याला वाटत नव्हतें. जनांच्या उपयोगीं पडण्यासारखें कांहीं तरी करीत असलें पाहिजे, तेव्हां असा कांहीं तरी उद्योग काढावा असें त्याच्या मनांत घोळत होतें असें त्याच्या तेव्हांच्याच लेखांवरून दिसतें. जो विचार करतां करतां कांहीं वर्षांनी निश्चय करून उद्योगास आरंभ झाला आणि त्याचें फळ 'हिंदुस्थानचा इतिहास' ह्मारूपानें बाहेर पडलें, त्याचा उल्लेख ह्या इटलींतील पहिल्या पर्यटनांत रोम शहरीं असतांच्या रोजनिशींत केलेला आहे तो असा—

तारीख ४ जानेवारी १८३१—मी अगदीं निरुपयोगी आहें असा शब्द न लागण्याला काय करावें, कोणता उद्योग आपल्या हातून होण्यासारखा आहे, हा विचार मी सकाळीं फिरावयास गेलेवेळीं पुनः माझ्या मनांत आला आपल्या हातून कोणती गोष्ट होईल हा विचार करतां करतां फक्त एक, कांहीं तरी लिहिणें होईल असें मला पूर्वींच वाटलें, आणि तें चांगलें साधण्याची जर कांहीं आशा असेल तर त्या कामाला हात घालण्याला मला संतोष वाटेल. परंतु मला इतर विषयांची नीटशी माहिती नसल्यानें फक्त हिंदुस्थानाविषयीं लिहावयाचें. तो विषय लोकांनीं आधींच उचललेला आहे आणि तो केव्हांही मनोरंजक वाटणारा नाहीं. तथापि लोकांना आवडेल असें कांहीं तरी मला लिहितां येईल असें जर वाटेल तर कितीएक थोर पुरुषां विषयीं मलाच

विपरीत, लिहिलेलें आहे, किंवा त्यांच्या विषयीं लोकांचे समज चुकीचे आहेत त्याचा निरास करतां येईल ह्या आशेनें हिंदुस्थानच्या इतिहासाचा कांहीं भाग लिहिण्याचा यत्न करावा असें माझ्या मनांत येईल. परंतु माझें पुस्तक जर चांगलें झालें नाहीं—आणि बहुतांशीं असेंच घडणार – तर हाल्लीं मी रिकामपणें आनंदांत काळ घालवीत आहे तें सोडून, ज्यापासून नफा नाहीं अशा दुःखदायक कामांत फुकट पडलों म्हणून मला वाईट वाटेल.'

परदेशीं फिरत असतांना त्याला आपला मित्र स्ट्राची साहेब वारल्याचें वर्तमान समजलें, तेव्हां त्याणें असें लिहिलें —

तारीख २७ जानेवारी रोजीं स्ट्राची साहेबाच्या मरणाची दुःखकारक वार्ता मला समजली. प्रारंभीं त्याचा उपदेश आणि कित्ता यांनींच माझें पुष्कळ हित झालें आणि पुढेंही पुष्कळ काळपर्यंत त्याच्या सतत स्नेहाचा लाभ घडेल या आशेवर मी होतों '

लंडनशहरीं परत आल्यावर एल्फिन्स्टन साहेबाला वाटलें कीं आतां हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थे संबंधानें चौकशी करण्याकरितां हौस ऑफ कामन्सची जी कमिटी नेमलेली आहे तिच्यापुढ आपल्याला साक्ष देण्याला जावें लागल. परतु तसें कांहीं झालें नाहीं. बोर्ड ऑफ कंट्रोलचे सेक्रेटरीनें ईस्टइंडिया कंपनीची प्रसिद्ध प्रसिद्ध नोकर मंडळी पाहून त्यांच्याकडे प्रश्न लिहूनच पाठवून दिले आणि त्यांचीं उत्तरें मागितलीं. एल्फिन्स्टन साहेबाला जे प्रश्न झाले त्यांत विशेषतः ब्रिटिश सरकारचा हिंदुस्थानच्या राजेरजवाड्यांशीं जो संबंध होता त्याविषयींच अधिक विचारलें होतें. त्याणें त्यांचीं उत्तरें दिलीं, परंतु त्याच्या मनाचें समाधान कांहीं झालें नाहीं. त्याबद्दल त्याच्या रोजनाम्यांत असें लिहिलेलें आहे—

तारीख १९ आगस्ट—हिंदुस्थानसंबंधी कामाकडे मला पुनः वळावें लागलें तेव्हां माझ्या मनाला कसें वाटलें तें सांगावयाचें विसरलों. पहिल्यानें

मला त्या विषयांत पूर्ववत आनंद होत आहे असें वाटलें आणि मी हौसेनें कामास लागलों. पुढें भावी गोष्टींबद्दल विचार करण्यांत आणि सुधारणेचे बेत करण्यांत मी इतर मंडळींपेक्षां फार कमी आहें असें वाटून हताश झालों आणि लोकांप्रमाणें चांगल्या चांगल्या बेतांच्या गोष्टी सांगण्याचें सोडून मी आपला नेहेमी हरकती सांगत बसतों याबद्दल मला वाईट वाटलं. माझें काम हीं फार सावकाश होऊं लागलें आणि जेवढें लिहून झालें होतें तें जेव्हां पुन: वाचून पाहूं लागलों तेव्हां त्यापासून मला कांहीं संतोष झाला नाहीं आणि लोकांनां तर खचित माझ्या इतकाही होणार नाहीं असें वाटलें. मला आपलीं मागचीं पत्रें—मुख्यत्वें करून मराठ्यांबराबरच्या युद्धाच्या वेळचीं—पहावीं लागलीं. तीं वाचलीं तेव्हां त्यांतलें तें जोराचें आणि खात्रीपूर्वक निक्षून लिहिणें कोणीकडे आणि आतांचें हें कोणीकडे, त्याला ह्याला फार अंतर पाहून आश्चर्य वाटलें. यांत खरें असें आहे कीं तेव्हां मला काय तो चटकर निकाल करावा लागत असे, त्या निकालापासून लागलाच परिणाम घडत असे; आणि तो परिणाम ज्या लोकांमध्यें मी रहात होतों त्यांच्या संबंधाच्या महत्वाच्या गोष्टींचा असे. ह्मणून तसे होतें. आतां येथें कांहीं तसें नाहीं. येथें जर मी बरोबर (right) सांगितलें तर त्यापासून फळ कांहीं व्हावयाचें नाहीं ह्मणून चूक (wrong) गैर न सांगण्याविषयीं मुख्यत्वें करून जपत आहे. या कामांत आनंद किंवा मौज वाटण्यासारखें कांहीं नाहीं, आणि याचा परिणाम असा होत आहे कीं आपण आपलें एकांतांत स्वस्थ असावें असें मला पूर्वीपेक्षां अधिकच वाटूं लागलें आहे.

एल्फिन्स्टन साहेबानें स्वत:विषयीं या प्रमाणें निराशेचे उद्गार काढले खरे, परंतु व्हिलीअर साहेबाच्या प्रश्नांनां त्याचीं जीं उत्तरें गेलीं तीं पाहिलीं ह्मणजे त्याचा तो लेख फार मनोरंजक असून फार चरचरीत आहे असें दिसून येतें. त्याला जे प्रश्न झाले ते साधारणत: अशा स्वरूपाचे होते. हिंदुस्थानांतील राजे रजवाड्यांचा राज्यकारभारांत आह्मी कोणत्या प्रकारें आणि कितीसा हात घालतों? आमच्याशीं त्यांचा संबंध जडल्यानें त्याचा

परिणाम काय झाला आहे? त्यांच्याशीं आमचें जें वर्तन आहे तें न्यायाच्या मूलतत्वांना कितीसें धरून आहे? ह्या मुख्य प्रश्नांचे पोट विभाग करून त्यांत मग आणखी फोड करून विचारलें होतें; आणि शेवटीं हाल्लीं जी राज्यपद्धति चालू आहे ती तुह्माला कशी वाटते, तींत येथें (विलायतेंत) किंवा हिंदुस्थानांत काय काय फेरफार केले पाहिजेत असें तुह्माला वाटतें तें ही सांगा असें ह्मटलें होतें.

**एल्फिन्स्टन** साहेबानें त्या प्रश्नांना तपशीलवार उत्तरें दिलीं. **मराठ्यांबरोबरचें** युद्ध संपल्यानंतर हिंदुस्थानची स्थिति कशी झाली तिचें थोडक्यांत पर्यालोचन करून पुढें जे राजेरजवाडे इंग्रज सरकारचे मांडलिक झाले त्यांच्याशीं वागतांना जे मोठे भानगडीचे प्रश्न उद्भवतात आणि ज्यांचा निकाल लावण्याचें इंग्रज मुत्सद्यांना मोठें जड जातें त्यांचा सविस्तर ऊहापोह केलेला आहे. त्या प्रश्नांचें महत्व केव्हां ही कमी होणारें नव्हे; ह्मणून त्याच्या त्या महत्वाच्या लेखांतून कांहीं उतारे पुढें देतों; ते लांबलचक ह्मणून वाचण्याला कंटाळा करूं नये.

'आमच्या संरक्षणाखालीं असणाऱ्या राज्यांच्या कारभारांत आमची जी ढवळाढवळ (interference) आहे तिचें स्वरूप आणि प्रमाण हीं दोन्ही पुष्कळ भिन्न भिन्न आहेत. त्यांना मदत करण्याबद्दलचे जे आमचे तहनामे आहेत त्यांतल्या बहुतेकांत असा एक करार आहे कीं तेथच्या राजाच्या अंतस्थ गोष्टींत (internal affairs) आह्मी हात घालावयाचा नाहीं. परंतु आह्मी असा हात घालूं नये ह्मणून उभयपक्षीं अगदीं जपून वागत असतांही कितीएक ठिकाणीं आमचा हात शिरला आहे; आणि बाकीच्या ठिकाणीं तहनाम्यांत तें कलम असून फुकट, अगदीं नसल्यासारखें आहे.

'असें होण्याचें कारण देशी (native) राज्यांची दुर्बलता आणि अपकीर्ति. आपले सरदार किंवा दुसऱ्या प्रजा हुकूम मानीनाशा झाल्यानें

त्यांना नरम आणण्याकरितां त्या राजांना वारंवार आमची मदत मागावी लागते. (त्या उभयतांच्या दरम्यान झालेल्या करारांस आह्मांस मध्यस्थ आणि जामीन व्हावेंच लागलें ह्मणून) आणि पैशासंबंधीं व्यवस्था किंवा दुसरे कांहीं ठराव करतांना ज्यांच्या बरोबर ते करावयाचे त्यांना त्यांचा विश्वास धरवत नसल्यानें आह्माला जामीन होण्याविषयीं त्यांना आमची विनवणी करणें भाग पडतें.'

'कांहीं ठिकाणीं असें झालें आहे कीं तेथचा राजा आमचे संरक्षणाखालीं असल्यानें त्याणें आपल्या राज्यकारभारांतलीं कांहीं खातीं आमच्या सरकारच्या प्रतिनिधीच्या ताब्यांत दिलीं; आणि कांहीं राजांनीं आपल्या साऱ्या राज्यावरची देखरेख त्यांजकडे सोंपविली.'

'संरक्षित राजांच्या विनंतीवरून त्यांच्या राज्यकारभारांत हात घातल्याचीं हीं उदाहरणें झालीं, तशीं त्यांच्याशीं झालेल्या तहनाम्याच्या साधारण रोखावरून त्यांना न सांगतां असा हात घालण्याचा आपल्यास अधिकार आहे असें ब्रिटिश सरकार मानीत असल्याचीं ही उदाहरणें आहेत. त्याला कारण असें लावण्यांत येतें कीं त्यांची राज्य व्यवस्था नीट नसल्यानें आपल्या बरोबर झालेल्या तहास बाध यईल असें भय वाटतें, किंवा आपल्याला जड जातील असे दुर्धर प्रसंग येऊन पुढें आपल्यास त्यांत हात घालावाच लागेल अशी भीति उत्पन्न होते.'

या प्रमाणें लिहून पेशव्यांच्या आणि गायकवाडाच्या कारभारांत किती किती हात घालावा लागला तें उदाहरणार्थ सांगून तो पुढें ह्मणतो--

आपलें राज्य बुडण्याच्या पंथास लागून इतकी निकृष्ट अवस्था आली कीं आतां सर्व उपाय थकले, इंग्रजांचा आश्रय केल्यावाचून गत्यंतर नाहीं, तो केला तरच निभाव लागेल, असें दिसूं लागेपर्यंत कोणी ही राजा आमच्या

संरक्षणाखालीं येत नाहीं. हा अखेरचा उपाय झाला ह्मणजे त्याचा तात्कालिक परिणाम असा होतो कीं त्या राज्याला कांहीं काळपर्यंत बळ येऊन तें भरभराटीस येत असतें. पुढें संरक्षण करण्याच्या तह्णपासून दुष्परिणाम काय काय होतात तें पुष्कळ वेळ दाखविलेले आहेतच. आतां आपल्याला कशाची भीति उरली नाहीं, आपण सुरक्षित असण्याला स्वतः कांहीं एक मेहेनत केली पाहिजे, किंवा चांगल्या प्रकारें वागलें पाहिजे, असें कांहीं नाहीं. असें वाटूं लागलें ह्मणजे एकीकडे त्या राजाच्या आंगची हिम्मत नाहींशी होते आणि दुसरीकडे राज्यकारभार मनसोक्त करण्याची प्रवृत्ति वाढत जाते. आमचे हे तह्नामे सृष्टिक्रमानुसार सहज घडून येणाऱ्या गोष्टींच्या आड येतात असें ही ह्मणतात. तें असें--एकाद्या राज्याची स्थिति बिघडत बिघडत ती अमूक एका थराला पोहोचली ह्मणजे तें लय पावावयाचें आणि त्याच्या जागीं त्याच्याहून बरें, असें दुसरें स्थापन व्हावयाचें'

'हें ह्मणणें, मुख्यत्वें त्यांतल्या पहिल्या दोन गोष्टी अगदीं खऱ्या आहेत. परंतु त्यांचा जो परिणाम होतो त्याच्याविषयीं गवगवा फार फाजील होतो असें मला वाटतें'

'आमच्याशीं संबंध झाल्यानें आह्मी संरक्षण केलेल्या राजांच्या आंगची युद्ध करण्याची व राजकारस्थानें करण्याची हिम्मत कमी होत जाते हें अगदीं खरें आहे आह्माला त्यांची मदत हवी आहे ती तर ह्या दोन गोष्टींत; ती मिळेनाशी झाल्यानें त्यांचा कमीपणा तेव्हांच लक्षांत येतो आणि त्याच्याबद्दल आरडाओरड फार होते. परंतु या कामीं सुद्धां मला असें वाटतें कीं त्यांचा जो ऱ्हास होत आहे तो आमच्याशीं संबंध झाल्यानें असें समजणें ही चूक आहे. मोगल बादशाही बुडाल्यापासून हिंदुस्थानांत जितकीं राज्यें जन्मास आलीं तितक्यांची अवस्था पाहिली तर ती बहुतकरून अगदीं एकसारखी दिसून येते. ती अशी कीं प्रथम राज्यस्थापन करणाऱ्या पुरुषाच्या कारकीर्दीत त्यांत जें बल असतें तें त्याचें त्याच्याबरोबर जातें; आणि तीन पिढ्या झाल्या

ह्मणजे सर्वस्वीं विलयास गेलें नाहीं असें एकही नाहीं. अशीहि एशिया खंडांतील राज्यांची क्षणभंगुर स्थिति आमचें वारें खरोखर लागलें नाहीं अशा देशांत सुद्धां दिसून येते. निजामाबरोबर आमचा पहिला तहनामा झाला त्यावेळेस इराणच्या शहानें आपले सर्व शत्रु जिंकून टाकले होते आणि आतां हा आपल्याला जिंकतो असें त्याच्या बहुतेक शेजाऱ्यांनां भय पडलें होतें. पुढें काबूलचा अमीर बलाढय झाला तेव्हां आतां याच्यापुढें आमचें हिंदुस्थानांतलें राज्य कसें निभतें अशी आह्माला मोठी काळजी उत्पन्न झाली होती. परंतु आतां तीं दोनही राज्यें, विस्ताराच्या मानानें पहातां, साऱ्या जगांत अत्यंत दुर्बल आहेत ह्मटलें तरी चालेल. एशिया खंडांतलीं राज्यें निर्बल होऊन मोडलीं तरी तीं पुनः जोरावतात असें वाटत असतें, परंतु इराणचा इतिहास पाहिला ह्मणजे तो हा भ्रम दूर होतो. इराणांत पहिल्या सफीव्ही घराण्याच्या तीन पिढया होईपर्यंत त्या राज्याची अतिशय भरभराट होती. पुढें चौथ्या पिढीपासून जे शहा झाले त्यांच्या कारकीर्दींत सुमार शंभर वर्षें त्याला उतरती कळा लागली होती; तेथून पुढें सुमार आणखी शंभर वर्षें लोटलीं, त्या अवधींत आणखी एक दोन फार हुशार बलाढय राजे निपजले परंतु त्या देशाची स्थिति पाहिली तर ती कांहीं सुधारली नाहीं; ती अजून देखील अफगाणिस्थानावर स्वारी करण्याच्या वेळीं होती तिच्यापेक्षां बहुधा वाईट आहे. नव्या घराण्याची स्थापना होऊन राज्यांतली गेलेली शक्ति पुनः आली अशीं आश्चर्य वाटण्यासारखीं एक दोन उदाहरणें हिंदुस्थानांत घडून आलीं आहेत हें अगदीं खरें आहे; परंतु एकंदरींत पाहू गेलें तर बहुतेक राज्यांत असे दिसून येतें कीं जेथें ह्मणून राज्यक्रांति झाली तेथें तें राज्य फुटून त्याचे तुकडे झाले किंवा त्याच्या वांटण्या झाल्या किंवा त्यांत अगदीं अंदाधुंदी, झोटिंगबादशाही झाली. ह्मणून मला असें वाटतें कीं ज्या राज्यांचा आमच्याशीं संबंध होऊन त्यांची शक्ति नाहींशी झाली तीं इंग्रजांनीं हिंदुस्थानांत अगदीं पाउल टाकलें नसतें तरी तशींच बलहीन झालीं असतीं.'

'त्या राजांच्या राज्यांतील अंतर्व्यवस्था बिघडलेली असते असें ह्मणतात

परंतु मला असें ह्मटलें पाहिजे कीं माझा अनुभव याच्या अगदीं उलट आहे. पेशव्यांचा आणि आमचा तह झाला त्यापूर्वी एक वर्षभर मी त्यांच्या राज्यांत होतों आणि तह झाल्यावर पुढें नऊ वर्षांनीं मी पुनः गेलों. मध्यंतरीं त्या राज्यांत जिकडे तिकडे दुष्काळ पडला होता. तरी देखील त्याची स्थिति अतिशय आश्चर्य वाटण्यासारखी सुधारली होती.'

'मी ह्मणतों त्या गोष्टीला पुरावा पाहिजे तर अगदीं उत्तम आहे. तो तहनामा होण्यापूर्वी आणि झाल्यानंतर मग तेथच्या राहिवाशी लोकांची स्थिति कशी होती तें वर्णन जनरल पामर आणि सर बारीक्लोज या उभयतांनीं आपआपल्या रिपोर्टांत केलेलें आहे तें ताडून पहावें. जनरल पामर याच्या कांहीं रिपोर्टांत असें लिहिलेलें आहे कीं दरवडेखोरांच्या टोळ्यांचा त्या प्रांतीं उपद्रव होत होता आणि पुणें शहराच्या आसपासचीं शेतें कोणी करीत नसत; कारण तीं सरकारच्या टाण्याजवळ पडल्यानें त्यांनां उपद्रव पोहोचण्याची भीति असे आणि तो पोहोंचूं नये असा बंदोबस्त पेशवे सरकारच्या हातून कांहीं होत नव्हता तहनामा झाल्यानंतर पुढचे जे रिपोर्ट आहेत त्यांत इतर राजांच्या मुलखास जसा उपद्रव लागतो तसा पेशव्यांच्या राज्यास नाहीं असें लिहिलेलें आहे. पेशव्यांच्या शेजारच्या निजामाच्या मुलखाची स्थिति त्याचा आमच्याशीं तह झाल्यानंतर खरोखर वाईट झाली. परंतु ती तशी होण्याचें कारण मुसलमानी राज्यांत जे आंगचेच दुर्गुण असतात ते असावे असा मला संशय आहे. तशी त्यांत व्यंगें होतीं तरी त्याची स्थिति शिंदे होळकरांच्या मुलखांपेक्षां बरी आहे असें मला दिसलें; आणि एकंदरींत पाहिलें तर मला असें वाटतें कीं आमच्या संरक्षणाखालीं असलेल्या राजांचे जे मुलख माझ्या पहाण्यांत आले त्यांची स्थिति स्वतंत्र राजांच्या मुलखांपेक्षां चांगली होती. त्या सर्वांत गायकवाडाच्या मुलखाची उत्तम; तसा संपन्न दुसरा कोणताच मुलख माझ्या पहाण्यांत आला नाहीं.'

संरक्षित राजांच्या मुलखांची स्थिति इतरांपेक्षां चांगली असण्याचें मुख्य

कारण बहुधा असें आहे कीं त्यांवर बाहेरून कोणाचा हल्ला होण्याचें भय नाहीं. तसेंच राज्याची शाश्वती हें ही कारण आहे. ती आल्यानें राजा कांहीं गोष्टींत मनास येईल तसा वागतो, परंतु बाकच्यिांत पुष्कळ बेतानें वागतो आणि पुष्कळ प्रकारच्या अव्यवस्थेच्या गोष्टी बंद करतो.'

'आह्मी संरक्षण केलेल्या राजांचा आणि आमचा जो संबंध आहे त्याचा अखेर परिणाम बहुधा एकच व्हावयाचा; तो असा कीं जो अशक्त तो सशक्ताच्या घशांत उतरावयाचा उभयतांमध्ये तंटे हे आपले उपस्थित होणारच; तें कांहीं चुकावयाचें नाहीं; आणि बलिष्ट राजा कितीही बेतानें वागला तरी अखेर परिणाम असा व्हावयाचा कीं दर तंटयाच्या अखेरीस जो निर्बल तो थोडा थोडा अधिक पादाक्रांत होत जाऊन अखेर अगदीं पराधीन व्हावयाचा. उभयतांमध्यें असा तंटा न आला तरी देखील एशियाखंडांतील राज्यांचा ऱ्हास पावत जाणें हा स्वभावधर्मच आहे, त्यामुळें तीं फार दिवसांचीं झालीं, थकलीं भागलीं ह्मणजे आमच्या हातांत पडतात. असें स्थित्यंतर झाल्यानें तेथच्या प्रजेचें हित होतें कीं आहित होतें हा प्रश्न निराळा आहे, त्याचा विचार मी अन्यत्र करीन. मला येथें एवढेंच सांगावयाचें आहे कीं subsidiary treaty ह्मणजे राजांनी आमची फौज आपल्या चाकरीस ठेऊन घ्यावी असे तहनामे झाल्यानें त्यांणीं एक होऊन मोठाले कट करावे आणि भयंकर लढाया कराव्या हें बंद झालें त्यांणीं आह्माला हिंदुस्थानांतून घालविलें असतें तरी आमच्याशीं केलेल्या त्या तहामुळें जसा त्यांचा नाश झाला तसाच खचित त्या लढायांनीं झाला असता, आमच्याशीं ज्यांचे तहनामे झालेले आहेत तीं राज्यें हरतऱ्हेनें कायम राखावीं यांतच आमचें हित आहे आणि तसेंच हें आमचें कर्तव्य ही आहे असें मला वाटतें, तसेच जीं स्वतंत्र राज्यें आहेत तींही कायम राखण्यांत आमचें हित आहे. लढाई करण्याची कारस्थानें रचण्याची किंवा लूट करण्याची संवय असल्यानें ज्या लोकांना आमच्या राज्यांत स्वस्थपणें राहवत नाहीं त्या सर्वांना त्या मुलखांत आश्रय मिळतो आणि त्या राज्यांशी आमच्या राज्याची तुलना करून पहावयास सांपडल्याने आमच्या प्रजेच्या मनाचा चांगल्या

चांगल्या प्रकारचा ग्रह होतो. आमच्या अमलाखालीं आल्यानें आमच्या तऱ्हेमुळें जो त्रास खरोखर होत असतो तो त्यांनां जाणवतो परंतु ज्या मोठ्या त्रासापासून ते मुक्त झाले आहेत त्याचें त्यांनां स्मरण नाहींसें होतें. स्वतंत्र राजे असल्यानें आमच्या फौजेला केव्हां केव्हां काम पडतें, हाही एक नफाच आहे, यांत कांहीं नुकसान नाहीं.'

'पैशाच्या दृष्टीनें पाहिलें तर नवीन जिंकून घेतलेल्या मुलखाच्या वसुलानें आमचें उत्पन्न पुष्कळ वाढलें आहे यांत कांहीं संशय नाहीं. राज्याचा विस्तार अधिक झाल्यानें त्याच्या बरोबर लष्करी व मुलकी खर्चही वाढलेच पाहिजेत, मुख्यत्वेंकरून मुंबई इलाख्यांत असें झालें कीं हे दोनही खर्च वाढल्यानें आणि धान्याचे दर उतरल्यानें वसुली रकमेंत कायमची तूट येऊन नवीन घेतलेल्या मुलखापासून व्हावा तितका नफा झाला नाहीं, पुष्कळ कमी झाला हें एक, दुसरें असें कीं नवीन घेतलेल्या मुलखाशीं ज्यांचा संबंध नाहीं असे कांहीं कायमचे व कांहीं तूर्तातूर्त होणारे खर्च वाढल्यानें कांहीं काळपर्यंत मुंबई इलाख्यांत नवीन मुलुख सामील होण्यापूर्वी जितकी तूट होती तिच्या जवळ जवळ येऊं लागली.'

'आम्ही मुलुख जिंकल्यानें बाहेरच्या शत्रूची भीति पुष्कळ कमी झाली; परंतु आंतल्या शत्रूंची अधिक झाली. कारण आम्ही जिंकून घेतलेल्या मुलखांतली आमच्या　　याची तऱ्हा नवीन, त्यांतल्या पुष्कळ भागांची स्थिरस्थावरता नाहीं, आणि आम्ही जिंकल्यामुळें त्यांतल्या ज्या सरदारांचे अधिकार गेले व ज्या शिपायांचा रोजगारधंदा बुडाला ते सारे नाखुष होऊन बसलेले. तरीपण हें भय दिवसें दिवस कमी होत चाललें आहे आणि जोंपर्यंत आम्ही अफाट फौज ठेवलेली असेल तोंपर्यंत तें मोठें नाहीं. तें मनांत आणून आमच्या सैन्याची योजना ठिकठिकाणीं वांटणी करून ठेवलेली आहे ती शहाणपणाची आहे असें जें कांहीं माझ्या नजरेस आलेलें आहे त्यावरून मला वाटतें.'

'वर जो काल निर्दिष्ट केला आहे त्यांत न्यायाच्या मूलतत्वांकडे चांगलें लक्ष पुरविलेलें आहे असें मला वाटतें. इतक्या दीर्घ काळांत जे कायदे झाले त्यांतल्या कांहींची जरूर होती किंवा नाहीं याविषयीं कोणाकोणाचीं मतें भिन्न असणारच; परंतु एकंदरींत हिंदुस्थान सरकारची राज्य चालविण्याची तऱ्हा शहाणपणाची आहे असें मला वाटतें मला मुख्य संशय आहे तो अंतर्व्यवस्थेंत आह्मीं हात कितीसा घालावा याबद्दल. मला येवढें कबूल केलें पाहिजे कीं राजेरजवाड्यांच्या कारभारांत हात घालावयाचा नाहीं असा जो बेत आहे तो तूर्त बरा आहे तरीपण त्यापासून त्यांनांच फार मोठा धोका आहे; तो असा कीं त्यांनां अधिकार असल्यानें त्यांच्या हातून ज्या चुका होतात, त्या दुरुस्त होऊंच नयेत इतक्या पल्याला जाईपर्यंत आह्मी कांहीं तिकडे लक्ष देत नाहीं. राजकीय कामांतल्या पेशव्याच्या चुका आणि गायकवाडाला मुक्त्यार ह्मणून आमच्या ताब्यांतून मोकळा केल्यापासून त्याच्या राज्यकारभाराची अव्यवस्था हीं दोन मी ह्मणतों त्या गोष्टीच्या खरेपणा बद्दलचीं चांगलीं उदाहरणें आहेत; परंतु असें भय आहे तरी आह्मी त्यांच्या राजकारभारांत हात घालावयाचा तो फार थोडा घालावा असें मला वाटतें.'

इंग्लिश सरकाराशीं तहनामे करून सुरक्षित असलेल्या राजेरजवाड्यांबद्दल याप्रमाणें बरेंच लिहून त्यावेळीं विचार चालू असलेल्या इतर विषयांवर ही त्याणें लिहिलें. ते विषय सैन्याची वांटणी कशी करावी, विलायत सरकारची तऱ्हा कशी असावी, सुप्रीम कोर्ट (supreme court) आणि इलाखे सरकार यांचा संबंध कसा असावा इत्यादि होते. सारें हिंदुस्थानचें राज्य गव्हरनर जनरलाच्या प्रत्यक्ष नजरेखालीं असावें असा विचार तेव्हां निघाला होता तो त्याला अगदीं पसंत नव्हता. सबब त्याबद्दलही त्याणें आपलें मत अगदीं स्पष्ट उलट दिलें.

**एल्फिन्स्टन** साहेबानें व्हिलीअर्स साहेबाला वरचें पत्र लिहिलें त्याच दिवशीं दुसरें एक लिहिलें त्यांत सैन्याच्या रचनेच्या व व्यवस्थेच्या संबंधाचा

जो अती महत्वाचा प्रश्न त्यावर विचार करून आपलें मत सविस्तर कळविलें.

सन १८३३. च्या मे महिन्यांत मालकम साहेब वारला तें वर्तमान एल्फिन्स्टन साहेबाला समजलें तेव्हां तो आपला फार दिवसांचा मित्र गमावल्याबद्दल त्याला फार वाईट वाटलें. त्याची योग्यता कोणत्या प्रकारची होती तें त्याणें आपल्या रोजनाम्यांत लिहून ठेवलें आहे. तो म्हणतो—

हिंदुस्थानांत आपल्या हयातींत, सर जान मालकम साहेबाचें जेवढें वजन होतें तेवढें त्या मोठ्या थोरल्या इलाख्याचें आधिपत्य ज्याला मिळालेले नाहीं अशा दुसऱ्या कोणाचें नव्हतें. तो जो वाढला तो आपल्या गुणांनीं; तो जें काय शिकला तें अगदीं आपलें आपण. तो हिंदुस्थानांत आला तेव्हां त्याला पंधरावें वर्ष होतें आणि पुढे पुष्कळ दिवसपर्यंत कांहीं करीत नव्हता आळसांत काळ घालवीत होता. तो एक उडाणटप्पू तरुण शिपाई होता परंतु एकादी गोष्ट पहाण्याबराबर तींतील मर्म ध्यानांत यावें आणि जें आपल्याला कळलें त्याचा उपयोग करावा अशी जी त्याची बुद्धि होती ती कांहीं अभ्यासानें येणारी नव्हती. तो अत्यंत निष्काळजीपणानें, बेफिकीर, वागत होता त्या दिवसांत सुद्धां तो मनुष्याची परीक्षा तेव्हांच करीत असे आणि कोणत्याही गोष्टींतलें मर्म त्याच्या ध्यानांत अगदीं बिनचूक न आलें तरीपण तेव्हांच येत असे. एकाद्या गोष्टीबदलचें त्याचें मत लौकर ठरे, तें बहुतकरून योग्य असे आणि त्याच्या अंगांत असा धीटपणा होता कीं तो कोणत्याही कामाला हात घालण्यास कचरत नसे. जें करण्याचा निश्चय होई तें तडीस जाईल अशा भरंवशानें तो करूं लागे आणि बहुतकरून त्यांत त्याला यश येई.

सर जान मालकम साहेबाच्या अंगचे हे सार्वजनिक (public) गुण झाले. ह्यां शिवाय त्याच्या अंगांत एक असा फार मोठा गुण होता कीं

ज्याच्याशीं त्याचा संबंध येई त्याची तो प्रीति संपादी आणि एकदा तर सर्व-प्रतीच्या लोकांनां तो इतका प्रिय झाला होता कीं तसा साऱ्या हिंदुस्थानांत दुसरा कोणी नव्हता. असें होण्याला कारण त्याचा सर्वोत्कृष्ट स्वभाव. तो असा कीं त्याला कशानें ही राग येत नसे, कांहीं झालें तरी तो निरुत्साह होत नसे, कोणत्याही प्रकारची करमणूक चालली असली तरी तींत तो हौसेनें शिरे, एकाद्याशीं त्याचा स्नेह झटला ह्मणजे तो दाट होई आणि आपल्या मित्राला साहाय्य करण्याचें त्याच्या हातांत असलें ह्मणजे तो मोठ्या उत्साहानें करी. तो मनाचा अगदीं मोकळा असे आणि आंत एक बाहेर एक ह्याचा त्याला तिटकारा असे त्यामुळें त्याच्याशीं कोणीही झाला तरी मोकळ्या मनानें वागे आणि त्याचा हेवा कोणी करीत नसे.

## भाग ९ वा.

रिकामपणीं काय करावयाचें, तर हिंदुस्थानचा इतिहास लिहावयाचा असें एल्फिन्स्टन साहेबानें मनांत आणलेलें होतें हें मागेच सांगितलें आहे. तें काम करण्याची त्याला हौस होती. ग्रंथकार असें त्याचें नांव आधींच झालें असल्यानें आतां त्याहून विशेष कीर्ति मिळविण्याची इर्शा वाटूं लागणें सहज होतें, परंतु तसें कांहीं झालें नाहीं. उलटें त्याला असें वाटूं लागलें कीं हें कांहीं आपल्याला साधणार नाहीं. ह्मणून पुष्कळ दिवस गेले तरी तो कांहीं लिहि-ण्याच्या तयारीलाही लागेना. तें पाहून त्याच्या मित्रमंडळीनें त्याच्याजवळ पुनः पुनः तें बोलणें काढून, आपल्या हातून हें काम खरोखर चांगलें होईल, हें कराच, असा आग्रह करून त्याला तें करण्याला प्रवृत्त केलें. सन १८३४ च्या जून महिन्यामध्यें तो टनाब्रिजवेल्स येथें गेला होता तेव्हां अभ्यास चाललाच होता, त्यांत ह्या विषयाचाही विचार करावयाचा आणि स्वतःला जी माहिती आहे ती लिहून ठेवावयाची असा त्याच्या मनाचा निश्चय ठरला. मग लौकरच हिंदुस्थानांतले प्राचीन गोष्टींविषयीं माहिती मिळवण्यांत व

केव्हां केव्हां टिपणें करण्यांत तो अगदीं गढून गेला. पुढें पर्जन्यकाळीं तो लीमिंगटन येथें गेला आणि तें काम त्याणें सुरू केलें. तेथें जाण्यांत त्याचा उद्देश अभ्यास करावा आणि प्रकृति वैद्यांना दाखवून औषधोपचार करावा हा होता. अशासमयीं पुनः सरकारची नोकरी पत्करण्याविषयीं त्याला फार आग्रह होऊं लागला. ईस्ट इंडिया कंपनीचे चेअरमन टकर साहेब यांचे मनांत त्याला हिंदुस्थानचा गव्हरनर जनरल नेमावें असें येऊन त्याणे त्याला ती जागा पत्करण्याविषयीं आगस्ट महिन्यांत पत्र लिहिलें. त्याचा विचार करून त्याणें असा जबाब दिला कीं 'उष्ण हवेंत माझ्या हातून काम होणार नाहीं; आणि हाल्लीं माझ्या प्रकृतीचें जें मान आहे तें मनांत आणलें असतां मला हिंदुस्थानांत मुळींच जातां येणार नाहीं.' त्यावर आपल्या मंडळींत बोलून टकर साहेबानें तारीख १ सप्टेंबर रोजीं त्याला पुनःअगदीं आग्रहानें लिहिलें. 'या गोष्टीचा नीट विचार करा, नाहीं ह्मणूं नका. असें त्याणें लिहिलें असल्यानें **एलिफन्स्टन** साहेबानें डाक्टर जेफसन यास तें कळविलें आणि कसें करावें ह्मटलें. तेव्हां प्रकृतीबद्दल काळजी मुळींच नको, त्याला जामीन मी होंतों आणि अलायन्स लाइफ इंशुरन्स कंपनींत विमा उतरण्याबद्दल सरटिफिकेट देतों असें सांगितलें. त्याचें वजन मोठें होतें, त्यामुळें तें मान्य होण्याबद्दल शंकाच नव्हती. परंतु एल्फिन्स्टन साहेबाला ती एकच नड वाटत नव्हती. त्याच्या मनांत पुष्कळ गोष्टी घोळत होत्या. हिंदुस्थानांत असतां कांहीं एकादें मोठें काम करावयाचें आहे कीं काय, कीर्ति मिळण्याचा संभव कितीसा आहे, खर्च कमी करावयाचा आणि कायदे करावयाचे, हीं मुख्य कामें आहेत तीं आपल्या हातून कशीं काय होतील द्रव्याच्या आशेला गुंतावें तर परत येताना ५०००० पौंड शिल्लक पडले ह्मणून त्यापासून आतांपेक्षां काय अधिक सौख्य होणार आहे, कामाची सदा दगदग, सदा घाई, चैन नाहीं, जिवाला स्वस्थता नाहीं अशानें प्रकृति नीट कशी राहील, आपल्या हौसेचा उद्योग कितीसा करावयास सांपडेल पांच सहा वर्षांनीं परत आलें ह्मणजे येथच्या मंडळींत कितीसें मिसळतां येईल; हिंदुस्थानचा इतिहास लिहावा असें मनांत आहे, तें काम मग करतां येईल

कीं नाहीं, इत्यादि अनेक गोष्टींचा नीट विचार करून जागा पत्करावयाची नाहीं असा त्याणें निश्चय केला आणि त्याप्रमाणें लागलेंच त्या पत्राचें उत्तर पाठविलें, मग दुसऱ्या दिवशीं त्याणें आपल्या रोजनाम्यांत अगदीं थोडक्यांत असें लिहिलें.

तारीख ३ सेप्टेंबर—टकर साहेबाच्या पत्राचें काल उत्तर पाठविलें. जागा देत होते ती नको असें पुनः लिहिलें. माझीं कारणें अगदीं थोडया शब्दांत सांगावयाचीं ह्मटलें तर एक प्रकृति नीट नाहीं आणि दुसरें तिकडे जाऊन यशप्राप्तीचा संभव नाहीं. उलट, मिळविलें आहे हें नांव बुडण्याचाच संभव अधिक.

पुढें तीन महिन्यांनीं व्हिगपक्षाचा पराभव होऊन प्रधानमंडळ बदललें. सर राबर्ट पील मुख्य प्रधान झाले आणि लार्ड एलिन्बरोची बोर्ड आफ कंट्रोल-वर नेमणूक झाली. त्याबरोबर त्याणें आधीं एल्फिन्स्टन साहेबाला कामावर आणण्याची खटपट सुरू केली. त्याणें त्याला कायमच्या दुय्यम चिटणीसाची (permanent under secretary) जागा पत्करता का असें पत्रानें विचारलें. त्याणें नाहीं असा जबाब दिला, तेव्हां तो त्याला स्वतः जाऊन भेटला आणि पुष्कळ वेळपर्यंत बोलत बसला. **एल्फिन्स्टन** साहेबाला ज्या कांहीं अडचणी वाटण्यासारख्या दिसल्या त्या दूर करण्याची त्याणें खटपट केली. तो ह्मणाला 'ह्या जागेचा पार्लमेंटाशीं किंवा राजकारणाशीं politics कांहीं संबंध नाहीं, आपल्याला जर कोणी सल्ला विचारील तर मात्र तो द्यावयाची. प्रधान मंडळांत उलटापालट झाली तरी ह्या जागेवरील मनुष्यास हालवितां येऊंनये असा उद्देश आहे तो आपणही पत्करल्यावांचून सिद्धीस जाईल असें वाटत नाहीं. तर आपण नाहीं ह्मणूं नका.' याप्रमाणें तो अगदीं मन मोकळें करून बोलला तेव्हां **एल्फिन्स्टन** साहेब अगदीं सद्गदित झाला परंतु अखेरीस त्याणें नकारात्मकच उत्तर दिलें.

पुढच्या आठवड्यांत ह्मणजे तारीख ३० डिसेंबर रोजीं बाहेर फिरा-

वयास गेलेवेळीं लॉर्ड एलिनबरोची आणि एल्फिन्स्टन साहेबाची भेट झाली तेव्हां त्याणें उभा राहून गव्हरनर जनरलच्या नेमणुकीविषयीं बोलणें काढलें तो ह्मणाला तुह्मी ती नाकारल्याचें ऐकिलें आहे, परंतु पत्कराल तर बरें होईल. तुमच्या सारखा त्या जागेला योग्य दुसरा कोणी मिळत नाहीं. एल्फिन्स्टन साहेब ह्मणाला माझी प्रकृति नीट नाहीं. मला इटलींतलीसुद्धां हवा सोसणार नाहीं. तुह्मी जात नाहीं तर कोणाला नेमावें तें तरी सांगा असें लॉर्ड साहेब ह्मणाल्यावरून प्रधानमंडळांतीलच दोन तीन असामींचीं नांवें एल्फिन्स्टन साहेबानें सुचविलीं. तीं त्याला मान्य झालीं परंतु त्यांतल्या कोणालाही पाठवितां येत नाहीं, त्यांशिवाय कोणी असेल तर सांगा असें तो ह्मणाला. परंतु तसें नांव घेणें त्याला बरें वाटेना सबब तो गप्पच राहिला मग तुह्मी जाल तर किती चांगलें होईल असें बरेच वेळ बोलून अखेर 'पहा कबूल करीत असाल तर उद्यां हुकूम होईल' असें ही त्याणें ह्मटलें; त्यावर एवढ्या थोरल्या जागेवर नेमण्याला मला आपण योग्य समजतां हें मला मोठें भूषण आहे, परंतु प्रकृतीपुढें इलाज नाहीं असें ह्मणून त्याणें आपलें पहिलेंच बोलणें कायम ठेविलें.

या तारखेच्या रोजनाम्यांत वरील सर्व हकीगत लिहून पुढें त्याणें असें लिहिलें आहे—माझी प्रकृति ही खरोखर अपरिहार्य अडचण आहे. तिच्यामुळें माझी तरतरी activity नाहींशी होईल आणि स्वभाव बिघडेल आणि मी कोणत्याही जागेला निरुपयोगी होईन. शिवाय मोठी जागा असली ह्मणून काय झालें, तीवर जाऊन जर मोठमोठीं कामें हातून होण्याचा संभव नाहीं तर ती आपल्याला हवी असें वाटण्यासारखें तींत कांहीं नाहीं.

प्रधानमंडळ एल्फिन्स्टन साहेबाला फार मानीत असल्यानें त्याणें तीन वेळ चार वेळ मी चाकरी पत्करीत नाहीं असें सांगितलें तरी त्यांच्याकडून त्याला पुनः पुनः आग्रह होत होता. लॉर्ड एलिनबरोला त्याणें नाहीं ह्मटल्यावर पुढें दीड महिन्यानें लॉर्ड आबरडीनच्या मनांत त्याला कानड्याचा

गव्हरनर नेमावें असें येऊन त्याणें ती खटपट करून पाहिली. त्याची ओळख नव्हती ह्मणून त्याणें हे साहेबाच्या द्वारें इलाज केला. तारीख १४ फेब्रुवारी रोजीं त्याच्या बोलावण्यावरून एल्फिन्स्टन साहेब कालोनियल आफिसांत गेला. कानडा देश हाल्लीं विथरलेला आहे, तेथच्या लोकांची समजूत घालून शांतता करणें अवश्य आहे, याजकरितां तुह्माला तेथें कमिशनर नेमून पाठवावें असा लॉर्ड आबरडीन, कालनीचे सेक्रेटरी यांचा हेतु आहे असें हे साहेबानें सांगितलें तेव्हां तें काम आपल्या हातून होणार नाहीं असें ह्मणून आपल्याला काय काय नडी वाटतात तें त्याणें सांगितलें. हे साहेबानें बराच वेळ बोलून त्याच्या साऱ्या हरकती दूर केल्या तेव्हां अखेर प्रकृतीची नड त्याणें दाखविली. उष्ण हवेंत माझ्यानें सहा महिने सुद्धां रहाणें होणार नाहीं असें तो ह्मणाला तेव्हां हे साहेबाला आपला आग्रह सोडणें आलें, आणि त्याणें त्याला निरोप दिला. तो कांहीं केल्या वळत नाहीं असें त्याणें लार्ड साहेबांस कळविलें.

प्रधानमंडळीचा हेतु आपणाला हिंदुस्थानांत किंवा अमेरिकेंत पाठवावें असा फार, परंतु त्यांचें ह्मणणें आपण मान्य केलें नाहीं ही गोष्ट एल्फिन्स्टन साहेबाच्या मनांत कांहीं दिवस घोळत असावी असें दिसतें. कारण पुढें दोन महिन्यांनीं त्याणें पुनः तिचा उल्लेख आपल्या रोजनाम्यांत केला आहे. कानड्यांतलें काम आपल्या हातून नीट झालें नसतेंच ह्मणून ती जागा नाकारली हें योग्यच केलें असें त्याला वाटलें. हिंदुस्थानच्या गव्हरनर जनरलीचें कांहीं तसें नव्हतें, परंतु तेथें जाऊन आतां मुख्यत्वें खर्च कमी करण्याचें काम करावयाचें होतें तें त्याला आवडणारें नव्हतें आणि तेथें जाऊन विशेष नांवलौकिक होण्यासारखाही रंग नव्हता, ह्मणून ती ही त्याणें नकोच ह्मटलें. त्याणें असें लिहिलें आहे—तेथें माझी प्रकृति खरोखर सहा महिनेही नीट राहिली नसती. तथापि तेथें जाऊन माझा कांहीं उपयोग होण्याचा किंवा कीर्ति मिळण्याचा उगाच थोडा तरी रंग दिसता तर मग मी आपल्या प्रकृतीकडे एक क्षण सुद्धां पाहिलें नसतें; मागच्यापेक्षां आतां मी पुष्कळ थंड झालों आहें तरी पण जर

एक क्षणभर खरी कीर्ति होण्याचा रंग असेल तर तेवढ्याकारितां मी आपलें उरलेलें सर्व आयुष्य आनंदानें खर्ची घालीन.

हिंदुस्थानच्या गव्हरनर जनरलाची जागा ह्मणजे लहान सहान नव्हे; ती आपल्याला मिळावी ह्मणून मोठमोठे लाळ घोटीत असतात, जी वशीला लाऊन सुद्धां मिळण्याची पंचाईत, ती आपण होऊन त्याच्य कडे चालत आली इतकेंच नव्ह, ती पत्करण्याविषयीं त्याचीं आर्जवें चाललीं होतीं, तरी सुद्धां त्याणें होय ह्मटलें नाहीं हें कांहीं योग्य केलें नाहीं; तशानें त्याणें आपलेंच नुकसान करून घेतलें; आपली कीर्ति वाढविणे त्याच्या हातचें होतें, तशी उत्कृष्ट संधी आली असून ती त्याणें फुकट घालविली, त्यामुळें त्याचें नांव पहिल्या प्रतीच्या मुत्सद्यांत यावयाचें तें आलें नाहीं, असें कित्येकांचें ह्मणणें आहे. कीर्ति मिळण्याचा खरोखर रंग असेल तर मी प्रकृतीकडे क्षणभरसुद्धां पाहणार नाहीं असें स्वतः त्याणेंही ह्मटलें आहे. असें असून त्याणें ती जागा पत्करिली नाहीं याचें कारण काय असावें असा सहजच प्रश्न उत्पन्न होतो. या शंकेचें समाधान त्याच्या कागदपत्रांवरून होतें. तो कांहीं भविष्य जाणणारा नव्हता. हिंदुस्थानांत केव्हां काय होईल आणि कसा प्रसंग येईल याचा कांहीं नेम नाहीं, असें जरी तो ह्मणत असे तरी आपण गेलों असतां हटकून कीर्ति मिळण्याचा सुयोग येईल असें कांहीं त्याला वाटत नव्हतें हा त्याचा दोष ह्मणतां येणार नाहीं. तसेंच मनांत जावयाचें नव्हतें ह्मणून तो प्रकृतीची सबब सांगत होता असेंही नाहीं. उष्ण हवेंत सहा महिनेही काढवणार नाहींत असें जें त्याला वाटत होतें तें कांहीं खोटें नव्हतें. सतत तीस वर्षें हिंदुस्थानांत राहिल्यानें प्रकृतीला अपाय झाला होता आणि त्यामुळेंच डाक्टर जेक्सन यास प्रकृति दाखवून औषध घेण्याचा त्याणें विचार केला होता. त्याला नीट निदान करतां यावें ह्मणून त्याणें आपल्याला काय काय होतें, कसें कसें वाटतें तें लिहून टिपणें करून ठावलीं होतीं, त्यांवरून पहातां त्याला जें भय वाटत होतें तें गैर नव्हतें. पुढें थोड्याच वर्षांत त्याची प्रकृति बिघडली ती तो हिंदुस्थानांत जाता तर लागलीच बिघडती.

अफगाणिस्थानाबराबर जी पहिली लढाई झाली तींत इंग्लिशांची फार हानी झाली. **एल्फिन्स्टन** साहेब गव्हरनर जनरल असता तर त्याने तो प्रसंगच येऊं दिला नसता असें कित्येकांचें मत होतें आणि तो वारल्यावर त्याच्या स्मरणार्थ जी सार्वजनिक सभा भरली तींत लार्ड एलिन्बरो साहेबानें तसें साफ बोलून दाखविलें. त्याच्या शहाणपणाविषयीं व कर्तृत्वाविषयीं लोकांची तशीच खात्री होती.

**एल्फिन्स्टन** साहेबाला गव्हरनर जनरल होण्याविषयीं आग्रह चालला होता त्यावेळेस तो आपलें इतिहास लिहिण्याचे काम करीत होता. परंतु त्याला असा संशय आला कीं आर्स्किन साहेब हाच इतिहास लिहीत असावा. त्यामुळें त्याचा उद्योग शिथिल पडला. परंतु त्या संशयाची निवृत्ति करून घेऊन तो पुनः काम करूं लागला कांहीं महिने काम केल्यावर लेखणी खालीं ठेऊन त्याणें ते लिहून झालेले कागद वाचले आणि गुंडाळून ठेऊन सोडले. असें करण्याला काय विशेष कारण झालें असेल तें असो.

स्काटलंड देशांत धर्मसंबंधीं शिक्षणाचीं साधनें कशीं काय आहेत याची चौकशी करण्याकरितां सन १८३५।३६ मध्यें रायल कमिशन बसलें; त्यांत एल्फिन्स्टन साहेबाची नेमणूक झाली; ह्मणून तो हिंवाळ्यांतच तिकडे गेला. अध्यक्षस्थानीं लार्ड मिंटो याची नेमणूक होती कमिशनचें काम पुरें होण्यापूर्वीच **एल्फिन्स्टन** साहेबास मार्च महिन्यांत येथून निघून यावें लागलें. कारण दीडवर्षापूर्वी जशी त्याची प्रकृति बिघडली होती तशी आतां पुनः बिघडली. लंडनांत कांहीं महिने अस्वस्थतेंत काढून तो युरोपांत फिरावयास गेला. त्या वर्षीचा हिंवाळा त्याणें पूर्वीप्रमाणें रोम शहरांत काढला.

सन १८३७ च्या वसंतऋतूंत लंडनांत परत आल्यावर त्याला कायमचासा कांहीं उद्योग दिसेना तेव्हां त्याणें इतिहासाचे गुंडाळून ठेवलेले कागद

बाहेर काढले. ते वाचून पाहतांना आपण लिहिलेलें हें बरें आहे असें कांहीं त्याच्या मनाला वाटेना आणि पुढें काम करण्यास उत्साह वाटेना. परंतु सुदेवानें त्याच्या मनांत असें आलें कीं आपला मित्र अर्स्किन साहेब यास हे खंड दाखवून त्याचें मत काय पडतें तें पहावें. मग त्याप्रमाणें करून त्याणें त्याला पत्र लिहून आपल्याला काय काय संशय वाटत होते व शंका आल्या होत्या तें सर्व कळविलें. त्याला ते कागद वाचून फार चांगले वाटले आणि तें काम तसेंच पुढें चालविण्याविषयीं त्याणें लागलेंच लिहिलें. तेणेंकरून एल्फिन्स्टन साहेबाला उत्तेजन येऊन तो मनापासून झटून काम करूं लागला सतत दोन वर्षें परिश्रम करून त्याणें मुसलमानांच्या कारकीर्दीचा इतिहास पुरा केला. मध्यंतरीं सन १८३९ च्या पर्जन्य काळांत त्याची प्रकृति बरीच बिघडली होती; तरी उठण्याची शक्ति अंगांत येतांच तो पुनः कामास लागला.

मुसलमानांची कारकीर्द संपून इंग्रजी अम्मल सुरू झाला त्याचा इतिहास एल्फिन्स्टन साहेब लिहूं लागला तों एक मोठेंच विघ्न उपस्थित होऊन त्याची लेखणी नीट चालेनाशी झाली, प्रसिद्ध इतिहासकार लार्ड मेकाले याचा लार्ड क्लाइव्हवरचा निबंध एडिंबरो रिव्ह्यूमध्यें प्रसिद्ध झाला. त्याचे भाषासौंदर्यादि वाचकांस अगदीं गुंग करून सोडणारे गुण पाहून एल्फिन्स्टन आश्चर्यचकित झाला आणि आतां आपण इतिहास लिहून नांव मिळवूं पाहणें व्यर्थ आहे असें त्यास वाटलें. तशांत त्याची प्रकृति बिघडूं लागली तेव्हां तो उद्योग मंदावला आणि इटलींत, निदान स्वित्झर्लंडांत तरी हवा पालटण्याकरितां जावें असें त्याणें योजलें. परंतु सुदैवानें त्याची आणि लार्ड जेफ्रे याची भेट होऊन हिंदुस्थानचा इतिहास ह्याच विषयावर बोलणें निघालें मग आपण लिहिलेले कागद त्याला दाखवून त्याचा अभिप्राय घ्यावा असें त्याच्या मनांत आलें व त्याप्रमाणें त्याणें केलें. लार्ड जेफ्रे साहेबास तो चांगला वाटून त्याणें त्याची योग्य तशी वाखाणणी केली आणि झाला आहे एवढा भाग लौकर छापा अशी विनंती केली. त्याचा तो अभिप्राय आणि प्रोत्साहनाचे शब्द ऐकून एल्फिन्स्टन साहेबाची सर्व काळजी दूर झाली. आज आपल्या नशि-

याचा निकाल लागला; आतां आपल्याला आनंदानें करीत बसण्याला धंदा झाला, असें त्याला वाटलें.

मग त्या कामाला त्याणें उत्साहानें सुरवात केली. मरे साहेबानें पुस्तक छापण्याचें कबूल केलें. त्याच्याशीं करार ठरल्यावर छापण्याकरितां शुद्ध प्रत केव्हां तयार होईल असें होऊन एल्फिन्स्टन साहेब लंडन शहर सोडून एका खेड्यांत गेला आणि तेथें काम करीत बसला. कारण शहरांत काम निर्वेध चालत नाहीं, अनेक प्रकारें हरकती येतात. पुढच्या वर्षाच्या आरंभींच तो लंडनांत परत येऊन झटून काम करीत होता. परंतु प्रकृति बिघडल्यानें तें नीट चालेना; कदाचित् हातचें टाकून देऊन स्वस्थ बसावें लागेल अशी भीति वाटूं लागली.

प्रकृती शिवाय दुसरीं विघ्नें ही उभीं राहिल्यानें इतिहासाचें काम तितकेंच पडतें असें वाटूं लागलें. ह्यावर्षी ह्मणजे १८४० मध्यें त्याची जी काय थोडीशी आप्त मंडळी शिल्लक उरली होती ती एक एक कमी होत अखेर त्याची एक बहीण राहिली होती ती आगस्ट महिन्यांत वारली आणि सात भावडांपैकीं तो तेवढा एक उरला.

सारी आप्तमंडळी गेल्यानें त्यांच्या मालमत्तेसंबंधीं व्यवस्थेंत पडावें लागून एल्फिन्स्टन साहेबाचा बराच वेळ मोडला. पुढें त्याच्या भावजईनें (sister-in-law) नेपल्स येथें जाऊन रहाण्याचा निश्चय केला तेव्हां तोही तिच्या बरोबर तिकडेच जावयास निघाला. तेव्हां आतां आपल्या इतिहासाचें काम कांहीं दिवस व कदाचित मुळींच बंद पडेल असें त्यास वाटलें. तो तिजबरोबर रोम शहरापर्यंत गेला. पुढें जाणें झालें नाहीं; त्याची प्रकृति बरीच बिघडून पुष्कळ दिवस पडून राहून त्याला स्वदेशीं परत जावें लागलें. पुढें थोडा उठता झाल्यावर त्याणें पुनः कामास सुरवात केली. परंतु त्याच्या हातून मेहेनत होईनाशी झाल्यानें त्याला तें सोडून यावें लागलें. पुढें एकदोन वेळ त्याच्या मनांत पुनः लिहिण्यास सुरवात करावी असें आलें परंतु तें कांहीं झालें नाहीं

अखेर सन १८४१ च्या दिसेंबर महिन्यांत आतां या वाग्मीं पुनः टांक लावावयाचा नाहीं असा त्याचा अगदीं पक्का निश्चय ठरला.

पुस्तक छापून झाल्यावर थोडक्याच दिवसांत त्याची खरी योग्यता दिसून आली आणि हिंदुस्थानाकरितां जी ( Indian civil service ) मुलकी सनदी नोकरांची परीक्षा होते तींत अभ्यासाकरितां तें नेमण्यांत आलें. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील विश्वविद्यालयाच्या अभ्यासक्रमांतही तें नेमण्यांत आलें.

## भाग ७ वा.

हिंदुस्थानचा इतिहास लिहिण्याचें काम एलिफन्स्टन साहेबानें कोणत्या प्रकारें केलें हें मागें सांगितलेंच आहे. ईस्ट इंडिया कंपनी हळु हळु मुलुख मिळवून राज्य करूं लागली आणि पुढें साऱ्या हिंदुस्थानांत प्रबळ होऊन बसली तो इतिहास लिहिण्याचेंही त्याच्या मनांत होतें व त्यास त्याणें सुरवात केली असून क्लाईव्ह साहेब विलायतेस जाऊन पुनः गव्हरनर होऊन आला तेथपर्यंतची हकीगत लिहून झालीही होती. परंतु पुढें प्रकृति बिघडल्यामुळें त्याला तें काम बंद करावें लागलें. मग तो मंडळींत जाऊन मिसळण्याचेंही कमी करूं लागला. सन १८४२ मध्यें त्याला जें दुखणें आलें त्यांतून तो बरा होईल असें दिसत नव्हतें परंतु निभावला. सन १८४४ मध्यें त्याणें शहर सोडल्यासारखेंच झालें; तो खेडयापाड्यांत जाऊन राहूं लागला. एक दोन ठिकाणें पालटल्यावर अखेर सन १८४७ मध्यें हूकउड हें त्याचें कायमचें वास्तव्य स्थान झालें. त्या शांत व रम्य स्थळींच त्याच्या आयुष्याचीं शेवटचीं बारा वर्षें गेलीं. येथें आल्यापासून तो कायमचा दुबळा ठरला. त्याला आपल्या शजाऱ्या पाजाऱ्यांत सुद्धां फारसें जाऊन मिसळतां येत नसे. मंडळींत बसून

करण्याची त्याला हौस असे परंतु आतां आपण

उठून बाहेर जाणें बंद झाल्याने कोणी आप्त इष्ट व मित्र मंडळी मुद्दाम त्याला भेटण्याला ह्मणून जात तेव्हां त्यांच्याशीं संभाषण सुखाचा लाभ घडे. त्यांत अनेक विषयांवर वादविवाद होई. बाकीचा काळ वाचनांत जाई. तो काव्यरसास्वादाचा फार लोलुप असल्यानें काव्यग्रंथांचेच वाचन विशेष असे. जें वाचावें त्याच्या गुणदोषांचे विवेचन करून आपलें मत लिहून ठेवावयाचें असा त्याचा परिपाठ होता, त्याप्रमाणें लिहिलेल्या लेखांनीं त्याचे रोजनामे बरेच भरून जात पुढें पुढें त्याला लिहिण्याचे श्रम होतनासे झाले तेव्हांपासून त्याणें तें जोडून दिलें. राजकीय विषयांवर तो वहुधा लिहित नसे परंतु हिंदुस्थानांतील गोष्टींविषयीं त्याचे विचार चालत आणि रोजनाम्यांत त्यावद्दल लेख मागच्यापेक्षां अधिक आहेत.

तारीख १५ सप्टेंबर सन १८५२ रोजीं ड्यूक आफ वेलिंग्टन वारला-दें वर्तमान एल्फिन्स्टन साहेबाला कळलें तेव्हां त्याणें त्याच्याविषयीं असें ह्मटलें कीं त्याच्या मरणानें आतां जी जागा रिकामी झाली आहे ती कधीं ही भरून येणार नाहीं. मोठा कठीण प्रसंग आला असतां त्यांतून पार पडण्याला सर्व राष्ट्राला त्याचा मोठा आधार वाटत असे तो आज नाहींसा झाल्यासारखा दिसतो. आज पन्नास वर्षें माझी त्याच्यावर सतत सारखी प्रीति होती. इतक्या काळांत मी जरी बहुतकरून त्याच्या जवळ कधीं गेलें नाहीं, दुरून दुरूनच त्याच्या विषयीं आश्चर्य मानीत असें तरी माझी त्याच्या, वर भक्ति होती आणि मी त्याला पूज्य मानीत असें. तो मोठा दैववान होता, त्याचें सर्व आयुष्य जसें चांगल्या प्रकारें गेलें तसा त्याचा शेवटही गोड झाला तो पुष्कळ वर्षें वांचला, त्याची कीर्ति मोठी झाली आणि अगदीं मरेपर्यंत त्याची प्रकृति उत्तम होती तशीच त्याची बुद्धि वगैरे मानसिक शक्तीही कायम होती.

ड्यूक आफ वेलिंग्टन याचा अंत्यविधि तारीख १८ नोव्हेंबर रोजीं झाला त्या दिवशीं लंडन शहरांत चोहींकडून लोक येत होते. गर्दी इतकी

झाली होती कीं आगगाडी एकसारखी चालली होती तरी मोठमोठ्यांस तींत जागा मिळत नव्हती ; प्रेतयात्रा ज्या रस्त्यानें झाली त्यांत शिरकाव होण्याची मोठीच मारामार पडत होती नेपोलियन बोनापार्टाचा पराभव केल्या दिवसापासून वेलिंग्टन साहेबावर साऱ्या राष्ट्राची जी भक्ति जमली होती ती त्या दिवसापर्यंत कायम होती. त्या दिवशींचा तो साराच अपूर्व प्रकार पाहून एल्फिन्स्टन साहेबाला मोठें आश्चर्य वाटलें आणि त्याच्या मनांत अनेक विचार आले. ते त्याणें लिहून ठेविले आहेत, त्यांत शेवटीं असें ह्मटलें आहे—मी असें समजत असतों कीं हें राष्ट्र शांततेचा आणि समृद्धीचा उपभोग घेऊं लागल्यानें सुखनिमग्न होऊन जाऊन आळसांत आणि मांद्यांत बुडालें आहे. एकादी सार्वजनिक किंवा राष्ट्रीय गोष्ट मनांत येऊन याला चेतना येईल असें नाहीं. सुखविघातक किंवा खर्च करण्यास लावणारी एकादी गोष्ट घडणार असें भय उत्पन्न होतेंसें दिसलें तर मात्र हें जागें होणार. परंतु आतां माझी अशी खात्री झाली कीं हें इंग्लंड मागें होतें तसेंच अजून आहे आणि दुर्दैवानें जर पुनः युद्धाचा प्रसंग आला तर बोनापार्ट वैभवशिखरास चढला होता त्यावेळीं त्यांतील एकुणएक मनुष्य जसा लढण्यास सिद्ध झाला होता तसा आतां ही होईल.

---

सन १८३८।३९ मध्यें अफगाणिस्थानासंबंधानें जीं कारस्थानें चाललीं होतीं त्यांचा एल्फिन्स्टन साहेबाच्या रोजनाम्यांत उल्लेख नाहीं आणि सन १८४१।४२ मध्यें जो भयंकर प्रसंग गुदरला त्यासंबंधानेंही ह्मणण्यासारखें कांहीं लिहिलेलें नाहीं हें पाहून आश्चर्य वाटतें. परंतु सरकारानें काबुलावर स्वारी केली ही मोठी चूक केली असें तो साफ ह्मणत असे आणि त्या दोन्ही प्रसंगांसंबंधानें आपलें मत आपल्या मित्रमंडळींत स्पष्ट बोलून दाखवीत असे. अफगाणिस्थानावर स्वारी करण्याचा सरकारचा विचार असल्याची बातमी एकानें त्याला सांगितली तेव्हां ते शब्द कानीं पडतांच तो तोंडानें 'अशक्य' असें ह्मणत खुर्चीवरून दचकून उठला. यावरून त्याला ती गोष्ट कशी वाटली

असावी हें सहज कळतें. पुढें त्याणें आपल्या एका मित्राला पत्र लिहिलें त्यावरून त्याचे विचार अगदीं स्पष्ट दिसून येतात, तो ह्मणतो—

'काबूल प्रकरणासंबंधानें मला काय वाटतें याचें तुह्मी अनुमान कराल. तुमच्या बराबर वाद करीत असें तेव्हां काबुलांत आमचा वकील (Agent) सुद्धां असूं नये असें मी ह्मणत असें तें तुह्माला आठवत असेल; आणि आतां तर हिंदुस्थानांतल्या आमच्या एकाद्या दोस्त राजाचें जसें संरक्षण करूं तसें त्या राज्याचें (state) संरक्षण करण्याचें आह्मी आपल्या अंगावर घेतलें आहे. दरा—इ—बोलन मार्गानें कंदाहारास २७००० फौज पाठविण्याचा विचार आहे असें आह्मी ऐकतों तशी जर पाठविली आणि तिचें पोषण करतां आलें तर कंदाहार आणि काबूल घेऊन तुह्मी शहासुजाला तेथें गादीवर बसवाल यांत कांहीं संशय नाहीं. परंतु त्या भिकार थंड, मजबूद, आणि दूरच्या देशांत आणि अफगाणांसारख्या दंगेखोर लोकांत त्याची गादी कायम राखतां येण्याची मात्र अगदीं आशा नको असें मला वाटतें. तुह्माला ती राखतां आली तर मला अशी भीति वाटते कीं तुह्मी राशियापुढें दुर्बळ होऊन बसाल. अफगाण लोक कोणत्याच पक्षास मिळाले नव्हते. त्यांच्यावर कोणी हल्ला करता आणि तो हटविण्याला तुह्मी त्यांना मदत करतेत तर ते तुमचे उपकार मानते; आतां ते तुमच्याशीं नाखुष असणार आणि तुह्माला हांकून लावण्याकरितां कोणी चालून आला तरी त्याला आनंदानें मिळणार. एक सुधारलेलें आणि दुसरें न सुधारलेलें अशा दोन राज्यांचा चांगला स्नेह झाला आणि तो तीन वर्षें तरी टिकला, तितक्या अवकाशांत तीं एकमेकांचा द्वेष करूं लागलीं नाहींत आणि भांडलीं नाहींत असें मला आजपर्यंत माहीत नाहीं, आमच्याशीं निकट संबंध आल्यानें त्यांना गप्प बसावें लागणार, तेवढ्यानें आह्मी त्यांना अप्रिय न झालों तरी रणजितसिंगासीं आह्मी स्नेह केला आहे आणि त्याणें घेतलेला मुलुख त्याच्याकडे चालण्याची हमी दिली आहे ह्मणून ते आमचा द्वेष केल्याशिवाय रहाणारच नाहींत. हीं माझी इतका दूर असलेल्याचीं मतें तेथें

जागेवर असणारांना कांहीं तरी भलभलतीं आहेत असें वाटेल, परंतु ह्या वेळपर्यंत मी जें काय ऐकिलें आहे तें सारें तसें असतें तरी माझीं हींच कायम आहेत.'

अफगाणिस्थानांतून मान खालीं घालून येत असतांना इंग्रज सेनापतीनें वाटेवरचा सिंधप्रांत गट्ट केला ती हकीगत ऐकून **एल्फिन्स्टन** साहेबानें मेटकाफ साहेबाला पत्र लिहिलें त्यांत त्याणें त्या सेनापतीच्या पराक्रमाविषयीं वगैरे असें लिहिलें आहे—तुह्माला हिंदुस्थानाविषयीं विचार करण्याला फुरसत आहे कीं नाहीं मला माहीत नाहीं. सिंध देशांत जो उद्धटपणाचा आणि जुलमाचा कहर उसळला तो वाईट वाटण्यासारखा होता. अफगाणिस्थानांत तसा प्रकार झाल्यावर त्याच्यामागून हा असा झालेला पाहून एकादा लठ्ठंभारती गरीबांचा काळ रस्त्यांत लाथा खाऊन घरीं आला ह्मणजे मग तो राग बायकोवर काढून तिला मारीत सुटतो तेव्हांच्या त्याच्या पराक्रमाची आठवण होते. परंतु या कृत्याबद्दल लॉर्ड एलिनबरोवर त्याच्या सेनापती इतका दोष नाहीं.

*  *  *  *

सिंधप्रांत सर झाल्यापासून पुढें कांहीं दिवस ह्मणण्यासारखी मोठी गोष्ट झाली नाहीं. परंतु लॉर्ड डलहौसी गव्हरनर जनरल होऊन बसल्याबरोबर सगळाच मनु पालटला. त्याणें आपलें विलक्षण बुद्धिचातुर्य लढवून तलवार न उपसतां व गोळीबार न काढतां हां हां ह्मणतां राज्य वाढविण्याची युक्ति काढली. त्याच्या सभोंवतें त्याच्याच सारखें तृष्णांध कामदारमंडळ जमलें. त्यांणीं त्याची वाहवा करून त्याची जी जी आज्ञा झाली ती शिरसा वंद्य करून उत्साहानें बजावली आणि त्याची इच्छा परिपूर्ण केली. त्याचा परिणाम काय झाला, तो सर्व विश्रुत असल्यानें येथें कथन करण्याचें कारण नाहीं. डलहौसीच्या संकल्पा प्रमाणें प्रथम सातारची गादी 'खालसा' ह्या मंत्रानें स्वाहा झाली आणि आतां पुढें अशीच एक एक राज्याहुति पडत जावयाची

असें दिसलें तेव्हां राजकीय (political) खात्याशीं संबंध असलेल्या, तशा प्रकारच्या गोष्टींचा विचार करण्याचा, व राजेरजवाड्यांच्या दरबारांत वकील म्हणून असलेल्या, सर्वांनांच आतां आपलें राज्य सहज वाढणार म्हणून आनंद झाला असें मात्र नाहीं. जे न्यायबुद्धि, विचारी व दूरदृष्टि होते त्यांनां वाईट वाटलें आणि काळजी उत्पन्न झाली. डलहौसीच्या कृतीची वाहवा करणारे व हर्षभरित होऊन जाणारे मुख्यत्वें मुलकी व न्याय [ Revenue and judicial ] खात्यांतले कामगार होते. हिंदुस्थानच्या राजेरजवाड्यांबराबर झालेले तहनामे कशा प्रकारचे आहेत हें कांहीं मनांत न आणतां डलहौसी साहेबानें दत्तक पुत्राला बापाची गादी मिळावयाची नाहीं असें जगजाहीर करून त्याप्रमाणें सातारचें राज्य बुडविलें ही बातमी एल्फिन्स्टन साहेबाच्या कानीं गेली तेव्हां त्याला फार वाईट वाटलें इतकेंच नाहीं, त्याच्या मनाला मोठा धक्का बसला.

आष्टीच्या लढाईंत प्रतापसिंह ऊर्फ आपा साहेब महाराज इंग्रजांच्या हातीं सांपडले तेव्हां त्यांनां सातार्‍यास नेऊन जाहागीर किंवा राज्य देऊन गादीवर बसविण्याचें हिंदुस्थान सरकारानें एल्फिन्स्टन साहेबाच्या मर्जीवर सोंपविलें होतें. त्याणें त्यांनां राज्य दिलें; तें नीट चालण्याची व्यवस्था केली महाराज मुक्त्यार होऊन चांगल्या प्रकारें स्वतः राज्यकारभार करूं लागले, लहानपणापासून शिकवून तयार केलेल्या मनुष्यापेक्षां देखील ते आपलें काम चांगलें करतात व त्यांच्या अंगांत राज्यकारभार चांगल्या प्रकारें चालविण्याची शक्ति आहे हें पाहून मोठा संतोष मानला, वगैरे पूर्ववृत्तांत वाचकांस विदित आहेच. पुढें सन १८३६ च्या सुमारास मुंबई इलाख्यापैकीं एका काळ्या पलटणावरील अम्मलदारांस फितूर करण्याची खटपट महाराज व त्यांचे कारभारी करीत असल्याचा त्यांजवर आरोप येऊन चौकशी सुरू झाली. त्या अम्मलदारांनीं ही गोष्ट खरी आहे असें जबाब दिले तेव्हां मुंबई सरकारानें मोठमोठ्या अम्मलदारांचें कमिशन नेमून साक्षीपुरावा घेण्यास सुरवात केली. मुंबई सरकारानें ती चौकशी अशाकांहीं झोकानें चालविली कीं ते कृत्य पाहून

कलकत्ता सरकार व विलायत सरकार ही विचारांत पडून गोंधळून गेलें. पुरावा पुष्कळ जमला, तो पाहून सरकारची अशी खात्री झाली कीं महाराजांवर आलेले आरोप खरे आहेत. मग कांहीं जास्त विचार न करतां सरकारानें महाराजांस असें ह्मटलें कीं आपण पलटण फितूर करण्याची खटपट केली खरी असें कबूल करा आणि आह्मांबरोबर असलेला तहनामा मोडलात सबब दुसरा, त्याच्याहून कडक, करून द्या. या प्रमाणें न कराल तर तुह्माला पदच्युत करूं. महाराजांकडे हा निरोप गेला तेव्हां त्यांनां त्वेष येऊन मी याप्रमाणें कांहींएक करणार नाहीं असें त्यांणीं उत्तर दिलें. सरकारानें त्यांनां पदच्युत करून काळ्यापाण्यावर पाठविलें आणि त्यांच्या भावास गादीवर बसविलें.

मुंबई सरकारानें या कामीं स्वैच्छ वर्तन केलें तरीपण त्याची मोठीशी अपकीर्ति झाली नाहीं. कारण महाराजांनीं फंदफितूर चालविला होता. सबब सरकारास त्यांचा बंदोबस्त करणें भाग पडलें असें ह्मटलें तर त्यांत कांहीं गैर झालें असें सामान्य जनांस दाखविण्यासारखें नव्हतें. सरकारानें चौकशी करून न्याय केला असें सहज वाटण्यासारखें होतें. परंतु विचारी पुरुषास तसें वाटण्यासारखें नव्हतें. एल्फिन्स्टन साहेबाच्या कानीं तें वर्तमान गेलें तेव्हां त्याला वाईट वाटणें सहज होतें. परंतु त्याचें वाईट वाटणें लोकांपेक्षां निराळ्या तऱ्हेचें होतें. महाराज मोठे थोर, चांगले हुशार निघाले असें आपण समजत होतों, त्यांच्या हातून अशी गोष्ट झाली असेल काय, त्यांनां शिक्षा झाली ती योग्य कीं अयोग्य, ह्या गोष्टी तो मनांत आणीत बसला नाहीं, आणि त्यांबद्दल त्याणें केव्हांच कांहीं बोलून दाखविलें नाहीं. त्याला जें काय वाईट वाटलें तें मुंबई सरकारच्या कृत्याबद्दल. इंग्रज सरकार ज्याला 'राजा' मानीत होत, ज्याच्याबरोबर तहनामा झालेला होता, त्याच्यावर आरोप ठेऊन, कमिशन नेमून, त्याजकडून त्याची चौकशी करविली, हा जो काय प्रकार झाला तो खरोखर फार अयोग्य झाला ह्मणून त्याला खरें वाईट वाटलें.

डलहौसी साहेबानें सातारच्या राज्यावर जो प्रसंग आणला तो वरच्याहून

फार निराळा. आपा साहेबांचे बंधु दहा बारा वर्षे राज्योपभोग घेऊन आजारी पडले. दुखणें कठीण, प्रकृति असाध्य झाली, आतां आपण यांतून बरे होत नाहीं, असें वाटलें तेव्हां त्याणीं दत्तक घेण्याचा विचार मनांत आणला. त्यांनां इंग्रज सरकारानें राज्य देऊन त्यांच्याशीं जो तहनामा केला होता त्यांत त्यांजकडे असलेला मुलुख पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें सतत चालेल असा करार होता. परंतु त्यांत एक कलम असें होतें कीं महाराजांनीं महत्वाच्या सर्व गोष्टींत इंग्रज सरकारचा विचार घेत जावें. त्यास अनुसरून महाराजांनीं रेसिडेंट साहेबास असें कळविलें कीं आपण दत्तक घेणार, त्यास संमति असावी. असा कांहीं प्रसंग येईल तेव्हां संमति द्यावी कीं न द्यावी याबद्दल रेसिडेंटाला कांहीं हुकूम नव्हता, ह्मणून त्याणें ती दिली नाहीं. तहनाम्याप्रमाणें आपल्याला दत्तक घेण्याचा अधिकार आहे, आपल्या वंशाकडे गादी चालेल, यांत संशय घेण्याचें कांहीं कारण नाहीं असें ह्मणून महाराजांनीं यथाशास्त्र, विधीपूर्वक दत्तक घेतला; आणि थोड्याच काळांत देह ठेविला. रेसिडेंट साहेबानें सर्व गोष्टी सरकारास कळविल्या तेव्हां दत्तक घेतलेल्या पुत्राकडे गादी चालवावी नचालवावी हा विचार सुरू झाला; मध्यस्थ ह्मणून निकाल करण्याचा आमचा हक्क मान्य आहे (सार्वजनिक व्यवस्था रहावी ह्मणून सर्व संस्थानांत आह्मी तो वरचेवर चालवीत असतों) तेव्हां आपल्या तर्फे निकाल करण्याचा आह्माला हक्क आहेच; असा कोटिक्रम चालवून, दत्तक देण्या घेण्यासंबंधानें सर्व हिंदुस्थान देशांत चालू असलेली वहिवाट, धर्मशास्त्र, सर्व लोकांचा समज, वगैरे सर्व मोठमोठ्या गोष्टींकडे अगदीं दुर्लक्ष करून, मोठें विलक्षण कृत्य करण्यास हिंदुस्थान सरकार प्रवृत्त झालें. महाराजांस औरस पुत्र नाहीं, दत्तक घेण्याचा अधिकार नव्हता, सबब गादी त्याजकडे चालवावयाची नाहीं, राज्य खालसा करावयाचें, असा सरकारानें ठराव केला.

डलहौसी साहेबानें असले विलक्षण, अतर्क्य, अलौकिक कोटिक्रम चालवून साताराचें राज्य बुडविलें हें वर्तमान **एल्फिन्स्टन** साहेबाच्या कानीं पडतांच तो अगदीं घाबरून गेला, त्याच्या मनाला असा कांहीं धक्का बसला

कीं तसा पूर्वी कधींच बसला नव्हता. साताऱ्याचें राज्य ही एक जाहागीर होती, जाहागिरीवर वरिष्ठ सरकारचा हक्क असतो तसा त्यावर आमचा होता असें मानणें आणि त्याप्रमाणें राज्याची व्यवस्था लावणें ह्मणजे भयंकर कर्म आहे असें त्यास वाटलें. शिवाजी महाराजांचा वंश नष्ट झाला आणि मराठी साम्राज्याचें आद्यपीठ नष्ट झालें हें वरें कीं वाईट, असें करणें हा न्याय कीं अन्याय, या विषयीं कोणाचें मत कसें ही असो, याबद्दल मोठासा विचार नाहीं, परंतु असें करण्यास आधार ह्मणून जीं नवीं मतें निघालीं आहेत, जीं हिंदुस्थानांत आणि त्याप्रमाणें विलायतेंत ही मान्य होऊन पसरत चाललीं आहेत, तीं फार भयंकर आहेत, आणि आतां तीं हिंदुस्थानांतल्या लहान थोर सर्व राज्यांनां लागू करावयाचीं ह्मटलें ह्मणजे मोठा अनर्थ होईल, कहर उसळेल हें भविष्य तत्काळ मनांत येऊन त्याला फार वाईट वाटलें आणि मोठी काळजी व भीति वाटूं लागली. त्या एका विषयानें त्याचें सारें लक्ष्य वेधलें आणि त्यावर त्याणें पुष्कळ विचार केला व पुष्कळ लिहिलें. इंग्रज सरकार सर्व सत्ताधीश, त्याला अशा गोष्टींचा निर्णय करण्याचा अधिकार आहे, जाहागीर बेवारस झाली तर ती खालसा करण्याचा हक्क वरिष्ठ सरकारास असतो, तो नियम हिंदुस्थानांतील सर्व राज्यांस states लागू करावयाचा, इत्यादि मनसोक्त, निरर्गल, भाषणें करणाऱ्या तत्पक्षीय मंडळीच्या मनःपूत प्रलापांवर व विशेषतः गादीच्या वारसासंबंधी तंट्यांत मध्यस्थ ह्मणून हात घालून अ ह्मी निकाल केल्याचे मागले दाखले पुष्कळ आहेत, तेव्हां या प्रश्नाचा आपल्या तर्फे निकाल करण्याचा, ह्मणजे औरस पुत्राच्या अभावीं गादी खालसा करण्याचा आह्मास हक्क आहे, इत्यादि सर्व कोटिक्रम आणि विचारसरणी मुळांतच केवढी भ्रामक आहे हें त्याणें त्या त्या मतावर चांगली टीका करून अगदीं स्पष्ट करून सोडलें. त्याणें आपला मित्र कोलब्रूक साहेब यास दोन पत्रें लिहिलीं त्यांत त्याचे विचार स्पष्टपणें दाखल केलेले आहेत.

हकबुक

तारीख १३ मे १८४९

मेहेरबान कोलब्रूक साहेब यांस.

तुह्मी पत्र पाठविलेंत त्याजबद्दल मी तुमचा फार आभारी आहें. त्या (सातारच्या) राजाला गादीवर बसवितांना, इतक्या कांहीं अटी घातलेल्या होत्या कीं त्या पाहिल्या ह्मणजे त्याला राजा ( Sovereign ) ह्मणतां येणार नाहीं, आश्रित वर्गाला जे नियम लागू आहेत, तेच त्याला लागू झाले पाहिजेत, (ह्मणजे त्याला आमच्या आश्रयानें असलेला असें समजलें पाहिजे) असला कोटिक्रम (argument) उपस्थित होईल असें तुह्मी ह्मणतां तसेंच मला वाटतें. परंतु जे कोणी परकी राजे ( foreign princes) त्याला राजे-पणा (sovereignty) नाहीं अशी तक्रार करीत असतील ते तसें ह्मणत असतील तर ह्मणोत; आह्माला कांहीं तसें ह्मणतां येणार नाहीं. कारण आह्मी त्याच्याशीं जो तहनामा केला आणि ज्यांत त्याणें कोणत्या अटी पाळून राज्याधिकार चालवावा हें ठरविलें, त्याच तहनाम्यांत त्याचा राजेपणा (sovereignty) स्पष्टपणें, प्रतिज्ञापूर्वक (solemnly) कबूल केला आहे. तें असो, तो आमचा आश्रित (dependent) असें घटकाभर ह्मटलें तरी तेवढ्यामुळें, त्याला वारस नसतील तर त्याचा मुलुख ज्याच्या आश्रयास तो राहिला त्याच्याकडे तो बेवारस संबंधानें आलाच पाहिजे असें होत नाहीं, किंवा त्याच्या मालमत्तेला कोण वारस व्हावा हें ठरविण्याचा अधिकार ही त्याला ज्यानें आश्रय दिला त्याला प्राप्त होत नाहीं हा कोटिक्रम पुरा करावयाचा ह्मटलें तर हिंदुस्थानांत सरः अशी वहिवाट आहे आणि तहनामा करणाऱ्या उभयपक्षांचा समज असा आहे असें सिद्ध करून देणें अवश्य आहे. तसें सिद्ध करण्याकरितां विलोबी साहेब आणि त्याच्याच विचारसरणीस अनुसरणारे जे दुसरे कोणी आहेत ते असें ह्मणतात कीं हा

नियम कांहीं आश्रित सरदारांस (dependent chiefs) लागू आहे आणि ह्मणून तो त्या राजाला लागू आहे. पुष्कळ इनामदार, जाहागीरदार, वगैरे लोकांचीं ते उदाहरणें देतात; परंतु ज्याला आह्मी राजा (sovereign ह्मणून कबूल केलें आणि ज्याच्याशीं तह केला आहे त्याला तहनाम्याच्यावेळीं हा नियम लागू केला आहे असें त्यांनां दाखवितां येईल काय? त्या राजाच्या मागें जशा अटी, मर्यादा (limitation) लावल्या आहेत तशाच अटी ज्यांनां लागू आहेत असे पुष्कळ दुसरे राजे आतां आहेत, पण त्यांच्यावर असा अधिकार कधीं चालविलेला नाहीं, चालविण्याचा आव देखील घातला नाहीं, हें त्यांनां नाकबूल करतां येईल काय? शिंदे, निजाम, अयोध्येचा नबाब इत्यादिकांनीं दत्तक घेतले तर ते आह्मी कायम केल्याशिवाय कायदेशीर होणार नाहींत, किंवा दत्तक घेतलेला पुत्र 'वारस' या शब्दाचा अर्थ जसा प्रचारांत आहे त्या प्रमाणें वारस होणार नाहीं, असें पार्लमेंटांत कोणीही ह्मणणार नाहीं तसेंच शिंदे, निजाम, वगैरे घराण्यास संतति नाहींशी झाली तर बेवारस ह्मणून त्यांचीं राज्यें आमच्याकडे येतील असें ही कोणी ह्मणणार नाहीं. ह्मणून साधारण वहिवाट ह्मणून जो हक्क सांगावयाचा तोही ठरत नाहीं.

परंतु आह्माला त्या तहनाम्यावरूनच हक्क प्राप्त झालेले आहेत; त्यांचा विचार स्वतंत्रपणें केला पाहिजे. त्या तहनाम्यांत एक कलम असें आहे कीं महत्वाच्या सर्व गोष्टींत राजानें आमच्या सल्लयाप्रमाणें वागलें पाहिजे. वारस होण्याकरितां पुत्र दत्तक घ्यावयाचा, तर एवढी महत्वाची गोष्ट दुसरी कोणतीच नाहीं. आह्मी नको नको ह्मणत असतां राजानें दत्तक घेतला असता, किंवा आमच्या ज्या काय हरकती असल्या त्या पुढें आणण्यास सवड न देतां लबाडीनें गुपचुप दत्तक घेतला असता, तर त्याणें तह मोडला असें झालें असतें आणि मग त्या अपराधास योग्य अशी शिक्षा देतां आली असती ती तो तहनामा रद्द ह्मणून त्याला दिलेला मुलुख काढून घ्यावा एवढी मोठी ही देतां येती. परंतु अशा प्रकारें त्याणें तहनामा मोडला असें कोणाचेंच ह्मणणें नाहीं.

दुसरें, राजाचा मुलुख आमच्याकडे परत येण्याचा आह्माला हक्क आहे. तो तो बेवारस ह्मणून नव्हे, परंतु त्या तहनाम्यावरूनच आहे. तो असा— आह्मी तो मुलुख त्या राजाला, त्याच्या वारसांनां व त्याच्या मागून गादीवर बसणारांनां दिला. ते नाहींसे झाले ह्मणजे तहनामा संपला आणि तो करण्यापूर्वी जशी स्थिति होती तशी आली. ह्मणून तो मुलुख पुनः आमच्या हातीं आला. अशा प्रसंगीं तेथच्या लोकांचें हिताहित व त्यांची इछा काय आहे हें पहाणें योग्य आहे असें व्होल्ट मार्केंझी साहेबाचें मत आहे तें गैर आहे असें माझें ह्मणणें नाहीं; परंतु त्यांचे हक्क न्यायाचीं जीं मूलतत्वें आहेत त्यांवर स्थापन झालेले आहेत; ह्या तहनाम्यावर स्थापन झालेले नाहींत. तथापि राजाचा मुलुख आमच्याकडे परत यावा ह्मणून आह्मी जो हक्क सांगणार तो त्याचे वारस व त्याच्या मागून गादीवर बसणारे खरोखर अगदीं नाहींसे होतील तेव्हां चालावयाचा आहे; आणि असे कोणी अगदीं नाहींसे झाले कीं काय याचा निकाल त्या देशचा कायदा व लोकरिवाज यांवरून केला पाहिजे, केवळ आमच्या इच्छे प्रमाणें करावयाचा नाहीं.

ह्या प्रश्नाची फार वाटाघाट करून मी पुष्कळ लांचलचक लिहिलें त्यामुळें तुह्माला कंटाळा येईल असें मला वाटतें. परंतु आतां या विषयावर हें माझें शेवटचेंच लिहिणें आहे हें मनांत आणून समाधान मानून घ्या. ह्यूम साहेब पार्लमेंटांत बोलणार, परंतु त्यांनां संधी मिळेल कीं नाहीं याची मला मोठी जबर शंका आहे. कदाचित तसा योग आलाच तर दोनही पक्षांकडून फक्त निरर्थक बडबड पुष्कळ होईल; जो खरा मुद्दा आहे तिकडे कोणाचें लक्ष जाणार नाहीं, त्यावर भाषण होणार नाहीं. कोर्ट आफ प्रोप्रायटर्सपुढें या प्रकरणीं जें काम चाललें व त्यासंबंधानें त्याचा जो रिपोर्ट झाला तो नुकता आतां माझ्यापुढें येऊन पडला आहे. त्याचीं थोडीशीं पानें मी वरवर चाळून पाहिलीं येवढेंच. सुलीव्हान साहेबाचें जें आरंभीं भाषण झालें त्यांत त्या खटल्याची हकीगत चांगली जोरदार तऱ्हेनें सांगितलेली दिसते. मला आणि ग्रँटडफ साहेबाला विचारावें असें त्याणें ह्मटलें आहे, त्यावर कोर्ट आफ

डायरेक्टर्स सहज उत्तर देतील. त्या गोष्टीचा जो निकाल करावयाचा तो उभयपक्षांपैकीं एकाच्या मुक्त्यारांच्या मर्जीला प्राधान्य देऊन तीप्रमाणें करावयाचा नव्हे. तहनामा ज्यांच्यामध्यें झाला त्या उभयतां मुख्य (मालक) असामींनीं त्यांतले शब्द जसे वाचले असतील आणि पसंत केले असतील तसा त्या शब्दांप्रमाणें करावयाचा. प्रधान मंडळाचे मुक्त्यार जर अशा कांहीं नव्या गोष्टी दाखवीत असतील कीं त्यांवरून तहनामा करणाऱ्या उभयपक्षांनीं त्यांत कांहीं मजकूर गर्भित ठेविला होता किंवा अमूक शब्द असे घातले होते कीं त्यांचा साधारण प्रचारांत जो अर्थ असतो त्याहून निराळा अर्थ मनांत आणून ते योजले होते तर मात्र त्यांच्या साक्षीचा उपयोग होईल.

मौं. एल्फिन्स्टन.

दुसरें पत्र.

वाटर्लू हॉटेल

तारीख १३ फेब्रुआरी १८५०

मेहेरबान कोलब्रूक साहेब यांस

ब्रिटिश सरकार व हिंदुस्थानांतील मुख्य मुख्य तद्देशीय संस्थानें (principal native states) यांचा संबंध कसा होता, मुख्यत्वें करून त्यांच्या वारसा संबंधानें व्यवस्था लावण्याचा आह्मांला हक्क कितीसा होता. मी त्या देशांत आलों तेव्हां सामान्यतः या विषयीं मत कसें होतें असा तुमचा प्रश्न: त्याचें उत्तर द्यावयाचें ह्मणजे खुद्द माझा ग्रह कसा होता तें मात्र मला खात्रीनें सांगतां येईल. परंतु मला असा भरंवसा आहे कीं आमचें सरकार आणि तद्देशीय राजेरजवाडे यांच्या दरम्यानच्या कामांत जे कोणी दुसरे लोक होते त्या बहुतेकांचा समज माझ्या प्रमाणेंच होता.

निजाम, पेशवे, शिंदे, होळकर, भोसले इत्यादि मुख्य मुख्य राज्यांशीं आमचा जो संबंध होता तो तीं बरोबरीचीं स्वतंत्र राज्यें ह्मणून होता आणि त्यांच्या गादीवर बसणाऱ्यांच्या वारस प्रकरणांत हात घालण्याचा आह्माला कांहीं अधिकार नव्हता; त्यांच्याशीं आमचे तहनामे झालेले होते त्यांवरून किंवा आमचें राज्य त्यांच्या शेजारीं, ह्मणून आह्माला जो काय हक्क येत होता तेवढा होता.

लॉर्ड हेस्टिंग्ज साहेबाच्या कारकीर्दीत ज्या नवीन राजेरजवाड्यांबराबर दोस्ती झाली त्यांपैकीं पुष्कळांकडून त्याणें असा करार करून घेतला कीं इंग्रज सरकार आमचें वरिष्ठ असें आह्मी ह्मणूं. एवढा त्यांच्या आमच्या संबंधांत नवीन प्रकार झाला आणि मग मुख्य मुख्य राज्यांबराबर [ रजपूत राजांच्या ) जे तहनामे झाले त्यांतल्या कांहींत त्याप्रमाणें कलमें घालण्यांत आलीं. परंतु त्यांवरून त्यांच्या वारसासंबंधीं प्रकरणांत कांहीं फेरफार झाला आणि इंग्रज सरकारचा त्यांत हात शिरला असें दिसत नाहीं. त्या तहनाम्यांचा हेतु राजकीय प्रकरणांत इंग्रज सरकारचें वर्चस्व साधावें इतकाच होता; राजानें आमचा जाहागीरदार व्हावें, आमचा दोस्त ह्मणून हाताखालचा मदतनीस व्हावें, किंवा नोकर, कूळ, ह्मणून ताबेदार व्हावें, असा नव्हता. पर राज्यांशीं जे काय व्यवहार होतील त्या सर्वांत इंग्रज सरकार श्रेष्ठ असावयाचें होतें, परंतु राज्यांतलीं सर्व कामें पूर्वीप्रमाणें ज्याच्या त्याच्या कायद्याप्रमाणें व देशरिवाजाप्रमाणें चालावयाचीं होतीं; त्यांत इंग्रज सरकारानें अगदीं हात घालावयाचा नव्हता. गादीवर कोण बसावयाचा हें ठरवणें हें मला वाटतें आंतलें काम आहे, यांत इंग्रज सरकारास हात घालतां येत नव्हता. त्या राज्याचा परस्परांशीं जो संबंध असेल त्याला त्या योगानें कांहीं बाध येत असेल किंवा देशांतील एकंदर शांततेला बाध येत असेल तर मात्र हात घालतां येता.

मी हिंदुस्थानांत होतों तेव्हां त्या देशांत सर्वत्र असाच समज होता असें

मी समजतों. गादीवर बसलेल्या पुरुषाला त्या गादीचा मालक असें इंग्रज सरकारानें मानणें फार महत्वाचें आहे असें न समजणारें एकही राज्य नव्हतें परंतु आपण वरिष्ठ, अधिपति, ह्मणून गादीवर बसण्याचा वारस ह्मणून हक्क कोणाचा हें ठरविण्याचा अधिकार इंग्रज सरकारास आहे, किंवा एकाद्या राज्य कर्त्या कुलाचा क्षय झाला, त्याला वारस उरला नाहीं, ह्मणून त्याचा मुलुख बेवारस ह्मणून घेण्याचा त्यास कांहीं हक्क सांगतां येईल असें त्या देशांतील राजेरजवाड्यांत कोणा एकाचेही मनांत कधीं आलें नाहीं.

त्या प्रकरणाचा एकंदरींत विचार करतानां वर लिहिल्या प्रमाणें खुद्द माझा पक्का समज झालेला आहे व हिंदुस्थानांत माझ्यावेळेस जे लोक होते त्यांचें मत तसेंच होतें; परंतु त्यांपैकीं आतां जे कोणी हयात असतील त्यांचे विचार आतां जर तसे नसतील, किंवा दुसऱ्या कोणी त्यावेळीं जर माझ्या मताच्या उलट लिहून ठेविलें असेल तर माझ्या मताला कांहीं किंमत असणार नाहीं.

मौं. एल्फिन्स्टन.

डलहौसी साहेबानें हिंदुस्थानांतील राजेरजवाड्यांचीं राज्यें संस्थानें व जाहागिरी बुडवून इंग्रजी राज्य वाढविण्यास आरंभ केला तेव्हां त्याची वाहवा करणारे व त्याच्या मतास अनुमोदन देणारे पुष्कळच उभे राहिले होते. एल्फिन्स्टन साहेबाला तें कांहीं बरें वाटलें नाहीं. औरस संतति नाहीं तर दत्तक घेण्यास अधिकार नाहीं ह्मणून राज्य चालवावयाचें नाहीं हें ह्मणणें किती अयोग्य होतें तें त्याणें स्पष्ट करून दाखविलें. परंतु डलहौसीची सर्वच कृति त्याला अमान्य होती असें नाहीं. त्याच्या सर्व कृत्यांत पंजाब आणि लखनौ (अयोध्या) खालसा करणें हें मुख्य होतें. त्यांत लखनौ बुडविलें हें कांहीं चांगलें केलें नाहीं असें पुढें ज्या गोष्टी घडून आल्या त्यांवरून दिसून आलें. परंतु एल्फिन्स्टन साहेबाला तें कांहीं गैर वाटलें नाहीं. त्यावेळीं त्या

त्या प्रकरणीं झालेले कागदपत्र पाहून त्याला जें वाटलें तें त्याच्या रोजनाम्यांत लिहिलेलें आहे. तें असें—

तारीख २६ आक्टोबर सन १८५५—भोजन झाल्यावर मेलव्हिल साहेबानें डलहौसी साहेबाच्या अयोध्येप्रकरणीं खलित्यांतल्या मुख्य मुख्य गोष्टी वाचल्या. त्याचा रास्तपणा, मितस्तपणा आणि मूलतत्वाला धरून वागणूक, जी त्यांत अगदीं व्यक्त दिसत आहे, ती पाहून मला आनंद आणि आश्चर्य वाटलें.

पुनः पुढच्या वर्षाच्या दिसेंबर महिन्यांत त्याणें असें लिहिलें आहे—

अयोध्याप्रकरणीं निळें blue बुक मी वाचलें आहे. त्याकामीं जो मार्ग स्वीकारण्यांत आला तो न्याय्य होता अशी माझी अगदीं खात्री झाली आहे. राज्याची उलटापालट करावयाची ती अयोध्येच्या लोकांच्या बऱ्याक-रितां, तर आपण त्यांत कांहीं एक ढवळाढवळ नकरतां, आपला हात काढून घेऊन, तेथच्या लोकांनां आपल्याला हवी तशी नवी राज्यव्यवस्था करण्यास सवड द्यावी असें लार्ड डलहौसीचें ह्मणणें होतें त्याप्रमाणें केलें असतें तर बरें झालें असतें. मला असें वाटतें कीं त्यापासून दुसरा कांहीं जरी चांगला परिणाम झाला नसता तरी एवढें दिसून आलें असतें कीं अखेर निकाल करणें आह्मी आपल्यावर घेण्यावांचून गत्यंतर नव्हतें; आणि दुसरें एक स्वतंत्र राज्य खालसा करून आपल्या राज्यांत सामील करण्याचा चटकर ठराव करण्यापेक्षां तें घेण्याचे सर्व शिष्टाचार [ते फक्त शिष्टाचारच दिसते तरी] करणें योग्य झालें असतें.

**एल्फिन्स्टन** साहेबानें कोलब्रूक साहेबाला अयोध्ये प्रकरणीं एक लांब-लचक पत्र लिहिलें. त्यांत वरच्याशिवाय आणखी ही कांहीं गोष्टींचा विचार केला असून दुसऱ्या गृहस्थांचीं मतें कशीं होतीं तें ही सांगितलेलें आहे. अयोध्येच्या स्थितीसंबंधानें असें ह्मटलें आहे—जनरल लो यांच्या ह्मणण्यावर

मी विशेष भरंवसा ठेवितों. तद्देशीय राजेरजवाड्यांच्या कारभारावर त्याची नजर फार मेहेरबानीची असून त्यांचीं राज्यें खालसा करूंनयेत असें ते नेहेमी ह्मणत असतात हें मला माहीत आहे. अयोध्येच्या राज्यकारभाराविषयीं तर ते असें ह्मणत असत कीं तेथचे लोक ह्मणत आमची आहे ही राज्यव्यवस्था कितीही वाईट असली तरी ती पुरवली, परंतु तुमची ती कडक आणि ढवळा-ढवळीची तऱ्हा, चपराशी आणि इतर हलके कामदार यांचा उद्धटपणा आणि जुलूम जबरी आह्माला नको. यापेक्षां ती बरी. तरीपण दहा वर्षांवर कांहीं दिवस लखनौस रेसिडेंटाचें काम केल्यावर आतां त्याचें मत असें अगदीं ठाम झालेलें आहे कीं तेथचें राज्य आहे असें राखणें अशक्य आहे.

पंजाब संबंधानें तारीख ३ एप्रिल १८४६ रोजीं त्याणें कोलब्रूक साहेबास पत्र लिहिलें त्यांत असें आहे— सर एच. हार्डिंग साहेबानें पंजाब घेण्याचा जो ठराव केला तो योग्य केला असें मला वाटतें. जेवढा भाग घेतला तेवढ्याची व्यवस्था आह्माला जशी सहज लावतां आली तशी साऱ्याची लावतां येण्यासारखी असती तर तो सारा घेता तरी बरें होतें. परंतु आह्माला त्यांतला उत्तम भाग तो मिळाला. अफगाण लोकांच्या आणि आमच्यामध्यें एक गरीबसें राज्य असणेंही बरेंच आहे. हालींच्या ह्या व्यवस्थेनें डोंगराळ मुलखांत लढाईचा प्रसंग येण्याचा टळला असेंही बहुधा झालें असेल. शीख लोकांच्या राहिलेल्या मुलखांत निवळ झोटिंग बादशाही होऊंनये अशी तजवीज होईल असें मी समजतों.

या प्रमाणें एल्फिन्स्टन साहेब हिंदुस्थानाविषयींच्या हरएक गोष्टींत मन घालून विचार करीत असे आणि आपल्याला जें काय बरें वाईट दिसेल तें आपल्या रोजनाम्यांत किंवा टिपणांवर लिहून ठेवीत असे. कोलब्रुक साहेबा-सारख्या मित्रमंडळीशीं पत्रव्यवहार होई त्यांतही प्रसंगानुसार तो आपले विचार प्रकट करीत असे. हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेंत फेरफार करण्याचा विचार पार्लमेंटांत सन १८५३ मध्यें निघाला तेव्हां आणि पुढें १८५७ मध्य

बंद होऊन तें मोडल्यावर पुढच्यावर्षी ईस्ट इंडिया कंपनीकडून राज्याधिकार काढून घेऊन तो पार्लमेंटानें खुद्द आपल्या नजरेखालीं राणी साहेबांच्या नांवानें चालवावा असें ठरलें त्यावेळीं जे वादविवाद झाले त्यांवर त्याणें चांगलें लक्ष पुरवून विचार केला. गव्हरनर जनरल यास असलेला अधिकार कमी केला तर कसें होईल, हिंदुस्थानांत असलेलें गोरें सैन्य वाढविलें आणि विलायतेंतील सैन्याशीं त्याचा कांहीं संबंध ठेविला नाहीं, अगदीं तोडून टाकला, तर काय होईल, त्याचें आणि काळ्या फौजेचें प्रमाण कसें असावें, तिची रचना कशी असावी, इत्यादि जे जे प्रश्न निघाले त्या सर्वांचा त्याणें विचार केला. पार्लमेंट आपल्याकडे अधिकार घेऊन तो एकाच मनुष्याच्या हातीं ठेवील तर कशा प्रकारें चालेल त्याचेंही त्याणें भविष्य केलें.

कोलब्रुक साहेबाला लिहिलेल्या एका पत्रांत त्याणें असें ह्मटलें आहे—

खुद्द आमचा सुरक्षितपणा आमच्या हिंदुस्थानांतल्या प्रजेच्या संतोषावर किती अवलंबून आहे याचा विचार केला ह्मणजे आतां नुकतेच जे वादविवाद झाले त्या सर्वांत त्या विषयाच्या ह्या भागावर थोडा तरी जोर देऊन एक ग्लाड्स्टन शिवाय करून नावांजलेल्या वक्त्यांपैकीं कोणी देखील बोलला नाहीं हें खरोखर आश्चर्य आहे. त्यांना बहुतकरून असा भरंवसा वाटत असेल कीं हिंदुस्थानच्या लोकांत सार्वजनिक मत कसें आहे तें हिंदुस्थान सरकार पाहील. परंतु तें सरकार अतिशय बलाढ्य असलें तरी देखील कांहीं उपयोग नाहीं. कारण त्याच सरकारानें इराणाबराबर व चिनाबराबर लढाई करण्याकरितां आणि ज्यांत हिंदुस्थानच्या लोकांचा कांहीं संबंध नाहीं अशा दुसऱ्या पुष्कळ गोष्टी करण्यांत आपण होऊन खर्च केला आणि त्यामुळें पैशाची तूट आली ह्मणून ती भरून काढण्याकरितां हिंदुस्थानावर एक नवा कर (समजा प्राप्तीवर कर) बसविला आणि तो बसवूंनये ह्मणून लोक पुष्कळ ओरडले तरी त्यांच्या हातून काय होणार?

ईस्ट इंडिया कंपनी राज्य करीत असतांना तिच्या कोर्ट आफ डायरेक्टर्सनें गव्हरनर जनरलास राज्य न वाढविण्याविषयीं वरचेवर किती हुकूम केले तरी तो ते मानीत नसे; बोर्ड आफ कंट्रोलचा प्रेसिडेंट असे तोही आपला अधिकार खरा चालवावा तसा चालवीत नसे. त्याच्या आणि कोर्ट आफ डायरेक्टर्सच्या करण्यास मेळ नसे. एकादवेळ गव्हरनर जनरलाला तें कोर्ट हुकूम करी त्याच्या उलट बोर्ड करी, केव्हां तसें नझालें तर त्या बोर्डाचा प्रेसिडेंट गव्हरनर जनरलाबरोबर खासगी पत्रव्यवहार चालवून आपल्या मता प्रमाणें हुकूम करी. त्यामुळें त्याला चांगलेंच फावे आणि कोणाला फारसा नभितां आपल्या मनास येई तसा वागे. तो सर्व प्रकार कंपनीचा अधिकार गेला म्हणजे बंद होणार हें उघड होतें. परंतु मग दुसरेंच भय उपस्थित होणार होतें हें मनांत येऊन एल्फिन्स्टन साहेबानें एका पत्रांत शेवटीं असें लिहिलें आहे—

आतां हें वर लिहिलेलें सर्व बंद होईल. मला जें भय वाटूं लागलें आहे तें चालू काळाबद्दल नव्हे; तें पुढच्या काळाबद्दल आहे. सध्या हिंदुस्थानाकडे सगळ्यांचें लक्ष लागलेलें आहे, परंतु तें जेव्हां तिकडून निघेल आणि दुर्बळ आणि मनसोक्त वर्तन करणारें प्रधानमंडळ अधिकारारूढ होऊन आपल्या निस्सीम भक्तांची हिंदुस्थानच्या राज्यावर नेमणूक करून त्यांना तिकडे पाठवूं लागेल आणि आपल्या पक्षाला बळकटी आणण्याकरितां तिकडच्या जागा त्यांच्याकडून पाहिजे त्याला देववूं लागेल व त्या कामगिरीबदला त्यांणीं कशीं ही बरीं वाईट कृत्यें केलीं तरी तीं संभाळून घेऊं लागेल, तेव्हां कसें होईल हें भय पडलें आहे.

'असला मतलब सिद्धीस जाऊंनये म्हणून तिकडे पृथक नोकरी, परीक्षा चढाओढ, हिंदुस्थानांत आधीं राहिलें पाहिजे ही अट, इत्यादि कितीही जरी आडकाठ्या घातल्या तरी त्यांपासून कांहीं उपयोग होणार नाहीं. लोकांनां केव्हांही मक्ता आवडत नसतो म्हणून आडकाठीचे जे नियम असतील ते जर कोणी मोडूं लागला तर त्याचाच पक्ष ते उचलतील; आणि ते नियम तरी

एकदम कधीं होणार आहेत, ते हळु हळु, कळत न कळत, अमलांत यावयाचे असतील.

'हिंदुस्थानांतलें इंग्लिशांचें राज्य चिरस्थाई झालेलें नाहीं,' हा काडयांचा डोल्हारा आहे,' 'हें कांचेचें घर आहे' इत्यादि व त्यापुढें 'हें मला वाटत होतें त्यापेक्षां बरेंच मजबूद आहे, हें संभाळणारा चतुर असेल तर याचा भंग होण्याचें फारसें भय नको,' अशा तऱ्हेचे उद्गार एल्फिन्स्टन साहेबाच्या तोंडून अनेकवार निघत असल्याचें मागें नमूद झालेलें आहे. आमच्या काळ्या फौजेच्या हातून हें बुडण्याचा प्रसंग येईल असें भविष्य त्याणें एका प्रसंगीं केलें होतें, त्याप्रमाणें सन १८५७ मध्यें काळ्या शिपायांचें भयंकर बंड त्याणें अनुमान केल्याप्रमाणें 'धर्म' ह्या मंत्राच्या प्रेषानें उद्भवून वणव्याप्रमाणें देशभर पसरलें आणि तें मोडण्यास महाप्रयास पडले. त्याची सर्व हकीगत त्याला इतरांप्रमाणें वेळोवेळीं कळतच होती, परंतु ती ऐकून त्याच्या तोंडानें काय शब्द निघत होते, राणी साहेबांनीं जो जाहिरनामा काढला तो त्याला कसा वाटला, इत्यादि गोष्टीं विषयीं त्याच्या रोजनाम्यांत किंवा अन्यत्र त्याचे लेख नाहींत असें बहुधा घडणार नाहीं, परंतु ते आह्मास प्राप्त होत नाहींत. ईस्ट इंडिया कंपनीस गाशा गुंडाळावयास सांगून राणीसाहेबांनीं हिंदुस्थानचें राज्य आपल्या नांवानें चालविण्याचें ठरविलें आणि सर्व अधिकार पार्लमेंटाकडे गेले तेव्हां पुढें कसें होईल याचें ही भविष्य त्याणें केलें. सर्वत्र शांतता झाल्यावर काळें सैन्य किती ठेवावें, त्याची रचना आणि व्यवस्था कशी असावी, गोरी फौज किती असावी, तिचें काळीशीं प्रमाण काय असावें, तिचा विलायतेंतील फौजेशीं संबंध असावा कीं नसावा, हिंदुस्थानाकरितां ह्मणून निराळीच गोरी फौज ठेविली तर नोकरीची मुदत पुरी झाल्यावर तिला विलायतेस परत पाठवून तेथें पेनशन द्यावें, कीं इकडेच रहावयास सांगून हिमालयाच्या थंड हवेंत वसाहती करून रहाण्यास सांगावें, अशा वसाहती झाल्या तर त्यांपासून राज्यास बळकटी येईल कीं अपाय होईल,

कमांडर-इन चीफ व गव्हरनर जनरल यांचा संबंध कसा असावा, वरिष्ठ कोण असावा, इत्यादि महत्वाच्या बहुतेक गोष्टींचा त्याणें विचार केला आणि आपला अभिप्राय आपला मित्र कोलब्रूक साहेब यास पत्रांनीं कळविला जशी काळ्या सैन्याची रीति तशी गोऱ्याची चाळगावयास पाहिजे कीं नको ते बिथरले तर काय करावें मागें असे प्रसंग आले होते कीं नाहीं, याचाही त्याणें विचार केला. या समयीं उभयतांमध्यें पत्रव्यवहार पुष्कळ झाला, तो विचारपरिप्लुत आणि मनोरंजक आहे. याच समयास त्याचा मित्र ग्रांटडफ् साहेब याणेंही सैन्याच्या नवीन रचनेसंबधानें आपलें मत त्यास कळविलें. ते त्याला अनुकूलच होतें.

कंपनीवरून राज्याधिकार काढून पार्लमेंटानें तो आपल्या हातीं घेतला, तो चालवण्यास प्रधानमंडळापैकीं एकाची नेमणूक होईल, तो आणि गव्हरनर जनरल स्वछंद वागतील, त्यांना दहपता कोणी नसल्यानें हिंदुस्थानाचें फार नुकसान होईल, असें एलफिन्स्टन साहेबानें तेव्हांच भविष्य केलें. ईस्ट इंडिया कंपनी स्वार्थ पहाणारी असल्यानें ती हिंदुस्थान आपलें असें समजत होती तेव्हां तिच्या एकट्याच्या हातूनच हिंदुस्थानच्या लोकांचें काय बरें वाईट होत होतें ते होतें, परंतु आतां India for the English ह्मणजे हिंदुस्थान हें इंग्लश लोकांकरितां आहे, ह्या मताचा सर्वत्र प्रसार होत असल्यानें हिंदुस्थानच्या प्रजेच्या हिताशी तिच्या इतकें ही कोणी जपणार नाहीं, याजकरितां एक स्वतंत्र बोर्ड ऑफ कौन्सिल नेमावें, त्यांतले सभासद शक्यत्यास निवडलेले (elected) असावे, निदान त्यांणीं हिंदुस्थानाकरितां जो प्रधान असेल त्याशीं अगदीं कांहीं संबंध न ठेवतां स्वतंत्रपणें काम चालवावें, पुढें तो त्या कौन्सिलांत हिंदुस्थानच्या लोकांस आह्मास घेतलेंच पाहिजे. अशा अर्थाचा त्याचा तारीख २ मार्च १८५८ चा लेख आहे तो इंग्रजींतच खालीं देतों.

The only effectual check that I can see, either on the Governor General or the ministry at home is a Board of Council, formed by election if possible,

but at all events conducting its business entirely separate from the Minister for India. Even if we had such a board there would remain the difficulty of getting members who would take a lively interest in India viewed separately from Great Britain and would attend to the peculiar views and wishes of the natives as well as to their pecuniary interests and strictly legal rights. The company did so to a considerable extent, because it had long regarded India as its own and was strongly opposed to the maxims now in favour of India for the English. Sooner or later, we must introduce natives into the Council itself or at least into the electing body.

याप्रमाणें एल्फिन्स्टन साहेबाचें हिंदुस्थानाविषयीं अगत्य, तत्संबंधी विषयांची त्याची चर्चा, त्याचा विद्याभ्यासंग वगैरे पाहिलें ह्मणजे त्याची प्रकृति यथास्थित असेल असें मनांत येणें सहज आहे. परंतु खरा प्रकार तसा नव्हता. त्याची बुद्धि वगैरे मानसिक शक्ति अखेरपर्यंत बहुतेक कायम होत्या. परंतु शरीरशक्ति उतार वयाबराबर कमी होत गेली आणि एकएक इंद्रिय थकत चाललें. दृष्टि मंदावली; बरेच दिवस दुसऱ्याला वाचावयास लावून ऐकावें लागूं लागलें. कर्ण बधिर झाले, त्यामुळें दुसऱ्याबराबर संभाषण सहजच कमी होऊं लागलें. शब्दही कमी पडला आणि निद्रा अधिक ग्रासूं लागली. परंतु अशी शरीरावस्था झाली ह्मणून तो कांहीं खिन्न होऊन कधीं तीं रड गात बसला नाहीं. आपले आप्त इष्ट गेले आणि आपण एकटे राहिलों ह्मणून मात्र त्याला वाईट वाटत असे. त्याच्या सात भावंडांपैकीं एक बहीण उरली होती ती सन १८४८ च्या आगस्ट महिन्यांत वारली. तेथून पुढच्या रोजनाम्यांत पुष्कळ स्नेही मंडळी गेल्याचें लिहिलेलें आहे. सन १८५८ मध्यें त्याणें लंडन शहरीं शेवटची खेप केली तेव्हां असें लिहिलें आहे—चालू पिढीच्या लोकांपासून मी किती अगदीं वेगळा आहें हें मला येथें ह्या खेपेला जसें जाणवत आहे तसें पूर्वी कधीं जाणवलें नाहीं. माझे मागच्या ओळखीचे लोक बरेच

नाहींसे होत आहेत इतकेंच नव्हे, त्यांतला एकादा अकस्मात कोठें भेटला तर त्याला पाहून मी दचकल्या सारखा होतों आणि तो अजून जिवंत आहे ह्याचें मला आश्चर्य वाटतें.

ह्याप्रमाणें मनाची स्थिति झाली असल्यानें केव्हां एकादा पूर्वपरिचित मनुष्य भेटला तर त्याला सहजच आनंद वाटे. सन १८५९ च्या जून महिन्यांत त्याची कांहीं आप्त मंडळी त्याला भेटावयास अकस्मात गेली. त्यांत टामसन बाई होती. तिच्या भेटीनें त्याला फारच आनंद झाला. कारण लहानपणींच घर सोडून हिंदुस्थानांत जाण्यापूर्वी जें जें त्याच्या परिचयाचें मनुष्य, स्थळ, किंवा गोष्ट होती त्याची त्याची तिला माहिती होती ह्मणून त्या सर्वांचें स्मरण होऊन तिच्याबरोबर त्यांविषयीं त्याला बोलावयास सांपडलें.

**एल्फिन्स्टन** साहेब आपला रोजनामा अगदीं अखेरपर्यंत लिहीत होता. त्यांत राजकीय, व्यावहारिक वगैरे अनेक विषयांवर त्याचे लेख आहेत मुंबईस असतांना बिशप हीबर याणें त्याची सर्व दिनचर्या पाहिली आणि आपल्याला त्याच्या धर्ममतांविषयीं काय वाटलें तें लिहिलें. तें मागें सांगितलेंच आहे. त्याला कांहीं लोक अगदीं धर्मलंड समजत होते, ती जशी चूक होती तशीच हीबर साहेब त्याला फारच भक्तिमान्, श्रद्धावान, समजत होता ती चूक होती. खरें पाहिलें असतां असें दिसतें कीं त्याच्या तारुण्याच्या काळांत ज्या मताचें प्राबल्य होतें, त्याणें त्यालाही ग्रासलें होतें. तें मत ह्मणजे ईश्वर आहे असें मानावें कीं नाहीं, हा संशय—असें होतें. परंतु कालानुरोधानें त्याला जसजसा अनुभव येत चालला आणि सतत विद्याव्यासंगानें मन सुसंस्कृत होत गेलें तसतसे त्याचे ते विचार पालटत गेले आणि तो खरा भक्तिमान, एकेश्वरवादी झाला. त्याचें वर्तन सुखदुःख समान मानावयाचें असा जो एक तत्वज्ञानांचा पंथ (stoic) आहे त्याच्या नियमास अनुसरूनच होतें. अर्वाचीन धर्म प्रवर्तकांत विशेषतः बटलर, प्याले, आणि लार्डनर यांच्या ग्रंथांचें तो अध्ययन करीत असे आणि दुसऱ्यालाही तेच वाचावयास सांगे. बायबलमध्यें 'पर्वतावरचा धर्मोपदेश' [sermon on the mount] हा त्याला

सर्वांत चांगली वाटे पोपकवीकृत सर्वव्यापी प्रार्थना universal prayer) त्याला जितकी प्रिय होती तितकी दुसरी कोणतीच नव्हती. ती विषयीं त्याच्या रोजनाम्यांत विस्तृत विवेचन आहे. एकदा तर त्याणें ती विषयीं असें लिहिलें आहे.—

तारीख ६ एप्रिल १८४६—Popes Universal Prayer मी आतां नुकती वाचली. आजपर्यंत मी पाठ केलेली अशी पहिली बहुधा हीच. तींतला प्रत्येक शब्द मी मनापासून ह्मणेन असा आहे आणि तींत ज्या गोष्टी नाहींत तो तिचा दोष असें लोक समजतात, त्या तर मला तिचा मोठा गुण वाटतो. इत्यादि

हा लेख बराच विस्तृत आहे, परंतु तो येथें देण्याचें कारण नाहीं.

हल्लीच्या काळांत एकाद्या सरकारी नोकरानें कांहीं काम केलें आणि तें वरिष्ठांस बरेंसें वाटलें ह्मणजे त्याच्यावर पदव्यांचा वर्षाव होतो त्याच्या छातीवर बिल्ल्यांना जागा पुरेनाशी होते. वर्षास दोन दिवस बिल्लेदानाकरितां नेमलेले आहेत. परंतु कंपनीच्या कारकीर्दींत तसल्या मानाची आणि पदवीदानाची इतकी स्वस्ताई नव्हती. एल्फिन्स्टन साहेबाचें नांव इतिहासांत अजरामर झालेलें आहे परंतु त्याच्या मागेंपुढें मानाचीं अक्षरें फारशीं नाहींत. तो ती किंमत कस्पटासमान समजत होता असें नाहीं हे त्याचा मित्र मालकम साहेब यास जेव्हां तसला मान मिळाला तेव्हां त्याणें काढलेले उद्गार मनांत आणले ह्मणजे सहज दिसून येतें. खडकीच्या लढाईनंतर त्याला बारोनेट ही पदवी देण्याचा विचार ठरला होता, परंतु त्याच्या घरच्या मंडळीनें ती नको असें त्याच्या तर्फेनें सांगितलें आणि तें त्यांचें करणें त्याला बरें वाटलें. मालकम साहेबाला C B हा किताब मिळाला तसा त्याला मिळता तर त्याचा आनंद झाला असता असें दिसतें, परंतु तो देण्याचें नांव देखील निघालें नाहीं. त्याला लॉर्ड ही पदवी देण्याचें घाटत असल्याची आफवा उठली होती, परंतु ती खरी होती असें त्याचा चरित्रकार ह्मणत नाहीं. आक्सफर्डच्या विश्वविद्यालयानें

मात्र सन १८३४ मध्यें त्याला D. C. L. ही सन्मानदर्शक पदवी देऊन त्याच्या गुणांचें अभिनंदन केलें.

सन १८५९ मध्यें एलिफन्स्टन साहेबाची प्रकृति बरीच थकली. हूकउड येथें त्याचा एक मित्र त्याला भेटावयास गेला तेव्हां आपल्या स्मृत्यादिक मानसिक शक्ति नष्ट झाल्या ह्मणून त्याला फार वाईट वाटत आहे व जीवित कष्टमय ह्मणून भयप्रद वाटत आहे असें त्याच्या नजरेस आलें. परंतु पुढें थोडक्याच दिवसांत त्या अवस्थेंतून त्याची मुक्तता झाली. अंतकाळीं त्याचे हाल मुळींच झाले नाहींत. तारीख २० नोव्हेंबर सन १८५९ रोजीं रात्रीं त्याला अकस्मात अर्धांगवायूचा झटका येऊन त्याबरोबर तो खालीं पडला. तेव्हां वाजलें काय ह्मणून पाहण्याकरितां त्याचा चाकर आंत गेला तों तो बेशुद्ध झालेला होता. पुढें थोड्याच तासांत त्याचें प्राणोत्क्रमण झालें. हूकउड जवळच लिंप्सफील्डच्या स्मशानभूमींत त्याचें प्रेत पुरण्यांत आलें. त्याचा पुतण्या लॉर्ड एलिफन्स्टन मुंबईचा गव्हरनर झाला होता, त्याची इच्छा आपलें प्रेत काकाच्याच शेजारीं पुरवें अशी होती, तीप्रमाणें पुढें थोड्याच वर्षांनीं तसें घडून आलें.

**एलिफन्स्टन** साहेबाच्या मरणाची वार्ता बाहेर पसरल्यावर, त्याचें स्मारक करण्याचा विचार लागलाच सुरू झाला. पुढें फेब्रुआरी महिन्यांत उइं· लिसच्या दिवाणखान्यांत सभा भरली. तींत त्याचें नांव चिरकाल राहे स्मारक करण्याचें ठरलें. त्यावेळचे हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी सर चार्लस उड ड्यूक आफ आर्गाईल, लॉर्ड एलिनबरो व पुढें ज्यां नांव पावले ते लॉर्ड, इत्यादि मोठमोठी इंग्लिश मुत्सद्दी मंडळी, व सर जान लारेन्स, मिस्टर होल्ट मार्केंझी कर्नल साइक्स आणि मिस्टर ग्रँटडफ, हे हिंदुस्थानांत काम केलेले मोठे गृहस्थ त्या सभेस हजर होते. कर्नल साइक्सनें त्याच्या हाताखालीं काम केलेले होतें हिंदुस्थानांत त्याच्यावेळीं असलेला तेवढाच तेथें होता. मिस्टर ग्रांटडफ हा त्याच्या स्नेह्याचा पुत्र होता.

मरण समई एल्फिन्स्टन साहेबाच्या वयाला ८० वर्षे संपून ८१ वें लागलेलें होतें. त्याचा संगमरवरी दगडाचा पुतळा करावा असें ठरून तो नोबल नामक प्रसिद्ध कारागिराकडून करविण्यांत आला आणि त्याची स्थापना सेंट-पालच्या देवळांत झाली. त्याची भर आकाराची तसबीर काढवून ती ओरिएंटल क्लबमध्यें ठेविलेली आहे. मुंबईंत त्याचें स्मारक कसें झालें तें मागें सांगितलेंच आहे.

## उत्तरार्ध समाप्त.

# याच ग्रंथकारानें केलेले इतर ग्रंथ.

विद्यमान एतद्देशीय राज्यें, संस्थानें व जाहागिरी

## यांचा इतिहास.

———o———

ह्यास दक्षिणाप्राईज कमिटीनें २५० रुपये बक्षिस दिले.

## मुंबई व वऱ्हाड येथील मे० डायरेक्टर आफ पब्लिक इन्स्ट्रक्शन यांनीं शाळांस व लायब्रऱ्यांस बक्षीस देण्यास पसंत केलें.

सर्व लोकांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं, आह्मी हा ग्रंथ मोठ्या मेहेनतीनें तयार करून छापला आहे. मनुष्यास स्वदेशाचा इतिहास माहीत असणें किती अवश्य आहे, हें सांगावयास नकोच. हिंदुस्थानास आतां जरी पारतंत्र्य आलें आहे, तरी थोड्या काळापूर्वी बऱ्याच भागास स्वातंत्र्य होतें; तें प्राप्त झालें कसें आणि पुढें गेलें कसें, इंग्रज लोक येथें राज्य कमाऊं लागल्यापासून आजपर्यंत जीं राज्यें बुडालीं व आज जीं कायम आहेत, तीं स्थापणाऱ्या पुरुषांनीं व त्यांच्या वंशजांनीं काय पराक्रम केले; शौर्य, धैर्य, युक्ति, राजकारण, राजनीति न्यायबुद्धि, देशाभिमान, कुलाभिमान, धर्माभिमान इत्यादि गुण त्यांच्या ठायीं कसे वसत होते, हें जाणण्याची ज्यास बुद्धि होणार नाहीं असा पुरुष विरळा. त्यांतही निजाम, गायकवाड, शिंदे, होळकर इत्यादि जीं लहान थोर राज्यें चालू आहेत, त्यांची इंग्रजांशीं गांठ पडल्यापासून कशी स्थिति होत आली आहे, व अशीं एकंदर राज्यें आहेत तरी किती, हें पाहण्याची ज्यास एकदां देखील इच्छा होणार नाहीं असा मनुष्य मिळणारच नाहीं, अशी कल्पना करून आह्मी

हा ग्रंथ तयार केला. तो द. प्रा. कमिटीस फार पसंत पडला. कमिटीचे सेक्रेटरी ह्मणतात "असा ग्रंथ मराठींत नाहीं, ही मोठी अडचण वाटत होती, ती आतां दूर झालेली पाहून लोकांनां खरोखर मोठा संतोष होईल. मराठी ग्रंथसमूहांतही मोठी भर पडेल. ग्रंथाची भाषा शुद्ध आणि साधी आहे." कमिटीचे मेंबर रा. ब. महादेव गोविंद रानडे, नारायण भाई दांडेकर, डॉ० रामकृष्ण गोपाळ भांडारकर, रा० रा० गोपाळ गणेश आगरकर यांनींही पुष्कळ प्रशंसा करून श्रमाच्या मानानें बक्षिस मोठें नाहीं असें ह्मटलें. ज्ञानप्रकाश, ज्ञानचक्षु, सुधारक महाराष्ट्रकोकिळ, व मराठी शालापत्रक यांनीं फार प्रशंसा केली आहे. तर आतां मराठी वाचकांनीं ही सेवा मान्य करून घ्यावी शाळामास्तरांनीं तर हें पुस्तक वाचल्याशिवाय राहूंच नये अशी विनंति आहे. लायब्रऱ्यांनींही याचा संग्रह अवश्य करावा.

पुस्तक डेमी अष्टपत्री सांच्याचें, व पृष्ठें ४३६ आहेत कागद सफेत, जाडा, चिवट, अक्षर उत्तम, बांधणी सुरेख, किंमत २ रुपये बंगीखर्च ३ आणें. पांच प्रती घेतल्यास टपालखर्च पडणार नाहीं. रोख पैसे पाठविल्यास अगर व्हाल्यु पेएबल मागविल्यास पुस्तक रवाना होईल.

कुरुंदवाड. कृ. ब. गोडबोले.

---

# संस्कृत गद्यात्मक रामायण

आपला हा हिंदुस्थान देश ह्मणजे सकलविद्यांचें माहेरघर अशी याची पूर्वापार ख्याति असून आमच्या पूर्वजांची जी प्रौढ संस्कृत

भाषा तिचें रमणीयत्व तर अवर्णिय आहे. आमच्या देशी पंडितांचे पालनकर्ते राजेरजवाडे कालवशेंकरून लोपत चालले, तेव्हां गीर्वाणभाषाध्ययनहीं कमी कमी होऊं लागलें; आणि तसाच क्रम गेल्या पन्नास वर्षांत चालू असता, तर आजला स्थिति काय झाली असती तिचें अनुमान करणेंही कठीण आहे. परंतु तिचा मंजूळ ध्वनि पाश्चात्य पंडितांच्या श्रवणीं पडतांच ते तल्लीन होऊन तिचे निस्सीम भक्त बनत चालले, तसें तिचें नष्टचर्य संपून पुनः गौरव होऊं लागलें. हल्लीं मोठमोठ्या सरकारी शाळांतून तर संस्कृत शिकविणारे स्वतंत्र गुरु असतात. शिकणारांची संख्याही फार मोठी आहे; पूर्वापार चालत आलेल्या शिकविण्याच्या रीतींतही फार अंतर पडलें आहे व विद्यार्थ्यांस अल्पायासानें ज्ञान व्हावें ह्मणून सुलभ ग्रंथ होत आहेत. परंतु एकंदरींत पाहतां अद्यापि गद्यग्रंथांची कमतरता फार आहे व त्यांची अवश्यकता तर मोठी आहे. हें मनांत आणून आह्मी अध्यात्मरामायणावरून श्रीरामकथा गद्यरूपानें लिहून तयार केली; ती कांहीं विद्वान् गहस्थांनीं पाहून विद्यार्थ्यांस फार उपयोगीं पडण्यासारखें पुस्तक होईल असें ह्मटल्यावरून छापविली आहे. मूळग्रंथाची भाषा सुलभ व मनोहर आहे, तीच होतां होईल तेथपर्यंत कायम ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. रचना मात्र बदलली आहे. त्यायोगानें तिचें प्राचीन स्वरूप विकृत न होतां जसेंच्यातसेंच स्पष्ट दिसत आहे.

अध्यात्म हा विषय स्वभावतःच गहन ह्मणून तो अज्जी गाळल आहे. तसेंच पौराणिक कथा ह्मटली ह्मणजे तींत कोठें पाल्हाळ, कोठें द्विरुक्ति, इत्यादि असावयाचें, तें सर्व गाळून व कथाभागही संक्षेपानेंच लिहिला आहे. त्या योगानें वीर, करुण, अद्भुत, इत्यादि रसभरीत; अरण्य, पर्वत, समुद्र, इत्यादि स्थलवर्णनयुक्त व पुत्रप्रेम,

उत्तम बंधुप्रीति, भक्तवात्सल्य इत्यादि अनेक मनोधर्मवर्णनयुक्त हें लहानसें पुस्तक प्रेक्षणीय झालें आहे.

पुस्तकाची किंमत १२ आणे. शिवाय टपालखर्च १ आणा. पाठविले असतां पुस्तक रवाना होईल. १० किंवा त्यांहून जास्त प्रती घेणारास टपालहाशील पडणार नाहीं.

हें पुस्तक संस्कृत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांस फार उपयोगाचें आहे व कितीएक हायस्कुलांतील विद्यार्थी हल्लीं तें शिकत आहेत. यावर खालीं लिहिलेले गृहस्थांकडून अभिप्राय आले आहेत. त्यांत ते हें विद्यार्थ्यांस फार उपयोगीं असें लिहितात.

डॉक्टर रा० गो० भांडारकर. प्रोफेसर डेक्कन कॉलेज.

वे. शा. सं. रा. रामशास्त्री वोडस } महामोहपाध्याय
,, ,, भीमाचार्य झळकीकर } एल्फिन्स्टन कॉलेज.
,, ,, गोविंद शंकर शास्त्री बापट, एल्फिन्स्टन हायस्कूल.
,, ,, गणेशशास्त्री रुकडीकर, राजाराम कालेज.
,, ,, गोविंद वामन पाध्ये, सोलापूर हायस्कूल.
,, ,, वासुदेव शास्त्री खरे, मिरज हायस्कूल.
रा. रा. शिवराम बापूजी परांजपे, संस्कृत प्रोफेसर राजाराम कालेज.
,, ,, नारायण बाळकृष्ण गोडबोले, दक्षिणा प्राईज कमिटीचे से.
,, ,, गणेश व्यंकटेश जोशी बी. ए. संस्कृत टीचर ए. हायस्कूल.
,, ,, अण्णाजी रामचंद्र अत्रे, हेडमास्तर मिरज हायस्कूल.

---

मासल्याकरितां एक लहानसा उतारा खालीं दिला आहे तो पहावा.

## युद्धकांडात्

तदा कुंभकर्णो रावणं प्राह । राक्षसेश्वर यत्कर्म त्वयारब्धं तत्केवलमात्मनाशाय । सीताहरणकाले त्वं भाग्याद्रामेण न दृष्ट आसीः ।

यदि स त्वामिदानीं पश्यति त्वं न जीवसि । रामो न मानुषः । असौ साक्षान्नारायणः सीता भगवती लक्ष्मीः । सा त्वया राक्षसानां विनाशायानीता । महामीनो विषपिंडं निगीर्य यथा पश्चात्तप्यति तथा त्वं रामपत्नीमानीयाद्य किंवा भविष्यतीति पश्चात्तप्यसे । अजानता त्वया यद्यप्यनुचितं कर्म कृतं तथापि तवानुसयाहं रामेण संध्यासे स्वस्थचित्तो भव ॥

कुंभकर्णवचः श्रुत्वा दशग्रीवो भ्रुकुटीविकटानन आसनादुत्पतन्निव जगाद त्वं सुबुद्धिमानिति ज्ञानबोधाय न मया प्रार्थ्यसे । मया कृतमंगीकृत्य यदि रोचते युद्ध्यस्व नोचेन्निद्रावशो भव । अधुना त्वां निद्रा बाधते । रावणं रुष्टं ज्ञात्वा कुंभकर्णस्तूर्णं युद्धाय निर्ययौ । महापर्वतसन्निभः स राक्षसः प्राकारं लंघयित्वा महास्वनेन समुद्रमभिनादयन्वानरान्नुपा भक्षयन्बाहुभ्यां पीडयामास । हरिवाहिन्यां कालांतकमिव भ्रमंतं मुद्गरेण हरींस्ताडयंत पाणिपादेन चूर्णयंतं भक्षयंतं च दृष्ट्वाखिला वानरा दुद्रुवुः । गदापाणिर्बिभीषणस्त दृष्ट्वा महामते भ्रातरि दयां कुरु तवानुजोऽहमित्युक्त्वा चरणौ ननाम । तस्य वृत्तांतं श्रुत्वा तं समालिंग्य कुंभकर्णोऽब्रवीद्वत्स राक्षसानां कुलसंरक्षणार्थं त्वं रामाश्रयेण जीव । त्वं महाभागवतोऽसीति मया पुरा नारदच्छ्रुतम् । तातेदानीं गच्छ मदमत्तविलोचनस्य मे स्वकीयपरकीयविवेकोऽधुना नष्टः । इत्युक्तोऽश्रुमुखो बिभीषणो भ्रातुःपादाव भिवंद्य रामपार्श्वमुपागत्य चिंतापर उपस्थितः कुंभकर्णोऽपि कराभ्यां चरणाभ्यांच हरीन्पेषयन्गंधहस्तिवद्वानरीं सेनां नाशयामास । राघवस्तं दृष्ट्वा क्रुद्धस्तस्मिन्वायव्यास्त्रं चिक्षेप तेन तस्य समुद्गरो दक्षहस्तश्चिच्छिदे । स हस्तोऽनेकान्कपीनर्दयन्भूमौ पतितः । अथ वानरा भयवेपमाना रामकुंभश्रवणयोर्युद्धं पश्यंतस्तूष्णीं बभुवुः

———

## समासचूडामणिः

संस्कृत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांस हें पुस्तक अत्युपयोगीं असल्यानें अगदीं अवश्य लागणारें आहे. किंमत अर्धा आणा. दहा प्रती घेतल्यास टपाल खर्च पडणार नाहीं.

---

## राबिनहुड चरित्र.

इंग्लंड देशांत फार दिवसांमागें राबिनहुड नामक विलक्षण मनुष्य होऊन गेला. त्याचें नांव माहीत नाहीं असा मनुष्य विलायतेंत मिळणारच नाहीं. त्याचे पवाडे लहानथोर सर्व मनुष्यांचे तोंडीं आहेत. त्याचें चरित्र वाचून लहान मुलें आणि मोठीं मनुष्येंही आनंद पावतात, अशा गाजलेल्या व्यक्तीचें नांव, गुण, व कर्म आमच्या देशबांधवांस माहीत असणें अगदीं अवश्य असल्यानें आह्मी एका इंग्रजी ग्रंथावरून हें पुस्तक तयार केलें. ते डे. व्ह. ट्रा. सोसायटीस पसंत पडून तिणें ७५ रुपये बक्षीस देण्याचें ठरविलें, पुस्तकाची किंमत ८ आणे. टपालखर्च १ आणा.

---

## अनाथ पांडुरंग.

दक्षिणा प्राईझ कमिटीनें ३०० रुपये
बक्षीस दिले.

मे० डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शन
यांणीं शाळांस व लायब्ररींयांस बक्षीस
देण्यास पसंत केलेलें पुस्तक.

सर्व लोकांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं आह्मी अनाथपांडुरंग नांवाची ऐतिहासिक कादंबरी इंग्रजीग्रंथाधारें तयार करून

छापिली आहे; तर महाराष्ट्रभाषाभिज्ञ रसिक जनांनीं तिची गोडी अनुभवून पहावी.

आजपर्यंत महाराष्ट्रभाषेमध्यें कादंबऱ्या पुष्कळ प्रसिद्ध झाल्या, परंतु त्यांत इंग्रजींतील ऐतिहासिक कादंबऱ्यांचे धर्तीवर हिंदुस्थानच्या इतिहासांतील कांहीं गोष्टी घेऊन त्यांवर रचलेल्या अशा फार थोड्या हें पाहून आह्मी हा यत्न केला तो कसा काय सिद्धीस गेला ते रा० ब० महादेव गोविंद रानडे व कविराज श्री० राजश्री गणपतराव हरिहर ऊर्फ बापूसाहेब कुरुंदवाडकर या उभय विद्वानांचे अभिप्राय खालीं दिले आहेत ते अवलोकन केले असतां सहज ध्यानांत येईल.

"हें पुस्तक रा० रा० कृ० ब० गोडबोले यांणीं केलेलें समग्र पाहिलें चांगलें साधलें आहे. भाषा सरळ, सुबोध, अस्सल मराठी * * गोष्ट चांगली जुळलेली आहे. अद्भुत व चमत्कारिक प्रसंग सर्वच ठिकाणीं दाखविण्यांत आलें आहेत त्यामुळें गोष्टीचे खरेपणा विषयीं शंका उत्पन्न होते तथापि त्या योगानें रस अधिक चढला आहे

पेंढारीलोकांची चाल, रीत, अनुभव, वगैरे प्रकार ह्या ग्रंथांत चांगले उतरले आहेत.

एकंदरींत पुस्तक फार मोठें झालें आहे, तथापि अलीकडे जीं आपल्या भाषेंत लहान मोठीं नाव्हेलस ( कादंबऱ्या ) झालीं आहेत, त्यांपेक्षां ह्या ग्रंथाची रचना, भाषा व रस, हे गुण अधिक साधले आहेत

रा. गोडबोले आपल्या खर्चानें ग्रंथ छापित असल्यास विशेष खर्चाचें काम आहे. परंतु कांहीं दिवसांनीं तरी ग्रंथाची प्रसिद्धि होऊन लोकाश्रयास पात्र होईल असें वाटतें."

**म. गो. रानडे**

"अनाथपांडुरंग" नांवाची कादंबरी आह्मी दोन वेळ समग्र वाचली. पेशवाईच्या अखेरचा जो धांदलीचा काळ तो दाखविण्याच्या उद्देशानें कवीनें ही लिहिली असावी.

सर्वमान्य विद्वान रा. ब. आनरेबल म. गो. रानडे यांणीं अभिप्राय दिला आहे त्यांत ते ह्मणतात तसेंच अगदीं बराबर आमचहा मत आहे.

मुख्यत्वें करून या कादंबरींतील संविधानकें जागोजाग चमत्कारिक रीतीनें जुळविलीं असल्यामुळें वाचतांना आनंद होतो. पेंढारा वगैरे हलक्या लोकांचें वर्तन तर हुबेहुब मजेदार लिहिलें आहे. या कादंबरींत दोषास जागा थोडी असून गुणास फार आहे यांत संशय नाहीं, ह्मणून ही सर्वांनीं संग्राह्य आहे.

**ग. ह. कुरुंदवाडकर.**

---

दक्षिणा प्राईझ कमिटीचे सेक्रेटरींनीं आपल्या रिपोर्टांत असें लिहिलें आहे—ह्या पुस्तकाची भाषा शुद्ध, अस्सल मराठी आहे. अलीकडे छापखान्यांतून जीं वरचेवर नवीन पुस्तकें बाहेर पडत असतात त्यांच्या सारखी नाहीं. सोन्याच्या समया, अत्तराचे दिवे, रत्नांची रेलचेल, असल्या अतिशयोक्तिवर्णनपूरीत निवळ कल्पित गोष्टीं पेक्षां ऐतिहासिक कादंबरी वाचणें पुष्कळ अधिक उपयोगी आहे. या पुस्तकाची भाषा पाहून मला अतिशय आनंद झाला, हिला मी खरी मराठी ह्मणतों. मराठींत जीं पुस्तकें प्रसिद्ध होत आहेत त्यांत अशी क्वचितच दृष्टीस पडते. ह्या पुस्तकास २५० पासून ३०० पर्यंत बक्षीस द्यावें.

कमिटीचे मेंबर रा. बा. गोपाळराव हरी देशमुख. नारायण भाई दांडेकर. डा० रा० गो० भांडारकर व रा० रा० गो० ग० आगर-

कर या सर्वांनीं चांगले अभिप्राय देऊन २०० रु. बक्षिस देण्याचें ठरविलें.

आजपर्यंत मराठींत ज्या कादंबऱ्या छापून प्रसिद्ध झाल्या आहेत त्यांत एवढी मोठी एक ही नाहीं. ( हिचीं पृष्ठें काव्येतिहासाच्या सांच्याचीं ४२० आहेत ) एवढा मोठा ग्रंथ अंगावर छापण्याचें काम रावबहादुरांनीं ह्मटल्याप्रमाणें फारच खर्चाचें असल्यामुळें बहुत कालपर्यंत अशक्यच वाटत होतें, परंतु कांहीं सवड निघाल्यानें छापून झालें.

दुसरी आवृत्ति छापत आहे.

**कृ. ब. गोडबोले.**

---


## आह्मांकडे खालीं लिहिलेलीं पुस्तकें विक्रीस तयार आहेत.

| | रु. | आ. | ट. ह. आणे. |
|---|---|---|---|
| संस्कृत गद्य रामायण .... .... | ० | १२ | १ |
| संस्कृत गणेशविजय काव्य सर्ग ६ पर्यंत... | ० | ८ | ६ पै |
| भट्टवंश काव्य सर्ग पहिला .... | ० | १ | ६ पै |
| विनायक महात्म्य आर्या, मल्हारी महात्म्य आर्या व ऋकसंहितेच्या अष्टकांची पदसंख्या | ० | ८ | १ |
| ध्रुवाख्यान अभंग टपालहांशीलसह | ० | १ | |
| कृष्णा माहात्म्य संस्कृत | १ | ४ | ४ |
| ,, प्राकृत | | ५ | १ |

दत्तमाहात्म्य प्राकृत ओवीबद्ध किंमत २ रुपये. ट. ह. ४ आणे

दत्त स्तोत्र प्राकृत ओवीबद्ध किंमत १ आणा. ट. ह. अर्धा आणा.

**कुरुंदवाड** **कृष्णाजी बल्लाळ गोडबोले.**